# “प्रगती आणि जिनविजय साप्ताहिकातील स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास”

मराठी विषयातील पीएच.डी.पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**


अभ्यासक

**सौ.मेघा महावीर आलासे**

मार्गदर्शक

**कै.प्रा.डॉ.कन्हैया कुंदप,**


**सन**

२०१६-१७

# प्रतिज्ञापत्र

"प्रगती आणि जिनविजय साप्ताहिकातील स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास" या विषयावरील प्रस्तुत प्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे च्या पीएच.डी. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे. हा प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक

ठिकाण

सौ.मेघा महावीर आलासे

संशोधिका

पद्मप्रिया पद्मावती कॉलनी,
धामणी रोड, नेमिनाथ नगर
सांगली

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,सौ.मेघा महावीर आलासे यांनी "प्रगती आणि जिनविजय साप्ताहिकातील स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास" या विषयावरील प्रबंध लेखनाचे संशोधन कार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

सौ.मेघा महावीर आलासे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्रपणे हा प्रबंध लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील कुठल्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.सदरचा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,, पुणे च्या पीएच.डी. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

दिनांक

ठिकाण

कै.प्रा.डॉ.कन्हैया कुंदप,

मार्गदर्शक

कलासागर, विद्यासागर,
एस.जी.एम.महाविद्यालयासमोर,
कऱ्हाड ४१५१२४.

# मनोगत...........

'प्रगती आणि जिनविजय' हे जैन मराठी नियतकालिक जैन घराघरांत आणि जैन लोकांच्या मनामनात बसलेले आपले वाटणारे जैन पत्रक आहे. लहानपणापासून मी हे नियतकालिक वाचत आणि पाहात आले आहे. दोन पानात घडी घातलेले हे प्रगतीचे रूप पाहाण्यासाठी, वाचण्यासाठी सारे घरच त्याची वाट पाहायचे आणि त्यामुळेच 'प्रगती आणि जिनविजय' बद्दलची उत्सुकता अगदी लहान वयातच मनात पेरली गेली. पुढे त्याचे रूपातर अस्वस्थ रोपात कधी झाले कळलेच नाही. याच अस्वस्थतेतून १०० वर्षात या प्रगतिने काय झेलले, पेलले हे पाहावे असे वाटू लागले. आणि या शंभर वर्षाच्या कालखंडातील विचारांच्या विशाल वृक्षांच्या पारंब्या झोके घेऊ लागल्या. त्यामुळेच विद्यावाचस्पती ही पदवी घ्यावी असा मनात विचार आला आणि समोर दिसू लागल्या प्रगति आणि जिनविजयमधील शंभर वर्षाच्या कालखंडात बावरलेल्या, , थबकलेल्या, , थिजलेल्या, ,फुललेल्या आणि स्त्री स्वातंत्र्यासाठी उत्सुक असलेल्या स्त्रिया.

महानुभावीय साहित्याचे गाढे अभ्यासक आणि थोर विचारवंत माझे गुरूवर्य डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी 'प्रगति आणि जिनविजय' यावर चर्चा केली. जैनांचे जीवन, लालन पालन, आचरण, वर्तन हे सगळे समाजासमोर आले पाहिजे. जैन साहित्य मराठी साहित्याला येऊन मिळाले असले तरी अजून म्हणावे तसे यश त्याला मिळाले नाही. त्यामुळे शंभर वर्षात जैन स्त्रियांच्या जगण्याची, राहण्याची, विचार करण्याची आणि व्यक्त होण्याची पध्दत 'प्रगति आणि जिनविजय' च्या माध्यमातून जर लोकांच्यासमोर आले तर ते मराठी साहित्याला अभिमानास्पद असेल अशा शब्दात त्यांनी माझा आत्मविश्वास वाढविला. त्यामुळे प्रगति आणि जिनविजयमधील शंभर वर्षाच्या स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास करायचा असे मी ठरवले. " एक स्त्री म्हणून स्त्रियांच्या लेखनाकडे बघणे मला जमू शकेल" माझ्या मनाने मला ग्वाही दिली.

सांगली येथे जैन बोर्डिंगच्या परिसरात 'प्रगति आणि जिनविजय' चे ऑफीस आहे. खरे तर बोर्डिंगचाच तो एक भाग आहे. इथेच 'प्रगति आणि जिनविजय' चे अंक छापले जातात. मी सांगलीतच राहाते. त्यामुळे शंभर वर्षातील हे अंक हाताळणे माझ्यासाठी सोपे ठरले. जैन बोर्डिंगच्या ऑफिसमधील श्री जिनेंद्र बुवनाळे यांचे मला खूप सहकार्य लाभले. छान बायर्डिंग केलेले, काही सुटे,,, काही प्लॉस्टिकच्या पिशवीमध्ये व्यवस्थित बांधून ठेवलेले अंक काढणे आणि परत तिजोरीत ठेवणे हे काम न कंटाळता, न थकता जिनेंद्रने केले आहे. सुरुवातीच्या काळातले अंक हे पिवळे पडलेले, जीर्ण झालेले, हात लावताच तुकडे पडतात की काय?... असे वाटणारे होते.या अंकाना हात लावायलाही भीती वाटायची. पण मी ते हळुवारपणे हाताळले. सुरुवातीच्या पंचवीस तीस वर्षातले अंक हे असे हट्टी, दाद लागू न देणारे होते पण नंतरचे अंक हे चांगल्या स्थितीतले होते . हे अंक हाताळताना कुठेही त्रास झाला नाही.१९०२ साली श्री. जिनविजय नावाचे मासिक श्री. आण्णासाहेब लठ्ठे, ,श्री आण्णाप्पा,, श्री.पड्याप्पा चौगुले, , श्री दादा भाऊ निटवे, , श्री आण्णा बाबाजी हंजे,, श्री बाळा आलासे वगैरे निष्ठावंत कार्यकर्त्याच्या प्रेरणेतून सुरू झाले. १९०७ साली श्री भाऊराव बाबाजी लठ्ठे यांनी 'प्रगती' साप्ताहिक सुरू केले. काही कारणास्तव 'श्री जिनविजय' आणि 'प्रगति' बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागल्याने दोन्हीच्या संयोगातून 'प्रगति आणि जिनविजय' नावाचे साप्ताहिक सुरू झाले. जे आजतागायत समाजाला ज्ञान, , प्रबोधन,, दिशा देण्याचे काम करीत आहे.

आज 'प्रगति आणि जिनविजय चा' अभ्यास करताना सुरुवातीचे १९१५ पर्यंतचे अंक उपलब्ध नाहीत. १९१६ पासून १९३१ पर्यंतचेही खूप कमी अंक उपलब्ध झाले आहेत. पण त्यामध्ये १९१६ पासून १९२२ पर्यत स्त्रियांनी काहीच लेखन केले नाही. १९२२ पासून १९३२ पर्यंतच्या १० वर्षाच्या कालखंडातही स्त्रियांनी खूप कमी लेखन केल्याचे आढळते.

१९३३ पासून पुढे मात्र स्त्रियांनी झपाटल्यासारखे लेखन केलेले आहे. १९३३ नंतर भरपूर प्रमाणात अंकही उपलब्ध झाले आहेत. पण तरीही अधले मधले बरेच अंक गहाळ आहेत. काही न वाचता येण्यासारखे आहेत. त्यामुळे या प्रबंधात  न सापडलेल्या किंवा वाचता न आलेल्या अंकांचा विचार करता आला नाही. त्या अंकात ज्या स्त्रियांनी लेखन केले असेल त्यांच्यावर अन्याय

केल्यासारखेच होईल, याची मनाला खंत आहे. पण इलाज नाही. नाईलाजाने त्यांच्या लेखनाचा आढावा इथे घेता आला नाही त्याबद्दल मी त्या लेखिकांची मनःपूर्वक क्षमा मागते.

जे चांगले आहे, सशक्त आहे ते सर्व लेखिकांचे आहे आणि जी उणीव राहिली आहे ती माझी आहे त्याबद्दल मी दिलागिरी व्यक्त करते.

प्रगति आणि जिनविजय च्या सांगली कार्यालयामधील श्री जिनेंद्र बुवनाळे , सुरेश सांगावे, शांतिनाथ चिपरे , महावीर पाटील , किसन माळी वगैरे सर्वाची वेळोवेळी मदत केल्याबद्दल मी आभारी आहे. प्रसिध्द लेखिका नीलम माणगावे यानी मौलिक मार्गदर्शन केले. वेळोवेळी भेटून कामाची चौकशी केली. लागेल ती मदत केली याबद्दल त्याच्या ऋणात राहायला मला आवडेल. डॉ. विलास संगवे यांनी लिहिलेल्या 'दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास' या पुस्तकाचाही संदर्भासाठी खूप उपयोग झाला. डॉ. विलास संगवे यांच्या प्रति मी कृतज्ञता व्यक्त करते. या कामामध्ये माझ्या घरच्यांची मला खूप मदत झाली. माझी मुले पंकज आणि प्रणव या दोघानीही मला मोलाचे सहकार्य, प्रोत्साहन आणि भावनिक आधार दिला. माझे पती महावीर आलासे यांनीही मोलाची मदत केली. हे मी कृतज्ञतेने नमूद करू इच्छिते. माझे सासरे स्व. आण्णासाहेब माझ्या सासूबाई स्व. शालिनी यांचे आशीर्वाद मला प्रेरणादायी होते. माझी आई सौ. पुष्पा, वडील श्री. आण्णासाहेब, भाऊ अतुल, वहिनी सौ. अश्विनी, चि. आदित्य यांची आपुलकीची साथ माझ्या लेखणीला नेहमीच होती.

माझ्या या संशोधनकार्यास गती आणि शुभेच्छा देणारे मित्रपरिवार, आप्तस्वकीय सदस्य आहेत. लठ्ठे एज्युकेशन संस्थेचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे माजी अध्यक्ष, सांगलीचे माजी महापौर मा. सुरेश पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एस. पाटील, डॉ. व्ही. बी. कोडग, उपप्राचार्य एन. डी. बिरनाळे, पर्यवेक्षिका श्रीमती आरगे मॅडम या सर्वाच्या प्रोत्साहनामुळेच माझ्या कामाला गती आली. या सर्वाची मी ऋणी आहे.

माझे हस्तलिखित स्वरूपात असलेले संशोधन लिखाण समजावून घेऊन ते संगणकावरून मुद्रित स्वरूपात तयार करून देण्याचे अत्यंत किचकट काम क्लीरिकल विभागातील श्री. दिपक चौगुले, श्री. शीतल पाटील व श्री. अविनाश पाटील, श्री. पद्मभूषण पाटील या सर्वानी आपुलकीने अहोरात्र राबून

केले. माझा त्रास सहन केला. आमच्या महाविद्यालयातील ग्रंथपाल व इतर सेवक वर्ग, दक्षिण भारत जैन सभेच्या ऑफिसमधील कर्मचारी या सर्वाच्या मोलाच्या मदतीसाठी मी सर्वाचे मनापासून ऋण व्यक्त करते.

याशिवाय अनेकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मला सतत मदत केली. त्या सर्वाचे मी आभार मानते व विस्मरणाने किंवा अनावधानाने काही नावे लिहायची राहिली असल्यास त्यांची क्षमा मागते.

संशोधिका

सौ. मेघा महावीर आलासे

# भूमिका

दक्षिण भारत जैन सभेची स्थापना १८९९ साली झाली. त्यावेळच्या समाजधुरिणांनी सामाजिक परिस्थिती ओळखली. समाजात सुधारणा व्हावी, समाजाची उन्नती व्हावी. धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत समाजाचा विकास व्हावा, समाजात सुबत्ता निर्माण व्हावी, सामाजिक, राजकीय, परिवर्तनाचा झंझावात त्यांना सहज पेलता यावा म्हणून जैन समाज धुरिणांनी, जैन समाजसेवकांनी, विचारवंतांनी सभेची स्थापना केली. हे कार्य अविरतपणे आजपर्यंत चालू आहे.

दक्षिण भारत जैन सभेच्या आज अनेक शाखा उदयाला आलेल्या आहेत. विद्यार्थी वसतिगृहे, श्राविकाश्रम, शैक्षणिक सोयीसाठी शाळा, कॉलेज, नियतकालिक, ग्रंथ प्रकाशन, वीर सेवा दल, पतसंस्था, वीर महिला मंडळ, महिला परिषद, पदवीधर संघटना आदि दृश्य रूपे म्हणजे एक प्रकारची सभेची दैदिप्यमान उन्नतीच म्हणावी लागेल.

सभेच्या अनेक दृश्य रूपांपैकी एक समाज जागृतीचे महत्त्वाचे रूप म्हणजे 'प्रगति आणि जिनविजय' हे नियतकालिक होय.

दक्षिण भारत जैन सभा स्थापन झाल्यावर सुरूवातीच्या काळात श्री.दादा भाऊ निटवे, श्री.आण्णा बाबाजी हंजे, श्री.बाळा आलासे, श्री.आण्णा बाबाजी लट्ठे, श्री.आण्णाप्पा फडयाप्पा चौगुले आदि सभेच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी समाजजागृती घडवून आणण्यासाठी, समाजाला उन्नतीचा मार्ग दाखविण्यासाठी, शिक्षणाभिमुख करण्यासाठी, चुकीच्या रूढी, परंपरा, चालीरीती नष्ट करण्यासाठी १९०२ साली 'श्री जिनविजय' नावाचे मराठी मासिक सुरू केले.

१९०६ साली बेळगावचे रिटायर्ड डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. संगाप्पा मल्लाप्पा अंकले यांच्या सेवायोगाने 'श्री जिनेश्वर' कानडी भाषेत सुरू केले. पण प्रकाशनाचे काम कठीण होऊ लागल्यामुळे प्रतिकूल परिस्थितीत मासिक १९३४ साली बंद करण्यात आले.

१९०७ साली सभेच्या कार्यक्रमांना पोषक म्हणून कुरूंदवाडमध्ये श्री.भाऊराव बाबाजी लट्ठे यांनी 'प्रगती' नावाचे साप्ताहिक सुरू केले. अतिशय कष्टाने हे मासिक ते चालवूही लागले. वर्ग णीदारांची संख्या वाढली नाही. पुरेशा वर्गणीदारांच्या अभावी ते १९१२ साली 'श्री जिनविजय' च्या साप्ताहिकात समाविष्ट केले आणि 'प्रगती आणि जिनविजय' या नव्या रूपाने १९१२ पासून साप्ताहिक पत्र सुरू झाले ते आजपर्यंत अविरतपणे सुरू आहे.

जैन समाजाचे एकमेव मुखपत्र 'प्रगती आणि जिनविजय' हे नव्हे. जैन नियतकालिकांचा इतिहास मोठा लक्षवेधी आहे. जैन नियतकालिकांची संख्याही फार मोठी आहे. मराठी २८, गुजराती ६४, हिंदी २४२, इंग्रजी १६, कन्नड ४, तमिळ ३, बंगाली २ अशी ही जैन नियतकालिकांची संख्या अभिमानास्पद असून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य या नियतकालिकांनी केलेले आहे.

मराठीमध्ये 'प्रगती आणि जिनविजय' च्याही आधी 'जैन बोधक' या साप्ताहिकाची सुरुवात झालेली होती. जैन बोधक हे साप्ताहिक १८८४ साली सुरू झाले. या जैनबोधक साप्ताहिकाला १३० वर्षे पूर्ण झाली असून जैन नियतकालिकांमध्ये या साप्ताहिकानी प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. पुढे मग, प्रगती आणि जिनविजय, सन्मती, तीर्थंकर, श्राविका, जैन जागृती, रत्नत्रय, सार्वधर्म, धर्ममंगल, दिव्यध्वनी, आत्मसागर, दिव्यशक्ती, जैन आचरण, जैन एकता, जैन कासार वार्ता, जैन मंत्र, जैन परंपरा, जैन पथिक, जैन संदेश, वृत्तमाधुरी, वीर सेवा दल वार्तापत्र, ज्ञानशलाका, पंचरंग प्रबोधिनी, अरिहंत वगैरे अशी अनेक नियतकालिके उदयास आली. यापैकी धर्ममंगल, श्राविका, ज्ञानशलाका सारख्या मासिकांची स्थापना तर स्त्रियांनीच केली. संस्थापक, संपादक म्हणून स्त्रियांनीच काम पाहिले. हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

‘प्रगति आणि जिनविजय’ या मासिकाला शंभर वर्षे पूर्ण झाली. अखंड अविरत खळखळणारी विचारधारा समाजापर्यंत पोहोचवणे हे सोपे काम नव्हे. पण प्रगतीने हे शिवधनुष्य पेलले. स्वत:ची प्रगती साधताना समाजाची प्रगतीही केली.

‘प्रगति आणि जिनविजय’ चा शंभर वर्षाचा इतिहास म्हणजे पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक सीमेवर वसलेल्या जैन समाजाच्या आणि समाजाचे प्रतिबिंब उमटलेल्या विचारप्रणालीचा इतिहास आहे. इथला जैन समाज कशारितीने जगतो. त्याच्या चालीरीती परंपरा कशा आहेत. धर्म परंपरा पाळताना अडथळयाचे कोणते टप्पे ‘प्रगती आणि जिनविजय’ साठी शोषक ठरतात. प्रगती होताना अस्वस्थ जाणिवांचे शिलेदार कसे जीवन जगतात हे पाहणे अत्यंत गरजेचे आहे. या शंभर वर्षात इथल्या जैन समाजाच्या विचारप्रणालीत, प्रगतीत जे अमृतमंथन झाले त्याचा आढावा घेतल्यानंतर प्रगतिशिवाय पुढे जाणे शक्यच नाही. आजचा जैन समाज उज्वल अमृताचे कुंभ पेलत आहे आणि म्हणून मराठी साहित्यविश्वात जैन समाजाची देखणी आणि जिवंत जगण्याची कलाकृती शिल्पवत करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. याच कर्तव्यातून हा शंभर वर्षांचा इतिहास तोलून मापून घेता आला.

खरे तरं ‘प्रगति आणि जिनविजय’ हे सामाजिक नियतकालिक आहे. पण धार्मिकतेच्या आवरणात पूर्णपणे गुरफटले गेले आहे. घरात वावरणाऱ्या आणि पुरुषीपणाच्या अहंकारात दबलेल्या स्त्रिया ह्या याच धार्मिक वाटेवर भेटतील असा समज होता पण जसजसे अंक वाचू लागले तसतसे नवनवीन धक्के बसू लागले. विविध विषयावर, विविध विचारांवर, विविध जाणिवांवर या स्त्रियांनी भरपूर लेखन केलेले आहे. विशेष म्हणजे कर्मकांडाना विरोध करणाऱ्या अधिकतर लेखिका ह्या आपल्या मतावर ठाम असणाऱ्या दिसल्या. वैचारिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक सुधारणा घडविणारे परिवर्त नाच्या दिशेने पाऊल टाकणारे लेखन जास्त आढळले. त्यामानाने देव करणारे खूप कमी भेटले.

स्त्रियाचे जीवन, त्यांचे जगणं, समाजातले त्यांचे स्थान, कुटुंबातला त्यांचा दर्जा, राजकारणातला प्रवेश, समाजकारणातला सहभाग, त्यांची उपेक्षा, अवहेलना, पुरुषसत्ताक समाजरचनेतले दुय्यम स्थान आणि या सर्वावर मात करणारी स्त्रियांची जिद्द, चिकाटी, त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती, त्यांचे सुखदु:ख, द्रारिद्रय, त्यांच्यात असणारा चिवटपणा, चिकटपणा, सांभाळून घेण्याची वृत्ती आणि समाजातील अनिष्ट

रूढी परंपरा नष्ट करण्यामागची तळमळ दिसून आली. गैरकारभार करणाऱ्या सामाजिक संस्थांवर आसूड ओढायलाही त्यांनी पुढे मागे बघितले नाही. आपले विचार मोकळेपणाने स्पष्ट, परखड शब्दात त्यांनी मांडले हे विशेष ... पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे समाजाचे प्रतिनिधित्व करत असूनही 'प्रगति' ने ते प्रसिध्द केले.

कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वैचारिक, गीतकाव्य, कथा, विचार, सुविचार, महिला बालसंगोपन, आरोग्य, गृहिणीविषयक सर्व (खाद्यपदार्थ, रांगोळी, फॅशन्स, उखाणे वगैरे सर्व) शिवाय एकांकिका, प्रवासवर्णन, पुस्तकपरिचय, व्यक्तीपरिचय या सगळया विभागात स्त्रियांनी लेखन केले आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने महिला अध्यक्षांनी केलेली भाषणे, विविध बातम्या म्हणजे समाजाचा आलेखच आहे. स्त्री विकासाच्या पाऊलखुणा जपत नवीन पाऊलखुणा उमटवण्याची जबाबदारी आजच्या जैन स्त्री वर्गावर आहे हे निश्चितच!

या प्रबंधाचा अभ्यास करताना वर्णनात्मक स्वरूपात संशोधनाची मांडणी केलेली आहे.१०० वर्षाच्या कालखंडाचा अभ्यास करताना घडून गेलेल्या घटनांचा मागोवा घेणे आवश्यक असल्याने वर्णनात्मक अभ्यास पध्दतीचा अवलंब करून प्रबंधासाठी माहिती संकलित केलेली आहे.

सौ.मेघा आलासे

# अनुक्रमणिका


| प्रकरण नं. | प्रकरणाचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | |
| | प्रतिज्ञापत्र | |
| | मनोगत | |
| | भूमिका | |
| १ | मराठी नियतकालिकांचे स्वरूप, महत्त्व व वाटचाल | १ ते २४ |
| २ | वैचारिक साहित्य स्वरूप आणि जैन वैचारिक साहित्य स्वरूप | २५ ते १०७ |
| ३ | जैन स्त्रियांच्या लेखनातील सामाजिकतेचा विचार | १०८ ते १३६ |
| ४ | जैन स्त्रियांच्या लेखनातील स्त्रीविषयक विचार | १३७ ते १६८ |
| ५ | जैन स्त्रियांच्या लेखनातील वाङ्मयविषयक विचार | १६९ ते २१८ |
| ६ | जैन स्त्रियांच्या लेखनातून प्रकट झालेली भाषाशैली | २१९ ते २३७ |
| ७ | जैन स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचे मराठीला योगदान | २३८ ते २६१ |
| | उपसंहार | २६२ ते २६८ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | २६९ ते २७१ |
| | साधन सूची | २७२ ते २७३ |

## प्रकरण १

# मराठी नियतकालिकांचे स्वरूप, महत्त्व व वाटचाल

१.१ नियतकालिकांचे स्वरूप

१.२ नियतकालिके आणि वाङ्मयेतिहास लेखन

१.३ मराठी नियतकालिकांची प्रेरणा

१.४ मराठी नियतकालिकांचा उदय : परंपरा व स्वरूप

१.५ स्त्री जीवन आणि नियतकालिके

१.६ जैन नियतकालिकांचा इतिहास

१.७ निष्कर्ष

१.८ संदर्भ टीपा

# प्रकरण पहिले

# मराठी नियतकालिकांचे स्वरूप, महत्त्व व वाटचाल

## १.१ नियतकालिकांचे स्वरूप व महत्त्व -

नियतकालिक म्हणजे ठराविक कालच्या अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङ्मय. त्यात तत्कालिक महत्त्वाचे तपशील असतात व काही चिरस्थायी महत्वाचे विषयही आलेले असतात. लौकिक घटना, त्यावरील भाष्य, काही स्फुट जीवनविचार, व्यवहारोपयोगी शास्त्रे आणि विद्या यांची माहिती नियतकालिकांतून असते. 'असा हा एकच मजकूर इष्ट त्या संख्येने, ठराविक वेळी आपल्या वाचकांना सादर करता येणे, हे नियतकालिकांचे मुख्य काम असते'.[१] नियतकालिकांचे आपल्या जीवनातले स्थान महत्वाचे आहे. साप्ताहिके, पाक्षिके आणि मासिके आपणास जीवनाचे चौफेर चित्र दाखवित असतात. नियतकालिके ही जीवनाची मूल्यमीमांसा करतात.

नियतकालिके ही विविध प्रकारची असतात. त्यातील वृत्तपत्रे ही चालू क्षणांशी आपणास जोडतात तर नियतकालिके चालू क्षणाशी थांबत नाहीत ती आपल्या काळाशी आपले नाते जोडून देतात. याअर्थी नियतकालिके वर्तमानाची अपत्ये असतात असे डॉ.व.दि.कुलकर्णी म्हणतात.[२] पुढे ते लिहितात की नियतकालिके ही वर्तमानातूनच जन्मतात, वर्तमानातच ती पुष्ट होतात आणि अखेर वर्तमानालाच ती आशयघन बनवितात[३]. ती वृत्तपत्राइतकी सद्यक्षणांशी बांधलेली नसतात, पण वर्तमानाहून फार दूरही गेलेली नसतात.

सामान्य माणूस नियतकालिक आवडीने वाचतो. तर गंभीर अभ्यासकाला नियतकालिके बौध्दिक विरंगुळा देण्यास सहाय्य करतात. त्याला प्रसन्नता देतात. ग्रंथ हे गुरू होत तर - मासिके - नियतकालिके मित्र होत. नियतकालिके आपणांस जीवनाचे सर्व बाजूनी आवश्यक ते आणि तेवढे दर्शन घडवितात. नियतकालिकांमुळे आपणांस आपल्या काळाची परिमाणे लाभतात. चित्र, संगीत, नाटक, क्रिडा, सारे काही नियतकालिकांतून आपल्या घरात येते. घरात बसून आपण सगळया जगाचे होतो. म्हणूनच नियतकालिकांचे आपल्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण आहे.

नियतकालिकांचा जन्म सामाजिक गरजेतून झालेला दिसून येतो. निरंतरपणे तऱ्हेतऱ्हेचे ज्ञान वाचकांपर्यंत पोहचते करणे हे नियतकालिकांचे मुख्य काम होय. वर्तमानपत्रे व मासिके ही नियतकालिकाची दोन मुख्य रूपे. समाजात घडलेल्या घटना समाजापर्यंत पोहोचवून समाजजागृती करणे हा त्यांचा उद्देश्य असतो. त्यातील ज्ञान जीवनाला सर्वस्पर्शी अंतर्मुख करणारे असते. तरीही नियकालिकाची व्याख्या करणे कठीण आहे. ती परिपूर्ण होईलच असे नाही. नियतकालिकाची व्याख्या करताना प्रा. भा. श्री. परांजपे म्हणतात - "नियतकालिक म्हणजे काळाचे स्वरूप नियमित करणारी एक वस्तू." या व्याख्येत नियतकालिकाचे रूप व अस्तित्वाची मर्यादा निश्चित होते. ही व्याख्या अत्यंत त्रोटक ठरते. वाङ्मय प्रकार कल्पू नये असे क्रोचे म्हणतो, ते येथे पटते. कारण उचित परिपूर्ण व्याख्या करणे हे अवघड काम आहे. एखाद्या साहित्य प्रकाराची व्याख्या जरी नेटकी, नेमकी उचित करता आली नाही तरी, त्याचे घटक सांगून त्यातून त्याचा प्रवाही प्रवाह मात्र आपण दाखवू शकतो हे मात्र खरे. 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास' या आपल्या पुस्तकात डॉ.व.दि.कुलकर्णी नियतकालिकांच्या स्वरूपाविषयी लिहितात - "नियतकालिक म्हणजे ठराविक काळाच्या अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङ्मय होय." हे नियतकालिक जीवनाच्या सर्वा ंगाना स्पर्शून सामान्य माणसाच्या अंतरंगात स्थानापन्न होते. कारण नियतकालिकांतील लेख वाचनीय, सोपे, सुकर असतात.

वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा संबंध वरवर जरी सारखा वाटला तरी तो मूलभूत भिन्न आहे. वृत्तपत्रे ही संग्राह्य नसतात तर नियतकालिके ही बऱ्याच वेळेला संग्राह्य स्वरूपाची असतात. आकार व आशयातही दोन्हीत भिन्नता आहे.

वर्तमानपत्रीय लेख बातमी देतात. नियतकालिक लेख बातमीतून वेध घेण्याचा प्रयत्न करतात व करायला लावतात. एकूण वर्तमानाला परिपुष्ट बनवून त्यातील मर्मज्ञ अपरिहार्यता नोंद करणे हे नियतकालिकाचे मुख्य काम आहे.

नियतकालिके हे प्रचारासाठी व प्रसारासाठी उत्तम साधन साहित्य असून वाचकांपर्यंत घेऊन जाणारे ते एक शब्दरूप प्रभावी माध्यम आहे. सर्व विषयांची गोडी लागणे, वाचकांना जागृत वाचक बनवणे, समाजातील सर्वांगिण ज्ञान देणे हे काम नियतकालिके सहज करतात. कमी वेळात जास्त ज्ञान नियतकालिके देतात. कदाचित ते ज्ञान खोलवर नसून काहीवेळा वरवरचेपण असते. नियतकालिक हे लोकाश्रयावर जगणारे असल्यानेच ते मित्रत्वाचे नाते निर्माण करते.

## १.२ नियतकालिक आणि वाङ्मयेतिहास लेखन -

नियतकालिके ही वाचक आणि लेखक यांच्यामधला प्राथमिक दुवा होण्याचे कार्य करतात. नियतकालिकांतून लेखकाचं साहित्य समाजमनात झिरपत राहतं. वाचक त्याचा स्विकार करतोय किंवा नाही, त्याला ते रूचते आहे किंवा नाही याचा अंदाज येऊ शकतो. वेगवेगळया नियतकालिकांतून साहित्य प्रकाशित झाल्याने वेगवेगळया थरातल्या वाचकांपर्यंत तो लेखक पोहोचतो. त्याला प्रसंगी साद, प्रतिसाद किंवा नकारही मिळतो. त्या लेखकाचं नियतकालिकात विखुरलेलं साहित्य एकत्रितपणे संग्रहाच्या रूपाने प्रकाशक वाचकांना सादर करतो. नियतकालिके ग्रंथव्यवहारात एखाद्या किल्ल्याच्या तटबंदीप्रमाणे कार्य करीत असतात.[४] असे श्री.प्रदीप कर्णिक म्हणतात. याचा अर्थ संपादक, प्रकाशक व लेखकाची बाजू घेऊन लढत असतात. काही ग्रंथ नियकालिकांतून क्रमश: प्रकाशित होतात, त्यांनाच हा लाभ मिळतो.

एकांकिका, कथा, कविता, लेख याबाबतीत त्यांना नियतकालिकांची 'तटबंदी' लाभते कारण नियकालिकांत प्रामुख्याने याच गोष्टी छापल्या जातात. काही वेळा क्रमश: कादंबरी, नाटक छापले जाते पण त्यांना नियतकालिकाची तटबंदी फारशी लाभत नाही असेच म्हणावे लागेल. मराठीतील 'वासूनाका' कादंबरी, 'सखाराम बाईंडर', 'गिधाडे' यासारखी नाटके टीकेच्या भक्ष्यस्थानी पडली, ती त्यांना नियतकालिकांची ढाल नव्हती म्हणूनच. विद्याधर पुंडलिकांच्या 'सती' कथेविरूध्दच्या लोकप्रक्षोभाला 'सत्यकथा' हे नियतकालिक भक्कम उभे राहिले पण सर्वच नियतकालिकं आपल्या लेखकांच्या भोवती तटबंदी उभारतात असे नाही.

नियतकालिकांच वाङ्मय क्षेत्रात बरेच मोठे योगदान आहे. नियतकालिकांतून प्रसिध्द होणाऱ्या साहित्यावर साधकबाधक चर्चा घडत असते. ही चर्चा कधी समीक्षक करतात तर कधी सुजाण वाचक करत असतात. काहीवेळा स्वत: लेखकही चर्चेत सहभागी होतो. ही चर्चा पुस्तकनिर्मितीचा मार्ग खुला करते. वाचकांची वैचारिक बैठक तयार करण्याचं कार्य अशा चर्चा करीत असतात. या चर्चतून वाचकांची लेखनाची मागणी कळते, आवड समजते. पण खरा घडतो तो लेखक! आपल्या लेखनातील चुका त्याला सुधारता येतात, दुरूस्त करता येतात त्या नियतकालिकांमुळे.

नियतकालिकांना व्यासंगी व जाणकार संपादकाची गरज असते. संपादकीय संस्कार करून संपादक, लेखकाचं साहित्य दर्जेदार करून घेऊ शकतो. म्हणून अनेक लेखकांवर संपादकीय ऋण

असते. नियतकालिकांमुळे संपादकीय संस्कार घडलेलं साहित्य आयतं मिळतं आणि त्यामुळे ग्रंथालयेही समृध्द होतात.

नियतकालिक त्या त्या काळाचा ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून प्रचंड मोलाचं कार्य बजावत असतात. त्या त्या काळाचा इतिहास नियतकालिकांतून हमखास मिळतोच. सर्वच नियतकालिके इतिहासाच्या दृष्टीने काही ना काही कार्य करीतच असतात. त्या दृष्टीने वर्तमानपत्रं, सांजदैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, व्दैमासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक, अनियतकालिक, हस्तलिखीत, चक्रमुद्रीत नियतकालिक आणि भित्तीपत्रकही महत्वाचे योगदान देत आली आहेत.

एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकातील साहित्य आणि वर्तमानपत्रातील साहित्य यात फरक असतो. वर्तमानपत्रातून प्रसिध्द होणारे साहित्य अनेकदा चांगले असूनही काळाच्या महिम्यात विरून जाते. पण मासिकाची चर्चा महिनाभर होत असते. ते जाणकारांच्या हातात जाते, त्यामुळे त्यातील साहित्याची चर्चा घडते. वर्तमानपत्रांना स्पर्धेत टिकण्यासाठी स्फोटक विषय हवे असतात. त्यात दर्जेदार लेखन कोपऱ्यात जात. वृत्तपत्रे राजकीय स्वरूपाची असल्याने साहित्याची बूज फारशी राखली जात नाही.

साप्ताहिकं, पाक्षिकं यांचा धागा वर्तमानाशी समांतरच चालत आला आहे. आठवडयात किंवा पंधरा दिवसांत जे घडले आहे, त्याचा आढावा घेण्याचा उद्देश्य यांचा असतो. आठवडयातील राजकीय विषय त्यांच्या दृष्टीने महत्वाचा असतो. तेथे साहित्याला जागा नसते.

या दोन्हीत जीव न रमणारा गंभीर लेखकवर्ग मासिकात रमतो. मासिक, व्दैमासिक, त्रैमासिक उत्तम साहित्य देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. यातील साहित्य ग्रंथरूपाने प्रसिध्द होण्यासाठी लेखक, वाचक, प्रकाशक उत्सुक असतो.

नियतकालिकांचे विविध प्रकार आहेत. केवळ साहित्याला वाहिलेली नियतकालिके आहेत, तशी काही ठराविक विषयांना वाहिलेली पण नियतकालिके आहेत. तर काही नियतकालिके ग्रंथप्रसाराचे उद्दीष्ट कार्य नजरेसमोर ठेवून चालविली जातात. नियतकालिकांचे तीन स्तर आहेत.

१) संशोधनपर नियतकालिके

२) दर्जेदार साहित्य प्रकाशित करणारी -
ललित व ललितेतर नियतकालिके

३) मनोरंजनपर रंजक साहित्य प्रकाशित करणारी नियतकालिके

आज नियतकालिकांचा प्रवाह क्षीण झाला आहे. कालचे साहित्य आजचे वास्तव आहे. हे वास्तव की, ज्याला एक इतिहास आहे, दीर्घ परंपरा आहे. त्याचे जतन करायचे असेल तर नियतकालिके जपली पाहिजेत. त्यांचे सर्वेक्षण होणे, त्यांना पुन्हा संजिवनी देणे गरजेचे आहे. विषयवार, लेखकवार, नियतकालिकांच्या सूची प्रसिध्द केल्या आहेत. मराठी नियतकालिकांच्या सूचीचा आवाका प्रचंड मोठा आहे. 'आणखी एकतरी सूची मंडळ हवे' या लेखात शरद साठे म्हणतात - 'ही साधने जेव्हा तयार होतील, तेव्हांच वाङ्मयाचा इतिहास खऱ्या अर्थाने लिहिता येई ल.'[५]

आज वाङ्मयाचा इतिहास कसा लिहिला गेलाय? तर ग्रंथरूपाने जे साहित्य उपलब्ध आहे, त्याच्या आधाराने हा इतिहास लिहिला गेला आहे. ज्यांचे साहित्य ग्रंथरूपाने प्रसिध्द नाही, त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यांची दखल इतिहास लेखकांनी घेतली पाहिजे. बऱ्याच कवींचे, कथाकारांचे, निबंधकारांचे लेखन केवळ नियतकालिकांतून प्रसिध्द झाले आहे. म्हणून नियतकालिके इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचा दूवा, पुरावा ठरतात.

इतिहास म्हटला की आपण फक्त वाङ्मयाचा इतिहास पाहतो हे चूक आहे. सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, आरोग्य, कला, खेळ इ. घटकांचा साकल्याने विचार होणे गरजेचे आहे. त्यासाठी समांतर इतिहास उपलब्ध हवा. आज तसा इतिहास उपलब्ध नाही. तो लेखांच्या स्वरूपात नियतकालिकांत पडून आहे. त्या त्या घटकांचा स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे इतिहास लिहिणे गरजेचे आहे. सभा, व्याख्याने, परिसंवाद, मतमतांतरे, वादंग यांची चर्चा ग्रंथरूपाने व्हावी. हे साहित्य आज फारच अल्पप्रमाणात पुस्तिकेच्या रूपाने उपलब्ध आहे. पण, त्यांची खरी दखल घेतली आहे ती नियतकालिकांनी. व्यासपिठावरून निर्माण झालेल्या साहित्याचा इतिहासही नियतकालिकांतूनच सापडतो. ग्रंथ म्हणजे एकाच वेळी हातात येणारे वाङ्मय, नियतकालिकातून टप्प्याटप्प्याने हे वाङ्मय उपलब्ध होते. यामुळेही नियतकालिकांना वाङ्मय इतिहासात स्थान मिळते. मराठी भाषेच्या गद्यशैलीस वळण लावण्याचे काम ही नियतकालिकांची कामगिरी म्हणावी लागेल. म्हणून वाङ्मयेतिहासाने त्यांची दखल घ्यावी.

ग्रंथव्यवहारात इतिहासाला स्थान आहे. त्यातही नियतकालिकांना महत्वाचे स्थान आहे कारण सर्वच असंग्रहित साहित्य नियतकालिकांतच पडून आहे. म्हणून नियतकालिकांचे वाङ्मयाच्या इतिहासातील स्थान महत्वाचे ठरते.

नियतकालिकातील लेख बोजड नसतात. ते वाचताना विशेष बौध्दिक क्लेश होत नाहीत; उलट थोडा निवांतपणा (रिलॅक्स मूड) ही येऊ शकतो. मन मोकळे होते. ताजे होते म्हणून नियतकालिकांना रसिक वर्ग प्राप्त झाला.

**१.३ मराठी नियतकालिकांची प्रेरणा -**

मराठी माणसाने बाह्यजगाशी नाते फार उशिराने निर्माण केले. १८३२ साली बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' च्या माध्यमातून आपणास प्रथमत: बाह्यजगाशी ओळख करून दिली. या आधी आमच्या वाङ्मयाची दृष्टी परलोकावरच सिमित होती. भक्ती-मुक्तीचा तिला वेध होता. पण बाळशास्त्री जांभेकरांनी आपणांला परलोकातून इहलोकात आणले. सुखी समृध्द जीवनाची आवश्यकता पटवण्यासाठी त्यांनी ठाम निश्चयाने ज्ञान-विज्ञानाच्या अभ्यासाची निकड किती महत्वाची आहे, हे प्रेमाने आणि निश्चयाने पटवून दिले. त्यासाठीचे माध्यम म्हणून त्यांनी नियतकालिकास निवडले. प्रा.डॉ.व.दि.कुलकर्णी आपल्या 'नियतकालिक आणि वाङ्मयेतिहास लेखन' या लेखात म्हणतात की, "नियतकालिक हा वाङ्मय प्रकार आपणाकडे अगदी नवीन होता. इतर वाङ्मयाविष्कार आपणाकडे या ना त्या रूपाने अस्तित्वात होते. काही प्रत्यक्षपणे अवलंबिलेले; तर काही अगदीच परिचित असे! मराठी भाषेत कथा - कादंबरी - नाटक नव्हते; पण संस्कृत मराठी पंडितांना बाणभट्टाची 'कादंबरी', 'शांकुतल' उत्तरामादी विदग्ध नाटयकृती आणि पंचतंत्र - हितोपदेशादी कथासाहित्य नुसते ज्ञात होते असे नाही, तर ते त्यांचे अभिमानाचे विषय होते. पंचतंत्र, हितोपदेश यातून आपणांस थोडीतरी कथा सृष्टी लाभलेली होती. 'लीळाचरित्र' हे महानुभावी चरित्रवाङ्मय, बरवरी (प्रतिज्ञेने इतिहास - कथा पण प्रकृतीने कादंबरी सदृश्य) किंवा नाना फडणीस यांचे आत्मचरित्र अशा रचनाही आपणांकडे झाल्या आहेत पण त्यांचा शोध व प्रकाशन उशिरा झाले. म्हणजे कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र असे गद्य वाङ्मयाविष्कार आपणाकडे होतेच. परंतु नियतकालिक या वाङ्मयाविष्काराला आपणाकडे बादरायण संबंध दाखवण्याइतकाही कोणताच पूर्वकालीन वाङ्मयाविष्कार असल्याचे आढळून येत नाही."[६]

इंग्रजांनी सन १८१८ मध्ये हिंदुस्थानावर आपली सत्ता काबीज केली आणि परकीय ब्रिटीश राजसत्तेचा अंमल चालू झाला. जेता नेहमीच जित्यावर सर्व तऱ्हेने आपले वर्चस्व प्रस्थापित करीत असतो. त्यातूनच आपल्या राज्यव्यवस्थेत चांगले कारकून तयार करण्यासाठी इंग्रजांनी हिंदूस्थानी माणसांसाठी शिक्षणाचा प्रसार केला. पण त्यामुळे एक गोष्ट नक्कीच चांगली झाली ती म्हणजे

शिक्षणामुळे आमच्या गुणदोषांची पारख आम्हांला झाली. आमचे भले कशात आहे याची जाणीव होऊन पाश्चात्य संस्कृतीतील उपयुक्त गोष्टी आम्ही आत्मसात केल्या. त्यामुळे दोन्ही संस्कृतीतील जे लाभदायक ते आम्ही आत्मसात केले. म्हणूनच त्याचा अविष्कार म्हणजे आधुनिक गद्य होय. तर विशेषकरून आधुनिक पद्य प्रकार होय. या बरोबरच आम्ही इंग्रजीतील नियतकालिक हा प्रकार स्विकारला आहे.

प्रा.भा.श्री.परांजपे नियतकालिकांची प्रेरणा सांगताना लिहितात की, - "एकोणिसाव्या शतकात - छापण्याची कला आणि हळूहळू मुद्रण संस्कार घडविणारे, छापणारे निर्माण होऊ लागले. मुद्रण हा व्यवसाय म्हणून करणारा व त्याची गरज भागविणारा परस्परसंबंध वर्ग जन्माला आला. गद्यातील व्यवहारही याच वेळी निरनिराळया कारणाने वाढीस लागला. व्यापार उद्योगधंदे व आर्थिक उलाढाली समजून घेण्याची हौसही महाराष्ट्रीय लोकात दिसू लागली. परकीय राजवटीच्या संपर्काने भौतिक विद्यांची स्थाने दृग्गोचर होऊ लागली. युरोप खंडाचे वर्तमान वाचकाला सांगणारी बातमीपत्रे आम्हांस वाचावयास मिळू लागली. कळत - नकळत एका औद्योगिक संस्कृतीच्या उंबरठयापाशी आपण येऊन पोचलो आहोत, याचीही जाणीव झाली आणि त्या संस्कृतीचे व त्यातील ऐहिक विज्ञाननिष्ठेचे आपण स्वागत केले पाहिजे हे ही आमच्यातील विचारवंत व पुढारलेल्या वर्गाच्या लक्षात येऊ लागले. भूतकाळाचा परिचय देणारे 'इतिहास लेखन' आणि भविष्यकाळाचा छेद घेऊ पाहणारे 'ज्योतिषविज्ञान' याच्याहून अगदी वेगळे आणि केवळ वर्तमानकाळाची घडामोड शब्दबध्द करणारे लेखन, मुद्रणाच्या सहाय्याने गद्याच्या रूपात महाराष्ट्रात साकार झाले. हीच आजच्या नियतकालिकांच्या उगमाची प्रेरणा ठरली."[७]

थोडक्यात इंग्रजी राजवटीत ज्या अनेक सुधारणा झाल्या त्यातूनच आम्हांला नियतकालिक हा प्रवाह प्राप्त झाला. हा वाङ्मय प्रवाह आमच्याकडे नव्हता. दैनंदिन घडामोडींशी संबंधीत असणारा विशिष्ट काळातील घटनोपघटनांचा माहितीवजा ऐवज पुरवणारा हा वाङ्मयप्रकार म्हणजे वैचारिक क्रांतीतून समाजसुधारणेचा एक सुप्त पण प्रक्षोभक स्त्रोत होता. विविध विषयांचे ज्ञानदान देणारा वर्तमानात कालबध्द झालेला वाङ्मय प्रकार म्हणजे नियतकालिक होय. वर्तमानपत्र आणि नियतकालिके या संदर्भात डॉ.व.दि.कुलकर्णी लिहितात - "मराठी वर्तमानपत्राचा जन्म हा शून्यतेकडून झालेला नाही; तो ज्ञानातून आणि ज्ञानासाठी, ज्ञानप्रकाश - फैलावण्यासाठी झालेला आहे. ज्ञानसंग्रह, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानप्रसार हे त्यांचे हेतू आहेत. इंग्रजी राजवटीच्या

प्रारंभकाळीच सार्वजनिक शिक्षण खात्याबरोबर लोकशिक्षणाचे एक साधन म्हणून वृत्तपत्रांचा अवतार झाला."[८] हेच नियतकालिकांच्या संदर्भात लागू होते.

## १.४ मराठी नियतकालिकांचा उदय : परंपरा व स्वरूप -

नियतकालिकांचे दोन मुख्य प्रकार पडतात ते म्हणजे वृत्तपत्रे आणि मासिके होय. लोकशाहीमध्ये या दोन प्रसारमाध्यमांना असामान्य महत्व प्राप्त झालेले आहे. लोकांचा ज्ञानसंग्रह वाढवून त्यांना लोकशिक्षण देणे तसेच त्यातून समाजप्रबोधन करणे या गरजेतून नियतकालिकांचा जन्म झालेला आहे. नियतकालिकांच्या प्रारंभी प्रथम वृत्तपत्रे नंतर मासिके असा जन्मक्रम दिसतो. वृत्तपत्रांचा जन्म - उदय कसा झाला ते थोडक्यात आपण पाहूया. इंग्रजांच्या राजवटीत शिक्षण प्रसाराबरोबर नवविचारांची जी जागृती झाली तिला मराठी भाषेतील नियतकालिके फारच उपयुक्त ठरली. ठराविक काळानंतर म्हणजे सात दिवसांनी, पंधरा दिवसांनी, एक महिन्यानंतर, तीन महिन्यानंतर, एक वर्षानी वा दररोज प्रसिध्द होणाऱ्या मुद्रित लेखनास साधारणपणे 'नियतकालिक' म्हणतात. वस्तुत: मुद्रणाच्या शोधामुळे 'गद्याचा' प्रसार झाला. युरोपिय संस्कृतीच्या प्रसाराबरोबर भौतिक विद्या, स्वातंत्र्य राष्ट्र, मानवी हक्क, बंधुत्व इ. क्षेत्रात नवीन विचार सुरू झाले. मुद्रण कला व वृत्तपत्र यांचे उगमस्थान आशियातील 'चीन' हा देश असला तरी प्रगतीच्या व परंपरेच्या दृष्टीनी आपण युरोपीय विशेषत: इंग्रजी भाष्य व वाङ्मय यांच्याशी संबंधित होतो. पोर्तुगीज जेजुईट या मिशनऱ्यांनी सोळाव्या शतकात हिंदुस्थानात पहिला छापखाना घातला. मुद्रण व्यवहारामुळे ग्रंथ छापले जाऊ लागले. इंग्रज मिशनऱ्यांनी इंग्रजी भाषेत नियतकालिके सुरू केली. कलकत्ता येथे सन १७८० मध्ये हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र 'हिकीज गॅझेट' (Hikeys Gazette) निघाले. आणि मुंबई येथे सन १७८९ मध्ये बॉम्बे हेरॉल्ड (Bombay Herald) हे इंग्रज लोकांची करमणूक करण्यासाठी व देश विदेशाच्या बातम्या देण्यासाठी निघाले. बंगाली भाषेत सन १९२३ मध्ये 'समाजदर्पण' हे हिंदुस्थानी भाषेतील पहिले वृत्तपत्र निघाले. नंतर गुजराती भाषेतही 'दर्पण' निघाले आणि सन १८३२ मध्ये मराठीत 'दर्पण' हे इंग्रजी - मराठी साप्ताहिक गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजन व बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले.

- **वृत्तपत्रे -**

आपल्याला घरबसल्या जगातील सर्व क्षेत्रातील ताजी माहिती देणारे व ज्ञानलालसा वाढीस लावणारे अतिमहत्वाचे ज्ञानकेंद्र म्हणजे 'वृत्तपत्र'. वृत्तपत्रांची किंमतही वाजवी असल्याने ते

समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांनाही सहजी प्राप्त होऊ शकते. या वृत्तपत्रात दैनंदिन घडामोडी त्यावरील मते - वादविवाद, आवश्यक तेथे फोटो असतात. संपादकीय अग्रलेख, स्फुट, विवेचन, मनोरंजन काहीवेळा खास पुरवणी अंक, ग्रंथपरिक्षण, व्यक्तिविशेष जाहिराती या माध्यमातून समाजाशी बांधिलकी स्विकारत समाजसेवेचे व्रत अंगिकारले जाते.

<u>मराठी वृत्तपत्रे -</u>

(१) <u>दर्पण</u> - ६ जानेवारी १८३२ साली बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले. 'इंग्रजी व मराठी भाषेतून प्रसिध्द होणारे उपयुक्त असे पत्र' असा गौरव त्याकाळी करण्यात आला. 'स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृध्दी व येथील लोकांचे कल्याण यांविषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे या इच्छेने 'दर्पण' हे वृत्तपत्र छापले गेले.'[९]

विलायतेतील विद्या कलाकौशल्य व हितकारक बातम्या तसेच विदेशींचे हिंदुस्थानातील लोक, धर्म आणि विद्या यासंबंधी विचार त्यात प्रगट होत. दर्पणाचे संपादकीय धोरण 'नेमस्त पण नि:स्पृह लोकहितवादी व प्रगमगशील' होते. वृत्तपत्र संपादनाचा एक उच्च आदर्श या वृत्तपत्राने घालून दिला. त्यामुळे लोकमान्यतेबरोबरच 'दर्पण'ला राज्यमान्यता मिळाली. परंतु सन १८४० पर्यंतच हे वृत्तपत्र चालले. वार्षिक वर्गणी (२४रू.) भारी असणे, मर्यादित साक्षरता, वाचनाची अभिरूची, ज्ञानलालसेचा समाजातील अभाव त्यामुळे खप मंदावला. तरीही वृत्तपत्रातील त्याचे योगदान मोलाचे ठरते.

(२) <u>मुंबई अखबार</u> -

दर्पणने लोकांच्यात वाचनाची अभिरूची निर्माण केल्यानेच ४ जुलै १८४० ला 'मुंबई अखबार' हे पत्र सुरू झाले. यात विविध प्रांतातील इंग्रजी वार्तांची भाषांतरे येत. पुस्तक अभिप्राय त्या काळातील बहुचर्चित विषय, हवामान, अपघात, मृत्यू, दरोडे यांच्या बातम्या येत. अफगानयुध्दाच्या बातम्या होत्या. लोकोपयोगी विषयावर पत्रे छापली जात असत. पण हे वृत्तपत्रही अल्पजिवी ठरले.

(३) <u>प्रभाकर</u> - २४ ऑक्टोबर १८४१ हा दरमहा १ रूपया वर्गणी असणारे हे पत्र शिळेवर छापले गेले. गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजन यांनी ते चालविले. चटकदार शैलीने आणि सामाजिक सुधारणेच्या पोटतिडीकीने हे पत्र चालविले

जाई. लोकहितवादींची गाजलेली 'शतपत्रे' प्रथम प्रभाकरातूनच प्रसिध्द झाली. या वृत्तपत्रात संपादकीय प्रौढपणा दर्पणच्या तुलनेने कमी होता, पण अभिनिवेष व आव्हानात्मकता त्यात होती. तिखटपणात नेमस्तपणाचा अभाव होता.इंग्रजांविरूध्द लिहिण्याची पध्दत याच पत्राने सुरू केली हे या पत्राचे मोठे योगदान होय. जनजागृतीच्या बाबतीत या पत्राचे विशेष स्थान आहे.

(४) धुमकेतू - भाऊ महाजन यानीच प्रभाकर बरोबर सन १८५३ मध्ये हे वृत्तपत्र सुरू केले. यातून विष्णुबुवा ब्रम्हचारी यांच्यावर कडक टीका करण्यात आली. त्यांच्या 'वेदोक्तधर्म प्रकाश' या ग्रंथातील अनेक दोषस्थळे यातून दाखविण्यात आली. त्याला दिलेले प्रतिउत्तरही धुमकेतूतूनच छापले जाई.

(५) मित्रोदय - हे वृत्तपत्र (साप्ताहिक) पुण्याहून सुरू करण्यात आले. काव्य, छंदशास्त्र व स्वधर्मोत्तेजन हे तीन हेतू धरून चालवण्यात आले. पुण्यातील हे पहिले वृत्तपत्र होते पण ते अल्पायुषी ठरले.

(६) ज्ञानप्रकाश - लोकांना अज्ञान, रूढी, वेडगळ धर्मकल्पना यांच्या अंधारातून दूर काढणाऱ्या वृत्तपत्रांनी प्रकाश वाचक नाव घेणे स्वाभाविक होते. बंगालमध्ये सोमप्रकाश तर महाराष्ट्रात इंदु प्रकाश, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, सूर्योदय, अरूणोदय, प्रभाकर, धुमकेतू अशा नावांची साप्ताहिके निघाली.सन १८४९ मध्ये 'ज्ञानप्रकाश' नावाचे महाराष्ट्राचे पहिले दैनिक वृत्तपत्र दि. १२ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द झाले. पहिली १४ वर्षे हे शिळेवर छापले जाई. सन १८६३ पासून ते टाईपात मराठी व इंग्रजी भाषांत छापले जाऊ लागले. १८५३ पासून हे पत्र प्रत्येक सोमवारी व गुरूवारी छापले जाऊ लागले. 'सत्य - सौख्य - ज्ञान' असे ब्रीद छापलेले असे. पुण्याहून कृष्णाजी त्रिंबक रानडे यांचे हे वृत्तपत्र सुधारणांचा पाठपुरावा करणारे होते. तरीही ज्ञानप्रसार व समकालीन घडामोडीची माहिती दिली जात असे. १९०४ पासून हे साप्ताहिक व दैनिक दोन्ही स्वरूपात प्रसिध्द होऊ लागले. स्त्रियांचे प्रश्न, साहित्य चर्चा यात होती. 'काव्यशास्त्रविनोद' या वाङ्मयीन सदरास लोकप्रियता लाभली. बातम्या, वृत्तांत व रंजकता यामुळे या वृत्तपत्रास सामाजिक व वाङ्मयीन दर्जा लाभला.

(७) ज्ञानोदय - अमेरिकन मिशनने ख्रिस्ती धर्मप्रचारार्थ हे प्रथम मासिक व नंतर साप्ताहिक असे सुरू केले. मिशन कार्याची माहिती हिंदू धर्मातील अनिष्ट चालिरीती, ख्रिस्ताची शिकवण यातून प्रसिध्द होई.

(८) इंदुप्रकाश - प्रभाकरचा अस्त आणि इंदुप्रकाशचा उदय एकाच वेळी झाला. महाराष्ट्रात हे वृत्तपत्र गाजले. मुंबईहून विष्णु परशुराम पंडित यांच्या प्रयत्नाने सन १८६२ मध्ये हे सुरू झाले. बालविवाह, केशवपन, स्त्रीशिक्षण इ. प्रश्नांची विस्तृत चर्चा या पत्रात घडली. इंदुप्रकाश हे त्याकाळच्या सुधारकांचे मुखपत्र ठरले. न्या.रानडे, न्या.चंदावरकर, न्या.तेलंग इ.नी लेखन करून या पत्राची प्रतिष्ठा वाढवली. विद्यापीठीय विव्दानांचे सहाय्य इंदुप्रकाशला मिळाले.

(९) अरूणोदय - सन १८६६ मध्ये जहाल राजकीय विचारांचे हे पत्र श्री.का.धो.फडके यांनी ठाण्याहून सुरू केले. त्यात आवेशमय लेखन होते.

(१०) नेटिव्ह ओपिनियन - रावसाहेब मंडलिक यांनी सन १८६४ मध्ये सुरू केलेल्या पत्रात अभ्यासपूर्ण लेख होते. नेटिव्ह लोकांचे प्रश्न - ते सरकारच्या कानांवर घालणे हाच त्याचा प्रमुख हेतू होता. लेखनशैली भारदस्त, प्रौढ, मार्मिक, सुबोध असल्याने उच्चभ्रू लोकांत या पत्रास प्रतिष्ठा मिळाली.

(११) सुबोध पत्रिका - प्रार्थना समाजाचे हे मुखपत्र १८७३ साली निघाले. समाजकारण व धर्म कारण हीच या पत्राची प्रमुख उद्दिष्टे होती.

(१२) दिनबंधु - सन १८७७ मध्ये म. ज्योतिबा फुले यांच्या प्रेरणेने हे पत्र सुरू झाले. सत्यशोधक समाजाचे हे मुखपत्र होते. दीन - दलित समाजाच्या दैनंदिन प्रश्नांची व त्याबाबतच्या सामाजिक समस्यांची चर्चा दीनबंधुमध्ये येई.

(१३) संदेश - यात आक्रमक अभिनिवेशनात्मक लेखन, वक्रोक्ती, चमत्कृती पूर्ण भाषा सरणी होती. अच्युत कोल्हटकरांचे हे वृत्तपत्र. याबद्दल डॉ.अ.न.देशपांडे म्हणतात, 'लोकांच्या अवधानाची चोरी कशी करावी या विद्येत अच्युतराव निष्णात आहेत.' मोठया अक्षरांचे मथळे देण्याची प्रथा संदेशनेच चालू केली. त्यातील 'वत्सला वहिनींची पत्रे' हे सदर वाचकप्रिय ठरले. वृत्तपत्रे विकत घेऊन वाचण्याची प्रवृत्ती संदेशने वाढवली.

(१४) <u>केसरी</u> - उदंड यश व लोकाश्रय मिळालेले हे वृत्तपत्र लो.टिळक आणि आगरकर यांच्या सहकार्याने चिपळूणकरांनी सुरू केले. सन १८८१ मध्ये हे सुरू झाले. तिघांच्या लेखाने केसरी गर्जू लागला. या वृत्तपत्राबद्दल डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात - " खप, लोकप्रियता, सातत्य, वाङ्मयीन योग्यता, लोकजागृती, निर्माणक्षमता, पारिभाषिक आणि व्यावहारिक स्वरूपाच्या नवनवीन अर्थक्षम शब्दांचा वेळोवेळी पुरवठा करण्यात दाखवलेली तत्परता या सर्व बाबतीत केसरीशी तुल्यबळ ठरेल असे एक तरी वृत्तपत्र सन १८८० पासून आजतागायत मराठी वृत्तपत्रात सापडेल की नाही याची शंकाच आहे." याचवेळी अनेक वृत्तपत्रे जन्माला आली.

(१५) <u>सुधारक</u> - आगरकरांनी केसरीतून निघून काढलेले वृत्तपत्र सन १८८८ मध्ये सुरू झाले. हे वृत्तपत्र सर्वार्थाने सुधारक होते. आगरकरांचा बुध्दीप्रामाण्यवाद, सुधारणावाद सर्व लेखांतून प्रतीत होई. नैमित्तिक, संशोधनात्मक, ऐतिहासिक व सामाजिक सुधारणा विषयक लेख यात येत. स्त्रीजीवना संबंधी लिहिलेले निबंध सुधारकी होते. या पत्राने जीवनदृष्टीबरोबर भाषासौष्ठव व रेखीवपणा शिकवला.

(१६) <u>किरण</u> - सन १८७७ मध्ये महादेव बल्लाळ नामजोशी यांनी हे पत्र साठे व पटवर्धनांच्या सहाय्याने काढले होते. हे पत्र अल्पजीवी ठरले, या पत्राची कामगिरी उल्लेखनीय होती. केसरी मराठा ही पत्रे निघाली त्याची 'किरण' ही पूर्वसूचना होती. सन १८७७ - ७८ चा दुष्काळ व सन १८७८ मधील देशी वृत्तपत्रांवर

निर्बंध घालणारा कायदा या संबंधाने 'किरण' या वृत्तपत्राने सडेतोड टीका केली. दुष्काळाबद्दल आकडेवारी दिली. या पत्राने 'बातमीच्या खरेपणाबद्दलची काळजी घेणे आवश्यक आहे' असा स्पष्ट इशारा दिला होता.

(१७) <u>अन्य वृत्तपत्रे</u> - या शिवाय पुण्यामुंबई बाहेर अनेक वृत्तपत्रांनी जन्म घेतला होता. त्यातील काही दीर्घायुषी ठरलेली वृत्तपत्रे -

* लोककल्याणेच्छ - सन १८७१ - पुणे येथे निघाले. 'गोल्याघुबड' पत्रामुळे हे पत्र गाजले.
* सत्यप्रकाश - १८७७ - मुंबई येथून निघाले. बेने इस्त्रायल समाजाचे हे मुखपत्र होते.
* बेळगांव समाचार - १८६४ - बेळगाव मधून निघाले.

* खानदेश वैभव - १८६८ - धुळे येथून निघाले.
* कोल्हापूरचे - 'ज्ञानसागर' (१८७१)
* सातारचे - 'शुभसूचक' (१८५८)
* रत्नागिरीचे - 'सत्यशोधक' (१८७१)
* सोलापूरचे - 'कल्पतरू'

ही वृत्तपत्रे त्या त्या परिसरात दीर्घायुषी ठरली. महाराष्ट्राबाहेरील

इंदूरचे -" पूर्ण चंद्रोदय "

देवासाचे -"वृत्तलहरी"

धारचे -"वृत्तधारा"

ही वृत्तेही आपले काम करीत होती याशिवाय -

ठाणे -"सूर्योदय "

नासिक -"नासिकवृत्त"

धुळे -"आर्यावर्त "

सातारा -"बोधसुधाकर "

अलिबाग -"सत्यसदन "

गोवा -"देशसुधारेच्छु "

अशीही वृत्तपत्रे होती. या बरोबरच पुणे वैभव,, वेंगुर्लेवृत्त,, वृत्तप्रकाश,, ज्ञानचक्षु इ. वृत्तपत्रे काही काळ आपले काम करीत होती. या सर्व वृत्तपत्रांचा विचार करता प्रस्तुत कालखंडाच्या अखेरीस वृत्तपत्रांची अभिरूची मराठी समाजासाठी पुष्कळच दृढमूल झाली होती. वर्तमान समजून घेणे आणि मते बनिवणे हे समाजाला आवश्यक वाटू लागले होते. त्यामुळे मराठी गद्यशैली बनत जाण्यास मदत झाली व गद्याचे सामर्थ्यही वाढले.वृत्तपत्रे आणि मासिके यानी मराठीतील एका प्रभावी वाडमयप्रकारचे निश्चित रूप धारण केले.निबंधवाडमय समृध्द करण्यास त्यामुळे हातभार लागला.वृत्तपत्र चालविणे हे उदात्त कर्तव्य असल्याची जाणीव तत्कालीन संपादकांना असल्याचे जाणवते.तसेच साधार बातम्या देणे व अकारण निंदा टाळणे याकडे वृत्तपत्रांचा कल होता.तसेच निरनिराळे वाद/प्रश्न चर्चिले, त्यावेळी लेखनाची पातळी कधी कधी खालावलेली जाणवते.

नियतकालिकांचा वाचकवर्ग अगदी मर्यादित होता. मुंबई पुण्याबाहेरही नियतकालिके निघाल्याचे दिसते. विविध विषयांवरील लेखाबरोबरच हवामान,पंचाग,बाजारभाव संपादकीय सूचना व वाचकांचा पत्रव्यवहार ही सदरे होती.

जाहिरात प्रथा फारशी नव्हती. क्वचितच जाहिरात दिसे.

(१८) हरिभाऊंची करमणूक - समाजहित ध्यानात ठेवून लोकांचे मनोरंजन करण्याचे काम हरी नारायण आपटे यांनी सन १८९० मध्ये दसऱ्याच्या मुहुर्तावर 'करमणूक'नावाचे वर्तमानपत्र काढून केले. व्यावहारिक, शास्त्रीय, मनोरंजनात्मक

ज्ञान देणे हा त्याचा हेतू होता. हे पत्र २७ वर्षे चालले. हे वृत्तपत्र सन १९१७ मध्ये बंद पडले.

(१९) काही राष्ट्रीय वृत्तपत्रे - निवंधमाला,केसरी इ. नियतकालिकांनी प्रज्वलित केलेली राष्ट्राभिमानची ज्योत महाराष्ट्रात अनेकांना प्रकाश दाखविणारी ठरली.

श्री. शि. म. परांजपे यांच्या 'काळ' नावच्या वृत्तपत्राने देशभक्तीची व स्वातंत्र्याची जोपासाना उत्तम प्रकारे केली. या पत्रास प्रतिष्ठा मिळाली. हे पत्र १० वर्षे चालले पण मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात स्वातंत्र्याची जोपासना करणारे एक जहाल पत्र म्हणून त्याने नाव कमावले. सन १९०८ साली यामुळेच परांजपे याच्यांवर राजद्रोहाचा खटला भरला गेला.

याचसुमारास 'राष्ट्रभक्त',, 'भाला',, 'देशसेवक', 'वैदभ', 'वऱ्हाडसमाचार', 'बडोदावासल', 'प्रगति', 'मोदवृत्त' इ. वृत्तपत्रेही देशजागृतीचे काम करत होती. याचमुळे यवतमाळचे 'हरिकिशोर, फडकेंचे 'विहरी' व 'अरूणोदय' इस्लापूरचे 'प्रतोद' सोलापूरचे 'स्वराज्य' प्रा. विजापूरकरांचे 'विश्ववृत्त या वृत्तपत्रावर सरकारी खटले झाल्याने ती बंद पडली.

या काळात वृत्तपत्र वाचण्याचे व्यसन लोकांना लागले. यातून 'महाराष्ट्र', लोकसेवक 'ज्ञानसाधान' 'आचार्य,देशसेवक इ वृत्तपत्रे सामाजिक व राजकीय लेखन करू लागली. 'देशसेवक','संशय',,'सुदर्शन',',युगांतर','चाबुक,चाबुकस्वार','राष्ट्रमत', 'रणसंग्राम' यातून अच्यूतराव कोल्हटकरांनी लेखन केले.

**आजच्या काळातील वृत्तपत्रे -**

ना.भि.परूळेकरांनी अमेरिकेत वृत्तत्रशास्त्राचे अध्ययन करून एक नव्या स्वरूपाचे दैनिक 'सकाळ'नावाचे पत्र सुरू केले.ते आजही महत्वाचे आहे.याचबरोबर महाराष्ट्रात अनेक वृत्तपत्रे प्रसिध्द होतात, होत आहेत. 'पुणे समाचार', 'मौज', 'निर्भिड', 'धनुर्धारी,', 'नवामनू' इ.आज विद्यापीठ, शाळा, कॉलेज यातून शिक्षणाचा प्रसार झाला.तेव्हा स्थानिक प्रश्नावर चर्चा करणारी व महत्त्वाची वृत्ते देणारी व मार्गदर्शन करणारी वृत्तपत्रे अनेक आहेत.येथे त्या सर्व वृत्तपत्रांची सूची देणे शक्य नाही व आवश्यकताही नाही.तरीही काही प्रातिनिधिक नावे पुढीलप्रमाणे -

१. रत्नागिरीचे - 'बळवंत' व 'सत्यशोधक'

२. सातारचे - 'ऐक्य', ',समर्थ' ,व 'श्रीशाहू'

३. अमरावती - 'उदय' व ' स्वतंत्र हिदुस्थान'

४. सावंतवाडीचे - 'वैनतेय'

५. कुलाब्याचे - 'कुलाबा समाचार'

६. सोलापूरचे - 'कर्मयोगी'

७. नगरचे - 'युगांतर', 'नगरसमाचार'

८. अकोला - 'प्रजापक्ष'

९. सांगली - 'विजय', ',सकाळ'

१०. कोल्हापूर - 'सत्यवादी', ',पुढारी'

११. औरंगाबाद - 'अजिंठा'

१२. जळगाव - 'महाराष्ट्र'

१३. नासिक - 'गावकरी'

१४. मुंबई- 'नवशक्ती,' , 'नवाकाळ,' , 'महाराष्ट्र टाईम्स',, 'लोकसत्ता'

अशा अनेक दैनिकांचे काम चालू आहे.इ.स.२००० साली मराठीत ५४२ मासिके,४४ व्दिमासिके,११७,त्रैमासिके व ११८ वार्षिक प्रकाशित होत होती.[१०]

एकंदरीत मराठी वाङमयाच्या प्रवाहात वृत्तपत्रांनी धर्म, राजकारण, समाजकारण ते करमणूकपर्यन्त यशस्वी मजल मारलेली दिसते.त्यामुळे लेखन,वाचन,अभिरूची संपन्न केली गेली.आपण येथे काही प्रातिनिधीक वृत्तपत्रांचा आढावा घेतला आहे.

## १.५ स्त्रीजीवन आणि नियतकालिके

प्रारंभी नियतकालिकांबरोबर स्त्रीचा संबंध 'एक महत्त्वाचा सामाजिक विषय' म्हणून होता. स्त्री जीवन आणि स्त्रियांचे प्रश्न याकडे समाजाचे लक्ष वेधून घेतले जात होते. त्यानंतर स्त्री वाचक होऊ लागली. स्त्रीचे मानसिक उद्‌बोधन करणे आणि स्त्रीला शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणे, या दृष्टीने प्रयत्न होऊ लागले. नियतकालिक स्त्रियांना उपयुक्त असावे, अशी दृष्टी आली. १८६७ मध्ये सुरू झालेल्या 'विविध ज्ञान विस्तारच्या अंकात' कुलस्त्रिया व गृहस्थ यांच्या करीता उपयुक्त असे घोषवाक्य आहे. यातूनच केवळ स्त्रियांकरीता स्वतंत्र नियतकालिक असावे आणि त्यामध्ये स्त्रियांच्या दृष्टिने महत्त्वाच्या विषयांवर लेखन प्रसिद्ध करावे, ही प्रेरणा निर्माण झाली. या दृष्टिने पहिला प्रयत्न 'स्टुडंट्स लिटररी सायंटिफिक सोसायटीने' केला होता. 'सुमित्र' हे नियतकालिक सदर संस्था प्रसिद्ध करीत होती. (१८५५) 'सुमित्र' प्रसिद्ध करण्यामागील हेतू संपादकांनी पहिल्या अंकात दिला आहे. ''स्त्रियांच्या अंत:करणास उपदेश होऊन त्यांची वर्तणूक सुधारेल अशा प्रकारचे विषय निरंतर दिले जातील''. 'मराठी मुलींचे मासिक' असेही 'सुमित्र' चे वर्णन आहेच.

मुंबईतील सदाशिव ज्ञानेश्वर प्रभू आणि मंडळींनी १८६४ मध्ये 'स्त्रीभूषण' हे स्त्रियांसाठी नियतकालिक सुरू केले. 'सुमित्र' च्या संपादकाप्रमाणे 'स्त्री भूषण' च्या संपादकांनी आपला हेतू स्पष्ट केला आहे. 'स्त्रियांनी ज्ञानसंपन्न होऊन संसार सुखाचा करावा'. हया आपल्या मासिकाचे स्वरूप स्पष्ट करताना त्यांनी जे विषय दिले आहेत त्यातून शिक्षण आणि प्रगत विचार या दोन्ही बाजूंनी स्त्रियांचे उद्‌बोधन करण्याचा हेतू स्पष्ट होतो. हे विषय म्हणजे स्त्रीधर्म, सद्‌गुणी स्त्रियांचे वर्णन, स्त्रीशिक्षण, पाकशास्त्र, स्त्रीकरमणूक, स्त्रियोपचार, स्त्रीगीत, ईश्वरी ज्ञान या प्रकारचे होते.

जानेवारी १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांची 'निबंधमाला' सुरू झाली आणि नियतकालिके प्रारंभीचा प्रायोगिक टप्पा पूर्ण करून सुस्थिर झाली. समाजाची वाचक प्रियता वाढल्याने नियतकालिकांच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झालेली दिसते. १८७४ ते १९१० या पुढच्या कालखंडात ४३ वर्षांमध्ये ५०० नियतकालिके प्रसिद्ध होताना दिसतात. त्यामध्ये स्त्रियांच्या नियतकालिकांची संख्या वाढलेली दिसते. १८६७ ते १८८९ मध्ये स्त्रियांची आणि कौटुंबिक अशी साधारणपणे पंधरा नियतकालिके होती. तर १८९० ते १९१९ या काळात सुमारे बारा नियतकालिकांची त्यामध्ये भर पडली.

नियतकालिकांच्या रूपाने नवे माध्यम आणि लेखनाच्या रूपाने नविन मार्गच स्त्रियांपुढे मोकळा होत होता. परंतू या वाटेवर लेखिका म्हणून स्त्रीने पाऊल टाकण्यासाठी त्यांच्या मानसिक व वैचारिक भरणपोषणाचा प्रारंभीचा काळ जाणे अपरिहार्य होते. हा काळ साधारणपणे १८८५ च्या आसपास संपून स्त्रियांच्या लेखनाला सुरूवात झाली. त्यानंतर स्त्रियांनी संपादनासही प्रारंभ केला. मार्च १८८६ मध्ये 'आर्यभगिनी' हे मासिक सुरू झाले. पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकावरील नोंद फार महत्त्वाची आहे, "हे मासिक मिसेस राधाबाई आत्माराम सगुण यांच्या आश्रयाने स्त्रियांकरिता एका स्त्रीकडून छापून प्रसिद्ध होत आहे"[११]. स्त्री शिक्षण प्रसाराचे साधन स्त्रीने पत्करले असे आपल्या लोकात हे पहिलेच उदा. आहे.

१८९५ मध्ये काशिनाथ रघुनाथ मित्र यांचे मासिक 'मनोरंजन' सुरू झाले आणि स्त्रियांच्या लेखनाला अधिक वाव मिळू लागला. 'कुलस्त्रियांकरिता कुलस्त्रियांनी चालवलेले नूतन मासिक पुस्तक' असे या मासिकाचे वर्णन त्यांनी केले आहे.

साधारणपणे १८९० ते ९५ नंतर लेखिकांच्या संख्येत वाढ होऊन लेखनात गती आणि सातत्य निर्माण झाले. १९०० नंतर लेखनाचा आशय विस्तारला. त्यामध्ये विषयाचे वैविध्य निर्माण झाले. लेखिका म्हणूनही प्रतिष्ठा स्त्रियांना प्राप्त झाली. नियतकालिकांचे प्रयोजन बदलून त्यानुसार अंतरंग बदलले. नियतकालिक हे संपादकाचे माध्यम आहे. तो आपल्या मासिकाला निश्चित चेहरा प्राप्त करून देतो, हे मानले गेले. पुढे 'संपादकीय' अग्रलेखाच्या दर्जापर्यंत याला परिपक्वता आली. 'वनिता विश्व' च्या संपादिका डॉ. चंदुकला हाटे या आपल्या संपादकियात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय घटनांचा वेध घेऊन त्यावर सातत्याने भाष्य करताना दिसतात.

## १.६ जैन नियतकालिकांचा इतिहास

लोकांमध्ये आलेली धर्माविषयीची मरगळ दूर व्हावी, धर्मासंबंधी आस्था निर्माण व्हावी, धर्मा चे ज्ञान द्यावे या हेतूने कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील कुंभोज या खेडेगावच्या प्रगतीशील जैन कार्यकर्त्यांनी 'सद्धर्म मंडळ' या नावाची संस्था इसवी सन १८८८ ला स्थापन केली. तिच्या तर्फे 'सद्धर्म प्रकाश' नावाचा छापखाना सुरू करून विद्या प्रसाराचे काम हाती घेतले गेले. भांडवल उभे करण्यासाठी काढलेल्या पत्रकात 'सद्धर्म मंडळा' ने म्हटले आहे 'विद्येकडे आम्हा जैन धर्मियांचे लक्ष नाही. त्यामुळे आमचे नुकसान होत चालले आहे. आम्ही रानटी अवस्थेत पडलो आहोत. आमच्यातील लोक दुराचारी व दुर्व्यसनी होऊन, लोभी स्वभावाचे होऊन व दुर्जनसेवा

करून आयुष्याचा अपव्यय करीत आहेत'[१२]. भांडवल पाठिंब्याच्या अभावामुळे ही संस्था बंद पडली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील ख्रिस्तेतर धर्मियांमध्ये होत असलेल्या या घडामोडींपासून जैन धर्मिय लोक अलिप्त राहणे शक्य नव्हते. जैन धर्माचे इतरांच्या आक्रमणापासून संरक्षण करणे, जैन संस्कृतीची सर्वांना ओळख करून देणे, जैन तीर्थक्षेत्रे, मंदिरे, ग्रंथ भांडारे यांचे रक्षण करणे, धर्माप्रमाणे आचरण करण्यास जैनांना उद्युक्त करणे इ. कामे जैन धर्महिताच्या दृष्टीने आवश्यक होते. त्यामुळे १८९० च्या सुमारास मथुरा या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी 'भारत वर्षीय दिगंबर जैन महासभा' या संस्थेची स्थापना झाली आणि 'जैनगजर' या आपल्या मुखपत्रातून जैन समाजात नवविचारांच्या प्रसारास सुरुवात केली. या अखिल भारतीय संस्थेच्या धर्तीवर 'मुंबई प्रांतिक दिगंबर जैन सभा' ही प्रादेशिक स्वरूपाची संस्था १८९५ च्या सुमारास मुंबई येथे शेठ माणिकचंद पानचंद जव्हेरी यांच्या अध्यक्षतेखाली गोपालदासजी वरैय्या यांच्या मंत्रीपणाखाली स्थापन झाली. 'जैनमित्र' या मुखपत्राच्याद्वारे विविध भागांतील जैनांना संघटनेचा संदेश या संस्थेनी दिला. याचाच परिणाम सोलापूर शहरात शेठ हिराचंद नेमचंद दोशी यांनी जैन धर्मियांच्या चळवळीचा शुभारंभ केला. जैन बोधक, वर्तमानपत्र, पाठशाला, ग्रंथ प्रकाशन इ. मार्गांनी नवे विचार, नवे ज्ञान द्यायला सुरूवात झाली. अकोल्याचे श्री. चवरे वकील यांनी 'जैन मार्तंड' हे मासिक सुरू केले. मुंबई प्रांतिक दिगंबर जैन सभेचे 'जैनमित्र' मुंबईचे पं. नाथूराम यांचे 'जैन हिर्तेषी' व भारतवर्षीय दिगंबर जैन महासंघाचे 'जैन गजर' ही तीन हिंदी मासिके निघत होती. पण ही सर्व मासिके धार्मिक बाबींचा उहापोह करणारी व धर्मग्रंथ क्रमश: प्रसिद्ध करणारी होती.

सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी दक्षिण महाराष्ट्र जैन सभेची स्थापना एप्रिल १८९९ मध्ये झाली. सभेच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी सभेच्या आश्रयाखाली 'श्री जिनविजय' नावाचे मराठी मासिक शके १८२४ च्या गुढी पाडव्याच्या सुमुहर्तावर म्हणजे एप्रिल १९०२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. "जैन धर्मावर गेल्या एक हजार वर्षांत आलेली अवकळा दूर करून लोकांना जैन धर्माचे महत्त्व पटवून देणे व त्यायोगे जैन धर्माचे पुनरूज्जीवन करणे आणि जैनांची उन्नती घडवून आणणे या मुख्य हेतूने या मासिकाचा जन्म झालेला होता". 'श्री जिनविजय' या मराठी मासिकाची मागणी वाढली तसेच कानडीतूनही हे मासिक काढावे अशी मागणी होऊ लागली. बेळगावचे रिटायर्ड डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. संगाप्पा मल्लप्पा अंकले यांच्या सहाय्याने १९०६ साली 'श्री

जिनविजय' या कानडी मासिकाचा शुभारंभ करण्यात आला. बंद, सुरू अशा अवस्थेत मासिक १९३४ साली कायमचे बंद झाले.

'श्री जिनविजय' हे मराठी मासिक दक्षिण भारत जैन सभेचे मुखपत्र असल्याने या मासिकाला खूप मर्यादा येत होत्या. तेव्हा यातील उणीवा भरून काढण्यासाठी 'प्रगति' नावाचे साप्ताहिक श्री. आण्णा बाबाजी लट्टे यांचे जेष्ठ बंधू श्री. भाऊराव बाबाजी लट्टे यांनी आपल्या राहत्या घरी कुरुंदवाड येथे १९०७ साली सुरू केले. श्री. भाऊराव लट्टे हे पदवीधर नव्हते. पण इंग्रजी व मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व चांगले होते. लेखन कौशल्य वाखाणण्यासारखे होते. तरीही वर्गणीदारांच्या अभावामुळे हे साप्ताहिक चालू ठेवणे कठिण होऊ लागले होते. अशी नाजूक परिस्थिती असताना सन १९११ साली सभेचे मुखपत्र असलेले 'श्री जिनविजय' मासिकाचे रुपांतर साप्ताहिकामध्ये करण्यात आले. सारासार बाबींचा विचार विनिमय होऊन श्री. भाऊराव लट्टे यांचे 'प्रगति' साप्ताहिक पत्र सभेच्या 'श्री जिनविजय' या साप्ताहिक पत्रात सामील करण्यात आले आणि सभेचे 'प्रगति आणि जिनविजय' या नावाने साप्ताहिक पत्र १९१२ पासून सुरू झाले ते आजतागायत चालू आहे.

जैन नियतकालिकांची संख्या खूप मोठी आहे. मराठी ३०, गुजराती ६४, हिंदी २४२, इंग्रजी १६, कन्नड ४, बंगाली २ अशी ही नियतकालिके समाज घडविण्याचे कार्य उत्तम रीतीने करीत आहेत. १८८४ साली 'जैन बोधका' ची सुरूवात झाली. पुढे मग 'प्रगती आणि जिनविजय' 'सन्मती', 'तीर्थंकर', 'श्राविका', 'जैन जागृती', 'रत्नत्रय', 'सार्वधर्म', 'धर्ममंगल', 'दिव्यखनी', 'आत्मसागर', 'दिव्यशक्ती', 'जैन परंपरा', 'जैन पथिक', 'जैन संदेश', 'वृत्तमाधुरी', 'वीर सेवादल वार्तापत्र', 'ज्ञानशलाका', 'पंचरंग प्रबोधिनी', 'अरिहंत', 'महापुरुष' वगैरे अनेक नियतकालिके उदयाला आली. पैकी 'धर्ममंगल', 'श्राविका', 'ज्ञानशलाका' सारख्या नियतकालिकांची स्थापना तर स्त्रियांनीच केली आहे. संस्थापक, संपादक म्हणून स्त्रियांनीच या नियतकालिकांची धुरा वाहिली. वहात आहेत. हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

जैन नियतकालिकांची संख्या अशी विपूल असून विषयाचा आवाका मोठा आहे. 'प्रगति आणि जिनविजय' हे साप्ताहिक सर्वांगिणदृष्ट्या महत्त्वपूर्ण असेच आहे. म्हणून 'प्रगति आणि जिनविजय' या साप्ताहिकातील स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

जैन समाजातल्या स्वातंत्र्यपूर्वीच्या स्त्रिया या चूल मूल सांभाळणाऱ्या होत्या. धर्म आणि समाज हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. दिवाणखान्यात स्त्रियांचं पाऊल पडण ही फार गंभीर बाब होती. अशाही काळात हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या जैन स्त्रिया या शिक्षणाच्या प्रवाहात आल्या. हा प्रवाह समाजाला जाऊन मिळाला. त्यांच्या जाणीवा जगण्यासाठी अधीर झाल्या आणि त्या लिहू लागल्या. लिहिण्यासाठी माध्यम म्हणून 'प्रगति आणि जिनविजय' चे व्यासपीठ त्यांना मिळाले.

शब्दात सामर्थ्य असते. लेखणीत बळ असते. समाज परिवर्तन घडवून आणण्याची ताकद असते. हे या स्त्रियांना समजू, उमजू लागले. शिक्षणाची ही साक्षरता दिवसेंदिवस वाढू लागली. जैन स्त्रिया हळूहळू साक्षर होऊ लागल्या. सामाजिक जाणीवा त्यांच्यात निर्माण झाल्या. स्वत:कडे, इतर स्त्रियांकडे, त्यांच्या समस्यांकडे बघण्याचा डोळसपणा त्यांना येऊ लागला. आपण बदललो तर परिस्थिती बदलेल आणि ही काळाची गरज आहे हे त्यांच्या लक्षात आले. घर नावाच्या चार भिंती आणि उंबरा नावाची लक्ष्मण रेषा ओलांडल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही हे त्यांनी अनुभवातून ओळखले. आपल्याला जे जाणवले, समजले ते इतरांनाही सांगावे या कर्तव्यातून, जाणीवेतून त्यांनी लिखाण केले.

स्त्रियांच्यामध्ये असणारी संवेदनशीलता जगाकडे बघण्याची नवी दृष्टी देते. तिच्यातील हळवेपणा समाजाप्रती आत्मियता देते. कर्तव्याच्या जाणीवेतून दुसऱ्यांना शहाणे करुन सोडण्याची जबाबदारी वाढते. नव्या काळाचे भान पेलताना, स्त्री म्हणून जगताना, नात्यांची रोपे वाढवताना, स्वत:तील स्त्रीत्व जपताना होणाऱ्या मानसिक हिंदोळयाचे चित्रण, लेखन करण्यासाठी तिने लेखणी उचलली.

समाजाच्या अंगणात आपले घर असते. त्या घरात आपण असतो. समाजातल्या सारासार गोष्टींचे विचारमंथन मनात दिसते. आपली जबाबदारी, सामाजिक दृष्टिकोन यातून विचारांची मांडणी तयार होऊ लागते. परखड, वस्तुनिष्ठ आणि ठोस लिखाण मूळ धरू लागते. असे लेखन जनजागृतीसाठी आवश्यक असते. त्यातून समाज प्रबोधन होऊन क्रांती घडू शकते, जी समाज जीवनाला प्रवाहित करण्यासाठी गरजेची असते. असेच समाज चित्रण लेखणीत उतरवण्याचा प्रयत्न जैन लेखिकांनी केलेला आहे.

## १.७ निष्कर्ष

१) मराठी वाङ्मयाचे अर्वाचीन स्वरुप बहुतांशी गद्यच आहे. प्राचीन साहित्यात गद्यात्मक परंपरा नव्हतीच. फक्त महानुभावीयांनी चांगले मराठी गद्य लिहिले. पण मराठी गद्य पोसले, वाढविले ते मराठी नियतकालिकांनीच.

२) नियतकालिकांचे हेतू, उद्दिष्ट, प्रेरणा वेगळया असल्या तरी रसिक वाचक हा त्यांचा केंद्रबिंदू असतो.

३) नियतकालिकांनी निबंध वाङ्मय समृध्द केले.

४) मराठीतील अनेक नामवंत लेखकांचे लेखन, समीक्षकांची समीक्षा नियतकालिकांतून प्रसिध्द होऊनच त्यांना नावलौकिक मिळाला.

५) इंग्रजांचे आगमन व मुद्रणाची सोय या गोष्टी नियतकालिकांना उपकारक ठरल्या.

६) दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, वार्षिक इ. नियतकालिकांचे अनेक प्रकार आहेत.

७) ज्ञानप्रसार, वृत्तप्रसार, मतप्रसार या उद्दिष्टांनी वृत्तपत्रे चालतात.

८) काही वृत्तपत्र प्रतिक्रियात्मक स्वरुपाची असतात.

९) मराठीतील अनेक नामवंत लेखकांनी, समाजसुधारकांनी, विचारवंतांनी, रणझुंजार राजकारण्यांनी नियतकालिक हेच माध्यम हत्यार म्हणून वापरले. उदा. म. फुले, चिपळूणकर, लोकहितवादी, रानडे, टिळक, भांडारकर, डॉ. आंबेडकर इ.

१०) ऐहिक जीवन समृध्द करणारे, व्यवहारोपयोगी ज्ञानविषय निवडून चर्चा करणे हा बहुतेक नियतकालिकांचा हेतू होता.

११) वृत्तपत्रे, नियतकालिके लेखनशैलीला महत्त्व न देता (अपवाद - प्रभाकर) समाजदर्शनावर भर देत. त्यामुळे साहित्यदृष्टया ती कमी दर्जाची ठरतात.

१२) साधार बातम्या देणे, अकारण निंदा टाळणे (अपवादात्मक होती) ही जाणीव वृत्तपत्रांना होती.

१३) वृत्तपत्र चालविणे उदात्त कार्य व कर्तव्य आहे याची जाणीव त्या संपादकांना होती.

१४) दोन वृत्तपत्रात चर्चावाद व झुंज होत असे. उदा. 'ज्ञानसिंधु' विरुद्द 'प्रभाकर' परंतु नियतकालिकांचा वर्ग मर्यादित होता.

१५) जाहिरातींची प्रथा फारशी नव्हती.

१६) वर्गणीचा दर जास्त असल्याने प्रती संख्या कमी, वाचक कमी तरीही विचार जागृती प्रशंसनीय केली. 'रंजना बरोबर अंजन' हे कार्य नियतकालिकांनी केले.

१७) आधुनिकतेचे व वैचारिकतेचे आव्हान नियतकालिकांनी स्विकारले आहे.

## १.८ संदर्भ टीपा


१) जोग रा. श्री., 'नियतकालिक वाङमय', मराठी वाङमयाचा इतिहास, खंड - ४ (१८०० ते १८७४), मराठी साहित्य परिषद पुणे प्रकाशन, सन १९९९, पृ. १०३.

२) (संपा.) कुलकर्णी व. दि., मराठी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास' खंड १, (सन १८३२ ते १८८२), मुंबई विद्यपीठ, मुंबई व श्रीविद्या प्रकाशन, पुणे, सन १९८७. पृ. ०२.

३) तत्रैव, पृ. ०३.

४) कर्णिक प्रदिप , 'ग्रंथव्यवहारात नियतकालिकांचे स्थान', 'ललित', संपादक, मुद्रक, प्रकाशक : अशोक कोठावळे, ३१६, प्रसाद चेंबर्स, सरस्वती प्रिंटर्स, मुंबई, जून १९९९, अं. ६, पृ. ३५.

५) साठे शरद केशव , आणखी एक तरी सूची मंडळ हवे, महाराष्ट्र टाइम्स,,, प्रदिप कर्णिक, तत्रैव, पृ. ०४२

६) (संपा.) कुलकर्णी व. दि., नियतकालिक आणि वाङमयेतिहास लेखन, 'मराठी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास' खंड १, (सन १८३२ ते १८८२)

७) परांजपे भा. श्री., 'अर्वाचीन मराठी वाङमयाचा इतिहास', - व्हिनस प्रकाशन, पुणे, सन १९९७, पृ. २७८ - ७९

८) (संपा.) कुलकर्णी व. दि., उनि ; पृ. ०५/०६

९) जोशी छाया व डॉ. जान्हवी, 'संतअर्वाचीन साहित्य समालोचन : नियतकालिक', (१८०० ते १९५०), मोघे प्रकाशन, पृ. २९.

१०) जाधव रा. ग., 'वैचारिक मराठी नियतकालिके : काही विचार', वाङमयीन परिप्रेक्ष्य, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृती, मार्च २००४, पृ. १३३.

११) (संपा.) खांडगे मंदा, ‘,स्त्री साहित्याचा मागोवा ः खंड १’, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, पृ.२२.

१२) डॉ.विलास संगवे, ‘दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास’, द.भा.जैन सभा,, कोल्हापूर, १९७६, पृ. २७.

१३) ढवळे वा. रा., ‘साहित्य नियतकालिकेचे’, साहित्य समालोचन, महाराष्ट्र प्रकाशन संस्था, मुंबई, पृ. १३५.

## प्रकरण २

# वैचारिक साहित्याचे स्वरूप आणि जैन वैचारिक साहित्याचे स्वरूप

२.१ वैचारिक साहित्याचे स्वरूप

२.२ मराठी साहित्यातील वैचारिक लेखनाचा उद्‌गम आणि विकास

२.३ वैचारिक साहित्य : प्रभाव आणि प्रेरणा

२.४ जैन वैचारिक साहित्य.

२.५ सन १९३१ ते १९४१ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.६ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.७ सन १९५३ ते १९६३ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.८ सन १९६४ ते १९७४ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.९ सन १९७५ ते १९८७ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.१० सन १९८६ ते २००२ या कालखंडातील वैचारिक साहित्य.

२.११ निष्कर्ष

२.१२ संदर्भ टीपा

# प्रकरण दुसरे

# वैचारिक साहित्याचे स्वरूप आणि जैन वैचारिक साहित्याचे स्वरूप

## २.१ वैचारिक साहित्याचे स्वरूप

मराठी साहित्याच्या एकूण वाटचालीमध्ये मध्ययुगीन काळातील सांप्रदायिक स्वरूपाचे साहित्य आणि अव्वल इंग्रजी कालखंडातील आधुनिक मराठी साहित्य असे दोन प्रमुख भाग सांगता येतात. यापैकी अव्वल इंग्रजी कालखंडामधील मराठी साहित्यामध्ये जे विविध प्रकार उदयास आले त्यापैकीच एक प्रकार म्हणजे वैचारिक साहित्य. या वैचारिक साहित्याचे स्वरूप आपणाला पुढीलप्रमाणे विषद करता येईल. संपूर्ण भारतामध्ये अनुशंगाने महाराष्ट्रामध्ये एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजी राजवटीचा एकधर्मी अंमल सुरू झाला. या राजवटीचा संपूर्ण भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो. समाजाच्या सर्व स्तरामध्ये म्हणजेच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक तसेच साहित्यिक या घटकांवर परिणाम झालेला दिसून येतो.

साहित्यिक प्रांतामध्ये इंग्रजी भाषा आणि साहित्य यांचा मोठया प्रमाणात प्रभाव पडलेला पाहावयास मिळतो. मराठी साहित्याच्या संदर्भात या प्रभावाचे विवेचन करावयाचे झाल्यास ठळक असा फरक आपल्याला जाणवतो. मध्ययुगीन काळामध्ये ओवी, अभंग या छंदामध्ये ज्या प्रकारचे विविध संप्रदायांनी जी साहित्य निर्मिती केली. त्याचा मध्यवर्ती हेतू हा आपापल्या सांप्रदायाचा किंवा पंथाचा प्रचार, प्रसार करणे आपले आचार, विचार, तत्त्वज्ञान यांचा प्रसार करणे हाच दिसून येतो. मध्ययुगीन काळातील मराठी साहित्याचे हे स्वरूप अव्वल इंग्रजी कालखंडात बदलले आणि मराठी साहित्याने नवे रूप धारण केले. इंग्रजांच्या राजवटीमध्ये फक्त सत्तापालटच झाला नाही तर साहित्याचे रूपही पालटले. इंग्रजी भाषा आणि साहित्य यांचा प्रभाव मराठी साहित्यावर मोठया प्रमाणात पडला. इंग्रजी साहित्यातील साहित्य प्रकार आकृतीबंध मराठी साहित्यामध्ये अवतरू लागले. महाराष्ट्रामधील इंग्रजी भाषा आणि ज्ञान आत्मसात केलेली नवी पिढी इंग्रजी साहित्याचे अनुकरण करू लागली. त्यातूनच मराठीमध्ये इंग्रजीतून मराठीत अनुवादाचा आणि भाषांतराचा प्रभाव वाढू लागला. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळाला त्यामुळेच भाषांतर काळ असे संबोधले जाऊ लागले. इंग्रजी साहित्यात रूढ असलेले साहित्यप्रकार मराठीमध्ये नव्याने अवतरू लागले. त्यामध्ये कथा, कादंबरी, निबंध यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. इंग्रजीतील

Essay वरून मराठीमध्ये निबंध हा प्रकार रूढ झाला. Story वरून कथा आणि Novel वरून कादंबरी असे प्रकार मराठीत रूढ होऊ लागले. या अव्वल इंग्रजी कालखंडातच (एकोणिसावे शतक) आधुनिक मराठी साहित्याचा पाया घातला गेला. वर उल्लेख केल्याप्रमाणे नवे नवे साहित्य प्रकार मराठीमध्ये रूढ होऊ लागले. कथा, कादंबरी, कविता, नाटक आणि निबंध वाङ्मय असे नवे प्रकार मराठीत आकार घेवू लागले. हे सर्व प्रकार साहित्याशी आणि एकूणच लालित्याशी संबंधित आहेत. या सर्व प्रकारांतून लालित्याचा आणि सौंदर्य भावनेचा प्रत्यय येतो. पण याशिवाय आणखीन एक साहित्याचा वेगळा प्रकार या कालखंडामध्ये मूळ धरू लागला. त्यालाच वैचारिक साहित्य असे म्हणता येईल.

कथा, कादंबरी, कविता, नाटक, निबंध असे सर्व प्रकार लालित्याशी, सौंदर्य भावनेशी निगडित आहेत. पण यापेक्षा वेगळा असा प्रकार म्हणून वैचारिक साहित्याचा उल्लेख करावा लागेल. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे विषद करता येईल.

अव्वल इंग्रजी कालखंडात म्हणजेच एकोणिसाव्या शतकामध्ये नव्या समाज सुधारणेची आणि धर्म सुधारणेची सुरुवात झाली. इंग्रजी ज्ञानामुळे भाषेमुळे इथला समाज सुधारू लागला. इथल्या अनेक कर्मठ सनातनी रूढी, अंधश्रद्धा यांच्या विरोधात बंड करून समाजसुधारणेचा पाया घालणारे अनेक समाजसुधारक पुढे आले. या समाजसुधारकांनी इथल्या सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीच्या विरोधात दंड थोपटले. याचा परिणाम एका नव्या समाज सुधारणेची/धर्म सुधारणेची चळवळ उभी केली. ही चळवळ उक्ती आणि कृती या दोन्ही स्वरूपात होती. समाजातील प्रस्थापितांच्या विरोधात अनेक समाजसुधारकांनी आपला लढा उभा केला. त्यामध्ये प्रामुख्याने पहिले नाव घ्यावे लागेल ते म्हणजे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्यांचे. त्याचबरोबर लोकहितवादी, बाबा पद्मजी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, शि. म. परांजपे, कोल्हटकर, श्री. व्य. केतकर, वि. का. राजवाडे, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विनायक दामोदर सावरकर आणि मिशनरी लोक यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या सर्वांनी सर्व समाज शिक्षित, सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न सुरू केला.

हा एक प्रकारे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात लढाच होता. हा लढा प्रत्यक्ष कृती बरोबरच वैचारिक पातळीवरदेखील होता. विवेकाधिष्ठित तसेच विचारांच्या आधारे प्रस्थापितांना, सनातन्यांना

नामोहरम करण्याचा प्रयत्न होता. या वैचारिक लढयातूनच मराठीमध्ये विपुल असे वैचारिक साहित्य निर्माण झाले. एकोणिसाव्या शतकामध्ये याची सुरुवात झाली. वर उल्लेख केलेल्या सर्व समाजसुधारकांनी या प्रकारात विपुल प्रमाणात भर घातली.

थोडक्यात वैचारिक साहित्य स्वरूपाबद्दल आपल्याला असे म्हणता येईल की, ज्या लेखनामध्ये विचारांना प्रधान स्थान असते, विवेकाचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परामर्श घेतलेला असतो, तर्काधिष्ठित सामाजिक स्थिती गतीचा सारासार विचार केलेला असतो अशा साहित्याला वैचारिक साहित्य असे संबोधता येईल. या साहित्यामध्ये भावना प्रधानतेला, लालित्याला आणि सौंदर्य भावनेला थारा नसतो. म्हणजेच बौद्धिक पातळीवर समाजातल्या सर्व स्तरातील स्थिती गतीचा तारतम्याने आलेख मांडण्याचा प्रयत्न या वैचारिक साहित्यातून केला जातो. या वैचारिक साहित्याचा पायासुद्धा इतर वाङ्मय प्रकारांप्रमाणेच अव्वल इंग्रजी कालखंडामध्ये घातला गेला. याची सुरुवात वर उल्लेख केलेल्या सर्व समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी केली.

## २.२ मराठी साहित्यातील वैचारिक लेखनाचा उद्‌गम आणि विकास

मराठी भाषेतील वाङमयाची परंपरा ही १६ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत कवितेच्या पंथाचा आहे. त्यांच्या काही वाङमयामध्ये गद्यलेखन आढळते. शिवकालीन 'आज्ञापत्र' जे रामचंद्रपंत अमात्य यांनी शिवाजी महाराजांच्या सांगण्यावरून लिहिले आहे.तो ग्रंथ मात्र वैचारिक साहित्याच्या अगदी जवळचा आहे. नंतरच्या कालखंडात बखरकारांनी गद्यामधून तत्कालीन इतिहास लिहिला पण या बखरीची दिशा इतिहास लेखनाकडे वळताना दिसते.

वैचारिक साहित्यामध्ये विचाराला प्रामुख्याने स्थान असते. मानवी जीवनामध्ये, जगण्याच्या शैलीमध्ये जे चांगले पोषक असेल तेच वैचारिक साहित्याला मानवणारे असते.यामध्ये तर्कनिष्ठ लेखन विवेकशील पद्धतीने मांडले जाते. इंग्लडमध्ये हे वैचारिक साहित्य विकसित झाले. इंग्रज राज्य करण्यासाठी व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले. तेव्हा त्यांनी आपल्या बरोबर त्यांचे साहित्य आणि संस्कृती आणली.त्यांच्या साहित्याचा स्त्री पुरुष समान संस्कृतीचा आचार विचारसरणीचा, जातीपाती पलीकडे जाऊन जीवन जगणाऱ्या मानवी वृत्तीचा प्रभाव इथल्या शिकलेल्या आणि मातृभूमीसाठी चांगले काहीतरी करू पाहाणाऱ्या युवकांवर झाला. ही पार्श्वभूमी मराठी वैचारिक साहित्याच्या उदयास कारणीभूत ठरली. भारत पारतंज्यात होता. चुकीच्या रूढी-परंपरेच्या

जोखडात बंदिस्त होता. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर वैचारिक साहित्याचा जन्म केव्हा झाला हे आपल्याला कळू शकेल.

या वैचारिक साहित्याचा अभ्यास करताना महाराष्ट्रातील समाजाचा आपण विचार करूया. पेशवे काळात पेशवे हे निव्वळ नामधारी राजा होते. दुस-या बाजीराव पेशव्यांचा मनमानी कारभार सुरू होता. बाबा आढाव या कारकीर्दीचे वर्णन करताना म्हणतात कितीतरी माताभगिनीनी बेअब्रूच्या भीतीने आत्महत्या केली.[१] करवसुलीच्या पद्धती तर भयावह व बीभत्स होत्या आणि पुढे त्यांनी पेशवे अत्याचाराचा पाढाच वाचला आहे. स्त्री अत्याचाराबाबत लोकहितवादींनी ब्राम्हण मामलेदाराची भयावह घटना सांगितली आहे. धर्माचा प्रचंड पगडा अनिष्ट चाली, रूढी परंपरेचा उच्छाद अंधश्रद्धेची परिसीमा, स्त्रियांना मिळणारी हिणकस वागणूक, जातीव्यवस्थेचा प्रचंड डागोंरा यात सारा महाराष्ट्र भरडला जात होता. अशा या सगळया पार्श्वभूमीवर १८१८साली पेशवाई बुडाली. १८२३ पासून हिंदुस्थानावर ब्रिटीश अधिसत्ता अप्रतिहतपणे राज्य करू लागली.

१४ व्या शतकामध्ये होऊन गेलेले कवी चॉसर, १६व्या शतकामधले कवी एडमंड स्पेन्सर तर १७ व्या शतकातील विल्यम शेक्सपिअर या सगळयांच्या काव्यामध्ये आधुनिक दृष्टी दिसते. मानवी जीवनावर भाष्य करणारी कविता १४ व्या शतकात इंग्लडमध्ये लिहिली गेली.[२] भारतात मात्र मराठी वाङमयामध्ये आधुनिक दृष्टी येण्यासाठी एकोणिसाव्या शतकापर्यत वाट पाहावी लागली.

युरोपमध्ये मुद्रण कलेचा उदय १५ व्या शतकात झाला तर भारतामध्ये त्याचा प्रवेश १६ व्या शतकामध्ये झाला. श्री. रा. के. लेले यानी मराठी वाङमयाचा इतिहास या पुस्तकामध्ये भारतात वृत्तपत्र सुरू करण्याचा पहिला प्रयत्न विल्यम बोल्टस यांनी केला आहे हे नमूद केले आहे. वृत्तपत्रांची सुरुवात झाली आणि महाराष्ट्रात परिवर्तन होऊ लागली. 'दर्पण' या पत्रातील संपादकीय लेख, स्फुटलेख व वाचकांची आलेली पत्रे यांचा विचार करता मराठी साहित्यातील वैचारिक लेखनाचे उगम स्थान 'छापखाना' म्हटले पाहिजे. या वैचारिक साहित्याच्या चळवळीमध्ये भाग घेऊन. समाज परिवर्तनाची मोठी लाट ज्या लेखकांनी निर्माण केली त्या गद्य लेखकांच्या लेखणीचा आढावा घेऊया.

## २.३ वैचारिक साहित्य : प्रभाव आणि प्रेरणा

- **लोकहितवादी :**

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ मध्ये झाला. 'प्रभाकर' या मासिकातून त्यांनी १०८ पत्रांद्वारे आपले विचार जनतेपर्यंत पोहोचविले. या पत्रानांच 'शतपत्रे' असे संबोधले जाते. या पत्रातून त्यांनी हिंदू समाजाच्या वैचारिक गुलामगिरीचा लोकांमधील अज्ञानाचा, पुराणग्रंथातील भ्रामक कल्पनांचा समाचार घेतला आहे. लोकांच्या अज्ञानामुळे अधर्म प्रवृत्ती, आणि भ्रष्टाचारी वर्तन वाढीस लागते असे त्यांना वाटते. बाबा पद्मजी यानी 'अरुणोदय' या आपल्या पुस्तकात त्यांच्या विचारांचा आपल्यावर झालेला आमूलाग्र परिणाम सांगितलेला आहे.

प्राचीन ग्रंथाचा आधार घेऊन 'लग्नाची पूर्वपिठिका' या निबंधात स्त्री-पुरुष संबंधाच्या सात स्थिती सांगितल्या आहेत. बालविवाह, जरठ कुमारी विवाह, विधवा विवाह व पुर्नविवाह याविषयाचे त्यांचे चिंतन अतिशय मूलगामी आहेत. लोकहितवादाचे पुनर्विवाहविषयक विचार बाबा पद्मजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीत आविष्कृत झाले आहे. स्त्री-पुरुषाचे जीवन हे परस्पर पूरक आहे. निसर्गत: दोघांनाही समान अधिकार मिळालेले आहेत. हे विचार मांडताना संस्कृतमधील श्लोक, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास यांच्या रचनेचा अभ्यास त्यांनी केलेला आहे. प्राचीन ग्रंथाचे (मनुस्मृती, स्कंदपुराण .... वगैरे) सुद्धा त्यांनी साधक बाधक विचार केलेला आहे.

लोकहितवादी स्वत: ब्राम्हण होते. पण समाजशास्त्रज्ञांच्या नजरेतून त्यांनी ब्राम्हणविषयक मते मांडली आहेत. तटस्थ वृत्तीने अतिशय कडवट शब्दांत त्यांनी ब्राम्हण समाजाचा समाचार घेतला आहे. सर्वत्र अज्ञान, आंधळेपणा पसरण्याचे एकमेव कारण म्हणजे पंडितांनी केलेल्या मूर्खपणाच्या कोटया आहेत. त्यामुळे शास्त्रातील रीती बंद झाल्या पाहिजेत. हे सांगताना मनू हा ईश्वराचा अंश आहे हे मानायला ते तयार नव्हते. मनुष्याच्या क्रियाकर्मालाच धर्म असे त्यांनी नाव दिले आहे. त्यामुळेच गोपूजेचा काळानुसार नवा अर्थही त्यांनी लावलेला आहे. निरर्थक आणि विवेकशून्य जातिव्यवस्था ही बिनबुडाची आहे हे सांगताना 'महार हिंदू आहेत व आपल्या देवाची पूजा करतात व धर्म मानतात तरी ते म्लेंछापेक्षा नीच कसे?'[३] असा सवाल करतात.

लोकहितवादीना असलेली इतिहासाची जाणीव, धर्मविषयक पुरोगामी भूमिका, विद्येवरची श्रद्धा, समाज सुधारणेचे प्रयत्न आणि आत्मपरीक्षण या बाबींमुळे मराठी वैचारिक साहित्यामध्ये त्यांचे स्थान मानाचे आहे.

लोकहितवादींची भाषा साधी, सरळ आहे. पाल्हाळिक, अवास्तव मांडणी किंवा पांडित्य प्रदर्शन कुठेही आढळत नाही. समाज प्रबोधनाची प्रेरणा असल्यामुळे सामाजिक परिवर्तनाचा आशय लेखनात दिसून येतो. त्यांच्या लेखणित आक्रमकता, प्रामाणिकता, प्रांजळपणा हे गुण दिसतात. त्यांचे लेखन साहित्य हे वैचारिक असल्यामुळे लालित्य आणि काव्यगुणांचा अभाव दिसून येतो. पण त्यांच्या भाषेचा अभ्यास केला म्हणजे "अव्वल इंग्रजी कालखंडातील मराठी गद्य शैलीचा एक प्रातिनिधिक नमुना पाहावयास मिळतो" समाजास्थितीचे दोष दाखविणे हाच त्यांचा प्रमुख हेतू आहे.

- **महात्मा जोतीराव फुले** (१८२७ ते १८९०)

क्षितिजापलीकडे दृष्टी असणारे महात्मा फुले हे अव्वल इंग्रजी काळात नागर जीवनाचे वर्तुळ लेवून नागरी जीवनात प्रवेश करणारे वैचारिक साहित्यिक आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व लढाऊ प्रवृत्तीचे व आक्रमक होते. कुठेही तडजोड न करता सडेतोडपणे सत्य मांडणारे सामाजिक विचारवंत, कर्ते समाजसुधारक आणि लोकशिक्षक म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन शुद्रातिशूद्रांच्या मुक्तीसाठी खर्च केले. अन्याय, अत्याचार आणि शोषणाविरुद्ध लढण्यात गेले. त्यांचे वैचारिक साहित्य आणि त्यांचे कार्य एकमेकांपासून वेगळे करता येतच नाही.

शस्त्रासारखी धारदार लेखणी चालविणाऱ्या महात्मा फुल्यांचा जन्म ब्राह्मणी विचार असणाऱ्या पुण्यात झाला. "स्वधर्मी भट ब्राह्मणाने (दिवाणजी कृष्णाजी देव) जोतीरावांना अज्ञानाच्या, अविद्येच्या अंधारात ठेवण्याचे प्रयत्न केले. उलट परधर्मी गफारबेग आणि लिजिटसाहेब ह्यांनी जोतिरावांना विद्येच्या प्रकाशात आणले".[४]

तत्कालीन जातीव्यवस्था व मनूरचित समाज व्यवस्थेमधील प्रश्नांमधून त्यांची स्वत:ची सामाजिक दृष्टी बनली. अंधश्रद्धा, रूढी परंपरा व पोथीनिष्ठ समाज या विरुद्ध ते उभे ठाकले. स्त्री, शूद्रातिशूद्र आणि शेतकरी हे तीन घटक त्यांच्या लेखनाचे विषय होते. ईश्वराचे अस्तित्व, वेदप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य यांना त्यांनी नकार दिला. ईश्वरी श्रद्धेला त्यांनी कडाडून विरोध केला. म. फुल्यांच्या निबंधात विवेकनिष्ठ विचार दिसतो. सामाजिक पुनरुथ्थानाचे साधन

म्हणून फुल्यांनी आपल्या साहित्यात त्याचा वापर केला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार, कृषकउद्धार, सामाजिक न्याय, सामाजिक लोकशाही, सामाजिक समता यांचे दर्शन यातून होते.

"समाज हा व्यवस्थेवर उभा राहिला होता, ती व्यवस्था शोषणाची होती. शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या ब्राह्मणी कपट कारस्थानाची आणि ब्राह्मणाचे ऐकून घेणाऱ्या धूर्त सरकारी अधिकाऱ्यांची होती. ती समूळ नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी 'ब्राह्मणाचे कसब' दाखवून दिले. 'गुलामगिरी' संपवण्यासाठी प्रस्थापितांना इशारा दिला. 'सत्सार' सांगितला". शूद्र, शेतकरी नि स्त्रियांचा आक्रोश आपल्या लेखणीतून सुस्त समाजापर्यंत नेला. एक पुरुष स्त्रियांना शिकवतो हा वाद निर्माण झाल्यावर स्वत:च्या पत्नीला त्यांनी शिकविले. सावित्रीबाई फुले या भारतीय आद्यशिक्षिका होत.

- **ताराबाई शिंदे (१८५० ते १९१०).**

सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते बापूजी हरी शिंदे यांची कन्या म्हणजे ताराबाई शिंदे होय. ताराबाईचे बालपण सत्यशोधकी विचारांच्या सान्निध्यात गेले होते. त्यामुळे स्त्री पुरुष विषमतेची जाणीव त्यांना होऊ लागली. स्वत:च्या घरात आणि परिसरात स्त्रीला गुलामासारखे वागवले जाते हे त्यांच्या नजरेस आले. एकाच उदरात जन्म घेतलेले दोन जीव शारीरिकदृष्ट्या परस्परांपासून वेगळे असले तरी निसर्गत: दोघांना सारखे अधिकार नाहीत. ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली आणि १८८२ साली "स्त्री पुरुष तुलना" हे वैचारिक साहित्य निर्माण झाले. महात्मा फुले यांच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव ताराबाईच्या लेखनावर होता. या साहित्याचे 'स्त्री पुरुष तुलना' हे शीर्षक समर्पक आहे. हे पुस्तक वाचल्यावर यातील विचार सामर्थ्याची जाणीव आपल्याला होते. चिंतनाची उच्चतम पातळी दिसून येते. प्राचीन ग्रंथाचे वाचन आणि त्याची क्षमता यावरून ताराबाईच्या चिकित्सक बुद्धीची ओळख पटते. या पुस्तकामध्ये स्त्रीच्या जगण्यापाठीमागे कोणकोणते घटक कार्यरत आहे याचा अभ्यास आहे.पुरुषी अहंकार आणि इंग्रजी काळातील सुधारकांचे पोकळ भाषण यांचे वास्तव दर्शन 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकात पाहावयास मिळते. म्हणूनच भास्कर चंदनशिव ताराबाई शिंदे यांचा उल्लेख 'स्त्री मुक्तीची क्रांतिज्योत ....'[५] असा करतात.

ताराबाईनी स्त्रियांचे शोषण करणारे तीन घटक सांगितले आहेत. 'अज्ञान' 'धर्म' आणि 'पुरुष'. या तीन घटकांमुळे स्त्री पिढयानपिढया गुलामीत खितपत पडली आहे. पुरुषी अहंकार हा स्त्री विकासातला मुख्य अडथळा आहे हे सांगताना "अरे, तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे ....."[६] म्हणत स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या पुरुषांचा खरपूस समाचार घेतला आहे. पुनर्विवाह शास्त्रशुद्ध नाही असे म्हणणाऱ्यांना ताराबाईनी रामायण, महाभारतातील पुनर्विवाहाचे दाखले दिले आहेत. परंपरेने चालत आलेल्या जरठकुमारी विवाह, बालविवाह, केशवपन, बहुपत्नीकत्व, पुनर्विवाह प्रतिबंध या रूढींचा तीव्र शब्दात निषेध केलेला आहे. ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची उकल मोठया अभ्यासू वृत्तीने, चिकित्सक भूमिकेतून केलेली आहे. मराठी साहित्यातील पहिल्या स्त्री समीक्षक म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले पाहिजे. 'स्त्री पुरुष तुलना' या पुस्तकातील आशय, भाषा आणि विवेचन पद्धती वैचारिक साहित्याला कलाटणी देणारी ठरली.

- **विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५० ते १८८२)**

मराठी भाषेवर निस्सिम प्रेम करणारे, हिंदू धर्माची जीवापलीकडे जोपासना करणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर हे उभ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. राष्ट्रवादाचा नवा आदर्श उभा करून राष्ट्रवाद धर्ममय आणि भाषामय करण्याचे काम विष्णुशास्त्रींनी केले. १८७४ साली 'निबंधमाला' हे मासिक त्यांनी सुरू केले. सात वर्षाच्या काळामध्ये निबंधमालेने आशयदृष्टया व भाषिकदृष्टया एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

'चित्रशाळा' हा छापखाना बाळकृष्ण वासुदेव जोशी यांच्या साहाय्याने त्यानी सुरू केला. १८७९ मध्ये बुधवार पेठेत 'न्यू किताबखाना' हे पुस्तकालय सुरू केले. टिळक, आगरकरांच्या मदतीने १८८१ मध्ये 'केसरी' व 'मराठा' ही नियतकालिके व १८८२ च्या सुमारास 'ग्रंथमाला' काढण्याचा निर्धार वाचला म्हणजे त्यांच्या प्रचंड कार्याचा आवाका आपल्याला लक्षात येतो. भाषा व भाषेच्याद्वारे लोकांना प्रेरणा देणे त्यांच्या लेखणीचे महत्त्वाचे कार्य होते. निबंधमालेतील लेखांमध्ये देशाभिमान भरलेला आहे. एकूण ७४ लेख भाषेचा विकास व्हावा, तिला उर्जितावस्था प्राप्त व्हावी आणि हिंदूधर्म वाढीस लागावा याविषयीचे आहेत. भाषाविषयक, वाङ्मयविषयक, इतिहासविषयक, समाजशास्त्रीय, मतखंडनपर, ग्रंथपरीक्षणपर असे लेख आहेत.

विष्णुशास्त्र्यांच्या लेखनाचा हाच विशेष आहे की ते वाङ्मयीन साहित्याची योग्य तऱ्हेने चिकित्सा करतात. परंतु साहित्यिकांचे जेष्ठत्व सिद्ध करताना त्यांचा हात आखडता होतो. 'मोरोपंताची कविता' यामध्ये त्यांची बेधडक विधाने दिसतात. आधुनिक मराठीतील पहिले चरित्र म्हणून 'जॉन्सनचे चरित्रा' कडे बघितले जाते. विचार दोन प्रकारचे असू शकतात. भावनात्मक आणि तर्काधिष्ठित विचार. भावनात्मक पद्धतीचे लेखन हे विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे आहेत. त्यामध्ये सैद्धांतिक बाजू खूप कमी आहे.

मराठी साहित्यात चिपळूणकरांनी स्वकर्तृत्वाने एक वेगळी शैली स्थिर केली. ही शैली संस्कृतप्रचुर असली तरी विषयाची मांडणी, सुसंगत, क्रमवार आहे. लहान वयातच वाचनाची सवय निर्माण झाल्यामुळे संशोधक दृष्टी त्यांच्यात वसलेली होती. उपोद्घात, मध्य, शेवट या तीन पायऱ्यातून सुभाषितवजा अवतरणाची मांडणी करताना ते दिसतात. शब्दांवर व वाक्यांवर त्यांचे प्रचंड प्रभुत्व दिसून येते. लेखनातून छद्मीपणाच्या छटेबरोबर वक्रोक्तीचा जबरदस्त वापर ते करतात.

चिपळूणकरांना वैश्विकता मानवणारी नव्हती. व्यापक दृष्टिकोन नव्हता 'भूतकाळाचे उदात्तीकरण करून त्यापासून प्रेरणा घेणाऱ्या,, पूर्वगौरववादी राष्ट्रवादाचे विष्णुशास्त्री हे उद्गाते होते'.[७] चिपळूणकरांमुळेच लोकमान्य टिळकांसारखा सामाजिक सुधारणेच्या कार्यात हस्तक्षेप करणारा महान विचारवंत जन्माला आला असे म्हणता येईल.

- **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक** (१८५६ ते १९२०)

स्त्री शिक्षणापेक्षा स्वराज्याला महत्त्व देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे सनातनी विचारांचे प्रवर्तक समजले जातात. देशामधले वातावरण, देशामधले ग्रंथ, विलायतेतील राजकारण या विषयीची माहिती लोकांना कळावी या उद्देशाने 'केसरी' हे वर्तमानपत्र त्यांनी सुरू केले. आपल्या भारतमातेची केविलवाणी स्थिती कशी झाली आहे. देश स्थितीच्या प्रगतीसाठी कोणकोणत्या अडचणी आहेत. त्यावर देशवासियांनी मात कशी करायची यावर साधक बाधक चर्चा केसरीतून केली आहे. लोकजागृतीचे प्रचंड क्षमता वृत्तपत्रात कशी असते हे त्यांनी या लेखनातून दाखवून दिले आहे. जनतेचे हक्क आणि अधिकार जिथे दिले जात नाहीत. देताना संकोच केला जातो तोच

जनतेच्या स्वातंत्र्याचा अधिक्षेप मानावा असे टिळकांचे म्हणणे होते. प्रथम राष्ट्राचे हित, नंतर प्रजेचे हित, त्यानंतर राष्ट्राची उभारणी हे त्यांच्या कार्याचे सूत्र होते.

लोकमान्य टिळकांचे वाचन दांडगे आणि अभ्यास भरपूर होता. त्यामुळे लोकमान्य टिळक हे खऱ्या अर्थाने उत्तम शिक्षक होते. त्यांच्या लेखनातून जनतेच्या बुद्धिला ते सरळ सरळ आवाहन करीत. लाकांचे मनोरंजन व्हावे, त्यांचे मन प्रसन्न व्हावे या हेतूने त्यांनी कधीही लेखन केले नाही. त्यांच्या कल्पित स्वराज्यात सर्वांना समान हक्क मिळणार होते. ते म्हणतात, "स्वराज्य शब्दाचा अर्थ वर आपले बादशहा कायम, इंग्रजी लोकांची सत्ता कायम आणि बाकीची व्यवस्था करण्याचा अधिकार पूर्णपणे लोकांच्या ताब्यात असणे हे स्वराज्याचे लक्षण आहे".[८] राजकीय सुधारणा ही टिळकांना खूप महत्त्वाची वाटत होती. लोकांकडे सिंहाचे बळ आहे. परंतु त्यांना ते माहीत नाही. असे त्यांना वाटे. "पशुपक्षांनासुद्धा खायला मिळते. खायला मिळणे हा काही पुरुषार्थ नाही".[९] लोकांच्यामध्ये असलेली मरगळ दूर करण्यासाठी, त्यांचे स्वत्व दाखवून देण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत.

लोकमान्य टिळक भारतीय समाजसुधारकांना तिस्मारखान म्हणत. म्हणूनच ए. एच्. फडके यांनी त्यांचा 'प्रतिगामी मताचे उद्‌गाते टिळक' असा उल्लेख केलेला आहे. परखड विचार मांडणाऱ्या टिळकांच्या भाषाशैलीत सहजता होती. आपल्या भाषेतून कृत्रिमतेला त्यांनी फाटा दिलेला होता. त्यांच्या साहित्यामध्ये शब्दसौंदर्यापेक्षा विचार चिंतनाला प्राधान्य होते. तर्कशक्ती महत्त्वाची होती. कल्पकता असली तरी वास्तवाचे काटेकोर पालन होते. त्यांच्या भावनेला आवाहन करणे हे होते. प्रत्येक शब्द अंत:करणातून आल्यामुळे त्यातील स्वराज्याविषयीची तळमळ आणि जाज्वल्य देशभक्ती शब्दागणिक जाणवते. शब्दयोजना भरपूर प्रमाणात करताना शब्दाचा पान्हा ते कधीच चोरताना दिसत नाहीत. दुर्बोधता हा गुण दिसत नाही आणि निर्धारित विचारांशी एकनिष्ठ राहिल्यामळे भाषा अतिशय प्रभावीपणे आलेली दिसते.

- **गोपाळ गणेश आगरकर (१८५६ ते १८९५).**

चिपळूणकरांपासून आगरकरांनी सामाजिक विचार घेतले, तर टिळकांनी प्रामुख्याने राजकीय विचार घेतले. १८८८ साली आगरकरांनी 'सुधारक' नावाचे पत्र काढून त्याद्वारे सामाजिक विचार मांडले. सुरुवातीला 'केसरी' मधून आगरकरांनी राजकीय विचार मांडले आहेत पण नंतर सामाजिक

विषय, प्रश्न महत्त्वाचे आहेत अशी त्यांची धारणा झाली. अनेक कारणांमुळे समाज पांगळा, आंधळा झाला आहे, याची चर्चा त्यांनी आपल्या साहित्यातून केली. त्यांच्या समग्र लेखनाचा पाया हाच मुळी विवेकनिष्ठ आहे. स्वत: ब्राह्मण असूनही त्यांनी त्यांच्या विरोधात लेखन केले. यामुळे सनातनी समाजाने त्यांची जिवंतपणी प्रेतयात्रा काढली. "इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार" हे त्यांचे विचार स्पेन्सरमिलच्या विचारांसारखे आहेत. नवीन काहीतरी देण्याचा त्यांचा सोस नवीन पिढीलासुद्धा काही प्रमाणात पचणारा आहे. पुरोगामी विचारांचे प्रणेते, व्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते म्हणून त्यांचे नाव मराठी साहित्यात स्थिर झालेले आहे.

"यास फिरून नविनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे".[१०] लोकशिक्षक म्हणून त्यांचे हे विचार आधुनिक मूल्यांवर आधारित तत्त्वांचा पुरस्कार करणारे आहेत. उपेक्षित वर्गाला प्राधान्याने शिक्षण देताना स्त्री पुरुषांना एकच शिक्षण एकत्र द्यावे. त्यांचे हे विचार म. फुलें यांच्या विचारांशी साधर्म्य साधणारे आहे. उदारमतवादी, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे रॉबर्ट स्पेन्सर यांच्या धर्ती वरचे आहे.[११]

स्पृश्य अस्पृश्यता ही धर्माबाहेरची गोष्ट आहे. जुन्या चाली पिढयानपिढया पोटाशी धरून बसण्यात अहित आहे. सोवळया ओवळयामुळे निव्वळ निरर्थकता येते. दुराग्रह वाढत गेल्यामुळे समाजात अज्ञान येते. त्यांचे हे विचार दुराग्रहाची तर्कनिष्ठ व बौद्धिक चिकित्सा करताना दिसतात. त्यांनी भारतीय सणांवर मर्मग्राही विचार मांडलेले आहेत. 'शिमगा' हा लज्जास्पद सण हे सांगताना पेहराव, अलंकार अशा सामान्य विषयावरही आपले सडेतोड विचार मांडलेले आहेत. वाङ्मयीन प्रश्नावरही त्यांनी चर्चा केली आहे. विवेकवादावर आधारित त्यांचे लेखन आहे. त्यांचे विचार ऐहिकतेचा पुरस्कार करणारे अज्ञेयवादी विचारसरणीचे आहे. पण वर्णव्यवस्थेतील विचार न्यूनत्वाकडे झुकलेले दिसतात.

आगरकरांच्या वैचारिक साहित्याची भाषाही सुंदर आहे. अलंकाराच्या पेहरावात प्रौढ विचारांची तर्कशुद्ध मांडणी आहे. त्यांच्यातील कल्पकता जबरदस्त आहे. रूपकांचा वापर उल्लेखनीय आहे. म्हणींची यथेच्छ उधळण आहे. वाचकाला समजेल असे दाखले आहेत. लालित्याचा वापर करताना आशयाकडे दुर्लक्ष होत नाही. उत्स्फूर्त आविष्कार आणि वैचारिकता

संपत नाही. भाषेची संयमशीलता, विषयाची विविधता, भाषेतील वक्तृत्वशैली, पल्लेदार वाक्ये आणि समर्पक दृष्टांताचे साहाय्य घेतलेली त्यांची भाषा ही मराठी वाङ्मयात खास नमुना म्हणून गणली गेलेली आहे. म्हणून सुनंदा देशपांडे म्हणतात, "आगरकरांना जे सांगावयाचे आहे त्याचे प्रतिपादन अतिशय उत्कटतेने, सहजतेने, कोणत्याही कृत्रिम अलंकाराचा हव्यास न धरता परिणामकारक रीतीने, प्रभावीपणे वाचकांच्या हृदयात खोलवर जाऊन ठसेल अशाच भाषेच्या साहाय्याने केलेले आहे".[१२]

- **शिवराम महादेव परांजपे** (१८६४ ते १९२९)

शि. म. परांजपे यांनी मराठी वैचारिक साहित्याच्या दालनात गंभीर विचारांची निर्मिती खेळकर वातावरणात केली. लालित्याने तत्त्वांची मांडणी जोरकस करता येत नाही हा समज मोडून काढला. ज्यावेळेला स्वराज्याविषयी उघड बोलता येत नव्हते त्यावेळेला शिवरामपंतांनी २५ मार्च १८९८ रोजी 'काळ' हे पत्रक सुरू केले.

त्यांच्या या वैचारिक साहित्यामध्ये वाङ्मयीन गुणांनीयुक्त राजकीय परिस्थितीवर केलेले भाष्य आहे. त्यांच्या या साहित्यामुळे ब्रिटिश राजवटीची भारतभूमीवर खोलवर गेलेली मुळे उखडण्यास सुरुवात झाली. सशस्त्र क्रांतीचे त्यांनी समर्थन केले. जनतेत स्वातंत्र्यकांक्षा निर्माण केली. थंड संगिनीत प्राण ओतला. तरुण जागे झाले. स्वातंत्र्यासाठी मरण्याची त्यांची तयारी झाली. १९१० साली 'काळ' वर इंग्रजांनी बंदी आणली. 'काळ थांबला', पण प्रेरणादायी विचार अखंडपणे वाहू लागले.

शि. म. परांजपेंनी लेखांमध्ये व्याजोक्तीचा वापर केला. वरचा अर्थ सर्वसाधारण माणसाला उद्देशून आहे असे वाटे. पण खोलवर विचार केल्यावर ब्रिटिश नीतीला उद्देशून आहे दिसून येईल. गनिमी हल्ल्याची त्यांची ही पद्धत मराठी साहित्यामध्ये गनिमी शैली म्हणून पाहता येईल. "भाकरीमध्ये दुसरा एक वाटेकरी आला, तर अर्थात पूर्वी जी एका मनुष्यासच सबंध भाकरी खावयास मिळत होती ती आता दुसरा आल्यामुळे पहिल्याला अर्धीच मिळू लागली".[१३] परांजपे यांची दृष्टी अशी शोधक होती.

भारतीय स्वातंत्र्याभोवतीच त्यांची लेखणी मर्दुमकी करीत असली तरी त्यांच्या साहित्यात तोचतोचपणा येत नाही. आपण भारतीय असून इंग्रजांविरुद्ध आपल्या देशबांधवांविरुद्ध लढतो.

आपला खरा शत्रू इंग्रज आहे. आपण सावध झाले पाहिजे आणि आपण लढले पाहिजे. यासाठी ते तळमळीने लेखन करतात. असे करताना वेगवेगळे दाखले देतात. मनोरम वर्णन करतात.

मराठी साहित्यामध्ये आपल्या स्वतंत्र गुण वैशिष्ठांनी शि. म. नी मुलायम भावरस ओतला आहे. भावनेला ते प्राधान्य देतात. वैचारिक साहित्य असूनसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असलेली रसिक वृत्ती भाषेला लालित्याचा साज चढविताना दिसते. देशावरचे प्रचंड प्रेम व्यक्त करताना पांडित्याचे प्रदर्शन किंवा संस्कृत प्रचुरता कुठेही आढळत नाही. लेखनात अलंकाराची आणि समर्पक दृष्टांताची योजना आहे. वि. स. खांडेकर म्हणतात, ‘‘चिपळूणकर हे मराठी भाषेचे शिवाजी असले तरी परांजपे हे तिचे पहिले बाजीराव होत’’.[१४] वैचारिक साहित्यामध्ये सर्व वाङ्मयीन गुणांचा समुच्चय एकाच ठिकाणी पाहावयाचा असेल तर शि. म. परांजपे यांचे मराठी लेखन साहित्य पाहावे.

- **अच्युत बळवंत कोल्हटकर** (१८७९ ते १९३१)

महादेव शास्त्री कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चिंतामणराव कोल्हटकर, बाळ कोल्हटकर ही मंडळी विविध क्षेत्रातील दिग्गज मानली गेली आहेत. त्यांच्यात घराण्यात ‘वाई’ येथे अच्युतरावांचा जन्म झाला. १९१५ ला ‘‘संदेश’’ पत्र त्यांनी सुरू केले. ‘‘संदेश’’ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरिता जन्मलेला आहे व त्या स्वातंत्र्याला मरण नाही. त्या प्रमाणे ‘संदेश’ संकटांनी कितीही ग्रासला तरी ‘संदेशला’ मृत्यू येणे अशक्य आहे.’’[१५] हे मत संदेशविषयी कोल्हटकरांनी मांडलेले आहे.

आपल्या साहित्यलेखनातून समाजाची सेवा व्हावी हीच त्यांची इच्छा होती. छत्रपती शिवाजी, रामदास, लो. टिळक यांच्याविषयी त्यांच्या मनात आदराचे स्थान दिसून येते. टिळकांवरील त्यांची भक्ती निस्सिम आणि परमोच्चकोटीची होती. त्यांचे साहित्य लेखन सर्वसामान्य लोकांसाठी होते. त्यांचे साहित्यलेखन लोकांना कधीच बोजड वाटले नाही. कारण ते साधे, सहज आणि सर्वांना पटण्यासारखे होते. त्यांच्या वैचारिक साहित्याचा आत्मा टिळक, चिपळूणकरांसारखा होता. तर बाह्यांग शि. म. परांजपे यांच्यासारखे होते. ‘‘हे राष्ट्रमाते, कीर्तनात ज्याप्रमाणे मृदंग ठेवावा त्याप्रमाणे हा संदेशाचा मृदंग तुझ्या कीर्तनात ठेवलेला आहे’’.[१६] अशी त्यांची भाषा सोपी, सुटसुटीत होती. उपमा, अलंकार व कल्पकतेने भरलेली होती. स्त्रियांनासुद्धा आपले वाटावे असे

त्यांचे लेखन होते. कितीही गंभीर विषय असला तरी ते हाताळताना विनोदीपणाचा वापर केल्यामुळे भाषेत बोजडपणा दिसून येत नाही. कोणतीही गोष्ट अतिशय खेळकरपणाने सांगणे हा त्यांच्या भाषेचा गुणधर्म आहे.

स्त्रियांना समान वागणूक दिली पाहिजे. हे त्यांचे विचार त्यांच्या लेखनातून दिसतात. पती पत्नीच्या घरगुती प्रसंगातून ते आपले विचार लोकांच्यापर्यंत सहजपणे पोहचवतात. पण प्रत्येक ठिकाणी देशनिष्ठा व्यक्त होतेच. तो काळ सनातनी होता. इंग्रजांच्या प्रमाणे पत्नीच्या बरोबर दिवसा ढवळया फिरता येत नव्हते. पण अच्युतराव दिवसा आपल्या पत्नीला घेऊन फिरत असत. काँग्रेसचे राजकारण हा विषय विनोदाने ते सादर करतात. म. गांधींची पहिली पत्नी होमरूल लीग असताना ते दुसरी पत्नी 'स्वराज्य सभे' शी संबंध ठेवतात. हे पहिल्या पत्नीला चालत नाही. हे रूपक योजल्याने गांधीजींनी लिहिलेली नोटीस वाचताना हास्याचा धवधवा निर्माण होतो.

'संदेश' या पत्रामधून विविध व्यक्तींचे मृत्युलेख लिहिलेले आहेत आणि त्यातून त्या व्यक्तींचे विचार व कार्य समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केलेले आहे. 'संदेश' चे धोरण या वैचारिक साहित्यामध्ये त्यांनी पाच महत्त्वाच्या व्यक्तींविषयी सांगितले आहे. ते पुरोगामी विचार मांडले तरी बऱ्याच लेखातून तसे दिसत नाही. त्यांच्या लेखनाचा विषय आशय टिळक, चिपळूणकरी असला तरी भाषा मात्र सर्वसामान्यांना पचणारी आहे. आपली मते मांडताना ते कोणाचीही पर्वा करीत नाहीत. मंदिराबाबतची त्यांची भूमिका चमत्कारिक होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लिहिलेल्या पत्रातून ते स्पष्टपणे दिसून येते.

- **डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर** (१८८४ ते १९३७)

कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध असणारे श्री. व्यं. केतकर हे आपल्या कादंबरीतून समाजाचे प्रश्न हाताळताना दिसतात. कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी ललित वाङ्मय लिहिलेले असले तरी त्यातून वैचारिक साहित्याचे आविष्करण होताना दिसते. वैचारिक साहित्याचा विकास करणाऱ्यांमध्ये केतकरांचे नाव अग्रक्रमाने घेतले जावे. समाजाच्या प्रगतीसाठी नवीन विचार नवीन दिशा देताना सामाजिक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे कामही त्यांनी आपल्या साहित्यलेखनातून केले आहे. कादंबरीच्या वृत्तीला बाजूला ठेवून त्यांनी काही लेखही लिहिलेले आहेत. साहित्य अकादमी ने ते 'केतकर लेख संग्रह' म्हणून प्रसिद्ध केलेले आहेत. कादंबरीमध्ये ज्या विक्षिप्त विषयांना त्यांनी स्थान

दिलेले आहे त्या विषयांची मांडणी लेखामध्येही केलेली आहे. काहीसे वावदूक असणारे लेख सावरकरांच्या विचाराच्या दिशेने जाणारे वाटतात. स्वदेशाविषयीचे प्रेम आहे. मराठी भाषेचा अभिमान आहे. महाराष्ट्र सारस्वताची सेवा करणे हे आपले आद्य कर्तव्य समजून त्यांनी 'ज्ञानकोशा' ची अवघड कामगिरी पूर्ण केलेली आहे.

श्री. व्य. केतकर यांच्या जातीविषयक मताचा परामर्श घेताना य. दि. फडके म्हणतात, "तरुणपणी केतकर जातिभेद शक्य तितक्या लवकर नाहीसा करावा अशी भाषा करीत असत. पण चातुर्वर्ण्य सिद्धांत झिडकारण्यास ते कधीच तयार झाले नाहीत".[१७] यावरून त्यांच्या विचारसरणीची आपल्याला कल्पना येते. १९३६ मध्ये 'जोत्स्ना' या मासिकात 'मी व माझे टीकाकार' हा लेख प्रसिद्ध झाला. त्यांची टीकाकारांकडे बघण्याची विनोदी वृत्ती त्यामधून दिसून येते. साहसी लेखनाची नवीन शैलीही त्यांनी विकसित केली.

साहित्य जमविणे, रक्षण करणे, संपादन करणे, प्रसिद्ध करणे आणि संशोधन करणे हे पाच धंदे त्यांनी 'राजवाडे यांची जीवन पद्धती' या लेखामध्ये सांगितलेली आहे. विद्यासेवकातील चौदा लेखांबरोबर त्यांनी समाजाच्या पडद्यापाठीमागे असलेले विषयही हाताळलेले आहेत. (उदा. मुंबई शहरातील शरीर विक्रय, सिनेमाचा धंदा इ.) यातून त्यांचे समाजशास्त्रीय विचार दिसून येतात. त्यांच्या भाषेविषयी डॉ.आळतेकर लिहितात, "डॉ. केतकरांचे लेखन अघळपघळ, भोंगळ आणि इंग्रजी धर्तीवर वाक्यरचना करणारे वाटते. डॉ. केतकरांची बुद्धी तीव्र आणि विवेचन खरी, पण भावनेच्या व कल्पनेच्या अभावामुळे त्यांचे लेख रूक्ष वाटतात".[१८] केतकरांनी आपल्या साहित्यामध्ये 'राष्ट्रभावना, हिंदुनिष्ठा, विश्वबंधुत्व' यांना त्यांनी महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसते.

- **विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (१८६३ ते १९२६)**

व्यासंगी संशोधक आणि अविश्रांत परिश्रम करणारा इतिहासकार म्हणून वि. का. राजवाडे हे संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. राजवाडेंच्या पूर्वी काही लेखकांनी अगदी जुजबी स्वरूपात इतिहास लेखन केलेले होते. पण वि. का. राजवाडें यांच्या इतिहास विषय संशोधनामुळे मराठी साहित्यात ऐतिहासिक भर पडली आणि म्हणूनच काही अभ्यासक "इतिहास संशोधनातील एक अध्वर्यू"[१९] म्हणून त्यांच्याकडे बघतात. १८९६ मध्ये त्यांना ऐतिहासिक कागदपत्रांचे बाढ मिळाले आणि तिथून त्यांच्या इतिहास संशोधन कार्याला सुरूवात झाली. 'मराठयांच्या इतिहासाची साधने' हा

पहिला खंड १८१८ मध्ये प्रसिद्ध झाला. याला १२७ पानांची प्रस्तावना आहे. १८१८ ते १९२७ या काळात त्यांनी एकूण २२ खंड प्रकाशित केले. या खंडांना जोडलेल्या विस्तृत, अभ्यासपूर्ण प्रस्तावना, समाजशास्त्र, भाषा व व्याकरण वाङ्मय चिकित्सा, वैविध्यपूर्ण विषयावरील ग्रंथ रचना आणि काही संपादित ग्रंथ अशी विपुल साहित्य संपदा बहाल करणारे वि. का. राजवाडे हे मराठी साहित्य व इतिहास क्षेत्रात बहुमोल कामगिरी करणारे अजरामर व्यक्तिमत्त्व आहे.

७ जुलै १९१० ला पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळाची त्यांनी स्थापना केली. ऐतिहासिक दुर्मिळ ग्रंथ, कागदपत्रे, चित्र, प्राचीन नाणी, अहवाल, इतिवृत्ते यांचे त्यांनी संपादन केले. म्हणूनच अरविंद ताटके म्हणतात, ''निरालसपणा, अमर्याद कष्ट करण्याची दांडगी उमेद, सर्वव्यापी विवेचक बुद्धी व विलक्षण ग्राहकता हे त्यांचे खास गुण होत''.[२०]

'इतिहासाचार्य' म्हणून गौरविलेले राजवाडे यांनी आपल्या ग्रंथांना ज्या प्रस्तावना लिहिलेल्या आहेत त्यामधून मराठी वैचारिक साहित्याचा पाया आपल्याला ठळकपणे दिसून येतो. शोधक आणि मार्मिक असणारे हे साहित्य त्यांनी अविश्रांतपणे केलेल्या कष्टाचे दर्शन घडविते. त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व या साहित्यातून प्रतिबिंबित होते. १८८४ ते १८९० या काळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या शिक्षणपद्धतीवर जे भाष्य केलेले आहे ते आजच्या काळातही तंतोतंत लागू होते.

'विकार विचार प्रदर्शनाच्या साधनांची उत्क्रांती' हा राजवाडे यांचा महत्त्वपूर्ण वैचारिक लेख. यातून ऐतिहासिक तत्त्वमीमांसा आणि विज्ञाननिष्ठ विचार दिसून येतात. भाषेविषयीच्या भ्रामक कल्पनेवर सडेतोडपणे मांडलेले त्यांचे तात्त्विक विचार उल्लेखनीय आहेत. तर्कनिष्ठ विवेकी विचारांच्या निर्मितीचा उहापोह करताना भाषेच्या आजच्या रूपाचे ते विश्लेषण करतात. ''काव काव करणाऱ्या पाखराला काक, किः खिः करणाऱ्या माकडाला किरवी .... भृंग आवाज करणाऱ्याला भृंग अशी शब्दावरून प्राण्याला नावे तो (माणूस) देतो''[२१] यातून मॅक्समुलरच्या 'वस्तुनादानुकरण' या सिद्धांतासारखा विचार करताना ते दिसतात.

पुराण ग्रंथातील दैवी उत्पत्ती ते नाकारताना मानवी कर्तृत्वाला महत्त्व देतात. वाङ्मयाचे विश्लेषण करताना ते म्हणतात, ''मनुष्य जातीच्या मुखातून जे जे म्हणजे सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपाने भूत, वर्तमान व भविष्यकाळ बाहेर पडले, पडते व पडेल ते ते सर्व वाङ्मय होय.''[२२] त्याच्या वैचारिक साहित्यातून मराठी भाषेवरचे प्रेम दिसून येते. भाषा, वाङ्मय, लिपी, व्याकरण

इत्यादींचा अभ्यास राष्ट्रहितासाठी आवश्यक आहे याचे प्रतिपादन ते करतात. विज्ञानाला महत्त्व देताना अस्पृश्यता निवारणासंबंधी आपले मत ठामपणे मांडतात. जात्युत्कर्ष म्हणजे कनिष्ठ जातीतून वरिष्ठ जातीत जाणे याबद्दल सुचवितात. त्यांनी अनेक महनीय व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा आपल्या साहित्यातून घेतलेला आहे.

राजवाडे यांनी कागदपत्रे, शिलालेख आणि मराठी व संस्कृत पोथ्या उपलब्ध करवून त्यावर टिपणे काढली. काहींवर लेख लिहिले. इतिहासाची सुव्यवस्थित मांडणी केली. त्यामुळे प्राचीन मध्ययुगीन भारताचा इतिहास आपल्याला समजतो. त्यांची भाषा साधी सोपी नि सरळ असून त्यामध्ये अलंकारप्रचुरता आणि पांडित्य प्रदर्शन दिसून येत नाही. सडेतोड भूमिका आणि तर्कशुद्ध मांडणी हा त्यांच्या विचार प्रतिपादनाचा गाभा आहे.

- **कृष्णराव भालेकर** (१८५० ते १९१०)

अस्पृश्य आणि बहुजन समाजातील लोकांना शिक्षण मिळावे, शेतकऱ्यांची दुर्दशा संपून जावी या सत्यशोधक विचाराने पछाडलेले कृष्णराव पांडुरंग भालेराव हे धडाडीचे कार्यकर्ते होते. शेतकरी, कामगारांची दु:खे आणि समस्या लोकदरबार, राजदरबारात मांडाव्यात यासाठी भालेकरांनी १८७७ साली ''दीनबंधू'' हे पत्र सुरू केले. महात्मा फुले बहुजन वर्गासाठी 'शुद्रातिशूद्र' हा शब्द वापरत असत. परंतू धनंजय कीरांनी सांगितल्या प्रमाणे ''लोखंडे आणि भालेकर त्यांचे वर्णन कनिष्ठ हिंदू म्हणून करीत''.[२३] फुल्यांच्या विचारसरणीतून थोडेसे वेगळे असलेले भालेकर यांनी 'बळिबा पाटील' ही पहिली मराठी ग्रामीण कादंबरी लिहून 'दिनमित्र' मधून ती क्रमश: प्रसिद्ध केली. १८९३ मध्ये त्यांनी 'शेतकऱ्यांचा कैवारी' या पत्राचे संपादन केले.

'भालेकरकृत श्रीखंड' असा शब्द ते 'दीनमित्र' मधून प्रसिद्ध होणाऱ्या पद्यलेखनासाठी योजितात. लेखनाबरोबर त्यांच्यात कृतिशीलताही दिसून येते. वर्णव्यवस्थेमुळे बहुजन समाज हिनावस्थेला गेला आहे, असे भालेकरांना वाटते. शेतकऱ्यांची हीनदीन अवस्था त्यांना पाहावत नव्हती. 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या लेखात ते शेतकऱ्यांना जागे करण्याचा प्रयत्न करतात. शेतकरी झोपी गेलेला आहे. ही झोप अविद्येची, अज्ञानाची, अंधश्रद्धेची व परंपरेने लादलेल्या धार्मि क व सामाजिक गुलामगिरीची आहे. हे सांगून त्यांच्या भोळया वेडगळ समजुती काढण्याचा प्रयत्न

आपल्या लेखणीतून करतात. बुरसटलेल्या विचारांपासून शेतकऱ्यांना परावर्तित करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचे अवघड कार्य निष्ठेने आणि तळमळीने करताना दिसतात.

शिक्षणाप्रमाणे त्यांची ब्राह्मणविषयक मते पाहण्यासारखी आहेत. ब्राह्मणांवर रागावण्याची ते सहा कारणे देतात. त्यांची चिकित्सक वृत्ती व समाजसुधारणेची तळमळ यातून दिसते. पण भालेरावांच्या लेखनाचा केंद्रबिंदू शिक्षण हाच आहे. त्यांची विचार विवेचनाची शैली अतिशय सुंदर आणि ओघवती आहे. त्यांची वक्तृत्व शैली कृत्रिमपणाचा आधार घेत नाही. उपमा अलंकाराचा योग्य ते वापर करतात. लोकशिक्षणाचा मंत्र आपल्या वैचारिक साहित्यातून त्यांनी मांडलेला आहे.

- **नारायण मेघाजी लोखंडे** (१८४८ ते १८९७)

भारतीय कामगार चळवळीचे प्रवर्तक असलेले नारायण मेघाजी लोखंडे हे ब्राह्मणेतर चळवळीतून उदयाला आलेले वैचारिक साहित्यकार आहेत. १८८० साली आर्थिक अडचणीमुळे 'दीनबंधू' हे पत्रक बंद पडले. लोखंडे यांनी हे पत्रक मुंबई येथून १८८० पासून सुरू केले. परिवर्तनवादी विचारसरणीचा पुरस्कार करून 'मिलहॅड्स असोशियेशन' ही कामगार संघटना त्यांनी स्थापन केली. 'दीनबंधू' या मासिकातून त्यांनी कामगारांच्या समस्यांवर प्रकाश पाडला. कामगारांच्या अधिकारांचे संरक्षण व्हावे यासाठी 'फॅक्टरी ॲक्ट' करूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. याकडे त्यांनी इंग्रज सरकारचे लक्ष वेधले. त्यांच्या या कार्याची नोंद मनोहर कदम यांनी आपल्या ग्रंथात घेतलेली आहे. "सरकारने जो फॅक्टरी ॲक्ट केला आहे. त्याची अंमलबजावणी जो कोणी लक्षपूर्वक पाहील त्यास असे आढळून येईल की, गिरण्यांचे व्यवस्थापन सरकारच्या कायद्यास धाब्यावर बसविण्याविषयी निरनिराळया प्रकारच्या युक्त्या लढवितात."[२४] कामगारांच्या प्रश्नाकडे जसे त्यांनी लक्ष दिले तसे त्यांनी तत्कालीन साहित्यलेखनाकडेही लक्ष दिल्याचे दिसते.

नारायण लोखंडे यांची भाषा ओबडधोबड असली तरी आशयसमृद्ध आहे. उपमा अलंकार तिला सोसवत नाही. ब्राह्मणेतरांच्या उन्नयनासाठी आपली लेखणी क्वचितच आढळते. ब्राह्मणेतर लोकांच्यासाठी आणि कामगारांच्या प्रश्नासाठी त्यांनी केलेले लेखन हे वैचारिक साहित्याच्या प्रवासातला महत्त्वाचा भाग आहे.

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१ ते १९५६)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक साहित्याचा मागोवा घेताना त्यांच्या विविध पैलूंचे दर्शन आपल्याला थक्क करून सोडते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १० जानेवारी १९३८ रोजी 'शेतकरी तितका एक' हा विचार मांडून शेतकऱ्यांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी विधिमंडळावर भव्य मोर्चा नेला या दृष्टीने ते शेतकऱ्यांचे नेते होते.[२५] त्यांचे संपूर्ण साहित्य अभ्यासले तर त्यामधून एक सच्चा विचारवंत, इतिहास संशोधक, अर्थतज्ञ, समाज शास्त्रज्ञ, चिकित्सक लेखक, राजकीय विचारवंत, धर्मशास्त्र अभ्यासक आणि घटनातज्ञ अशा अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. 'मूकनायक' या पाक्षिकामध्ये लिहिलेले त्यांचे मनोगत म्हणजे वैचारिक साहित्याला दिलेली नवी दिशा होय. त्यांच्या या साहित्यामध्ये कुठेही संदिग्धता आढळत नाही. विषय कसा हाताळायचा याचे पुरेपूर भान त्यांना होते. माणसाला माणूसपणाची मूल्ये देण्यासाठी त्यांचे हे साहित्य खूप मौलिक असे आहे.

स्पृश्य आणि अस्पृश्य समाजाचे मनपरिवर्तन व मतपरिवर्तन करण्यासाठी त्यांनी वैचारिक साहित्याचे लेखन केले आहे. त्यांच्याकडे वैचारिक समर्थ बैठक आहे व त्यामध्ये नवसमाज रचण्याची ताकद आहे. आंबेडकर हे अभ्यासक असल्यामुळे त्यांच्या वैचारिक साहित्यामधून संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचा निर्देश केलेला आहे. 'मूकनायक' पत्राला निवडलेली बिरुदावली तुकाराम महाराजांची आहे. प्राचीन वाङमयाचा अभ्यास असल्यामुळे ते महाभारतातील कथांचाही उल्लेख करताना दिसतात. महाभारतात सांगितल्याप्रमाणे माणूस पितृऋण, देवऋण, ऋषिऋण, लौकिक ऋण अशी चार ऋणे आपल्या पाठीवर घेऊन जन्माला येतो.[२६] यातील लौकिक ऋण हे प्रत्येकाने फेडले पाहिजे असे आंबेडकर ठणकावून सांगतात. लौकिक ऋण म्हणजे समाजाचे ऋण स्वीकारून ते फेडले पाहिजेत.

गांधीजींची अहिंसा ही खऱ्या अर्थाने हिंसा होती असे आंबेडकरांना वाटते. "हिंसा म्हणजे नुसता जीव घेणेच नव्हे तर दुसऱ्या प्राण्यांचे मन किंवा शरीर यास इजा करणे याचाही त्यांत समावेश होतो. अर्थात अहिंसा म्हणजे कोणाही सचेतन प्राण्यास न दुखविणे होय."[२७] हिंसेचा व्यापक अर्थ सांगताना त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचा सूक्ष्मरितीने अभ्यास केलेला दिसतो. "प्रगति"चा आढावा घेताना

आंबेडकरांच्या या जैन तत्त्वज्ञानाचा त्यांच्या अभ्यासाचा आणि विचारांचा मनापासून मला खूप आदर वाटतो.

"ब्राम्हणांच्या खाणीतून हिरे निघतात आणि शूद्रांच्या खाणीतून सारे कोळसेच निघतात अशा खोटया समजुतीला हिंदुसमाज बळी पडला आहे."[२८] असे बाबासाहेबांना वाटते. जातिभेद मानणे, स्त्रियांना कमी लेखणे यामुळे माणूस माणसांचा द्रोह करतो असेही त्यांना वाटते. त्यांच्या या वैचारिक साहित्याला संदर्भाचा, दाखल्यांचा प्रत्येक ठिकाणी आधार आहे. गुळगुळीत आणि मोघम विषय स्पष्टीकरणात त्यांना रस नाही. निर्भयपणे सत्य सांगताना त्यांची दृष्टी संशोधकाची बनते. "हिंदु समाज हा अनेक वर्ष जगला तो केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगला आहे."[२९] असे विचार मांडताना त्यांची धारदार लेखणी कुणाचीही तमा बाळगत नाही.

'शिका व संघटित व्हा' हा मंत्र आंबेडकरांनी दिलेला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वाप्रमाणेच सामाजिक न्याय या तत्त्वास त्यांनी महत्त्व दिले. दलित मनावर संस्कार करण्यासाठी, दांभिकपणाचे वाभाडे काढण्यासाठी आणि लोकोन्नती करण्यासाठी त्यांनी आपली लेखणी अविरतपणे चालवली. समाजोद्धार आणि आत्मोन्नती हा गाभा त्यांच्या साहित्यात दिसून येतो. आक्रमक अशी त्यांची भाषाशैली जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्यात यशस्वी होते. बुद्धिप्रामाण्याची जोड भाषेला दिल्यामुळे संदिग्धता दिसून येत नाही. वैचारिक साहित्याला त्यांनी जी शीर्षके दिलेली आहेत त्यातही अर्थगांभीर्य जाणवते. भाषेत लालित्य, अलंकार कुठेही कृत्रिम वाटत नाहीत. उपहास हा ठळकपणे दिसणारा गुण त्यांच्या भाषेत आढळतो. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अखंड आणि जिवंत झरा वैचारिक साहित्याच्या माध्यमातून मराठी भाषेला मिळालेला आहे. तर्कशुद्ध आणि तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे विचार आणि कृती यात अंतर राहिलेले नाही.

- **विनायक दामोदर सावरकर** (१८७३ ते १९६६)

बॅ. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या वैचारिक साहित्यातून स्पष्टपणे दिसते. भारतावर इंग्रजांचे राज्य आणि त्यामुळे भारतीय संस्कृतीवर झालेला परिणाम याचा ते प्रखर शब्दात विरोध करतात. समाजामध्ये चालू असलेल्या चुकीच्या वेडगळ चालींचा ते निषेध करतात. देवभोळेपणाला विरोध करतात. त्यांची देवावर श्रद्धा होती. पण 'उत्कट भावना व तर्कट बुद्धी' त्यांच्या ठिकाणी होती. देवाला ते मानतात. पण त्यासाठीच्या चुकीच्या कल्पना, पद्धती उदा. सत्यनारायण पूजा

वगैरे त्यांना खुळचटपणाच्या वाटतात. काही ठिकाणी त्यांची भावना त्यांच्या विचारांबरोबर सामना करताना दिसते. 'दोन शब्दांत दोन संस्कृती' या त्यांच्या लेखनात भावनेपेक्षा विचार प्रबळ ठरल्याचे दिसते. सावरकरांनी 'खरा सनातन धर्म कोणता ?' या लेखामध्ये 'सनातन या शब्दाचा पारंपरिक अर्थ न सांगता शाश्वत सत्याचे परिणाम त्यास लावले आहेत. धर्म वेडेपणा नष्ट करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर करावा हे त्यांचे विचार स्पष्ट करताना डॉ. गिरीश मोरे म्हणतात, "देवभोळेपणा घटला तरच यंत्रशीलपणा वाढेल असे त्यांना वाटते. त्यामुळेच ते यंत्रांचे स्वागत करतात. यंत्रांनाच देवता मानतात. 'यंत्र' या निबंधात त्यांनी यंत्रबळाचे महत्त्व विशद केल्याचे दिसते. यावरून 'राष्ट्रवादी' प्रमाणे 'वैज्ञानिक' साहित्यकार म्हणून सावरकरांकडे पाहता येते.[३०] वैज्ञानिक सत्य मांडताना ते इतिहास विषयाकडे दुर्लक्ष करीत नाहीत. समाजामध्ये असलेल्या रूढींच्या बेडया आणि जातिभेद नष्ट करण्यासाठी त्यांच्यामध्ये असलेली सामाजिक उत्थानाची तळमळ कौतुकास्पद आहे.

सावरकरांच्या लेखामधील मतांमध्ये प्रतिपादनातील आग्रहीपणा दिसतो. आक्रमक लेखन करताना उपहास आणि उपरोधाचे साहाय्य ते घेतात. कट्टर हिंदुत्ववादी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

वैचारिक साहित्याचा पाया रचणाऱ्या उल्लेखनीय व्यक्तिमत्त्वांचा, त्यांच्या लेखणीचा, विचारांचा, तर्कनिष्ठ सुसंगतीचा, कौतुकास्पद कामगिरीचा, समाजाला बदलू पाहणाऱ्या स्पंदनाचा विचार विकासाच्या माध्यमातून केला. यानंतर जैन वैचारिक साहित्याचा त्यांच्या क्रमवार विचारसरणीचा, प्रगतीशील कार्याचा, सडेतोड मांडणीचा, रोखठोक जगण्याचा आढावा घेऊया.

## २.४ जैन वैचारिक साहित्य

माणसाची ओळख विचार करणारा प्राणी म्हणूनच आहे. तो विचार करतो म्हणूनच प्रगतीची अनेक दालने त्याच्यासाठी खुली होतात. त्याच्या वागण्या, बोलण्यात, लिहिण्यात हा विचार हुशारीच्या रूपात येतो. माणूस विचार करतो अगदी सहजपणे, जाणीवपूर्वक ठरवून त्याला विचार करावा लागतच नाही. माणूस सहजपणे जसा श्वास घेतो तसे सहजपणे त्याच्या मनात विचार येत राहतात. हेच विचार त्याच्या कृतीत उतरतात. त्याच्या व्यक्तिमत्त्वात भरून राहतात. चांगले,

वाईट, बरोबर, चूक हे माणसाला त्याच्या मनाने, विचारांनी संकेत दिलेले असतात. त्याला सतर्कता आलेली असते. मात्र हे विचार अल्लाउद्दिनच्या दिव्याप्रमाणे असतात. चांगला विचार करणारा माणूस जादुई दिव्याचा वापर चांगल्यासाठीच करतो.आपल्यावर जसे संस्कार असतात ते जसे रूजतात तसेच विचार घडत असतात.

जैन समाज हा अनेक धार्मिक रितीरिवाज आणि रुढी परंपरेत अडकलेला आहे. त्यामुळे जैन लेखिकांची विचार करण्याची पद्धत ही धर्माशी निगडीत आहे. समाजात चाललेल्या अनिष्ट रुढीवर, चुकीच्या परंपरेवर, कर्मठ समाजावर प्रहार करताना तिची लेखणी अधिकच तेजस्वी झालेली आहे. पण अधिकतर हे रितीरिवाज तिच्या मनाला सुख देऊन जातात. आणि हेच सुख त्यावरचे विचारमंथन लेखनीच्या रुपात समाजासमोर आणण्याचं काम जैन लेखिकांनी केले आहे.

विचारप्रधान लेखन हे तर्कशुद्ध असते. बुद्धीला आव्हान देणाऱ्या किंवा अस्वस्थ मनाला चालना देणाऱ्या निरीक्षणावर आधारित असते. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, नीती, ज्ञान-विज्ञान मागची तळमळ या लेखातून व्यक्त होते.लिहिणाऱ्याला कळकळीने काही तरी सांगायचे असते.

'प्रगती आणि जिनविजय' मधल्या वैचारिक लेखामध्ये लेखिकानी हे लेखन भावनिक तळमळीने जीव ओतून लिहिले आहे. स्त्री सुधारणा व्हावी समाजसुधारणा, धर्मसुधारणा व्हावी हा या लेखनापाठीमागचा हेतू आहे. १९२० ते १९३० या दहा वर्षात काही आढळले नाही.

## २.५ सन १९३१ ते १९४१ या काळातील प्रगती आणि जिनविजय या नियतकालिकातील वैचारिक साहित्य

संपूर्ण भारतात हळूहळू शिक्षणाचा प्रसार सुरू झाला होता. स्त्री शिक्षणाची सुरुवात झालेली होती.जैन समाजावर या शिक्षणाचा प्रभाव पडत होता. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या स्त्रियांना स्वत:च्या मताची जाणीव होत होती. सरलाबाई नाईक हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्या १९३४ साली एम.ए. झालेल्या होत्या. स्त्रियांच्या दृष्टीने त्यांच्या हिताचा विचार त्या करू शकत होत्या.

स्त्रियांचे कार्यक्षेत्र या लेखात २२ मे १९३४[३१] सौ. सरलाबाई नाईक एम. ए. म्हणतात. "स्त्रियांचे कार्यक्षेत्र शिक्षणाच्या प्रमाणे परिस्थिती व समाजातील समजुती यावर अवलंबून आहे. जिजाबाई,,,,, अहिल्याबाई,, बायजाबाई,, लक्ष्मीबाई यांनी राजकारणात नाव कमावले पण मुसलमानी सत्तेत संरक्षणासाठी स्त्रियांना पडद्याची पद्धत स्वीकारावी लागली. त्यामुळे त्याचे जीवन संकुचित होत गेले. हळूहळू स्त्री ही केवळ पतीच्या वैयक्तिक इच्छा पूर्ण करण्यासाठी उत्पन्न झाली आहे असा समज रूढ झाला व अज्ञानावस्थेत रुतलेल्या स्त्रियांनाही दागिने घालून देह सजविणे, पतीची खुषी व मर्जी सांभाळणे एवढयासाठीच आपल्या जन्म आहे असे वाटू लागले. दुबळे शरीर, अशिक्षित बुद्धी, नष्टप्राय विचारशक्ती व परावलंबीपणा यांच्या जणू काय त्या मूर्तीच बनल्या".

१९३४ साली एवढया धाडसाने लिहिणारी सरलाताई जैन स्त्रियांसाठी नक्कीच आदर्श असतील. जैन स्त्रियांना ह्या खूपच सोवळे ओवळे पाळणाऱ्या होत्या. सोवळे पाळताना आपण कुणाला दुखावतो किंवा सोवळे स्वच्छ असले पाहिजे याकडे दुर्लक्ष होताना दिसते. आणि म्हणूनच लीलावती जुनूनकर अमरावती २६ जून १९३४[३२] यांनी 'सोवळे पुराण' नावाचा लेख संवादातून स्पष्ट केला आहे. सोवळे म्हणजे स्वच्छता या आरोग्यदायी सोवळयाकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी बायकांना स्पष्ट विचारले आहे. 'आठ दिवस न धुतलेले सोवळे कसले?'

जैन समाजात स्त्रियांच्या वैचारिक दर्जातही सुधारणा होत होती. त्या काळात शहा यांनी सुधारणा करण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. सप्टेंबरचा त्यांचा 'महिला वाचनालय'[३३] हा लेख वाचला म्हणजे स्त्री शिक्षणासाठी त्याची तळमळ आणि आत्मीयता आपल्याला प्रखरपणे दिसून येते आणि त्यांच्याबद्दल आदर वाटू लागतो.

वाचनाविषयीचे आपले विचार स्पष्ट करताना त्या म्हणतात, 'वाचनाच्या योगाने मनोरंजन होऊन ज्ञानप्राप्ती होते. विरह,,, द:ख,, वेदना,, कंटाळलेपणा येतो अशा वेळी वाचनासारखे दुसरे साधन नाही. निराशेचे निरसन करण्यासाठी सीता, ,मैना, सुंदरी व द्रौपदीसारख्या आदर्श गृहिणी,, ब्राम्ही,, सुंदरीसारख्या तत्वज्ञानी स्त्रिया, झाशीची राणी लक्ष्मीबाई,, अहिल्याबाई,, चंदनबाला व अनंतमतीसारख्या पराकमी स्त्रियांची चरित्र वाचली असता पुनरुत्साह प्राप्त होऊन धैर्य उत्पन्न होते. आळस हा मोठा दुर्गुण आहे. तो आपल्याला वाचनापासून तोडतो.' याशिवाय वाचनालयाची

आवश्यकता, ग्रंथसंग्रह,, वर्तमानपत्रे,, नियतकालीकांचा संग्रह, , फिरते वाचनालय, , श्राविकाश्रम, कोल्हापूरचे प्रयत्न वैगरे मुद्देही त्यांनी लेखात समाविष्ट केले आहेत.

कोल्हापूरच्या जिनसेन भट्टारकाचे शिष्य समाधिगुप्त भट्टारक यांनी आपल्या ध्यान अध्ययनाकरिता अनंतमति आर्जिकेच्या हातून माघ वद्य प्रतिपदा शके १६६५ रूधिरोद्गार संवत्सर गुरूवारी लिहिण्यास प्रांरभ केला आणि मार्गशीष १३ शके १६६९ प्रथमनाम संवत्सर गुरूवारी नंदापूर नगरात संपविला हा उल्लेख परामागम नावाच्या ९६९ पानी कानडी लिपितल्या जुन्या ग्रथांत सापडतो. सौ.सुलोचना भोकरे याच्या वाचनात हा ग्रंथ आला. त्या अस्वस्थ झाल्या.दोनशे वर्षा पूर्वी इतकी वळणदार अक्षरे काढणारी अनंतमती कोण? तिने आणखी काही ग्रंथ लिहले आहेत काय? त्या काळच्या इतर जैन सुशिक्षित स्त्रियांची माहिती, नांदणीच्या भट्टारक महाराजांची गादी किती वर्षापूर्वीची? या बद्दल संशोधन व्हायला हवे म्हणून ही अनंतमती लेखिका कोण? हा लेख सौ.सुलोचना भोकरे यांनी ६ नोव्हेंबर १९३४[३४] च्या अंकात लिहिला.

'एका दिवसात लग्न' या विषयावर १६ जुलै १९३५[३५] ला कु. शंकुतला बोवडे यांनी विचार मांडले आहेत. मोठयांच्या वागण्यातून मुलांना शिकवण मिळावी यासाठी लीलाताई जुनुनकर ३० जुलै १९३५[३६] यांनी 'वडील माणसांची शिकवणूक' हा लेख लिहिला. लग्न हा विषय तसा नाजूक पण या विषयावर ५ नोंव्हबर १९३५[३७] च्या अंकात लीलाताई जुनूनकर यांनी विचार करायला लावणारा पण समजून सांगणारा लेख लिहिला आहे. सासरी हातात पुस्तक घ्यायची जिथ चोरी असेल तिथं शिकवण्याची गोष्ट तर दूरचीच,,, अशा ठिकाणी लग्न झालेल्या मुलीला (कुसुमला) अंगावर धोंडा पडण्या एवढे दु:ख होते म्हणून कुसूम या लग्नाला विघ्न म्हणते. कथानकामध्ये गुंफलेल्या या लेखाचे नाव आहे 'लग्न की विघ्न'

'सुधारलेले लग्न'[३८] या लेखात रत्नप्रभा महाजन यांनी अनेक स्त्रियांच्या विचारांचा आधार घेऊन लग्न कसे करावे हे सांगितले आहे. माधवराव काळे या बन्नोरे समाजातील गृहस्थांनी एका दिवसात लग्न केले. त्याचे हे विचार सुधारणावादी होते पण लग्नात मिरवायला मिळाले नाही म्हणून नातेवाईक, स्त्रियांना खूप दु:ख झाले. या लग्नावर टीका झाली. पुरुषांना दारिद्रय आणण्यास ही लग्नेच कारणीभूत होतात. लग्नात पैशाची धूळधान होते. असे सांगून त्यांनी समाजाला आवाहन

केले आहे की, 'खोटी लाज सोडा, पोकळ चालीरिती तोडा - मोडा फेकून द्या. पण आपला पैसा सांभाळा. घराचे रक्षण करा. त्यासाठी प्रत्येक जैन स्त्रीने पहिली गोष्ट ही केली पाहिजे की, लग्न एका दिवसात ५/- रू. करा. जेवणं,,,, मिरवणं यामुळे लग्नाला पैसे जास्त लागतात.'

'पोटाचा प्रश्न'[३९] या लेखात कु.शंकुतला नामचंद गांधी,, पंढरपूर या म्हणतात, "पोटाचा प्रश्न सोडवायचा असेल तर व्यवहारी शहाणपणा शिकलेच पाहिजे. स्वावलंबनाचे शिक्षण हेच स्वाभिमानाचे शिक्षण! खरे शिक्षण हेच!" शिक्षणाच महत्व सांगताना त्यांनी आधुनिक शिक्षण म्हणजे स्वाभिमान, धर्म, निष्ठा, स्वावलंबन वगैरे सारख्या अंगच्या अमोल गुणास पारखे बनवून माणसाला मातीमोल करणारे मद्य आहे हे ही मत नोंदवले आहे.

स्त्रिया शिकल्या पाहिजेत त्यामुळे त्या धाडसी बनतील, त्यांच्यात आत्मविश्वास येईल असे बऱ्याच शिकलेल्या स्त्रियांना वाटत होते. सौ.सुलोचना भोकरे ३१ डिसेंबर १९३५[४०] च्या 'चांदणीत तूप' या लेखात हे विचार मांडले आहेत. लेखाच्या आधी त्यांनी एक टीप दिलेली आहे. 'वऱ्हाडात विशेषत: कारंजात पर्युषण पर्वामध्ये सकाळी मंदिरात देवदर्शन करून आल्यानंतर एकासना पूर्वी जे अल्पाशन अर्थात फराळ करतात त्याला चांदणीत तूप घालणे म्हणतात.' चांदणीत वरचे वर तूप घातल्याशिवाय ती चांगली तेवत राहू शकत नाही तद्वत आपल्या आत्मज्योतीच्या चांदणीत तूप घातल्याशिवाय आपल्याला उत्साह वाटत नाही. पुरुषांना उलाढालीची कामे करता यावीत म्हणून त्याच्या चांदणीत वरचेवर तूप घालणाऱ्या स्त्रियांना त्या उदेशून म्हणतात 'भगिनिनों तुमचा पती व्यसनी असेल तर मुळुमुळु रडत बसू नका त्याला दुर्व्यसनापासून परावृत करा. तो अधर्मी असेल तर चेलना राणीसारखे वागा तो देशद्रोही असेल तर रजपूत वीरांगनेचे चित्र समोर आणा.'

पुरुष वर्गाला खडबडून जागे करण्यासाठी त्याच्या मनाची ज्योत चांगली तेवत ठेवण्यासाठी त्याला प्रोत्साहनरूपी तूप घाला की जेणे करून उत्तरोत्तर उत्कर्षाची स्थिती प्राप्त होऊन जैन समाज हा हिंदुस्थानचा एक राजकीय घटक आहे असे होईल. शिक्षण आणि त्यावर ज्ञान यामुळे स्त्रियांना परिस्थितीतून मार्ग काढता येईल.

धार्मिक कार्यक्रमावर प्रश्न विचारण्याचे धाडसही या स्त्रियांमध्ये आहे. प्रत्येक वर्षी महावीर जयंती का साजरी करायची असा प्रश्न ही या स्त्रियांना पडतो हे विशेष. या बद्दलचा प्रश्न उषादेवी

मगदूम यांनी 'महावीर जयंती' या लेखात (९ जुलै १९४१)[४१] विचारलेला आहे. त्या म्हणतात, 'आपण फक्त ढेकणावर दया करतो आणि शेजारी उपाशी असतानाही पंचपक्वानावर ताव मारतो. वीतभर शेतासाठी पाठच्या भावाचे डोके फोडतो. चार पैसे व्याजासाठी कुळाची बायका पोरे रस्त्यावर टाकतो आणि सुंदर मुलीपायी अनेक खून पाडतो. अहिंसा धर्माच्या पताका एका हातात घेऊन एका हातांनी विधवांचे गळे कापतो आणि महावीर जयंतीही साजरी करतो'. दांभिक, दुटप्पी आणि स्वार्थी समाजाची टरफले लेखिकेने काढलेली आहेत. पुढे महावीरांची मूर्ती बोलते आहे. समाजाची उलट तपासणी करते आहे. असे महावीरांच्या तोंडूनच स्वार्थी समाजाचे चित्र मांडले आहे.

या स्त्री लेखिकांनी साहित्यिक क्षेत्रावरही भाष्य केले आहे. कु. कांता शहा यांनी फडके-अत्रे वादावर आपले विचार मांडले आहेत. लेखाचा विषय 'विचारतरंग'[४२] असा आहे. त्या म्हणतात, ''आनंदाची गोष्ट ही की, फडके-अत्रे वाद थांबल्यामुळे दोघांच्याही वृत्तपत्रामधून परस्परांच्या उखाळया पाखाळया काढून जी अश्लीलतेची धूळफेक होत आहे तिच्यातून सदाभिरुची बायकांची सुटका झाली. दु:खाची गोष्ट ही की, काही 'हिंदुत्व छाप' भ्याडांनी जो निंद्य हल्ला करुन लेखन स्वातंत्र्यावर नि स्वतंत्र मतप्रणालीवर घाला घातला त्यामुळे स्वातंत्र्यवीरांनी स्वातंत्र्याचीच पिछेहाट केल्यासारखे झाले. समाजातल्या बऱ्याच 'आनंदाच्या गोष्टी' आणि 'दु:खाच्या गोष्टी' त्यांनी विचार तरंग मध्ये मांडल्या आहेत''.

आपल्या समाजामध्ये जात, पोटजात असे प्रकार आढळतात. आज ही जातीबाहेर जाऊन किंवा पोटजात सोडून विवाह केलेला चालत नाही. मग साठ वर्षांपूवीची गोष्ट तर काय असेल ? सुधारणावादी मत मांडणे वेगळे आणि त्यांची वाटचाल करणे ही गोष्ट वेगळी. साठ वर्षांपूर्वीही पोटजातीत मिश्र विवाह व्हावेत असे म्हणणारे बरेच सुधारक होते. ते विचार मांडत. पण पोट जातीबाहेर जाऊन विवाह मात्र अपवादानेच होत. सौ. सुलोचना भोकरे यांनी 'आंतर्जातीय विवाहार्थ तीन सूचना' (१७ डिसेंबर १९४१)[४३] या लेखात याच विषया संबंधी काही सूचना केल्या आहेत. स्पष्ट, परखड बोलणाऱ्या सुलोचनाबाई म्हणतात, 'दक्षिण महाराष्ट्र जैन सभेने तरी जैनांच्या पोट भेदात विवाह करावेत असा स्पष्ट ठराव आपल्या वार्षिक अधिवेशनात केलेला दिसून येत

नाही. (केला असल्याचे दाखविल्यास मी माझे म्हणणे परत घेईन) त्यासाठी त्यांनी केलेल्या सूचना अशा ....

१) जैनांच्या पोटभेदात सर्रास लग्ने करावीत अशा स्पष्ट शब्दात येत्या सभेत ठराव पास करावा.

२) ज्या ज्या गावी निरनिराळ्या नावाने ज्या सैतवाल्यांच्या वार्षिक सभा भरतील. त्या प्रत्येक सभेत हा ठराव मान्य असेल तर तपास केला पाहिजे. म्हणजे असे मिश्रविवाह घडवून आणण्यात त्या समाजातील लोकांना उत्तेजन मिळेल.

३) श्री. लक्ष्मीसेन, श्री. जिनसेन, श्री. विशालकिर्ती व श्री. देवेंद्रकिर्ती या भट्टारकांनी आंतरजातीय विवाह होण्यास आमची पूर्ण संमती आहे असा जाहिरनामा काढून त्याचा प्रसार आपल्या शिष्ट मंडळीत करावा. 'जैन जातीचे देव एक, त्यांच्या धार्मिक क्रिया एक, रोटी व्यवहार होतात पण बेटी व्यवहार होत नाहीत ....' असे मत मांडून त्यांनी शेवटी मिश्रविवाह झालेल्या मुळगुंदच्या देशपांडे घराण्याचा उल्लेख केला आहे'.

## २.६ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील वैचारिक लेखन

स्त्री ही बंधनात अडकलेली बघताना समाजाला खूप समाधान होते. लग्न झाल्यानंतर तिची भूमिका ही केरसुणीची असते. प्रत्येक काम सासरचे लोक आणि पती यांच्या इच्छेनुसारच करायचे. काम झाल्यावर पुढच्या कामाची वाट बघत कोप-यात बसायचे. याच विषयाला अनुसरून -(११ फेब्रुवारी १९४६)[४४] सौ. सुलोचना भोकरे यांनी 'वैवाहिक जीवन व समाज कार्य' असा लेख लिहिला आहे. विवाहित स्त्रीला समाज कार्य करता यईल का ? स्त्रिया समाजकार्याला विन्मुख का होतात ? त्या सभेत चमकत का नाहीत ? सभेला हजरसुद्धा का राहात नाहीत ? वगैरे मुद्यांचे विवेचन करून त्या म्हणतात, "लग्नापूर्वी मुली शिकतात. समाजकार्याची आवड निर्माण होते. पण लग्नानंतर सासर किंवा पतीची साथ मिळाली नाही तर निराशा पदरी येते. पती खंबीर मनोवृत्तीचा, उदार धोरणाचा असेल तर ठीक चालते. पण तो संशयी असेल तर संसारात असंतोष निर्माण होतो. त्यासाठी स्त्रियांचे बळी पडतात". पुरुषांच्या दुहेरी वागण्यावर अचूक बोट ठेवताना त्या म्हणतात, 'बाहेर स्त्री स्वातंत्र्यावर व्याख्यान देणारे घरात नवरेशाही गाजवतात. स्त्री एखाद्या हुद्यावर असेल तर हाताखालच्या पुरुषांना तो अपमान वाटतो. समाज कार्य करणा-या स्त्रियांच्या मानसिक खच्चीकरणावर भाष्य करताना त्या म्हणतात, "समाजकार्य करणा-या स्त्रियांना चूल, मूल, मातेचे

थोर पवित्र कार्य तर बजावावेच लागते, शिवाय पतीची लहर सांभाळून त्याची बडदास्त ठेवावी लागते. साहजिकच मग तिला .... धुसपुस नको, त्रागा नको, खोचून बोलणं ऐकायला नको आणि ते समाजकार्यही नको, असे वाटते. त्यासाठी आपली समाज व्यवस्था बदलली पाहिजे. पुरुषांनी समजुतीचे धोरण स्वीकारले पाहिजे. काळ बदलला, विचार प्रवाह बदलले, पण सौ. सुलोचना भोकरे यांचा लेख आजही स्त्रियांच्या दुःखाची खपली काढून जातो.

"स्वतःला हिंदू म्हणवून घेण्याची लाज न वाटता जैन म्हणवून घेण्याची लाज का वाटावी" असा रोकडा सवाल कु. अंजनीताई रोकडे, अकोला (११ मे १९४८)[४५] यांनी केला आहे. एवढयावरच त्या थांबल्या नाहीत. जैन समाजाला त्यांनी आवाहन केले आहे. कळवळून सांगितले आहे. "जैन बांधवहो, सावधान! सर्व भेदाभेद विसरून आपला समाज संघटीत करून बलवान करा आणि महावीर चरणी प्रतिज्ञा करा की आजपासून तन, मन, धन जैन समाज आणि भारतभू सर्व दृष्टीने दिवसेंदिवस श्रेष्ठ व बलवान करण्याकरता खर्च करेन".

## २.७ सन १९५३ ते १९६३ या कालखंडातील वैचारिक लेखन

मोठयांच्या आठवणी, विचारसरणी पुढच्या काळाच्या मनात नेहमीच असते. या आठवणींच्या खुणा मनात जोपासताना त्याचे दरवाजे इतरांना खुले करून देणे हे समाजाच्या सशक्तीकरणासाठी खूप महत्वाचे असते. संस्कृतीचा हा अमोल ठेवा मार्गदर्शक असतो. म्हणूनच काळ जातो, व्यक्ती जातात पण त्यांच्या आठवणी मात्र शिल्लक राहतात. यावरच चर्चा करताना सौ. सुलचना भोकरे यांनी नम्रपणे आठवण नमूद केलेले आहे. 'श्री आचार्यश्रींची दिव्यवाणी' (८ ऑगस्ट १९५५)[४६] या लेखात त्यांनी आचार्य शांतिसागरांची आपल्या आयुष्यातील एक आठवण सांगितली आहे. १९२३ सालातील ही घटना आहे. आचार्य शांतीसागर महाराज त्यावेळी जैन बोर्डिंगमध्ये ससंघ आले होते. लक्ष्मणराव, वासुदेवराव, आरवाडे बंधू वगैरे लोक त्यावेळी आचार्यांच्या आजूबाजूला होती. संघाची सगळी व्यवस्था पाहताना या मंडळींना एक गोष्ट सुचली. जैन मुलींची धार्मिक परीक्षा घ्यावी अशी ईच्छा त्यांनी शांतीसागर महाराजांच्या समोर मांडली. श्राविकाश्रमातील सगळ्या मुलींना एकत्र करून संघासमोर आणण्यात आले. त्यात सुलोचनाबाई होत्या. त्या संघात एक मुनी कडक स्वभावाचे होते. त्यांनी मुलींना मोठया आवाजात प्रश्न विचारला. सगळया मुली

घाबरल्या. ही गोष्ट शांतीसागर महाराजांच्या लक्षात आली. तेव्हा शांतीसागर त्या मुनींना म्हणाले, "अहो मुली लहान आहेत. जरा शांततेने, दमाने विचारावे". सुलोचनाबाई म्हणतात, "त्यांच्या शांत, धीरगंभीर चेह-यात व वाणीत कोणती जादू भरली होती न कळे. आमची भीती नष्ट होवून आम्हास दुप्पट धैर्य आले". त्या दिवशीच्या प्रवचनात म्हणे आचार्यश्रींनी मुलींचे कौतुक केले व श्राविकाश्रमात इतके चांगले धर्मशिक्षण दिले जाते याबद्दल समाधान व्यक्त करून पुढील कार्यास शुभाशिर्वाद दिले.

दिगंबर जैन समाज हा प्रामुख्याने शेती करतो. शेती हाच या समाजाचा (चतुर्थ दिगंबर) मुख्य व्यवसाय आहे. संपूर्ण घरच शेती या व्यवसायांवर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण भागातील ब-याच स्त्रियाही प्रत्यक्ष शेती करतात. रोजच शेतात गेल्यामुळे नांगरणी, खुरपणी, पेरणी, काढणी, मळणी इ. कामे सहजपणे स्त्रिया करतात. इथे दोन गोष्टी मुद्दामहून नमूद कराव्याशा वाटतात. १९६० च्या काळात ग्रामीण भागातील कष्ट करणा-या, घरात राहणा-या स्त्रियांना लिहिता वाचता येत नव्हते आणि ज्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यांचा शेतीशी संबंध येत नव्हता. त्यांची घरची शेती असली तरीसुद्धा अमुक अमुक एवढी शेती आहे हे सांगण्यासाठीच त्यांचा शेतीशी संबंध येत होता. पण या लेखाचे वैशिष्ट असे की दिल्लीत राहणा-या, शेतीपासून दूर असणा-या सौ. सुमन पाटील यांनी चक्क शेतक-यांच्यावर लेख लिहिला आहे. "शेतक-यांनो हे वाचा"[४७] म्हणून चक्क जनावरांवर लेख लिहिला आहे. जनावरे .... दुभती जनावरे, भाकड जनावरे, जनावरांचे प्रकार, मिळणारे दूध, त्यांना लागणारा चारा, दुधाच्या उत्पन्नाची इतर देशाच्या उत्पन्नाशी तुलना वगैरेची माहिती कोष्टकांत स्पष्ट केली असून त्या म्हणतात, "भारताची शेती जनावरांवर अवलंबून आहे. सुदृढ आणि जातिवंत जनावरे म्हणजेच उत्तम शेती. बैलांच्या कष्टाने पिकलेले धान्य आणि गाई, म्हशींनी दिलेले दूध म्हणजेच आपले खाद्य. तेव्हा आपल्या जनावरांना भरपूर खाद्य देणे व त्यांची जोपासना करणे हे आपले कर्तव्य आहे".

अंगभर दागिने आणि भौतिक सुखाच्या साधनेपलीकडे जाऊन स्त्रिया विचार करतात. त्यावेळी त्या प्रगल्भ होतात. त्यांची मानसिकता संपूर्ण विश्वात स्वतःला सामावून घ्यायला लावणारी असते. तिचा दृष्टिकोन बदलतो. विशाल होतो. अशा विचारांतून सौ. चंचलाबाई शहा, अंधेरी

(२१ नोव्हेंबर १९५५)[४८] यांनी 'काही तरी करा' नावाचा लेख लिहिला आहे. जुने .... नवे .... करा .... पण काही तरी करा. अभय दान द्या. अहिंसेचा प्रचार करा. काहीही करा .... पण करा. इतर समाजाची आणि जैन समाजाची तुलना करताना त्या म्हणतात, "समाजात समर्थ सोसायटी, छत्रपती सोसायटी, परमहंस सोसायटी, आर्य समाज, विवेकानंद, कृष्णानंद अशा अनेक सोसायटया, बँक, शाळा, कॉलेजीस दिसतात. पण जैनांची एकही सोसायटी, बँक, शाळा, कॉलेज नसावे ? हिंदुस्थानात जैन नाहीतच की काय ? प्रत्येक शहरात, खेडयात जैनांनीही बँका, सोसायटया काढल्या तर किती बहार होईल. जैन समाज सुधारणेस मग किती वेळ लागेल ?" (चंचलाबाईंच्या स्वप्नातील जैन समाज आता पूर्ण रूपाने अस्तित्वात आलेला आहे. विचारांची सुधारणा .... प्रश्नच आहे ?).

सौ. चंचलाबाईंचे विचार, जैन समाज सुधारणेची त्यांची इच्छा, खरं तर चांगलीच आहे. पण त्याही काळात जैनांची बोर्डिंग शाळा, कॉलेज, बँका होत्याच. श्राविकाश्रम होते. कदाचित हे त्यांना माहीत नव्हते किंवा आणखीन सुधारणा ही त्यांची अपेक्षा असावी.

स्व. वालचंद शेठ श्राविकाश्रमात आले होते. तेव्हाची आठवण सौ. सुलोचना भोकरे यांनी सांगितली आहे. (१५ एप्रिल १९५७)[४९]. श्राविकाश्रमात आल्यानंतर ते म्हणाले होते, "कोणतेही हलके व लहान काम करण्यास लाजू नका. त्यात कमीपणा नाही. जे हाती घ्याल ते चिकाटीने व एकाग्रतेने केल्यास निश्चित यशाची खात्री देता येते".

"स्वातंत्र्यातील घटनेनी स्त्रियांना समान हक्क दिले. समान दर्जा व समान संधीचा अधिकार दिला. पुरुषांप्रमाणेच स्त्रीलाही मतदानाचा आणि वेतनाचा हक्क दिला. कायद्याने विधवा विवाहाला आणि घटस्फोटाला मान्यता मिळाली. तर पुरुषांसाठी बहुपत्नीकत्व बेकायदेशीर ठरवले. मुलींना वारसा हक्क व दत्तक घेण्याचे हक्क मिळाले". हे मत (१३ ऑगस्ट १९५७)[५०] कुसुम नायर यांचे आहे. "स्वातंत्र्याची फळं" हे या लेखाचे नाव आहे. भारत स्वतंत्र झाला. त्याला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यापासून स्त्रियांना काय फायदा झाला हे या लेखात सांगितले आहे.

"आठवणी" हा लेख इतिहासाशी संबंधित आहे. यात दोन आठवणी सांगितलेल्या आहेत. आज समाजात जे जैन स्त्रियांचे योगदान दिसते त्या पाठीमागे कुणाकुणाचा हातभार आहे. हे या

लेखातून स्पष्ट होते. सौ. सुलोचना भोकरे यांनी (१४ ऑक्टोबर १९५७)[५१] ला या दोन आठवणी सांगितलेल्या आहेत. या स्त्रियांच्या कर्तृत्वाशी आणि कर्तृत्वावर आक्षेप घेण्याशी संबंधित आहेत.

१९३४ या द. म. जैन सभेच्या अधिवेशनात 'घडलेली ही घटना आहे. स्तवनिधी येथे हे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात 'प्रगती आणि जिनविजय' या संपादक मंडळाची निवडणूक हा विषय आला. तेव्हा स्व. आदिनाथ उपाध्ये म्हणजेच सुलोचना बाईच्या वडिलांनी एक लक्षवेधी सूचना मांडली. स्त्री लेखिका प्रगती आणि जिनविजयच्या संपादक मंडळात असावी. कळंत्रे आक्कांनी याला मान्यता दिली. तेव्हा सभेमध्ये असणारे एक सद्‌गृहस्थ चिडले आणि उसळून म्हणाले हा खेळ नाही. बायकांना
कसे जमणार असले अवघड काम ? ही जबाबदारी कशी टाकावी त्यांच्यावर ? त्यावेळी
'केवळ शोभेसाठी त्यांचे नाव घालायचे काय ? 'अशी दुसऱ्या एका व्यक्तीने त्यांना साथ दिली. तेव्हा श्री. बी. बी. पाटील, वकील यांनी विचारणा केली की, 'तुम्हालाच सारा मक्ता दिला आहे काय ? 'पुढे पाटील यांनी 'स्त्रियांच्या कर्तृत्वाला संधी दिली पाहिजे. ' अशी पुस्ती जोडली. नंतर सहसंपादक मंडळात पुरुष तरी काय करतात ? जागाच अडवतात ना? ते कसली शोभा आणतात? 'म्हणून केशवराव चौगुले यांनी विरोधकांची बोटे त्यांच्याच डोळ्यात घातली.

'अहो वर्षभर स्त्रियांचे काम तरी पहा!' असा विश्वास धावते काकांनी व्यक्त केला आणि कळंत्रे आक्कांनी सुलोचनाबाईचे नाव सुचवले. मग त्या रीतसर स्त्री विभागाच्या संपादिका झाल्या. संपादक पदावर काम करताना धावते काकांनी त्यांच्यावर दाखवलेला विश्वास त्यांनी सार्थ करून दाखविला.

सुलोचनाबाई कणखर होत्या तशाच त्या स्पष्टवक्त्या पण होत्या. स्तवनिधी येथे तिळगुळाचे प्रदर्शन भरवले होते. तिकिट एक आण्याचे होते. तिकिट देण्यासाठी सुलोचनाबाईना दारावर उभे केले होते. दुपारी श्री. लट्ठे व रा. ब. चौगुले आणि त्याच्या बरोबरीची मंडळी आली. नियमाप्रमाणे सुलोचनाबाईनी त्यांच्याकडे तिकिटाची मागणी केली. कळंत्रे आक्का गोंधळून गेल्या. 'त्यांना आत जाऊ दे. अडवू नको.' त्यांनी सुलोचनाबाईना सांगितले. 'तेव्हा स्पष्टपणे सुलोचनाबाई म्हणाल्या, 'आक्का नियम म्हणजे नियम. सर्वांना लागू. हा अन्याय नव्हे का ?' तेव्हा हसत हसत लट्ठे, चौगुले यांनी चार चार आणे दिले आणि सुलोचनाबाईनी एक एक आणा घेउन बाकीचे पैसे

परत केले. सुलोचनाबाईंचा हा करारी बाणा बघून लट्ठे आणि चौगुले थक्क झाले. लट्ठे यांनी तिळगुळाच्या दोन बांगडया तर चौगुले यांनी तिळगुळाचा पेला बक्षीस म्हणून दिला. म्हणाले, 'मुली तू धैर्याने स्पष्ट बोलल्याबद्दलचे हे बक्षीस !'

सुलोचनाबाईंचा हा स्पष्टवक्तेपणा लेखनातसुद्धा दिसून येतो. (१ सप्टेंबर १९५८)[५२] या वाचकांच्या पत्रव्यवहारात सभेच्या नावावरून झालेले मतभेद, वादविवाद, गोंधळ याबद्दल त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे. सभेच्या नावाविषयी त्या म्हणाल्या, नाव म्हणायला सोपे, लिहायला आटोपशीर, सुटसुटीत असावे. मूळ नावाला बाधा न आणता जैन सभा, भारत जैन सभा, भारतीय जैन सभा किंवा दिगंबर जैन सभा अशी नावे त्यांनी सुचविली आहेत व सभेच्या प्रगतीसाठी पुढील सूचना मांडल्या आहेत.

१) सभेच्या कार्यकारी व स्थानिक सभासदास स्वत:खेरीज ५ तरी सभासद वाढविणेचे बंधन असावे. २) सभेच्या कोणत्याही शाखेच्या कार्यकारी मंडळावर सभासदाशिवाय कोणाला घेऊ नये. ३) कार्य कारी मंडळाची बैठक दर महिन्याला भरली पाहिजे व वर रिपोर्ट गेला पाहिजे. ४) तशी बैठक भरत नसेल तर वरच्या बॉडीने त्यांना तशी सूचना देऊन जागृत केले पाहिजे.या सर्व गोष्टींचा विचार व्हावा आणि ज्यायोगे एकी टिकेल असाच मार्ग स्वीकारावा.

संस्थेची प्रगती व्हावी, ती मोठी व्हावी व एकी राहावी व चिरकाल टिकावी म्हणून मांडलेले हे विचार अतिशय मौलिक असे आहेत. समाज बांधणीसाठीही उपयुक्त आहेत.

महर्षी कर्वे व सौ. कर्वे सांगलीत आले त्यावेळची आठवण सौ. सुलोचना भोकरे यांनी लिहिलेली आहे. (१५ सप्टेंबर १९५८)[५३]. महर्षी कर्वे सांगलीतील आश्रम बघून भारावून गेले. संस्थेचे उल्लेखनीय कार्य बघितल्यावर त्यांनी जैन समाजाला धन्यवाद दिले. आपल्या भाषणात त्यांनी मुलींना सांगितले, प्रकृतीकडे प्रथम लक्ष दिल्याशिवाय संसारात उपयोग नाही. त्यासाठी शरीरबल वाढवा. त्या दृष्टीने तुमच्यातील काही व्रते चांगली आहेत. सुलोचनाबाई म्हणतात, महर्षी कर्वे दुसऱ्यांना जसे सांगत तसेच स्वत: वागत, हेच त्यांच्या आयुष्याचे रहस्य आहे.

स्वामींचा आशिर्वाद या लेखामध्ये सौ. सुलोचना भोकरे यांनी वडिलांची आठवण सांगितली आहे. (७ सप्टेंबर १९५९)[५४]. त्या आपले विचार मांडताना म्हणतात, आठवणी जिवंत ठेवणं ही निकडीची बाब असून 'डायरी' म्हणजे एक चित्रपटच ! त्याचा फायदा पुढील पिढीला कसा

व केव्हा घेता येईल हे सांगता येत नाही. इतिहास दबला जाऊ नये ही सामाजिक जबाबदारी आहे. शेडबाळचे श्रावक मोठे उत्साही व प्रयत्नी ! त्यांच्या मदतीने वडिलांनी प्रौढ महिला वर्ग काढला. कृष्णाबाई व हौशाक्का यांना पाटलांच्या आईनी पाठवायचं कबूल केलं. त्या म्हणाल्या, अण्णा लिहिता वाचता आलं तर घरबसल्या मला या बायका पुराण वाचून दाखवतील. मग उपाध्यांच्यावर अवलंबून राहायला नको. डायरी बोलकी कशी असते ? ती इतिहास कसा उलगडून दाखवते ? याचे प्रत्यंतरच यावरून येते.

भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांची आठवण 'स्मृती' या लेखामध्ये (५ ऑक्टोबर १९५९)[५५] सौ. सुलोचना भोकरे यांनी सांगितली आहे. १९४२ चा तो कालखंड होता. त्या काळात स्त्री परपुरुषासमोर येत नव्हती. मध्यरात्री घरी पुरुष नसताना परपुरुषाला घरात घेणे ही त्या काळातील किती कठीण गोष्ट होती. पण सुलोचनाताई धाडसी होत्या. मध्यरात्रीची वेळ होती. दारावर टर्क टक आवाज झाला. पती अजून घरात आलेले नव्हते. दरवाजा उघडणं ही भयंकर गोष्ट होती. एवढयात आवाज आला 'भोकरे आहेत का ? 'बाहेरून विचारणा झाली. 'मला आश्रय हवा आहे' अशी अपेक्षा ऐकू आली. दार उघडावे की नको ? अशी शंका आलीच. पण भोकरेचे नाव घेऊन आश्रय मागतात म्हटल्यावर सुलोचनाताईनी दार उघडले. नंतर समजले आलेली व्यक्ती म्हणजे स्वातंत्र्य लढयात भूमिगत काम करणारे कुपवाडचे श्री. आर. पी. पाटील होते. भोकरे आल्यानंतर त्यांनी वीर महिलेचे काम केल्याबद्दल सुलोचनाबाईचे कौतुक केले. आर. पी. पाटील यांना काही दिवस भोकरे यांच्या घरात आश्रय मिळाला. त्यावेळच्या आठवणी अगदी मनापासून सुलोचनाताईनी सांगितल्या आहेत.

मानपत्राची आठवण सांगताना सुलोचनाताईचा ऊर भरून आलेला आहे. श्री.आर. पी. पाटील यांना सुलोचनाबाईच्या वडिलांनी पुढाकार घेऊन त्यांच्या कामगिरीसाठी मानपत्र देऊन सत्कार केला.

मानपत्र स्वीकारतांना श्री. आर. पी. पाटील म्हणाले, हे मला प्रथम मिळालेले मानपत्र आहे. आपल्या मानपत्राला साजेसे कार्य करुन मी दाखवीन. जनसेवा करीन. आणि पुढे .... सुलोचनाताई म्हणाल्या, स्वातंत्र्य लढयात श्री. आर. पी. पाटील यांनी खरोखरच आपले कर्तव्य चोख बजावले.

चांगल्या गोष्टीसाठी सुलोचनाताई नेहमीच हिरिरीने आपली मते मांडत. 'पुनःश्च सूचना' (१९ ऑक्टोबर १९५९)[५६] या लेखात त्याचा अनुभव आपल्याला येतो. धावते काकांचा सत्कार त्यांच्या कार्याबद्दल करायचा होता. हा ठराव द. भा. जैन सभेत पास झाला. पण पुढील कार्य वाही स्थगितच राहिली. त्याची आठवण करुन देण्यासाठी सुलोचनाताईंनी लेखणीचा वापर शस्त्रासारखा केला. छोटेखानी लेख लिहिताना त्या लेखाच्या शेवटी त्या म्हणतात, 'पुराणातली वांगी पुराणात म्हणतात तसे 'सभेतील ठराव दप्तरात' असे होऊ नये एवढेच.'

एखादी गोष्ट आवडली व मनात विचाराचे चक्र फिरु लागले तर ज्याच्या हातात लेखणी आहे अशी स्त्री लिहिल्याशिवाय शांत बसूच शकत नाही. मला जे आवडले, भावले ते इतरांपर्यंत पोहचवावे या हेतूनेसुद्धा अनेक लेखिकांनी लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. कु. माणिक हुळबत्ते यांनी (७ मार्च १९६०)[५७] साहित्यकार आणि सदाचार या लेखात अशाच एका वाचलेल्या लेखाबद्दल आपले मत मांडले आहे. या लेखाचे मूळ लेखक आहेत काका कालेलकर. गोपालदास नागर यांनी हिंदी अनुवाद केला आहे आणि याचे मराठीत भाषांतर कु. माणिक हुळबत्ते यांनी केले आहे. या लेखाचा विस्तार तसा खूप मोठा आहे. अनेक उदा. याच्यामध्ये दिली आहेत. साहित्यकाराचे चरित्र आणि त्याचे चारिंत्र्य या दोन्हीमध्ये कोणताच संबंध नाही. हे या लेखात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी एका मुलीचे उदा. दिले आहे. एक मुलगी एका विद्वान कवीच्या प्रेमात पडते. तिला नंतर कवीचे चारिंत्र्य समजते. तिला खूप पश्चाताप होतो. ती त्या साहित्यकाराचे आपल्या जवळचे सर्व साहित्य जाळून टाकण्याचे ठरवते. त्या वेळेला म. गांधी तिला म्हणतात, त्यांचे साहित्य तुझ्याजवळ ठेवणे किंवा नाश करणे दोन्हीही वाईट. पण त्याचा उपयोग तिसऱ्याच व्यक्तीला होऊ शकेल. तेव्हा ते साहित्य तू त्यांच्या हवाली कर. लेखाच्या शेवटी माणिक म्हणते, उज्वल चारित्र्य आणि उज्वल साहित्य एकाचवेळी निर्माण करणारे लेखक जन्माला येवोत. अशी प्रार्थना आपण परमेश्वराकडे का करु नये?

यातील एक गोष्ट मनाला खटकते. साहित्यिक चोवीस तास साहित्यिक नसतो. त्यांचे वागणे, बोलणे आणि विचार करणे हे सर्वसामान्य माणसासारखे असते. त्यामुळे माणसातल्या चांगल्या वाईट गोष्टी त्यांच्याकडेही असू शकतात. म. गांधी म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या साहित्याने अनेकांना प्रेरणा मिळाली हे महत्वाचे आहे.

अनेकांच्या उपदेशाप्रमाणे लोकमान्य टिळकांचा उपदेशही प्रगती आणि जिनविजयाच्या अंकामध्ये आहे. 'लोकमान्यांचे अमृततुल्य बोल' असे लेखाचे नाव आहे. विद्यार्थ्यांसाठी म्हणून (१७ सप्टेंबर १९६२)[५८] सौ. चंचलाबाई शहा यांनी तो लिहिला आहे. लोकमान्य टिळक सिंहगडावर आले होते. त्यावेळी काही मुले त्यांना भेटायला गेली. त्यांच्याकडे त्यांच्या अमृततुल्य मार्गदर्शनाची मागणी केली. तेव्हा लोकमान्य म्हणाले, अभ्यास करा, यापेक्षा वेगळा उपदेश मी काय करणार ? पण नंतर
लोकमान्य विद्यार्थ्यांबरोबर दोन अडीच तास बोलले.

.... ज्याला ध्येय नाही व ध्येयासाठी जो प्रयत्न करीत नाही तो मनुष्य या संज्ञेस अपात्र समजावा. मानवी जीवन चैन करण्यासाठी नसून कर्तव्य करण्यासाठी आहे. पारतंत्र्याची ज्याला चीड येत नाही त्याला षंढच म्हटले पाहिजे. आळसासारखा दुर्गुण नाही. दैव, देश, कायदा, प्रयत्न, भाषावार प्रांतरचनेनुसार राज्यकारभार चालविण्याची गोष्ट, शिक्षण, आरोग्य, बेकारी वगैरे गोष्टींवर लोकमान्य मनमोकळे बोलले. शेवटी म्हणाले, प्रजेच्या आवश्यक गरजा या सरकारास पूर्ण करता येत नाहीत. ते सरकार राज्य करण्यास सर्वस्वी नालायक आहे असे समजावे.

पुणे येथील सौ. वासंती शहा या चतुरंग लेखिका म्हणून ओळखल्या गेल्या. चौरस आणि सखोल अभ्यास करणाऱ्या स्त्रिया विद्वानांमध्ये त्यांची गणना होते. लेखामध्ये आपले विचार त्या पद्धतशीरपणे मांडतात. ठाम वैचारिक मांडणी आणि विचारातला समतोलपणा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट म्हणता येईल. फक्त वैचारिक भूमिकाच न मांडता त्या त्यावर उपायही सुचविताना दिसतात. 'समाजधुरीण या विषयाकडे लक्ष पुरवतील काय?' (२८ जानेवारी १९६३)[५९] या लेखात त्यांनी जैन समाज आणि समाजधुरीण यांना जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या म्हणतात, 'स्वातंत्र्यानंतर १५ वर्षांत अनेक संतांच्या, देवदेवतांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. धार्मिक सणानिमित्त आकाशवाणीवरुन भजन, अभंग, वेदमंत्र, श्रुतिका म्हटल्या जातात. हे ठीक आहे. पण यापासून जैन समाजाने काही बोध घ्यायला पाहिजे. भारतीय संस्कृती ही फक्त वैदिक धर्मानेच घडवली आहे काय ? त्यामध्ये जैन धर्माचा काहीच वाटा नाही आहे की काय ? असल्यास तो कोणत्या रुपाने आणि किती प्रमाणात आहे ? आणि याचे ज्ञान आपल्या जैन समाजाला आहे काय ? कर्मसिद्धांत आणि पुनर्जन्म ही तत्वे म्हणजे भारतीय धर्म संस्कृतीला जैन धर्माने दिलेली अमोल देणगी आहे.

भारतीय संस्कृतीच्या घडणीमध्ये जैन धर्माचा फार महत्वाचा वाटा आहे. पण जैनेतर इतिहासकारांनी जैनांच्या या कर्तृत्वावर अनुलेखाने विस्मृतीचा गोळा फिरविला आहे. जैन समाज एकीकडे अल्पसंख्यांक झाल्यामुळे इतिहासकारांना या कार्यात यश आले. याकरिता प्रथम एक अभ्यास मंडळ स्थापन करावे. या सभासदांनी जैन तत्त्वज्ञान व इतिहासावर आधुनिक शैलीने लहान मोठी पुस्तके लिहावीत. जैन राजे, जैन आचार्यांनी धर्मप्रभावानेसाठी काय केले ? याचाही इतिहास लिहावा .... खूप विस्तृत अभ्यासपूर्ण लेख लिहून जैन समाजाला हालविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

बाहुवली हे जैनांचे श्रद्धास्थान असलेले अतिशय तीर्थ ठिकाण होय. या ठिकाणाला सौ. सुमती अरविंद पाटील, बी. ए. ऑनर्स या गेलेल्या होत्या. त्यांना बाहुवलीतील आवडलेल्या गोष्टी 'मला बाहुवलीत काय दिसले' (१५ एप्रिल १९६३)[६०] या लेखात मांडलेल्या आहेत. प्रथम त्यांनी श्री समंतभद्र महाराजांविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. कारण बाहुवली या क्षेत्राचा विकास म्हणजेच या क्षेत्राचे तीर्थक्षेत्रात व तीर्थक्षेत्राचे मोठया विद्यापीठात रुपांतर समंतभद्र महाराजांनी केले आहे. बाहुवलीत झालेल्या पंचकल्याण महोत्सवामध्ये बाहुबलीचे महत्त्व आणि जैन धर्माने आजपर्यंत केलेली मानवधर्माची सेवा या विषयी चलीत चित्रपट दाखवला. त्याचा वृत्तांत सांगून .... तीर्थंकरांचा जन्म .... मातेची १६ स्वप्ने .... क्षत्रिय व इतरांची कर्तव्ये .... नेमिनाथांचा विवाह .... त्या प्रसंगी कोंडलेली मूक जनावरे .... नेमिनाथांचा वैराग्य .... पार्श्वनाथांना झालेला कर्मठाचा उपसर्ग .... राणा प्रतापसिंहाला युद्धावेळी पैशाची उणीव भासली तेव्हा भामाशाह नावाच्या मंत्र्याने आपल्याजवळचे सर्व द्रव्य दिले, तो प्रसंग ... भरत बाहुवली युद्ध .... वगैरे विषयाचे विवेचन कले आहे.

अभ्यासपूर्ण लेख लिहिणाऱ्यांमध्ये डॉ. सौ. विजयालक्ष्मी पांगळ यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. प्रगतीमध्ये त्यांनी भरपूर दर्जेदार लेखन केलेले आहे. अकबर आणि जैन धर्म (३ फेब्रुवारी १९६४)[६१] या लेखामध्ये अकबराला जैन धर्म कशा पद्धतीने भावला. त्याला तो कितपत समजला हे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे मांडताना त्यांनी इंगजी जैन गॅजेटमध्ये श्री एम्. एस्. रामस्वामी अय्यंगार यांनी लिहिलेल्या लेखाचा उल्लेख केला आहे. अय्यंगार म्हणतात, अकबराची जैन धर्मावर श्रद्धा होती. त्यावेळच्या साधूंचा अकबरावर प्रभाव होता. प्रसिद्ध इतिहास लेखक मि. विन्सेंट

स्मिथ यांचाही उल्लेख लेखामध्ये केला आहे की, स्मिथनी आपल्या 'अकबर' या गंथात १६६ व्या पानावर लिहिलेले आहे की, जैन गुरूंनी अकबराच्या विचारावर व राजनीतीवर जो प्रभाव टाकला त्याचा उल्लेख इतिहासकारांनी केलेला नाही. अकबराचे जैनांच्याबद्दल असणारे मत सांगताना विजयालक्ष्मी पांगळ यांनी अकबराच्या जीवनातील एक प्रसंग सांगितला आहे. अकबर बादशहा लाहोरला असताना एक घटना घडली. ईदच्या पहिल्या दिवशी मुनी शांतीचंद्रजी हिंसा होते म्हणून गाव सोडून निघाले असताना बादशहा म्हणाले शेरी आणि शाक खाल्यानेही राजे होऊ शकतात. कुराणाची हीच आज्ञा असून कुराण शरीफनीसुद्धा प्रत्येक प्राणीमात्रावर दया करायला सांगितले आहे ! लेखात शेवटी पांगळ म्हणतात, जैनांप्रमाणे आचरण करणाऱ्या अकबराने स्वत: मात्र कधीच जैन म्हणून उल्लेख केला नाही.

माणूस शिकला, शहाणा झाला आणि त्याचे शहाणपण म्हणजे अस्तित्वात आलेली विभक्त कुटुंबपद्धती. नोकरीच्या निमित्ताने माणूस घराबाहेर पडला. पण पाठीमागच्या पाऊल खुणा पुसून टाकण्याइतका शहरीमय झाला. प्रगतीमध्ये एकत्र कुटुंबपद्धती (८ नोव्हेंबर १९६४)[६२] हा लेख आला. त्यावेळेला कदाचित याची सुरुवात असेल. एकत्र कुटुंबपद्धतीची गरज आणि फायदे सांगण्यासाठी नवलबाई शहा यांनी हा लेख लिहिला. तीर्थयात्रेला जाताना, जप, तप, व्रत करताना, गरोदरपणात, बाळंतपणात एकत्र कुटुंबाची मदत होते. सासू सासरे आणि इतरांचे मनुष्यबळ मिळते. कलेची आवड जोपासता येते. हे विचार या लेखामध्ये व्यक्त केले आहेत.

सौ. नंदिनी बागी, यांनी 'सन्मती सेवा समाज धारवाड' (२८ डिसेंबर १९६४)[६३] या लेखामध्ये वसतिगृह, देवालय, हॉल वगैरे उभारणीचा तपशील .... जमा खर्च आणि पुढील गरजा या विषयी माहिती दिली आहे.

जैनांमध्ये पंचम, चतुर्थ, बोगार, सैतवाल, असे भेद का ? आपण सर्व एकाच देवाची पूजा करतो. सर्वजण तीच धार्मिक पुस्तके वाचतो. तीच व्रतवैकल्ये आचरतो. सर्व काही एकच, मग हे भेद का ? एकमेकांच्या मंदिरात गेल्यावर एकमेकांशी भांडणे का होतात ? मग आपला धर्म पुढे कसा टिकणार ? अशी चिंता कु. सरोजनी वणकुद्रे यांनी जैन समाज (११ ऑक्टोबर १९६५)[६४] या लेखामध्ये मांडली आहे.

जैन बोधक, प्रगती आणि जिनविजय, सन्मती, जैनमित्र, जैन संदेश, जैन जगत, जैन दर्शन, अहिंसा, दिगंबर जैन, आत्मधर्म, महिलादर्श वगैरे वार्तापत्राची माहिती (२७ डिसेंबर १९६५)[६५] 'वर्त मानपत्रे व जैन समाज' या लेखामध्ये डॉ. सौ. विजयालक्ष्मी पांगळ यांनी दिली आहे. 'स्वाध्याय मंथन' मध्ये पांगळ यांनी धार्मिक तत्त्वज्ञानाचे पालन, रत्नत्रय धर्माचे आकलन वगैरे गोष्टींवर चर्चा करुन एक उदा. दिले आहे. रणांगणात लढणारे जर आत्मसाधनेत प्राणार्पण करतील तर त्यांचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. पण सध्या रणांगणात शौर्य गाजविणारे वीर आकुलता करीत प्राण विसर्जन करतात ही किती दु:खाची गोष्ट आहे. किती अज्ञान आहे. त्यामुळे खऱ्या आनंदाला ते पारखे होतात.

रणांगणात शहीद होणाऱ्या योद्ध्यांची तुलना थोडी अस्थायी वाटली. मी N. C. C. ची ANO आहे. त्यामुळे सैन्यात काम करताना जीवावर उदार होणाऱ्या सैनिकांचे जीवन जवळून बघितले आहे. इतके प्रामाणिक जीवन धर्म करणारे तरी जगतात का ? हा प्रश्नच आहे.

**२.८ १९६४ ते १९७४ या कालखंडातील वैचारिक लेखन**

' जिओ और जिने दो' हा मंत्र सगळ्या जगाला अहिंसेचे तत्त्व शिकवणाऱ्या धर्माने दिले. जगावर प्रेम करणारा हा जैन धर्म आपल्या धर्माला विश्व धर्म समजतो. पण असे असूनही आपापसातल्या एकतेची गरज या धर्माला आहे. विचार मंथन करणाऱ्या आणि दुसऱ्याला चिंतन करायला लावणाऱ्या लेखकांनी यावर भाष्य केले आहे.

विश्वाला सामावून घेण्याची ताकद जैन धर्मात असूनही खुद्द जैन समाजातील लोकांच्या विघटनाचे काय करायचे ? डॉ. सौ. विजयाजक्ष्मी पांगळ यांनी 'जैन समाजाची एकता' (१० जानेवारी १९६६)[६६] या लेखात हाच मुद्दा उचलून धरला आहे. जैन समाजातील एकी अबाधित राहिली पाहिजे आणि ही एकता निर्माण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. असे सांगून त्या म्हणतात, 'पंथभेद, जातीभेद, त्यात पुन्हा पोटजाती भेद यामुळे जैन समाज विस्कळीत झाला असून जैन समाजात एकता राहिली नाही'. त्यासाठी रोटी बेटी व्यवहार सर्व जैन समाजात सुरू करायला पाहिजे. तसेच जैन समाज .. जैन धर्म यांची संघटना करुन समाज जोडायला पाहिजे. असे आपले विचार स्पष्ट करुन त्या म्हणतात, 'असे झाले तरच आपण जैन अनुयायी आहोत'.

जैन समाजामध्ये अनेक पोटजाती आहेत. पंथभेद आहेत. त्यामुळे समज गैरसमज

होतात. हे होऊ नये असे बऱ्याचजणांना वाटते आणि बऱ्याचजणांनी यावर लेखन केले आहे. डॉ. विजयालक्ष्मी पांगळ यांनी (४ जुलै १९६६)[६७] श्री कान्जी स्वामींबद्दल झालेला गैरसमज जैन दिगंबर समाजाने दूर करावा म्हणून लेख लिहिला. त्या म्हणतात, 'कान्जी स्वामी शिथिलाचार वाढविणारे ग्रंथ निर्माण करून त्याचा प्रचार करीत आहेत आणि मूलभूत सिद्धांताचे हनन करुन जैन धर्मावर आघात करीत आहेत, हा त्यांच्यावरचा आरोप चुकीचा आहे. त्यांनी स्वत: दिगंबर दिक्षा घेतली नसली तरी ते स्वत:स श्रावक समजून निरंतर शास्त्र स्वाध्यायात निमग्न असतात. ते कधीही फाजील गप्पा करीत नाहीत. समंतभद्राना भेटून त्यांच्याशी त्यांनी चर्चाही केली आहे. (मोठा दोन अंकात विस्तृत लेख लिहिला आहे).

डॉ. विजयालक्ष्मी पांगळ यांचा दुसरा लेख जैन स्त्रियांच्याबदल आहे. जगाबरोबर आपल्या स्त्रिया राहाव्यात, विचार कराव्यात असे त्यांना वाटते. 'जैन बंधू भगिनींना आवाहन' (२२ ऑगस्ट १९६६)[६८] या लेखात डॉ. पांगळ यांनी स्त्रियांना 'जागे व्हा !' चे आवाहन केले आहे. जैन महिलांना त्या विचारतात 'जैन महिलांनो असे का व्हावे? जग किती पुढे चालले आहे. मग जैन समाज, जैन महिलाच मागे का असाव्यात? हा स्त्री देह शूरत्वाच्या, त्यागाच्या, दानाच्या दागिन्यांनी नटू द्या. इंदिरा गांधीसारख्या स्त्रिया जैन महिलातून बाहेर पडू द्यात!'

भ. महावीरांचा २५०० वा निर्वाणोत्सव तद्नुषंगाने ' आपले कर्तव्य ' असा लेख (६ फेब्रुवारी १९६७)[६९] सौ. वासंती शहा, पुणे यांनी लिहिला आहे. हा निर्वाणोत्सव भारतात मोठया वैभवाने साजरा करायचे असे अधिवेशनात ठरले असल्याने भारतात तर तो मोठया प्रमाणात साजरा होईलच पण भारताबाहेर जागतिक पातळीवर जैन धर्मासंबधी चर्चा व्हावी.... अशी अपेक्षा सौ. शहा यांनी व्यक्त केली आहे. त्या म्हणतात, 'यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारचा सहयोग मिळवणे आवश्यक आहे. सरकारने पुढाकार 'घेतला तरच महोत्सव भारतव्यापी होऊ शकेल. दुसरे म्हणजे या निमित्ताने क्रमिक पुस्तकातून जैन संस्कृतीला योग्य स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. आत्ताच्या शाळा, कॉलेजातील पुस्तकातून जैन संस्कृतीचा इतिहास अगदी संकीर्ण व पुष्कळदा चुकीचा किंवा विपर्यस्तही दिलेला असतो. तसे होऊ नये म्हणूनही प्रयत्न करायला हवेत?

जैन लेखिका किती जागरूक आहेत आणि जागरूकतेने विचार करतात हे यातून दिसते. 'जैन बोधक' अमृत महोत्सव अंकामध्ये 'आम्ही आणि आमचे जीवन' हा डॉ.हेमचंद्र जैन यांचा लेख प्रसिद्ध झाला. त्यानंतर विजयालक्ष्मी पांगळ यांनी' जरा निरीक्षण करू या' (२४ एप्रिल १९६७)[७०] हा लेख लिहिला. परमेश्वराची पूजा आपण करतो. पूजाअर्चा, भक्ती, आरती सगळ मनापासून करतो. पण हे करताना आपला मूळ उद्देश परमेश्वराची कृपादृष्टी अधिक मिळावी ही असते. पण परमेश्वराचे गुण आपल्यात यावेत हा हेतू धर्माने सांगितलेला आहे. आपल्याला तत्त्वज्ञानाची ओळख करून घेऊन आपला प्रमाद झटकून टाकला पाहिजे. आत्मशक्तीचा परिचय करून घेऊन आत्मसंशोधनाची गरजही आपल्याला असल्याची नोंद त्यांनी केली आहे.

भ. महावीरांचा २५०० वा निर्वाण महोत्सव मोठया प्रमाणात साजरा झाला. याबद्दल आभार व्यक्त करून सर्व कार्यक्रमाची माहिती डॉ. विजयालक्ष्मी पांगळ यांनी (२२ मे १९६७)[७१] 'महावीर जयंती निमित्त रेडिओ केंद्रावर झालेले कार्यकम' असा लेख लिहिला. आकाशवाणी रेडिओ केंद्राने दिल्ली, नागपूर, पुणे, मुंबई या सर्व केंद्रांवर महावीर जयंती निमित्त भ. महावीर जीवनावर प्रवचन, भाषण, भक्तिगीते, आरती, स्तुती, स्तोत्रे आदि कार्यक्रम सादर करून महाराष्ट्रामधील घराघरातून महावीरांचे विचार पोहचवले. त्याबद्दलची ही कृतज्ञता होती.

भक्तिमार्गात आणि त्यातून येणाऱ्या क्रियाकांडात, पूजा-अर्चा महोत्सवात गुरफटलेल्या जैन समाजाला जागृत करण्याचे काम काही लेखिकांनी जाणीवपूर्वक केलेले दिसते. जैनांविषयी अजैन इतिहासकार, लेखक, साहित्यिक, वक्ते जे वक्तव्य करतात ते किती चुकीचे असतात. हे दाखवून देऊन जैन समाजाला हलविण्याचा प्रयत्न 'जैन समाज जागृत आहे का ?' या लेखात (२६ जून १९६७)[७२] कु. कुमुदिनी रोकडे, अकोला यांनी केला आहे. जैनांविषयी अजैनांची वक्तव्ये त्यांनी पुढीलप्रमाणे दिली आहेत.

१) जैनांच्या अहिंसेनी भारत स्त्रैण झाला.

२) जैन धर्म हा बंडखोर मुलगा असून त्याने स्वत:स पोषक सामुग्री वैदिक धर्मातून घेऊन आपले अलग दुकान मांडले.

३) महावीर हा जैन धर्माचा संस्थापक आहे.

४) जैन धर्म हा हिंदू धर्माचा एक पंथ आहे.

५) जैन धर्मात आत्महत्या करणे हे मोक्षाचे साधन मानले आहे.

६) जैन धर्म हा नास्तिक धर्म आहे.

७) जैन धर्म हा पाखंडी धर्म आहे.

८) जैनांचा इतिहास हा शरणागतांचा इतिहास आहे.

९) साप सोडावा पण जैन मारावा.

असे किती तरी मुद्दे खोडून काढण्याचा प्रयत्न कु. रोकडे यांनी केला आहे.

वासंती शहा यांनी 'जैन संस्कृती' (३० ऑगस्ट १९६७)[७३] वर लेख लिहिला आहे. दुसरा लेख स्वातंत्र्यदिनानिमित्त जुनाट कल्पनांच्या व रूढींच्या बेडया तोडायला पाहिजेत. हे सांगणारा लेख लिहिला आहे. त्या म्हणतात, 'राजकीय गुलामगिरी झुगारून देता येते पण रूढींची गुलामगिरी झुगारून देता येत नाही. सनातनी विचारांचे स्त्री पुरुष, त्यांचे सोवळे ओवळे, मुनींचा अर्थध्यास, नवीन मंदिरे बाधण्याचा आग्रह, पुस्तक प्रकाशन वगैरे मुद्यांवर त्यांनी परखड विचार मांडले आहेत. पुस्तक प्रकाशनासंबंधी त्या म्हणतात, लालित्य विद्वत्ता, भाषा, मांडणीच्या दृष्टीने काहीच नसलेले लेखन, भोळ्या भाविक समाजाकडून म्हणजे स्वत: काहीच वाचत नाहीत अशा लोकांकडून पैसा गोळा करून छापले जाते. ते वाचणार कोण? सातव्या आठव्या शतकातील पूर्वाचार्यांचे मोठमोठे काव्यग्रंथ जुन्या आर्यावृत्तात भाषांतर करून हजार पानी ग्रंथ छापले जातात. (समाजाच्या पैशातून) पण ते वाचणार कोण ? त्याचा वाचक कोठून आणणार ? हे सर्व बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत पण ते करणार कोण ? म्हणून जुन्या कल्पनांच्या बेडया तोडायला पाहिजेत. असा लेख लिहून बौद्धिक जागृती करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

विचारवंत त्यागी कोण ? असा लेख लिहून डॉ. सौ. विजयालक्ष्मी पांगळ यांनी (२७ एप्रिल १९७०)[७४] 'सत्य तत्त्वांची उकल झालीच पाहिजे' असे प्रतिपादन केले आहे. कान्जी स्वामींवर कुणीतरी त्यागींनी टीका केली. त्याला उत्तर देण्यासाठी हा लेख लिहिलेला आहे. त्यागींनी कान्जी स्वामींबद्दल विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे सौ. पांगळ यांनी दिलेली आहेत. त्या म्हणतात, सात तत्त्वांचा विचार करून, अभ्यास करून, चिंतन करून, आलेल्या मंथनातून आत्मतत्त्वरूप वेगळे करून, त्याचीच श्रद्धा, त्याचेच ज्ञान व त्याचेच आचरण करणे यासच सम्यकदर्शन, ज्ञान चारीत्र्य म्हटले आहे ! मोठा अभ्यासपूर्ण आध्यात्मिक लेख .... असे या लेखनाला म्हणता येईल. 'स्वभावाची

स्विकृती' (३ ऑगस्ट १९७०)[७५] या लेखातही प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांनी आपले अध्यात्मिक चिंतन मांडले आहे.

विशालमती अम्मा यांनी 'मातृबोध' या लेखात (६ मार्च १९७२)[७६] अध्यात्माबरोबर लौकिक उपदेशही केला आहे. त्या म्हणतात, 'मुलांनो-मुलींनो, आपल्या सद्बुद्धीचा उपयोग विचारपूर्वक करण्यास शिका. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होत असेल तर, आपल्या दुष्ट मित्रांपासून व बांधवांपासून सावध रहा. भावनेस वश होऊन समाजास, राष्ट्रास खाली मान घालावयास लावणाऱ्या कृत्यापासून दूर रहा. खोटया पक्षाला बळी पडून, सत्य, अहिंसेला विसरून राजकारण खेळणे म्हणजे तालीम न करता मैदानात कुस्ती करता उभे राहाणे! हे जसे हास्यास्पद आहे तसे हल्लीचे मतदान करणे, उभे राहाणे भविष्यकाळाच्या अधःपतनाचे सूचक आहे. शेवटी त्यांनी म्हटलंय, इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिण्यास इतिहासकारांना उत्साह वाटेल असे वागा.

## २.९ सन १९७५ ते १९८७ या कालखंडातील वैचारिक लेखन

प्रत्येक समाजामध्ये धर्माचा पगडा जबरदस्त असतोच. धर्म (कर्मकांड) करणे म्हणजे पुण्य कमावणे ही कल्पना व्यक्तीच्या मनामध्ये ठाण मांडून बसलेली असते आणि त्यावरच मनुष्य आचरण करत असतो. पण ह्या कर्मकांडामुळे त्यांच्या हातून चुका होत राहातात. समाजात त्या मान्यही होतात. पण हीच गोष्ट समाजाच्या उन्नतीला
घातक आहे. यावरही प्रगतीमध्ये लिखाण झालेले आहे.

'सुखाची गुरुकिल्ली' (६ ऑक्टोबर १९८०)[७७] या लेखात सौ. विजया देवेन्द्राप्पा दावणगेरे यांनी सॉकेटीसचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्या म्हणतात, कमीत कमी असूनसुद्धा जो शांत समाधानी रहातो तो सर्वात श्रीमंत. कारण शांती, समाधानी, तृप्ती हीच खरी संपत्ती आहे. उदाहरणादाखल त्यांनी एक गोष्ट सांगितली आहे. तीन श्रीमंत व्यक्ती असतात. ते तिघेही सुखाच्या शोधात असतात. तेव्हा एक ज्ञानी त्यांना सोन्याच्या चाव्या देतो आणि सांगतो 'याने सुखाच्या बागेचे दार उघडले जाईल'. त्यामध्ये दोन व्यक्ती हावरट, लोभी असतात. त्यांच्या हातातील चावी वेडीवाकडी बनते. तिसऱ्याच्या हातातील चावी दोघेही हिसकावून घेतात. पण ती ही किल्ली वेडीवाकडी बनते. दोघे निराश होतात. निघून जातात. परत तो ज्ञानी येतो. आपल्या जवळची किल्ली

तिसऱ्याला देतो आणि बागेचे दार उघडते. लेखिका म्हणते, मनात समता भाव ठेवला की सुखाची गुरुकिल्ली सापडते.

(१२ जानेवारी १९८१)[७८] सौ. विजया देवेन्द्राप्पा दावणगेरे यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. (१९ सप्टेंबर १९८१)[७९] दिवाळी अंक म्हणून प्रसिद्ध झालेल्या अंकात वासंती शहा यांनी कर्मकांडावर पोटतिडकीने लेखन केले आहे. त्यांच्या मते समाजात 'विचारवंत थोड़े क्रियाकांडवादीच जास्त ! मूर्ती, मंदिरासाठी गोळा केल्या जाणाऱ्या पैशासंबंधी विवेचन करुन त्या म्हणतात, धर्म प्रभावनेच्या कल्पना जेव्हा मंदिर आणि मूर्ती भोवतीच घोटाळू लागतात, तेव्हा सामाजिक दृष्टी हरवू लागते. पुढे त्यांनी समाजभानासंदर्भात आपले विचार मांडले आहेत की, १२ व्या १३ व्या शतकापासून आमचे सामाजिक भान सुटले आहे. आज परिस्थिती अशी आहे की, श्रावकांनी आपल्या धर्मप्रभावनेच्या सर्व योजनांचा ओघ सामाजिक विकासाच्या, सामाजिक प्रगतीच्या कार्याकडे वळवायला हवा.

प्रगतीमध्ये परखड विचार मांडणाऱ्या लेखिका म्हणजे सौ. वासंती शहा. समारंभात रमलेल्या आणि उत्सवात हरवलेल्या समाजाला जागृत करण्याचे काम त्यांनी केले. 'प्रभावनेमध्ये प्रदर्शन नसावे, द्रव्य बळाचे तर दर्शन घडावे सम्यक धर्माचे' या लेखात (२३ नोव्हेंबर १९८१)[८०] त्या म्हणतात, 'अखिल भारतीय पातळीवर उत्सव साजरे करणे म्हणजे धर्मप्रभावना नव्हे. जैनांनी आता उत्सवाद्वारे धर्मप्रभावना (?) करण्याची हौस आवरती घेतली पाहिजे. लेखात विद्यानंद मुनींचे विचार सांगितले आहेत की, मूर्तीपूजा हे धर्माचे फार प्राचीन स्वरूप आहे. हे म्हणजे बिगारीच्या वर्गात बसण्यासारखे आहे. या वर्गातून बाहेर कधी पडणार ? पत्रकारितेविषयीही त्यांनी या लेखात विवेचन केले आहे. त्यांच्या मते .... इकडून तिकडून चार लेख आणि कविता गोळा करून ठराविक काळाने अंक काढणे म्हणजे पत्रकारिता नव्हे. समाजापुढील आव्हाने, बिकट प्रश्न यावर लेखन केले पाहिजे. वर्तमान परिस्थितीत नवी दिशा दाखवणेचे कार्य पत्रकारितेतून झाले पाहिजे.

'समाज विचाराला लागलेले चुकीचे वळण' या लेखामध्ये (१ फेब्रुवारी १९८२)[८१] सौ. वासंती शहा यांनी समाजाला दिशा दाखवण्याचे काम केले आहे. त्या म्हणतात, जैन धर्माची अनेकांतवादी शिकवण स्व-पर हितकारक आहे. व्यक्ती समाजाखेरीज जगू शकत नाही. समाजाच्या

हितामध्येच व्यक्तीचे हित सामावलेले आहे. पण जैनांनी हा सामाजिक दृष्टीकोन हरविला त्याला किती तरी शतके लोटली. 'दान सत्पात्री करावे. गरज पाहून द्यावे' असे जिनेश्वरांनी सांगितले आहे. पण हे तत्त्व मागे पडून व्यक्तिगत पुण्य प्राप्तीचे स्वरूप त्याला आले आहे आणि याला कारण आमचे त्यागी व भट्टारकादी धर्म नेते आहेत. त्यांनी समाज विचाराला असे वळण दिले की, दान धर्माच्या साऱ्या कल्पना मंदिर, मूर्ती आणि त्यागीगण यांच्या भोवतीच घोटाळत राहिल्या.'

समाज विचाराला चुकीचे वळण लागल्याचे स्पष्ट करून पुढे त्यांनी धार्मिक क्रिया समाजहिताची असावी असा लेख (१ मार्च १९८२)[८२] लिहिला. समाजात सध्या काय घडत आहे? त्यांनी चमत्कारी मूर्ती, जागृत शासन देवतांचे स्थान, नवस वगैरे संकल्पनांचा अभ्यासू आढावा घेतला आहे. धर्माचा संबंध सांगताना त्या म्हणतात, धर्माचा संबंध मानवी मनाशी आहे. तो मूर्ती मंदिराशी कसा जोडला गेला ? या मागचे कारण काय ? हे शोधले पाहिजे. मंदिर बांधणे किंवा मूर्ती, मानस्तंभ उभारणे हे महान पुण्याचे कार्य आहे. अशी समाज मनाची समजूत करून देण्यात आली आहे. त्यामुळे इहपर लोकी अमाप सुख मिळते आणि परंपरेने मोक्षसुद्धा मिळतो. अशी भावना दृढ झाल्यामुळेच इतकी मंदिरे आणि मान स्तंभ उभे राहिले. अर्थातच धर्म व्यक्तिगत पातळीवर राहिला आणि धर्म आणि समाजहित या वेगळया गोष्टी बनल्या.

मोठया मार्मिक पद्धतीने वासंती शहा यांनी 'भूतकाळात हरवलेल्या वाटेने धर्माची वाटचाल' अशा मथळयाखाली लेख (१५ मार्च १९८२)[८३] लिहून वाचक श्रोत्यांना हालविले आहे. त्या म्हणतात, एकीकडे जैन धर्म हा विश्वधर्म आहे. वैज्ञानिक धर्म आहे म्हणायचे पण आजच्या वैं ज्ञानिक युगात कुणाला वीजेवर चालणाऱ्या जात्याचे पीठ चालत नाही, तर कुणाला कवळी बसवलेल्याच्या हातचे जेवण चालत नाही. हे अत्यंत चुकीचे आहे. (२१ मार्च १९८३)[८४]. 'आमच्या अहिंसेला आलेले हास्यास्पद स्वरूप' या लेखात त्या म्हणतात, जैन धर्माने अहिंसेवर भर दिला आहे. पण जैनांची अहिंसा हा इतरांच्या चेष्टेचा विषय बनला आहे. कारण आम्ही आमच्या अहिंसा आचरणाला उलट दिशेने सुरुवात केली आहे. उदा. हिंसा होते म्हणून मुलींच्या डोक्यातल्या उवा न काढणाऱ्या स्त्रिया ! वाणी लोक शेती करण्याला हिंसा समजतात. क्रियात्मक अहिंसा पाळल्याने कोणी अहिंसक बनत नाही. भाव अहिंसा होणे गरजेचे आहे. हिंसक आणि अहिंसक माणसाचा शाकाहाराशी आणि दयाळूपणाशी काही संबंध नसतो. हे स्पष्ट करताना त्या म्हणतात,

'शाकाहारी माणूससुद्धा हिंसक असू शकतो. हिटलर शाकाहारी होता. मद्य, मांसाला त्याने स्पर्श केला नव्हता. पण ६० लाख ज्यूंची त्याने हत्या केली. या उलट मांसाहारी मनुष्यसुद्धा दयाळू असू शकतो.'

देणगीच्या नावावर होणारी समाजाची लूट थांबवण्यासाठी (२८ मार्च १९८३)[८५] वासंती शहा यांनी 'समाजाची ही लूट थांबवायला हवी' हा लेख लिहिला. ‘आत्मलक्षी साधूची लक्षणे‘ या लेखात (९ मे १९८३)[८६] सौ. वासंती शहा यांनी साधूंविषयी विवेचन केले आहे. त्या म्हणतात, जातीचा संबंध पिंडाशी आहे. नवधा भक्तीचा संबंध आत्म्याशी आहे. साधूचे हे लक्षण आहे की, साधू घराघरामध्ये फक्त आत्म्याला पाहतो. आहारासाठी श्रावकांना (काही कारणास्तव) नकार देणाऱ्या साधूसंबंधी लेख लिहून प्रबोधन केले आहे.

वृक्षरोपणाचे फायदे .... वृक्षतोडीचे तोटे .... कमी होत गेलेला पाऊस वगैरे संबंधी सविस्तर लेखन (२० जून १९८३)[८७] या अंकात शरयू दफ्तरी यांनी ‘वृक्षारोपण जंगलतोड’ या लेखात केले आहे. त्या म्हणतात, ‘‘प्रत्येक शेतकऱ्याने इंधन, चारा व फळांसाठी झाडे लावावीत. जन्म, मृत्यू, लग्न कुठल्याही कारणासाठी आठवण म्हणून वृक्षारोपण करावे’’. १५ ऑगस्ट दिवशी गोम्मटगिरीवर अनेक श्रावक श्राविकांनी आपल्या पूर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेकडो झाडे लावयाचे जाणीवपूर्वक सांगून वृक्षारोपणाविषयी प्रबोधन केले आहे.

(४ जुलै १९८३)[८८] या अंकात सौ. शरयू दफ्तरी यांनी जैन धर्मामध्ये अनेक चाली-रीती-रूढी-परंपरा आहेत त्या चाली-रीती-रूढींकडे वैज्ञानिक व मनोवैज्ञानिक दृष्टीने पाहावे. अनेकांत विचार सरणीतून त्यांचा विचार करावा. म्हणून साधकबाधक चर्चा स्पर्धेचे आवाहन केले. त्या संबंधी त्यांनी विचार मांडले आहेत.

सौ. वासंती शहा यांनी ‘जैन धर्म संस्कृती मध्ये स्त्रीचे स्थान’ या (५ सप्टेंबर १९८३)[८९] च्या अंकात पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम स्थानावर राहिलेले आहे. जैन संस्कृतीही त्याला अपवाद नाही. जैन समाजातही स्त्री दुय्यम स्थानावरच आहे. हे सांगण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. त्या म्हणतात, ‘‘स्त्री जीवनाच्या विविध अंगावर श्रमण आणि ब्राह्मण या दोन्ही संस्कृतीची संयुक्त छाप पडली आहे. या दीर्घ कालखंडात ती कधी समान अधिकार उपभोगत होती तर कधी तिला पुरुषाच्या दास्यातही राहावे लागले. पण या सर्व काळात भारतीय

स्त्री ही शील, विनय, लज्जा इ. गुणांचे नित्य प्रतीक बनून राहिली आहे. धार्मिकक्षेत्र वगळता या देशातील सर्व स्त्रियांचे जीवन समानच आहे. पण जैनधर्माने स्त्रीला आत्मविकासाचा समान अधिकार दिला आहे. कृत युगापासून चालत आलेले तिचे समान स्थान हळूहळू विसाव्या .... बावीसाव्या तीर्थंकरानंतर महावीर कालातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेत घसरत गले". मोठे प्रदीर्घ ऐतिहासिक दाखले देऊन लिहिलेल्या लेखात त्या शेवटी म्हणतात, "जैन धर्मामध्ये 'पतिव्रता' हा शब्दप्रयोग नाही. कारण या शब्दातून स्त्रीचे दास्यत्व ध्वनित होते. या शब्दाऐवजी 'सहधर्मचारिणी' असा शब्दप्रयोग आहे".

३ ऑक्टोबर १९८३[९०] या अंकात सौ. वासंती शहा यांनी मुनीच्या शिथिलाचारा संबंधी 'या म्हणे संघाच्या संचालिका' हा लेख लिहून त्यांनी संचालिकांविरोधी आवाज उठवला आहे. मुनींचा शिथिलाचार मंत्र-तंत्र-आंगठया मंतरलेले नारळ वगैरे निषेध करून त्या म्हणतात, "त्या कार्यात संघनायकापर्यंत स्त्रियांना पोहोचविण्याचे कार्य संचालिका करतात. त्या आहारदान, वस्त्रदानाच्या निमित्ताने जनतेकडून पैसा उकळण्याचे काम करतात". जैनधर्मात जादूटोण्याच्या संकल्पना नाहीत. मग या गोष्टी आल्या कशा ? अंधश्रध्देला विरोध करण्यासाठी वासंती शहा यांनी लेखणी उचलून समाजाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला आहे.

(२ एप्रिल १९८४)[९१] च्या अंकात समाज जागृतीसाठी किंवा समाजामधला एखादा प्रश्न सोडवण्यासाठी नेमके काय करायला हवे ? तर 'चतु:संघाने एका मंचावर यावे' असे सुचविणारे विचार त्यांनी मांडले आहेत. त्या म्हणतात, "अनेकांतवादी धर्माने सांगितलेला प्रत्येक विचार आणि आचार स्वपरहितकारक आहे, मग व्यक्तीच्या एखाद्या नियमामुळे किंवा आचारामुळे जर समाजात अशांती आणि विरोध निर्माण झाला तर तो आचार सम्यक् कसा म्हणता येईल? धर्म परंपरा टिकून राहण्याच्या दृष्टीनेसुद्धा गृहस्थ आणि मुनी यांच्यात सामंजस्य आणि सहकार्य असणे तसेच दोन्ही वर्गांनी एकमेकांच्या अधिक जवळ जाणे आवश्यक आहे पण अलीकडे मुनी आणि गृहस्थ यांच्यात बराच संघर्ष सुरू झाला आहे. आहार ग्रहणाच्या बाबतीतला भेदभाव .... त्यातून निर्माण झालेला असंतोष .... कळसाचा बहिष्कार यातून समाजात आणि चतु:संघात विघटन होत आहे ही चिंतनीय बाब आहे आणि त्यासाठी धर्म नेत्यांनी एकत्र येऊन खुल्या व्यासपीठावरून चर्चा करायला हवी".

वासंती शहा यांनी सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी, त्यावर तोडगा काढण्यासाठी विचार मंथन होणे गरजेचे आहे. त्यासाठी चतु:संघाने एका मंचावर चर्चा करून समस्या सोडवावी असे सुचविले आहे. चतु:संघाप्रमाणेच अधिवेशनाच्या व्यासपीठावरूनही अशा प्रश्नांची चर्चा व्हायला हवी असे वाटल्याने त्यांनी पुन्हा या विषयावर (२८ मे १९८४)[९२] ला लेखन केले. त्यांनी लिहिले आहे की, 'आधिवेशनाच्या व्यासपीठावरूनही काही सामाजिक प्रश्नांची चर्चा व्हावी'. या लेखात त्यांनी जैन नियतकालिकांमध्ये कालानुरुप मार्गदर्शन व्हायला हवे असा महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. सामाजिक हानी होऊ नये, जैनांची संख्या आणखी घटू नये, शिक्षणावर अधिक भर द्यायला हवा अशा मुद्यांबरोबर वैफल्यगस्त तरूण पिढी, खेडयातील तरूण वगैरे संबंधी विस्तृत विवेचन करून त्या म्हणतात, 'धर्म टिकवायचा असेल तर आधी समाज टिकवायला हवा. कित्येक ठिकाणी मंदिरे आहेत पण जैनांची घरे नाहीत असे का ? ' या प्रश्नाकडे ही त्यांनी लक्ष वेधले आहे.

'चातुर्मास चतु:संघचर्या' या लेखात ज्योती शहा यांनी (२ जुलै १९८४)[९३] च्या अंकात चातुर्मासातला पाऊस मुनी आर्यिकांचा सहवास मुलींच्या नुकत्याच सुरू झालेल्या शाळा अशा वेळी विशेष जबाबदारी नसते. धावपळही कमी असते. त्यामुळे हा काळ स्वत:च्या भावनांना एक विशिष्ट वळण देण्याला अनुकूल दिसतो .... तथापि मुनी संघाचा फायदा घ्यावा असे विचार मांडले आहेत.

खरी जन्माष्टमी कोणती ? या विषयी (६ ऑगस्ट १९८४)[९४] च्या अंकात ज्योती शहा यांनी 'श्रीकृष्ण जन्माष्टमी विचार आचार' या लेखात विवेचन केले आहे. त्या म्हणतात, 'बंदिवासात जन्मलेल्या कृष्णाने जन्मापासून मृत्यूपर्यत अनेक संकटांना तोंड दिले. तथापि श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी हरिवंश पुराण प्रथमानुयोगाचे ग्रंथ वाचून कृष्णाच्या विचित्रतेस जाणून धर्माभिमुख होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने जन्माष्टमी साजरी करणे'.

प्रा. सौ. लीलावती जैन यांचे नांव स्पष्ट, परखड विचार मांडणाऱ्या, भीडभाड न ठेवता आपल्या योग्य मुद्यांशी ठाम राहणाऱ्या, अन्यायाविरूद्ध झगडणाऱ्या आणि विशेषत: मुनीच्या शिथिलाचारासंबंधी स्पष्टपणे मत मांडणाऱ्या म्हणून घ्यावे लागेल. त्यांनी (१३ ऑगस्ट १९८४)[९५] 'समाज प्रबोधनाची दिशा' या सदरात त्यांनी 'आता सुबुद्ध, सुजाण श्रावकाचाराची गरज आहे' असा लेख लिहिला आहे. लेखात उच्च कोटीतले आचार्य, विचारी मुनी, शिथिलाचारी मुनी आणि

अनाचारी मुनी असे मुनींचे चार प्रकारात विवेचन करून त्यांनी समाजाला आवाहन केलेय की, श्रावकांनीच मुनी निरखून घेतले पाहिजेत. सुजाण श्रावकांसाठी त्यांनी काही गोष्टी सुचवल्या आहेत. त्या अशा .... १) मंत्र-तंत्र-ज्योतिषी-अंगठया वगैरे प्रकार श्रावकांनी बंद पाडावेत.

२) मंदिर, प्रतिष्ठापना, रथभ्रमण वगैरेची उपयुक्तता पारखून घेऊन पैसे द्यावेत. रजिस्टर्ड ट्रस्ट, विश्वासपात्र ट्रस्टी हे ही पारखून घ्यावेत. विना पावती पैसे देऊ नयेत.

३) गावोगावी सत्यशोधक समिती किंवा सुधारमंडळे स्थापन करावीत. स्वाध्याय, पाठशाला, तत्त्वचर्चा शिबिरे, प्रवचन सप्ताह वाढवून खऱ्या देव, गुरू, शास्त्राबद्दल श्रद्धा निर्माण करावी.

४) अनाचारी मुनींना कपडे नेसवून गृहस्थ धर्माकडे परतवण्याचे अधिकार श्रावक संघाला असला पाहिजे.

५) मुनी व आर्यिका यांचे स्वतंत्र संघ असावेत व आर्यिकांच्या संरक्षणाची जबाबदारी समाजाने घ्यावी.

६) दानांचे ओघ सामाजिक विकासाकडे व स्वाध्याय तत्त्व अध्ययनाकडे वळवावे.

७) एकाच ठिकाणी आधीच अनेक मूर्त्या, मंदिरे असल्यास पुनश्च नवीन मंदिराची, मूर्त्यांची भर घालू नये.

८) संघ संचालनाची गरज फक्त मुनीसंघाच्या तीर्थपर्यटनासमयीच असावी व संघ चालक पुरुष श्रावक असावेत. खूप मोठया विस्तृत लेखामधील मुद्दे हे आहेत. श्रावकांना सुजाण विचारी, रत्नपारखी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न लिलावती जैन यांनी केला आहे.

(१० डिसेंबर १९८४)[९६] सौ. वासंती शहा, 'व्यंतर देवतांचा स्वीकार हा धर्म नव्हे तर आपदधर्म' या लेखात म्हणतात, 'जिनप्रणित धर्म हा निरिश्वरवादी धर्म आहे. आत्मकर्तृत्ववादी धर्म आहे. म्हणून हविर्भाग अर्पण करून नैवेद्य दाखवून .... देवतांच्या करुणेची व कृपाप्रसादाची याचना करणे या धर्माला मजूंर नाही. मग 'ओम फट् स्वाहा' म्हणून नारळ फोडणे कितपत योग्य आहे. यातला फट् हा हिंसावाचक शब्द आहे. नारळातील पाण्याने क्षेत्रपालाला अभिषेक करणे ही क्रिया म्हणजे नरबळीचे किंवा पशुबळीचे अहिंसक रूप आहे. बलीच्या रक्ताभिषेकाची ही सहीसही नक्कल आहे'.

वाचकाला विचार करायला लावणारा वासंती शहा यांचा लेख आहे.

वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे. वृद्धाश्रम ही काळाची गरज आहे. ही खरी वस्तुस्थिती सरोजा राजहंस यांनी (२४ डिसेंबर १९८४)[९७] च्या 'शांतिसाठी सहजीवन योजना' या लेखात वृद्धाश्रमाला पर्याय सुचवला आहे. ५० ते ७५ वयातील वृद्धांनी आठ ते पंधरा दिवसांसाठी बाहुबली सारख्या ठिकाणी मुनी सहवासात राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्या म्हणतात, 'असे केल्याने देवदर्शन, मुनी सहवास, स्वाध्याय, तत्वचर्या, समवयस्कांची सोबत, शंका समाधान हे सर्व होईलच. शिवाय घरातील कौटुंबिक प्रेमाचा, वात्सल्यतेचा धागा न तुटता कुटुंबाबरोबरचे नातेही चांगले राहील. पण सण-समारंभ सुखात पुन्हा एकत्रही राहता येईल! ही योजना म्हणजे वृद्धाश्रमाला समांतर संस्था असे त्यांना वाटते.

'अन्नातील भेसळ' या सौ. सुनंदा आवटे, कोल्हापूर याच्या (७ जानेवारी १९८५)[९८] लेखात त्या म्हणतात, 'ज्या पदार्थांचे उत्पादन कमी व मागणी जास्त, अशा पदार्थात भेसळ जास्त होते'. कशात कसली भेसळ केली जाते याचा विस्तृत तपशील दिले आहेत व त्यासाठी समाजाने कशी खबरदारी घ्यावी याचे विवेचन केले आहे. तसेच लोकशिक्षणाची गरज असल्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

(७ जानेवारी १९८५)[९९] सौ. प्रेमलता गुंडे यांनी '६८ व्या आधिवेशनाच्या निमित्ताने' द. भा. जैन सभा, ८५ वर्षातील त्यांचे कार्य, महिला विभाग, बाबासाहेब कुचनुरे यांचे वीर सेवा दलातील योगदान, जैन धर्म वगैरे मुद्यांवर लेख लिहिला आहे.

संपादकीय लेखनात सौ. प्रेमलता गुंडे यांनी (४ फेब्रुवारी १९८५)[१००] 'वीर बाला संघटनेची जरूरी' असल्याचे विचार मांडले आहेत. हुंडा, मानपानाच्या रूढी वगैरे सारख्या सामाजिक समस्या निवारण्यासाठी तसेच महिला शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, निराधार अपंग परित्यक्त्या स्त्रियांचे प्रश्न, धार्मिक शिक्षण, अल्पवयीन युवकांना मुनी दिक्षा देण्याच्या अपप्रवृत्तीतून निर्माण होणाऱ्या समस्या निवारण्यासाठी महिला सभा व वीर बाला संघटनेची जरूरी असल्याचे सांगितले आहे.

सौ. जयश्री सुरेंद्र सूर्यवंशी यांनी (१४ फेब्रुवारी १९८५)[१०१] च्या अंकात 'मला न उमजलेले एक कोडे' यांचा स्त्रियांविषयीचा पण वैचारिक असा खूप चांगला प्रदीर्घ लेख प्रगतीमध्ये प्रसिद्ध केला. स्त्री आणि स्त्रीवरचा मनुवादी अन्याय नेहमीचाच आहे. तिचे शील, तिचे चारित्र्य, तिची कुटिलता हा नेहमीच झालेला टीकेचा विषय आहे. हाच विचार त्यांनी लेखात मांडला आहे. एके

दिवशी त्यांच्या गावच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त कथा स्त्रियांच्या कुटिलतेवर व अश्लिलतेवर सांगितल्या. त्यामुळे लेखिकेच्या मनात वादळ उठले की, अशाच कथा पुरुष का सांगतात ? पुरुष जातीच्या कुटील, दुष्ट अशीलाच्या कथा कमी का आहेत ? पुरूष इतका अनितीने वागत असतांना उपदेशांचा भडिमार स्त्रीयांनाच का ? एकूणच परूष प्रधान संस्कृतीत पुरूषांकडून स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्यायावर लेखिकेने प्रकाश टाकला आहे.

(४ मार्च १९८५)[१०२] सौ. निलम पाटील यांनी 'प्रसुती पूर्व मुलगा मुलगी' या लेखात आपले विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, 'गर्भातील बालकात काही व्यंग आहे का ? हे पाहण्यासाठी गर्भजल परीक्षा करायची असते. पण आज काल मुलगाच हवा या हट्टासाठी गर्भजल परीक्षा केली जाते. हे चुकीचे असून मुलगा मुलगी जे होईल ते स्वीकारणेच योग्य आहे'. अहिंसा हा मूळ पाया असलेल्या जैन धर्मातील पालकसुद्धा लिंग भेद करतात आणि मुलीचा गर्भ काढून टाकतात. तसे होऊ नये म्हणून त्यांनी जनमत जागृत केले आहे. याच अंकात (४ मार्च १९८५)[१०३] सौ. पुष्पा पाटील यांनी 'आहेर देणे घेणे' या वर प्रबोधनात्मक लेख लिहिला असून त्यामध्ये समाजातील देण्या घेण्यावरील रूढींवर प्रकाश टाकला आहे.

सौ. जोत्स्ना जैन यांनी 'उद्ध्वस्त होणारी कुटुंबे' असा लेख (१८ मार्च १९८५)[१०४] या अंकात लिहिला असून नोकरी करणाऱ्या स्त्रीचे घराकडे दुर्लक्ष होऊन कुटुंबाची वाताहात कशी होते हे एका ताठ वागणाऱ्या स्त्रीच्या उदाहरणावरुन स्पष्ट केले आहे. त्या म्हणतात, 'स्त्री ने नोकरी करावी पण कुटुंबाकडे ही लक्ष द्यावे. पती पत्नीच्या परस्परांच्या मनाची जपणूक हाच कौटुंबिक जीवनाचा पाया आहे. उद्ध्वस्त होणारी कुटुंबे ही या बळकट पायावरच वाचतील'.

याच अंकात 'वास्तववादी धर्मप्रणाली'[१०५] यावर वासंती शहा यांनी लेखन केले आहे. यात त्या म्हणतात, 'भारतीय भूमी अनेक धर्म आणि दर्शने यांची जननी आहे.सन्यास धर्माचा आणि अध्यात्मिक विचारांचा उगम याच देशात झाला असून वेदकाल आणि वेदोत्तर काळात कितीतरी धर्म मते आणि तत्त्वप्रणाली उदयास आल्या. पण त्यातल्या फारच थोडया अस्तित्वात राहिल्या. महावीर काळात बौद्ध धर्म भरभराटीला आला पण आता तो नावापुरताच उरला आहे. वैदिक देवतांची जागा इतर देवतांनी घेतली. वैदिक धर्माचे हिंदू धर्मात रूपांतर झाले पण जगाच्या पाठीवर हजारो वर्षे शुद्ध, अबाधित स्वरूपात जैन धर्मच राहिला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही'. पुढे

विस्तृत लेखात जैन धर्माची वस्तुनिष्ठ भूमिका.... लोकाभिमुकता.... व्यापक हिताची भावना.... राष्ट्रीय वृत्ती..... नित्य नूतन स्वरूप अशा मुद्यांना धरून विवेचन केले आहे.

'कौटुंबिक स्वास्थ्य' वर (६ मे १९८५)[१०६] सौ जोत्स्ना जैन यांनी लेख लिहिला आहे. तर कु. पुष्पा धनपाल पाटील यांनी 'यादी में शादी' वर (१६ जून १८८५)[१०७] च्या अंकात लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. खर्च, वेळ, मानापमान टाळण्यासाठी यादी पे शादी आवश्यक असल्याचे मत त्यांनी नोंदवले आहे. कौटुंबिक स्वरूपामध्ये जोत्स्ना जैन यांनी ढासळत चाललेल्या कुटुंबाची अनेक उदाहरणे दिली आहेत. त्या म्हणतात, 'हट्टीपणा हा कौटुंबिक स्वास्थ्य बिघडवणारा वाइट दुर्गुण आहे. पतीला खटकणाऱ्या गोष्टी टाळल्या पाहिजेत. उदाहरण म्हणून नोकरी करणाऱ्या स्त्रीचे परपुरुषाशी बोलणे, गप्पा मारणे, वगैरे सांगून शेवटी तिच्यावर घटस्फोटाची वेळ येते. हे सांगितले आहे.

'हिंदू कायद्यातील स्त्रियांचे हक्क व संरक्षण या विषयावर अग्रलेख (१ जुलै १९८५)[१०८] च्या अंकात सौ. प्रेमलता गुंडे यांनी लिहिला आहे. हिंदू विवाह कायदा, पत्नी असताना केलेला द्वितीय विवाह, कायदेशीर विभक्तपणा व घटस्फोट पालकत्वाचे अधिकार, विधवा, पत्नी, कन्या, आई पोटगीचा कायदा वगैरे मुद्यांवर प्रकाश टाकणारा माहितीपूर्ण लेख लिहून जैन स्त्रियांना कायद्यांविषयी जाणीव करून दिली आहे. (१२ ऑगस्ट १९८५)[१०९] च्या अंकात गुंडे यांनी 'समयसार' वर लेख लिहून वेळेचे महत्त्व सांगितले आहे. त्या म्हणतात, 'जो वेळेची किंमत करतो त्याचा वेळ सन्मान करतो आणि जो वेळ दवडतो तो वेळेमध्ये हरवून जातो. म्हणून आजचे काम आजच केले पाहिजे.'

वासंती शहा यांनी (२८ आक्टोबर १९८५)[११०] 'पत्रकारिता ही लोकशाही राज्यातील मोठी प्रबळ शक्ती आहे' हे सांगितले आहे. त्या म्हणतात, 'पत्रकारिता ही लोकशाही राज्यातील मोठी प्रबळ शक्ती आहे. सामाजिक न्यायासाठी झगडणे हे पत्रकाराचे मुख्य कर्तव्य!' पुढे पत्रकारांची कर्त व्ये ..... आमची पत्रकारिता ..... आचार संहिता ..... पत्रशक्तीचा प्रत्यय ..... सामाजिक हिताला अग्रक्रम वगैरे मुद्यांचा उहापोह कला आहे.

सौ प्रेमलता गुंडे यांनी 'जीवन जगण्याची कला' या (२ डिसेंबर १९८५)[१११] च्या लेखात जन्माला येणारा प्रत्येक माणूस जगत असतो. पण फक्त जगणे ..... मरेपर्यंत जगणे

. . . . . मरण येत नाही म्हणून जगणे आणि जीवनाचा आस्वाद घेत जगणे यात फरक आहे हे जीवनाचा आस्वाद कसा घ्यायचा हे सांगितले आहे. त्या म्हणतात, ‘काव्य शिल्प वगैरे अनेक कला जीवनास समृद्ध करीत असतात. जीवन जगण्याची कला म्हणजे जीवनात सुख निर्माण करण्याची व सर्वांबरोबर स्वत: सुखी होण्याची कला आहे.‘

कु. पुष्पा धनपाल पाटील यांनी आजच्या समाजात जगावे कसे हे ‘अहिंसा आजच्या युगाचा आवश्यक धर्म ' या (३० डिसेंबर १९८५)[११२] लेखात सांगितले आहे. ‘अहिंसा परमो धर्म:' आणि ‘जगा आणि जगू द्या' हे भारतीय जैन संस्कृतीने दिलेले बहुमोल संदेश आहेत. महावीरांनी सांगितलेली अहिंसा आजच्या या विनाश युद्धाच्या भयंकर अग्नीतून मुक्त होण्यासाठी एकच उपाय आहे असे ठाम मत मांडले आहे.

मिथ्यात्त्वाला जैन धर्मात स्थान नाही मग जैन शास्त्रात मिथ्या कोठून आल्या? असा सवाल ‘आगम मंत्रतंत्र व दिशाभूल एक अल्प शोधन’ या लेखात प्रा. सौ. लीलावती जैन यांनी (२० जानेवारी १९८६)[११३] विचारला आहे. लेखात हास्यास्पद मिथ्या गोष्टींचे विवेचन करून आगम म्हणजे काय? हे सविस्तर सांगितले आहे. तसेच पूर्वात प्राणवाद, मंत्र तंत्र ज्योतिष भूतप्रेत इ. संबंधी विवेचन आढळल्याचे सांगितले आहे. तसेच जादूटोणा, अंधविश्वास, मोहिनी विद्या, तोडगा वगैरेही सांगितले आहे पण महावीरांनी मिथ्यात्व सोडायला सांगितले असल्याचे प्रतिपादन करून त्या शेवटी श्रावकांना सांगतात, ‘जिनवाणीचा मूल उद्गम पवित्र व स्वच्छ आहे, पण जन्म-गाव समूहातून वाहात येता येता त्या प्रवाहात अत्यंत घाणेरडे नाले, ओढे येऊन मिळाले आहेत म्हणून सुबुद्ध, सुजाण श्रावकांनी गटारगंगेला जिनवाणीची जिनगंगा समजू नये.‘

सौ. प्रेमलता गुंडे यांनी ‘अन्यायाचा प्रतिकार’ या लेखात (३ फेब्रुवारी १९८६)[११४] अन्यायाच्या प्रतिकारातून देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे या अर्थाचे विवेचन केले आहे. स्वातंत्र्य, चळवळ, हरिजन मंदिरप्रवेश वगैरे मुद्यांचा आढावा घेऊन त्या म्हणतात, ‘दलित, पिडित, अबला यांचेवर जेव्हा अन्याय होतो तेव्हा त्यांच्या अंगी प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे आणि त्यांच्यावरील अन्याय दूर होण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे सर्वांचे पवित्र कर्तव्य आहे. इतकेच नव्हे तर ती ईश्वरी आज्ञाच आहे, याची जाणीव आपण सर्वांनी सतत ठेवल्यास समाजातील दीन दलितांची आणि संकटग्रस्त अबलांची अन्यायातून सुटका होईल.’

'धर्मक्षेत्रावरील गैरकारभाराला दातेही जबाबदार' असा (१० मार्च १९८६)[११५] ला वासंती शहा यांनी लेख लिहून दान करणाऱ्यांना जागे केले आहे. तीर्थक्षेत्रावर भाविक दान करतात पण दानातून मिळालेल्या पैशाचा विनियोग कसा होतो याविषयी ते दक्ष राहत नाहीत. काही उदाहरणे देऊन शेवटी त्या म्हणतात, 'समाजाच्या गरजा लक्षात घेऊन त्या कार्यासाठीच तुमचे पैसे दान करा, तरच तुमच्या पुढील पिढीच्या हाती धर्माची ज्योत देऊ शकाल.'

प्रा. सौ. लीलावती जैन आणि वासंती शहा या दोन परखड लेखिकांनी (२४ मार्च १९८६)[११६] 'ऐकावे ते नवलच! गंधोदक महात्म्य' या लेखात प.पू. १०८ गणधराचार्य कुंथुसागर महाराज यांच्या चरणोदक (गंधोदक) डोळयात घालून घेतल्याने एका मंददृष्टी जैन भगिनीस स्वच्छ दिसू लागले असा अनुभव 'प्रगती आणि जिनविजय' मध्ये (३ मार्च १९८६)[११७] च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यासंदर्भात काही शंका उपस्थित करून जनजागरण केले आहे. शंका थोडक्यात अशा .....

१) दृष्टीदोष सुधारण्याचा हेतू ठेवून गंधोदक किंवा मुनींचे चरणोदक डोळयात घालणे अथवा पिणे कितपत योग्य आहे.

२) तीर्थंकर अभिषेकाचे गंधोदक व मुनींचे चरणोदक समान आहेत काय?

३) चरणोदकाने डोळे बरे होतात हा हजार पाचशेंचा अनुभव आहे काय?

४) रोग नष्ट करणे किंवा ज्ञानवृद्धी करणे हे हेतू मनात ठेवून दोन्ही उदक घेणे, घालणे, पिणे आत्माभिमुख वर्तन होऊ शकते काय?

५) गंधोदकाचा महिमा एवढा समर्थ आहे तर सर्व नेत्र तज्ञांनी, नेत्रशल्यचिकित्सकांनी आपली नेत्रचिकित्सालये व शस्त्रक्रिया बंद कराव्यात काय ?

६) गंधोदक घेतल्याने अभ्यास न करता मुले पास होतील काय?

७) फक्त महिला मंडळानीच गंधोदक घेऊन मुला बाळांना द्यावे? पुरुषांनी गंधोदक घेऊन मुलांना देऊ नये काय? आरोग्याच्या अंधश्रद्धा व बुवाबाजीच्या चमत्काराला उजेडात आणून वैज्ञानिक जाणीवा रुजवण्याचा चांगला प्रयत्न प्रा. लीलावती जैन व वासंती शहा यांनी केलेला दिसून येतो.

'मंत्रतंत्राचा वापर करावा की करू नये' या विषयावर लेखिकांच्या प्रतिक्रिया मागवल्या होत्या. बऱ्याच लेखिकांनी उलटसुलट दोन्ही अंगानी लिहिले आहे. पण जास्त लेखिकांनी मंत्रतंत्राचा

वापर करू नये असे लिहिले आहे. या विषयावर श्री.व सौ.अलका बाबासो पाटील (पती पत्नी दोघांनी मिळून) पाठवलेल्या लेखात मंत्रतंत्राचा वापर करावा असे सुचविले आहे. त्याचे कारण सांगताना त्या म्हणतात, 'संकटग्रस्त जैन माणूस धर्माने काही फायदा होत नाही म्हणून यल्लमा, नाईकवा, ज्योतिबा, मुस्लीम दर्गा वगैरेंकडे वळतात तेव्हा श्रावकाला धर्मामध्ये स्थिर करावयाचे असेल तर किंवा त्यांना मिथ्याज्ञानाच्या अंध:कारातून सम्यक्ज्ञानाच्या प्रकाशाकडे वळवायचे असेल तर मुनीवर्गांनी मंत्रतंत्राचा वापर अवश्य केला पाहिजे.'

(खरे सम्यकत्व आणि मिथ्यात्व यामधला फरक श्री. व सौ. पाटील यांना समजलेला नाही काय असे वाटते कारण सम्यक ज्ञानाच्या प्रकाशाकडे मंत्र तंत्राने श्रावकांना कसे काय वळविता येईल ? तसेच ते आपल्या कुठल्याही मताशी ठाम नाहीत असे दिसते.)

'भगवान महावीरांनी आम्हास काय दिले ?' या लेखात २१ एप्रिल १९८६[११८] या सौ. नयना धनंजय पाटील म्हणतात, 'वृषभनाथांनी स्थापन केलेला जैन धर्म भ. महावीरांनी ऊर्जितावस्थेत नेला. एकाच गोष्टीचा त्यांना ध्यास होता की, 'माणूस श्रावक कसा बनेल ?' श्रावक म्हणजे श्रवण करणारा ऐकणारा माणूस ! श्रोता फक्त कानांनी ऐकतो तर श्रावक प्राणांनी ऐकतो. असा प्राणांनी ऐकणारा श्रावक निर्माण व्हायला हवा. भ. महावीरांच्या उपदेशाचे मनन चिंतन केल्यास मानवास मन:शांती जरूर मिळते.'

'रामायणातील जटायू' वर ५ मे १९८६[११९] ला कु. मायादेवी समुद्रविजय पाटील यांनी लेख लिहिला आहे. तर सौ स्वीटी जैन पुणे यांनी 'संसार संसार' असा लेख याच अंकात लिहून .... घटस्फोटापर्यंत आलेल्या कुटुंबाच्या उदाहरणाचा उल्लेख करून, नवरा-बायकोचे भांडण घरातच ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

तसेच सौ. सुमन चौधरी यांनी 'व्रतवैकल्ये' एक चिंतन याच अंकात (५ मे १९८६)[१२०] संपादकीय लेखन वेगळया दृष्टिकोनातून केले आहे. त्या म्हणतात, 'रविवार, शुक्रवार, दशलक्षणादी अनेक प्रकारच्या नोपी व व्रत उपवास सर्वत्र करताना आढळतात. याने पुण्य मिळते की नाही हा वादाचा मुद्दा असेल पण व्यक्तिगत गुण वाढतात हे निश्चित .... पण व्रतास खर्च येतो मग फळे वगैरे महागडया वस्तू ईश्वराला वाहून कसले पुण्य पदरी पडणार ? खरे तर छोटी बालके, अनाथ, अपंग हेच खरे ईश्वराचे अवतार आहेत. त्यांची सेवा म्हणजे ईश्वरसेवा नव्हे का ? देव प्रसन्न होतो

हा चुकीचा विचार प्रथम मनातून काढला पाहिजे ?' असे सांगून आपला धर्म दैववादी नसून प्रयत्नवादी असल्याचे विचार मांडले आहेत.

'सुजाण पालकत्व' वर संपादकीय लेखन सौ. प्रेमलता गुंडे यांनी (४ ऑगस्ट १९८६)[१२१] च्या अंकात लिहिला आहे. यात चांगुलपणाची सुरुवात घरापासूनच होते. म्हणून पालकच मुलांचे चांगले मित्र, मागदर्शक, तत्त्वज्ञ असले पाहिजेत. तसेच मुलांच्यात निर्भयता, शिस्तप्रियता, ध्येयनिष्ठता, चारित्र्यशुद्धता बनवण्याची जबाबदारी पालकांचीच असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले आहे. सौ. सुनंदा आवटे यांनी याच अंकात (४ ऑगस्ट १९८६) 'मूल शाळेत जाऊ लागते तेव्हा' या विषयावर तर 'आत्मा आणि शरीर' यावर सौ. अनुराधा गडेण्णावर यांनी लेखन केले आहे. त्या म्हणतात, 'आत्मा आणि शरीर यांचा सुरेख संगम म्हणजे मानव होय'.

(१५ जूलै १९८६)[१२२] कु. जयश्री गांधी यांनी 'साधुसंत येती घरा' असा लेख १ जुलै १९८६ रोजी चारूकिर्ती भट्टारक स्वामी, सोलापूरला संस्थानगरमध्ये आले त्यावेळी लिहिला आहे. स्वामींच्या प्रवचनामधील काही भाग त्यांनी सांगितला आहे की .... धर्म हा जोडणारा आहे तोडणारा नाही. धर्म आपसात लढत नाही, पण धर्माच्या नावाखाली लोक मात्र आपसात लढतात. धर्म मंदिरे बांधण्यात, दान देण्यात नाही तर तो सेवाभावात आहे. पं. सुमतीबाईचे कार्य मदर तेरेसाप्रमाणे आहे. महिलांचा उद्धार करणे हे मानवता धर्माचे काम आहे. वगैरे .... प्रवचनाच्या प्रारंभी माताजींच्या शुभहस्ते स्वामीजींना सन्मानपत्र व 'मानवरत्न' हा किताब देऊन सत्कार करण्यात आला होता. असा उल्लेख केला आहे.

प. पू. आर्यिका १०५, भरतमती माताजी यांनी 'क्षमावाणी' या (१५ सप्टेंबर १९८६)[१२३] च्या लेखात 'क्षमावलीचा आता फक्त शिष्टाचार राहिला आहे. लक्षावधी रूपयांचे सुंदर छापील कार्ड पाठवतात .... प्रत्यक्ष भेटतात .... क्षमा मागतात पण हे सर्व यंत्रवत झाले आहे. आज तिचे स्वरूप बाजारू झाले आहे. क्षमा मुखाने म्हणतो पण भाव गळयाखाली उतरत नाहीत. हृदयात क्लेश, कपट ठेवून क्षमा मागून काय उपयोग ? क्षमा म्हणजे भित्रेपणा नव्हे. क्षमा म्हणजे वीरता ! दुसऱ्यांना मारणे नव्हे ! दुसऱ्यांना जिंकणे नव्हे ! आपल्या वासना कषायाना मारणे, विकाराना जिंकणे म्हणजे क्षमा होय' असे विचार मांडले आहेत.

सौ. सुमन चौधरी यांनी (१० नोव्हेंबर १९८६)[१२४] च्या दिवाळी अंकात 'लक्षदीप उजळूया' असा लेख लिहिला आहे. तर याच दिवाळी अंकात 'विद्या विनयेन शोभते' असा लेख कु. मायादेवी पाटील यांनी लिहिला आहे. 'पुरुषार्थ आणि देव' या (२४ नोव्हेंबर १९८६)[१२५] च्या लेखात सौ. सुवर्णा धनपाल हावळे यांनी पुरुषार्थ श्रेष्ठ असल्याचे आपले मत मांडले आहे.

लग्न, डोहाळे जेवणे, घर बांधणे, विहिर काढणे, कुणी वारले तरी गारवा म्हणून ठोमरा भाकरी देण्याची पद्धत आजही ग्रामीण भागात (शहरातही) आहे. लग्नमंडपात वराचे पाय धुणे तर ग्रामीण शहरी भागात संस्कृतीचा भाग म्हणून आजही चालू आहे. या विषयावर प्रतिक्रिया पाठवण्याचे आवाहन प्रगती आणि जिनविजयमधून केले होते. त्याला भरपूर प्रतिसाद मिळाला. या प्रकारच्या रुढी असाव्यात आणि नसाव्यात अशा दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रिया आल्या. त्यातील काही प्रतिकिया (१ डिसेंबर १९८६)[१२६] कु. पुष्पा धनपाल पाटील, दुधगांव, सौ. विभावरी चौगुले, वाळवा, सौ. सरोजिनी इचलकरंजे, सांगली यांनी पाठविल्या आहेत.

'स्त्री स्वातंत्र्य आणि सामाजिक जाणीव' या विषयावर आपले विचार सौ. विनया माधव ताम्हनकर यांनी (२ फेब्रु १९८६)[१२७] या अंकात मांडले आहेत. ब्राह्मी, सुंदरी पासून इंदिरा गांधी, कल्पना चावला सारख्या कर्तृत्ववान स्त्रियांचा उल्लेख वारंवार केला जातो. पण बाकीच्या सर्व सामान्य शोषित, अशिक्षित, अन्यायग्रस्त स्त्रियांचे काय ? नेमका हाच विचार विनया ताम्हनकर यांनी मांडून समाजाची वास्तव परिस्थिती उजेडात आणली आहे. त्या म्हणतात, 'औद्योगिक क्रांतीमुळे आणि पाश्चात्य जीवनामुळे स्त्रीच्या जीवनात परिवर्तन झाले. स्त्री काहीही करू शकते हे मान्य केले गेले. पण ही स्थिती मूठभर स्त्रियांची. बाकीच्या स्त्रियांना अद्यापही स्वातंत्र्याची चव चाखायला मिळाली नाही'. पुढे स्त्री शिक्षण .... आर्थिक स्वातंत्र्य .... पुनर्विवाहातल्या अडचणी .... विधवा, परित्यक्तांचे जिणे .... सासरचा छळ वगैरे मुद्दे लिहून लेखात शेवटी त्या म्हणतात, 'सर्वजण काय करतात. याऐवजी मी काय करतो हे पाहायला हवं आणि मी काय करायला हवं ? हे सर्वांनी ठरवायला हवं म्हणजे मग समाजमन जागृत होईल आणि ही राष्ट्रीय समस्या लवकर सुटण्यास मदत होईल'.

लग्न समारंभातील चालीरीतींवर प्रतिक्रिया मागवल्या होत्या. त्यात सौ. उज्वला आडमुठे, दुधगाव यांनी या चालीरीती कशा असाव्यात या अर्थी (२ फेब्रुवारी १९८७)[१२८] च्या अंकात लेखन

केले आहे. आपले विचार मांडताना त्या म्हणतात, 'आलेला गारवा सर्वच लोक खातात, त्यामुळे एक प्रकारची आपुलकी वाटते. एकात्मतेची भावनाही वाढते'. जावयाचे पाय धुणे याबद्दल त्या म्हणतात, 'गुणी व्यक्तीचे कोणतेही काम करण्यात कमीपणा नाही. हा विचार यामध्ये असल्यामुळे जावयाचे पाय धुण्यात वाईट काय आहे ? त्यामुळे वराचे मनात आपुलकी होऊन वधूंना चांगली वागणूक मिळावी असा हेतू असल्याने ही पद्धत सदोष आहे. असे मला वाटत नाही'. (गुणी व्यक्तीचे पाय धुणे तर मग मुलीचे का नाही ? असा प्रश्न पडतो. शिवाय लेखिका म्हणते यामुळे खरेच वधूला चांगली वागणूक मिळते का ?)

सौ. विजया अनंत गाट यांनी 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा' यावर (२ फेब्रुवारी १९८७)[१२९] च्या अंकात तर प्रेमलता गुंडे यांनी 'जिच्या हाती पाळण्याची दोरी' यावर जयसिंगपूरला झालेला कार्यक्रम आणि स्पर्धेचा वृत्तांत सांगितला आहे.

'यशाचे खरे रहस्य' यावर आपले विचार मांडताना सौ. अनुराधा गडेण्णावर (४ मे १९८७)[१३०] म्हणतात, 'तुम्हाला जीवनात जे हवे आहे, फक्त त्याचाच विचार करा' या वाक्यात खूप मोठा अर्थ दडलेला आहे आणि यशाचे रहस्य आहे. दृढ निर्णय, आत्मविश्वास, इच्छाशक्ती, अविरत प्रयत्न केले तर यशाची माळ आपल्या गळयात पडल्याशिवाय रहात नाही ?

'भारतीय औद्योगिक कंपन्यांचे नियोजन कसे चालते? 'यावर संशोधन करून मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्रा. डॉ. सौ. अरूणा कौलगुड यांनी मिळवली आहे. या सांगलीच्या माहेरवाशीण असून मुंबई येथील डहाणूकर महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका आहेत. 'महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रातील महिलांचे कार्य व कर्तबगारी' या विषयावर त्यांचे संशोधन चालू आहे. 'महिला मनुष्यबळ विकास : आजची नितांत गरज' वरचा त्यांचा लेख (४ मे १९८७)[१३१] अभ्यासातून आलेला असल्यामुळे तो वस्तुनिष्ठ आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार स्त्रिया, त्यांचे प्रमाण, रोजगार समस्या, रोजगारीत असणाऱ्या ज्या गामीण, निमशहरी स्त्रिया, प्रतिष्ठित तथाकथित समाजसेवा करणाऱ्या श्रीमंत समाजातील सुखवस्तू स्त्रिया, प्रपंच चालवण्यासाठी कामधंदा करणाऱ्या तळागाळातील स्त्रिया वगैरे सर्व स्त्रियांचा आढावा त्यांनी आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक दर्जा यासंबंधीही विवेचन केले आहे. त्या म्हणतात, 'चूल मूल करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त असून त्यांनीही आता गृहोपयोगी वस्तूंद्वारे स्वयंरोजगार निर्माण करायला हवा.'

कु. सुलक्षणा जिवंधर मुळे यांनी (६ जुलै १९८७)[१३२] च्या अंकात एका महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आहे. 'मुनींना आहार देण्यात अरूची काय ?' मंदिर पूजा पंचकल्याणिक वगैरे झगमगटातून होणाऱ्या गरीब श्रीमंतीच्या बाबींचा आढावा घेऊन मुनींचे सोवळे, पाणी, पीठ, गॅस, आहारासाठीचा खर्च, आहार देणाऱ्यांना द्यावे लागणारे नियम वगैरे मुद्दे उपस्थित करून त्या म्हणतात, 'हे सगळं पूर्वीच्या काळी ठीक होत. आता महानगरातल्या चाळीत राहणाऱ्या, नोकरी करणाऱ्यांना हे करण कसं शक्य आहे?' शिवाय कष्ट नको असणाऱ्या आजच्या पिढीला धर्माकडे वळवण्यासाठी निरनिराळे कार्यक्रम करून..... इतर कार्यातील भडकपणा काढून टाकायला पाहिजे, असेही त्यांनी सूचित केले आहे.

'समाधीमरण' वर आपले विचार जिनदेवी माताजी यांनी (१० ऑगस्ट १९८७)[१३३] च्या अंकात लिहिले आहेत की, 'सल्लेखना आत्महत्या नव्हे. कारण आत्महत्येमध्ये क्रोध, मान, माया, लोभाच्या आवेशाने जीवनाला कंटाळून लपून कुठे तरी जीव दिला जातो. परंतु सल्लेखनात कषायांची मंदता असते. सुखशांती असते. सल्लेखना जबरदस्तीने दिली जात नाही तर स्वत: खुषीने, आनंदाने मृत्यूला आव्हान दिले जाते. म्हणून त्याला मृत्यू महोत्सव म्हणतात.'

सौ. प्रेमलता गुंडे यांनी 'दान' वर (३१ ऑगस्ट १९८७)[१३४] च्या अंकात संपादकीय लिहिले असून आहारदान, औषधदान, अभयदान, वैय्यावृत्तदान वगैरे संबंधी विवेचन केले आहे.

'मानवी स्वातंत्र्य' वर संपादकीय लेखन सौ. प्रेमलता गुंडे यांनी (२ नोव्हेंबर १९८७)[१३५] च्या अंकात लिहिले असून भारतीय स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य वगैरेंचे विवेचन केले आहे. सौ. सुमन चौधरी यांनी (७ डिसेंबर १९८७)[१३६] 'जैन आणि जैन धर्म' यावर संपादकीय लिहिले आहे. त्या म्हणतात, 'जैन धर्म हा हिंदू धर्माचा गाभा नसून तो स्वतंत्र धर्म आहे?' या विषयी विवेचन करून खानेसुमारीत किंवा इतर केव्हाही धर्म लिहीत असताना 'जैन' असा स्पष्ट उल्लेख करण्यासंबंधी जैन समाजाला आवाहन केले आहे.

(१४ डिसेंबर १९८७)[१३७] ला वासंती शहा यांनी 'समाज रक्षण हेच संस्कृती रक्षण हीच वास्तविक तीर्थरक्षा' असा लेख लिहिला असून त्यामध्ये तीर्थरक्षा कमेटीची मूळ उद्दिष्टे..... जैन संस्कृती वगैरे गोष्टींचे विवेचन करून संस्कृती घडवणारा माणूसच असतो म्हणून जीर्णोद्धार माणसांचा

व्हायला हवा, अशा अर्थाचे विचार मांडून शेवटी 'समाजातून बाहुबली पुढे यावेत' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## २.१० सन १९८८ ते २००० या कालखंडातील वैचारिक लेखन

'नववर्षाचे स्वागत' हे संपादकीय प्रेमलता गुंडे यांनी (४ जानेवारी १९८८)[१३८] ला लिहिले असून फेअर फॅक्स, बोफोर्स, पंजाव प्रश्न, श्रीलंका प्रश्न, दुष्काळ, सतीप्रकरण, अंधश्रद्धा, दारिद्रय वगैरे जुन्या वर्षाचा आढावा घेऊन जैन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी द. भा. जैन सभेने मार्ग दर्शन करावे अशी इच्छा व्यक्त केली आहे.

तसेच 'कुटुंब न्यायालये' वर (२ एप्रिल १९८८)[१३९] सौ. प्रेमलता गुंडे यांनी संपादकीय लिहिले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाने भारताची राज्यघटना लिहिली. हिंदू विवाह कायदा, वारसा कायदा, हुंडाबंदी, सतीबंदी, स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायदेशीर हक्क निर्माण केले. परंतु कायद्याचा लाभ गरजू स्त्रियांना प्रत्यक्ष उपलब्ध होण्यासाठी अनेक अडचणी भासतात .... त्यासाठी त्यावर उपाय म्हणून कुटुंब न्यायालयाची योजना आणली जात आहे. कुटुंब न्यायालयाची गरज आणि इतर स्त्री संदर्भातले विवेचन त्यांनी केले आहे.

कर्नाटकातील शिरगुप्पी येथील महिला अधिवेशनात सौ. प्रेमलता गुंडे यांनी (४ जुलै १९४८)[१४०] ९५ वर्षांच्या कळंत्रे आक्का मुंबईहून आल्याचा उल्लेख करून, त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करून अधिवेशनाचा वृत्तांत सांगितला आहे. तर याच अंकात वासंती शहा यांनी 'कासार समाजाचे स्थितीकरण होणे आवश्यक' असा लेख लिहिला आहे. नागपूर पासून कोकण कर्नाटक पर्यंत कासारसमाज पसरलेला आहे. व्यापार करणारा हा समाज जैन आणि हिंदू कासारात विभागलेला असून हिंदू कासारसुद्धा मांसाहाराला स्पर्श करत नाहीत. म्हणजे कधी काळी सर्वच कासार जैन असावेत.

'हुंडा प्रतिबंधक कायदा' या वरच्या लेखात थोडी कायदेशीर माहिती (५ सप्टेंबर १९८८)[१४१] ॲड. सौ. शैलजा पंडित यांनी दिली आहे की, लग्नातील कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्षाकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लग्नापूर्वी, लग्नात किंवा लग्नानंतर लग्नाचा मोबदला म्हणून काही मौल्यवान वस्तू देणे घेणे म्हणजे हुंडा ! वधू आणि वर दोन्ही पक्षास हुंडा प्रतिबंधक कायदा लागू आहे तथापि हुंडा वधू पक्षाकडून वर पक्षच घेत असतो. हुंडा घेणाऱ्याला कमीत कमी ६ महिने व

जास्तीत जास्त २ वर्षे कैद व १०,००० रू. किंवा हुंडयाच्या किंमती एवढया .... दोन्हीत जी रक्कम जास्त असेल तेवढया रकमेच्या दंडाची तरतूद आहे.

नर्मदा कोथळे यांनी (३ ऑक्टोबर १९८८)[१४२] 'नात्यातील विवाह एक गंभीर समस्या' यावर 'नात्यातील विवाहातून जन्मणारी संतती निरोगी अव्यंग जन्मेलच असे नाही'. असे प्रबोधनात्मक विवेचन केले आहे. (२१ नोव्हेंबर १९८८)[१४३] 'जैन जगला तर जैन धर्म जगेल?' या लेखात वासंती शहा यांनी अलीकडच्या काळात जैन समाज उत्सवप्रिय बनल्यामुळे तो खऱ्या धर्मापासून अलग होत चालला आहे. मग खरा धर्म म्हणजे काय ? यावर आपले विचार मांडले आहेत. या लेखात त्या म्हणतात, 'जैन धर्म हा चिकित्सेचा धर्म आहे. हा धर्म भावडया श्रद्धेचा विषय नसून या धर्माला ज्ञानाशिवाय श्रद्धा मंजूर नाही पण आम्ही लोक जैन सिद्धांत विसरलो. समाजरक्षणात आणि समाजसंवर्धनात धर्म आहे याचा आम्हाला विसर पडला आणि आम्ही उत्सवप्रिय झालो. उत्सवाची हौस भागवण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांना खर्ची टाकत आलो. त्यामुळे हा समाज प्रत्यही घटत गेला. पण अजून आमची उत्सवाची हौस फिटली नाही. विशेष म्हणजे यालाच आम्ही धर्मप्रभावना म्हणत आहोत. जैन जगला तर जैन धर्म जगेल हे आम्हाला कधी प्रतीत होणार ? आमचे डोळे कधी उघडणार ?' या लेखात पुढे परीक्षा प्रधान जैन धर्म .... सिद्धांत काय आहे ? समतावादी धर्म .... नेत्यांची हौस अशा अनेक मुद्यांचे विस्तृत विवेचन केले आहे.

सौ. प्रेमलता गुंडे यांनी (७ फेब्रुवारी १९८९)[१४४] 'उपेक्षित जैन इतिहास' यावर संपादकीय लिहिले आहे की, जैन धर्म हा बौद्ध धर्मातून उदयास आला असा गैरसमज इतिहासकारांनी निर्माण केला. जैन इतिहास हेतूपुरस्कर दडवण्यात आला, त्यामळे जैन इतिहासाचे भान जैन धर्मियानांही उपलब्ध नाही. याबाबत सभेने समाजातील विद्वान अधिकारी व्यक्तींशी संपर्क साधून जैन धर्माच्या राजकीय इतिहासाचे संशोधन करून वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्याची योजना सत्वर हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे.

वासंती शहा यांनी 'मूर्तीची प्राणप्रतिष्ठा .... मूर्तीवर संस्कार ही केवळ कवि कल्पना' या (२१ फेब्रुवारी १९८९)[१४५] च्या लेखात प्रत्येक वर्षी किमान दहा वीस तरी पंचकल्याणिके भारतात होत असतात. एक प्रकारचा धर्मोत्सव मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या निर्मित्तातून जैन समाजामध्ये केला जातो. हे कितपत योग्य आहे. याविषयी विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, 'मूर्तीची

प्राणप्रतिष्ठा करण्याची कल्पना व तिचा क्रियाविधी निरिश्वरवादी जैन धर्मामध्ये नाही. जैनधर्म शास्त्र हे सिद्धांत शास्त्र आहे. षट्वस्तुंच्या स्वरूपाचे विवेचन करणारे विज्ञान शास्त्र आहे. प्रत्येक जीवात्मा हा भावी परमात्मा हा सिद्धांत मांडणारा केवली प्रणित धर्म आहे. मूर्ती ही साधनेसाठी प्रतिक म्हणून उपयोगी आहे'. पुढे त्या मिस्कीलपणे आणि मार्मिकपणे म्हणतात की, 'जिथे माणसावर लवकर संस्कार होत नाहीत तिथे जड मूर्तीवर संस्कार कसे काय होणार ?' म्हणून ही कल्पना 'कवि कल्पना' असे त्यांना वाटते. पुढे धाडसीपणाने त्या विधान करतात की, 'मूर्तीच्या अवलंबनातून खुद्द मुनीच मुक्त झाले नाहीत तर ते आपल्या अनुयायांना आपले धर्म नेतृत्व मानणाऱ्या भाविकांना कोणता वेगळा उपदेश करणार ? मूर्तीची प्रतिष्ठापना केल्याने आणि विधिविधाने केल्याने महापुण्य मिळते ही मिथ्या कल्पना आमच्या त्यागी आणि भट्टारकांनीच समाजमनात रुजविली आहे ?'

(२१ मार्च १९८९)[१४६] वासंती शहा यांनी 'आजकाल प्रतिष्ठेचे उद्दिष्ट कोणते ? ' या लेखात परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. समाज म्हणजेसुद्धा निसर्गाचाच एक भाग अर्थातच तो ही परिवर्तनीय आहे. परिवर्तनाशिवाय प्रगती नाही. या विषयीच्या आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या म्हणतात, 'समाजामध्ये कालानुरूप परिवर्तनाची प्रकिया सतत चालू राहिली पाहिजे. रूढी निष्ठा व अंधानुकरण यांचा समाजातील विचारवंतांकडून नेहमी निषेध होत राहिला पाहिजे आणि, 'आज गरज कशाची आहे ?' हे त्यांनी लोकांच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे. तरच समाज प्रगतीपथावर राहू शकेल'. पुढे .... गरजेप्रमाणे बदल .... गरज हाच धर्म .... संस्कृतीची प्रतिके .... इतक्या मूर्ती कशाला ? स्थापना कशी करावी ? या मुद्यांवर प्रकाश टाकला आहे.

'वधूवर' मेळाव्याची उपयुक्तता व सामाजिक गरज' यावर संपादकीय (४ एप्रिल १९८९)[१४७] सौ. प्रेमलता गुंडे यांनी लिहिले आहे. तर 'विज्ञान युगातही अंधश्रद्धा दिसते' याबद्दल खेद अंधश्रद्धा या लेखात (२ मे १९८९) व्यक्त केला आहे. मूक प्राण्यांच्या कत्तली, बुवाबाजी, गंडे दोरे ताईत, अंगात येणे, सती जाणे आदि मुद्यांवर भाष्य केले आहे.

स्त्री शिक्षणातील योगदानाबाबत श्रीमती लिलावती सावनाप्पा, दुग्गे यांचे नाव आदराने घेतले जाते. लग्नानंतर सासरच्या घरी न जाता सरळ सांगलीच्या श्राविकाश्रमात शिक्षणाला सुरूवात करुन, नंतर पुण्यात कर्व्यांच्या संस्थेत पदवी संपादन करून तेथून निपाणी सारख्या जरा वेगळ्याच ठिकाणी

मुलींच्या शिक्षणासाठी कन्या शाळा (१९३८) सुरू करून लिलावती दुग्गे यांनी पतीच्या पाठिंब्याने कार्यास सुरूवात केली.

'संघर्ष : एक मुक्त चिंतन' या लेखात (६ जून १९८९)[१४८] लिलावती दुग्गे म्हणतात की, संघर्ष हा शब्दच जीवघेणा आहे. कमालीच्या स्वार्थामुळे संघर्ष पेटतो अशा संघर्षाने कुटुंब मोडकळीस येते. जीवनाच्या सर्व क्षेत्रात ही वृत्ती बळावली असून कष्ट करण्याची जरुरीच भासत नाही. समाजात, शिक्षण संस्थेत सगळीकडे संघर्ष आणि नीतीमूल्यरहित जीवनावस्था असल्यानंतर शेवट काय होणार आहे ? सर्व नाश ! वस्तुस्थितीतून आलेली निराशा त्यांनी व्यक्त केली आहे.

'स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेते म. गांधी' या गांधीजयंती निमित्त (१० ऑक्टोबर १९८९)[१४९] सौ. प्रेमलता गुंडे यांनी लिहिलेल्या लेखात गांधीजींनी स्त्रियांना दिलेल्या समानतेविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्या म्हणतात, 'गांधीजींच्या आदेशामुळे भारतीय स्त्रीने निर्भयतेने स्वातंत्र्य लढयात भाग घेतला. एक प्रकारे भारतीय स्त्री ची मुक्तीच ही ! गांधीजीच्या मते स्त्री ला अबला म्हणणे तिची बदनामी होय'. ते म्हणतात, मी स्त्रीच्या जन्माला आलो असतो तर, 'स्त्री ही आमच्या हातचे खेळणे बनण्याकरीता जन्माला आली आहे'. या पुरुषी अहकाराविरुद्ध बंड पुकारले असते. सौ. गुंडे पुढे म्हणतात, 'ज्या समाजात स्त्रीवर अन्याय होतो तो समाज प्रगती साधू शकत नाही. स्त्री स्वातंत्र्याचे म. गांधींनी केलेले महनीय कार्य, ही आधुनिक भारताच्या वाटचालीतील शक्ती आहे'.

'वधू-वर मेळावे आजची सामाजिक गरज' या विषयावर (६ फेब्रुवारी १९९०)[१५०] संपादकीय सौ. प्रेमलता गुंडे यांनी लिहिले तर कु. प्रतिभा मलगोंडा पाटील, अक्कोळ (२० फेब्रुवारी १९९०) यांचा 'सांप्रत दिगंबर जैन समाजाचे राजकीय भविष्य' हा निबंध स्पर्धेमधील तृतीय क्रमांकाचा निबंध प्रसिद्ध केलेला आहे. जैन समाज, त्यातील छोटे, मोठे पंथ, राज्यकर्ते, मतदार, वीर सेवा दल, सांस्कृतिक कार्यक्रम, महाराज वगैरे मुद्यांवरून विवेचन केले आहे. शेवटी 'समाजातील तरुण पिढी जर समाज कार्याच्या दिंडीत सहभागी झाली तर जैनांचे राजकीय भवितव्य उज्ज्वल होईल' असा आशावाद प्रगट केला आहे.

'मन वढाय वढाय' या (७ ऑगस्ट १९९०)[१५१] लेखात सौ. सुरेखा कोगनोळे यांनी तर 'आम्ही म्हातारे का होतो ?[१५२]' या लेखावरून सौ. अनुराधा गडेण्णावर यांनी आपले विचार मांडले आहेत.

(४ सप्टेंबर १९९०)[१५३] वासंती शहा यांनी 'तत्त्वशून्य क्रियाविधीच्या पसाऱ्यात जैन धर्माचा आत्माच हरवला आहे.' या लेखात अंधश्रद्धेत लोक कसे गुरफटतात यावर प्रकाश टाकला आहे. त्या म्हणतात, 'अलीकडच्या पंधरा वीस वर्षांत विधी-विधानांचे प्रमाण किंवा प्रस्थ फार वाढले आहे. हजारो लाखो रू. खर्चाची विधाने मोठया संख्येने होऊ लागली आहेत. याचे कारण समाज दैववादी व अंधश्रद्धा बनला आहे. विवेकहीन आणि लोभी बनला आहे. मृत व्यक्तीच्या नावाने सुतक, श्राद्ध अशा अशास्त्रीय रूढी विज्ञानवादी धर्मामध्ये नाहीत. सुतकात निष्क्रियतेने दिवस घालवण्यात आपण बहुमूल्य वेळ घालवतो. कर्म दहनाने कर्म दहन होत नाही या सर्व मिथ्या कल्पना आहेत. यापासून लाभ मृताला नाही पंडिताला होतो आहे.' एकूणच अशा क्रियाकांडात धर्माचा आत्मा हरवल्याचा विशाद व्यक्त करुन समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

'कल्पद्रुम आराधना महोत्सवाचे फलित' असे संपादकीय लेखन सौ. प्रेमलता गुंडे यांनी (६ नोव्हेंबर १९९०)[१५४] च्या अंकात लिहिले आहे. तर याच अंकात कु. छाया शहा यांनी 'खरा तो एकची धर्म' यावर आपले विचार मांडले आहेत. दुसऱ्याची सेवा करणे हाच खरा धर्म यावर आपले विचार मांडले आहेत. फक्त देवाचे दर्शन घेतल्याने, स्वाध्याय वाचल्याने पुण्य मिळते असे नाही तर तसे आचरण केल्याने पुण्य मिळते, असे विचार व्यक्त केले आहेत.

सौ. अनुराधा गडेण्णावर या 'जैन धर्म व निसर्ग' या (११ डिसेंबर १९९०)[१५५] लेखात म्हणतात, 'जैन धर्म हा पूर्णत: अहिंसा तत्त्वावर आधारित असून तसा तो जगत आला आहे. जैन समाज हा पापभिरू, संयमी, त्यागी, परोपकारी असल्याने एखाद्याला विनाकारण दुखावणेही तो हिंसाच समजतो. निसर्गाकडेही या दृष्टीनेच बघतो आणि एक प्रकारे निसर्ग रक्षण आणि संवर्धन करतो.'

'मराठी जैन साहित्य संमेलनाच्या' निमित्ताने सौ. प्रेमलता गुंडे यांनी (१ जानेवारी १९९१)[१५६] लिहिलेल्या लेखामध्ये सांगली येथे संपन्न झालेल्या जैन साहित्य संमेलनाचा वृत्तांत, संमेलनाची गरज आणि संमेलनाची फलश्रुती वगैरेवर आधारित आपले विचार मांडले आहेत. तर जनगणनेबाबत जैन धर्मियांची जबाबदारी या संपादकीय लेखात जनगणनेच्या माहिती पत्रकात धर्म 'जैन' असे स्पष्ट लिहिण्यासंबंधीचे आवाहन केले आहे.

'जग विनाशाच्या उंबरठयावर' या लेखात (५ फेब्रुवारी १९९१)[१५७] च्या अंकात सौ. प्रेमलता गुंडे यांनी इराक कुवेत युद्धाच्या पार्श्वभूमीवर युद्ध, युद्धाचे परीणाम वगैरेचे विवेचन करुन अहिंसक गरजेची आवश्यकता यावर आपले विचार मांडले आहेत. तर 'ग्राहक संरक्षण' या सामाजिक जबाबदारीच्या विषयावर (५ मार्च १९९१)[१५८] संपादकीय लिहिले आहे.

'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' या (२ जुलै १९९१)[१५९] च्या सौ. अनुराधा गडेण्णावर यांनी खरा धर्म कोणता, यावर आपले विचार मांडले आहेत. नोबेल पारितोषिक प्राप्त मदर तेरेसांचा धर्म, डॉक्टरांचा धर्म, शिक्षकांचा, साने गुरुजींचा धर्म हा खरा माणसाचा धर्म असल्याचे, समाज सेवेचा धर्म असल्याचे प्रबोधनात्मक विचार मांडून समाजाच्या जाणीवा प्रगल्भ करण्याचा प्रयत्न केला आहे.

स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या ही चांगलीच गोष्ट पण (६ ऑगस्ट १९९१)[१६०] च्या अंकात सौ. अनुराधा गडेण्णावर म्हणतात, 'सधन स्त्रियांनी नोकरी करणे गरजेचे आहे काय ?' त्यांना वाटते जास्त स्त्रिया नोकरी करू लागल्यामुळे तरुणांची बेकारी वाढू लागली आणि त्यामुळे बेकार तरुण व्यसनी बनू लागले. त्यासाठी त्यांनी सल्ला दिला आहे की, 'किमान सधन स्त्रियांनी तरी गरीब हुशार गरजू तरुणांचा विचार करावा. त्यांनी सामाजिक कामे करावीत. कला गुणात प्राविण्य मिळवावे. नृत्यनाटय, चित्रकला, हस्तकला, शिवण काम वगैरे गोष्टीत रस घेऊन त्यात प्रगती करावी'.

वासंती शहा यांनी शिथिलाचारी मुनीं विरोधी जनजागरण करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आढळतो. असाच पुन्हा एक प्रयत्न त्यांनी 'अशाच भवितव्याची आम्हाला प्रतिक्षा आहे काय ?' या लेखात (२० ऑगस्ट १९९१)[१६१] केला आहे. त्या म्हणतात, 'मुनींनी धर्मशाळेला घर बनवले आहे. असेच होत राहीले तर जैन धर्माचा लोप होईल .... अशाच भवितव्याची आम्हाला प्रतिक्षा आहे का ?' त्यासाठी 'आमच्या सामाजिक जाणीवा विस्तारल्या पाहिजेत.' असा लेख (१७ सप्टेंबर १९९१)[१६२] लिहून धर्माच्या अनुयायांना सावध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या म्हणतात, 'धर्म हा व्यक्तीचा निजीभाव आहे. धर्माचा उदय व्यक्तीच्या अंत:करणात होतो, सम्यक दर्शन, ज्ञान चरीत्र या आत्मिक गुणांचा विकास व्यक्तिगत तपश्चर्येने होतो. म्हणून धर्माचा केंद्रबिंदू व्यक्ती आहे. परिग्रहप्रमाण व्रताची योजना सामाजिक जाणीवांच्या विस्तारासाठी आहे. आपल्या प्राप्तीचा काही

भाग सामाजिक हितासाठी राखून ठेवला तरच समाजाचे रक्षण होईल. जैन धर्म हा विश्व धर्म आहे. अशा केवळ घोषणा करून काही साधत नाही. त्यासाठी विश्वाचा विचार करायला पाहिजे. एखाद्या धर्माचे अनुयायी कसे वागतात, यावरून त्या धर्माविषयी लोक आपले मत बनवत असतात हे आपल्या लक्षात घेतले पाहिजे.'

सौ. प्रेमलता गुंडे (१ ऑक्टोबर १९९१)[१६३] च्या संपादकीय लेखामध्ये सौ. प्रेमलता गुंडे 'जैन धर्माचा आधुनिक अविष्कार म्हणजे गांधीवाद ! गांधींनी आपले तत्वज्ञान जैन धर्माच्या चिरंतन मूल्यांवर आधारीत असल्याने जैन धर्मियांनीही आपल्या धर्माचे आचरण निष्ठेने करावे, म्हणजे गांधीवादाच्या तत्त्वज्ञानाला वंदन केल्यासारखे होईल.असे विचार मांडून गांधींना मानवंदना दिली आहे. तर (१९ नोव्हेंबर १९९१)[१६४] च्या अंकात वासंती शहा यांनी 'समाजाला आता सुयोग्य व खंबीर नेतृत्वाची गरज' असल्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. मुनी मुनींचे चारीत्र्य, साधूंना बहकवणारे समाज नेते, कार्यकर्ते या सर्वांमुळे जैन धर्मसंघाचा तोल ढासळू लागला आहे. तो सांभाळण्यासाठी दक्षिण भारत जैन सभेने पुढाकार घ्यावा.' असे आवाहन वासंती शहा यांनी केले आहे.

व्ही. सी. आर. वर सिनेमा बघण्याच्या फोफावल्या प्रवृत्तीवर नाराजी व्यक्त करून त्याला विरोध करण्यासाठी 'सावधान ! व्ही. सी. आर. एक भूत' नावाचा लेख (२६ नोव्हेंबर १९९१)[१६५] च्या अंकात लिहिला आहे, तर (३ डिसेंबर १९९१)[१६६] सौ. सुनिता जर्दे यांनी 'संध्याछाया' या लेखात मानवी जीवनाच्या अवस्थांचे विवेचन करून त्या संबंधी विचार मांडले आहेत की, वृद्ध म्हणजे चालता बोलता आशीर्वाद, अनेक वर्षांचे गाठोडे त्यांच्या जीवनासंबंधी लेख लिहून वृद्धांबद्दलचा आदर व्यक्त केला आहे.

प्रा. सौ. नीलम पाटील यांनी 'आहेर एक पुनर्विचार' या लेखात आहेराचे, भेटवस्तूचे स्वरूप आता बदलले पाहिजे असे (१२ मे १९९२)[१६७] सांगतात. त्याऐवजी इच्छेप्रमाणे बंद पाकीटातून रक्कम देणे त्यांना योग्य वाटते. कारण त्यामुळे यजमानांना तो पैसा गरजेप्रमाणे खर्च करता येतो. शिवाय अनावश्यक आलेल्या भेटींचा त्रासही वाचतो. कविता आणि सविता या दोघींच्या संवादावरून हे विचार अधिक स्पष्ट केले आहेत.

(४ ऑगस्ट १९९२)[१६८] सुरेशा शहा यांनी गांधानाथारंगजी दिगंबर जैन जन मंगल प्रतिष्ठान आचार्य कुंदकुंद पुरस्कार वितरण समारंभ, दिल्ली येथील वृत्तांत मांडला आहे. (८ सप्टेंबर १९९१)[१६९] 'अहिंसा' लेखात प्रा. सुनिता जर्दे यांनी भारतीय मूल्यांचा विचार मांडला आहे.

'उद्ध्वस्त होणारी कुटुंबे' या (६ ऑक्टोबर १९९२)[१७०] च्या लेखात सौ. जोत्स्ना जैन, पुणे यांनी आपले विचार मांडले आहेत की, विवाह करणे सोपे पण वैवाहिक जीवन जगणे अवघड. एका उदाहरणावरून विचार पटवला आहे. प्रा. सौ. शशिकला चौगुले यांनी (१० नोव्हेंबर १९९२)[१७१] 'साहित्य साधना, एक चिंतन' मध्ये म्हणतात, 'पोटाच्या भूके इतकीच बुद्धीची भूक महत्त्वाची असते. त्यासाठी साहित्य हवे.' पुढे साहित्य, साहित्याचे प्रकार, प्रसिद्धीमाध्यमे, तरुणांसाठी व्यासपीठ वगैरे मुद्यांवर विचार मांडले आहेत. तर डॉ.सौ.नयना धनंजय पाटील यांनी (८ डिसेंबर १९९२)[१७२] 'सार्थक करूया जगण्याचे' या लेखात कालबाह्य झालेल्या निरर्थक आणि बुरसटलेल्या विचारासंबंधी विचार मांडून अनेक नात्यात माणूसपणाचे नाते श्रेष्ठ असल्याने नव्या दमात नवे गीत गायचे आवाहन केले आहे. तसेच त्यांनीच 'साहित्याचे अभिसरण' या (२२ डिसेंबर १९९२)[१७३] च्या लेखात साहित्य, संगीतकले शिवाय कुठलेही जीवन उन्नत करता येणार नसल्याचे सांगितले आहे. तसेच घर कामात अडकलेली स्त्री, तिची घुसमट, वाचनाच्या व्यासंगाची कमतरता आदी मुद्यांवर प्रकाश टाकला आहे.

'एक जन्म सुंदर जीवनासाठी' या वैचारिक लेखात डॉ. सौ. नयना पाटील यांनी
(१६ फेब्रुवारी १९९३)[१७४] स्त्रियांनी जीवन विकासाच्या अत्युच्च पदाकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन केले असून विविध कलांच्या अभ्यासाने साहित्य, संगीतकला यांच्या व्यासंगाने जीवनाचा विकास होतो असे सांगितले आहे.

'सुख शांतीचा मूलमंत्र' (६ जुलै १९९३)[१७५] च्या प्रा. सौ. सुनिता जर्दे यांनी या लेखात अहिंसा, संयम, त्याग असे विचार मांडले असून सौ. शुभदा शशीकुमार पाटील, नवी दिल्ली यांनी 'नवी दिल्ली येथील अहिंसा संमेलनाचा' वृत्तांत (२८ सप्टेंबर १९९३)[१७६] सादर केला आहे.

'जैन विवाहाच्या रूढीपरंपरा रीतिरिवाज आजच्या काळात योग्य आहेत का ?' यावर (२३ जानेवारी १९९७)[१७७] सौ. मंगला कोठारी यांनी विवेचन केले आहे. मोक्षाचा आधारक श्रावक कसा असतो ? यावर (३ एप्रिल १९९७)[१७८] सौ. लिलावती सुमेरचंद जैन यांनी विवेचने केले आहे.

असा श्रावक मद्य, मांस व्यसने, कुशील व परिग्रह यांचा तिरस्कार करतो. त्याच्यापासून सुख नाही हे जाणतो. तो मोक्षाचा आराधक असतो .... अशा प्रकारचे विचार मांडले आहेत.'

डॉ. सौ. नयना पाटील यांनी काटकसर या लेखामध्ये पाण्याच्या दुर्भिक्षाबद्दल (४ डिसेंबर १९९७)[१७९] च्या अंकात आपले विचार मांडले आहेत. पाणी म्हणजे जीवन पण आज पाण्याचा दुष्काळ सर्वत्र दिसून येतो. पाण्याची काटकसर कशी करावी, यावर मार्गदर्शन केले आहे.

'२१ व्या शतकाच्या उंबरठयावर जैन स्त्रिया' या लेखात (६ ऑगस्ट १९९८)[१८०] डॉ. सौ. पद्मजा पाटील यांनी उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील समाजाचे विवेचन करून आजच्या स्त्रिया शिकल्या पण कुठे फरक पडला आहे ? असा प्रश्न विचारला आहे.

सौ. सरोज खोत, रुकडी 'विचार मंथन' (२६ डिसेंबर १९९८)[१८१] मध्ये 'विनाशाकडे का वाटचाल होत आहे ?' या विषयी विचार मांडताना घर, घरातले वातावरण, संस्कार, टि. व्ही., केबल, गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे.

८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'दक्षिण महाराष्ट्रातील जैन स्त्री शिक्षण .... मागोवा' असा एक अभ्यासू दृष्टिकोनातून प्रा. सौ. सुमन चौधरी यांनी (१७ मार्च २०००)[१८२] मध्ये लेख लिहिला आहे. १९४१ च्या स्त्री शिक्षणापासून २००० पर्यंत स्त्रीच्या शिक्षणातील चढउतार, झालेली प्रगती आणि सर्व प्रवाहात सौ. गोदुबाई उपाध्ये, कळंत्रे आक्का, लिलावती दुग्गे यांच्या अथक परिश्रमाचा मागोवा घेतला आहे.

(२७ ऑक्टोबर २०००)[१८३] सौ. विभावरी दोशी, कोल्हापूर या 'बदलत्या काळातील व्रत संकल्पना' या लेखात म्हणतात, 'बदलत्या विश्वानुसार आपले राहणीमान बदलले पाहिजे. त्याला अनुरूप व्रतांचे पालन केले पाहिजे. चांगले काम करणे आणि वाईट काम सोडणे याला व्रत म्हणता येईल. जैन समाज संघटित राहण्यासाठी प्रत्येकाने एकतेचे व्रत अंगिकारले पाहिजे. 'मी' च्या पलीकडे समाजाचेही एक विश्व आहे, हे जाणण्याची व बघण्याची दृष्टी जागृत करून त्याचप्रमाणे पालन करण्याचे व्रत अंगिकारले पाहिजे'.

जयसिंगपूर येथे झालेल्या एका वक्तृत्व स्पर्धेचे नीलम माणगावे यांनी (५ ऑक्टोबर २००१)[१८४] 'समालोचन' केले आहे. या स्पर्धेसाठी, भारतीय स्त्री काल, आज, उद्या, बेरोजगार कारणे आणि उपाय, २१ व्या शतकात साधुसंतांची गरज, चारित्र्यसंपन्न नागरिक काळाची गरज,

विद्यार्थी आणि राजकारण आणि आजचा शेतकरी असे विषय असून एकूण ४४ स्पर्धकांनी भाग घेतला. त्यापैकी 'भारतीय स्त्री, काल, आज, उद्या' या विषयावर २१ स्पर्धकांनी आपले विचार मांडले. म्हणजे २१ व्या शतकात तरुणतरुणींनी घेतलेली भारतीय स्त्री स्थित्यंतराची नोंद म्हणजे आशेची नवी ज्योतच म्हणावी लागले.

'काटकसर' मध्ये पैशाची काटकसर कशी करावी या बद्दलचे मार्गदशर्दन (२८ डिसेंबर २००१)[१८५] मध्ये सौ. वनिता पाटील, कोल्हापूर यांनी केले आहे. तर (१२ एप्रिल २००२)[१८७] प्रगती आणि जिनविजयचा शंभर वर्षांतला थोडक्यात आढावा सौ. प्रेमलता गुंडे यांनी 'प्रगती आणि जिनविजयची गतीशील वाटचाल' या लेखात घेतला आहे. शेवटी त्या म्हणतात, 'जैनधर्मीय समाज हा शिक्षण, शेती, व्यापार आदि उद्योग क्षेत्रात प्रगतीशील आहे. तथापी जैनधर्मियांची मानसिक एकता अद्यापी असावी तितकी मजबूत झालेली नाही, ती होणे ही शतकाची गरज आहे.'

## २.११ निष्कर्ष :-

१) एका जैन सद्गृहस्थांनी १९५७ साली काढलेले उद्गार (सौ. सुलोचना भोकरे यांच्या 'आठवणी' लेखातून ) ही स्त्रियांसाठी खूप लाजिरवाणी गोष्ट ठरेल. " स्त्रिया काय लिहिणार आहेत ? त्याना काय जमणार आहे ? लिहिणे म्हणजे काही खेळ नाही!" या उद्गाराला जैन लेखिकानी तोडीस तोड उत्तर दिले आहे. वैचारिक लेख लिहिण्यात स्त्रिया कुठेही कमी पडल्या नाहीत.

२) लेखिकांनी अनेक विषयात भरभरून विविधांगी लेखन केलेले आहे. हे लेखन वाचून थक्क झाल्याशिवाय आपण राहात नाही. अतिशय सूज्ञपणे नेहमीच्या आघाडीच्या लेखिकांनी लेखन केलेच आहे. पण त्याशिवाय नुकत्याच लिहिणाऱ्या नवीन लेखिकांनी सुध्दा आपले विचार ठामपणे मांडले आहेत.

३) समाजाच्या कर्मकांडावर, चुकीच्या धार्मिक परंपरेवर या लेखिकांनी मोठया आत्मविश्वासाने लेखन केले आहे.

४) वैचारिक लेख लिहिताना पत्ररूपाचे माध्यमसुध्दा वापरण्यात आलेले आहे. जैन लेखिकांची कल्पकता इथे दिसून येते. वाचकांशी संवाद साधणारे, आठवणी सांगणारे, स्पर्धेचे आवाहन

करणारे... इ. लेख कदाचित वैचारिकमध्ये बसणारे नसतील. पण या प्रत्येकामध्ये लेखिकांनी कोणता ना कोणता तरी विचार मांडलेला आहे. म्हणून त्यांचा समावेश वैचारिकमध्ये केलेला आहे.

५) " सांगा स्त्रिया कशात कमी आहेत?" असे म्हणत स्त्री सार्मथ्याचा आरसाच १९३४ साली एम. ए. झालेल्या सरलाबाईनी धरला आहे. विवाहानंतर स्त्री कशी पाहिजे यावरही विचारमंथन झालेले आहे. परंपरागत रुढीला चिटकणाऱ्याची वृत्ती अजूनही बदलत नाही हे वास्तव सत्य समोर येते. सौ. सुलोचना भोकरे यांचा परखडपणा मनाला भावून जातो.

६) जैन समाज जिवंत आहे काय? सामान्य जनतेचा गैरसमज करून काय मिळाले ? जैन समाज जागृत आहे काय? आमची दिशा कोणती? असे सडेतोड प्रश्न विचारुन लेखिकानी समाजाला जणू मुळापासून हालविण्याचे आणि हादरविण्याचे काम केलेले आहे. 'शेतकऱ्यानो हे वाचा' म्हणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना जनावरांच्या बद्दलची बारीक सारीक माहिती दिलेली आहे. शेतकऱ्यांना खूप उपयोगी पडणारा लेख आहे.

७) सौ. सुलोचना भोकरे, सौ. वासंती शहा, प्रा. सौ. लीलावती जैन, डॉ. विजयालक्ष्मी पांगळ यानी दांभिक, दुटप्पी समाजावर आसूड ओढले आहेत. समाजाला जणू उभे आडवे झोडपण्याचे काम केलेले आहे. आपली धारदार लेखणी एखादया योद्ध्यासारखी समाजहानिकारक व धर्म संस्कृतीला बाधक असणाऱ्या गोष्टीवर केलेली आहे. डॉ. विजयालक्ष्मी पांगळ व वासंती शहा यांचे लेख संशोधनपर आहेत.

८) विजया देवेन्द्राप्पा, पं. सुमतीबाई शहा, सहसंपादिका सौ. प्रेमलता गुंडे, सौ. सुमन चौधरी, सौ. शरयू दफ्तरी, डॉ. सौ. नयना पाटील, डॉ. सौ. पद्मजा पाटील या आघाडीच्या लेखिकांनी चौफेर लेखन केलेले आहे. कु. कुमुदिनी रोकडे यांचे धाडसी आणि परखड व्यक्तिमत्व त्यांच्या लेखनातून जाणवते. एखादा दुसरा लेख लिहिणाऱ्या लेखिका तर अनेक आहेत. या सर्वानी मिळून वैचारिक लेखन समृध्द केलेले आहे.

९) त्यागी स्त्रियांनीही आपले वैचारिक योगदान दिलेले आहे. विशालमती आम्मा, जिनदेवी माताजी, भरतमती माताजी सारख्या त्यागींनीही आपले समृध्द लिखाण 'प्रगती आणि जिनविजय' च्या माध्यमाने समाजाला बहाल केलेले आहे.

१०) अकबर आणि जैन धर्म, जैन आणि जैनाचरण, जैन आणि धर्म, जैन समाजाची एकता, वर्त मानपत्रे व जैन समाज, जैन धर्मसंस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान... यासारख्या लेखातून समाजाच्या डोळयात अंजन घालण्याचे काम लेखिकांनी केलेले आहे. जैन समाज कुठे आहे ? ते कुठे असायला हवे ? त्यासाठी काय करायला हवे ? आणि काय सोडायला हवे ? याविषयी लेखिकांनी केलेले मंथन म्हणजेच जैन जीवनाची जगण्याची दिशा... दशा... वास्तवता आणि आदर्श यांचा मांडलेला आलेखच आहे.

११) एकूणच जे चांगले आहे त्याचे कौतुक आहे. पण या लेखिकांचे प्रयत्न त्यांची आस... धडपड... आंतरिक तळमळ या वैचारिक लेखातून मांडण्याचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. २० व्या शतकातल्या स्त्रिया २१ व्या शतकापर्यंत हळूहळू बदलत गेल्या. ठामपणे आपली मते मांडू लागल्या. विचार करायला लागल्या ही एक प्रकारची वैचारिक प्रगल्भताच म्हणावी लागेल.

## २.१२ संदर्भ टीपा

१) तर्खडकर दादोबा पांडुरंग : वैचारिक मराठी भाषेचे व्याकरण, मुंबई, तृतीयावृत्ती, १९५७, पृ. ९ व १०.

२) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध : उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २२.

३) तत्रैव : पृ. २७.

४) देशमुख मा. म. : राष्ट्र निर्माते, शिवभारती प्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९२, पृ. ३.

५) चंदनशीव भास्करतत्रेव, पृ. ९८.

६) तत्रैव : पृ. १२.

७) फडके (डॉ.) य. दि. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ६७.

८) तत्रैव, खंड ६, पृ. ४७१.

९) तत्रैव : पृ. ४८२.

१०) आगरकर गोपाळ गणेश : आगरकर वाङ्मय खंड १, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९८४, पृ. ७.

११) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध उद्‌गम आणि विकास, प्रथमावृत्ती २००९, पृ. १९०.

१२) देशपांडे सुनंदा : गोपाळ गणेश आगरकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८३, पृ. ४०.

१३) तत्रैव : भाग ८, पृ. २५ व २६.

१४) खांडेकर वि. स. : प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण, १९९३, प. २७४.

१५) कोल्हटकर अ. ब. : अच्युतराव कोल्हटकर स्मारक, ग्रंथ भाग १, प्रकाशन : संपादक अनंत हरि गद्रे, मुंबई, प्रथमावृत्ती १९३३, पृ. २१६.

१६) तत्रेव : पृ. २१.

१७) फडके (डॉ.) य. दि. : केतकर लेखसंग्रह, डॉ. श्री. व्यं. केतकर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, १९७७, प्रस्तावना, पृ. ११.

१८) अळतेकर (डॉ.) म. मा. : तत्रेव, पृ. २०७.

१९) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध उद्‌गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २२५.

२०) ताटके अरविंद : सांधक सप्तर्षि, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६२, पृ. ४२.

२१) तत्रैव : पृ. २.

२२) तत्रैव : पृ. १०५.

२३) कीर धनंजय : म. जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९६, पृ. २६२.

२४) तत्रैव : अंक १३ वा, १ एप्रिल १८९४, पृ. २.

२५) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध : उद्‌गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २६१.

२६)तत्रैव : पृ १७० (१४).

२७) तत्रैव : पृ. १२९ (३).

२८) डॉ.आंबेडकर बाबासाहेब : तत्रैव, पृ. २०७ (५).

२९)  तत्रैव : पृ. २०८ (६).

३०) डॉ.मोरे गिरीश, 'मराठी निबंध उद्गम आणि विकास', प्रथमावृत्ती, २००९, पृ. २७५.

३१) सौ. नाईक सरलाबाई , 'स्त्रियांचे कार्यक्षेत्र',, प्रगति आणि जिनविजय, २२ मे १९३४.

३२) जुनुनकर लिलावती, 'सोवळे पुराण', प्रगति आणि जिनविजय, २६ जून १९३४.

३३) पं.शहा सुमतीबाई ,'महिला वाचनालय', प्रगति आणि जिनविजय, ११ सप्टेंबर १९३४.

३४) सौ.भोकरे सुलोचना, 'ही अनंतमती लेखिका कोण?', प्रगति आणि जिनविजय, ६ नोव्हेंबर १९३४.

३५) कु.बोवडे शकुंतला, 'एका दिवसात लग्न', प्रगति आणि जिनविजय, १६ जुलै १९३५.

३६) जुनुनकर लिलाताई , 'वडील माणसांची शिकवणूक', प्रगति आणि जिनविजय, ३० जुलै १९३५.

३७) जुनुनकर लिलाताई , 'लग्न की विघ्न ?', प्रगति आणि जिनविजय, ५ नोव्हेंबर १९३५,

३८) सौ.महाजन रत्नप्रभा, 'सुधारलेले लग्न', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर १९३५.

३९) कु. गांधी शकुंतला नानचंद, 'पोटाचा प्रश्न', प्रगति आणि जिनविजय, ३ डिसेंबर १९३५.

४०) सौ. भोकरे सुलोचना, 'चांदणीत तूप', प्रगति आणि जिनविजय, ३१ डिसेंबर १९३५.

४१) मगदूम उषादेवी ,'महावीर जयंती' , प्रगति आणि जिनविजय, ९ जुलै १९४१.

४२) कु.शहा कांता , 'विचार तरंग', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर १९४१.

४३) सौ.भोकरे सुलोचना, 'आंतरजातीय विवाहार्थ तीन सूचना', प्रगति आणि जिनविजय, १७ डिसेंबर १९४१.

४४) सौ.भोकरे सुलोचना, 'वैवाहिक जीवन व समाज कार्य', प्रगति आणि जिनविजय, ११ फेब्रुवार १९४६.

४५) कु.रोकडे अंजनीताई, 'जैन समाज जिवंत आहे का?', प्रगति आणि जिनविजय, ११ मे १९४८.

४६) सौ. भोकरे सुलोचना, 'श्री. आचार्यश्री ची दिव्यवाणी', प्रगति आणि जिनविजय, ८ ऑगस्ट १९५५.

४७) सौ.पाटील सुमन , 'शेतकऱ्यांनो हे वाचा', प्रगति आणि जिनविजय, २४ ऑक्टोबर १९५५.

४८) सौ.शहा चंचलाबाई, 'काही तरी करा', प्रगति आणि जिनविजय, २१ नोव्हेंबर १९५५.

४९) सौ.भोकरे सुलोचना, 'स्व. वालचंद शेठजी यांची आठवण', प्रगति आणि जिनविजय, १५ एप्रिल १९५७.

५०) नायर कुसुम , 'स्वातंत्र्याची फळ', प्रगति आणि जिनविजय, १३ ऑगस्ट १९५७.

५१) सौ.भोकरे सुलोचना, 'आठवणीतले लेख', प्रगति आणि जिनविजय, १४ ऑक्टोबर १९५७.

५२) सौ.भोकरे सुलोचना , 'वाचकांच्या पत्रव्यवहारात', प्रगति आणि जिनविजय, १ सप्टेंबर १९५८.

५३) सौ. भोकरे सुलोचना, 'महर्षि कर्वे व सौ. कर्वे सांगली आश्रमात आले तेव्हाच्या आठवणीवर लेख', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९५८.

५४) सौ. भोकरे सुलोचना, 'स्वामींचा आशिर्वाद', प्रगति आणि जिनविजय, ७ सप्टेंबर १९५९.

५५) सौ. भोकरे सुलोचना , 'स्मृती', प्रगति आणि जिनविजय, ५ ऑक्टोबर १९५९.

५६) सौ. भोकरे सुलोचना, 'पुनश्च सूचना', प्रगति आणि जिनविजय, १९ ऑक्टोबर १९५९.

५७) कु.हुळबत्ते माणिक , 'साहित्यकार आणि सदाचार', प्रगति आणि जिनविजय, ७ मार्च १९६०.

५८) सौ.शहा चंचलाबाई, 'लोकमान्यांचे अमृततुल्य बोल', प्रगति आणि जिनविजय, १७ सप्टेंबर १९६२.

५९) सौ.शहा वासंती, 'समाजधुरीण या विषयकडे लक्ष पुरवतील काय?', प्रगति आणि जिनविजय, २८ जानेवारी १९६३.

६०) सौ.पाटील सुमती अरविंद, 'मला बाहुबलीत काय दिसते?', प्रगति आणि जिनविजय, १५ एप्रिल १९६३.

६१) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'अकबर आणि जैन धर्म', प्रगति आणि जिनविजय, ३ फेब्रुवारी १९६४.

६२) शहा नवलबाई, 'एकत्र कुटुंब पद्धती', प्रगति आणि जिनविजय, ८ नोव्हेंबर १९६४.

६३) सौ.बागी नंदिनी, 'सन्मती सेवा समाज,धारवाड', प्रगति आणि जिनविजय, २८ डिसेंबर १९६४.

६४) कु.वणकुद्रे सरोजनी, 'जैन समाज', प्रगति आणि जिनविजय, ११ ऑक्टोबर १९६५.

६५) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'स्वायंमंथन', प्रगति आणि जिनविजय, २७ डिसेंबर १९६५.

६६) डॉ. सौ. पांगळ विजयालक्ष्मी, 'जैन समाजाची एकता', प्रगति आणि जिनविजय, १० जानेवारी १९६६.

६७) डॉ.पांगळ विजयालक्ष्मी , 'श्री. कान्जी स्वामींबद्दल झालेला गैरसमज जैन दिगंबर समाजाने दूर करावा', प्रगति आणि जिनविजय, ४ जुलै १९६६.

६८) डॉ.पांगळ विजयालक्ष्मी, 'जैन बंधू भगिनींना आवाहन', प्रगति आणि जिनविजय, २२ ऑगस्ट १९६६.

६९) सौ.शहा वासंती, 'भ. महावीरांचा २५०० वा निर्वाणोत्सव व तदनुषंगाने आपले कर्तव्य', प्रगति आणि जिनविजय, ६ फेब्रुवारी १९६७.

७०) डॉ.पांगळ विजयालक्ष्मी, 'जरा निरीक्षण करु या', प्रगति आणि जिनविजय, २४ एप्रिल १९६७.

७१) डॉ.पांगळ विजयालक्ष्मी, 'महावीर जयंती निमित्त रेडिओ केंद्रावर झालेले कार्यक्रम', प्रगति आणि जिनविजय, २२ मे १९६७.

७२) कु.रोकडे कुमुदिनी , 'जैन समाज जागृत आहे का?', प्रगति आणि जिनविजय, २६ जून १९६७.

७३) सौ. शहा वासंती, 'जैन संस्कृती', प्रगति आणि जिनविजय, ३० ऑगस्ट १९६७.

७४) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'विचारवंत त्यागी कोण?', प्रगति आणि जिनविजय, २७ एप्रिल १९७०.

७५) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'स्वभावाची स्विकृती', प्रगति आणि जिनविजय, ३ ऑगस्ट १९७०.

७६) विशालमती अम्मा, 'मातृबोध', प्रगति आणि जिनविजय, ६ मार्च १९७२.

७७) सौ.दावणगेरे विजया, 'सुखाची गुरुकिल्ली', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑक्टोबर १९८०.

७८) सौ.दावणगेरे विजया, 'माझ्या प्रिय भगिनींनो', प्रगति आणि जिनविजय, १२ जानेवारी १९८१.

७९) सौ.शहा वासंती, ‘विचारवंत थोडे क्रिडाकांडावाधीच जास्त’, प्रगति आणि जिनविजय, १९ सप्टेंबर १९८१.

८०) सौ.शहा वासंती, ‘प्रभावने मध्ये प्रदर्शन नसावे द्रव्य बळाचे, तर दर्शन घडावे सम्यक् धर्माचे’ प्रगति आणि जिनविजय, २३ नोव्हेंबर १९८१.

८१) सौ.शहा वासंती, ‘समाज विचाराला लागलेले चुकीचे वळण’, प्रगति आणि जिनविजय, १ फेब्रुवारी १९८२.

८२) सौ.शहा वासंती, ‘धार्मिक क्रिया समाजहिताची असावी’, प्रगति आणि जिनविजय, १ मार्च १९८२.

८३) सौ.शहा वासंती, ‘भूतकाळात हरवलेल्या वाटेने धर्माची वाटचाल’, प्रगति आणि जिनविजय, १५ मार्च १९८२.

८४) सौ.शहा वासंती, ‘आमच्या अहिंसेला आलेले हास्यास्पद स्वरुप’, प्रगति आणि जिनविजय, २१ मार्च १९८३.

८५) सौ.शहा वासंती, ‘समाजाची ही लूट थांबवायला हवी’, प्रगति आणि जिनविजय, २८ मार्च १९८३.

८६) सौ.शहा वासंती, ‘आत्मलक्षी साधूची लक्षणे,,’, प्रगति आणि जिनविजय, ९ मे १९८३.

८७) दफ्तरी शरयू,‘वृक्षारोपण जंगलतोड’, प्रगति आणि जिनविजय, २० जून १९८३.

८८) सौ. दफ्तरी शरयू, ‘साधक बाधक चर्चा’, प्रगति आणि जिनविजय, ४ जुलै १९८३.

८९) सौ.शहा वासंती, ‘जैन धर्म संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान’, प्रगति आणि जिनविजय, ५ सप्टेंबर १९८३.

९०) सौ.शहा वासंती, ‘या म्हणे संघाच्या संचालिका’, प्रगति आणि जिनविजय, ३ ऑक्टोबर १९८३.

९१) सौ.शहा वासंती, ‘चतु:संघाने एका मंचावर यावे’, प्रगति आणि जिनविजय, २ एप्रिल १९८४.

९२) सौ.शहा वासंती, ‘अधिवेशनाच्या व्यासपीठावर काही सामाजिक प्रश्नांची चर्चा व्हावी’, प्रगति आणि जिनविजय, २८ मे १९८४.

९३) शहा ज्योती, 'चातुर्मासचतु:संघचर्या', प्रगति आणि जिनविजय, २ जुलै १९८४ .

९४) शहा ज्योती, 'श्रीकृष्ण जन्माष्टमी विचारआचार', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑगस्ट १९८४ .

९५) प्रा.सौ.जैन लिलावती, 'आता सुबुद्ध, सुजाण श्रावकाचाराची गरज', प्रगति आणि जिनविजय, १३ ऑगस्ट १९८४ .

९६) सौ.शहा वासंती, 'व्यंतर देवतांचा स्वीकार हा धर्म नव्हे तर आपद धर्म', प्रगति आणि जिनविजय, १० डिसेंबर १९८४ .

९७) राजहंस सरोजा, 'शांतीसाठी सहजीवन योजना', प्रगति आणि जिनविजय, २४ डिसेंबर १९८४ .

९८) सौ.आवटे सुनंदा, 'अन्नातील भेसळ', प्रगति आणि जिनविजय, ७ जानेवारी १९८५ .

९९) सौ.गुंडे प्रेमलता, 'द. भा. जैन सभा, ८५ वर्षांतील त्याचे कार्य, महिला विभाग, जैन धर्म वगैरे मुद्यांवर लेख', प्रगति आणि जिनविजय, ७ जानेवारी १९८५ .

१००) सौ.गुंडे प्रेमलता, 'वीरबाला संघटनेची जरुरी (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ४ फेब्रुवारी १९८५ .

१०१) सौ.सुर्यवंशी जयश्री सुरेंद्र, 'मला न उमजलेले एक कोडे', प्रगति आणि जिनविजय, १४ फेब्रुवारी १९८५, .

१०२) पाटील नीलम, 'प्रसूती पूर्व मुलगामुलगी', प्रगति आणि जिनविजय, ४ मार्च १९८५, .

१०३) सौ.पाटील पुष्पा, 'आहेर देणे घेणे', प्रगति आणि जिनविजय, ४ मार्च १९८५ .

१०४) सौ.जैन जोत्सना, 'उध्वस्त होणारी कुटुंबे', प्रगति आणि जिनविजय, १८ मार्च १९८५ .

१०५) सौ.शहा वासंती, 'वास्तववादी धर्म प्रणाली', प्रगति आणि जिनविजय, १८ मार्च १९८५ .

१०६) सौ.जैन जोत्सना, 'कौटुंबिक स्वास्थ्य', प्रगति आणि जिनविजय, ६ मे १९८५ .

१०७) कु.पाटील पुष्पा धनपाल, 'यादी में शादी', प्रगति आणि जिनविजय, १६ जून १९८५ .

१०८) सौ.गुंडे प्रेमलता, 'हिंदू कायद्यातील स्त्रियांचे हक्क व संरक्षण', प्रगति आणि जिनविजय, १ जुलै १९८५ .

१०९) सौ.गुंडे प्रेमलता, 'समय', प्रगति आणि जिनविजय, १२ ऑगस्ट १९८५ .

११०) सौ.शहा वासंती, 'पत्रकारिता एक प्रबळ शक्ती', प्रगति आणि जिनविजय, २८ ऑक्टोबर १९८५.

१११) सौ.गुंडे प्रेमलता, 'जीवन जगण्याची कला', प्रगति आणि जिनविजय, २ डिसेंबर १९८५,.

११२) कु.पाटील पुष्पा, 'अहिंसा आजच्या युगाचा आवश्यक धर्म', प्रगति आणि जिनविजय, ३० डिसेंबर १९८५.

११३) प्रा. सौ.जैन लिलावती, 'आगम मंत्रतंत्र व दिशाभूल एक अल्प शोधन', प्रगति आणि जिनविजय, २० जानेवारी १९८६.

११४) सौ.गुंडे प्रेमलता, 'अन्यायाचा प्रतिकार', प्रगति आणि जिनविजय, ३ फेब्रुवारी १९८६.

११५) सौ.शहा वासंती, 'धर्मक्षेत्रावरील गैर कारभाराला दाते ही जबाबदार', प्रगति आणि जिनविजय, १० मार्च १९८६.

११६) प्रा. सौ.जैन लिलावती, 'ऐकावे ते नवलच! गंधोदक महात्म्य', प्रगति आणि जिनविजय, २४ मार्च १९८६.

११७) श्री.व सौ.पाटील अलका बाबासो, 'मंत्रतंत्राचा वापर करावा की करु नये यावर प्रतिक्रिया', प्रगति आणि जिनविजय, २४ मार्च १९८६.

११८) सौ.पाटील नयना, 'भ. महावीरांनी आम्हास काय दिले?', प्रगति आणि जिनविजय, २१ एप्रिल १९८६.

११९) कु.पाटील मायादेवी, 'रामायणातील जटायू', प्रगति आणि जिनविजय, ५ मे १९८६.

१२०) सौ.चौधरी सुमन, 'व्रत वैकल्ये एक चिंतन (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ५ मे १९८६.

१२१) सौ.गुंडे प्रेमलता, 'सुजाण पालकत्व (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ४ ऑगस्ट १९८६.

१२२) कु.गांधी जयश्री, 'साधू संत येती घरा', प्रगति आणि जिनविजय, १५ जुलै १९८६.

१२३) भरतमती माताजी, 'क्षमावाणी', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९८६.

१२४) सौ.चौधरी सुमन, 'लक्षदीप उजळूया', प्रगति आणि जिनविजय, १० नोव्हेंबर १९८६.

१२५) सौ.हावळे सुवर्णा, 'पुरुषार्थ आणि दैव', प्रगति आणि जिनविजय, ४ नोव्हेंबर १९८६.

१२६) सौ.ताम्हनकर विनया, 'स्त्रीस्वातंत्र्य आणि सामाजिक जाणीव', प्रगति आणि जिनविजय, १ डिसेंबर १९८६.

१२७) सौ.आडमुठे उज्वला, 'लग्न समारंभात या चालीरीती असाव्यात यावर लेखन', प्रगति आणि जिनविजय, २ फेब्रुवारी १९८७.

१२८) सौ.चौधरी सुमन, 'सुजाण पालकत्व', प्रगति आणि जिनविजय, २ फेब्रुवारी १९८७.

१२९) सौ.गाट विजया अनंत, 'पुत्र व्हावा ऐसा', प्रगति आणि जिनविजय, २ फेब्रुवारी १९८७.

१३०) गडेण्णावर अनुराधा, 'यशाचे खरे रहस्य', प्रगति आणि जिनविजय, ४ मे १९८७.

१३१) प्रा. डॉ. सौ.कौलगुड अरुणा, 'महिला मनुष्यबळ विकास! आजची नितांत गरज', प्रगति आणि जिनविजय, ४ मे १९८७.

१३२) कु.मुळे सुलक्षणा, 'मुनींना आहार देण्यात अरुची का?', प्रगति आणि जिनविजय, ६ जुलै १९८७.

१३३) आर्यिका जिनदेवी माताजी, 'समाधी मरण', प्रगति आणि जिनविजय, १० ऑगस्ट १९८७.

१३४) सौ.गुंडे प्रेमलता, 'दान (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ३१ ऑगस्ट १९८७.

१३५) सौ.गुंडे प्रेमलता, 'मानवी स्वातंत्र्य (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, २ नोव्हेंबर १९८७.

१३६) सौ.चौधरी सुमन, 'जैन आणि जैन धर्म (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ७ डिसेंबर १९८७.

१३७) शहा वासंती, 'समाज रक्षण हेच संस्कृती रक्षण, हीच वास्तविक तीर्थ रक्षा', प्रगति आणि जिनविजय, १४ डिसेंबर १९८७.

१३८) सौ.गुंडे प्रेमलता, 'नववर्षाचे स्वागत (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ४ जानेवारी १९८८.

१३९) सौ.गुंडे प्रेमलता, 'कुटुंब न्यायालये (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, २ एप्रिल १९८८.

१४०) सौ.गुंडे प्रेमलता, 'अधिवेशनाचा वृत्तांत', प्रगति आणि जिनविजय, ४ जुलै १९८८,.

१४१) ॲड. सौ.पंडित शैलजा, 'हुंडा प्रतिबंधक कायदा', प्रगति आणि जिनविजय, ५ सप्टेंबर १९८८.

१४२) कोथळे नर्मदा, 'नात्यातील विवाह एक गंभीर समस्या', प्रगति आणि जिनविजय, ३ ऑक्टोबर १९८८.

१४३) शहा वासंती, 'जैन जगला तर जैन धर्म जगेल', प्रगति आणि जिनविजय, २१ नोव्हेंबर १९८८.

१४४) सौ.गुंडे प्रेमलता, 'उपेक्षित जैन इतिहास (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ७ फेब्रुवारी १९८९.

१४५) सौ.शहा वासंती, 'मूर्तीची प्राणप्रतिष्ठा .... मूर्तीवर संस्कार ही केवळ कवी कल्पना', प्रगति आणि जिनविजय, २१ फेब्रुवारी १९८९.

१४६) सौ.शहा वासंती, 'आजकाल प्रतिष्ठेचे उद्दिष्ट कोणते ?', प्रगति आणि जिनविजय, २१ मार्च १९८९.

१४७) सौ.गुंडे प्रेमलता, 'वधूवर मेळाव्याची उपयुक्तता व सामाजिक गरज', प्रगति आणि जिनविजय, ४ एप्रिल १९८९.

१४८) दुग्गे लिलावती, 'संघर्ष : एक मुक्त चिंतन', प्रगति आणि जिनविजय, ६ जून १९८९.

१४९) सौ.गुंडे प्रेमलता, 'स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेते म. गांधी', प्रगति आणि जिनविजय, १० ऑक्टोबर १९८९.

१५०) सौ.गुंडे प्रेमलता, 'वधूवर मेळावे आजची सामाजिक गरज', प्रगति आणि जिनविजय, ६ फेब्रुवारी १९९०.

१५१) सौ.कोगनोळे सुरेखा, 'मन वढाय वढाय', प्रगति आणि जिनविजय, ७ ऑगस्ट १९९०.

१५२) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'आम्ही म्हातारे का होतो', प्रगति आणि जिनविजय, ७ ऑगस्ट १९९०.

१५३) सौ.शहा वासंती, 'तत्वशून्य क्रियाविधीच्या पसाऱ्यात जैन धर्माचा आत्माच हरवला आहे', प्रगति आणि जिनविजय, ४ सप्टेंबर १९९०.

१५४) सौ.गुंडे प्रेमलता, 'कल्पद्रुम आराधना महोत्सवाचे फलित (संपादकीय)', प्रगति आणि जिनविजय, ६ नोव्हेंबर १९९०.

१५५) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'जैन धर्म व निसर्ग', प्रगति आणि जिनविजय, ११ डिसेंबर १९९०.

१५६) सौ.गुंडे प्रेमलता, 'मराठी जैन साहित्य संमेलनाचा वृत्तांत', प्रगति आणि जिनविजय, १ जानेवारी १९९१.

१५८) सौ.गुंडे प्रेमलता, 'जग विनाशाच्या उंबरठयावर', प्रगति आणि जिनविजय, ५ फेब्रुवारी १९९१.

१५९) सौ.गुंडे प्रेमलता, 'ग्राहक संरक्षण', प्रगति आणि जिनविजय, ५ मार्च १९९१.

१६०) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे', प्रगति आणि जिनविजय, २ जुलै १९९१.

१६१) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'सधन स्त्रियांनी नोकरी करणे गरजेचे आहे काय?', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑगस्ट १९९१.

१६२) सौ.शहा वासंती, 'अशाच भवितव्याची आम्हाला प्रतिक्षा आहे काय?', प्रगति आणि जिनविजय, २० ऑगस्ट १९९१.

१६३) सौ.शहा वासंती, 'आमच्या सामाजिक जाणीवा विस्तारल्या पाहिजेत', प्रगति आणि जिनविजय, १७ सप्टेंबर १९९१.

१६४) सौ.गुंडे प्रेमलता, 'जैन धर्माचा आधुनिक अविष्कार म्हणजे गांधीवाद', प्रगति आणि जिनविजय, १ ऑक्टोबर १९९१.

१६५) सौ.शहा वासंती, 'समाजाला आता सुयोग्य व खंबीर नेतृत्वाची गरज', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर १९९१.

१६६) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'सावधान ! व्ही. सी. आर. एक भूत', प्रगति आणि जिनविजय, २६ नोव्हेंबर १९९१.

१६७) सौ.जर्दे सुनीता, 'संध्या छाया', प्रगति आणि जिनविजय, ३ डिसेंबर १९९१.

१६८) प्रा. सौ.पाटील नीलम, 'आहेर एक पुनर्विचार', प्रगति आणि जिनविजय, १२ मे १९९२.

१६९) सौ.शहा सुरेखा, 'गांधीनाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान आचार्य कुंद कुंद पुरस्कार वितरण समारंभाचा वृत्तांत', प्रगति आणि जिनविजय, ४ ऑगस्ट १९९२.

१७०) प्रा.सौ.जर्दे सुनिता, 'अहिंसा', प्रगति आणि जिनविजय, ८ डिसेंबर १९९१.

१७१) सौ.जैन जोत्सना, 'उध्वस्थ होणारी कुटुंबें'', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑक्टोबर १९९२.

१७२) प्रा. सौ. चौगुले शशिकला, 'साहित्य साधना, एक चिंतन', प्रगति आणि जिनविजय, १० नोव्हेंबर १९९२.

१७३) डॉ. सौ.पाटील नयना, 'सार्थक करुया जगण्याचे', प्रगति आणि जिनविजय, ८ डिसेंबर १९९२.

१७४) डॉ. सौ.पाटील नयना, 'साहित्याचे अभिसरण', प्रगति आणि जिनविजय, २२ डिसेंबर १९९२.

१७५) डॉ. सौ.पाटील नयना, 'एक जन्म सुंदर जीवनासाठी', प्रगति आणि जिनविजय, १६ फेब्रुवारी १९९३.

१७६) प्रा. सौ.जर्दे सुनिता, 'सुख शांतीचा मूलमंत्र', प्रगति आणि जिनविजय, ६ जुलै १९९३.

१७७) सौ.पाटील शुभदा शशीकुमार, 'नवी दिल्ली येथील अहिंसा संमेलनाचा वृत्तांत', प्रगति आणि जिनविजय, २८ सप्टेंबर १९९३.

१७८) सौ.कोठारी मंगला, 'जैन विवाहाच्या रुढी परंपरा रितीरिवाज', प्रगति आणि जिनविजय, २३ जानेवारी १९९७.

१७९) सौ.जैन लिलावती, 'मोक्षाचा आराधक श्रावक कसा असतो', प्रगति आणि जिनविजय, ३ एप्रिल १९९७.

१८०) डॉ. सौ.पाटील नयना, 'काटकसर', प्रगति आणि जिनविजय, ४ डिसेंबर १९९७.

१८१) डॉ. सौ.पाटील पद्मजा, '२१ व्या शतकाच्या उंबरठयावर जैन स्त्रिया', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑगस्ट १९९८.

१८२) सौ.खोत सरोज, 'विचारमंथन मध्ये विनाशाकडे का वाटचाल होत आहे ?', प्रगति आणि जिनविजय, २६ डिसेंबर १९९८.

१८३) प्रा. सौ.चौधरी सुमन, 'दक्षिण महाराष्ट्रातील जैन स्त्रीशिक्षण', प्रगति आणि जिनविजय, १७ मार्च २०००.

१८४) सौ.दोशी विभावरी, 'बदलत्या काळातील व्रत संकल्पना', प्रगति आणि जिनविजय, २७ ऑक्टोबर २०००.

१८५) सौ.माणगावे नीलम, 'एका वक्तृत्व स्पर्धेचे समालोचन केले', प्रगति आणि जिनविजय, ५ ऑक्टोबर २००१.

१८६) सौ.पाटील वनिता, 'काटकसर', प्रगति आणि जिनविजय, २८ डिसेंबर २००१.

१८७) सौ.गुंडे प्रेमलता, 'प्रगति आणि जिनविजयची गतीशील वाटचाल', प्रगति आणि जिनविजय, १२ एप्रिल २००२.

## प्रकरण ३

# जैन स्त्रियांच्या लेखनातील सामाजिकतेचा विचार

३.१ सन १९३१ ते १९४१ या कालखंडातील सामाजिक लेखन

३.२ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील सामाजिक लेखन

३.३ सन १९६५ ते १९७५ या कालखंडातील सामाजिक लेखन

३.४ सन १९७६ ते १९८६ या कालखंडातील सामाजिक लेखन

३.५ सन १९८७ ते २००२ या कालखंडातील सामाजिक लेखन

३.६ निष्कर्ष

३.७ संदर्भ टीपा

## प्रकरण तिसरे

# जैन स्त्रियांच्या लेखनातील सामाजिकतेचा विचार

जैन समाजातल्या स्वातंत्र्यपूर्वीच्या स्त्रिया या चूल मूल सांभाळणाऱ्या होत्या. धर्म आणि समाज हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. दिवाणखान्यात स्त्रियांचं पाऊल पडणं ही फार गंभीर बाब होती. अशाही काळात हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या जैन स्त्रिया या शिक्षणाच्या प्रवाहात आल्या. हा प्रवाह समाजाला जाऊन मिळाला. त्यांच्या जाणिवा जगण्यासाठी अधिर झाल्या आणि त्या लिहू लागल्या. लिहिण्यासाठी माध्यम म्हणून 'प्रगति आणि जिनविजय' चे व्यासपीठ त्यांना मिळाले.

शब्दात सामर्थ्य असते. लेखणीत बळ असते. समाजपरिवर्तन घडवून आणण्याची ताकद असते हे या स्त्रियांना समजू, उमजू लागले. शिक्षणाची ही साक्षरता दिवसेंदिवस वाढू लागली. जैन स्त्रिया हळूहळू साक्षर होऊ लागल्या. सामाजिक जाणिवा त्यांच्यात निर्माण झाल्या. स्वत:कडे, इतर स्त्रियांकडे, त्यांच्या समस्यांकडे बघण्याचा डोळसपणा त्यांना येऊ लागला. आपण बदललो तर परिस्थिती बदलेल आणि ही काळाची गरज आहे हे त्यांच्या लक्षात आले. घर नावाच्या चार भिंती आणि उंबरा नावाची लक्ष्मण रेषा ओलांडल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही हे त्यांनी अनुभवांतून ओळखले. आपल्याला जे जाणवले, समजले ते इतरांनाही सांगावे या कर्तव्यातून, जाणिवेतून त्यांनी लिखाण केले.

स्त्रियांमध्ये असणारी संवेदनशीलता जगाकडे बघण्याची नवी दृष्टी देते. तिच्यातील हळवेपणा समाजाप्रती आत्मीयता देतो. कर्तव्याच्या जाणिवेतून दुसऱ्यांना शहाणे करून सोडण्याची जबाबदारी वाढते. नव्या काळाचे भान पेलताना, स्त्री म्हणून जगताना, नात्यांची रोपे वाढवताना, स्वत:तील स्त्रीत्व जपताना होणाऱ्या मानसिक हिंदोळयाचे चित्रण, लेखन करण्यासाठी तिने लेखणी उचलली.

समाजाच्या अंगणात आपले घर असते. त्या घरात आपण असतो. समाजातल्या सारासार गोष्टींचे विचारमंथन मनात दिसते. आपली जबाबदारी, सामाजिक दृष्टिकोन यातून विचारांची मांडणी तयार होऊ लागते. परखड, वस्तुनिष्ठ आणि ठोस लिखाण मूळ धरू लागते. असे लेखन जनजागृतीसाठी आवश्यक असते. त्यातून समाज प्रबोधन होऊन क्रांती घडू शकते, जी समाज

जीवनाला प्रवाहित करण्यासाठी गरजेची असते. असेच समाज चित्रण लेखणीत उतरवण्याचा प्रयत्न जैन लेखिकांनी केलेला आहे.

सन १९२० ते १९३० ः- सामाजिक लेखन आढळले नाही.

## ३.१ सन १९३१ ते १९४१ या कालखंडातील सामाजिक लेखन

सन १९३० नंतरच्या काळामध्ये सविनय कायदेभंग १९३२, महायुद्ध विरोधी सत्याग्रह १९४० आणि १९४२ ची चलेजाव चळवळ! या स्वातंत्र्याच्या चळवळीने वेग घेतला होता. देश असा स्वातंत्र्यलढयात क्रियाशील असल्यामुळे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली समाजात सर्व स्तरात समाजसेवा, लोकसेवा, देशसेवा, हरिजनसेवा सारखे शब्दप्रयोग रूढ झालेले होते. मात्र जैन स्त्रियांची प्रवृत्ती पारंपारीक धार्मिकतेतच जास्त होती. अशा या वातावरणात धर्माकडे लोकांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. या जाणिवेने त्यांनी समाजाचे लक्ष धर्माकडे वळविण्यासाठी लेखन केल्याचे जाणवते. सौ. राजुबाई रावसाहेब दोशी यांनी (१ ऑगष्ट, १९३४)[१] 'सेवा' या आपल्या संपादकीय लेखामध्ये म्हणतात, 'सेवा दोन प्रकारच्या असतात. परमार्थिक व लौकिक |' आजकाल समाजसेवा, लोकसेवा, देशसेवा, हरिजनसेवा, अस्पृश्यसेवा वैगेरे ऐकू येतात पण त्यामुळे धर्मसेवेकडे लोकांचे दुर्लक्ष होत आहे. धर्मसेवा ही कित्येकांना राष्ट्रविघातक व समाजविघातक वाटू लागली आहे ही खेदाची गोष्ट आहे. कोणतीही सेवा धर्माला अनुसरून झाली पाहिजे.

धर्माचा पगडा स्त्रियांवर किती होता, हे यावरून लक्षात येते.

(६ नोहेंबर, १९३४)[२] तत्कालीन जैन समाजावर... विशेषतः स्त्रियांवर धर्माचा पगडा जास्त होताच. पण सामाजिक चळवळींचाही पगडा कळत नकळत सगळयांच्याच मनावर, वागण्यावर पडत होता. वृत्ती प्रवृत्तीत बदल घडवून आणत होता. तसाच पगडा लक्ष्मीबाई पाटील यांच्यावर स्पृश्य अस्पृश्याचा..., महात्मा गांधीजींच्या विचारांचा पडला होता. तो त्यांनी आपल्य अनुभवावर आधारित 'सोन' या लिखाणात व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या अनुभव सांगितला आहे की, दसऱ्या दिवशी पाच-सहा मुले येऊन जरा लांबच राहून 'सोने घ्या जी!' म्हणाली. तसे त्यांचे आप्पा म्हणाले सोने पुढे येऊन द्या. मुले पुढे येईनात. आम्ही सगळे म्हाराची आहोत जी म्हणून मुले सगळी तिथेच राहिली. तेव्हा शेवटी आप्पाच त्यांच्या जवळ जाऊन सोने द्या म्हणाले. तेव्हा तेथे असलेल्या आप्पांच्या एका गांधी भक्त मित्राला ते आवडले नाही. ते म्हणाले याचा परिणाम आपणासच भोगावा लागेल. ते लोक आपली कामे करणार नाही. आपली हांजी करणार नाहीत. पुर्वीच्या

ऋषींनी त्यांना उगीचच का तुच्छ लेखले? ही जात मगरूर आहे. यांना पिढीजात कलंकीत जे बट्टा लागलेला आहे तो योग्यच आहे. त्यावर आप्पा म्हणाले, गांधी भक्त म्हणविणाऱ्यांनी असे उदगार काढू नयेत. पाच-सहा कोटी अस्पृष्यांना हीन लेखून स्वराज्य मिळाले तरी ते टिकणार नाही. वैगेरे... लेखिका म्हणते, 'महात्माजींच्या एकीकरणाचा हा धडा प्रत्येक समाजाने गिरवायला नको का?'

बोलणे आणि वागणे वेगळे ठेवणाऱ्या पाखंडी लोकांना लक्षमीबाई पाटील यांनी दिलेली ही चपराख वस्तुस्थिती थेट समोर आणते.

कु. शकुंतला बोबडे यांनी 'एका दिवसात लग्न' या (१६ जुलै १९३५)[३] च्या लेखात लग्न ही वैयक्तिक गोष्ट असली तरी जेव्हा त्या लग्नाचा समारंभ होतो तेव्हा ती गोष्ट सामाजिक बनते. पूर्वीच्या काळामध्ये तीन तीन पाच पाच दिवस लग्न चालायचे. वेळ पैसा मनुष्य बळाचा वापर व्हायचा. नवीन विचारांनुसार हे चुकीचे असल्याची जाणीव स्त्रियांना होऊ लागली होती, हा विचार मांडला आहे. लग्नात मानपाणाला भरपूर पैसा खर्च होतो. मने दुखावतात म्हणून अशा चाली लग्नातून काढून टाकून तीन दिवसांच्या लग्नाच्या गोंधळापेक्षा एका दिवसात लग्न करणे चांगले असे मत त्यांनी मांडले आहे.

धर्मांतराची जाहीर गर्जना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या व्यासपीठावरून करताच सगळया समाजामध्ये हलकल्लोळ उठला. या घटनेनंतर (१२ नोव्हेंबर, १९३५)[५] 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जैन धर्म' नावाचा लेख खास स्त्रियांसाठीच्या सदरात कु. शकुंतला नानचंद गांधी, पंढरपूर यांनी लिहिला. त्या म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा ही एका व्यक्ती पुरती नसून त्याच्या मागे ७ कोटी अस्पृश्य आहेत याची जाणिव जैनांनो क्षणभरही दूर करू नका. हे ७ कोटी अस्पृश्य आज जरी नसले तरी उद्या कोणता तरी अन्य धर्म स्वीकारल्या खेरीज राहणार नाहीत. तेव्हा सावध व्हा. त्यांना जैन धर्मामध्ये शुद्धीकृत करून घेण्याच्या मार्गाला लागा. कम्युनल अवॉर्डवेळी तुम्ही आपल्या आळसाने जातवार हक्क गमावून बसला आहात. मुसलमानांनी, ॲंग्लो इंडियनांनी आपले हक्क मिळविले. हिंदू धर्मिय शिखांनी जादा अधिकार प्राप्त करून घेतले. राष्ट्रीय प्रवृत्तीचा टेंबा मिरविणारे दाढीवाले मुंजे कॉंग्रेसची आज्ञा यत्किंचितही न मानता राउंड टेबलला गेले. जैनांनो तुम्ही वेळ दवडलीत तसे आता करू नका. बारा लक्षावर आलेली जैनांची

संख्या सात कोटींनी वाढवा' खूप विस्तृत लेख लिहून जैनेतरांना जैन केल्याची अनेक उदाहरणे त्यांनी इतिहास, पुराणा मधील दिली आहेत...... पूर्ण लेख मुळातूनच वाचण्यासारखा आहे.

महात्मा गांधीच्या विचारांचा पगडा जैन स्त्रियांवरही झालेला दिसतो. गांधीजी म्हणत, 'गुलामांना गुलाम असल्याची जाणिव करून द्या म्हणजे ते अन्यायाविरूद्ध झगडतील.' या विचाराच्या जवळ जाणारा विचार सरस्वतीबाई उत्तूरकर, कोल्हापूर यांनी 'राष्ट्रोद्धार' या लेखात (१४ जानेवारी, १९३६)[६] मांडला आहे. त्या म्हणतात, 'गुलाम व्यक्तीकडून कधीच राष्ट्राची उन्नती झालेली ऐक्यात आलेली नाही.' अनेक प्रकारच्या गुलामीबद्दल त्यांनी विवेचन केले आहे. खाणे, पिणे, व्यसने वैगेरेची जशी गुलामी असते. तशी भय आणि अज्ञानाचीही गुलामी असते. गुलामी मग ती कुठलीही, ती  वाईटच! ...... अशाप्रकारचे विस्तृत विवेचन केले आहे.

(२८ जानेवारी, १९३६)[७] पत्र आणि त्या पत्राला उत्तर अशा पत्रांच्या माध्यमातूनही काही लेख प्रसिद्ध झाले आहेत. 'प्रिय बंधू श्रीपाल यास,' या मायन्याखाली अंजनीदेवींनी लिहिलेल्या पत्रात वाचनाबद्दलचे आपले विचार कु. पद्मावती बेळगाव यांनी मांडले आहेत. फक्त धर्मपुस्तके न वाचता वर्तमानपत्रेही वाचली पाहिजेत. स्त्रियांना शिक्षण तर दिले पाहिजे. पण त्याचबरोबर कशिदा, विणकाम, गायन याचेही शिक्षण दिले पाहिजे.दुष्ट जगापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी....आत्मसंरक्षण आणि शीलरक्षण दोन्हीसाठी लाठी, लेझीम, जांबीया वैगेरे प्रकारचे शारिरीक शिक्षणही दिले पाहिजे. अशा अर्थी स्त्रियांना कलागुणसंपन्न आणि शूर, वीर, धीट बनण्यासंबंधी प्रबोधन केले आहे.

(११ फेब्रुवारी, १९३६)[८] निर्मलाबाई मेधळ, देवळी यांनी शिक्षणाने स्त्रियांना विचार दिला. प्रत्येक गोष्ट चिकित्सा वागण्या बोलण्यातली असेल. लग्नकार्यातल्या उधळपट्टीची असेल किंवा देवपूजेसंबंधी असेल. ' ही पूजा कोणाची?' असा लेखच यांनी लिहिला आहे.त्या म्हणतात, ' जैन समाजात द्रव्य पूजेचे बंड फार चालू आहे. रोज नवे लुगडे, नवे पदार्थ, रात्रंदिवस, रात्रंदिवस मेहनत, साखर, तुपाचा खर्च सगळे फार चालले आहे.' पुढे मिस्कीलपणे त्या विचारतात. 'देव तर या सर्वांपासून अलिप्त आहे, मग त्याला उगीचच मोहजाल का पाडायचे? नाव देवाचे पण मिळते गुरविणीला. पण त्या बिचारीने किती खायचे ? हेच पदार्थ जर उपाशी भुकेल्यांना दिले तर ते धन्यवाद देतील. मरणाऱ्यास वाचविणे, उपाशाला खाऊ घालणे यास धर्म म्हणत नाहीत काय?' शेवटी त्यांनी जैन स्त्रियांचे अज्ञान दूर करायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

'मोफत' या लेखात (१७ मार्च १९३६)[९] 'मिस गांधी' यांनी स्वातंत्र्य चळवळी बरोबरच स्वदेशी चळवळही स्वातंत्र्यपूर्व काळात जनमानसात रुजली होती. परदेशी वस्त्रांची होळी आणि स्वदेशी...खादी वस्त्रांचा स्वीकार हा देशाभिमानाचा एक अविभाज्य भाग बनला होता. त्याचाही पगडा जैन स्त्रियांवर पडला होता. या विषयासंबंधी एक उदाहरण देऊन आपला मुद्दा स्पष्ट केला आहे.त्याचबरोबर फुकट सापडले म्हणून परदेशी मालही चटकन उचलणाऱ्याकडे जाता जाता अंगुली निर्देश दाखवला आहे. लेखिका फिरायला गेलेली असताना मोफत ... मोफत... असा आवाज आला. बघेपर्यंत एका माणसाने वर्तमानपत्रात गुंडाळलेले पुडके त्यांच्या हातात कोंबले. उघडून पाहाताच आत परदेशी वायल कापडाचा दोन वाराचा तुकडा दिसला. त्या कपडयाचा स्पर्श होताच त्यांनी तो कपडा फेकून दिला आणि फेकण्याचाच अवकाश एका दुकानदाराने तो उचलून घेतला.

(२८ ऑगष्ट, १९४०)[१०] 'इतिहास शुद्धीकरण' सारखा लेख स्त्रीने लिहावा हे सुद्धा सुखद आश्चर्यच आहे. यावरूनच समाजातील घडामोडींकडे आणि इतरही सर्वव्यापी गोष्टींकडे जैन लेखिकांचे बारीक लक्ष होते हे कौतुकास्पद आणि आश्चर्यकारकही आहे हे दिसून येते. मराठी हायस्कूलमधल्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकामधील जैनांना कमीपणा आणणाऱ्या चुकीच्या माहितीकडे वाचकांचे लक्ष मंदोदरीबाई चवरे यांनी वेधले. 'हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास' लेखक गणेश नारायण जोशी बीए एल एल बी ...पुणे यांनी सदर इतिहासात पान नंबर २६ मध्ये लिहिलेली माहिती खालीलप्रमाणे

१) लिच्छवी सरदार कुलात भगवान महावीरांचा जन्म झाला. पारसनाथाने स्थापन केलेल्या या संप्रदयात महावीर शिरला.परंतु या पंथातील नियम व बंधने न आवडून लवकरच त्याने आपला नवीन पंथ स्थापन केला.

२) महावीरांची धर्मतत्वे खऱ्या सुखाची पायरी आत्मक्लेशाची असून त्याची मोक्षसाधनात गणना झाली. अर्थात आत्महत्या ही आत्मक्लेशची परमावधी असल्यामुळे आत्महत्या हेही मोक्षाचेच साधन मानले गेले.

३) 'हिंदुस्थानचा सचित्र इतिहास' लेखक का. ना. भिडे यांच्या पा. नं. २७ मध्ये जैन धर्म यासदराखाली ' इ.स.पुर्व ६०० ते ७०० च्या हिंदुस्थानात मोठी खळबळ झाली. त्या खळबळीतून बौद्ध धर्माचा जसा जन्म झाला तसा जैन धर्माचाही झाला. जैन धर्माचा संस्थापक कोण? याविषयी बराच मतभेद आहेत. महावीरांच्यापूर्वी तेवीस

तीर्थंकर होवून गेले व त्यांनीच जैन धर्म स्थापन केला, असे काही जण म्हणतात कितीही मतभेद असले तरी बहुजन महावीरालाच जैन धर्माचे संस्थापक मानतात.

तत्त्वे - दुःखमय जीवनाचा अंत शरीर झिजवुन करावा, असे हा धर्म सांगतो.

इतिहास शुद्धीकरणाचा मोठा सुंदर लेख लिहून शेवटी त्या म्हणतात, 'वरीलपमाणे चुकीची कल्पना इतिहासकारांनी लिहिलेली आहे. ती दुरुस्त करण्याकरीता योग्य ती कारवाई करणे इष्ट व जरूरी आहे. इकडे श्री. आर. एन. शहा लक्ष देतील काय?'

(१८ सप्टेंबर, १९४०)[११] सौ. सुलोचना भोकरे यांनी, 'हुंडा प्रकरण' या लेखात एक अनुभव सांगितला आहे. बी. ए. झालेल्या एका तरुणीने हुंडा देण्यास विरोध केला. वराच्या वडिलांनी त्याला आक्षेप घेतला. तेव्हा वरानेच बाणेदारपणे विचारले की, 'लग्न मुलीशी करावयाचे आहे की पैशाशी' असा प्रश्न करून त्याच मुलीशी विवाह केला. हे उदाहरण सांगून त्या म्हणतात, ' हुंडा देणार नाही व हुंडा घेणार नाही असा निश्चय मुला-मुलींनीच करायला हवा.' एक गंमत पण वास्तव म्हणून त्यांनी उदाहरण सांगितले की, 'वधूकडून जरी हुंडा मिळाला नसला तरी काही लोक लग्नाच्या वेळी ताटात आपणच रुपये घालून इतका हुंडा मिळाला असे दाखवून हुंडयाची हौस भागवून घेतात.'

सौ. सुलोचना भोकरे यांनी थोडया वेगळया अंगाने हा राजकारणातील स्त्रियांच्या आरक्षणाचा मुद्दा सध्या गाजतो आहे. उलट सुलट विचार होत आहे. पण आरक्षणाचे बील काही पास होत नाही. स्त्रियांचे राजकारणातील नेतृत्व समाजहिताचे आहे. स्त्रिया जास्त आत्मीयतेने काम करू शकतात, हे आता महिला सरपंच, नगराध्यक्ष, आमदार, खासदार त्यांच्या कार्यक्षमतेविषयी शंका राहिलेली नाही हा विषय मांडला आहे. त्यापुढे म्हणतात (,१६ ऑक्टोबर, १९४०)[१२] 'दिवसेंदिवस जग सुधारत चालले आहे. पण राजदरबारी लायक स्त्रियांचा शिरकाव जास्त झाल्याशिवाय आमच्या अडचणी दूर होणार नाहीत. पण आपण निवडून आल्या नंतर एका विशिष्ट जातीपुरते न पाहता मागासलेल्या सर्व जातींच्या स्त्रिया, अधिक स्वतंत्र कशा होतील या हिताचा विचार करायला हवा.' जातीच्या राजकारणाला त्यांचा विरोध होता हे स्पष्टच आहे. शिवाय निवडणूक लढविणाऱ्या स्त्रियांना वयाची सवलत असावी असे त्यांचे मत आहे. 'सांगली असेंब्लीची निवडणूक व स्त्रियांना वयाची सवलत' या लेखात त्या म्हणतात, ' निवडणूक लढविण्याची अट पुरुषांना व स्त्रियांना ३० वर्षांची आहे. पण स्त्रियांसाठी ही अट २५ वर्षांची आहे. याचे कारण देताना त्यांनी सांगितले की,

'स्त्री पुरुष शरीर, प्रकृती, स्वभाव, ज्ञान, शारदा, कायदा यांचा केल्यास प्रपंच व समाजाच्या परिस्थितीची जाणिव स्त्रियांना पुरुषांपेक्षा काही वर्षे आदी येते. खानेसुमारीच्या आकडयानुसार स्त्रियांची आयुमर्यादा पुरुषांपेक्षा कमी असलेली दिसते. म्हणून स्त्रियांना वयाची सवलत हवी.'

(१० डिसेंबर, १९४१)[१३] 'कोल्हापूर प्रजापरिषद व स्त्रिया' या लेखामध्ये त्यांनी एक वेगळा विषय मांडला आहे. समाजातील सर्व घडामोडींचा विचार करणाऱ्या त्यावर लेखन करणाऱ्या आघाडीच्या लेखिका सौ. सुलोचना भोकरे यांचे नाव आदराने घ्यायला हवे. विषय कोणताही असो आपले मत स्पष्ट शब्दात मांडत असत. २२ नोव्हेंबर, १९४१ दिवशी कोल्हापूरात भाई बागल यांच्या अध्येक्षतेखाली कोल्हापूर संस्थानातील कार्यकर्त्यांचे खास संमेलन भरले. एक वर्षापूर्वी हेच संमेलन मुरलीधराच्या देवळात भरणार होते. पण सभेच्या दिवशी सभेच्या पुढाऱ्यांच्या विरूद्ध अत्याचार केले. म्हणून प्रस्तुतचे संमेलन आमंत्रित लोकांचेच भरले तरी १००० ते १५०० लोकांचा प्रचंड जन समुदाय उपस्थित होता...... या परिषदेचा वृतांत त्यांनी या लेखात दिला. त्या म्हणतात, 'अन्यायाची दाद संघशक्तीने लावून घेण्याला प्रजापरिषद हा मुख्य उपाय आहे म्हणून प्रजापरिषदेला पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही काया वाचा मने शुद्ध करून मदत करावी.

## ३.२ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील सामाजिक लेखन

सौ. सुलोचना भोकरे यांनी (१८ डिसेंबर १९४२)[१४] 'कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ' या लेखात शिरोळ पेटा (पेटा- पूर्वी तालुक्याला पेटा म्हणत असत), रायबाग, कटकोळ, इचलकरंजी, आरग, मणेराजुरी वैगेरे भागात शेतकऱ्यांच्या पदरात दोन आणे सुद्धा पीक पडले नाही, असे सांगून सरकारने हा भाग 'दुष्काळी भाग' ,म्हणून जाहीर करावा असे आवाहन केले आहे.

(१ जून १९४३)[१५] समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींवर एक सामाजिक जबाबदारी असते. ती व्यक्ती फक्त कुटुंबाची नसल्यामुळे ती समाजाचा आदर्श असते. त्या व्यक्तीचे अनुकरण समाज करीत असतो. तो त्यांचा वाटाडया असतो.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासंबंधी त्यांच्या मुलाच्या लग्नानंतर एक खंत सुलोचना भोकरे यांनी व्यक्त केली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मुलाचे लग्न ९ मार्च १९४३ ला जातीतील मुलीशी झाले. त्या ऐवजी आंतरजातीय मुलीशी झाले असते तर....? आपल्या मनातील विचार व्यक्त करताना त्या म्हणतात, 'कर्मवीर स्पृश्यास्पृश्य मानीत नाहीत. अशा

कर्तबगार, विशाल मनोवृत्तीच्या धाडसी वीराच्या हातून पोटभेदातील मुलीशी आपल्या मुलाचा विवाह घडवून मिश्र-विवाहाचा मार्ग पाडावयास हवा होता.'

सौ. सुलोचना भोकरे यांनी (११ जुन १९४३)[१६] अयोध्येमधील राम मंदिराचा वाद आता कळीचा मुद्दा बनला आहे. या मुद्याला धरून राजकीय डावपेच खेळले जाऊ लागले आहेत. राजवटयांच्या बदलानुसार मंदिरांचा हक्कही हिसकावून घेतला जातो.इतिहास नवा नाही हे असे सामाजिक प्रश्न प्रत्येक पिढीत, प्रत्येक शतकात निर्माण होत असतात. बळी तो कानपिळी या न्यायानुसार घटना, संदर्भ, मालकी हक्क बदलले जातात. अशाच मुद्याकडे समाजाचे लक्ष वेधले आहे 'कोल्हापूरचे अंबाबाईचे देऊळ' असे लेखाला नाव दिसे असून त्या म्हणतात, 'कोल्हापूरचे अंबाबाईचे देऊळ हे मूळचे जैनांनीच बांधले आहे, अशी पुष्कळांची समजूत आहे. पण ती समजूत प्रा. कुंदणगारांच्या पुस्तकामुळे (पुस्तकाचे नाव आहे 'कोल्हापूरच्या श्री महालक्ष्मी मंदिरावर नोटस्') संशय उत्पन्न करेल आणि कालांतराने जैनांचा प्राचीन इतिहास बुडेल, हा मोठा व न भरून येणारा तोटा होईल असे होता कामा नये म्हणून जैन इतिहास संशोधकांनी व मुनींनी या पुस्तकातील खोडसाळ विधाने खोडून काढावीत आणि खरा प्रकार जगासमोर ठेवावा हे अत्यंत जरुरीचे व महत्त्वाचे आहे.

पुस्तकासंबंधी सांगताना पुस्तकातील काही मुद्दे त्यांनी दिले आहेत. ते मुद्दे असे, 'हे देऊळ मूळचे हिंदुंचे होते. नंतर जेव्हा जैन राजे बलाढय झाले तेव्हा त्यांनी या देवळाला बस्तीचे रूप दिले. मग देवगिरीच्या हिंदू राजांनी पुन्हा याला हिंदू देऊळ बनविले' हे चुकीचे असल्याचे सुलोचना भोकरे यांनी कळकळीने लिहिले आहे.

सन १९५३ ते १९६४ या अकरा वर्षात सामाजिक आशय व्यक्त करणारे विशेष लेखन लिहिले गेले नाही.

### ३.३ सन १९६५ ते १९७५ या कालखंडातील सामाजिक लेखन

कालमानानुसार आणि समाज विकासाच्या गरजेनुसार समाजात बदल व्हायला हवेत. परिवर्त न घडायला हवे पण तसे होताना आढळत नाही ही वस्तुस्थिती आहे. जैन साधूंना जलप्रवास आणि आकाशमार्गे प्रवास त्याज्य मानला आहे. परिग्रह प्रमाणातून आलेल्या दिशाबंधनाचा विचारही या मागे आहे. शिवाय सूक्ष्मनिसूक्ष्म जीव हिंसा टाळण्याचा विचारही या मागे आहे. ते आज कितपत योग्य आहे? अपवादात्मक म्हणून असा प्रवास त्यागींनी केला तर बिघडले कुठे? इथपर्यंत काही

विचारवंतांची मानसिकता येऊन पोहोचली आहे. या विषयला अनुसरून (४ जानेवारी, १९७१)[१७] 'आमची दिशा कोणती?' नावाचा लेख कुमुदिनी रोकडे, अकोला यांनी लिहिला. चित्रभानुजी हे श्वेतांबर साधू एकदा जैनतत्त्व समजावून सांगण्यासाठी विमानाने जिनेव्हाला गेले. तेव्हा त्यांच्यावर 'वायुकाय जीवाची हिंसा करीत जाणे दोषास्पद आहे' अशी श्वेतांबरांकडून टीका झाली. त्यावेळी 'काही दिगंबर मुनिंनीही परदेशागमन करून जैन प्रचार का करू नये?' अशी विद्वानांनी विचारणा केली. त्यानंतर या मुनींच्या परदेशगमनाबाबत आणि विमानप्रवासाबाबत बराच उलटसुलट वाद झाला. त्या प्रसंगाला धरून कुमुदिनी रोकडे यांनी दोन अकांतून प्रदीर्घ लेख लिहिले. जैन साधू, त्यांचे जीवन, आचरण तत्त्वे वैगेरे गोष्टी संदर्भात भाष्य केले. पण त्यामध्ये मुद्यांची गोष्ट बाजूला पडल्याचे जाणवले. एक चांगला विषय पण लेख भरकटत गेला... असे नाईलाजाने नमूद करावे लागले.

कु,. कुमुदिनी रोकडे यांनी (२७ मार्च, १९७१)[१८] 'आमची दिशा कोणती?' याच शीर्षकाचा दुसरा लेख लिहिला. जैनेतर समाजात ज्यांनी त्यांनी आपापली धर्मसंस्कृती जोपासली. त्यांची संघशक्ती टिकून राहिली पण आपल्या जैनांचे काय? या अर्थी जैन समाजाला दिशा दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्या म्हणतात, 'मुंबईत ख्रिश्चन कॅथलिकांचे अधिवेशन भरले. त्यांनी अर्धे जग ख्रिश्चनमय केले. मशिदीतून हजरत बाल (पैगंबराचा केस) चोरीला गेला तेव्हा तर भारत सरकारची पाचावर धारण बसली. आठ दिवसांत तो बाल (केस) शोधून काढला. पण आपले काय? आम्हाला धर्माची किंमत पैशापुढे कःपदार्थ वाटली. तसे नसते तर भगवंतांच्या मूर्ती फोडल्या, तोडल्या किंवा पळवल्या नसत्या. आपणच जागे केव्हा होणार. हे केवलीच जाणोत!' निराशेच्या हताश स्वरात जैनांना डिवचून त्यांनी जैन समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.

(२३ जून, १९७५)[१९] सौ. उषाताई मगदूम यांनी ' अभिनंदनीय विवाह' या संपादकीय लेखात प्रसिद्ध केले आहे की, 'बागाईतदार पोलीस पाटील आण्णा नाना फराटे, डिग्रज यांचे नातू प्रकाश यांनी जनगोंडा दादा पाटील, वसगडेकर यांची मुलगी चि. सौ. का. सुनंदा हिचेशी हुंडा न घेता, तसेच करणीच्या रूपाने निरर्थक महागडया वस्तू न घेता विवाह केला. त्यासंबधीचे विवेचन करून त्या म्हणतात, ' सर्व मुला मुलींच्या माता पित्यांनी, मुलामुलींनी ... विशेषतः मुलांनी वरील शुभ

सुरुवातीची री ओढली तरच हां हां म्हणता ही भयानक रूढी उखडून, उन्मळून पडेल. आमची तरुण पिढी इकडे लक्ष देईल काय?'

### ३.४ सन १९७६ ते १९८६ या कालखंडातील सामाजिक लेखन

(२७ एप्रिल, १९८१)[२०] एखाद्या घटनेचे पडसाद समाजाच्या सर्व स्तरांतून उठतात. लोक आपापल्या परीने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्यात स्त्रियाही मागे नाहीत हे सौ. प्रभावती रघुनाथ देशमाने यांच्या 'पत्र' या लेखावरून स्पष्ट होते. श्वेतांबर दिगंबरांचा शिरपूरचा वाद बराच गाजला. त्याला भरपूर प्रसिद्धी मिळाली. लेख छापून आले. असाच लेख वाचून प्रभावती देशमाने यांनी पत्र लिहिले आहे. अंतरिक्ष शिरपूर प्रकरणाबावत वाचून त्यांना असे वाटले की, 'आपणही तेथील आपल्या महिलामध्ये सामील व्हावे व श्वेतांबरी लोकांशी झगडावे. त्यावेळेस प्राण गेले तरी पर्वा नाही. तीर्थंकर व जैन बोधक मध्ये शिरपूरचे प्रकरण वाचताना डोळयातून अश्रू वाहतात.' शेवटी त्यांनी आपल्याला शिरपूरमधील महिलांची ओळख नसल्याचे सांगून उपाय सुचविण्याची विनंती केली आहे.

या लेखाकडे एखादा सामाजिक प्रश्न वैयक्तिक पातळीवर कसा येतो आणि भावनावशतेने प्राणाची पर्वा न करता यात स्वतःला झोकूण देण्याची तयारी कशी होते. याचे उदाहरण म्हणून बघता येईल.

सौ. प्रभावती देशमाने श्वेतांबरांशी झगडण्यासाठी स्वतः शिरपूर स्थळी उतरावे म्हणतात, तर अभ्यासपूर्ण विचार करून 'हा वाद आता संपायला हवा' असे सौ वासंती शहा (६ जुलै, १९८१)[२१] मध्ये म्हणतात. श्वेतांबर दिगंबरमधला शिरपूर वाद पाऊणशे वर्षापासूनचा जुना आहे. एवढया दीर्घ काळात काही निकाल दिगंबरांच्या बाजूने तर काही निकाल श्वेतांबराच्या बाजूने लागले आहेत. शिरपूर वाद, मक्षी पार्श्वनाथ वाद, केशरीयाजी वाद, गिरनार वाद वैगेरेंचे अभ्यासपूर्ण विवेचन करून वासंती शहा म्हणतात, 'आमची तीर्थरक्षा कमिटी काय करते? वादग्रस्त असलेले एकही क्षेत्र आमची तीर्थरक्षा समिती परत मिळवू शकली नाही. हा इतिहास आहे. पण दहा कोटींचा निधी वाढविण्यासाठी गावेगाव फिरणाऱ्यांना देणगीदार असा प्रश्न विचारत नाही की गिरनार, केशरीयाजी इथे भिल्ल गोसावी घुसले आहेत. कुठलेही आक्रमण तुम्ही यशस्वीपणे परतवू शकला नाही. मग दहा कोटींचा निधी कशासाठी जमवता आहात?' दोन्ही पंथांच्या प्रमुखांना एका व्यासपीठावर येण्याची गरज असल्याची आपली वैचारिक भूमिका मांडली आहे. दिवसेंदिवस तीव्र

होत जाणारा कलह थांबवायचा असेल तर परस्पर सामंजस्याने तो थांबवता येईल असे त्यांनी सांगितले आहे.

अनेक बाजूंना उजेडात आणणारा लेख लिहून समाजासमोर सौ. वासंती शहा यांनी जणू आरसाच धरला आहे. खरे तर हा पूर्ण लेखच एवढा परखड आणि मेंदूला झिणझिण्या आणणारा आहे. त्यामुळे तो मूळातूनच वाचायला हावा.

याच शिरपूर प्रकरणावर (३ ऑगष्ट, १९८१)[२२] 'शिरपूर प्रकरणाच्या निमित्ताने थोडे आत्मसंशोधन' हा लेख सौ. वासंती शहा यांनी लिहिला आहे. थोडया वेगळयाच बाजूंनी त्यांनी या लेखाची मांडणी केली आहे. या प्रकरणात त्यागी मुनींचीही काही जबाबदारी आहे,.त्यांच्याही योगदानाची गरज आहे. या विचारातून त्यांनी परखड... स्पष्ट शब्दांत लेख लिहिला आहे. त्या म्हणतात, 'आमच्याकडे मुनी-आर्यिका, ऐलक, क्षुल्लक यांची कमतरता नाही. भारतभर ते इतस्ततः विहार करीत असतात. पण शिरपूरला मात्र कोणी गेले नाही. कोटीचा संकल्प पुरा करण्यासाठी १५ हजार मैलांची पदयात्रा करून झाली, पण ती पावले शिरपूरकडे वळली नाहीत. कोटींची भरती करण्यासाठी समाजाला पुन्हा पुन्हा आवाहने केली. पण 'चलो शिरपूर' असे कोणी म्हणाले नाही. शिरपूरला शांतता प्रस्थापित होण्यासाठी इतरत्र जप-जाप्य-यज्ञ केला गेला. तो शिरपूरमध्ये केला असता तर, या झगडयाची इतिश्री झाली असती.

दिवाळी अंक सप्टेंबर, १९८१ प्रसिद्ध झाला. या दिवाळी अंकामध्ये (१४ सप्टेंबर, १९८१)[२३] कु., कुमुदिनी रोकडे यांनी पुन्हा शिरपूर घटनेसंबंधी लेख लिहून लंकडभाईनी सुचवलेल्या तोडग्यांचा परामर्श घेतला आहे. 'असा असावा सत्याग्रह लुंकड भाईना पत्र...' असे या लेखाचे स्वरूप असून त्या म्हणतात, 'लोकमतातील आपले विचार वाचून समाधान वाटले.' शिरपूर घटनेचे विवेचन करून त्या परखडपणे म्हणतात, 'मनमाड अग्निकांडाच्या दाहक वेदना अजून जागृत असताना कुण्या साधूने मानवतेला कलंक लावणाऱ्या या भयंकर घटनेला क्षुल्लक ठरवले हा जैनांचा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे.' लुंकडभाईंच्या मताशी सहमत असल्याचे कुमुदिनी रोकडे यांनी सांगितले असले तरी, त्यांचे सर्वच मुद्दे त्यांनी स्विकारले नाहीत. स्पष्ट शब्दात त्याला तीव्र विरोधही केला नाही.

लुंकडभाईनी सुचविलेले तोडगे- १) दोन्ही पंथांच्या ४/४ लोकांनी एकत्र येऊन तोडगा काढावा. २) चिट्ठी टाकून निर्णय घ्यावा...... हा तोडगा लेखिकेला हास्यास्पद वाटतो. त्या

म्हणतात चिठ्ठी टाकून निर्णय घ्यायला, धर्मक्षेत्र ही काही लॉटरी नव्हे.    ३) हे क्षेत्र सरकारने ताब्यात घ्यावे......लेखिका म्हणते, ' हा वाद अहिंसेने मिटवावा.'

लेखाच्या वर लुंकडबाईंनी चौकट टाकली आहे. ती अशी, 'आपली क्षेत्रे अजैनांच्या ताब्यात गेलेली जैनांना चालतात पण आपल्याच भावाला ती देणे सहन होत नाही.' लुंकडभाई तोडगे चार म्हणतात पण दिले तीन आहेत.

सामाजिक आशय आणि सामाजिक प्रश्नासंबंधीची चर्चा या लेखात केली आहे हे महत्त्वाचे आहे.

(२४ फेब्रुवारी, १९८२)[२४] सौ. वसंती शहा यांनी 'भट्टारक संस्थेचा मूळ उद्देश आणि आजचे भट्टारक' असा खरमरीत पण वस्तुस्थिती निर्देशक लेख लिहिला आहे.

खरतर पूर्ण लेख मुळातूनच वाचण्यासारखा आहे. पण इथे थोडक्यात त्याचा आढावा देत आहे. तोही वासंती शहांच्या भाषेत...

जैन संस्कृती आणि वैदिक संस्कृती हजारो वर्षापासून शेजारी नांदत आल्यामुळे आचार विचारांची देवाणघेवाण होणे स्वाभाविक होते. भट्टारक संस्था ही अशाच एका पध्दतीचे अनुकरण आहे. शंकराचार्यांनी इ.स. आठव्या शतकामध्ये देशाच्या चार भागामध्ये चार धर्मपिठे स्थापन केली. त्याच धर्तीवर जैनांमध्ये भट्टारक संस्था अस्तित्वात आली. ती स्थापन करण्यामागे उद्देश हा होता की, जैन संस्कृतीचे आणि समाजाचेही रक्षण करणे., बंधुभाव जोपासणे धर्मजागृती करणे वगैरे... पण काळाची  गरज म्हणून ज्या सद्हेतूने एखादी प्रथा सुरू होते तो हेतू काही वर्षांनी विस्तृत होतो आणि ती प्रथा मात्र स्थूल रूपाने चालू राहाते. भट्टारक संस्थेचीही तीच गत राहिली. समाजाकडून भंडारपट्टी वसूल करणे, मंदिर बांधणे, प्रतिष्ठा करणे, प्रतिष्ठाचार्य म्हणून मिरवणे आणि भरपूर बिदागी मिळवणे एवढाच भट्टारकांचा समाजाशी संपर्क राहिला आहे. त्यांच्या अशा समाजहित विरोधी धोरणामुळे व स्वार्थी वृत्तीमुळे ईडर (गुजराथ), कारंजा (विदर्भ), येथील पीठे रद्द झाली..., वैगेरे खूप विस्तृत लेख लिहून समाजाच्या डोळयात अंजन घालण्याचे काम वासंती शहा यांनी केले आहे. त्या म्हणतात, 'श्रावकच आता जागरुक व्हायला हवेत. पीठाचा पैसा हा समाजाचा पैसा आहे. त्या पैशातून सहकारी स्वरूपाचे उद्योग का निघू नयेत? गरीब विद्यार्थ्यांच्यासाठी शिक्षणाची सोय का होऊ नये ?' शेवटी... 'धार्मिक भ्रष्टाचाराला वाव देण्यासाठी भट्टारकांसारखेच श्रावकही

करणीभूत आहेत. सगळेच कर्तव्यविन्मुख झालेले आहेत...' अशा आशयाचे आपले मत त्यांनी निर्भी डपणे मांडले आहे.

(१७ फेब्रुवारी, १९८३)[२५] सौ. वासंती शहा यांनी 'बहिष्कार जारीच आहे' हा लेख लिहिला आहे. विधवा विवाहाला कायद्याने मान्यता मिळाली आहे. पण धर्ममान्यता मिळालेली नसल्यामुळे समाजमान्यताही मिळाली नाही. त्यामुळे अशा विवाहांनंतर खूप चर्चा होते. तसेच पोटजातीय विवाहसुद्धा थोडाफार चर्चेचा विषय होतो आणि त्याला कारणीभूत समाजाबरोबर त्यागीही असतात. अशा आशयाचा लेख आहे. विजातीय वा विधवा विवाह केलेल्यांकडून महाराज आहार घेत नाहीत. यासंबंधीचे लेखन 'तीर्थंकर' मधून वाचल्यानंतर वासंती शहा यांनी प्रस्तुत लेख लिहिला आहे.

(२० जून १९८३)[२६] सौ. वांसती शहा यांनी आपल्या 'ही कोंडी आता फुटलीच पाहिजे' या लेखात माणसाला वाळीत टाकून कोंडीत पकडण्याची मानसिकता बदलली नाही यावर प्रकाश टाकला आहे. माढा गावातील श्री विलास शहा यांच्यावर तेथील गुजर समाजाने बहिष्कार टाकला तो एवढयासाठी की, विलास शहा यांची ८० वर्षाची मावशी तेथील दलित बालवाडीमध्ये जाऊन तेथील १०० मुलांना रोज रुचकर खाऊ बनवून खायला घालून यायची. मावशी दलित वस्तीमध्ये जाते म्हणून मावशीसह सर्वच कुटुंबियांना गुजर समाजाने मंदिरात यायला बंदी घातली. दोन तीन महिने असा त्रास सहन केल्यानंतर विलास शहा यांनी पत्रक काढून बहिष्काराला महाष्ट्रभर प्रसिद्धी दिली आणि बहिष्कार उठेपर्यंत उपवास करण्याची घोषणा केली. उपवासासाठी ते मंदिरात जाऊन बसले पण प्रतिष्ठित आणि ट्रस्टी लोकांनी दबाव आणला. हे प्रकरण वर्षभर धुमसत आहे. त्याची कोंडी फुटायला हवी म्हणून वासंती शहा यांनी या प्रकरणाला लेखनाद्वारे पुन्हा प्रसिद्धी दिली. कळसा गावातील घटनाही अशीच म्हणून कळसा गावाचा उल्लेख करून त्या म्हणतात, ' मुनींच्या प्रभावाखाली असलेल्या धनिकांच्या या कृत्याला वाचा फोडायला हवी!'

(१२ डिसेंबर, १९८३)[२७] 'जिकडे धर्म तिकडे विजय' असा लेख कळसा बहिष्कार प्रकरणावर लिहून अशा प्रकरणात मुनींनी घेतलेल्या मौन भूमिकेबद्दल नाराजीतून आवाज उठवला आहे. त्या म्हणतात, 'इतर मुनींनी या प्रकरणात लक्ष घालायला काय हरकत होती?' मुनींना बहिष्कार उठवणे सहज शक्य होते. मग त्यांनी बहिष्कृत श्रावकाप्रती वात्सल्यभाव का दाखवला नाही? हे धर्म कार्य नव्हते काय? विधवेने पुनर्विवाह करावा की नाही? याची चर्चा धर्मशास्त्रात

कोठेही आढळत नाही. पन जैनांनी हिंसक कृत्ये करू नयेत असे मात्र शास्त्रात स्पष्टपणे सांगितले आहे. पण समाजात चित्र काय दिसते?'

वासंती शहा यांनी लेख विस्ताराने लिहून कळसा प्रकरणाबद्दल विरोध आणि मुनी मौनाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

श्वेतांबर-दिगंबर यांचा बाहुबली डोंगरावरचा वाद... खरे तर झगडाच खूप गाजला आणि वाजला पण कोल्हापूर आणि सांगली भागातल्या स्त्रियांनी एवढया मोठया ज्वलंत घटनेविषयी खूप कमी लेखन केलेले आहे. या संदर्भात प्रा. जी. के. पाटील यांनी पानं भरून अग्रलेख लिहिले. स्पष्ट, परखड, घणाघाती आवाजी लेखांनी त्यांनी पानं भरून अग्रलेख लिहिले. त्यांनी प्रगतीचे अंक अक्षरशः गाजवले. एक प्रकारचे तुफानी शाब्दिक हल्ले करून हिंसकतेवर तोफा डागल्या, कदाचित त्यामुळेच असेल स्त्रियांनी या संदर्भात लिहिण्याचे धाडस केले नसावे. तरीही 'स्त्री' शक्तीचा नवा अविष्कार' नावाचा लेख (२ जानेवारी, १९८४)[२८] श्रीमती सरोजनी खंजीरे यांनी लिहून बाहुबलीवरील स्त्रियांच्या योगदानाचे कौतुक केले. मोठया संख्येने झालेला स्त्रियांचा सहभाग...त्यांना केलेली अटक...सुटका वैगेरे बाबींचा उल्लेख करून बाहुबलीवरील मशाल मिरवणूक आणि झालेल्या दगडफेकीचा निषेध व्यक्त केला.

याच अंकामध्ये सौ कांचन कापसे यांनी 'बाहुबली प्रकरणी स्त्रियांचे मनोगत' नावाचा लेख लिहिला. त्यांनी बाहुबली प्रकरणाचा आढावा घेतला आणि हिसंक कृत्ये, मारामारी, दगडफेक न करता अहिंसक मार्गाने सत्याग्रह करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

याच बाहुबली घटनेवर (९ जानेवारी, १९८४)[३०] ऐतिहासिक दाखले देऊन सौ. कुमुदिनी रोकडे यांनी 'जैन समाज जागृत आहे काय?' नावाचा लेख लिहिला. त्यात त्या म्हणतात, 'आम्ही अध्यात्मवादी असावे. मोक्षेसू असावे. आसक्त असू नये या अर्थाने आमच्या उदासीनवृ,त्तीने आमची अमूल्य जीवनमूल्ये उघडया डोळयांनी नष्ट होऊ द्यावीत काय. सर्वसंग परित्याग केलेल्या मुनींची गोष्ट वेगळी पण सर्वधारण श्रावकांना छप्परात राहावयाचे असेल तर गळके छप्पर दुरूस्त करायलाच हवे. इतिहासात महान राजे होऊन गेले. प.पू. १०८ श्री सिद्धार्थ सेनाचार्य, प.पू.श्री सिंहनदी आचार्य यांनी पराक्रमी शूरवीर राजे घडविले, निर्माण केले. पण आज इतिहास घडविण्याची ताकद आपल्यात नाही. संपूर्ण विनाश होण्यापूर्वी आम्ही जागृत होणे महत्त्वाचे नाही काय?

कळसा प्रकरण नेमके काय आहे? त्याबद्दल थोडे स्पष्ट लिहायला हवे. कळसा हे कर्नाटकामधील एक जैन वस्ती असलेले गाव. कळसा गावामधील जैन समाज म्हणजे तेथील लोक दासीपुत्र आहेत. (धर्मपत्नी सोडून ठेवलेल्या बाईपासून झालेली मुले) असा एक समज आहे. कदाचित पूर्वीच्या काळातील ती वस्तुस्थिती असू शकेल. विवाहबाहय किंवा विधवेपासून (विधवा विवाहापासून) झालेली संतती असू शकेल. तर श्रवणबेळगोळला जाताना विमलसागर महाराजांचा संघ कळसा गावात गेला. कळसातील लोकांनी आनंदाने स्वागत केले. आहाराची जय्यत तयारी केली. पण महाराजांनी जाहीर केले की, कळसा गावातल्या लोकांकडून आहार घेणार नाही. सर्व महाराजांनी आपल्या संघातील चौकातच आहार घेतला. या घटनेने गावातील लोक चिडले. एकच गदारोळ उठला. पुढे महाराजांनी कळसा गावातील संतती ही अनौरस असल्याचे सांगून त्यांना मंदिरात येऊ द्यायचे नाही असा आदेश दिला. बहिष्काराचे पत्रक काढून ते पसिद्ध केले. या घटनेनंतर कळसातील लोकांनी सौ. वासंती शहा आणि प्रा. सौ. लिलावती जैन यांना पत्रक पाठवले. तेव्हा वासंती शहा आणि लिलावती जैन यांनी कळसातील लोकांना सांगितले, ‘बहिष्काराचे पत्रक केराच्या टोपलीत टाका’ लोकांनी तसे केले. पत्रक केराच्या टोपलीत टाकले. त्यावर आधारित प्रस्तुत लेख लिहिला आहे.

त्यानंतर वासंती शहा यांनी एक विस्तृत पत्रक काढले. त्या पत्रकात कळसा गावात घडलेल्या घटनांचा सविस्तर आढावा घेऊन त्यामध्ये जैन समाजातील लोकांच्या आलेल्या प्रतिक्रियाही नोंदवल्या आहेत. तसेच कळसा गावातील लोकांनी वासंती शहा यांना पाठविलेल्या पत्राचा समावेश केला आहे. त्या पत्रावरून लक्षात येते की, कळसा गावात ‘दासीपुत्र’ असलेल्या समूहाला....समाजातील त्या श्रावकांना बहिष्कृत केले असून त्यांना देवळात धर्मक्रियासुद्धा करू देत नाहीत. अभिषेक, पुजादी धर्मक्रिया सुद्धा त्यांना करू देत नाहीत. दाराशी पायरीजवळ त्यांची जागा असते. तिथे पायरीजवळ बसून ते फक्त णमोकार मंत्र जाप करू शकतात. पूजाविधी दुरूनच पहातात. श्रावण पोणिमेला जानवे देतानाही पंडित दुरूनच त्यांच्या अंगावर जानव्यांची भंडोळी फेकून देतात.

वासंती शहा यांनी या सर्व गोष्टीचा आढावा घेऊन पत्रकात शेवटी लिहिले आहे की, ‘कळसा परिसरातील श्रावक त्या मुनींना भावी केवली भगवान मानून मोठया भक्तीने आहार द्यायला

गेले होते. पण त्या भक्तांची नवधाभक्ती अव्हेरून त्यांनी जणू दाखवून दिले की, दासी चंदनबालेच्या हातचा आहार घेणाऱ्या महावीरांच्या परंपरेपासून आपण फार दूर गेलो आहोत.'

(प्रा. सौ. लीलावती जैन यांनी निर्भिडपणे आपले विचार मांडण्यासाठी 'धर्ममंगल' नावाचे स्वतंत्र मासिका सुरू केल)

वासंती शहा यांनी जिथं जिथं अन्याय घडतो, भ्रष्टाचार होतो. गैरवापर केला जातो. तिथं तिथं आवाज उठवला आहे. असाच त्यांनी (२१ मे, १९८४)[३२] 'मुंब्रा येथील बाहुबली मंदिर ट्रस्टचा गैरवापर' आपल्या लेखणीतून समाजासमोर आणून जनमत जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. 'मंदिर बांधण्याची भावना वारसा हक्काने आलेल्या ट्रस्टी जवळ नसते' असे विधान करून त्यांनी घराणेशाहीच्या भूमिकेवरच आपले मत व्यक्त केले आहे. मुंब्रा मंदिर ट्रस्टीच्या १३ एकर जागेपैकी १० एकर जागा ट्रस्टीने झोपडीमागे २००० हजार रूपये घेवून मुसलमानास दिली...या प्रकरणाची जाहीर वाच्यता करून मूर्तीसमोरची फक्त ३ एकर जागा आहे ती तरी वाचवावी या कळकळीने आणि पोटतिडकीने लेख लिहिलेला जाणवतो.

(२३ जून, १९८४)[३३] बुवाबाजी करणाऱ्या जैन मुनीविरोधीही सौ. वसंती शहा यांनी 'आता दिगंबर समाजातही बुवाबाजी' या लेखात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या म्हणतात, 'काही मुनी दर्शनाला येणाऱ्यांना व्रत, नियम देण्याऐवजी पावती पुस्तक सरकवतात, धर्मा चरणच मनाला सुखशांती मिळते, हे पटवून देण्याऐवजी मंतरलेला नारळ घरात टांगण्यास देतात. हे बदलण्यासाठी एकत्र येऊन आघाडी निर्माण केली पाहिजे, तरच आपल्याला समाजात नव्याने सुरू झालेल्या बुवाबाजीला रोखता यईल.

(१५ एप्रिल, १९८५)[३४] वासंती शहा यांनी, 'श्री क्षेत्र कुंथलगिरीच्या व्यवस्थापनातील गुरूकुल आणि त्यांचे व्यवस्थापन' या विषयावर...गुरूकुलाच्या एकूण परिस्थितीवर प्रकाश टाकला आहे. गुरूकुलामध्ये शिक्षण घेणारी गरीब मुले...त्यांचे खालावलेले राहणीमान, त्यांच्या गरजा आणि समाजाकडून मदतीची अपेक्षा व्यक्त करणारा लेख लिहून श्रावकांच्या सामाजिक मदतीची अपेक्षा लिहून श्रावकांच्या सामाजिक जबाबदारीला हलविण्याचा प्रयत्न केला आहे. अशा संस्थांकडे समाजाचे कसे दुर्लक्ष होते. इकडे समाजाचे लक्ष वेधले आहे.

'सूर्यकिर्ती' प्रतिमेचा निषेध करा' असे प्रा. सौ. लीलावती जैन यांनी (२९ मार्च, १९८५)[३५] लेखनातून आवाहन केले आहे. गुजरातमधे पंचकल्याणिक पूजा झाली. त्या पूजेमध्ये

कानजी स्वामींच्या कल्पित भावी चौथ्या भावातील तीर्थंकर सूर्यकिर्तीच्या प्रतिमेचीही प्रतिष्ठापना केली. लीलावती जैन यांनी याचा निषेध केला आहे. समाजात असे अयोग्य प्रवाह निर्माण होऊ नयेत म्हणून प्रस्तुत लेख लिहिला असून शेवटी त्या म्हणतात, 'कानजी स्वामींचा पुतळा व्हायला हरकत नव्हती. शेवटी व्यक्तीपूजेपेक्षा सिद्धांतपूजा महत्वाची हे श्रावकांनी लक्षात ठेवावे.'

## ३.५ सन १९८७ ते २००२ या कालखंडातील सामाजिक लेखन

वासंती शहा यांनी (१९ जानेवारी, १९८७)[३६] 'शेडबाळ छात्रालयातील गरीब मुलांची दयनीय अवस्था' असा लेख लिहून समाजाचे लक्ष तिकडे वेधण्याचा प्रयत्न केला आहे. गुरूकुल किंवा आश्रमसंस्था या समाजातील गरीब अनाथ मुलांच्या राहण्याच्या सोयीसाठी सुरू केलेल्या आहेत. अशा संस्था ही सामाजिक गरज असते आणि या गरजेची परिपूर्णता करायला हवी याची समाजाला जाणीवही असते. या जाणिवेतूनच या संस्था चालत असतात पण कधी कधी वस्तुस्थिती फारशी चांगली दिसत नाही. अशा संस्थेविषयी हा लेख लिहिला आहे. लेखिका एकदा आश्रमातील मुलांना गणवेश देण्यासाठी गेल्या. तेव्हा तिथे दिसलेला ऑखो देखा हाल त्यांनी प्रस्तुत लेखामध्ये मांडला आहे. तो असा, '...

- काही मुले अर्धउघडी तर काही मुले फाटक्या कपडयात आढळली. वसंती शहा यांना सांगितले की, रविवार असल्यामुळे मुलांनी कपडे धुतले आहेत.'
- आर्थिक परिस्थितीची चौकशी केली असता प्रत्येक वेळेला उत्तरे वेगवेगळी दिली.
- १५ ते १६ वर्षांची मुले बारीक आणि खुरटलेली दिसली.
- मोठी मुलेही खालच्या वर्गात शिकत होती.
- गोटा केलेल्या डोक्यावर खवले पडलेले दिसले.
- दोनच खोल्यात ५५ मुले राहात होती. बाकीच्या खोल्या कुलुपबंद होत्या.
- कुठल्याही मुलांच्या चेहऱ्यावर हसू नव्हते.

वासंती शहा म्हणतात, 'याला जबाबदार कोण? व्यवस्थापन की समाज? की आम्हाला मिळालेली धर्माची शिकवण? आमच्या डोक्यात भरवलेल्या दानधर्माच्या विपरीत कल्पना की धर्म प्रभावनेच्या कल्पना?'

'क्रांतिकारक निकाल' म्हणून संपादकीय लेख केरळमधील एका पोटगी खटल्यासंबंधी सौ. सुमन चौधरी यांनी (१ जुन, १९८७)[३७] लिहिला आहे. सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती ए.पी.सेन आणि

न्यायमूर्ती एस. नटरवाजन यांच्या खंडपीठाने सर्वधर्मीय स्त्रियांना पोटगीपात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण व क्रांतिकारक निकाल केरळमधील सायराबानू अब्दुलगफुर यांच्या खटल्यात देऊन सायराबानूस दरमहा ३०० रू व तिच्या कन्येस दरमहा २०० रुपये द्यावेत असा आदेश दिला. त्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी संपादकीय लिहून सामाजिक कर्तव्यातला आपला महत्त्वपूर्ण संपादकीय वाटा उचलला आहे.

(१० ऑगष्ट, १९८७)[३८] या एकाच अंकात 'सणावारी देव भाडयाने देणारे ट्रस्टी' आणि 'मूळ तीर्थाची उपेक्षा करून तीर्थरक्षा कशी होणार?' असे दोन परखड लेख वासंती शहा यांनी लिहून सामाजिक जाणिवांची व्यापकता समाजासमोर आणली आहे.

जैन समाजातील मनमानी कारभार करणाऱ्या ट्रस्टींची प्रवृत्ती 'सणावरी देव भाडयाने देणारे ट्रस्टी' या लेखात उजेडात आणली आहे. मुंबईच्या उपनगरात राहणाऱ्या धर्मबांधवाकडून वासंती शहा यांना ट्रस्टींच्या मनमानी कारभारासंबंधी घटना सांगणारी दोन पत्रे निवेदनासह आली पहिल्या पत्रामध्ये (श्वेतांबर गृहस्थांनी लिहिलेले) सांगितले गेले की, महावीर जयंतीला श्वेतांबर जैन समाजाने भ. सुमतीनाथ मंदिरापासून मुंबई येथील बाहुबली मंदिरापर्यंत पालखी नेली. तिथे महाराजांचे प्रवचन, ८७० लोकांचे जेवण वगैरे झाले. पण त्यासाठी ट्रस्टींच्याकडून काहीही मदत झालेली नाही, उलट ट्रस्टींनी २५० रुपये भाडे मागितले. दुसऱ्या पत्रातील मजकूर असा...भगवान महावीर जन्मकल्याणक दिवशी बाहुबली जैन मंदिरामध्ये ट्रस्टींची एकही व्यक्ती हजर नव्हती. रोषणाई नव्हती, रोषणाई, पताके, काहीच नव्हते. नळाला पाणीही नव्हते. कारण नळाचे बील भरले नव्हते. त्यामुळे श्वेतांबर भाविकांना फार त्रास भोगावा लागला'.

वासंती शहा यांनी आलेल्या पत्राची जाहीर वाच्यता लेखनातून केली आहे. शेवटी एक टीप दिली आहे की, टीप- भगवान बाहुबली जैन मंदिर मुंब्रा यांनी लेखात नमूद बाबीसंबंधी आपले मनोगत पाठवावे प्रसिद्धी दिली जाईल.

'मूळ तीर्थाची उपेक्षा करून तीर्थरक्षा कशी होणार?' या लेखात सामाजिक भ्रष्टाचारासंबंधी काही प्रश्न उपस्थित केले आहेत...... ११ कोटींचे उद्दिष्ट ठेवून तीर्थरक्षा समितीने रथ सोडला आहे. समितीजवळ सध्याही अडीच तीन कोटींचा निधी आहे, त्याचे व्याज वर्षाला २५ ते ३० लाख येते. तो पैसा जीर्णोद्धारासाठी खर्च केला जातो पण कोणत्या क्षेत्राला पैसा दिला जातो? जीर्णोद्धार खरोखर झाला का? समिती तिकडे लक्ष पुरविते का? आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावते का?

असे अनेक प्रश्न उपस्थित करून त्या म्हणतात, 'क्षेत्र नेहमी पडक्या अवस्थेत ठेवणेच ट्रस्टींच्या फायद्याचे आहे. त्यामुळे यात्रेकरूकडून नित्य पैसे उखळता येतात. मात्र यात समाज पिळून निघतो.' खरी तीर्थक्षेत्रे कुठली? यावर सुंदर विवेचन केले आहे. त्या म्हणतात, मुनी, आर्यिका म्हणजे मूळ धर्मतीर्थ! भारतभर विखुरलेले अज्ञानग्रस्त आणि दारिद्रयग्रस्त श्रावक म्हणजे जिवंत श्रावक तीर्थ! यांच्या रक्षणाची योजना आखिल भारतीय दिगंबर जैन तीर्थरक्षा समितीजवळ आहे काय? या तीर्थाची उपेक्षा करून तीर्थरक्षा कशी होणार?

खाली टीप दिली आहे की, टीप-तीर्थरक्षा समितीचे नूतन अध्यक्ष अशोककुमार जैन यांचेशी या लेखात नमूद असलेल्या बाबींसंबंधी पत्रव्यवहाराने संपर्क साधला पण काहीही उत्तर आले नाही. कृपया त्यांनी आपले मनोगत कळवावे, त्यास प्रसिध्दी दिली जाईल.

राजस्थानमधील रूपकुंवर या सती गेलेल्या स्त्रीच्या घटनेवर संपादकीय सौ सुमन चौधरी (५ ऑक्टोबर, १९८७)[४०] यांनी लिहून या घटनेला 'अमानुष केवळ अमानुष' म्हटले आहे. पुढे सती बंदी कायदा...... राजाराममोहन रॉय वैगेरे संबंधी विवेचन आहे.

श्रध्दा-अंधश्रध्देचा खेळ मानव निर्मितीपासून चालूच आहे आणि अंधश्रध्दा दूर करण्याचे प्रयत्नही चालूच आहेत. मानवबळीपासून पशुबळी पर्यंत आणि देव-देवतांपासून भूत पिशाच्या पर्यंतच्या गोष्टी भोवती सतत अंधश्रध्देचे वलय फिरत आलेले आहे.त्यामध्ये क्रुरता आहेच. स्वार्थही आहे आणि भोळया भाबडया माणसांची फसवणूकही आहे. अशाच अंधश्रध्देच्या रूढी परंपरेवर (७ मार्च १९८८)[४१] 'केवढे हे क्रौर्य' सौ. प्रेमलता गुंडे यांनी संपादकीय लिहिले आहे. 'बिरदेव यात्रेमध्ये, २२ फेब्रुवारीच्या दै. सकाळमध्ये ७ हजार बकऱ्यांचे बळी दिले' ही बातमी वाचून सौ गुंडे म्हणतात, 'हे म्हणजे समाज्याच्या कुरतेचे लक्षण आहे. बिरदेव हा शाकाहारी देव पण त्याचे भक्तगण मंदिराभोवती भुतावळ येवू नये म्हणून हजारो बकऱ्यांची कत्तल करतात. ही अंधश्रध्दा थांबविण्यासाठी, निष्पाप जीवांची हत्या थांबवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने काहीही उपाययोजना, हालचाल केलेली दिसत नाही. द. भा. जैन सभेने आणि सर्व स्तरावरील समाजधुरीणांनी समाज जागृती करणे आवश्यक आहे.

(५ डिसेंबर, १९८९)[४२] सौ. शरयू शरद मोहिरे, पुणे यांनी जैन कासार समाज मृत्युच्या छायेत या लेखामध्ये पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे, हे जेवढे खरे आहे तेवढेच पैशाशिवाय जगता येत नाही, हे ही खरे! माणूस जेव्हा आर्थिक अडचणीमध्ये येतो. पोट भरण्याची भ्रांत पडते, तेव्हा तो

वैचारिक शिथिलता येऊन बुद्धिहीन झाल्याप्रमाणे कळपामागे (चारा दिसेल तिकडे) जाऊ लागतो. ही त्याची अगतिक असते आणि य अगतकितेचा फायदा अन्य लोकांकडून घेतला जातो. अशाच एका घटनेसंबंधी सांगितले आहे. 'कोकण कासार परिषदे'च्या निमित्ताने सर्व जैन कासारांचे कोकणातील कासारवाडी (रायगड) येथे धर्मांतर झाले आहे, अशी खळबळजनक माहिती देऊन पुढे म्हटले आहे की, 'हिंदू कासाराच्या नेतृत्वाने जैन कासार समाजाला आर्थिक प्रगतीच्या योजना सांगितल्या आणि हिंदू कासार या नावाखाली सर्व गरीब कासारांनी एक व्हावे, असे त्यांनी आवाहन केले आणि जैन कासारांनी धर्मांतर केले. सर्व जैन कासार स्वतःल अजैन म्हणवून घेऊ लागले आहेत.

(एखादया व्यक्तीने धर्मांतर करणं आणि सगळा समाज धर्मांतर करणं हया दोन गोष्टी वेगळया आहेत. म्हणजे हे भयंकरच आहे. खरेतर जैन समाज यावर खडबडून जागा व्हायला पाहिजे पण तसे दिसत नाही, कारण इतर कुणी स्त्रियांनी यावर प्रतिक्रिया नोंदवल्याचे आढळले नाही.)

'ऐतिहासिक घटना' म्हणून संपादकीय सौ.प्रेमलता गुंडे यांनी (७ जुलै, १९९०)[४३] लिहिले आहे. (२४ जून, १९९०)[४४] रोजी दक्षिण भारत जैन सभेचे ७१ वे नैमित्तीक अधिवेशन झाले. तेव्हा 'वीरबाला महिला सेवा दल' या शाखेची स्थापना केली. शाखेचे स्वागत करून शाखेच्या कार्याबद्दल अपेक्षा व्यक्त केल्या आहेत की, अशा सेवा दलातून स्त्रीच्या मानसिक आणि बौद्धिक उक्रांतीची अवस्था प्राप्त होईल. जेव्हा समदुःखी, समानधर्मी म्हणून स्त्रिया स्वतःला ओळखू लागतील तेव्हा सासू सुनेला समजावून घेईल. आई लेकीला ओळखेल. यातूनच आधुनिक स्त्री जन्माला येईल आणि समाजातील स्त्री पुरूषाचे स्थान समानतेच्या पातळीवर अधिक उपयुक्त आणि हितकारक ठरेल. ती तशी ठरावी अशा आशयाचा लेख लिहून पुढे 'वीरबाला महिला सेवा दल' च्या गरजेवर भाष्य केले आहे.

सौ. विमला दोशी, पुणे यांनी 'तीर्थक्षेत्रांची होणारी अवहेलना थांबवली पाहिजे.' या लेखामध्ये 'भिकाऱ्यांना भीक देऊ नका त्याच्या हातांना काम द्या.' असे गांधीजी म्हणत हाच विचार थोडया वेगळया अंगाने तीर्थक्षेत्रांच्या पार्श्वभूमीवर मांडला आहे. तीर्थक्षेत्रावर 'निछावर न्योछावर' म्हणून भीक मागणारे किती तरी असतात. चिल्लर, नाणी त्यांच्या पुढयात टाकून पुण्य कमावणारेही अनेक असतात. पण असे दान करण्यापेक्षा या दानवृ,त्तीला वळण देवून , त्यांच्या दानाचा ओघ

एकत्र करून अशा लोकांचे उत्थापन केले पाहिजे असा एक आदर्श... मानवतावादी विचार सौ. दोशी यांनी मांडला आहे. तसेच प्रवेशद्वारावरचे, उपहारगृह, रसगृह, घोडयांचे, उंटाचे ताफे, डोलीवाल्यांचा बाजारूपणा वैगेरे व्यावसायिकतेवर आणि त्यातील लांडी लबाडीवरही भाष्य करून ही अवहेलना थांबवली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

(१४ एप्रिल, १९९२)[४६] वधू वर पालक मेळाव्या संबंधी सौ स्वाती रोकडे यांनी लिहिले आहे. या व्यासपीठावर हुंडा प्रथा, पोटजात, पुनर्विवाह वैगेरेचा विचार केला गेला. पण बऱ्याच पालकांनी मुलांना बरोबर आणले नव्हते व मुलांना न आणलेल्यांना १०० रू. दंड लावला होता. ही गोष्ट योग्य होती असे त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. बरोबरच आहे, वधू-वर नसतील तर वधूवर परिचय मेळाव्याचे प्रयोजनच काय?

नीलम माणगावे यांनी (१९ ऑक्टोबर, २००१)[४७] दिल्ली येथील जैन मंदिरामध्ये तिघांची हत्या करून जबर चोरी केली. या घटनेवर आधारित समाज जागृतीसाठी 'दिल्ली मंदिरातील घटना, काही प्रश्न' या लेखात समाजासमोर काही प्रश्न उपस्थित केले आहेत की, 'समाजात दारिद्रय, दुष्काळ, बेरोजगारी यांची संख्या वाढत गेल्यावर आपली ऐश्वर्य संपन्न मंदिरे किती काळ सुरक्षित राहणार आहेत? शांतीची, अंहिसेची शिकवण देणाऱ्या जैन मंदिरांसमोर संरक्षणासाठी पोलीस ठेवणे म्हणजे अहिंसेची क्रूर चेष्टाच नव्हे काय? ऐश्वर्याचे प्रदर्शन करून मंदिरे मौल्यवान बनविण्यापेक्षा हा पैसा समाजविकास कामासाठी, प्रबोधन प्रकल्पासाठी वापरला तरच आपली मंदिरे खऱ्या अर्थाने अहिंसेची श्रध्दा स्थाने बनतील.'

(१६ नोव्हेंबर, २००१)[४८] पंचकल्याणिक पूजा आणि त्यामधील ५६ राजे हा पूजेमधील नेहमीचाच अत्यावश्यक आणि अनिवार्य प्रकार! या प्रकारासंबंधी घडलेली एक घटना सांगून नीलम माणगावे यांनी 'तरी ती गप्प का बसते ! ... का?' असा अग्रलेख लिहिला. त्यावर बऱ्याच प्रतिक्रिया आल्या. एक वैचारीक घुसळण झाली. घटना अशी ... पंचकल्याणिक पूजेम,ाधील ५६ राजांमध्ये (हे राजे नेहमी पुरूषच असतात) मुलीही होत्या. राजसम्राटांना नजराना देण्यासाठी एक मुलगी उठते तेव्हा सूत्रधार निवेदनात म्हणतात, 'अमुक देशाचे राजे परगावी गेले आहेत. त्यांनी आपल्या मुलीला महावीरांच्या दरबारामध्ये पाठवले आहे.' सूत्रधाराच्या या वक्तव्यावद्दल लेखिकेने नाराजी व्यक्त केली आहे की, सूत्रधारांनी असं का म्हणावं? त्यांनी त्या मुलीचं स्वतंत्र अस्तित्व का मानलं नाही? आपल्याकडं राज्यकर्त्या स्त्रियांची अभिमानास्पद मोठी परंपरा आहे. झाशीची राणी,

राणी चन्नमा, ताराराणी... मग असे का? एखाद्या महाराणीचे नाव त्या मुलीला द्यायला काय हरकत होती? अजून किती वर्षे बायकांना नाकारणार आहात? बायकांनी अजून किती वर्षे स्वयंपाकघरामध्ये-माजघरामध्ये बसायचं? त्यांना राजदरबारात स्थान नाहीच का?.... वगैरे. लेख मुळातूनच वाचायला हवा (परिवर्तन समाजातील स्त्रीचा आत्मसन्मान आणि पुरुषप्रधान समाजरचनेकडे अंगुली निर्देश करणारा लेख... असेच याविषयी म्हणता येईल.

प्रा. सौ. सुनिता जर्दे व सौ,. रजनी शिरहट्टी यांनी नीलम माणगावे यांच्या 'तरी ती गप्प बसते...! का?' लेखावर प्रतिक्रिया (२८ डिसेंबर, २००१)[४९] यात पाठवल्या आहेत. सौ जर्दे यांनी लेखाला विचारप्रवृत्त,ा लेख वैगेरे म्हणून पुढे 'कोणतेही सामाजिक परिवर्तन एकदम होत नाही' असे मत नोंदविले आहे. त्या म्हणतात, 'दरबारात नाचणारी नर्तकी स्त्रीच असते. तिला समाजासमोर नाचायला प्रवृत्त केलेच ना? ३० टक्के आरक्षण भांडून मिळणार नाही, ते गोड बोलून युक्तीनेच मिळवावे लागेल. तोपर्यत समाजही परिवर्तनशील बनेल?'

सौ. रजनी शिरहट्टी म्हणतात, 'एखादी स्त्री पुढं जात असेल तर तिचे पाय न खेचता तिला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. अशा प्रोत्साहनानेच ती समाजातील आपले स्थान निर्माण करू शकेल.'

(३ मे, २००२)[५१] डॉ. उर्मिला जैन, मुंबई यांनी 'महावीरांची जन्मभूमी कुंडलपूरच, वैशाली नाही' असा लेख लिहून केले आहे. त्या म्हणतात, 'श्वेतांबर समाजाने वैशाली ही भगवान महावीरांची जन्मभूमी आहे असे भासवून तिथे मोठे महावीर स्मारक निर्माण करण्याचे योजले आहे. स्मारक तयार करण्यास कोणाचाच विरोध नाही पण वैशालीला महावीरांची जन्मनगरी म्हणून मान्यता देण्यास संपूर्ण दिगंबर जैन समाजाचा विरोध आहे. भगवान महावीरांची जन्मभूमी 'कुंडलपूरच' हे सिध्द करण्यासाठी त्यांनी अर्थासह श्लोक आणि प्राचीन साहित्यामधील दाखले दिले आहेत. जन्मभूमीवरचा वाद हा काही फक्त अयोध्येमधल्या राम जन्मभूमीचाच नाही. राजकीय हस्तक्षेपामुळे आणि मतांच्या राजकारणामुळे शिवाय हिंदू-मुस्लिमांच्या जातीय वादामुळे तो गाजला. असे वाद जैन समाजामध्येही आहेत. अशाच एका वादाच्या विषयावर लेखन करून ते समाजासमोर आणण्याचे काम डॉ. उर्जिता जैन, मुंबई यांनी केले आहे.

एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या संपत्तीचा (स्थावर, जंगम) जेव्हा ट्रस्ट करते तेव्हा ती संपत्ती समाजाची बनते. समाजसेवेसाठी, समाजहितासाठी त्याचा वापर केला जातो. त्या संपत्तीवर ट्रस्टी इतकाच समाजाचाही नैतिक अधिकार असतो. पण ट्रस्टी जेव्हा मनमानी कारभार करू

लागतात तेव्हा समाजालाच त्याला विरोध करावे लागते. असाच विरोध 'अशा घटना घडू नयेत' या (९ ऑगष्ट, २००२)[५२] लेखामध्ये सौ. लीलावती जैन यांनी केला आहे. पुणे विद्यापीठ रोडवरील 'वालचंद हिराचंद लोककल्याण ट्रस्ट' च्या मालकीचे कस्तुरबाई वालचंद मंगल कार्यालय व सॅनिटोरियम विकण्यात येत असून तेथे पंचतारांकित हॉटेल बांधण्यात येणार असल्याच्या बातमीवरून लीलावती जैन यांनी समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न कळकळीने आणि पोटतिडकीने केला आहे. तर नीलम माणणगावे यांनी, 'काही महाविद्यालयीन मुलांनी भरवस्तीत, भर दुपारी, भर रस्त्यावर एका मुलाचा निघृण खून केला या घटनेवर आधारित... अशा घटना का घडतात? मुलं अशा घटनेपर्यंत का उतरतात? त्यांच्यावर संस्कार कमी पडले की काय? पालक काय करतात? आपण एवढे कशात गुरफटलोय की आपले आपल्या मुलांकडेही लक्ष नाही?' अशा मुद्यांना धरून सामाजिक जाणिवेतून आपण आणि आपली मुले हा लेख (६ सप्टेंबर २००२)[५३] लिहून पालकांना आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याबद्दलचे विचार मांडले आहेत. पुढे डिग्रज गावात पंचकल्याणिक चालू असताना अशीच एक घटना घडली, (त्यात जैन मुलांचा समावेश होता.) त्या घटनेचा उल्लेख करून 'धर्म आणि वास्तवाची संगती कशी लावायची?' असा प्रश्न लेखिकेने उपस्थित केला आहे.

जैन समाजाची एक बुध्दिजीवी पदवीधरांची युवा संघटना होय.पदवीधर संघटना (ग्रॅज्युएट असोशिएशन) या संघटनेला १२ वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने तपपूर्ती केलेल्या कार्याचा आढावा नीलम माणगावे यांनी पदवीधर संघटनेच्या पाऊलखुणा या (२७ सप्टेंबर, २००२)[५४] संपादकीय लेखात घेतला आहे. पदवीधर संघटनेच्या चळवळीची प्रेरणा-१२ वर्षाचा कालखंड-संघटनेची उद्दीष्टे...उपकम...आदर सत्कार... अन्य विविध कार्य... भविष्यकालीन संकल्पना आदि मुद्यांना धरून लिहिलेल्या लेखात त्या शेवटी म्हणतात, 'माहिती, तंत्रज्ञान, जागतीकीकरण आणि उदारीकरणाच्या वातावरणात जैन युवकांनी मुसंडी मारण्याची संधी दवडता कामा नये.'

**३.६ निष्कर्ष:**

१) शिक्षणामुळे स्त्रियांना डोळसपणा आला. साक्षरतेबरोबर त्यांना नवी दृष्टी आली. चोखंदळपणा त्यांच्यात निर्माण झाला. चांगले, वाईटपणाची समज आली. आपण, आपले जीवन, परिसरातला जैन समाज, समाज मनातील हालचाल, जगातले हिंदोळे हे सर्व जाणून घेण्याची समज जैन स्त्रियांना आली. त्या आत्मविश्वासाने लिहू लागल्या. स्पष्ट विचार परखडपणे मांडू लागल्या.

२) जैन समाज हा संख्येने अल्प असा समाज आहे. खेडया पाडयात राहणारा शेतकरी समाज म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अशा समाजातल्या स्त्रियांनी लिहिणे ही धाडसाची गोष्ट आहे. प्रगतीमध्ये सामाजिक विषयावरचे लेखन खूप कमी असले तरी ते धाडसाचे म्हणावे लागेल.

३) जैन स्त्रियांनी वैचारिक विषयावर खूप लेखन केले आहे. पण सामाजिक विषयावर बोलताना, लिहिताना सुरुवातीला दहा वर्षाचा काळ जावा लागला. कुटुंबाच्या परिघाभोवतीच फिरणाऱ्या स्त्रियांना परिघाबाहेर जाण्यासाठी विचारांची दारे खुली झाली नसावीत. पण नंतरच्या कालखंडात बदल होऊ लागलेला दिसतो. १९२२ ते १९३३ या कालखंडात सामाजिक आशयाचा एकही लेख नाही.

४) स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीवाद जोपासणारी व्यक्ती व्यवहारात जातीयवाद पाळत होती. यावर कर्मवीर लक्ष्मीबाई पाटील यांनी भाष्य केले आहे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतरांची घटना, एका दिवसात लग्न, परदेशी वस्त्रांची होळी, इतिहास शुद्धीकरण, हुंडा, निवडणूक, दुष्काळ, कोल्हापूरचे अंबाबाईचे देऊळ अशा अनेक विषयांवर लेखन आपल्या कुवतीनुसार १९५४ पर्यंत लेखिकांनी केलेले आहे. १९४५ ते १९६६ या वीस वर्षात सामाजिक विषयावरचे लेखन कमी असलेले दिसते.

६) सौ. सुलोचना भोकरे आणि वासंती शहा, पुणे यांनी सामाजिक विषयात लेखन करुन इतिहास घडविलेला आहे. महाराज, सोवळे, ओवळे, कळसा प्रकरण, श्वेतांबर वासियांचा झगडा, संस्थांचा मनमानी कारभार, गुरुकुलातील मुलांची दयनीय अवस्था, तीर्थरक्षा कमेटीची अंदाधुंदी अशा अनेक विषयांवर परखड लेख लिहून समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

७) प्रा. सौ. लिलावती जैन, सौ. सुमन चौधरी, सौ. कुमुदिनी रोकडे, सौ. प्रेमलता गुंडे, मि. गांधी, नीलम माणगावे यांनीही समाजातील काही प्रश्नांवर अचूक बोट ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

८) वेगळा विचार करणाऱ्या, समाजाची, जगाची जाणीव असणाऱ्या जैन स्त्रिया आहेत. धर्मात आणि कुटुंबात रमताना नव्या काळाला सामोरे जाण्यासाठी नव्या मूल्यांची गरज आहे. यांची त्यांना जाणीव आहे. या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्त्रिया म्हणून या सामाजिक लेखन करणाऱ्या लेखिकांकडे पाहता येईल. मनाच्या तळमळीतून त्यांचे लेखन अस्सलपणे बाहेर पडलेले आहे.

### ३.७ संदर्भ टीपा


०१) सौ.दोशी राजुबाई रावसाहेबा, 'सेवा', प्रगति आणि जिनविजय, १ ऑगस्ट १९३४.

०२) सौ.पाटील लक्ष्मीबाई, 'सोने', प्रगति आणि जिनविजय, ६ नोव्हेंबर १९३४.

०३) कु.बोवडे शकुंतला, 'एका दिवसात लग्न', प्रगति आणि जिनविजय, १६ जुलै १९३५.

०४) सौ.जुनुनकर लीलाताई, 'लग्न की विघ्न', प्रगति आणि जिनविजय, ५ नोव्हेंबर १९३५

०५) कु.गांधी शकुंतला, 'पंढरपूर आंबेडकर व जैनधर्म', प्रगति आणि जिनविजय, १२ नोव्हेंबर १९३५.

०६) सौ.वत्तूरकर सरस्वतीबाई, 'कोल्हापूर राष्ट्रोध्दार', प्रगति आणि जिनविजय, १४ जानेवारी १९३६.

०७) कु.पद्मावती, 'बेळगांव प्रिय बंधू श्रीपाल यास', प्रगति आणि जिनविजय, २८ जानेवारी १९३६.

०८) सौ. मेधळ निर्मलाबाई, 'देवळी ही पूजा कोणाची?', प्रगति आणि जिनविजय, ११ फेब्रुवारी १९३६.

०९) मिस.गांधी, 'मोफत', प्रगति आणि जिनविजय, १७ मार्च १९३६.

१०) सौ.मंदोदराबाई चावरे, 'इतिहास शुध्दीकरण', प्रगति आणि जिनविजय, २८ ऑगस्ट १९४०.

११) सौ.भोकर सुलोचनो, 'हुंडा प्रकरण', प्रगति आणि जिनविजय, १८ सप्टेंबर १९४०.

१२) सौ.भोकर सुलोचनो, 'सांगली असेंब्लीची निवडणूक व स्त्रियांना वयाची सवलत', प्रगति आणि जिनविजय, १६ ऑक्टोंबर १९४०.

१३) सौ.भोकरे सुलोचना, 'कोल्हापूर प्रजापरिषद व स्त्रिया', प्रगति आणि जिनविजय, १० डिसेंबर १९४१.

१४) सौ.भोकरे सुलोचना, 'कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ', प्रगति आणि जिनविजय, १८ डिसेंबर १९४२.

१५) सौ.भोकरे सुलोचना, 'खास स्त्रियांसाठी मधील लेखन नाव नाही', प्रगति आणि जिनविजय, १ जून १९४३.

१६) सौ.भोकरे सुलोचना, 'कोल्हापूरचे अंबाबाईचे देऊळ', प्रगति आणि जिनविजय, ११ जून १९४३.

१७) सौ.रोकडे कुमुदिनी, 'अकोला आमची दिशा कोणती?', प्रगति आणि जिनविजय, ४ जानेवारी १९७१.

१८) सौ.मगदूम उषाताई, 'अभिनंदनीय विवाह', प्रगति आणि जिनविजय, २३ जून १९७५.

१९) सौ.रोकडे कुमुदिनी, 'आमची दिशा कोणती?', प्रगति आणि जिनविजय, २७ मार्च १९७१.

२०) सौ.देशमाने प्रभावती, 'पत्र', प्रगति आणि जिनविजय, २७ एप्रिल १९८१.

२१) सौ.शहा वासंती, 'पुणे हा वाद आता संपायला हवा', प्रगति आणि जिनविजय, ६ जुलै १९८१.

२२) सौ.शहा वासंती, 'शिरपूर प्रकरणाच्या निमित्ताने थोडे आत्मसंशोधन', प्रगति आणि जिनविजय, ३ ऑगस्ट १९८१.

२३) सौ.रोकडे कुमुदिनी, 'असा असावा सत्याग्रह', प्रगति आणि जिनविजय, १४ सप्टेंबर १९८१

२४) सौ.शहा वासंती, 'भट्टारक संस्थेचा मूळ उद्देश आणि आजचे भट्टारक', प्रगति आणि जिनविजय, २४ फेब्रुवारी १९८२.

२५) सौ.शहा वासंती, 'बहिष्कार जारीच आहे', प्रगति आणि जिनविजय, १७ फेब्रुवारी १९८२.

२६) सौ.शहा वासंती, 'ही कोंडी आता फुटलीच पाहिजे', प्रगति आणि जिनविजय, २० जून १९८३.

२७) सौ.शहा वासंती, 'जिकडे धर्म तिकडे विनय', प्रगति आणि जिनविजय, १२ डिसेंबर १९८३.

२८) श्री.खंजिरे सरोजिनी, 'स्त्रीशक्तिचा नवा अविष्कार', प्रगति आणि जिनविजय, २ जानेवारी १९८४.

२९) सौ.कापसे कांचन, 'बाहुबली प्रकरणी स्त्रियांचे मनोगत', प्रगति आणि जिनविजय, २ जानेवारी १९८४.

३०) डॉ.रोकडे कुमुदिनी, 'जैन समाज जागृत आहे काय?', प्रगति आणि जिनविजय, ९ जानेवारी १९८४.

३१) सौ.शहा वासंती, 'कळसा परिसरातील जैन समाजाने बहिष्कार पत्रक कचऱ्याच्या टोपलीत टाकले', प्रगति आणि जिनविजय, २० फेब्रुवारी १९८४.

३२) सौ.शहा वासंती, 'आता दिगंबर जैन समाजातही बुवाबाजी', प्रगति आणि जिनविजय, २३ जून १९८४.

३३) सौ.शहा वासंती, 'मुंब्रा येथील बाहुबली मंदिर ट्रस्टचा गैरवापर', प्रगति आणि जिनविजय, २१ मे १९८४.

३४) सौ.शहा वासंती, 'श्री क्षेत्र कुंथलगिरीच्या व्यवस्थापनातील गुरुकूल आणि त्यांचे व्यवस्थापन', प्रगति आणि जिनविजय, १५ एप्रिल १९८५.

३५) प्रा. सौ.जैन लीलावती, 'सूर्यकीर्ती प्रतिमेचा निषेध करा', प्रगति आणि जिनविजय, २९ मार्च १९८५.

३६) सौ.शहा वासंती, 'शेडबाळ छात्रालयातील गरीब मुलांची दयनीय अवस्था', प्रगति आणि जिनविजय, १९ जानेवारी १९८७.

३७) सौ.चौधरी सुमन (संपादकीय), 'क्रांतिकारक निकाल', प्रगति आणि जिनविजय, १ जून १९८७.

३८) सौ.शहा वासंती, 'सणावरी देव भाडयाने देणारे ट्रस्टी', प्रगति आणि जिनविजय, १० ऑगस्ट १९८७.

३९) सौ.शहा वासंती, 'मूळ तीर्थाची उपेक्षा करुन तीर्थरक्षा कशी होणार?', प्रगति आणि जिनविजय, १० ऑगस्ट १९८७.

४०) सौ.चौधरी सुमन (संपादकीय), 'अमानुष केवळ अमानुष', प्रगति आणि जिनविजय, ५ ऑक्टोंबर १९८७.

४१) सौ. गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'केव्हढे हे क्रौर्य' , प्रगति आणि जिनविजय, ७ मार्च १९८८.

४२) सौ.मोहिरे शरयू शरद, 'जैन कासार समाज मृत्यूच्या छायेत', प्रगति आणि जिनविजय, ५ डिसेंबर १९८९.

४३) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'ऐतिहासिक घटना', प्रगति आणि जिनविजय, ७ जुलै १९९०.

४४) सौ.गुंडे प्रेमलता, 'वीरबाला महिला सेवा दल', प्रगति आणि जिनविजय, २४ जून १९९०.

४५) सौ. दोशी विमला, 'पुणे नीछावर न्योछावर?', प्रगति आणि जिनविजय, २४ जून १९९०.

४६) सौ. रोकडे स्वाती, 'वधू वर पालक मेळावा', प्रगति आणि जिनविजय, १४ एप्रिल १९९२.

४७) सौ.माणगावे नीलम, 'दिल्ली मंदिरातील घटना काही प्रश्न', प्रगति आणि जिनविजय, १९ ऑक्टोंबर २००१.

४८) सौ.माणगावे नीलम, 'तरी 'ती' गप्प बसते!...... का?', प्रगति आणि जिनविजय, १६ नोव्हेंबर २००१.

४९) प्रा. सौ.जर्दे सुनिता, 'वाचकांच्या प्रतिक्रिया ...... तरी ती......का?', प्रगति आणि जिनविजय, २८ डिसेंबर २००१.

५०) सौ.शिरहट्टी रजनी, 'वाचकांच्या प्रतिक्रिया ...... तरी ती......का?', प्रगति आणि जिनविजय, २८ डिसेंबर २००१.

५१) डॉ.जैन ऊर्जिता, 'भ. महावीरांची जन्मभूमी कुंडलपूर, वैशाली नाही', प्रगति आणि जिनविजय, ३ मे २००२.

५२) प्रा. सौ.जैन लीलावती, 'अशा घटना घडू नयेत', प्रगति आणि जिनविजय, ९ ऑगस्ट २००२.

५३) सौ.माणगावे नीलम, 'आपण आणि आपली मुले', प्रगति आणि जिनविजय, ६ सप्टेंबर २००२.

५४) सौ.माणगावे नीलम, 'पदवीधर संघटनेच्या पाऊलखुणा', प्रगति आणि जिनविजय, २७ सप्टेंबर २००२.

## प्रकरण ४

# जैन स्त्रियांच्या लेखनातील स्त्रीविषयक विचार

४.१ सन १९३० ते १९४१ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.२ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.३ सन १९५३ ते १९६३ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.४ सन १९६४ ते १९७४ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.५ सन १९७५ ते १९८६ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.६ सन १९८७ ते २००३ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

४.७ निष्कर्ष

४.८ संदर्भ टीपा

# प्रकरण चौथे

# जैन स्त्रियांच्या लेखनातील स्त्रीविषयक विचार

'प्रगती आणि जिनविजय' मधील स्त्रियांनी केलेल्या लेखनाचा आढावा घेताना जैन स्त्री जीवनाचा अनुभव नव्याने आला. स्त्री जीवनाचा अभ्यास करताना स्त्रियांविषयी स्त्रिया काय म्हणतात हे 'स्त्री विषयक' या प्रकरणात आपल्याला पाहता येईल. त्यामुळे एक स्त्री म्हणून स्त्री संदर्भात ती काय म्हणते हे पाहणे महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. कारण त्यामधूनच तिची भूमिका स्पष्ट होताना दिसेल.

स्त्रियांचे प्रश्न, त्यांचे विचार, त्यांचे जीवन, पोषाख, अलंकार, वेदना, त्यांचे सुख-दुःख, विधवा, परितक्त्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, त्यांचा पारंपरिक दृष्टीकोन त्यांचे अधिकार, कर्तव्ये पातिव्रत्य, हुंडा, पती-पत्नी संबंध, स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य, स्त्री विकास भारतीय स्त्री, प्रौढ बाल विधवा विवाह, स्त्रियांपुढील आव्हाने अशा अनेक पैलूंना स्पर्श करणारे लेखन स्त्रियांनी केलेले आहे. स्त्री कशी बदलत गेली? तिचा विकास कसा होत गेला? हे आपल्याला जैन स्त्री जीवनाच्या जगण्यातून अनुभवता येईल. लेखन पक्रियेचं स्वरूप 'स्त्रियांनी केलेलं स्त्रियांसंदर्भातल लेखन' असे आहे.

### ४.१ सन १९३० ते १९४१ या कालखंडातील स्त्रीविषयक लेखन

'खास स्त्रियांसाठी' हे सदर १९३३ पासून चालू केले ते १९४५/४६ पर्यंत चालू होते. स्त्रियांनी त्याला प्रचंड प्रतिसादही दिला. या सदरामध्ये संवांद, कथा, काव्य, वैचारिक, धार्मिक, सामाजिक... कुठल्याही विषयावरचे लेखन अनेक स्त्रियांनी भरभरून केले. 'सुधाताईची पत्रे' आणि 'सुधाताईस पत्र' या शीर्षकाखाली त्यांनी जुगलबंदीच घडवून आणली.

(१० मे, १९३०)[१] च्या अंकात 'श्री सुधाताई' या नावाखाली सुधाताई म्हणतात, "तुम्ही पुरुषांनी वर्तमानपत्र भाराभर वाचावीत आणि आम्ही बायकांनी मात्र त्याचा उपयोग पेटवण्याकडे करावा, आता ही स्थिती कोठपर्यंत चालणार? लाज वाटली पाहिजे." (हा संवाद नणंद, भावजय, दादा या तिघांमधला आहे) यावर वहिनी म्हणाली, 'खरय वन्स अगदी खरं, लाज कोणाला वाटेल बरं? वर्तमानपत्र, मासिक आणायची आणि तुला समजत नाही म्हणून सिनेमातली चित्र स्वतः

पाहायची बरं...!' तेव्हा दादा म्हणतो, 'अगं ताई मूर्खांना वर्तमानपत्रातलं काही कळतं काय?' स्त्रियांच्या बुध्दीमत्तेला निकृष्ट ठरवणारी अशी ही संवादातील दादांची कोपरखळी, त्या काळातील स्त्रियांची अवस्था दर्शवून जाते.

पुन्हा सुधाताई (९ मार्च १९३३)[२] च्या अंकात म्हणतात,' पुरुष मोठे मतलबी, स्त्रियांना नकळत का होईना पण गुलाम करतीलच. आता दूर कशाला? आमच्या दक्षिण महाराष्ट्रात काय...वऱ्हाडात काय...किंवा 'चांदबिबिचे खानदेशात' काय... किती विद्वान समाजसेवक आहेत, पण त्यांच्या बायका अगदी मेणाच्या बाहुल्या! प्रोफेसर, वकील, शेतकरी, व्यापारी, शेतकरी सभेत आले की चार दोन गप्पा ठोकून देतील आणि आमच्या प्रोफेसरीण, वकीलीण, व्यापारी किंवा शेतकऱ्यांची स्त्री म्हणजे पुरुषांच्या संपत्तीच प्रदर्शन करणारी चालती बोलती एक मूक जरतारी पेटी |

'स्त्रियांचे अलंकार' या लेखात सौ. सुभद्राताई पंडित (५ सप्टेंबर १९३३)[७] म्हणतात, "श्रीमंत अगर गरीब यजमानांचे चालते बोलते सेव्हींग्ज खाते म्हणजे स्त्रिया |" अलंकाराने स्त्रियांची शोभा वाढते हे खरे, पण अलंकाराने शरीर व मन स्वच्छ, पवित्र व प्रेमळ केले पाहिजे? त्यासाठी त्यांनी काही नियम सांगितलेले आहेत. ते म्हणजे

१) नेहमी मन शांत ठेवावे.

२) गरीब मनुष्य व प्राणी यांवर दया करावी.

३) अतिथी सत्कार करावा.

४) पतीची मर्जी राखावी.

५) पतिवर निष्ठा ठेवून हसतमुख राहावे.

६) पति बाहेरून आल्यावर मधुर भाषण करावे.

७) पतीला विपत्ती आल्यास त्याला समजून घ्यावे.

८) पतीच्या व्यवहाराची, कारभाराची जरूर माहिती घ्यावी.

९) प्रेम, विनय, पातिव्रत्य इ. सद्‌गुणांनी मंडित स्त्रीला सज्जन सोन्या मोत्यांच्या दागदागिन्यांपेक्षाही जास्त मान देतात.

त्याच अंकात म्हणजे (५ सप्टेंबर, १९३३)[८] च्या अंकात सुधाताईंचा समाचार घेणारी भरपूर निनावी पत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. त्यातील काही पत्रे.... (फक्त मुद्दे)

१) गुप्त व पोषाखी पोलिसांनी चांभार चौकशी सुरू केली.

२) वकिली बाण्याचा वास आला.

३) ही सुधाताई वऱ्हाडकरीण नसून संपादकांच्या ऑफिसमधील बिऱ्हाडकरू अगर श्रीमतीबाई असाव्यात.

४) सुधाताईंच्या पत्रामुळे वऱ्हाडी व दक्षिणी या दोघांना एकदमच कळ आली व वाचा फुटली हा सुधाताईंच्या पत्रांचा अपूर्व प्रभावच नव्हे?

५) सुधाताईंनी नाव, गाव, ठाव, ठिकाणा, उद्योगधंदा वैगेरे कळवावा. अशा टिपणीनंतर सुधाताई फारश्या दिसल्याच नाहीत.

कु. सुलोचना उपाध्ये यांनी रेल्वेतील आपला एक अनुभव (२० ऑक्टोबर, १९३३)[९] च्या अंकात सांगितला आहे. त्यांना एक ख्रिश्चन तरुणी रेल्वेत भेटते. गोव्याहून आलेली ही तरुणी स्टेशन मास्तरांच्या मुलांना सांभाळायचे काम करत असते. त्यासाठी तिला दरमहा १५ रुपये मिळतात. गरीब व वृदध आई-वडील, हुंडयासाठी तिच राहिलेलं लग्न, भावंड वैगेरे संबंधी तिन सर्व माहिती सागितली. सुलोचना बाईनां हा अनुभव मोलाचा वाटला. त्या म्हणतात, 'स्वावलंबन, दृढ निश्चय व उद्योगप्रियता हे त्या तरुणीचे गुण आमच्या भगिनींना अनुकरणीय आहेत. तसेच हुंडयाच्या दुष्टचालीमुळे किती दुःस्थिती प्राप्त होते. हे वाचकांना समजावे म्हणून हे खरोखरचे संभाषण प्रसिद्धीसाठी पाठवले आहे.'

'मातेचे संस्कार' या दि. (०३, नेव्हेंबर, १९३३)[१०] च्या अंकामध्ये सुभद्राबाई अमरावती म्हणतात...

'बाई रडता रडता निजली | साखर तुपात भिजली ||

बाळ खेळता खेळता गेले दूर | हाती खारीक खोबऱ्याचे झाले चूर ||

या जात्यावरच्या ओळी सांगून म्हणतात, 'असल्या साखर तुपाच्या आणि खारीक खोबऱ्याच्या संस्काराने आपली पोरं शूर कशी निपजतील? जिजाबाईंना शूर शिवाजी घडवण्यासाठी त्यांच्यावर वीरत्वाचे संस्कार करावे लागले. पौराणिक , ऐतिहासिक गोष्टी सांगून खंबीर बनवावे

लागले. आज आम्ही बाळाला, दुसरा कोण मारील म्हणून घराबाहेर जाऊ देत नाही. अर्थातच आमची प्रजा दिवसेंदिवस भेकड, दुबळी व कुचकामी निपजू लागली तर त्यात नवल काय? आपल्या पोटी वीर संतान पैदा व्हावी किंवा आपल्या संतानाचा बोलबाला व्हावा असे वाटत असेल तर धैर्य वान बनून आपल्या मुलास तसे घडवावे.'

कु. सुलोचनाबाई उपाध्ये यांच्या (दि.१८ डिसेंबर, १९३३)[११] 'स्त्रियांचा पोषाख' या लेखात त्या म्हणतात, 'जैन स्त्रियांच्या' पोषाखामध्ये सुधारणा व्हावयास पाहिजे. चोळी घातल्यानंतर पोट आणि पाठीचा निम्मा भाग उघडा राहतो. तो झाकण्यासाठी चोळीस नेहमी जाकीट घालावे. दोन घालण्यापेक्षा पोलके (ब्लाऊज) घालावे. कासोटा घातल्याने पायांच्या पोटऱ्या दिसतात. त्या दिसू नयेत म्हणून 'बायकांच्या टाचण्या' (वुईमेन्स पीन) किंवा गॉर्टर्स विकत मिळतात ती वापरावी. कामाच्यावेळेस अडचण होऊ नये म्हणून कोंबडा कासोटा मारावा. पण इतर वेळेस ओचे पद्धतीचे लुगडे नेसावे.

(०१ जानेवारी, १९३४)[१२] 'एकांगीपणा' या लेखात अमरावतीच्या सुभद्राबाई म्हणतात, ' स्त्रियांमध्ये थोडी सुधारणा दिसते पण ती एकांगी आहे. शिक्षणात व्यायामात स्त्रिया मागे राहतात. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी त्यांची अवस्था आहे. मुलीपेक्षा मुलगा मोठा पण किती मोठा? पन्नाशीच्या म्हाताऱ्याबरोबर बारा वर्षांच्या मुलीचे लग्न... एवढा मोठा?' त्या शेवटी म्हणतात, ' ही सुधारणा एकांगी आहे.'

सौ. चिमणाबाई गायकवाड यांनी दि. (०५ जून १९३४)[१३] च्या अंकामध्ये 'स्त्रियांना बंधमुक्त केल्यास स्त्री जात व पुरुष जात यांच्यामध्ये चढाओढ लागून कलह माजेल अशी भिती बाळगण्याचे कारण नाही.स्त्रिया पुरुषांची नुसती खेळणी किंवा मोलकरीण मानल्या जाऊ नयेत.' असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे.

कु. सुलोचना भोकरे यांनी दि. (१२ जून, १९३४)[१४] च्या अंकात 'संतती नियमन' सारख्या नाजूक विषयावर भाष्य केले आहे. त्या म्हणतात, 'रतिसुख तर मिळावे पण बीजारोपण होऊ नये असे न लिहिण्यासारखे कृत्रिम उपाय काही स्त्री पुरुष योजतात. परंतू असे करणे वाईट आहे. त्या ऐवजी ब्रम्हचर्य, परिग्रहप्रमाण, एक पती/पत्नी व्रत, बाल, वृध्द व विजोड विवाहापासून संतती उत्पन्न करू नका, असे जैनाचार्य सांगतात तेव्हा संतती उत्पन्न करण्याचे बंद करणे हेच खरे

संततिनियमन होय'. तर दुसऱ्या लेखामध्ये 'भगिनींनो प्राण गेला तरी शीलव्रताचे पालन करा. त्यातच आत्मकल्याण आहे.' या योगाने स्त्री पर्याय नाश होऊन सम्यकत्व प्राप्त होते व शेवटी मोक्षसुखाची प्राप्ती होते असे 'शीलव्रत' या लेखामध्ये शीलवतीबाई, कारंजा म्हणतात.

'आनंदीवृत्ती' या लेखामध्ये (३ जुलै, १९३४)[१६] माणिक घाटे म्हणतात, 'आपल्याकडे १६/१७ वर्षापर्यंत मुली हसतात त्यांच्या हास्य विनोदाला आचरट म्हणतात. विवाहित मुलीला तर आपले हास्य माहेरीच ठेवून जावे लागते. त्यामुळे तरुण वयातच त्या आंबट व गंभीर मुद्रेने वावरताना दिसतात.' माणिक घाटे यांनी स्त्रीच्या निखळ जगण्यावरच्या बंधनावर अचूक बोट ठेवलेले आहे.

सौ. चंद्रकला हाटे, एम. ए. (४ सप्टेंबर, १९३४)[१७] च्या अंकामध्ये 'हिंदी समाजातील स्त्रियांची पूर्वीची व सध्याची स्थिती' तशीच आहे हे सांगताना म्हणतात, 'स्त्री लहानपणी बापाच्या नंतर पतीच्या व अखेर मुलाच्या आणि मुले नसली तर दुसऱ्या नातेवाईकांच्या स्वाधीन असते' स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा, त्यांचे मागासलेपण आर्थिक पारतंत्र्य, बहुपत्नीकत्व, परावलंबीत्व वैगेरे मुद्यांना स्पर्श करून त्या म्हणतात, 'लग्न हेच स्त्रियांच्या जीवनातील ध्येय होय. हा काळ आता गेला आहे. स्वातंत्र्याची गोडी लागल्यामुळे स्त्रिया पुरुषांच्या ताब्यात जावयास नाखूष आहेत. १९३४ च्या काळामध्ये शिक्षणामुळे हे धाडस आले असावे.

कु. शोभाताई पाटील यांचा 'आदर्श गृहिणी' या विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक आला असून तो निबंध 'प्रगती आणि जिनविजयच्या' (११ सप्टेंबर, १९३४)[१८] च्या अंकामध्ये प्रसिद्ध झालेला आहे. सुशिक्षित होऊन, सुगृहिणी, सुमाता होणारी, समाजाच्या व मातृभूमीच्या कल्याणासाठी झटणारी आपल्या अज्ञानी भगिनींना सुशिक्षीत करून त्यांना कर्तव्याची जाणीव करून देणारी, उत्तम ज्ञान असणारी, लहान मोठी कामे, मुले, पतीव्रत वैगेरे जपणारी हसतमुख-टापटीपीने राहणारी, वडिलधाऱ्या माणसांचा मान राखणारी, गर्व न करता स्वच्छता, आरोग्य, व्यायाम, कला, कौशल्य, गायन यात रस असणारी, धोरणी, दूरदर्शी असणारी गृहिणी तिने सामाजिक संस्था, संस्था, समारंभ, शाळांमध्ये कामे करावीत. आपल्या धर्मामधल्या वेडगळ, धर्माभोळया व सोवळयाच्या कल्पना नाहिशा करून खऱ्या धर्माची माहिती करून घेण्याचा प्रयत्न गृहिणीने अवश्य करावा.

(१८ सप्टेंबर, १९३४)[१९] सौ. सुलोचना बोरीकर यांनी धार्मिक वाचनाबरोबरच इतर वाचनही स्त्रिया करीत होत्या. याचा प्रत्यय देणारा एक लेख लिहिला आहे. 'स्त्री' मासिकामध्ये चंद्रकलाबाई घाटे यांचा लेख त्यांनी वाचला. घाटे म्हणतात, ' जैन धर्माने तर स्त्रियांना आत्माच नाही असे मानले आहे.' या मताचे खंडन करण्यासाठी सौ. सुलोचना बोरीकर म्हणातात, 'हे विधान घाटेबाईंनी कोणत्या ग्रंथाच्या आधारे केले आहे? जैन धर्माने तर जीवालाच आत्मा म्हटले आहे. आत्म्यात स्त्री पुरुष असा भेद नसतो. याच अंकात 'स्त्रिया आणि कला' या लेखात कु. कृष्णाबाई बोरीकर म्हणतात, 'संसारात शोभा आणण्यासाठी स्त्रियांची कला हीच भूषविणारी वस्तू आहे. कलावान स्त्री हीच खरी रूपवान होय. कलावान स्त्री आपल्या पतीस सुख देते व अडीअडचणीच्या प्रसंगी कलेचा उपयोग जीवनार्थही करते, विणकाम, शिवणकाम, कलाकुसरीने चित्र सजवणे, संगीत, चित्रकला मनाला आनंद देते.

कु. लीलाताई जुनुनकर आणि कु. सुशीला आपटे यांनी (९ ऑक्टोबर, १९३४)[२१] व (२३ ऑक्टोबर, १९३४)[२२] या दोन अंकामध्ये अनुक्रमे 'स्त्रिया आणि परमार्थ' आणि 'स्त्रियांनी वेळ कसा घालवावा?' हे लिहिले आहे. लीलाताई 'स्त्रिया आणि परमार्थामध्ये म्हणतात,' संसाराकडे आधी लक्ष द्या. तो सुखाचा करा नंतर परमार्थाच्या मागे लागा' तर सुशिला आपटे 'स्त्रियांनी वेळ कसा घालवावा' यामध्ये सांगतात, ' चकाटया पिटण्यात वेळ घालवू नका. व्रतवैकल्ये करीत बसण्यापेक्षा स्वदेशी वस्तू वापरून त्याचा प्रचार करण्याचे कार्य करा. म्हणजे हिंदुस्थानला परवशतेच्या गर्तेतून वर काढण्यास हातभार लागेल.

परिवर्तनवादी, पुरोगामी, रूढी, परंपरांना विरोध करणारी विद्रोही विचारांची एखादी महिला प्रत्येक पिढीत असतेच. मग ती कुठल्याही जातीची असेना का, पण तिच्यामध्ये समाजाला जाब विचारण्याचे धाडस असते. असेच धाडस (३० ऑक्टोबर, १९३४)[२३] च्या 'विधवा स्त्रियांसंबंधी समाजाने पाळावयाची कर्तव्ये' या लेखामध्ये मिस एस. एन. गांधी यांनी केले आहे. त्या म्हणतात, 'कुंकू लावणे हा स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्क आहे. कुंकू हिंदुस्थानची निशाणी आहे. मग नवरा वारल्यावर हा हक्क बंद का व्हावा? केशवपनामुळे स्त्रियांचा चेहरा कुरूप होतो त्यामुळे पुरुष त्यांच्याकडे पापदृष्टीने बघत नाही त्यामुळे विधवांच्या शीलाला धक्का पोहोचत नाही, ही समजूत चुकीची आहे.' असे ठामपणे म्हणून त्या विचारतात, 'कोणत्याही मंगल कार्यामध्ये विधवांना भाग

घेता येत नाही. पत्नी मेल्यावर पतीला कोणी पापी म्हणत नाही, मग हा भेद का? शेवटी त्या म्हणतात, 'पुनर्विवाहास मोकळीक मिळाली तर कमकुवत मनाच्या स्त्रियांचा अनीतीपासून बचाव होई ल.

सौ. सुलोचना भोकरे (१८ डिसेंबर, १९३४)[२४] च्या 'न्हाणवली' या लेखात म्हणतात, 'विवाहित मुलीला पहिल्यांदा ऋतुप्राप्ती होते तेव्हा नवऱ्यासह तिला मखरात बसवून ओटी भरून वरात काढतात. रजोदर्शन हा स्त्रीचा स्वाभाविक शरीरधर्म-त्यासाठी तिला चारचौघात कशासाठी मिरवायचे? त्यामुळे तिला किती संकोच होतो. मुलीला न्हाणवली बसवून सासुरवाडीकडून भारी किंमतीचा आहेर व द्रव्य उकळण्यासाठीच नवऱ्याकडच्यांचा हेतू असतो आणि हे बंद व्हायला पाहिजे.' (२५ डिसेंबर, १९३४)[२५] 'गोदूबाई उपाध्ये लेख' यात त्या म्हणतात, ' पतीच्या मानमरातबाने पुढे येण्यापेक्षा स्वतःच्या कर्तबगारीने व चिकाटीने नाव मिळवावे (व्यक्ती परिचयाचा गोदुबाईचा स्वतंत्र लेख आहे) असं गोदुबाईंना वाटायचे.

सौ, सुशिला भोकरे, ' पतिनामलेखन' या (२२ जानेवरी, १९३५)[२६] च्या अंकामध्ये म्हणतात, 'स्त्रियांनी कु.सौ.श्रीमती घालूनच नावे लिहावीत किंवा नावासमोर पिता किंवा भ्रतार लिहून मग पिता किंवा पतीचे नाव लिहून आडनाव लिहावे. 'पतिव्रत' व 'एकपत्नीव्रत' या (२९ जानेवारी, १९३५)[२७] च्या अंकात स्त्री, शिक्षण, स्त्रियांचे बदलते दिवस त्यांचे हक्क वैगेरे संबंधीचा उहापोह करून त्या म्हणतात, 'शास्त्रे स्त्रियांनी लिहिली असती तर त्यांनी, पुरुषांनी विशेष कारणाशिवाय एकपत्नीव्रताप्रमाणेच राहिले पाहिजे असे ठासून सांगितले असते. सुलोचन भोकरे यांनी ५ मार्च, १९३५ मध्ये 'खास स्त्रियांसाठी' सदराचा समारोप केलेला आहे. एकूण २५ लेखिकांनी लेखन केल्याचा उल्लेख करून सर्वांचे आभार मानून हे सदर आणखी स्त्रियांनी पाहावे अशी सदिच्छा प्रकट केली आहे.

'जुने ते सोने' या लेखात कु. लीलाताई जुनुरकर (५ फेब्रुवारी, १९३५)[२८] म्हणतात, 'जुने ते चांगले व नवे तेवढे वाईट असे म्हणता येईल का? जुने असो अगर नवे असो चांगले असेल ते घ्यायला कोणती हरकत आहे? सुधाताईचे पत्र (१९ मार्च, १९३५)[२९] च्या अंकामध्ये पुन्हा प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी काही ठराविक स्त्रियाच लिहितात. इतर स्त्रिया का लिहीत नाहीत अशी खंत व्यक्त केली आहे.

'पुरुषांचे दुसरे लग्न' मध्ये राजुलमती आगरकर (३० एप्रिल, १९३५)[३०] म्हणतात, 'पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करणे यात धर्माची हेटाळणी आहे. त्याने स्त्रियांचे नुकसान होते. पूर्वी राजे-महाराजे अनेक लग्न करीत पण आजचे अतिशहाणेही तेच करीत आहेत'. (७ मे, १९३५)[३१] च्या अंकामध्ये सौ. सुलोचनाबाई भोकरे 'विवाह समारंभ' या लेखामध्ये म्हणतात, 'हुंडा, मान, पान, रुसवा, फुगवा सोडून लग्न एका दिवसात उरकावे. दोन्ही पक्षांनी मिळून एकच उत्तम जेवण घातल्यास वेळ, खर्च व श्रम वाचतील. बेकारीच्या अशा दिवसात चैनी खातर पैसा खर्च करण्यापेक्षा तो पैसा सत्कारणी लावावा. लग्न म्हणजे संमेलन...त्यास अनुसरून मनोरंजन कार्यक्रम ठेवून हौस-मौज अनुभवावी मात्र त्यात पुरुषांनीच भाग न घेता बायकांची दगदग कमी करून त्यांनाही मौज मारण्यास सवड करून द्यावी. नाही तर त्या स्वयंपाक घरातच राहतील, आहेरामुळे गरीब लोकास कुठेही जाण्यास संकोच होतो.' गरीब-श्रीमंतामधील भेद व गरिबांची कोंडी याकडे सूचकपणे अंगुलीनीर्देश केलेला आहे. तर श्री रुक्मिणीबाई लोणकर (२१ मे, १९३५)[३२] च्या अंकामध्ये म्हणतात, 'सुशिक्षित मुली आणि विवाह' या लेखामध्ये नाराजीने म्हणतात, 'जैन समाजामध्ये असमाधानकारक आणि हानिकारक स्थिती दिसून येते. सुशिक्षित, सुंदर, सुस्थितील मुलींना विवाह म्हणजे काय? मन ही चीज आहे? संसार कसा असतो? जोडीदार कसा असावा? हे कळत असूनही त्यांना मनाजोगता योग्य जोडीदार मिळत नाही ही खेदाची गोष्ट आहे. कर्जबाजारी मुलीचे वडील आपल्या सुंदर मुलीला एखाद्या जुगारी, व्यसनी पण श्रीमंत मुलाच्या घरात ढकलून देतो. मुलीच्या मनाविरूध्द विवाह करणे प्रत्यक्ष पोटच्या गोळयाला मारणेच नव्हे का? विवाह हा का होम आहे, मुलीचा बळी द्यायला?' १९३५ साली असा प्रश्न विचारणे ही साधी गोष्ट नव्हती.

'जैन स्त्री समाजाची सद्यस्थिती व उपाय' या (४ जून, १९३५)[३३] च्या लेखामध्ये शिलब्रतीबाई, कारंजा म्हणतात, "आमच्या जैन स्त्रियांना चूल व मूल या पलीकडे जगामध्ये काही आहे असे वाटत नाही आणि मुलांविषयीच्या भावना काय तर? खाऊ पिऊ घालणे एवढेच! स्त्रियांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. मातृत्व-पत्नीत्वाची जबाबदारी, राष्ट्रीयत्वाची भावना, परमार्थ सुख अशा सर्व बाजूने स्त्री सुशिक्षित झाली पाहीजे."

सौ. सुलोचना भोकरे यांनी 'खास स्त्रियांसाठी' हया पुन्हा चालू केलेल्या सदरामध्ये (२३ जुलै, १९३५)[३४] स्त्रियांना उद्देशून 'पुनश्च ॐ' या लेखामध्ये त्या म्हणतात, 'स्त्रिया लिहीत नाहीत.

आपल्याला लिहायला येईल का? ते प्रसिदध होईल का? अशा स्त्रिया शंका काढतात आणि हौस असूनही लिहिण्यास कचरतात' म्हणून त्यांनी भगिनींना आवाहन केलयं की, 'भगिनींनो भिण्याचे मुळीच कारण नाही. धैर्याने पाय टाका म्हणजे सराव होईल.'

१७ सप्टेंबर १९३५ शिक्षण, बालविवाह, हुंडा, लग्नातील देवघेव... समाजाचा जणु व्यापारी दृष्टिकोण बनलेला तो काळ! मुलाच्या प्रत्येक परीक्षेबरोबर हुंडयाचे मान वाढत गेले. मुलाच्या आई -वडिलांना वाटू लागले, 'आपली सुशिक्षित मुले म्हणजे जणु पैशाची खाणच' या विषयी कु. इंदुमती लडगे (१७ सप्टेंबर, १९३५)[३५] 'स्त्री शिक्षण' मध्ये म्हणतात, 'अशावेळी सुशिक्षित मुलांनी मनावर घ्यायला हवे पण ते घेत नाहीत. माझ्या आई-वडिलांना हुंडा पाहिजे...... असे म्हणतात, तर 'उत्पन्नदार सुशिक्षित लोकांना बायका मरणे ही फायद्याची गोष्ट वाटते' अशी कडवट प्रतिक्रिया सौ. सुशिलाबाई मिठारे यांनी (१ ऑक्टोबर, १९३५)[३६] च्या 'हुंडा' लेखात व्यक्त केली आहे.

सौ. चंचलाताई शहा, बारामती यांनी स्त्री-पुरुषामध्ये थोडा शारिरीक फरक असतो याचा अर्थ पुरुष श्रेष्ठ किंवा स्त्री कनिष्ठ होत नाही. याचीही जाणीव स्त्रियांना आलेली दिसते. ही गोष्ट स्त्री विकासाच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाची आहे. यासंदर्भात 'आजचे स्त्री जीवन' या लेखामध्ये (२९ जानेवारी, १९४१)[३७] त्या म्हणतात, 'आम्ही स्त्रिया झालो हे पाप झाले काय? मुले आणि मुली शारिरीक भिन्न असली तरी आत्म्यामध्ये शक्ती सारखीच आहे. देवता म्हणून आमची पूजा करा असे आम्ही मुळीच म्हणत नाही पण तिला जे निर्जिव खेळणं समजल जातं, त्याची चीड येते'. स्त्रीच्या वस्तुरूपावर चंचलाबाईनी नेमके भाष्य केले आहे.

### ४.२ सन १९४२ ते १९५२ या कालखंडातील स्त्री विषयक लेखन

ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक समाजाला खडबडून जागे करणारे असून सन १८८२ मध्ये प्रसिदध झाले. तसे स्वतंत्र लेखन जैन स्त्रियांमध्ये १९ व्या शतकात निर्माण झाले नाही. पण स्त्री पुरुष समानतेचे भान निश्चित आलेले जाणवते. स्त्री-पुरुष समानता जशी महत्त्वाची तशी स्त्री-स्त्री समानतासुदधा महत्वाची याचेही भान स्त्रियांना आले. सौ चंपाबाई शहा, रावळगाव, (१ जून, १९४६)[३८] च्या 'वैवाहिक जीवन व वैवाहिक स्त्रियांचे समाजकार्य' या लेखामध्ये म्हणतात, 'पदवीधर स्त्रियाच फक्त समाजकार्य करू शकतील व ५-६ इयत्तेपर्यंत शिक्षण झालेल्या स्त्रिया समाजकार्य करू शकणार नाहीत असे म्हणणे अन्यायाचे होईल?' त्यांना हे समजले होते की

क्वचित कोठेतरी एखादी पदवीधर स्त्री बाकी पाचवी, सातवीपर्यंत शिकलेल्या पण स्त्री म्हणून त्या समान पातळीवर कामे करू शकतात हे आत्मविश्वासाने सांगतानाच जास्त शिकलेल्या स्त्रियांसमोर कमी शिकलेल्या स्त्रियांवर अन्याय होतो. पुढे स्त्री-पुरुष समानतेबद्दल (१ जून १९४७)[३९] च्या अंकामध्ये त्या म्हणतात, 'पुरुषाचा स्त्रीवर जितका हक्क आहे तितकाच स्त्रीचाही पुरुषांवर आहे. आपल्याप्रमाणे स्त्रीला ही भावना आहेत. तिला स्वतंत्र आत्मा आहे. स्वतंत्र विचारशक्ती आहे. याची जाणीव पुरुषांनी सदैव ठेवावी.' 'आजचे स्त्रीजीवन' या लेखामध्ये त्यांनी स्त्री स्वातंत्र्यावरचे आपले परखड मत मांडले आहे.

## ४.३ सन १९५३ ते १९६३ या कालखडातील स्त्री विषयक लेखन

स्वातंत्र्यानंतर हा काळ महत्त्वाचा आहे. घटनेने स्त्रियांना समानता दिली मतदानाचा हक्क दिला. पाश्चात्य स्त्रियांप्रमाणे मतदानाच्या हक्कासाठी स्त्रियांना संघर्ष करावा लागला नाही. या टप्प्यावर स्त्रियांना बदलत्या काळाचे भान आले. तसेच जैन स्त्रियांनी ही वेगवेगळया विषयांवर लेखन केले. पण स्त्री-पुरुष समानता सामाजिक जीवनात प्रत्यक्ष जगण्यात उतरली नसल्याने या विषयावर स्त्रियांनी पुन्हा पुन्हा लेखन केले. आजही तो झगडा संपलेला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

(१३ जुलै, १९५९)[४०] च्या 'प्रौढ विवाह समस्या' या लेखामध्ये कु. वसुंधरा ढेरे म्हणतात, 'काही बाबतीत पुरुष श्रेष्ठ काही बाबतीत स्त्री श्रेष्ठ असे असताना स्व-सुखाला अंतरावे लागते, असे का?' शिकलेल्या मुलींविषयी...... त्यांच्या विवाह समस्येविषयी त्या म्हणतात, 'स्त्री शिकली की तीला कमी शिकलेला नवरा नकोसा असतो. मग ती नोकरी करते. पैसे मिळवते पण लग्न थांबते. त्यामुळे विवाहाची समस्या निर्माण होते. प्रौढ स्त्री-पुरुषांनी विवाह संदर्भातील सौंदर्याची कल्पना बदलली पाहिजे.'

(९ जानेवारी, १९६१)[४१] हुंडयासंदर्भात तरुण मुलांमुलींना उद्देशून सौ. चंचलाबाई शाह म्हणतात, 'लग्नात महान विघ्न आणणारा हुंडा एक जुनाट रोग आहे. हुंडा मागने एक भिक्षेचाच प्रकार आहे. यात कोणालाच लाज वाटत नाही. हुंडा घेऊ नका म्हणून गप्पा मारणारे वेळ आली की हुंडा घेतल्याशिवाय राहात नाहीत'. त्या मुलींना सांगतात, 'मुलींनो हुंडा हा तुमच्या स्त्री जातीची विटंबना करणारा महारोग आहे. लग्न संबंध हा प्रेमाने जोडावयाचा असतो. पण हुंडा नेहमी आड

येतो. पाच सहा मुली असणाऱ्या बापाने पाच-पाच हजार हुंडा कस द्यायचा?' असा प्रश्न त्यांनी समाजाला विचारला आहे. 'आई-आई' हा कु. सुनंदा मालगावे, यांनी (२१ मे, १९६२)[४२] मध्ये आईवर लेख लिहिला असून यामध्ये आईची थोरवी सांगितली आहे.

## ४.४ सन १९६४ ते १९७४ या कालखंडातील स्त्री विषयक लेखन

डॉ. सौ विजयालक्ष्मी पांगळ यांनी, "स्त्रीस अबला का म्हणावे?" असा दणदणीत प्रश्न (३१ जानेवारी, १९६६)[४३] च्या अंकामध्ये विचारला आहे. स्त्रियांना अबला म्हणतात याचेच त्यांना आश्चर्य वाटते कारण तिच्याच पोटी जन्म घेऊन तिच्याकडून संगोपन करून घेऊन विद्वान पंडित शूरवीर होतात. तरी स्त्री अबला? सबल स्त्रियांचे काही पौराणिक दाखले त्यांनी दिले आहेत. सीतेने वनवासात तसेच अंजनीने गरोदरपणातसुध्दा सासूने हाकलून दिले असता स्वाभिमानाने वनवास पत्करून आपल्या अब्रूचे रक्षण केले. अनंतमतीने पळवून नेलेल्या विद्याधरास दाद दिली नाही. अशा स्त्रिया या सबलाच! तसेच पुरुष शरीराने सबल असला, हाती सत्ता असली म्हणून त्याला सामर्थ्यवान म्हणता येणार नाही. आपल्या वासनेनं, पापानं, स्त्रीला लाचार बनविणाऱ्याला सामर्थ्यवान कसे म्हणणार? अशा आशयाचा सुंदर लेख लिहिला आहे.

## ४.५ सन १९७५ ते १९८६ या कालखंडातील स्त्री विषयक लेखन

सौ उषाताई मगदूम यांनी (११ ऑगष्ट १९७५)[४५] 'महिलांना आवाहन' या लेखात हुंडयासाठी लग्न मोडलेली काही उदाहरणे सांगून हुंडयाची प्रथा बंद करून अनावश्यक खर्चाला फाटा देण्यासाठी स्त्रियांना आवाहन केले आहे.

(२० ऑगष्ट, १९७९)[४६] आकाशवाणीच्या सौजन्याने सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तारा अली बेग यांचा 'एक सामाजिक कलंक ः हुंडा पद्धती !' हा सर्व समावेशक लेख प्रसिद्ध करण्यात आला. यामध्ये त्या म्हणतात, '१९६१ मध्ये प्रथम हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला. परंतु इतर सामाजिक कायद्याप्रमाणे हा कायदासुद्धा शोभेचा दागिनाच ठरला. कारण हुंडा पद्धतीवर त्याचा काही एक परिणाम झाला नाही. हुंडा पध्दतीमुळे घडत असलेल्या दुष्कृत्यांच्या बाबतीत सर्व सामान्य लोक उदासीन राहिल्यामुळे या संघटनांचा जन्म झाला. बऱ्याचवेळा शेजारच्या घरगुती मामल्यात हस्तक्षेप करून भांडण करण्यापेक्षा लोक गप्प राहतात. त्यामुळे सामाजिक धाक राहिला नाही. परिणामी स्त्रियांच्या छळवणुकीचा मुक्त परवाना अशा कुटुंबाना मिळाला. त्यासाठी फक्त

कायद्यात सुधारणा करण्यापेक्षा इतर सुधारणा करायला हव्यात. लग्न समारंभातला अनावश्यक खर्च , संपत्तीचे प्रदर्शन, विद्युत रोषणाई, संपत्तीचे प्रदर्शन, जेवणावळी वगैरेवर बंदी घातली पाहिजे.

(१४ सप्टेंबर, १९८१)[४७] सौ पुष्पा कलाजे यांनी, 'नववधूंची सप्तपावले' या लेखात त्यांनी संग्राहय केलेली सप्तपदी म्हणजे नववधूंची कर्तव्य सांगितलेली आहेत. ती थोडक्यात अशी १) काही बिनसले तर कुटंबातला आनंद तू टिकवला पाहिजेस.

२) जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजेस. ३) बिनचूक उत्तरे देताना आत्मविश्वास बाळगला पाहिजेस. ४) जबाबदारीचा वाटा तू उचलला पाहिजेस. ५) अभिमानाने पाऊल उचलायला हवेस. ६) पुरुष लबाड असतात हे विसरू नको. ७) संसाराच्या वेलीवरच्या फुलानां सौंदर्य सुगंध निर्मिण्याची जबाबदारी तुझी आहे हे विसरू नको ...... सप्तपदी सांगताना प्रत्येक पावलाला रमणी, सौभग्यकांक्षिणी, गृहिणी, गृहलक्ष्मी, भाग्यलक्ष्मी, स्वामिनी, मातृदेवते अशी विशेषणे लावली आहेत.

(१५ मार्च, १९८२)[४८] कु. माधुरी आवटी, कुरंदवाड, यांनी 'स्त्री स्वातंत्र्य' वर लेख लिहिला आहे. पण स्त्री स्वातंत्र्यापेक्षा स्त्रियांनी कसे वागावे? कसे राहावे? यासंबंधीचेच विवेचन केले आहे. बलात्कार, स्त्री विक्री, देवदासी, बालविवाह वैगेरे मुद्दे मांडून त्या म्हणतात, ' स्त्री जर मुक्त व्हावयास हवी असेल तर प्रथम तिला शिक्षित करायला हवे.' पुढे त्या म्हणतात, 'स्त्री मुक्ती हवी असेल तर स्त्रियांनी स्वतःवर काही बंधने घालून घ्यायला हवीत. तंग व शॉर्ट कपडे न घालणे, आडरानातून एकटे न फिरणे, मुलांच्याकडे बघून उगीचच नखरे न करणे पुरुषाला आपला शत्रू न समजणे व सलगीही न करणे......' या बंधनाबरोबरच स्त्रियांना एक कानमंत्रही त्या देतात, ' आपल्या पतीच्या व्यवहारात लक्ष घालून जर तो चुकीच्या मार्गावरून जात असेल तर त्याला योग्य तो सल्ला द्यावयास हवा.'

जैन समाज (विशेषतः दिगंबर जैन चतुर्थ) हा प्रामुख्याने ग्रामीण भागात जास्त प्रमाणात असून शेती करण्याऱ्यांची संख्या जास्त असल्याने अर्थातच शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. तर स्त्रियांचे त्याहून कमी आहे. कु. गंगुबाई रामगोंडा पाटील एरंडोली यांनी (३ मार्च, १९८३)[४९] मध्ये घरकाम करणाऱ्या स्त्रिया सतत कामातच व्यस्त असतात, त्यांना अशी उसंतच नसे यावर भाष्य केले 'जैन कुटुंबातील महिलेचे स्थान' या लेखात केले आहे. त्या म्हणतात, 'जैन स्त्रीला विश्रांती, विसावा

घेण्याची सवलतच नाही तिने १६ तास सतत राबले पाहिजे. सदैव काम केले पाहिजे अशी सासरच्यांची अपेक्षा असते. जणु ती एक मोलकरीणच.'

(४ एप्रिल, १९८३)[५०] ला सौ प्रज्ञा आणि (२ मे, १९८३)[५१] ला सौ शकुंतला खोत, (६ जुन १९८३)[५२] ला कु. अलका पाटील आदींनी 'पत्नीचा हातभार-पत्नीला हातभार' या विषयावर तीन-चार महिन्यांत लेख लिहिले आहेत. संसाराला अर्थार्जनाने पतीचा हातभार आणि संसारातील कष्ट, जबाबदारीने पत्नीचा पतीला हातभार लागत असतो. नोकरी करणाऱ्या स्त्रीला घर व नोकरी अशी दुहेरी जबाबदारी असते. मुलाकडे लक्ष ठेवण्यास, पतीला प्रसन्न ठेवण्यात तिला तारेवरची कसरत करावी लागते. त्यात ती आपले आरोग्य विसरते. ती कंटाळते, थकते, दमते, पण तिला 'बैस थोडा वेळ' असं कुणी म्हणत नाही. याविषयी कु. अलका पाटील म्हणते, 'नोकरी करणाऱ्या स्त्रीने कसेही वागले तरी समाज तिलाच दोषी ठरवतो. नवरा संशयग्रस्त होतो. कधी पालकही संशयी होतात. त्यामुळे ती सदैव संत्रस्त व भयभीत राहते. त्याला आल्याबरोबर चहाचा पेला मिळावा अशी अपेक्षा असते तिला मात्र साचलेल्या कामांना सामोरे जावे लागते. अशावेळी नवऱ्याने घरकामाला हातभार लावला तर बिघडले कुठे?' नोकरी करणाऱ्या अविवाहित मुलीच्या हालअपेष्टासंबंधी ती म्हणते, 'मिळवती जर कुमारिका असेल तर पाहणाऱ्यांचा दृष्टिकोन दूषित असतो. तिला सहकारी पुरुषांचा त्रास होतो. मानसिक ओढातान होते. त्यातूनच अपराधी भावना निर्माण होते.'

वासंती शहा, पुणे, यांनी पौराणिक काळापासून स्त्री आणि तिचे चारित्र्य यावर समाजाचे खूप लक्ष असते. मग ती स्त्री कोणत्याही जाती धर्माची असो, तिचे चारित्र्य शुद्ध असले तरच ती देवी होते. यासंदर्भात (५ सप्टेंबर, १९८३)[५३] च्या 'जैन धर्मसंस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान' या लेखामध्ये त्या म्हणतात, 'भारतीय स्त्री चारित्र्याच्या घडणीवर श्रमण व ब्राम्हण या दोन्ही संस्कृतीचा प्रभाव आहे. श्रद्धा, मूल्ये, धार्मिक व लौकिक आचार विचार इ. स्त्री जीवनाच्या विविध अंगावर प्राचीन संस्कृतीची छाप पडलेली आहे. या दीर्घकालखंडामध्ये ती कधी समान अधिकार उपभोगत होती तर कधी तिला पुरुषांच्या दास्यात रहावे लागले. पण या सर्व काळामध्ये भारतीय स्त्री शील, विनय, लज्जा इ. गुणांचे प्रतिक बनून राहिली आहे. धार्मिक क्षेत्र वगळता य देशातील सर्व स्त्रियांचे

सांस्कृतीक जीवन समान स्वरूपाचे आहे. जैनांचे रामायण, मनुस्मृतीचा प्रभाव, जैन धर्माची भूमिका, बदलते युग, धर्म संघाचा आधार, अशा मुद्यांना घेऊन सखोल विचार मांडले आहेत.

समाजात स्त्रीमुक्तीसाठी म्हणजे न्याय व हक्कांसाठी झगडणाऱ्या आणि प्रयत्नशील राहणाऱ्या स्त्रिया आहेत आणि फक्त संसार-मुले-बाळे यात रमणाऱ्याही स्त्रिया आहेत. मग त्याच्यावर अन्याय का होईना? उंबऱ्याआडच्या स्त्रियांचा पारंपरिक विचारही व्यक्त होताना दिसतो. (४ मार्च, १९८५)[५४] च्या आंकामध्ये सौ विजया धनंजय गाट, 'स्त्री मुक्ती' संबंधी विचारतात. 'आपल्या समाजाला स्त्री मुक्ती चळवळीची गरज आहे काय? धर्म परंपरेच्या ऱ्हासाची शक्यता तिने शील संवर्धनाने केली पाहिजे. नीती धर्माने सद्गुणांची वाढ केली पाहिजे. अतिरेकी आसक्ती टाळून स्वधर्माचे आचरण न कुरकुरता करावे?'

हुंडयामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या कुटंबाची उदाहरणे देऊन, 'उद्ध्वस्त होणारी कुटुंबे' हा लेख (१८ मार्च १९८५)[५५] रोजी च्या अंकामध्ये सौ जोत्स्ना जैन यांनी लिहिला आहे. तर 'दोष कुणाचा' या (८ एप्रिल, १९८५)[५६] ला सौ शशिकला आरवाडे यांनी हुंडयाची दुसरी बाजू मांडलीय. 'मुलीचे आई-वडीलच चांगल्या स्थळासाठी सोनं, नाणं, मान-पान, हुंडा वैगेरे खर्च करायला तयार होतात मग दोष कोणाचा?' असा सवाल केला आहे.

स्त्री मुक्तीचा जमाना आहे परंतु स्त्री मुक्त नाही आणि जैन स्त्रिया तर नाहीच नाही. अनेक समस्यांना अन्याय-अत्याचाराला तिला तोंड द्यावे लागते. स्त्री मुक्तीच्या वाटेवर जैन स्त्रियांची परिस्थिती कशी आहे? हे सौ शालिनी पाटील यांनी (३ फेब्रुवारी, १९८६)[५७] च्या 'स्त्री मुक्ती आणि जैन समाज' मध्ये घेतलेला आहे. सातवी ते दहावी पर्यंत शिकणाऱ्या ग्रामिण मुली... शाळेतील त्यांची गळती... विवाहित तरुणींची आत्महत्या किंवा भाजून मृत्यू, हुंडयाने कमकुवत बनणाऱ्या मुली, व्दिभार्या प्रतिबंधक कायदा असूनही दुसरे लग्न करणारे पुरुष, परित्यक्ता स्त्रिया, त्यांचे आई-वडिल या सर्वांची सविस्तर माहिती घेऊन जैन स्त्रियांची वास्तवता समाजापुढे आणली आहे. तसेच 'स्त्री मुक्ती' वर श्रीमती विजया धनंजय गाट (३ मार्च, १९८६)[५८] आणि सौ. प्रेमलता गुंडे यांनीही विचार मांडले आहेत.

'जैन धर्म आणि स्त्रियांचे स्थान' या लेखामध्ये सौ सुमन चौधरी (२१ जून, १९८६)[६०] यांनी २० व्या शतकात स्त्री ने पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळविले आहे. शिक्षण साहित्य राजकारण

वैद्यकीय व्यवसाय अथवा राजकारणात जैन महिला मागे राहिल्या नाहीत हे सांगून ब्राम्ही, सुंदरी, यांची उदाहरणे दिली आहेत.

(१ डिसेंबर, १९८६)[६१] नाशिक जिल्हयातील चांदवड येथे भरलेल्या शेतकरी महिलांच्या राज्यव्यापी अधिवेशनाबद्दल सहसंपादिका सौ. सुमन चौधरी यांनी किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया' या संपादकीय लेखात शेतकरी स्त्रियांच्यावर भाष्य केले आहे. '२५/३० हजार जमलेल्या स्त्रिया म्हणजे स्त्री मुक्ती चळवळीतील महत्त्वाचे पाऊल' असा उल्लेख त्यांनी या घटनेचे स्वागत करताना केला आहे. शेतकरी महिलांनी चांदवडच्या अधिवेशनामध्ये आपापली गाऱ्हाणी मांडली. आपलं काम, चूल मूल, स्वयंपाक पाणी शारीरिक कष्ट, धुणी भांडी, आजारपण, बाळंतपण वैगेरे सगळे जीवनच त्यांनी अधिवेशनात उलगडून दाखवले आहे. यावर सुमन चौधरी म्हणतात, 'आपल्या जैन ग्रामीण स्त्रियांचे दुःखही या पेक्षा वेगळे नाही. कारण कायदा व्यवहारातील तफावत आणि संस्कृतीचा बागुलबुवा तिला पिचत ठेवतो. स्त्रीच्या जीवनातील असुरक्षितता दूर झाली पाहिजे. ही आजच्या काळाची गरज आहे.'

हळूहळू स्त्रीला परावलंबी जीवनाची जाणीव होऊ लागली आणि स्वावलंबी बनण्याची ओढ लागली.

## ४.६ सन १९८७ ते २००३ या कालखंडातील स्त्री विषयक लेखन

सौ सुचेता बर्वे (२ मार्च १९८७)[६२] च्या 'शुभमंगल सावधान' या लेखात म्हणतात, 'पैसा आणि आसरा याबाबतीत प्रत्येक स्त्री ने स्वालंबी असले पाहिजे. कावळा चिमणीतल्या चिमणीलाही तिचं घर असतं पण इथं स्त्री ला घरच नाही. घर नवऱ्याची किंवा मुलांची असतात.' लग्नासंबंधी एक धोक्याचा इशाराही त्यांनी दिलाय की, विवाह म्हणजे आनंददायी गोंधळ असतो,. पाटर्या, दागदागिने, मिरवणे, ताशे वाजंत्री, पक्वानांच्या पंगती या सर्वात तिच्या जिवाभावाची... हक्काची निवाऱ्याची गोष्ट विसरली जाते.'

सौ. प्रेमलता गुंडे यांनी याच अंकामध्ये (२ मार्च, १९८७)[६३] संपादकीयमध्ये, 'मुलगी झाली हो' या शीर्षकाखाली गर्भजल परीक्षण, मुलीचा गर्भ काढून टाकणे, त्याचे धोके सांगून समाजजागृती केली आहे. पुन्हा सौ गुंडे यांनी (४ मे १९८७)[६४] च्या संपादकीय मध्ये स्त्री पुढील आव्हाने' या विषयावर विवेचन केले आहे. त्या म्हणतात, 'स्त्री पुढील आव्हाने काळाप्रमाणे बदलत गेली

आहेत. शतकाच्या सुरुवातीची स्थिती आज बदललेली आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, मातृत्व, बाल संगोपन संस्कार याची जबाबदारी कोणत्याही प्रकारे न टाळता अथवा मूलभूत मर्यादेचा भंग न करता शिक्षण समानता आणि आर्थिक स्वातंत्र्य या क्षेत्रात भारतीय स्त्रीने प्रगती केली पाहिजे. हेच मोठे आव्हान आहे.

'आपण थोडे आत्मपरीक्षण करूया' या प्रेमलता गुंडे यांच्या (९ मार्च, १९८७)[६५] मध्ये इंदोर मधील इंद्रपभू साध्वीचे अपहरण झाल्यानंतरचे आपले विचार स्पष्ट शब्दात मांडले आहेत. यामध्ये मुलीची दीक्षा घेणे, तिची कौटुंबिक पार्श्वभूमी, वैराग्य नसताना वडील हुंडा देऊ शकत नाहीत म्हणून दीक्षा ग्रहण केल्यानंतर संसारी जीवनाची ओढ लागणे... या संबंधीचे आपले मत नोंदविले आहे. त्या म्हणतात, 'हुंडयासाख्या समस्यातून आलेले वैराग्य हे वैराग्य नव्हे, सुटका करून घेण्याची ती भावना!' या सर्व गोष्टींचा विचार करून समाजाने आत्मपरीक्षण करणे किती गरजेचे आहे हे डोळसपणे मांडले आहे. पुरूष प्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान असतेच. यातून जाहिरातीचे क्षेत्रही सुटलेले नाही. 'जाहिरातीचे युग आणि स्त्रिया' यामध्ये सौ. सुमन चौधरी यांनी (६ एप्रिल, १९८७)[६६] ला संपादकीय लिहिले आहे. त्या म्हणतात, 'समाजाच्या चौकटीतले दुय्यम स्थानच स्त्रियांच्या जाहिरातीमध्येही दिसते. गृहसजावट, केशभूषा, वेशभूषा, पाककला, बालसंगोपन वैगेरे गोष्टींच्या जाहिराती ती करते... त्यासाठी देह प्रदर्शनही तिला करावे लागते. स्त्री ला देवी मानायचे नाही. दासी मानायचे नाही. आपल्यासारखे माणूस मानायचे. पुरुषांनी एवढे केले तरी स्त्री मुक्तीचे ध्येय लवकर साध्य व्हायला मदत होईल'. एक सुशिक्षित मुलगी, 'प्रगती आणि जिनविजयकडे सासरच्या छळासंबंधी (विशेषतः सासूच्या) पत्र पाठविते आणि त्या पत्राला प्रगती... मधून वाचा फोडावी असे सुचविते. ते पत्र आल्यानंतर सासू, सून, सासर, माहेर, हक्क, कर्तव्य वैगेरे मुद्यांना धरून 'मुली तू आलीस आपल्या घरी' असे संपादकीय लेखन सौ सुमन चौधरी यांनी (३ ऑगष्ट, १९८७)[६७] च्या अंकामध्ये केले आहे. जैन विवाहितेचे वास्तव जीवन असेही असते. हे समजण्यासाठी पत्राचा थोडा मजकूर आपल्यापुढे ठेवणे गरजेचे आहे... पत्र असे आहे.

मा. संपादक 'प्रगति आणि जिनविजय' यांना,

माझा नवरा सुशिक्षित आहे पण जुन्या वळणाचा आहे. सासुबाई नेहमी घालून पाडून बोलतात. दिवसभर काम लावतात. मला कामाचा कंटाळा नाही पण कसलेही स्वातंत्र्य नाही.

आम्ही नवरा बायको बोललो तरी सासूबाईंनां आवडत नाही नवऱ्याला चहा पाहिजे असल्यास तो आईला सांगतो. ती मग साखर आणून देते. स्वयंपाकाच्या वस्तूसुद्धा कुलपात ठेवते. लग्नाला आठ वर्ष झाली तरी ही परिस्थिती. परवा किरकोळ कारणावरून भांडण झाले. तेव्हापासून आमचे नवरा बायकोचे संबंध सासूबाईनी बंद केले. 'मोलकरीण म्हणून राहायचे असेल तर राहा नही तर चालती हो' असे सासूबाई म्हणतात पण आमच्या सारख्या सुनांच्या दुःखांना वाचा फोडावी या हेतूने हे पत्र लिहायचे धाडस केले आहे. आपली एक भगिनी...' या पत्राला अनुसरूनच चौधरी यांनी संपादकीय विवेचन केले आहे.

प्रा. डॉ. सौ. उषा आपटे, सांगली यांनी (७ सप्टेंबर, १९८७)[६८] च्या 'नोकरदार ,महिला' वर महिलांचा व्यक्तिमत्त्व विकास, आर्थिक स्वायतत्ता राष्ट्रीय संपत्ती, महिला उद्योग वैगेरे मुद्यांना स्पर्शणारा लेख लिहिला आहे. तर सौ. सुमन चौधरी यांनी (५ सप्टेंबर, १९८७)[६९] च्या 'अमानुष केवळ अमानुष' म्हणून राजस्थानमधील रूपकंवरच्या सती घटनेवर संपादकीय लिहिले आहे. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरूध्द जोरदार चळवळ सुरू केली. १८२९ साली सतीबंदीवर कायदा होऊनही अशा घटना घडतात या बद्दल निषेध करून त्या म्हणतात, 'या पार्श्वभूमीवर जैन महिला भाग्यवान म्हणायच्या कारण जैन धर्माने स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले आहे.'

सौ अनुराधा डोणगावकर, कागवाड यांनीही स्त्रियांच्या बदलत्या स्थितीवर 'मृगजळ' हा लेख (२६ ऑक्टोबर, १९८७)[७०] च्या अंकामध्ये लिहीला असून त्याच अंकात हुंडाबळीवर डॉ. सौ. वर्षा अक्कोळे यांनी वेगळाच प्रकाश टाकला आहे. 'मुलीचा गर्भत्याग करणे म्हणजे एक प्रकारे माता-पित्यानं केलेला हुंडाबळीच नव्हे का?' गर्भजल परीक्षा, मुलीचा गर्भत्यागावर विवेचन केले आहे.

कु. मालुताई सावळवाडे, नांद्रे (सेक्रेटरी महिला मंडळ, नांद्रे) यांनी (७ डिसेंबर १९८७)[७२] च्या अंकामध्ये 'जिथे शील उत्तम आहे तीच खरी सुंदर स्त्री ! भगिनींनी पूजा अर्चा करावी. धर्म तत्त्वांच्या सुरक्षिततेसाठी व प्रचारासाठी तन, मन, धन अर्पण करून प्रसंगी बलिदानही द्यावे असे विचार मांडले आहेत. तसेच याच अंकात 'संपत्ती हेच रोगाचे निदान' असल्याचे सौ. निर्मला आरवाडे यांनी सागितले आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटी म्हणजे २१ व्या शतकाच्या शेवटच्या १०/१५ वर्षांत स्त्रियांना नवे भान आल्याचे जाणवते. स्त्री जीवनावर सतत विचार मंथन होत असल्यामुळे त्याच्या जीवनात आणि व्यक्तिमत्त्वात बदल होऊ लागल्याचे लक्षात येते. स्वतःच्या जीवनाकडे, नात्याकडे, पती-पत्नी संबंधाकडे नव्याने बघण्याची दृष्टीही आल्याचे जाणवते आणि या दृष्टीने जैन स्त्रियाही विचार करू लागल्याचे, लिहू लागल्याचे प्रगति आणि जिनविजय मधल्या लेखनावरून लक्षात येते. फक्त विचार, चर्चा नको. काम आणि प्रत्यक्ष कृती पाहिजे. या ठाम टप्प्यावर स्त्रिया लिहू लागल्या आहेत.

(१ फेब्रुवारी, १९८८)[७४] संपादकीय मध्ये सौ सुमन चौधरी म्हणतात, 'चला कामाला लागुया' महिलांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर घेतलं पण फक्त शिबिर घेऊन काय उपयोग? पुढं कामाला लागल पाहिजे यासंबंधी आपले विचार स्पष्ट केले आहेत. याच अंकामध्ये 'भारतीय स्त्री आज उद्या' यावर सौ हेमलताबेन कोठारी यांनी आपले विचार प्रकट केले आहेत.

(४ एप्रिल, १९८८)[७६] सौ अनुराधा गडेण्णावर यांनी शिक्षणाने माणूस शिक्षित होते. साक्षर होतो. पण तो सुशिक्षित होतोच असे नाही. स्त्रियांच्या बाबतीतही तेच. खरी सुशिक्षित स्त्री कोणाला म्हणायचे? यावर भाष्य केले आहे... त्या म्हणतात, 'खरी सुशिक्षित स्त्री कोण? जिच्या अंगी चांगल्या गुणांचा वृत्तीचा व भावनेचा खजिना भरलेला आहे तीच खरी सुशिक्षित स्त्री! एखादी स्त्री एम.ए. शिकली असेल पण चांगल्या जीवन मूल्यांची नसेल आणि तिचे हृदय जर अहंभावाने, अहंकाराने भरलेले असेल. तर एम. ए. च्या डिग्रीला शून्य किंमत आहे. विद्यापीठाने दिलेल्या पदवीने जीवनाची उंची मोजता येत नाही. त्यासाठी नैतिकतेचे अधिष्ठान हवे. उच्च आचार विचारांचे प्रखर व्यक्तिमत्त्व हवे पदव्यांचे शेपूट असलेल्या पण व्यवहारापासून अलिप्त असलेल्या स्त्रीला सुशिक्षित कोण म्हणेल?

बऱ्याच जैन स्त्रिया पदवीधर, डॉक्टर, इंजिनियर, वकील, सी.ए. वैगेरे सर्व क्षेत्रामध्ये २० व्या शतकाच्या अखेरच्या टप्प्यात चमकल्या आहेत. आपल्या क्षेत्रातली माहिती लिहून समाजाला जागृत करू लागल्या. ॲड तारा नरगुंदे, सांगली यांनी (१ ऑगष्ट, १९८८)[७७] च्या अंकामध्ये निराधार पत्नी, मुले आणि आई-वडिलांच्या पोटगी संबंधीची कायदेशीर माहिती दिलेली आहे. पोटगीच्या अधिकाराबद्दल स्त्रियांना जागृत केले आहे. तसेच याच अंकामध्ये 'रिकामा वेळ कसा कारणी लावाल?' संबंधी स्त्रियांना मार्गदर्शन सौ. सुचेता बर्वे यांनी केले आहे. रिकाम्या वेळी

एखादी आवडीची कला शिकावी, गाण, शिवणकाम, विनकाम, चित्रकला, ब्युटीपार्लर जे आवडेल ते शिकावे. शिवाय समाजसेवा म्हणून अंध, अपंग, कष्टकरी, कामकरी मुलांना शिकवावे, पापड, चटण्या, मसाले करून विकावेत. वृध्द मंडळींनी एका हॉलमध्ये एकत्र येऊन वेळ घालवावा असे अनेक मार्ग वेळ घालवण्यासाठी सुचविले आहेत.

ॲड. शैलजा पंडित यांनी (५ सप्टेंबर, १९८८)[७९] च्या अंकामध्ये 'हुंडा प्रतिबंधक कायद्याविषयक मर्गदर्शन केले आहे. तर याच अंकामध्ये 'स्त्री रक्षणाचे कायदे?' या विषयावर सौ शैलजा सावंत यांनी लेख लिहिला आहे. स्त्री वर अनेक प्रकारचे अन्याय होतात. सतीप्रथा, बहुपत्नीकत्व, अपहरण, वेश्याव्यवसायाला लावणे वैगेरेच्या माध्यमातून स्त्रीवर गुन्हे घडतात तेंव्हा तिने कुठल्याही दडपणाखाली न येता फौजदारी कायद्यानुसार केलेल्या तरतुदीचा आधार घेऊन स्त्रियांनी प्रतिकार केला पाहिजे. त्या म्हणतात, 'फौजदारी कायद्यानुसार जर लग्न झाल्यापासून सात वर्षांच्या आत स्त्रीने आत्महत्या केली किंवा तिचा संशयास्पद मृत्यू झाला तर तिच्या पतीस व त्याच्या नातेवाईकास परिस्थिती लक्षात घेऊन शिक्षा होऊ शकते.' अशी माहिती देऊन स्त्रियांना दिलासा देण्याचे काम केले आहे.

"स्त्री स्वातंत्र्यासंबंधी गांधीजीचे विचार" संपादकीय मध्ये सौ हेमलता गुंडे यांनी (३ ऑक्टोबर, १९८८)[८१] मांडले आहेत. त्यांनी लिहिलंय, 'स्त्री शक्तीचे मोल गांधीजींनी जाणले होते. स्त्रीला अबला संबोधण्यावर गांधीजींचा आक्षेप होता. कुठल्याही आपत्तीमध्ये स्त्री-पुरुषापेक्षा अधिक टिकते, म्हणून आपली शक्ती व कर्तृत्त्वशीलता जाणून स्त्रियांनी निर्भयपणे आपला भार उचलला पाहिजे.

'स्त्रीचे सामाजिक स्थान' यावर (६ जून १८८९)[८२] ला सौ प्रेमलता गुंडे यांनी संपादकीय लिहीले आहे. त्या म्हणतात, कायद्याने स्त्रीला समान दर्जा दिला आहे. परंतू अजूनही कुटुंबामध्ये मुलाच्या आणि मुलीच्या शिक्षणाची समस्या निर्माण होते. तेव्हा मुलाच्याच शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. अजूनही कन्याजन्मावर शोक केला जातो, ही आजची वास्तवता आहे. स्त्री-पुरुषाच्या जीवनातील उपकरण बनली आहे. स्त्री गुलामाप्रमाणे विकली जायची. याला फार काळ लोटला पण आजही लपवून छपवून त्याचा वापर होत असतो. स्वतःचा स्वतःवर हक्क न राहणे, आत्मा गमावून बसणे त्यावेळी तिचे स्वत्वही हरवून जाते. पण आज.... आता स्त्रीला माणूस

बनविण्यासाठी तिच्या मानसिक, बौध्दिक, अध्यात्मिक विकासासाठी शिक्षणाचे संस्कार करणे जरुरीचे आहे.''स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेते महात्मा गांधी' या विषयावर संपादकीय (३ ऑक्टोबर, १९८९)[८३] च्या अंकामध्ये पुन्हा लिहिले आहे.

सहसंपादिका सौ. प्रेमलता गुंडे यांनी राजकारणातील स्त्रियांच्या राखीव जागेचा प्रश्न चर्चेत येतो पण राखीव जागेसंबंधी विधेयक शासन मंजूर करीत नाही हा प्रश्न उचलून धरला आहे. 'स्त्रियांची सामाजिक व राजकीय परिस्थिती' या विषयावर (६ मार्च १९९०)[८४] च्या अंकामध्ये त्यांनी संपादकीय लिहीले आहे. त्या म्हणतात, '२१ व्या शतकात झेपावणाऱ्या लोकशाहीच्या प्रगतीला स्त्री कर्तृत्वानेही गती दिली आहे. स्वातंत्र्य काळात सामाजिक, शैक्षणिक राजकीय क्षेत्रामध्ये स्त्री चे स्वतंत्र असे स्थान आणि प्रतिमा निर्माण झाली आहे. घटनेने लिंगभेद वर्ज मानला आहे. तथापि समाजधुरीण आणि राजकीय नेते स्त्री-पुरुष भेद कटाक्षाने जोपासतात. त्यासाठी निरनिराळया सबबी व कारणे देतात, ती मतलबी आणि चुकीची आहेत. लोकप्रतिनिधीत स्त्रियांना किमान ३० टक्के हिस्सा ठेवणेच्या घोषणा केल्या पण १० टक्केही अजून प्रतिनिधीत्व मिळू शकले नाही.'

(६ नोव्हेंबर १९९०)[८५] कु. लता आप्पासो शेडबाळे यांनी, 'स्त्री च्या विकासातील स्त्री हीच धोंड' असे भाष्य सासू-सून यांचे नाते, झगडा, सासूने केलेला सासुरवास, वैगेरे उदाहरणावरून केले आहे. 'महिला सहकार या विषयावर ( ७ मे १९९१)[८६] सौ. प्रेमलता गुंडे यांनी संपादकीय लिहून त्यामध्ये राजकारणातील महिलांच्या ३० टक्के जागेसंबंधी विचार मांडला आहे. सौ प्रेमलता गुंडे यांनी (४ फेब्रुवारी, १९२२)[८७] चे संपादकीय पुन्हा महिलांवर लिहिले आहे. 'उपेक्षित महिला परिषद' मध्ये त्यांनी दक्षिण महाराष्ट्र जैन महिला परिषदेसंबंधी स्पष्ट आणि परखड विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, '९२ वर्षाच्या प्रदीर्घ कालवधीनंतरही महिला परिषदेची बाल्यावस्था अद्यापही संपलेली नाही.' सक्षम, समर्थ नेतृत्व महिलांसाठी लाभलेले नाही याची खंत व्यक्त करताना त्या स्पष्टपणे म्हणतात, 'महिलांची संघटना बांधणे, महिला प्रश्नांना वाचा फोडणे, महिला प्रगती व उन्नत्तीसाठी विधायक कार्ये हाती घेणे वगैरे कामे समर्थ नेतृत्वाच्या अभावी झालेली नाहीत.

(२ जून १९९२)[८८] प्रा. सौ. सुमन चौधरी यांनी वाचकांशी सासू-सूनेच्या नात्यामधले सासूचे नाते हे समाजाने सरसकट बदनाम ठरवले आहे. काही झाले तरी दोषाचे बोट नेहमीच सासूच्या दिशेने दाखविले जाते. पण काही वेळा सुनवासही सासूला घडू शकतो. अशा नाजूक

विषयांवर 'हितगूज' साधले आहे. कालबाहय होत असलेल्या सासुरवासासंबंधी आपले विचार मांडून, 'सासुरवासाच्या नावाखाली सुशिक्षित प्रगल्भ पण सासूच्या भूमिकेत नकळत बदनाम होणाऱ्या भगिनींना न्याय मिळायला हवा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

'पतीच्या कर्तबगारीत पत्नीचाही वाटा' महत्वाचा असतो असे विवेचन सौ. सुमन शहा कल्याण यांनी (६ ऑक्टोबर, १९९२)[८९] मांडले आहे. तर 'सत् स्त्रियः रक्ष्यन्ते गृहम! ' या लेखात सौ. उज्वला आडमुठे, दुधगाव यांनी पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रीजीवन मैनासुंदरी, चंदनबाला, सीता, द्रौपदी, वगैरेंचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे.

सौ. ज्योती मोहन शहा, सांगली यांनी (२१ डिसेंबर, १९३०)[९१] च्या 'शीला लेखात साकार झालेल्या जैन स्त्रिया' या शीर्षकाने लेख लिहिला आहे. इतिहासातील प्रेरणादायी कर्तृत्त्वही स्त्रियांमध्ये आहे. यामध्ये जैन स्त्रियाही मागे नाहीत. हे उदाहरणासह स्पष्ट करणारा महत्त्वाचा लेख आहे. लेखामध्ये त्या म्हणतात, 'मंदिर बांधणे, त्यागींची सेवा करणे, ग्रंथ रचनेला प्रेरणा देणे व दान करणे अशा धार्मिक कार्यातच नव्हे तर सरोवर बांधणे गावे वसविणे या सारख्या सामाजिक कार्यातसुदधा स्त्रिया सक्रीय असत. प्रसंगी रणभूमीवर पराक्रम करणे व तेवढयाच धीराने मृत्यूला सामोरे जाऊन यमसल्लेखना घेणे अशा प्रकारच्या जैन स्त्रियांच्या कार्याचा उल्लेख अनेक शीला लेखातून मिळतो.

२१ शतक म्हणजे, 'खाजगीकरण, व्यापारीकरण, जागतिकीकरणाच्या विळख्यात गुदमरण्यासाठी आपणहून जाणार आहे. एका बाजूला विज्ञान तर दुस-या बाजूला धर्मा च्या नावाखाली गटांगटामध्ये विभाजित झालं आहे. बुवाबाजीला उधण आलेले आहे. स्त्रीचं वस्तूकरण आणि बाजारीकरण झपाटयान करू पाहणारं, चंगळवादाच्या मोह जाळात अडकलेल्या या २१ व्या शतकात हिंसा मोठया प्रमाणावर होत आहे. सामाजिक हिंसा, गुन्हेगारी हिंसा, राजकीय हिंसा पावलोपावली घडत आहेत. गुन्हेगारी आणि राजकारण याचं एक बेमालूम समीकरण झालेलं आहे. त्यातून हत्याकांडाच राजकारण खेळलं जात आहे. फूलनदेवी हत्याकांड हे यातीलच एक महत्त्वाचे उदाहरण आहे.

अलीकडच्या फुलनदेवीचा उल्लेख स्त्री सहनही करते अत्याचारानं पेटून उठते बदल्याच्या भावनेनं आपलं आयुष्यही उधळून लावते अशी स्त्रिमधील ठळक उदाहरण म्हणून करावा लागेल.

भावी आयुष्याची सुखद स्वप्ने पाहणाऱ्या परकऱ्या फूलनपासूनच दरोडेखोर फूलनदेवी पर्यंतचा आणि तिच्या राजकारणातील सहभागापासून हत्याकांडापर्यंतचा प्रवास म्हणजे स्त्री जीवनाच्या फरफटीचा इतिहास आहे. (७ सप्टेंबर, २००१)[९२] सहासंपादिका निलम माणगावे यांनी 'संदर्भ फूलनदेवीचा' या शिर्षकाखाली आपले विचार फूलनदेवीच्या हत्याकांडानंतर मांडले आहेत. फूलन... तिचे आयुष्य समाज...समाजातली हिंसा या पार्श्वभूमीवर 'अहिंसा किती गरजेची आहे'. याचे महत्त्व पटवून देणारा लेख असे याचे स्वरूप असून लेखाच्या शेवटी त्या म्हणतात, 'दया, क्षमा, शांती वैगेरे पर्युषण पर्वापुरती लक्षात न घेता सदासर्वकाळ अंमलात आणली तरच येत्या भविष्यकाळामध्ये पुन्हा अशा फूलनदेवी तयार होणार नाहीत. नाहीतर उद्या आपल्यातीलच एखादी मुलगी फूलनदेवी बनेल, तेव्हा पश्चातापाशिवाय आपल्या हातात काहीच उरणार नाही आता फक्त णमोकार मंत्र घालून चालणार नाही तर आजपासून...आत्तापासून 'जगा आणि जगू द्या' याही पुढे जाऊन जगवा आणि मग जगा या संदेशाचा पाठपुरावा केला पाहिजे?'

२१ व्या शतकात मॉडेलिंग, सौंदर्य स्पर्धा, झटपट पैसा मिळवून देणारा शरीर विक्रय सारख्या बारबालाला प्रोत्साहन देणारा धंदा स्त्रियांना आकृष्ट करत आहे आणि या भुलभुलैयाच्या मोहाला स्त्रियाही बळी पडत आहेत. हा चंगळ वाद झपाटयाने स्त्रियांचा बुध्दीभेद करत आहे. ही लाजीरवाणी गोष्ट समाजाला रोगट बनवत आहे. एका बाजूला काही अंगी स्त्रिया तर दुसऱ्या बाजूला पुरुष समाजरचनेला मनुवादी व्यवस्थेला धरून राहणाऱ्या सहन करणाऱ्या आहेत. तर काही अंशी विरोध करणाऱ्या स्त्रिया आढळतात.

आजकाल मध्यमवर्गीय स्त्री शिकून पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रामध्ये काम करू लागली अर्थार्जनाने संसाराचा डोलारा संभाळू लागली तरी पारंपरिक भूमिकेतून रूढी परंपरेतून व्रत वैकल्ये यातून आधुनिक बुवाबाजीतून कर्मकांडातून बाहेर न पडता अधिकाधिक त्यात अडकत चालली हे कटू सत्य आहे. पण स्त्री ला नवेभान आलेलं आहे. स्वतःची ओळख महत्त्वाची वाटू लागली अहे. स्त्रीपणातून माणूसपणाकडे तिची वाटचाल चालू झाली आहे हे नाकारता येणार नाही.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने लिहिलेल्या (८ मार्च, २००२)[९३] च्या अंकामध्ये नीलम माणगावे म्हणतात, 'मी कोण? मी एक स्त्री आहे, म्हणजे कोण आहे? स्त्री आहे म्हणजे माणूस नव्हे काय? लिंगभेदाने मी एक स्त्री असले तरी, माणूस म्हणून माझे एक अस्तित्व आहे.

व्यक्ती म्हणून माझं एक व्यक्तिमत्त्व आहे, याची जाणीव होणं... म्हणजे महिला सबलीकरण! स्वतःचे मत, विचार प्रकट करणं, स्वतःचे निर्णय स्वतः घेणं म्हणजे महिला सबलीकरण! बालसंगोपन, वृध्द-आजारी-अपंगाची सेवा गृहिणी म्हणून स्वतः करणं म्हणजेसुध्दा एक प्रकाराचं मिळवणं याची जाणीव होणं...म्हणजे महिलांचे सबलीकरणं...' अन्यायाच्या विरोधात झगडतानासुध्दा मनाची शांती ढळू न देता आत्मविश्वासानं जगण्याच सामर्थ्य मिळवणं म्हणजे महिला सबलीकरण!

पद्मावती खेमलापुरे, 'धर्म या लेखामध्ये (८ मार्च, २००२)[९४] च्या अंकात म्हणतात, 'सध्याच्या परिस्थितीचा विचार करता धर्म स्त्रियांमुळेच टिकला आहे आणि टिकणार आहे. स्त्रियांनी धर्माचरण करत असताना पर पंच सोडून प्रपंच करावा.'

प्रा. सौ. सुमन चौधरी यांनी 'प्रगती आणि जिनविजयची वाटचाल महिला उन्नतीची' असा लेख (१२ एप्रिल, २००२)[९५] च्या अंकामध्ये लिहिला आहे. 'प्रगती आणि जिनविजय' ने १०० वर्षात स्त्रियांच्या उन्नतीकरता, त्यांच्या विकासाकरता, त्यांच्या विचार लेखनाला दिशा देण्याकरता त्याची व्याप्ती, खोली वाढविण्याकरीता नेहमीच उन्नतीच्या दिशेने पाऊल उचलले आहे. त्या लेखामध्ये म्हणतात, 'प्रगती आणि जिनविजय' ने महिला कल्याण आणि महिला उन्नतीला प्राधान्य दिले आहे. महिलाकल्याण ही सतत चालणारी गतिमान प्रक्रिया आहे. तिला सततचा अवसर मिळायला हवा.' अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

(२६ जुलै, २००२)[९६] सौ सुनेत्रा नकाते, यांनी 'फुलं हवीत की काटे?' या लेखामध्ये स्त्री आणि पुरुष नवरा आणि बायको, दोघेही परस्परावलंबी आहेत. नाण्याच्या दोन बाजूच आहेत. दोघांनाही एकमेकांची गरज असते. मग पुरुषच श्रेष्ठ... त्यालाच मान का? त्याचाच सन्मान का? तो मान स्त्रीला का नाही? या आशयाचे लेखन करण्यात आले. 'जावयाची बडदास्त सासरवाडीत ठेवली जाते तशी सुनेची सासरी ठेवली जाते का? असा मूलभूत प्रश्न विचारणारी एक स्त्री आणि निवेदिका... म्हणजेच लेखिका यांच्यातल्या संवादातून विषयाला वाचा फोडली आहे. मला वाटते जैन समाजातही स्त्री-पुरुष समानतेची मुळे हळू-हळू पण घट्टपणे खोलवर रुजविण्याची सुरुवात झालेली आहे. हे खूप महत्त्वाचे व गरजेचे आहे. कारण भ. महावीर तीर्थंकरांनी याची सुरुवात त्याच्या काळात केली होती. पण ती पुरुषप्रधानतेत उखडली गेली. सर्वच जैनेतर समाजाबरोबर

हिंदू संस्कृतीवरोबर जैन स्त्रियांनीही गौण लेखलं जाऊ लागलं दुय्यम स्थानावर नेऊन बसवलं गेलं. त्या स्थानावरून समानतेच्या स्थानावर येण्याची धडपड स्त्रियांनी सुरू केली आहे.

स्त्री विषयक लेखनाची ही फलश्रुती आहे असे म्हणणे म्हणजेच १०० वर्षातील स्त्रियांच्या लेखनाला मिळालेली पावतीच आहे. ज्यामुळे आजच्या स्त्रीला आपल्या पायावर उभे राहता आले. मानाने जगता येऊ लागले त्यामुळे ही एक प्रकारची

मानवंदनाच आहे.

## ४.७ निष्कर्ष

१) १९०३ पासून २००३ पर्यंतचे लेखन म्हणजे एका शतकाचा म्हणजेच १०० वर्षांचा प्रवास. स्त्रीजीवनाचा, समाजजीवनाचा, त्यांच्या बदलत्या जाणीवांचा, प्रगल्भतेकडे जाणाऱ्या विचारांचा, नव्या आत्मसन्मानाची स्त्री कशी होती? कुठ होती? तिची वाटचाल कुठून कुठेपर्यंत झाली हे सांगणारा आहे.

२) या १०० वर्षांमध्ये अनेक विषयांना स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे स्त्रियांनी काम केले. पण जैन स्त्रिया खऱ्या अर्थाने सुशिक्षित झाल्या का? त्यांना स्वतःकडे, समाजाकडे, जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी आली का? त्यांच्यात परिवर्तन झाले का? हे बरेचसे प्रश्न तसेच आहेत.

३) अजूनही शतकापूर्वीच्या समस्या जशाच्या तशाच आहेत. उदा.हुंडा! आज हुंडयाचे स्वरूप बदलले असले तरी वधूकडून वराला आजही बरेच द्यावे लागतेच. दागदागिने, महागडया वस्तू, फ्लॅट, वैगेरे यांची नकळत मागणी केली जाते आणि चांगल्या स्थळासाठी वधूच्या पालकांकडून ती पुरवलीही जाते. त्यामुळे हुंडयाची समस्या १०० वर्षांपूर्वीची होती तशीच आजही आहे.

४) स्त्रिया शिकून मिळवू लागल्या आहेत. त्यांनी वेगवेगळया क्षेत्रामध्ये स्वतःच कर्तृत्व सिध्द केले आहे. पण तरीही आज ही विधवा परितक्त्यांच्या प्रश्नातून त्यांची सुटका झाली नाही. आजही विधवा पुनर्विवाहाला समाज मान्यता देत नाही ही वस्तुस्थिती आहे.

५) २१ व्या शतकातही हुंडाबळी, मुलीच्या जन्माविषयी दुःख आणि त्यातूनच गर्भलिंग चाचणी, मुलीचा गर्भत्याग म्हणजेच स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या घटनांचे प्रमाण वाढत आहे. सतत १०० वर्षे या विषयावर लेखन, प्रवोधन चालूच आहे. तरीही अशा गोष्टी घडतात, त्याला खरी प्रगती म्हणावी

का? तरीही स्त्रियांनी केलेले लेखन, त्यांनी लिहिलेले विषय, लिखाणातली तळमळ बघून परिवर्तन कसे घडत गेले हे सहज लक्षात येते.

६) प्रथम लेखन केलल्या लेखिका श्री भ्र. चारूदत्त कळंत्रे यांनी जैन श्राविकाश्रमाची स्थापना सांगली येथे केली. त्याचा उल्लेख २८ एप्रिल, १९२२ च्या अंकामध्ये आलेला आहे. कळंत्रे आक्का यांनी खेडयापाडयातील जैन स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडी करुन दिली. म्हणूनच आपल्या लेखामध्ये त्यांनी 'स्त्री शिक्षण व त्याचे महत्त्व' या विषयावर विवेचन केले आहे. स्त्री शिक्षणापासून सुरुवात झालेला हा स्त्री लेखनाचा प्रवास स्त्रियांच्या अनेक समस्यांचा वेध घेत घेत माणूसपणापर्यंत येऊन पोहोचतो. म्हणूनच स्त्री जीवनाचा या शतकाचा प्रवास महत्त्वाचा आहे.

७) सुरुवातीच्या काळात स्त्री शिक्षण, दागिने, पोषाख, हुंडा, शील, पातिव्रत्य, घर, गृहस्थी या विषयांवर असून त्यात स्त्री शिक्षणावर जास्त भर दिलेला आहे. तरीही शिक्षणाचा अंतिम हेतू आदर्श संसारासाठी आणि धर्म ग्रंथ वाचण्यासाठी, देवदेविकांची माहिती करून घेण्यासाठीच असा सूर दिसतो जे जे चांगले ते पतिसाठी असा पारंपरिक दृष्टिकोन जाणवतो.

८) 'पुरुष म्हणजेच सर्वश्रेष्ठ' इथपासून 'जावयाची बडदास्त सासरवाडीत ठेवली जाते, तशी सुनेची सासरी ठेवली जाते का?' असा प्रश्न विचारण्याचे धाडस सौ. सुनेत्रा नकाते आणि 'स्त्री म्हणजे माणूस नव्हे का?' असे विचारण्याचे बळ नीलम माणगावे यांनी केले आहे. इथपर्यंतचा प्रवास म्हणजे स्त्री जीवनाचा स्त्री विषयक वैचारी परिवर्तनाची प्रगती असे म्हणता येईल.

९) 'कुंकू लावणे हा स्त्रियांचा जन्मसिध्द हक्क आहे मग नवरा वारल्यानंतर हा हक्क बंद का व्हावा? असा धाडसी बेधडक प्रश्न मिस. एस. एस. गांधी सारखी एखादी लेखिका (३० ऑक्टोबर, १९३४) स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये विचारते. तर सौ. सुलोचना भोकरे 'न्हाणवलीची प्रथा बंद व्हायला पाहिजे' अशी परिवर्तनाची नांदी करून जाते. सौ. सुलोचना भोकरे, उषाताई मगदूम, सौ. प्रेमलता गुंडे, प्रा. सौ. सुमन चौधरी आदी संपादिकांनी त्या काळामध्ये समाज प्रबोधनचे विपूल लेखन केले आहे.

१०) तसेच सौ सुलोचना भोकरे यांनी 'पतिनामोल्लेख' नावाच्या लेखात स्त्रियांनी पतीच्या नावाचा उल्लेख अवश्य करावा या अर्थी लेखन केले आहे. तर सौ ज्योती शहा यांनी 'शीलालेखात साकार झालेल्या जैन स्त्रिया' यामध्ये अनेक जैन स्त्रियांचा उल्लेख केला आहे.

११) एकूणच स्त्रियांनीस्त्री विषयक केलेले हे लेखन मनाच्या आंतरिक तळमळीतून आलेले आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते. स्त्रीसमस्या उलगडून दाखविताना स्त्री प्रश्नांना थेट भिडून त्यांनी लेखन प्रामाणिकपणे केलेले आहे. लेखनाची गुणवत्ता, भाषिक, समृद्धी, उच्च अभिव्यक्तीचे निकष इथे लावताच येणार नाहीत. आंतरिक ओढीतून आणि आपल्या जैन माता भगिनींची सुधारणा व्हावी या जाणीवेतून केलेले हे लेखन यातून स्त्री विकासाची स्थिती-गती-प्रगती अधोरेखित होते हे निश्चितच खरे आहे.

## ४.८ संदर्भ टीपा


१) सुधाताई, 'सुधाताईंची पत्रे', प्रगति आणि जिनविजय, १० मे, १९३३

२) सुधाताई, 'सुधाताईंची पत्रे', प्रगति आणि जिनविजय, ०९ मार्च, १९३३.

३) सरस्वतीबाई, 'सुधाताईस पत्रे', प्रगति आणि जिनविजय, ०८ जुलै, १९३३.

४) सुधाताई, 'सुधाताईंची पत्रे', प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑगष्ट, १९३३.

५) कु.उपाध्ये सुलोचनाबाई, 'सुधाताईस पत्रे', प्रगति आणि जिनविजय, २२ ऑगष्ट, १९३३.

६) सुमती, 'प्रिय सुंदर', प्रगति आणि जिनविजय, २२ ऑगष्ट, १९३३.

७) सौ.पंडीत सुभद्राबाई, 'स्त्रियांचे अलंकार', प्रगति आणि जिनविजय, ०५ सप्टेंबर, १९३३

८) निनावी पत्रे, 'सुधाताईस पत्रे', प्रगति आणि जिनविजय, ०५ सप्टेंबर, १९३३.

९) कु.उपाध्ये सुलोचनाबाई, 'रेल्वेतील अनुभव', प्रगति आणि जिनविजय, २० ऑक्टोबर, १९३३.

१०) सुभद्राबाई, 'मातेचे संस्कार', प्रगति आणि जिनविजय, ०३ नोव्हेंबर, १९३३.

११) कु.उपाध्ये सुलोचना, 'स्त्रियांचा पोषाख', प्रगति आणि जिनविजय, १८ डिसेंबर, १९३३.

१२) सुभद्राबाई, 'एकांगीपणा', प्रगति आणि जिनविजय, ०१ जानेवारी, १९३४.

१३) सौ.गायकवाड चिमनाबाई, 'लेखाचे नाव नाही', प्रगति आणि जिनविजय, ०५ जुन, १९३४.

१४) कु.भोकरे सुलोचाना, 'संतती नियमन', प्रगति आणि जिनविजय, १२ जुन, १९३४.

१५) ब्र. शिलवतीबाई, 'शीलव्रत', प्रगति आणि जिनविजय, १२ जुन, १९३४.

१६) घाटे माणिक, 'आंनंदीवृत्ती', प्रगति आणि जिनविजय, ०३ जुलै, १९३४.

१७) सौ.हाटे चंद्रकला, 'हिंदी समाजातील स्त्रियांची पूर्वीची व सध्याची स्थिती', प्रगति आणि जिनविजय, ०४ सप्टेंबर, १९३४

१८) कु.पाटील शोभाताई, 'आदर्श गृहिणी', प्रगति आणि जिनविजय, ११ सप्टेंबर, १९३४.
१९) सौ.बोरीकर सुलोचना, 'धर्मावरील आक्षेपाचे निराकरण', प्रगति आणि जिनविजय, १८ सप्टेंबर, १९३४.
२०) कु.बोरीकर कृष्णाबाई, 'स्त्रिया आणि कला', प्रगति आणि जिनविजय, १८ सप्टेंबर, १९३४.
२१) कु.जुनुनकर लिलाताई, 'स्त्रिया आणि परमार्थ', प्रगति आणि जिनविजय, ०९ ऑक्टोबर, १९३४.
२२) कु.आपटे सुशिला, 'स्त्रियांनी वेळ कसा घालवावा', प्रगति आणि जिनविजय, २३ ऑक्टोबर, १९३४,.
२३) मिस गांधी एस. एन., 'विधवा स्त्रियांसंबंधी समाजाने पाळावयाची कर्तव्ये', प्रगति आणि जिनविजय, ३० ऑक्टोबर, १९३४,
२४) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'न्हाणवली', प्रगति आणि जिनविजय, १८ डिसेंबर, १९३४.
२५) सौ. भोकरे सुलोचनाबाई, 'गोदुबाई उपाध्ये लेख', प्रगति आणि जिनविजय, २५ डिसेंबर, १९३४.
२६) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'पतीनामोल्लेखन', प्रगति आणि जिनविजय, २२ जानेवारी, १९३५.
२७) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'पतिव्रत व एक पत्नी व्रत', प्रगति आणि जिनविजय, २९ जानेवारी, १९३५.
२८) कु.जुनुनकर लिलाताई, 'जुने ते सोने', प्रगति आणि जिनविजय, ०५ फेब्रुवारी, १९३५.
२९) सुधाताई, 'सुधाताईची पत्रे', प्रगति आणि जिनविजय, १९ मार्च १९३५.
३०) आगरकर राजुलमती, 'पुरुषांचे दुसरे लग्न', प्रगति आणि जिनविजय, ३० एप्रिल, १९३५.
३१) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'विवाह समारंभ', प्रगति आणि जिनविजय, ०७ मे, १९३५.
३२) श्री.लोणकर रूक्मिणीबाई, 'सुशिक्षीत मुली आणि विवाह', प्रगति आणि जिनविजय, २१ मे, १९३५.
३३) ब्र. शिलवतीबाई, 'जैन स्त्रीसमाजाची सद्यास्थिती व उपाय', प्रगति आणि जिनविजय, ०४ जून, १९३५.
३४) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'पुनश्च ॐ', प्रगति आणि जिनविजय, २३ जुलै, १९३५.
३५) कु.लडगे इंदुमती, 'स्त्री शिक्षण', प्रगति आणि जिनविजय, १७ सप्टेंबर, १९३५.

३६) सौ.मिठारे सुशिलाबाई , 'हुंडा', प्रगति आणि जिनविजय, ०१ ऑक्टोबर, १९३५.

३७) सौ.शहा चंचलाबाई, 'आजचे स्त्रीजीवन', प्रगति आणि जिनविजय, २० जानेवार, १९४१.

३८) सौ.शहा चंचलाबाई, 'वैवाहिक जीवन व वैवाहीक स्त्रियांचे समाजकार्य', प्रगति आणि जिनविजय, ०१ जून, १९४६.

३९) सौ.शहा चंचलाबाई, 'आजचे स्त्रीजीवन', प्रगति आणि जिनविजय, १ जून, १९४७.

४०) कु.ढेरे वसुंधरा, 'प्रौढ विवाह समस्या', प्रगति आणि जिनविजय, १३ जुलै, १९५९.

४१) सौ.शहा चंचलाबाई, 'लग्नात महान विघ्न आणणारा जुनाट रोग - हुंडा', प्रगति आणि जिनविजय, ०९ जानेवारी, १९६१.

४२) कु.मालगावे सुनंदा, 'आई! आई!! आई!!!', प्रगति आणि जिनविजय, २१ मे १९६२.

४३) डॉ.सौ. पांगळ विजयालक्ष्मी, 'स्त्रीस अबला का म्हणावे', प्रगति आणि जिनविजय, ३१ जानेवारी १९६६.

४४) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'स्त्रिची महान योग्यता', प्रगति आणि जिनविजय, १४ जुलै, १९६९.

४५) सौ. मगदुम उषाताई, 'महिलांना आवाहन', प्रगति आणि जिनविजय, ११ ऑगष्ट, १९७५.

४६) बेग तारा अली, 'एक सामाजिक कलंकः हुंडा पध्दती!', प्रगति आणि जिनविजय, २० ऑगष्ट, १९६१.

४७) सौ.कलाजे पुष्पा, 'नववधूची सप्त पावले', प्रगति आणि जिनविजय, १४ सप्टेंबर १९८१.

४८) कु.आवटी माधुरी, 'स्त्रीस्वातंत्र्य', प्रगति आणि जिनविजय, १५ मार्च १९८२.

४९) श्री.पाटील गंगुबाई रामगोंडा, 'जैन कुटुंबातील महिलेचे स्थान', प्रगति आणि जिनविजय, ३ जानेवारी १९८३.

५०) सौ. प्रज्ञा, 'पत्नीचा हातभार पत्नीला हातभार', प्रगति आणि जिनविजय, ०४ एप्रिल, १९८३.

५१) सौ.खोत शकुंतला, 'पत्नीचा हातभार पत्नीला हातभार', प्रगति आणि जिनविजय, ०२ मे १९८३.

५२) कु.पाटील अल्का, 'पत्नीचा हातभार पतीला हातभार', प्रगति आणि जिनविजय, ०६ जून १९८३.

५३) सौ.शहा वासंती, 'जैन धर्म संस्कृतीमध्ये स्त्रीला स्थान', प्रगति आणि जिनविजय, ०५ सप्टेंबर, १९८३.

५४) सौ.गाट विजया धनंजय, 'स्त्री मुक्ती', प्रगति आणि जिनविजय, ०४ मार्च १९८५.

५५) सौ.जैन जोत्सना, 'उध्वस्त् होणारी कुटुंबे', प्रगति आणि जिनविजय, १८ मार्च १९८५.

५६) सौ.आरवाडे शशिकला, 'दोष कुणाचा', प्रगति आणि जिनविजय, ०८ एप्रिल, १९८५.

५७) सौ.पाटील शालीनी, 'स्त्री मुक्ती आणि जैन समाज', प्रगति आणि जिनविजय, ०३ फेब्रुवारी १९८०.

५८) सौ.गाट विजया धनंजय, 'स्त्री मुक्ती संबंधी विचार प्रवाह', प्रगति आणि जिनविजय, ०३ मार्च १९८६.

५९) सौ.गुंडे प्रेमलता, 'स्त्रीमुक्ती संबंधी विचार प्रवाह', प्रगति आणि जिनविजय, ०३ मार्च, १९८६.

६०) सौ.चौधरी सुमन, 'जैन धर्म आणि स्त्रीयांचे स्थान', प्रगति आणि जिनविजय, २१ जून १९८६.

६१) सौ.चौधरी सुमन सह संपादिका, 'किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया', प्रगति आणि जिनविजय, ०१ डिसेंबर १९८६.

६२) सौ.बर्वे सुचेता, 'शुभमंगल सावधान', प्रगति आणि जिनविजय, ०२ मार्च १९८७.

६३) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'मुलगी झाली हो', प्रगति आणि जिनविजय, ०२ मार्च १९८७.

६४) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'आजच्या स्त्रीपुढील आव्हाने', प्रगति आणि जिनविजय, ०४ मे १९८७.

६५) सौ.गुंडे प्रेमलता, 'आपण थोडे आत्मपरिक्षण करूया', प्रगति आणि जिनविजय, ०९ मार्च १९८७.

६६) सौ.चौधरी सुमन (संपादकीय), 'जाहिरातीचे युग आणि स्त्रिया', प्रगति आणि जिनविजय, ०६ एप्रिल १९८७.

६७) सौ.चौधरी सुमन (संपादकीय), 'मुली तू आलीस आपल्या घरी', प्रगति आणि जिनविजय, ०६ एप्रिल १९८७.

६८) प्राचार्य सौ.आपटे उषा, 'नोकरदार महिला', प्रगति आणि जिनविजय, ०७ सप्टेंबर १९८७.

६९) सौ.चौधरी सुमन, ‘अमानुष केवळ अमानुष’, प्रगति आणि जिनविजय, ०५ ऑक्टोबर १९८७.

७०) सौ.डोणगांवर अनुराधा, ‘मृगजळ’, प्रगति आणि जिनविजय, २६ ऑक्टोबर १९८७.

७१) डॉ.सौ.अक्कोळे वर्षा, ‘हुंडाबळी’, प्रगति आणि जिनविजय, २६ ऑक्टोबर १९८७.

७२) कु.सावळवाडे मालुताई, ‘जिचे शील उत्तम आहे तीच खरी सुंदर स्त्री’, प्रगति आणि जिनविजय, ०७ डिसेंबर १९८७.

७३) सौ.आरवाडे निर्मला, ‘संपत्ती हेच रोगाचे निदान’, प्रगति आणि जिनविजय, ०७ डिसेंबर १९८७.

७४) सौ.चौधरी सुमन (संपादकीय), ‘चला कामाला लागूया’, प्रगति आणि जिनविजय, ०१ फेब्रुवारी १९८८.

७५) सौ.कोठारी हेमलताबेन, ‘भारतीय स्त्री आज उद्या’, प्रगति आणि जिनविजय, ०१ फेब्रुवारी १९८८.

७६) सौ.गड्डेणावर अनुराधा, ‘खरी सुशिक्षीत स्त्री कोण?’, प्रगति आणि जिनविजय, ०४ एप्रिल १९८८.

७७) ॲड.नरगुंदे तारा, ‘निराधार पत्नी-मुले आणि आई-वडील’, प्रगति आणि जिनविजय, ०१ ऑगष्ट १९८८.

७८) सौ.बर्वे सुचेता, ‘रिकामा वेळ कसा कारणी लावाल?’, प्रगति आणि जिनविजय, ०१ ऑगष्ट १९८८.

७९) ॲड.पंडीत शैलजा, ‘हुंडा प्रतिबंधक कायदा’, प्रगति आणि जिनविजय, ०५ सप्टेंबर, १९८८.

८०) सावंत शैलजा, ‘स्त्री रक्षणाचे कायदे’, प्रगति आणि जिनविजय, ०५ सप्टेंबर १९८८.

८१) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), ‘स्त्री स्वातंत्र्यासंबंधी गांधीजीचे विचार’, प्रगति आणि जिनविजय, ०३ ऑक्टोबर १९८८.

८२) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), ‘स्त्रीचे सामाजिक स्थान’, प्रगति आणि जिनविजय, ०६ जून १९८९.

८३) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'स्त्री स्वातंत्र्याचे प्रणेते महात्मा गांधी', प्रगति आणि जिनविजय, ०३ ऑक्टोबर १९८९.

८४) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'स्त्रीयांची सामाजीक व राजकीय स्थिती', प्रगति आणि जिनविजय, ०६ मार्च १९९०.

८५) कु.शेडबाळे लता आप्पासो, 'स्त्री विकासातील स्त्री हीच धोंड', प्रगति आणि जिनविजय, ०६ नोव्हेंबर १९९०.

८६) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'महिला व सहकार', प्रगति आणि जिनविजय, ०७ मे १९९१

८७) सौ.गुंडे प्रेमलता (संपादकीय), 'उपेक्षित महिला परिषद', प्रगति आणि जिनविजय, ०४ फेब्रुवारी १९९२.

८८) प्राचार्य सौ.चौधरी सुमन, 'हितगुज', प्रगति आणि जिनविजय, ०२ जून १९९.

८९) सौ.शहा सुमन, 'पतीच्या कर्तबगारीत पत्नीचा वाटा', प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑक्टोबर १९९२.

९०) सौ.आडमुठे उज्वला, 'सत् स्त्रियः रक्ष्यन्ते गृहम', प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑक्टोबर १९९२.

९१) सौ.शहा ज्योती, 'शीलालेखात साकार झालेल्या जैन स्त्रिया', प्रगति आणि जिनविजय,२१ डिसेंबर १९९३.

९२) सौ.माणगावे निलम, 'संदर्भ फुलनदेवीचा', प्रगति आणि जिनविजय, ०७ सप्टेंबर २००१.

९३) सौ.माणगावे निलम, 'महिलादिना संबंधी', प्रगति आणि जिनविजय, ०८ मार्च २००२

९४) ब्र.खेमलापूरे पदमावती, 'धर्म', प्रगति आणि जिनविजय, ०८ मार्च २००२.

९५) प्राचार्य सौ.चौधरी सुमन, 'प्रगती आणि जिनविजयची वाटचाल महिला उन्नतीची', प्रगति आणि जिनविजय, १२ एप्रिल २००२.

९६) सौ.नकाते सुनेत्रा, 'फूलं हवीत की काटे?', प्रगति आणि जिनविजय, २६ जुलै २००२.

## प्रकरण ५

# जैन स्त्रियांच्या लेखनातील वाङ्मयविषयक विचार

५.१ कथाविषयक

५.२ काव्यविषयक

५.३ प्रवासवर्णन

५.४ ग्रंथ परिक्षणात्मक

५.५ निष्कर्ष

५.६ संदर्भ टीपा

# प्रकरण पाचवे

## जैन स्त्रियांच्या लेखनातील वाङ्मयविषयक विचार

वाङ्मयनिर्मितीची प्रक्रिया ही गूढ आणि अज्ञात असते. या वाङ्मयनिर्मितीतून आपल्याला समाजाचे दर्शन घडते. माणूस त्याचे वागणे, बोलणे, विचार करणे, या सगळयाच गोष्टींचे दर्शन म्हणजेच मानव दर्शन होते. माणूस कळतो. त्याचे जगणे, हसणे, रडणे, कुढणे कळते. माणूस त्यांच्या या आंतरिक भावनेच्या निमित्ताने आत्मिक तळापर्यंत पोहोचतो. या भावनांचे तो प्रकटीकरण करतो. लेखक म्हणून वावरू लागतो. कथा, कादंबरी, कविता, नाटय, चरित्र, आत्मचरित्र, ललित, लेख, पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन, लोकसाहित्य, संतसाहित्य, बालसाहित्य वगैरे अनेक साहित्य प्रकारातून लेखक लिहित राहतो. त्या त्या काळातील सामाजिक परिस्थिती साहित्यात उमटू लागते. मानवी जीवनाचे नाते संबंध, त्यांचे लागेबांधे, हेवा, द्वेष, मत्सर, आनंद, दु:ख, वेदना, असूया, ईर्षा, दया, क्षमा सारख्या मानवी स्वभावाचे जिवंत चित्रण साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होते. या सर्व गोष्टींचा विचार केला तर साहित्य एक प्रकारचे समाजाचे प्रतिकात्मक रूप ठरते. पण 'प्रगति आणि जिनविजय' मधील साहित्यातून हे मानवी मनाचे कंगोरे, मानवी संघर्षाचे चित्रण अपवाद वगळता फारसे दिसून येत नाही.

कथा, कविता, पुस्तक परिचय, प्रवास वर्णन आणि परिचयात्मक व्यक्तिचित्रण या प्रकारातून जैन लेखिकांनी 'प्रगति आणि जिनविजय' मध्ये लेखन केलेले आहे. पण जैन स्त्रियांच्या मनात धर्म, मंदिर आणि मुनी हे ठासून भरलेले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावरही झालेला आहे. 'प्रगति आणि जिनविजय' हे मासिक सामाजिक विचार जागृतीसाठी निर्माण झालेले पत्रक आहे. पण या पत्रकाच्या वाटयाला निखळ ललित साहित्य आलेले नाही. काही तरी सांगणे, बोध, उपदेश देणे यासाठीच यातील साहित्याचा उपयोग झालेला आहे.

कथांमध्ये बोध कथा, कवितेमध्ये भक्तिगीत, स्तुतिगीत, पुस्तक परिचयामध्ये धार्मिक पुस्तकांचे परिचय आणि प्रवास वर्णनामध्ये धार्मिक तीर्थक्षेत्रांना दिलेल्या भेटीचे वर्णन असे यातील लेखनाचे स्वरूप आहे.

## ५.१ कथाविषयक

कथेचा जन्म उत्सुकतेपोटी झाला. कथा सगळयांनाच आवडतात. स्त्रियांना कथा सांगायला, ऐकायला खूप आवडते. बाल वयात आजीकडून गोष्ट ऐकताना मुले रमतात. खुमासदार पद्धतीने एखादी घटना सांगणे ही स्त्रियांची कलात्मक सहजप्रवृत्ती असते. या प्रवृत्तीतून त्या सकस कथा लेखन करतात. मराठी साहित्यात काशिबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, गिरीजाबाई कीर वगैरे महत्त्वाच्या लेखिकांपासून सुरू झालेली कथेची परंपरा अलीकडच्या प्रिया तेंडूलकर, सानिया, आशा बगे वगैरे समकालीन लेखिकांपर्यंत आलेली आहे. अलीकडच्या काळात जैन लेखिकांनी कथा लिहिलेल्या आहेत. स्व. नलिनी शहा, सुरेखा शहा, लिला शहा, नीलम माणगावे, मीना गरीबे, मेघा आलासे, सुनेत्रा नकाते अशा कितीतरी जैन लेखिकांनी कथा परंपरेत मोलाची भर घातली आहे. जैन लेखिकांच्या 'शासन' नावाचा कथा संग्रहही निघाला आहे. 'प्रगति ....' मधील कथांचे स्वरूप बोधकथा, मूल्यकथां सारखे आहे. पुराणकथांचा बाज घेऊन त्या आलेल्या आहेत. कदाचित 'जैन वृत्तपत्र' एक 'धार्मिक वृत्तपत्र' (नसतानाही) असे स्वरूप आल्यामुळे ही याच प्रकारच्या कथा स्त्रियांनी लिहिल्या असाव्यात.

### सन १९३० ते १९४० या काळातील कथा लेखन

'गरीब बहिणीची ओवाळणी' अशी एक छोटी पारंपरिक वळणाची, लोकसाहित्यातील कथा श्रीमती सुधाताई यांनी (३ नोव्हेंबर १९३३)[१] च्या अंकात लिहिलेली आहे. ती कथा श्रीमंत भाऊ, गरीब बहीण ... तिचा अपमान... नंतर ती श्रीमंत होते. नंतर भाऊ मान देतो. या पार्श्वभूमीची आहे.

सुरूवातीच्या काळात बऱ्याच लेखिकांनी संवादातून एखादे कथानक मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सौ.सुशिला मिठारी यांनी 'उद्योगी तरुण' या नावाने लिहिलेली कथा ही काम करत शिकलेल्या मुलाची असून आई-वडील व मुलाच्या संवादातून ती साकारली आहे. त्याचे स्वरूप भरपूर संवाद आणि थोडेसे निवेदन असे आहे. ही कथा (१४ जुलै १९३४)[२] च्या अंकात लिहिलेली आहे. कमल विमलच्या संवादातून 'ज्ञानाचे महत्त्व' ही कथा ब्र.शीलवतीबाई यांनी (७ ऑगस्ट १९३४)[३] च्या अंकात मांडलेली आहे.

(२ ऑक्टोंबर १९३४)[४] 'प्रेमसंन्यास' नावाची पुनर्विवाह करणाऱ्या स्त्री ची कथा सुगंधाबाई वाकेकार जैन, , कारंजा यांनी लिहिलेली आहे. विवाहित स्त्री कमलला तिच्या पतीने पत्रातून काडीमोड दिला. पुढे तिची मनोहर नावाच्या मुलाशी मैत्री झाली. तोही निराश होता कारण त्याचा प्रेमभंग झाला होता. दोघेही समदु:खी असल्याने दोघांची मैत्री जमली व पुढे त्यांनी विवाह केला, वगैरे...

१९३४ च्या सालात साधी, सोपी, सुटसुटीत पण स्वत:च्या पुनर्विवाहाचा निर्णय घेणाऱ्या स्त्री ची कथा महत्त्वाची आहे. कथेचे नांव 'प्रेमसंन्यास' ठेवले आहे. कारण प्रेमाची सांगता विवाहात झाली होती. सुगंधाबाई वाकेकर यांनी 'स्त्री हृदय' नावाचे कथानक विमला आणि कुसुम या मैत्रिणींच्या पत्रातून (१ जानेवारी १९३५)[७] साली लिहिलेली आहे.

'माझे स्वप्न' नावाची कथा ललित अंगानी सौ.सुलोचना भोकरे यांनी (१२ फेब्रुवारी १९३५)[८] मध्ये लिहिलेली आहे. 'मी' या निवेदनाने आलेल्या विवेचनात ती स्वप्नात रामटेकच्या यात्रेस निघाली असताना तीला वनदेवी भेटते. ती वनदेवीला म्हणते, 'बाई तुमच्या राज्यातील आनंदलाभास मी फार उत्सुक आहे. मला आत घ्याल काय?' वनदेवी म्हणते, 'का नाही?' मग वनदेवी आत घेऊन तिला पुष्पलता,, फलवृक्ष,, वने,, उपवने, वगैरे दाखवते. ती पाण्यात डुंबणार एवढयात जाग येते. पायावर काही तरी ओझे पडल्याचे जाणवते. यामध्ये स्वप्न आणि वास्तव यांचा सुरेख मेळ घातलेला आहे.

(१९ फेब्रुवारी १९३५)[९] मध्ये कृष्णाबाई बोरीकर यांनी 'परीक्षा' ही छोटेखानी कथा लिहिलेली आहे. या कथेत त्यांनी परीक्षा जवळ आल्यावर वाटणारी भीती सांगितलेली आहे. तसेच प्रेमभंग झालेल्या तरुणीची 'दुखावलेली कलिका' या नावाची कथा सौ.शालिनी कांबळे यांनी (२५ जून १९३५)[१०] मध्ये लिहिलेली आहे.

(२ जुलै १९३५)[११] अंकात सौ.सिंधुताई काळे यांची 'दागिन्यांची हौस फिटली' ही कथा आहे. ही कथा दागिन्यांची हौस आवरण्याचा उपदेश करणारी आहे. नवऱ्याने बायकोला आणून दिलेली नथ घालून दोघेजण सिनेमाला जातात. तिथे नथ मूळ मालक ओळखतो व त्यांना पोलीसकैद (अटक) होते अशी ती कथा आहे. कु.लीलावती जुनुनकर यांनी (५नोव्हेंबर १९३५)[१२] शिक्षणाचा

गंधही नसलेल्या एका तरुणीची कथा सांगितलेली आहे. घरात लग्न ठरल्यानंतर होणारी तगमग 'लग्न की विघ्न?' यामध्ये व्यक्त झाली आहे. तर कु.शकुंतला दत्तात्रय रणदिवे यांनी (२६ नोव्हेंबर १९३५)[१३] मोहावर विजय मिळवणारी कथा 'विमोह' लिहिलेली आहे.

'वनातील सौंदर्य' ही कथा ललित अंगानी सिंधुताई काळे यांनी (२४ डिसेंबर १९३५)[१४] मध्ये लिहिलेली आहे. या लेखात पौर्णिमेच्या चांदण्या रात्रीचे वर्णन केले आहे.

सुगंधाबाई बाकेकर यांनी लग्न जमत नसलेल्या मुलीची व्यथा 'आत्मज्ञान' नावाच्या कथेत (२८ जानेवारी १९३६)[१५] साली मांडली आहे. हुंडा आणि शिक्षण यामुळे स्नेहलचे लग्न जमत नव्हते. शेवटी ४० वर्षांच्या विश्वासने ५०० रू. हुंडा स्नेहलच्या वडिलांना देऊन लग्न जमवले. स्नेहलताला हे लग्न पसंत नव्हते. पण वडिलांना नकार देण्याचे धाडस तिच्यात नव्हते त्यामुळे तिने लग्नानंतर आत्महत्या केली,. 'समाज अशा अनमेल विवाहाच्या प्रज्चलित कुंडात आपल्या अज्ञ बालकांची आहुती तर देणार नाही ना?' असा शेवटी लेखिकेने प्रश्न विचारला आहे.

'समाजाचा दुबळेपणा' (१५ मे १९४०)[१६] या कथेत कुसुम व रतनलाल या दोन प्रेमिकांनी केलेल्या आत्महत्या सौ.रतनबाई आहळे यांनी विदारकपणे मांडल्या आहेत. दुबळया मनाच्या स्नेहलने केलेली आत्महत्या आणि कुसुम व रतनलाल यांची आत्महत्या म्हणजे तत्कालीन समाजातील तरूणांच्या मनाची काहीशी दुबळी आणि अहिंसावादी धर्माच्या अभ्यासाची असलेली उणीवच म्हणावी लागेल. कारण स्नेहलला नकार देता आला असता किंवा कुसुम व रतनलाल यांना पोटजातीतल्या विरोधाला न जुमानता विवाह करता आला असता पण प्रवाहाविरुध्द पोहण्याचे धाडस त्या काळातल्या तरुणांजवळ नव्हते किंवा बापाला स्पष्ट सांगण्याचे धाडस स्नेहलजवळ नसल्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारून त्यांनी आपले प्रश्न सोडवले.

('ताराबाई देवीची पूजा' असा उल्लेख 'समाजाचा दुबळेपणा' या कथेत आला आहे. ही कोण ताराबाई देवी, समजले नाही)

सौ.सुलोचना भोकरे यांनी 'साक्षरता प्रसार' (२९ जानेवारी १९४१)[१७] च्या अंकात लिहिली आहे. याला कथा म्हणता येणार नाही. पण एक अनुभव त्यांनी कथेच्या अंगाने लिहिले आहे.

मोलकरणीला त्या म्हणाल्या,, 'माझ्याकडे शिकायला येत जा!' मोलकरीण म्हणाली,'कधी येऊ? दिवसभर कामे करून संध्याकाळी दमून भागून घरी येते.' दुसऱ्या एका प्रसंगात त्यांनी एका कामकरी बाईला विचारले,, ' मुलांना शाळेत का पाठवत नाहीस?' ती म्हणाली, "मग शेतात म्हशी राखायला कोण जाणार?' यावरून लेखिकेने तात्पर्य काढले की, शिक्षण गरिबांसाठी नसून सुखवस्तू लोकांसाठीच आहे. आर्थिक विषमता व दारिद्रय काढून टाकल्याशिवाय समाज सुधारणेचा वृक्ष फोफावणार नाही.हेच त्यांनी सांगितले आहे.

सुलोचना भोकरे यांनी (१२ मार्च १९४१)[१८] च्या अंकात 'स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य' वर एक कथास्वरूप उदाहरण दिले आहे की, स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर व्याख्यान देणाऱ्या श्रीमंत नवऱ्याची बायको एकदा २०१ रू अनाथ बालिकाश्रमाला दान देण्याचे एका कार्यक्रमात नवऱ्याला विचारल्याशिवाय जाहीर करते. घरी आल्यावर नवऱ्याला सांगते तेव्हा नवरा म्हणतो, 'एवढे रुपये देण्याचे कबूल करायला कोणी सांगितले होते? तुम्हाला दाग दागिने उंची वस्त्रे देतो ते तुम्ही आमची मर्जी सांभाळावी व सुंदर दिसावे यासाठी. शिवाय लोकात श्रीमंतीचे प्रदर्शन व्हावे यासाठी!' तेव्हा बायको म्हणते,, 'मग माझी या घरात काहीच सत्ता नाही वाटते? व्याख्यानातील उदार मते कुठे गेली?' शेवटी नवरा ५० रू. देण्यासाठी तिला परवानगी देतो तेव्हा तिला ब्रम्हांड आठवते. 'पत्नी' घराची मालकीण हे शब्द किती दिशाभूल करणारे आहेत हे समजल्याने तिच्या डोळयात अंजन पडते.ही कथा सुधारणावादी पुरुषांच्या दुटप्पी वागण्यावर चांगलाच प्रकाश टाकते. तसेच स्त्री च्या धारिष्टयावर, तिच्या स्वतंत्र वैचारिक भूमिकेवरही प्रकाश टाकते.

सौ.सुलोचना भोकरे यांनी (२३ एप्रिल १९४१)[१९] च्या अकांत 'देहार्पण' ही कथा लिहिली. ही कथा स्त्रियांची समर्पणाची प्रवृत्ती दाखविणारी आहे.कुंदा ही निवेदिकेची मैत्रीण बाळंतपणात आजारी पडते. नवरा खूप सेवा करतो, त्याने ती संकोचते. डॉक्टरांनी लगेच मूल नको म्हणजे शारिरीक संबंध नको थोडे दिवस माहेरी जा असे सांगितलेले असते. पण पतिने एवढी सेवा केली पण आपण त्याला काय दिले? म्हणून तिच्या मनाला रुखरुख लागते. शेवटी ती स्वत:च पती नको म्हणत असतानाही त्याला समर्पित होते. त्यामुळे पुन्हा दिवस जातात आणि त्यात ती मरते. हे सर्व कुंदाने पाठवलेल्या पत्रामुळे निवेदिकाला समजते. पत्रात शेवटी कुंदा आपल्या वागण्याचे समर्थन करताना म्हणते. 'पती ज्या समान भावनेने व उदार वृत्तीने वागेल त्याच्या दुप्पट मोबदला पत्नी

निःस्वार्थपणे देऊ शकते, हे जगाला कळू दे!' निवेदिका म्हणते,, ' माझ्या जिवलग कुंदेने अतुल स्वार्थत्यागाने निर्व्याज्य पतिप्रेमभक्तीने देहार्पण केले. या कथेतून 'कुठल्याही परिस्थितीत पतिला शरीरसुख देणं हे आपलं कर्तव्य आहे!' ही स्त्रियांची मानसिकता स्पष्ट झाल्याचे जाणवते.

'विजयाच्या आघाडीवर' ही चार प्रवेशांची छोटी एकांकिका चंचलाबाई शहा यांची असून ती (११ जून १९४१)[२०] च्या अंकात प्रसिध्द झाली आहे. महावीर जयंतीला शाळेला सुट्टी मिळण्यासंबंधीची ही एकांकिका! यामध्ये कमलाबाई,, त्यांची मुलगी आनंद,, मैत्रीण, सुमन,, शाळेतल्या हेडमिस्ट्रेस,,घर,,शाळा ही सगळी पार्श्वभूमी आहे. मुख्याध्यापिका बाईच्या हातात 'कीर्तनसम्राट तात्यासाहेब चोपडे' यांचे 'जगउध्दारक जैनधर्म' हे पुस्तक असून एकांकिकेतून ते सहज प्रगटले आहे.

## सन १९४५ ते १९७७: या काळातील कथा

सौ. सुलोचना भोकरे यांचे 'स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य' हे कथारूप विवेचन (१ मे १९४५)[२१] मध्ये प्रसिध्द झाले असून १९४५ ते १९५५ या १० वर्षात दुसरी कथा किंवा अन्य कथारूप काही प्रसिध्द झालेले आढळलेले नाही.

' तक्रार' नावाचे छान रूपक (२० ऑगस्ट १९५६)[२२] सौ.चंद्राबाई क. पाटील, ऐतवडेकर यांनी लिहिले आहे. उद्योग आणि आळस यांच्यामधले हे रूपक आहे. देवेंद्राजवळ उद्योग तक्रार करतो की, 'सूर्य आळशी आहे. तो लवकर उठत नाही. त्यामुळे मला कामाला जाण्यासाठी त्याची वाट पाहावी लागते.' आळसही तक्रार करतो की, 'सूर्य फार गडबडी आहे मी उठायच्या आधीच तो आपले दार उघडतो. म्हणजे सूर्य जसा आहे तसाच असतो. उद्योग आणि आळस यांच्या प्रवृत्तीप्रमाणे त्यांना सूर्य वाटतो. कु.मालती चारूदत्त पाटील यांनी (२७ नोव्हेंबर १९६२)[२३] मध्ये 'अमर सौभाग्य' म्हणून नेमिकुमार राजुलमतीची कथा लिहिली आहे.

<u>सन १९६७ ते १९७७</u> :- या दहा वर्षात कथालेखन लिहिलेले आढळले नाही.

### सन १९७८ ते १९८८ : या काळातील कथा

(२ जून १९८०)[२४] 'मोह' ही कथा सासू - सुनेच्या माध्यमातून मोहाचा त्याग करण्याचा संदेश देणारी सौ. सुवर्णा सकळे,, अंकलखोप यांची आहे. या कथेत सासू - सुनेचे पटत नाही. सासू मुलग्याला रागाने म्हणते 'मला जाळून टाक!' मुलगा खरोखरचं नदीकिनारी तिला सरणावर ठेवतो., विसरलेली काडेपेटी आणायला घरी जातो. एवढयात सासू उठून सरणात शेतातला भोपळा ठेवते. मुलगा येऊन सरण पेटवतो. भोपळा फुटतो. मुलगा घरी जातो. सासू एका देवळात लपते. चोर येतात आणि दागिन्यांची वाटणी करू लागतात. तेवढयात 'माझा वाटा कुठाय?' असे सासू म्हणते. चोर घाबरून पळून जातात आणि दागिने घेऊन ती घरी येते. सुनेला म्हणते, 'दागिने स्वर्गातून आणले' त्यावर सून नवऱ्याला म्हणते, 'मलाही पेटवा' नवरा तिलाही सरणावर ठेऊन पेटवतो.आणि ती मरते... अशी ही कथा मोह आवरण्याचा संदेश देते पण जैन अहिंसेचे काय? आई आणि बायकोला जाळून मुलगा मानवहत्या करतो... या हिसेंचे काय करायचं? असा प्रश्न मनात आल्यावाचून राहत नाही, असो.

'मोह' ही कु.राणी सुरेश पाटील आणि 'सत्याचा विजय' ही कु.सुवर्णा आप्पासाहेब चौधरी यांच्या पारितोषिक प्राप्त दोन कथा (६ जून १९८३)[२५] च्या अंकात प्रसिध्द झाल्या आहेत.

कु.पुष्पा धनपाल पाटील यांनी ( ५ मे १९८६)[२७] साली 'मौनत्व एक महान औषध' अशी बोधकथा लिहिली. नवरा रागावल्यानंतर गप्प राहण्यासाठी शेजारीण औषध देते आणि म्हणते, 'नवरा रागावतो तेव्हा हे औषध तोंडात धरून ठेव' ती तसे करते. नवरा शांत होतो. तेव्हा शेजारीण औषधाचे गुपित सांगते, 'ते औषध नव्हते, ते तुझे मौन होते.'

सौ.अनुराधा गडेण्णावर यांनी 'आशा' नावाची बोधकथा (६ ऑक्टोंबर १९८६)[२८] मध्ये लिहिली. एका मोठया कुटुंबातल्या भरपूर स्त्रिया आपापली कामे वाटून करीत. पण एखादी आजारी पडली तर तिचे काम कुणी करीत नसत. तेव्हा आशा नावाची सून युक्ती करते. जावांची कामे ती स्वत:च करू लागते. आपल्यासाठी आणलेल्या साडयाही जावानांच देऊ लागले. त्याचे कारण सांगताना ती म्हणते, 'कुटुंबाची सेवा केल्याने आंतरिक शुध्दता मिळते. त्यामुळे अध्यात्मिक संपत्ती प्राप्त होते.' हे ऐकून सगळयाच कामे करू लागतात. 'जो प्रत्येक संकटाला तोंड देताना

हसतमुख असतो, . कठीण परिस्थितीतही स्वत:ची मनस्थिती ढासळू देत नाही,, तोच जीवनात सफल होऊ शकतो,' असे लेखिका शेवटी म्हणते .

'मातीची डाळ' अशी बोधकथा (२ फेब्रुवारी १९८७)[२९] सुनंदा आप्पासाहेब कोले यांनी लिहीले आहे . प्रवचनात सांगितलेली प्रतिकात्मक कथा असे याचे स्वरूप आहे . ही एक सुंदर रूपक कथा आहे . कारण पाण्याचा एक थेंब मातीवर पडला की, त्याचा डाळीएवढा चिखल होतो . उन्ह पडले की पुन्हा त्याची माती होते . तसेच श्रोते कान देऊन ऐकतात . घरी गेल्यावर विसरून जातात . माती पूर्ववत होऊन जाते .

'नवी आई' ही पत्रकथा (६ ऑगस्ट १९८७)[३०] सौ.सुचेता माधव रणदिवे यांनी लिहिली आहे . सावत्र आईचा आदर्श निर्माण करू पाहणारी मैत्रीण स्वत:ला मूल झाल्यानंतर पारंपरिक सावत्र आईच कशी होते? या आशयाची ही कथा आहे . याच अंकात 'संस्कार' नावाची सौ.मायादेवी अजित पाटील यांनी आजोबांच्या लाकडाच्या थाळीची कथा ('तीच थाळी तुम्हाला उपयोगी पडेल' असं नातवाने आपल्या आई - वडिलांना दिलेल्या उत्तराची) लिहिली आहे .

सौ.उज्वला केळकर यांनी ( ५ ऑक्टोंबर १९८७)[३२] 'धन्वंतरी' नावाची बोधकथा लिहिली आहे . ती अशी,... वैद्याकडून शिकून विनू आणि धनू ही दोन मुले जंगलात दशमी सोडून जेवायला बसली . एवढयात कण्हणारा म्हातारा आला व म्हणाला, 'मला घर दार कुणीच नाही' विनू म्हणाला, 'म्हाताऱ्याला पडू दे इथंच!' पण धनूने त्याला घरी नेले, औषध पाणी केले . म्हातारा खूष झाला . हा म्हातारा वेषांतर केलेला गुरूच होता . त्याने शिष्यांची परीक्षा घेतली होती .

जयश्री गडकरी यांनी (२६ ऑक्टोंबर १९८७)[३३] च्या अंकात वृध्दापकाळाच्या चिंतेवर भाष्य करणारी 'का चिंता करिशी' ही कथा लिहिली आहे . तर (७ नोव्हेंबर १९८७)[३४] च्या अंकात कथेतून 'खरी संपत्ती' हा संदेश प्रा.सौ.भूपाळी दर्यापूरकर यांनी सांगितलेली आहे . एक करोडपती श्रीमंत आपली संपत्ती फक्त २० हजारच सांगतो . महाराज म्हणतात असे का? तेव्हा तो म्हणतो, 'धर्म कार्यासाठी मी फक्त २० हजारचं खर्च केले आहे म्हणून माझी खरी संपत्ती तेवढीच!'

'मावळतीचे सांगाती' अशी महाराजांच्या समजवण्यावरून चोरी करण्याचे सोडलेल्या दुर्दैवी विधुराची कथा लेखक अनामिका म्हणून लेखिकेने (७ डिसेंबर १९८७)[३५] च्या अंकात सांगितलेली आहे.

सौ.सुनंदा आवटी यांनी 'वास्तविक त्याग' नावाची बोधकथा (११ जानेवारी १९८८)[३६] च्या अंकात लिहिली... एक साधू राजवाडयासमोर जाऊन म्हणतो, 'मला धर्मशाळेत जायचे आहे,. मंत्री म्हणतो, 'ही धर्मशाळा नव्हे हा राजाचा राजवाडा आहे? वादावादी होते शेवटी राजाही येऊन सांगतो की हा राजवाडाच आहे. तेव्हा साधू म्हणतो, 'दहा पंधरा वर्षांपूर्वी इथं दुसराच कुणी होता. तोही याला आपला राजवाडाच म्हणत होता. उद्या आणखी कुणी तिसरा येऊन त्याला आपलाच राजवाडा म्हणेल. म्हणजे राजवाडा तोच पण मालक बदलतो, मग याला धर्मशाळा म्हणायचे नाही तर काय म्हणायचे? 'राजा साधूच्या पाया पडतो.' क्षणभंगूर जीवनाबरोबरच अहंकार सोडून देण्याच्या संदर्भातील ही कथा आहे. तर सुवर्णा हाबळे, सांगलीवाडी यांनी (७ मार्च १९८८)[३७] कथेला नाव न देता बोधकथा लिहिली. जंगलात तहानलेल्या राजाला एक भिल्ल पाणी देतो. राजा त्याला चंदनाचे जंगल भेट देतो. पण भिल्लाला चंदनाची माहिती नसल्याने झाडे तोडून ... जाळून त्याचा कोळसा विकून तो आपली उपजिविका करतो. शेवटी पावसाळयात कोळसा न करता आल्याने एका झाडाची लाकडे तोडून तो ती विकायला नेतो. व्यापारी त्याची योग्य किंमत करून पैसे देतो. तेव्हा त्याला पश्चाताप होतो. लेखिकेने शेवटी तात्पर्य सांगितले की, जंगलातील झाडे म्हणजे अनेक भव ... कोळसा म्हणजे प्रत्येक जीवनाची केलेली माती... राहिलेले झाड म्हणजे चालू जीवन, ते तरी सत्कार्य सध्दर्मी लावावे.

सौ. सुवर्णा हाबळे यांनी (४ एप्रिल १९८८)[३८] राम आणि शाम या दोन सद्गुणी आणि दुर्गु णी मित्रांची कथा सांगितली आहे. पूर्वकर्मावर आधारित कथेत लेखिका तात्पर्य सांगते... पूर्वकर्म माहीत नसल्याने माणसाने जीवनात चांगले वागावे.

सुमतीमती माताजींच्या प्रवचनाच्या आधारावरून लिहिलेली 'खेळातील तत्त्वज्ञान' ही कथा सुवर्णा हावळे यांची( १ ऑगस्ट १९८८)[३९] च्या अंकातील आहे. विटी आणि दांडूच्या खेळात पहिले सात अंक मोजत नाहीत. त्या सात आकडयांना तत्त्वज्ञानाचा आशय देऊन कथा मांडली

आहे. १) पहिला दांडू घालताना मुले 'एकात दहा' म्हणतात म्हणजे आत्म्यात पहा. २) दुसरा दांडू घालताना 'दो का छुटी' म्हणतात म्हणजे राग व्देष सोडून द्या. ३) तिसऱ्याला 'तिनका मिट्टी' म्हणजे सम्यकज्ञान -दर्शन - चारित्र्याला मिठी मारा. ४) चौथा दांडू 'चारका घोडा' म्हणजे चारित्र्यरूपी घोडयावर आरूढ व्हा. ५) 'पाचवा पीर' म्हणजे पंचमहाव्रते धारण करा. ६) सहावा 'सेकंड डोळा' म्हणजे म्हणजे डोळे मिटून ध्यान कराल तर ज्ञानाचा तिसरा डोळा मिळेल. ७) 'सातवा झील' म्हणजे सातही जिंकलो. सात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने करून घेतलेली मोक्षप्राप्ती. अशी खेळातून तत्त्वज्ञानाची सांगड घातलेली आहे.

'श्रध्देचं साध्य' म्हणून एक घटना सौ. सुचिता बर्वे यांनी (५ डिसेंबर १९८८)[४०] च्या अंकात सांगितली आहे. अंथरूण धरलेल्या आप्पाना वाटायचं आलेल्या संबंधिताना पत्नीनं चहा द्यावा. पण ती द्यायची नाही. आप्पाना वाईट वाटायचं. निवेदिकेलाही एकदा आप्पानी सांगूनही चहा दिला नाही. पण आप्पा वारल्यानंतर त्यांच्या पत्नीनं त्यांना चहा बिस्कीट दिलं. वागण्यातला विरोधाभास या कथेत दाखवला आहे.

### सन १९९० ते २००० या काळातील कथा लेखन

ब्र.विलासमती कुंथुनाथ टोणे यांनी 'ईर्षा' नावाची बोधकथा (५ फेब्रुवारी १९९१)[४१] लिहिलेली आहे. यात चार विद्वान राजाकडे गेले. राजाने प्रत्येकाला दुसऱ्याबद्दल विचारले. पहिला म्हणाला - दुसरा विद्वान कोरा ठणठणीत गाढव आहे. दुसरा म्हणाला - तिसरा कोरा ठणठणीत घोडा आहे. तिसरा म्हणाला - चौथा उंट आहे. तर चौथा म्हणाला - पहिला बैल आहे. दुसऱ्या दिवशी राजाने चौघांना जेवायला बोलावले आणि पहिल्यासमोर भाताचा कोंडा, दुसऱ्यासमोर धान्य, तिसऱ्यासमोर कडुनिंबाचा पाला तर चौथ्यासमोर गवत ठेवले. चौघांना आपली चूक समजून आली.

सौ.सुवर्णा पाटील यांनी सद्भावनेचे कथारूप विवेचन (११ जून १९९१)[४२] च्या अंकात केले आहे. लग्न न जमणाऱ्या तरुणाला (निर्मलकुमार) त्याची आई तीन दिवसांनी आहार करणाऱ्या व तीनच प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या साधूकडे पाठवते. तो रात्री जंगलातून जाताना म्हातारीकडे राहिला. सकाळी जाताना म्हातारी म्हणाली, 'माझी मुलगी मुकी आहे. तिचे लग्न जमेना, ते ही साधूना

विचारून ये' वाटेत एका माळयाने आणि ऋषीनेही आपापली कामे सांगितली. एकूण कामे चार झाली आणि साधू तर तीनच प्रश्नांची उत्तरे देणार होते. तेव्हा त्याने स्वत:चेच प्रश्न कमी करून इतरांची उत्तरे ज्याची त्यांना सांगितली. बदल्यात ऋषी व माळयाने त्याला धन दिले. मुक्या मुलीबरोबर त्याचे लग्न करायचे ठरले. आनंदाने ती मुकी मुलगी बोलू लागली... अशी आहे ही साठा उत्तराची सफल संपूर्ण कथा!

## ५.२ काव्य विषयक

जे कथांचे आहे तेच पद्य विभागाचे म्हणजे कवितांचे आहे. धार्मिक भक्तिगीते,, स्तुतीगीते या स्वरूपात काव्य लिहिली गेली आहेत.

वास्तविक मनात कोंडलेल्या भावनांना शब्दरूप देऊन एका जीवघेण्या घुसमटीतून मुक्त होण्यासाठी म्हणजेच मन मोकळे करण्यासाठी काव्य हा प्रकार स्त्रियांना खूप जवळचा वाटतो. याच भावनेतून लोकसाहित्यातील लोकगीत आलेली आहेत. जे कुठं न बोलता, कुणाला सांगता येत नाही ते त्या स्त्रिया उखळाला,, जात्याला,, मुसळाला,, रहाटाला सांगायच्या. मन मोकळं करायच्या. जसं की दूध उतू जावे. त्यातून लोकगीत जन्माला आली. पण जैन स्त्रियांनी आपले मन साहित्यातून (प्रगतिच्या अंकातून) मोकळे केलेले दिसत नाही.

काव्यपिसारा फुलवण्याचा प्रयत्न त्यांनी धार्मिकतेची चौकट ठेवूनच केला आहे. अपवादात्मक हाताच्या बोटावर मोजता येण्याएवढया काही वेगळया गोष्टी आहेत पण तेवढयाच बाकीच्या अध्यात्म्याच्या जवळ जाणाऱ्या आहेत.

सन १९२० ते १९३० :- या दहा वर्षात काव्याविषयी काही आढळले नाही.

### सन १९३१ ते १९४१ :- या काळातील काव्य लेखन

कु.सुलोचना उपाध्ये यांनी अत्यवस्थ असलेला मुलगा, त्याची आई, त्यांच्यामधील भावना, वेदना, अखेरीस होणारी ताटातूट आणि त्यातून 'मृत्यू कुणाला चुकणार आहे?' असा क्षणभंगूर जीवनाचा अमृत संदेश 'करुण दृश्य' या कवितेत (३ ऑगस्ट १९३२)[१] मांडलेली आहे.

'कुणा एका खेडयात झोपडीत, बाळ बाबू तो खेळे बिछान्यात
आई त्याची गतवधा असे खिन्न, खोल शब्दानी बोलला कन्हून
नको आई अश्रू ते उगा गाळू, मरणे हा नियम असे चालू
जगामध्ये जगणार कोण आहे? वेळ बघुनी वागणे प्राप्त आहे!'

विधवा आईला शेवटच्या क्षणीही आधार देणारा हा मुलगा, शेवटी त्याचा मृत्यू होतो... आणि कविता संपते. हे 'करुण दृश्य' वाचकांसमोर हुबेहुब राहते एवढे कवितेचे सामर्थ्य आहे.

कु.सुलोचना उपाध्ये यांची दुसरी कविता दिंडी वृत्तात असून आई - मुलीचा सुंदर संवाद यामध्ये आहे. ती कविता (१७ ऑगस्ट १९३२)[२] च्या अंकात आहे. 'दागिन्यांची आवड' या कवितेत नुकतीच परीक्षा संपल्यानंतर विवाहाची मागणी आलेल्या मुलीला आई विचारते.

'सांग तुजला दागिने पाहिजे ते, तेच घाला सांगेन पाहुण्यानां (या कवितेच्या ओळी आहेत) चंद्रहार,, मंगळसूत्र,, कुंकु,, कोयरी,, पाटल्या,, साखळया वगैरे सर्व दागिन्यांचे आई वर्णन कवितेत करते पण मुलगी म्हणते,

'नोकरीच्या साखळया नको पायी | देशसेवेला होती त्रासदायी!

दागिन्यांबरोबर नोकरी...... नोकरीच्या साखळयासुध्दा नको...... म्हणजे बंधन नको. ज्याचा देशसेवेला त्रास होईल, असे सांगणारी सूज्ञ मुलगी म्हणजे स्वातंत्र्याची आस लागलेली देशभक्त जैन महिला!

'स्तवनिधी क्षेत्रास पाहून' अशी कविता (१५ सप्टेंबर १९३२)[३] च्या अंकात सुलोचना उपाध्ये यांनी लिहिली. त्या म्हणतात......

'व्यर्थ किती पैसा जातो, पूजेचा अविनय होतो.
धर्माला धक्का येतो, उभयतानो 'त्वयाधर्ममर्याधं'
चाला राखा क्षेत्रमहात्म्याला!'

या कवितेतून त्यांनी क्षेत्रमहात्म्य मोठं आणि ते राखायला हवं हे सांगितले आहे. त्याच म्हणजेच सुलोचना उपाध्ये यांनी 'कोणा थोराला फूल देऊ?' असे १ ऑक्टोंबर १९३२ च्या अंकातील कवितेतून विचारतात ,

'सर्वांचे गुण पाहता मन दिसे प्रत्येक हा थोरसा
कोणाला मग देऊ फूल न कळे सर्वाहूनी श्रेष्ठशा!'

पुढच्या अंकात या कवितेला उत्तर म्हणून 'कवि - देवेंन्द्रतनम' या कविने कविता लिहिलीय की, ,

'ऐसा काय विचार घोर पडला पुष्पास अर्पावया
नाही काय सुयोग्य थोर दिसला सप्रेम ते घ्यावया?'

कवितेच्या शेवटी म्हणतात, ,

'थोरांच्या गणनेत सवाई तुला ते भासती सारखे
दृष्टीचा भ्रम ओळखूनी सुनये दे फूल त्याला!'

कवितांची अशी ही जुगलबंदी निश्चितच वाचनीय आहे, असे म्हणता येईल.

'दागिन्यांची आवड' ही सुलोचना भोकरे यांची कविता (२९ मे १९३४)[४] च्या अंकातून प्रसिध्द झाली. या कवितेतून त्यांनी सांगितले आहे की, ऋण काढून दागिने करू नका आणि कमीत कमी दागिने वापरा.

'ऋण तुम्ही नका काढू | दागिने ना रुचे
शोभती छान पाटल्या
पुढे बांगडया | चोख गोल्डच्या
नको जास्तीचे | दागिना ना रुचे |'

(१४ ऑगस्ट १९३४)[५] सुलोचना भोकरे यांनी 'माहेरची ओढ' स्त्रियांना असते आणि त्यासाठी सासूची परवानगी मागत असताना माहेरच्या आठवणी सून सासूस सांगते अशा आशयाची कविता लिहिली. आप्पा,,भाऊ,,आई कुणी बोलवायला आले नाही म्हणून त्या म्हणतात,,

'सासूस सून बोले | आलीय पंचमी ही
नाहीच चैन जीवा | झाले अधीर बाई!'

'चुकलं ग ताई' या कवितेत सौ.सुलोचना भोकरे यांनी (२६ मार्च १९३५)[६] लग्न करून संसारात पडल्यामुळे काहीच करता येत नसल्याची खंत मांडली आहे. त्या म्हणतात -

'चुकलं ग ताई | मम आशा सर्वही जाई
शाळेमध्ये मनात बळकट
केले होते बेतही निश्चित
परि आता गे झाले विपरीत
करू मी काई | मम आशा सवेही जाई ||'

'माझा बाळ' म्हणून कविता (३० एप्रिल १९३५)[७] निर्मलाबाई काळे यांनी लिहिली तर त्यांचीच 'दु:खी विधवा' नावाची कविता (१० डिसेंबर १९३५)[८] च्या अंकात प्रसिध्द झाली आहे. भूप शिवाजी चालीत त्यांनी ती लिहिली आहे.

'त्रासले ग बाई | संसारी सुखच नाही ||'

कपाळकरंटी, पांढरपायी ठरविलेल्या स्त्री ची भावना व्यक्त केली आहे.

(३१ डिसेंबर १९३५)[९] च्या अंकात कांचन यांची 'प्रेम हे असे आहे' ही कविता प्रसिध्द झाली.

'काय गेली ती मज फसवुनिया
जा ग बाई तू हसत हसवुनिया
परि जगताला मार्ग दाखविन

खुळया प्रेमाला आदर्श करीन.'

कांचन यांनीच (१४ जानेवारी १९३६)[१०] च्या अंकात सामाजिक समस्येवर भाष्य करणारी कविता ' जैन हिंदू नाहीत' हे सांगणारी वास्तव मांडणी केली आहे.

'हिंदू म्हणोनी कोणी जैनास हाक मारी
ती हाक येता कानी मज होय शोक भारी.'

नावातील अद्याक्षर घेऊन कु. इंदूमती पाटील,, अहमदनगर यांनी (५ नोव्हेंबर १९४१)[११] च्या अंकात 'श्रीवीरध्वजवंदन' नावाची कविता लिहिली आहे. तर सुलोचना भोकरे (११ फेब्रुवारी १९४२)[१२] यांची 'तिची सबब' नावाची कविता प्रसिध्द झाली आहे. 'तो' कथेकरी आणि 'ती' यांच्या संवादातली कविता आहे. जवळपास 'नाच ग घुमा कशी मी नाचू' यासारखी आहे.

'तो :- कातत नाहीस का? गे इंदू |
कातत नाहीस का?
ती :- रहाट नाही मला |
मत्प्रिया रहाट नाही मला |'

अशी स्त्री खेळ कविता आहे.

**सन १९४५ ते १९५५ :- या काळातील काव्य लेखन**

सौ.चंचलाबाई पाटील यांनी (१ मे १९४८)[१३] 'अंगाई गीत' लिहिले आहे.'राजसा ये रे, एकच पापा दे रे' अशी अंगाई लिहिली आहे. तर सौ.उषा काक्रंबे यांची माझ्या प्रेम सागराला भरती आणणारा चंद्र,, मनरूपी कमल उमलविणारा सूर्य,, जीवनाचा अचूक मार्ग दाखविणारा प्रकाश झोत वगैरे अनेक विशेषणांनी परिपूर्ण असा 'तू कोण' ही कविता (२३ एप्रिल १९४९)[१४] च्या अंकात प्रसिध्द झाली... कवितेचा समारोप शेवटी तो कोण याचे उत्तर 'प्रेमाच्या अमृतावर आमरण सुखी ठेवणारा देवेंद्र!' असे लिहून केलेला आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर साहित्यात स्वातंत्र्याचा विषय घेणे साहाजिकच आहे. (१७ डिसेंबर १९४९)[१५] सौ.सुलोचना भोकरे यांनी 'यंदाची भाऊबीज' या कवितेत भावाचे मनोगत व्यक्त केले आहे. भाऊ आपल्या ताईला म्हणतो.

'भाऊबीज येइ | घालू काय तुज ताई'

गोरे गेले, स्वातंत्र्य मिळाले. सोवत सोने नाणे तर गेलेच पण आयुष्याच्या कपाळी रेशन येऊन बसले. खादी भरड वाहू लागली. साखर महाग झाली. मग भाऊबिजेला काय घालू? वगैरे ... शेवटी ताई म्हणते,

'काही नको रे मजला भाई
सुविर महिला तव भगिनीही
तत्पर मी होई | शुभदिनी व्रत हे घेई
विश्वबंधुचे तत्त्व धरिते
सारी जनता जागृत करिते
आशीर्वाद देई | ओवाळणी मज ही भाई!'

विश्वबंधुत्त्वाचे व्रत घेऊन सारी जनता जागृत करण्यासाठी वीर महिला बनण्याची ओवाळणी म्हणून आशीर्वाद मागणारी ही ताई निश्चितच स्वातंत्र्यानंतरची जबाबदारी ओळखणारी जैन स्त्री आहे.

(१५ जून १९५३)[१६] च्या अंकात सौ.रत्नाबाई गुणधरराव वणकुद्रे,, कोल्हापूर यांची जीवन क्षणभंगूर आहे तरी जीवनावरचा मोह सोडण्यासंबंधीची 'जीवनसार' नावाची कविता प्रसिध्द झाली. त्या म्हणतात,

'माझे तुझे म्हणू नको तू कुणाचा नाही रे
यमराजाची वर्दी येता जेथील तेथे राहिल रे
जीव माया लावू नको तू कोणी कुणाचा नाही रे
कामापुरते मामा म्हणती आप्तेष्ट हे सारे रे'

शेवटच्या ओळीत स्वत:चे नांव गुंफून त्या म्हणतात

'संसाराला विटूनी देवा रत्नाचे मन होई वैरागी रे

चंचल मन हे स्थीर न राहे पुन्हा पुन्हा भुलते रे'

कविता लिहण्याचे सामर्थ्य असणारी एक समर्थ कवयित्री म्हणून रत्नाबाईंचा उल्लेख करावा लागेल.

(१४ सप्टेंबर १९५३)[१७] सौ.चंपाबाई कलगोंडा पाटील,, ऐतवडे यांनी घरात नव्याने येणाऱ्या सुनेला उद्देशून 'सूनबाई' नावाची कविता लिहिली.

'भरल्या घरात हसत मुखानं

ये तू आनंदान 'सूनबाई' ||१||'

तिने संसार सांभाळावा, उजळावा,, सासऱ्याला जिंकावे,, वंशाचा अंकूर द्यावा वगैरे सांगून शेवटी म्हणते,,

'मनातील बोल बोलले मी तुला

हसू नको मला सूनबाई ||७||'

कवितेतील सासू प्रेमळपणाने सुनेला तिच्या जबाबदाऱ्या सांगत आहे.काहीशा लोकगीताच्या अंगांन जाणारी कविता आहे.

'श्री गुरू व्रतोपदेश स्तवन' नावाचे काव्य श्रीमतीबाई गरगट्टे यांनी (१९ ऑक्टोंबर १९५३)[१८] मध्ये लिहिली आहे.

श्रीमती गरगट्टे यांनी 'महावीर जयंती जन्मोत्सव गीत' (२६ एप्रिल १९५४)[१९] च्या अंकात लिहिले. तसेच त्यांनीच आचार्य शांतीसागर निर्वाणानंतर लिहिलेले गीत प्रगतीने (७ ऑक्टोंबर १९५५)[२०] प्रसिध्द केले आहे.

'विमल यशाचा दाहिदिशी दुंदुभि गाजितो |

त्या शांतिसागराना मी सद्भक्तिनेच नमितो |'

श्रीमतीबाई गरगट्टे यांनी 'शांतिसागर मुनिपदी' (७ नोव्हेंबर १९५५)[२१] आणि 'पू. शांतिसागर' (२१ नोव्हेंबर १९५५)[२२] या दोन्ही कविता शांतिसागरावर केलेल्या असून एकाचे बोल आहेत,

'उपसर्ग संकटाची बांधेन ज्यास छाया

मुनी शांतिसागराच्या गाते यशा जगी या|' || धृ ||

**सन १९५६ ते १९६६:- या काळातील काव्य लेखन**

'विनवणी' नावाची कु.नर्मदा आवटी यांची कविता (९ जानेवारी १९५६)[२३] च्या अंकात आहे.

'माझ्या हृदयी महावीर सदा

जपते मी सदा न कदा

शेवटी ... अंध:कार नाश होण्याला

विनवणी करते महावीराला'

'आचार्य शांतिसागरपदी माझे भाव' - श्रीमतीबाई गरगट्टे - (५ मार्च १९५६)[२४] ला कविता लिहिली आहे.

'धन्य मुनी शांतिसागर नाम जगी गाजे |

निर्वाणाची चढता पायरी ज्योत खरी साजे ||'

सौ.विजयमाला पाटील,, बागणीकर यांची 'समतेने नांदू भारती' ही कविता (१० डिसेंबर १९५६)[२५] च्या अंकात प्रसिध्द झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समतेने राहावयास हवे अशा आशयाची ही कविता आहे, त्या म्हणतात...

'आझाद म्हणूनी आता तुम्ही, नांदा भारती'

शेवट - 'भारतवासी आपण बंधू,

सिख, पारसी, जैन नी हिंदू

वंधूभाव समतेने, आता नांदू भारती |'

(१० सप्टेंबर १९५६)[२६] सौ.सुनंदा खाडिलकर यांची 'देवाघरच्या कन्येस' आणि ' घेऊन माहेराला आले'(२९ सप्टेंबर १९५६)[२७] ही सौ.विजया पाटील, बागणीकर यांच्या दोन्ही कविता आईने मुलीला उद्देशून लिहिलेल्या कविता आहेत. देवाघरी गेलेल्या स्वर्गीय कन्येस आई म्हणते... (सुनंदा खाडीलकर)

'का गे अशी आई तू गेलीस सोडूनिया
माता, पिता नी स्वकिया दु:खात लोटूनिया
देवासी सांग चिमण्या पाहील आई वाट
अन् सावकाश ये रे मांडवरी तू थेट |'

तर मुलीला माहेरी आणलेली आई म्हणते, (विजया पाटील)

'उदास असी का आज बालिके
घेऊनी मी तुज मम घरी आले
नयन भावडे कुणा पाहण्या
सांग आतुरले, असे का संकट तुजला पडे?'

आईची दोन रूपं या कवितेतून व्यक्त झालेली दिसतात.

श्रीमतीबाई गरगट्टे - (१६ डिसेंबर १९५७)[२८] 'श्रीगुरूस्तवन' म्हणतात,

'स्वामी कृपा करोनी सध्दर्म पंथ दावा'

'महावीर जन्मोत्सवानिमित्त' - श्रीमती गरगट्टे यांनी (१२ मे १९५८)[२९] च्या अंकात कविता लिहिली. तसेच त्यांनीच 'माझे मनोद्वार' (१७ नोव्हेंबर १९५८)[३०] च्या अंकात ही कविता लिहिली आहे.

(२३ नोव्हेंबर १९५९)[३१] सप्तव्यसन सोडण्यासाठी,,, मुलगूण येण्यासाठी 'रे जीवा सम्यक्त्व ग्रहण कर' हे ठुमरी चालीतले गीत कु.सुन्दर गांधी यांनी लिहिले आहे. तर त्यांनी (३० नोव्हेंबर

१९५९)[३२] च्या अंकात 'भैया मेरे' च्या चालीवर 'मनुजा सोड' नावाचे मोहाला सोडण्याविषयी गीत लिहिले आहे.

'स्त्री विषयक गीत' म्हणून एक अर्थपूर्ण गीत (१४ डिसेंबर १९५९)[३३] च्या अंकात प्रसिध्द झाले आहे. कवीचे नाव नाही पण एक चांगले लोकगीत म्हणून त्यांच्या ओळी देत आहे, नात्याचा पोकळपणा कसा असतो, हे यावरून दिसून येते...

'बहिणीला भाऊ एक तरी असावा

पावलीचा खण एक रात्रीचा विसावा

भाव ग म्हणती, आल्या बहिणी भेटाया

भावजया म्हणती आल्या नणंदा लुटाया

आई बापाच्या राज्यात खाल्या दुधावरच्या सायी

भावजयाच्या राज्यात ताक घेण्याची सत्ता नाही'

मुलीला माहेर कसं परकं होतं याचं वास्तव दर्शन या कवितेतून घडते.

सौ.इंदुमती टिळक यांनी (३१ ऑक्टोंबर १९६०)[३४] काव्यातून श्री. आर. पी. पाटील चेअरमन स्कूल बोर्ड, द.सातारा यांना 'मानाचा मुजरा' केला आहे.

'पावन झाला आपुल्याकार्ये दक्षिण सातारा

स्वीकारा हा गुरुजनांचा मानाचा मुजरा |'

'श्री गुरुचरणी प्रार्थना' मध्ये श्रीमती गरगट्टे (७ नोव्हेंबर १९६०)[३५] च्या अंकात म्हणतात,,,,

'मम जीवन तरू फुलवावा श्री गुरू जन्म सफल करावा'.

सौ.नवलबाई शहा यांनी 'निर्वाण' नावाची कविता प.जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतर (६ जुलै १९६४)[३६] च्या अंकात लिहिली. त्यांनी नेहरूंना तीर्थंकरांचा दर्जा दिला,. त्या म्हणतात,,,

‘शोकसागरी जनता सारी गेलीया बुडून

पावला तीर्थंकर निर्वाण’ ||ध्रृ||

‘सारे जागा’ नावाची त्याचीच कविता (९ नोव्हेंबर १९६४)[३७] च्या अंकात प्रसिध्द झाली.

‘सम्मेद शिखरजी की जय बोलो

सारे जागा या समयाला, सम्मेद शिखरजी की जय बोलो |’

(८ फेब्रुवारी १९६५)[३८] - निमाली शुक्राची चांदणी - कु.पुष्पलता कासार

(१५ फेब्रुवारी १९६५)[३९] - सत्वरक्षक - सौ. नवलाबाई शहा

(३ मे १९६५)[४०] - कोडे - सौ.सरोजनी वणकुद्रे

(३ मे १९६५)[४१] - भ.महावीरास आवाहन -कु.पुष्पलता कासार

भाव - भक्ती असणाऱ्या या कविता आहेत. ‘भगवान महावीर’ यांची अद्याक्षरे घेऊन ‘कोडे’ ही कविता केलेली आहे. सरोजिनी वणकुद्रे यांनी (११ ऑक्टोंबर १९६५)[४२] ‘मनाची व्यथा’ प्रभूला सांगितली आहे.

**सन १९६७ ते १९७७:- या काळातील काव्य लेखन**

सौ.रत्नाबाई वणकुद्रे यांनी (२० फेब्रुवारी १९६७)[४३] - ‘तिळगुळ गीत’ लिहिले. हे गीत म्हणजे दर्शन - ज्ञान - चरित्रादी अध्यात्मिक तत्वे घालून बनवलेले तिळगुळ.

(१७ एप्रिल १९६७)[४४] - महावीर जन्मोत्सवाचा पाळणा सौ.नवलाबाई शहा यांनी ‘पाळणा’ नावाने लिहिला आहे.

“त्रिशला मातेच्या पोटी जन्मला

महावीर नाम शोभे तयाला

नावाचा उद्धार त्याने हो केला

युगानुयुगे डंका वाजला... जोवाळा जो जो रे जो.”

(३० ऑक्टोंबर १९६७)[४५] - 'अमरवाणी' कविता सौ. सुचेता रणदिवे यांनी लिहिली तर सौ. सरोज धनपाल चौगुले, एम.ए.बी.एड. सांगली यांनी (२२ एप्रिल १९६८)[४६] 'आस' ही कविता लिहिली.

'सदा माझे मनी | वसो तुझी मुर्ती

मोक्षाचिये पति | जिनराया'

जगाला शांत करण्याची प्रार्थना 'शांत करो या भूदेवीला' या सौ.रत्नाबाई वणकुद्रे यांच्या कवितेत केली आहे. ती कविता (२८ एप्रिल १९६८)[४७] च्या अंकातील आहे.

'प्रभो घ्या आज नवा अवतार' अशी अवतार घेऊन साक्षात्कार घडविण्याची प्रार्थना कु.कुमुदिनी रोकडे यांनी (३ जून १९६८)[४८] मध्ये केली आहे.

सौ. लीला माणिकराव बुरसे यांनी (२३ सप्टेंबर १९६८)[४९] च्या अंकात 'हे जनतेच्या कर्म वीरा' हे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर गीत लिहिले आहे.

पुष्पलता कासार - (४ नोव्हेंबर १९६८)[५०] - 'प्रभावना मानिते मी तिथे'

धर्मापासून मानवता धर्मापर्यंतचा आशय कवितेमध्ये विस्ताराने आला आहे.

'जिनधर्माचे मर्म जानुनी

जिनधर्मावरील निष्ठा ठेवूनी

आचार घडे हो जिथे

प्रभावना मानिते मी तिथे' ...१

शेवटी ... मानवता हा धर्म म्हणोनी

'मानवता ही निती जाणुनी

पूजा घडे हो जिथे

प्रभावना मानिते मी तिथे...७'

डॉ.सौ.विजयालक्ष्मी पांगळ यांची 'दयाळा दर्शन दे मजला' अशी भक्तिमार्गाची कविता (३० डिसेंबर १९६८)[५१] च्या अंकात प्रसिध्द झाली.

सौ.लीलावती भालचंद्र वंजाळ,`,, सांगली यांची 'पार्श्वनाथ वंदना', सौ.इंदूमती मोतिलाल पुरवत,, ,करकंब यांची 'पर्युषण पर्व' आणि सौ.सरोज चौगुले,,,, उदगांव याची पालखी अशा तीन भक्तिमार्गाच्या कविता (१५ सप्टेंबर १९६९)[५२] च्या अंकात प्रसिध्द झाल्या.

'साजरी करूया महावीर जयंती' अशी कविता सौ. नवलाबाई शहा यांची (२७ मार्च १९७२)[५५] च्या अंकात आहे.

'आनंदाने गजबजली जैनांची वस्ती

साजरी करूया महावीर जयंती'

सहज गुणगुणता येतील असे साधे शब्द घेऊन सुंदर गीत ..., गेय रचना... नवलबाईची प्रतिभा दर्शवते.

(१० एप्रिल १९७३)[५६] - सौ.सुजाता मोहनलाल शहा यांची -

'लाभले मनुरत्न तुझे जन्मात

आता सावध हो जीवनात?'

नाती - गोती, धन - दौलत - मोह - माया - मान - पान यात अडकू नका. सावध व्हा, ,म्हणून संदेश देणारी कविता प्रसिध्द झाली तर सौ.इंदुमती पुरवत यांची 'आज महावीर जन्माला आला' आणि सौ.नवलबाई शहा यांचे 'महावीर ज्ञान भांडार' अशा महावीरांच्या जीवन संदर्भातल्या दोन कविता (८ एप्रिल १९७४)[५७] च्या अंकात प्रसिध्द झाल्या आहेत.

सौ.इंदुमती पुरवत - 'वीर प्रभूंची मूर्ती' - (३१ मार्च १९७५)[५९]

सौ.कुसुम गुंडाळे यांनी (२३ जून १९७५)[६०] च्या अंकात 'पार्श्वनाथ स्तवन' असे भक्तीगीत लिहिले असून त्यांनी ते 'मन डोल रे' च्या चालीवर लिहिले आहे.

सौ.सुजाता शहा यांची 'ए मालिक तेरे बंधे हम'... या गीताच्या चालीवर 'शांतीसागर स्मरणगीत' (२२ सप्टेंबर १९७५)[६१] च्या अंकात लिहिले असून (३ फेब्रुवारी १९७६)[६२] च्या अंकात

त्यांचीच भरत बाहुबलीवर आधारित 'भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ' आणि 'देवाची मागणी' या दोन कविता प्रसिध्द झाल्या आहेत.

'गोरी गोरी पान च्या चालीवर' सौ.सरोजनी नांद्रे यांची 'श्री.१०८ मुनीपद' (२६ डिसेंबर १९७७)[६४] च्या अंकात प्रसिध्द झाले आहे.

**सन १९७८ ते १९८८:- काळातील काव्य लेखन**

चंपाबाई कमते , 'प्रभू दर्शन लाभ' (१० मार्च १९७८)[६५]

'अरे संसार संसार आणि 'कशाला काय म्हणू नये' या बहिणाबाईच्या दोन कविता (२९मे १९७८)[६६] च्या अंकात प्रसिद्ध झाल्या आहेत.

'हरपला  धरतीचा तारा' म्हणून आपल्या आजोबांना काव्यातून कु.शुभदा शांतिनाथ मुंडे या आठवीच्या मुलीने (२६ जानेवारी १९८१)[६८] आदरांजली वाहिली आहे.

'बाहुबलीच्या वैराग्याची ऐका तुम्ही कहाणी,

भरतेशाने चक्र सोडले झाली मानहानी'

(१६ मार्च १९८१)[६९] 'बाहुबली भगवान' नावाचे गीत भरत बाहुबली वर सौ पुष्पलता फुरसुले यांनी लिहिले आहे.

महावीराचा पाळणा कु सुरेखा परमाज यांनी (२२ जून १९८१)[७०] च्या अंकात लिहिले आहे. तर कु उज्वला रोकडे यांनी 'उचलते म्हणून वेलभंडार' नावाची श्वेतांबर दिगंबर वादाच्या पार्श्वभूमीची कविता पोटतिडकीने (६ जुलै १९८१)[७१] च्या अंकात लिहिली आहे. एक आव्हानात्मक कवितेचे स्वरूप आहे...

'श्वेतांबरी थैमान मांडूनी

दिगंबरी लुटला दो हातानी

प्रतिकाराला पुढे न कोणी

उच्छादाचे सत्र चालले चहुकडे अनिवार

उचलते म्हणूनी बेलभंडार......|१|

(१५ मार्च १९८२)[७२] च्या महावीर जयंती विशेषांकात सौ विद्या पटवर्धन यांची 'महावीर जन्मोत्सव'कविता प्रसिद्ध झाली.

'त्रिशला देवी प्रसन्न हर्षित की जाहली,

महावीरांच्या आगमनानी मातृत्वा पोहोचली'

कु.प्रिया जोशी यांची 'माझी आजी' बालकवीता (२९ नोहेबर १९८२)[७३] च्या अंकात आहे. 'त्रिवार वंदन तुला' ही कविता सौ शुभदा कोठारी यांची (३ ऑक्टोबर १९८३)[७४] च्या अंकात आहे.चंपावती कमते, यांची (२७ फेब्रुवारी १९८४)[७५] च्या अंकात 'प.पू विद्यानंद मुनी महाराज वंदन' नावाची कविता आहे. कु.प्रिया दोशी, यांची 'पाऊस' नावाची बालकविता (२ जुलै १९८४)[७६] च्या अंकात आहे.

सौ.विमल काक्रंबे यांची 'वंदन' आणि सौ.लीला शांतीकुमार शहा यांची 'आचार्य शांतिसागर स्तवन' या दोन कविता (२७ ऑगस्ट १९८४)[७७] च्या अंकात प्रसिद्ध झाल्या.हा अंक आचार्यश्री विशेषांक असून त्या कविता शांतिसागराविषयी आहेत.

'जय महावीर म्हणणार,गगनी ध्वज मी फडकविणार' असे 'वीर ध्वज गीत' कु.प्रमिला भाऊ उपाध्ये, अक्कोळ यांचे असून ते (२२ ऑक्टोबर १९८४)[७९] च्या अंकात आहे. कु.शुभदा गुंडे, सांगली यांनी इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर 'मिटले एक जीवनपुष्प' अशी काव्यांजली (५नोव्हेंबर१९८४)[८०] वाहिली आहे. त्या म्हणतात,

'वाऱ्याचा मुक्तपणा आज ,दबकून चालला होता.

नभातील मेघांचा वेग,स्तब्ध झाला होता'

दिग्मूढ झालेल्या समाजाचे चित्रण करून शेवटी त्या म्हणतात,

'उमलले एक जीवनपुष्प अमरतेच्या बागेमध्ये

मिटले एक जीवनपुष्प दुर्बल वेडाच्या नशेमध्ये'

'जाग मानवा जाग' ही कविता (३ डिसेंबर १९८४)[८१] च्या अंकात सौ निर्मला सांगरोळे यांनी लिहिली आहे. 'माझे माझे म्हणू नको, सौंदर्यात अडकू नको, दुर्वर्तन सोडून दे, शांत संयम धारण करून जिनवाणीचा उपदेश ऐक' असा आशय असणारी ती कविता आहे.

(२८ जानेवारी १९८५)[८२] थोडासा विद्रोहाचा सूर श्री नवलबाई शहा यांच्या 'मला काही सांगायचे आहे'या कवितेत जाणवतो.

'तुमच्याच पाऊलवाटे वरून आम्ही किती दिवस चालायचं?

तुमच्या भावनाना जिंदगीसारखं

किती दिवस ठेवायाचं ?

मरगळलेल शरीर, मरगळलेल मन,

झटकून टाकायचं आहे

मला काही सांगायचं आहे'

नवलबाईच्या कवितेविषयी निश्‍चितचं असे म्हणता येईल की, त्यांची ही कविता मनाला जागवणारी एक सुंदर कविता आहे.

'महावीर स्वामीं चा पाळणा' (२१ जून १९८६)[८३] च्या अंकात नवलबाई शहा यांनी लिहिला तर......सौ.शांता बंडेद्र पाटील यांची 'जीवन ज्योत' ही 'माझी ज्योत सतत तेवू दे देवा' अशी ई श्वराची आळवणी करणारी कविता (९ सप्टेंबर १९८६)[८४] च्या अंकात लिहिली.

मुनी आगमनाविषयीचा आनंद प्रकट करणारी कविता (८ फेब्रुवारी१९८८)[८५] च्या अंकात 'आले आहे केशवनंदी मुनी| आनंद पसरला नगरातुनी' कु.इतिश्री वांजुळे यांनी लिहिली. (४ जुलै

१९८८)[८६] च्या अंकात सौ .शहाणी श्रीकांत पाटील, सांगली यांनी 'खरं गणित' नावाच्या कवितेतून जीवनाच गणित मांडले आहे.

'ना आकडयांच ना संख्याचं गणित आहे जीवनचं

ना क्षेत्रफळाच ना व्याजाचं, आयुष्य आहे अनुभवाचं

सुस्वभावाच्या प्रेमाने करावा गुणाकार, कष्टाच्या मनोरंजनाने भागाकार

कपटीपणाचा लघुत्त्तम काढावा, सद्‌गुणांचा वर्ग करावा,

मैत्रीतून मत्सराची वजाबाकी करा, उदयोग आणि शीलाची बेरीज करा.'

असा नीतीमूल्यांचा गणिती आराखडा कवितेतून मांडला आहे.

**सन १९८९ ते २००३ :- या काळातील काव्य लेखन**

कु.प्रतिमा वरखेडकर यांनी महावीर यांचे 'प्रणाम गीत' हिंदी मध्ये (१८ एप्रिल १९८९)[८७] च्या अंकात लिहिले आहे.

'ये महावीरों के वीर, मैं तुम्हे प्रमाण करती हूँ |

ये स्वच्छता के प्रेमी,, मैं तुम्हे प्रणाम करती हूँ |'

जैन धर्माची सुकलेली वेल ......पुन्हा टवटवीत करून ......धर्माचे मर्म समजावून सांगणाऱ्या धर्म सूर्याला प्रणाम अशा आशयाची कविता कु. छाया भरमू गाजी, दुधगांव यांनी (२४ सप्टेंबर १९९१)[८८] च्या अंकात 'प्रणाम तुजला माझा' ही कविता लिहिली आहे.

डॉ.सौ सरिता कोठाडिया यांनी (१ डिसेंबर १९९२)[८९] च्या अंकात

'नव्या जगात जायचे आहे

नव्या दमाने नवे गीत गायचे आहे.'

अशी कविता लिहिली. तर सौ.शुभदा पाटील यांनी (४ जानेवारी १९९६)[१०] च्या अंकात कळंत्रे अक्कांवर 'महाश्वेता' या नावाची कविता लिहिली

'श्रीमती स्व.कळंत्रे आक्का

कर्पूरगौरी तेजाची दीपज्योती

शतशः प्रणाम श्रीमती......' शेवटी त्या म्हणतात......

'हे महाश्वेते महान श्रीमती

घे जन्म पुन्हा धरतीवरती'

काव्यापेक्षा कवयित्रीची भावना महत्वाची आहे असे म्हणनेच योग्य होईल !

कु.पार्शिया बाहुबली गांधी ,अकलूज यांनी तीर्थवंदनाचे 'झिम्मा गीत' (९ जानेवारी १९९७)[११] च्या अंकात लिहिली आहे.

'चल ग सई, कुठं ग बाई ||धृ||

कैलास गिरीवर

आदीजिनेश्वर मोक्षासी गेले, तिथ गं बाई !

चल ग सई, कुठं ग बाई......'

सौ. कांचन वणकुद्रे यांनी सुनबाईचे 'भारूड' (१७ डिसेंबर १९९९)[१२] च्या अंकात लिहिले आहे.

'नेहमीच आई करता घाई

फुरसत नाही ऐकायला

जायचे मला ऑफिसला हो

जाऊ कधी सांगा मी मंदिराला’

कवितेची नायिका म्हणजे नोकरी करणारी स्त्री कवितेतून आपल्या दिवसभराच्या कामाची यादी मांडते आणि शेवटी म्हणते,

‘घरातून प्रणाम देवाला हो

मनाने जाते मी मंदिराला

रविवारी जाते मी मंदिराला’

सौ.कांचन वणकुद्रे यांनी आजच्या युगातल्या सुनेचा समजूतदारपणा ,तडजोडीचा आपलेपणा आणि धर्मा विषयीचा डोळस दृष्टिकोन मांडून आजच्या स्त्रीची ...... ‘करिअरिस्ट’ स्त्रीची मानसिक ओढातान स्पष्ट केली आहे.

वासंती शहा यांची (१४एप्रिल २०००)[९३] च्या अंकातील ‘अरिहंत स्तुती’ नावाची कविता.

‘मूर्ती तुझी वीतराग ,मम मानस तोषविते

दर्शनेच तव देवा, जाय दुरित विलयाते’ अरिहंत दर्शनाची तृप्ती यात दर्शवते आहे.

सौ.सुरेखा शहा यांनी ‘संयम’ या कवितेत निसर्गातून संयम शिकण्याचा विचार दिला आहे. तर ‘हे स्त्री तुझ्या शक्तीमधून’ अंधार दूर करण्याचा आशावादी दृष्टिकोन दाखविला आहे.तसेच सौ.रजनी शहा यांच्या ‘दिवाळी मोक्षाची’ या कवितेत दिवाळीच्या मंगलमयतेचे वर्णन केले आहे. भ.महावीरांच्या निर्वाणदिनाची महती सांगितली आहे. अशा या सौ. सुरेखा शहा यांच्या दोन कविता आणि सौ.रजनी शहा यांची एक कविता (१९ नोव्हेंबर २००१)[९४] च्या दीपावली विशेषांकात प्रसिद्ध झाली आहे.

सौ.रूपाली राजेंद्र पाटील यांनी ‘माणगावाचा राम’ अशी द.भा.जैन सभेचे इचलकरंजी जैन बोर्डिंगचे सेक्रेटरी मा.रामू देवे यांच्या अपघात निधनानंतर कौटुंबिक जिव्हाळयाची उत्कट कविता (११ ऑक्टोंबर २००२)[९७] च्या अंकात लिहून श्रध्दांजली (काव्यांजली) वाहिली आहे.

'वाट पहात बसल्या होत्या काकू सांजसमयी उंबरठयावर

पण अचानक न सांगता गाडी का थांबली दूरवर ?'

अशी ही श्रध्दांजली शतकातील शेवटची कविता आहे.

**५.३ प्रवासवर्णने**

उदयोग, व्यवसायासाठी किंवा फिरण्याच्या हौसेतून लोक प्रवास करतात.प्रवासाला जाणे ही सर्वाच्यां आवडीची गोष्ट आहे.प्रवासवर्णनात निसर्गसौंदर्यापासून गड, किल्ले, समुद्र, पर्वत, डोंगर, दऱ्या आणि फिरत असताना येणारे सर्व विस्मयकारी अनुभव आणि मनाला भिडणारी माणसं शव्दवध्द् केली जातात. प्रवासाने अनुभवविश्व विशाल होऊन संकुचित भावना नष्ट व्हायला मदत होते. माणसाचे जीवन समृध्द बनते. अनेक बऱ्या वाईट अनुभवातून जाताना 'केल्याने देशाटन' काय काय पहायला, ऐकायला मिळते ते सारे, मनाची आंतरिक समृध्दी वाढवणारी असते.

पूर्वी प्रवास हा विशेषतः तीर्थक्षेत्र दर्शनासाठी केला जायचा. पण अलीकडच्या काळात निसर्ग -रम्य ठिकाणी, महागडया हिल स्टेशनवर किंवा क्वचित परदेशवारीही केली जाते . पूर्वीच्या काळी प्रवास करणे म्हणजे आनंदापेक्षा, अनुभवसमृध्दी पेक्षा पुण्य मिळवणे हाच भाग जास्त होता. म्हणून भक्तियात्रेच्या निमित्ताने स्त्रिया, शिखरजी , गिरनार, दक्षिणेकडील श्रवणबेळगोळादी क्षेत्रानाच जास्त जायच्या. त्यामुळे अर्थातच प्रवास वर्णनात तोच भाग जास्त दिसून येतो. काही वेगळे प्रवास कमी प्रमाणात आहेत.

**सन १९२० ते १९६३ या कालखंडातील प्रवासवर्णन**

'माझा कर्नाटकचा प्रवास' कु.सुलोचना उपाध्ये यांनी (१५ जानेवारी १९३०)[१] आणि (३१ जानेवारी १९३० )[२] च्या प्रगतिच्या दोन अंकातून वाचकांना करून दिली आहे. त्या सन १९३० साली कर्नाटकातील म्हैसूरला प्रवासाला गेल्या होत्या. पण त्यांच्या वर्णनातून त्यांनी सर्वांना प्रवास घडवून आणलेला आहे. म्हैसूरला जाण्यासाठी मिरजेहून केलेल्या प्रयाणापासून त्यानी चित्रमयता शव्दवध्द केली आहे. रेल्वेतून दिसणारी दृश्ये ......बदलत गेलेली शेती......तिथले शेतकरी ......शेतातील पिके यांचा आढावा घेतला आहे .तसेच म्हैसूरमधील कृष्णवर्णीय व शामसुंदर

स्त्रिया यांची ही अचूक नोंद केली आहे. प्रशस्त रस्ते, उंच घरे, अफाट शहर, गजबजलेले वातावरण या सर्वांबरोबरच तलाव, कालवे राजवाडे ,ज्युबिली गार्डन, शोभिवंत देवळे यांचे बारीक निरीक्षण मांडले आहे.श्रीरंगपटट्णम, श्रावणबेळगोळ, मुडबिद्री, वेण्णूर तिथली देवालये, हैदरअली, टिपू सुलतान त्यांचा इतिहास ...... असे विस्तृत प्रवास वर्णन लिहून कर्नाटकला शब्दातून अमरत्व दिले आहे.

सुधाताईनी 'सुधाताईंचे पत्र ' या (२६ जुलै १९३३)[३] च्या अंकात वऱ्हाड फिरून आल्यानंतरच्या आठवणी सांगितल्या आहेत. मूर्तीजापूर, कारंज येथील ब्रम्हचर्याश्रम आणि तिथं भेटलेले मोतीचंद शेठ, आळंदकर जोशी, महाजन वकील, चंद्रकुमार स्त्री, कोकू मावशी यांच्या भेटीबददलचा आनंद व्यक्त करून 'कारंजा म्हणजे जैनांची काशी पाहिल्याचे समाधान शब्दबध्द केले आहे.

सन १९४२ ते १९५२ : या दहा वर्षात काही प्रवास वर्णने आढळले नाही.

**सन १९५४ ते १९८७ : या कालखंडातील प्रवास वर्णने**

(१८ जुलै १९५५)[४] च्या अंकात सौ.सुमन पाटील, दिल्ली यांनी मणिपूरला जाऊन आल्यानंतर 'मणिपूर स्टेट आणि लोक' म्हणून आपले अनुभव मांडले आहेत.

'स्त्रियानां घर चालविण्यात पुरुषांची बरोबरी करता येणं अशक्य आहे, असं खूप वेळा बोललं जातं पण मणिपूर स्टेटला जाऊन येणारे असे बोलंणार नाहीत' असे आपले मत व्यक्त करून 'स्त्रिया पुरुषांहून आधिक कुशलतेने बरीच कामे करू शकतात' हे मणिपूरला आलेले प्रत्यंतर त्यानी नमूद केले आहे.मणिपूर चे भौगोलिक क्षेत्रफळ, डोंगर दऱ्या रांगा, तेथील लोक राहणीमान त्यांचे पोषाख यांचे वर्णन करून त्या म्हणतात 'तेथे बहुतेक वैष्णवी ख्रिश्चन लोक असून स्त्रिया पुरुषांहून अधिक चपळ असतात, सशक्त व उद्योगी दिसतात. बाजरात, शेतात, रस्त्यावर सगळीकडे स्त्रिया दिसतात. विणकाम, मच्छिमारी स्त्रियाच करतात. पाठीशी लहान बालके व डोकीवर ओझी घेतलेल्या स्त्रिया लगबगीने वावरतात. स्त्रियांच्या हातात बांगडया अथवा इतर दागिने नाहीत. याउलट काही पुरुषांच्या गळयात व कानात आपल्यासारखे दागिने दिसतात. सुपारी, नारळ,

बांबूच्या बागेत असणारी खेडी...... पत्र्याची छोटी घरं'...... वगैरे सांगून त्यांनी एक निरिक्षण नोंदवले आहे की, 'देवदर्शन घेण्यासाठी देवळात जायचे असल्यास तिथे मणिपूरी पोषाखच घालावा लागतो.

सन १९६४ ते १९७४ : काही आढळले नाही.

एन.सी.सी च्या लेफ्टनंट हुद्यावर असणाऱ्या सौ.कांचन कापसे एम.एस.सी असून राजाराम कॉलेजमध्ये त्या प्रोफेसर आहेत. त्या महिला आश्रमाच्या सेक्रेटरी असून पॅराशूट जॅपिंग कोर्ससाठी त्या दिल्लीला गेल्या होत्या. (१४ फेब्रुवारी च्या १९८५)[५] च्या अंकात त्यांनी 'पॅराशूट जॅपिंग एक थरारक अनुभव' म्हणून आपले जिवंत अनुभव मांडले आहेत. ४००० फुटावरून खालचं दिसणार दृश्य...... विमानातून खाली उडी मारल्याचा तो क्षण...... पॅराशूट उघडेपर्यंतची प्राणांतिक धडधड...... वाऱ्याचा तडाखा...... बधीरलेला मेंदू...... पोटातील भीती...... याचा थरार शब्दातून जसाच्या तसा मांडला आहे. वाचकांना ही तो थरार अनुभवता यावा एवढे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे.

जैन महिलाश्रमाच्या अध्यक्षा.श्री रत्नाबाई मिरजी इंग्लंडहून आल्यानंतर इंग्लंड भेटीबददल सौ.अक्कुताई कित्तुर यांनी त्यांची घेतलेली मुलाखत (६ एप्रिल १९८५)[६] च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे.प्रश्नोत्तराच्या स्वरूपातील ही मुलाखत असून रत्नाबाईंनी आपले अनुभव मोजक्या शब्दात मांडलेला आहे.

श्रीमती.गंगुबाई आरवाडे यांनी 'उगवत्या सूर्याच्या देशात' ही प्रवासवर्णनाची लेखमाला (१९ जानेवारी १९८७)[७] च्या अंकात सुरू केली. पुढे (२ मार्च १९८७)[८] आणि (६ एप्रिल १९८७)[९] अंकात ती चालू ठेवली. बॅकाक, जपान, टोकियो, तिथला समुद्र, तिथले सामाजिक जीवन, सयामी बुटके लोक, खाणे, पिणे, हॉटेलस्, बौध्द मंदिरे ५|| टन वजनाची सोन्याची १५ फुट उंचीची ध्यानस्त बुध्दमूर्ती, पुढे हॉगकॉग चीन यांचे वर्णन केले आहे.

सन १९८६ ते २००३: या दीर्घ कालखंडात स्त्रियांनी खूप प्रवास केला पण लेखिकांनी त्या विषयी काही लिहिलेले आढळले नाही. एकूनच प्रवासवर्णन अपवादात्मकच केले आहे.

## ५.४ ग्रंथ परीक्षणात्मक

खूप कमी लेखन ग्रंथपरिचयावर स्त्रियांनी केलेलं आहे.मुळातं जैन स्त्रियांचं वाचनचं कमी. फक्त जैन नाही तर सर्वच स्त्रियांचं वाचन कमी आहे. पुन्हा जे वाचलं जातं ते धार्मिक ग्रंथापुरतचं मर्यादित असल्याने पुस्तकपरिचयात्मक लेखनात धार्मिक पुस्तकावर केलेलं लेखनचं जास्त आहे.काही वेगळया पुस्तकावर अपवादात्मक चर्चा ही केलेली आहे.

'या हृदयाचे त्या हृदयाला' म्हणतात तसं, स्वत:ला जे आवडलं, जे भावलं तेच दुसऱ्याला सांगणं, या सहज प्रवृत्तीतूनही काही पुस्तकांवर भाष्य केलेल आहे.

सन १९२३ ते १९३३: या कालखंडात काही आढळले नाही.

(७ ऑगस्ट १९४०)[१] च्या अंकात 'अर्धांगीनीनं काय काय दाखवलं' म्हणून अर्धांगी बोलपटाचं परिक्षणात्मक विवेचन सौ.सुलोचना भोकरे यांनी केले आहे. त्या म्हणतात 'अर्धांगी' हा करमणूकप्रधान बोलपट आहे. पण केवळ उच्च दर्जाचे करमणूक हेच सामाजिक चित्रपटाचे ध्येय असून उपयोगाचे नाही, तर त्यात जीवनाचे वास्तव चित्रणही होणे आवश्यक आहे.

सौ. सुलोचना भोकरे यांनी संपादित केलेले महत्वाचे पुस्तक 'जैन महाराष्ट्र लेखिका' हे आहे. यात एकूण ४२ लेखिकांचे ८४ लेख या पुस्तकामध्ये आहेत. 'पुस्तक वाचून वाटले हिंदुस्तानातील जैन समाजातील स्त्री वर्ग आता निद्रितावस्थेतून बाहेर पडून स्वत:चा दर्जा ओळखून केवळ स्त्री वर्गाच्याच नव्हे तर राष्ट्रोन्नतीच्या कार्यास हातभार लावण्यासाठी मनापासून खटपट करीत आहे. असे या पुस्तकासंबंधी लिहिताना कु.विमल उकार (११ सप्टेंबर १९४०)[२] च्या अंकात म्हणतात. प्रत्येक तरुण व प्रौढ स्त्रींनी लघुकथा व निबंध या प्रकारातील वाङ्मय वाचून पुस्तकाचा लाभ घ्यावा.

तसेच अनेक पुरुष लेखकानी हे आपले अभिप्राय नोंदवून पुस्तकाचे कौतुक केल्याचे आढळले.

'जैन महाराष्ट्र लेखिका' हे पुस्तक ३६८ पृष्ठांचे असून दक्षिणेस हुबळी पासून उत्तरेस वऱ्हाडापर्यंतच्या ४२ लेखकांनी निरनिराळया विषयांवर लिहलेले विचारणीय लेख आहेत. सौ. सुलोचना भोकरे यांनीही या पुस्तकाचे वस्तूनिष्ठ परिक्षण केले आहे. बहुतेक छायाचित्रे आणि

अल्पविचार ही दिली आहेत. कु.ब्र सुमतीबाई शहा यांनी स्व.कंकुमावशी यांचे चरित्र व पुस्तकासंबंधी दोन शब्द लिहिलेले आहे. उत्तम बाईडिंग केलेले असून पुस्तकाची किंमत १रू व टपाल खर्च तीन आणे ठेविली आहे.

हे पुस्तक वाचून कळून येते की, सुशिक्षित महिलांचे विचार किती प्रगल्भ होत चालले आहेत. धार्मिक लोकानांही पुस्तक वाचनीय झाले आहे.

**सन १९४५ ते १९५५ :**

कीर्तनकुमार तात्यासाहेब चोपडे यांना जैन आणि हिंदू या पुस्तकावर सौ.सुलोचना भोकरे यांनी (११ जुलै १९४६)[३] च्या अंकात लिहिले आहे. त्या म्हणतात, 'हे पुस्तक लिहून चोपडे यांनी जैन धर्माची व जैन समाजाची अमूल्य कामगिरी केली आहे. जैन हे हिंदू तर नाहीतच परंतु हिंदू हेच एके काळी जैन होते' असे चोपडे छाती ठोकपणे व विश्वसाने सांगतात. सुसंगत, सुस्पष्ट असा इतिहासाचा आरसा डोळयापुढे ठेवून लेखन केले आहे.

**सन १९५६ ते १९६६**

सौ.सुलोचना भोकरे यांनी 'दिगंबरत्व' या पुस्तकासंबंधी (१७ सप्टेंबर १९५६)[४] च्या अंकात लिहिले आहे की, 'सोलापूर चे सुप्रसिद्ध समाजसेवक,लेखणीकुशल श्री,लालचंद हिराचंद शहा यांचा 'दिगंबरत्व'हा चुरचुरीत लेखांचा संग्रह असून एका पेक्षा एक सरस व चटकदार लेख त्या मध्ये आहेत. 'शिळया कादील ऊत'' 'श्री गणेशा चा शिमगा'जैनांनो लजिरवाणे जिणे जगणार काय?' वगैरे लेख सर्व दृष्टया चांगले असून अशा पुस्तकाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे. सौ.सुलोचना भोकरे यांनी (८ ऑक्टोंबर १९५६)[५] च्या अंकात 'जैनंद्रवत'कथा संग्रह संपादक कालचंद्र शास्त्री यांच्या पुस्तकाचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे.

सौ.प्रेमलता हुक्केरी यांनी लेखक पं.जिनदास पार्श्वनाथ फडकुले यांच्या 'रात्री भोजन त्याग' कथा या पुस्तकासंबंधी माहिती (९ फेब्रुवारी १९५९)[६] च्या अंकात दिली आहे.

पं.सुमतिबाई शहा यांच्या 'भावपल्लवी' या पुस्तकासंबंधी सौ.सुलोचना भोकरे यांनी (६ जुलै १९५९)[७] च्या अंकात लिहिले आहे.चिंतन आणि वंदन या दोन विभागात विभागलेले असून चिंतन

विभागात आत्मदर्शन कसे होईल ? हे सांगितले आहे. तर वंदन विभागात २४ तिर्थंकरांना केलेल्या वंदनाबद्दल लिहिले आहे.

सन १९६७ ते १९७७: काही अढळले नाही.

**सन १९७८ ते १९८८:**

हिरा शहा, मुंबई यांनी, पुणे येथील जैन तत्त्वावर झालेल्या शिबिराची समिक्षा (८ जानेवारी १९७९)[८] च्या अंकात लिहिले आहे.१४व १५नोव्हेंबरला संपन्न झालेल्या दोन दिवशीय शिबिराचा वृत्तांत सांगून शिबिरातल्या त्रृटी सांगितल्या आहेत की, 'श्री.रावसाहेब शहा यांनी वासंतीबाई शहा यांच्या अनुवादित महावीर वाणी पुस्तकातील पहिला पाठ म्हणून दाखवला व श्रोत्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला' व्याख्यानातले झालेले बदल, छोटया मनोरंजन कार्यक्रमाचा अभाव या गोष्टी सोडता शिबिर छान झाले.

सौ.त्रिशला कुंडलपूरकर यांनी 'मला आवडलेले पुस्तक' म्हणून 'आनंदी गोपाळ' या पुस्तकासंबंधी (७ फेब्रुवारी १९८३)[९] च्या अंकात लिहिले आहे.ज्या काळी शिक्षणाची चळवळ नव्हती त्याकाळी गोपाळराव जोशी यांनी आपल्या पत्नीला शिकवण्याचा अटट्टाहास केला.त्यांना प्रतिसाद देऊन आनंदीबाई डॉक्टरकीचे शिक्षण अमेरिकेतून घेऊन आली.तिची जिदद,शिक्षणातून,ज्ञानातून तिची विस्तारलेली क्षितिजे, गोपाळकरांचे प्रोत्साहन महत्वाचे वाटले.म्हणून सौ.कुंडलपूर यांनी ते आवडल्याचे सांगितले तर सौ.त्रिशला कुंडलपूरकर यांनी (४ एप्रिल १९८३)[१०] च्या अंकात 'आनंदी गोपाळकर यांची दुसरी बाजू मांडली आहे.त्यात त्यांनी गोपाळरावांना आनंदीबाई शिकेपर्यंत किती कष्ट पडले त्यासंबंधी विवेचन केले आहे.त्या म्हणतात 'लोक पहिली डॉक्टर म्हणून आनंदीबाई कडे पाहतात,त्यात गोपाळरावांना स्थान असत नाही.पण खर तर हा 'गोपाळरावांचाच पराक्रम होय', तसेच त्या शेवटी म्हणतात. 'आपल्या पत्नीला 'मोठी' बनविण्याची स्वप्ने पाहणारे त्यासाठी जीवाचा आटापिटा करणारे गोपाळराव आजही हवे आहेत'

सौ.विद्युलता देशमाने यांनी (१४फेब्रुवारी १९८५)[११] च्या अंकात 'शीलविजय' संबंधी लिहिले आहे श्री.ए.एम.कोठारी हे 'मुलांचे बिरबल' म्हणून ओळखले जात असून त्यांनी शीलपुराणातील

ओवीबद्ध कथेचे कादंबरीत परिवर्तन केले असल्याचे सांगून विद्युलता देशमाने यांनी पुस्तकाचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे तर......

डॉ.तारा भवाळकर यांनी 'एक गोष्ट अर्धीच या वसंत पटवर्धन यांनी केलेल्या भाषांतरित पुस्तकाचा परिचय (१५ जुलै १९८५)[१२] च्या अंकात करून दिलेला आहे. मूळ पुस्तकाचे नाव 'अर्ध कनाथक' ३४० वर्षापूर्वी बनरसीदास या जैन साधूंच्या वज्रभाषेत असलेल्या दोहा आणि चौपाई छंदातील ३७५ श्लोक सांगितलेल्या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद 'एक गोष्ट अर्धीच' हा आहे.

बालविकास भाग १ते४ या जैन धर्मातील तत्त्वज्ञानचा परिचय करून देणाऱ्या मौलिक पुस्तकांचा थोडक्यात परिचय सौ.प्रेमलता गुंडे यांनी (२८ ऑक्टोबर १९८५)[१३] च्या अंकात करून दिलेला आहे. तसेच त्यांनीच (२ नोव्हेंबर १९८७)[१४] च्या अंकात 'मोहनजोदडो जैन परंपरा आणि प्रमाण' या पुस्तकाचा परिचय करून दिला आहे. हे पुस्तक म्हणजे आचार्य मुनीश्री विद्यानंद यांच्या 'मोहनजोदडो जैन परंपरा और प्रमाण' या हिंदी पुस्तकाचा अनुवाद असून यातून जैन धर्म, जैन धर्मा ची प्राचीनता,त्याचा इतिहास मोहनजोदडो उत्खननातील स्वतिक, त्रिशूल, कल्पवृक्ष या चिन्हांवरून जैन धर्माची प्राचीनता स्पष्ट होते,असे सांगितले आहे.

**सन १९८९ते२००३:**

आचार्य विद्यासागरजी यांच्या 'मूकमाटी' बदद्ल प्रा.सौ.लीलावती जैन यांनी (१४ मार्च १९८९)[१५] च्या अंकात लिहिली आहे. श्रमण संस्कृतीचा मंगल कलश म्हणून 'मूकमाटी' ग्रंथाला त्यांनी संबोधले आहे.तसेच मूकमाटीच्या दुसऱ्या खंडाचे विवेचन केले आहे.त्या म्हणतात, 'कल्पनेचा फुलोरा, शब्दांच्या योजना, अर्थ छटांची बांधणी, अर्थांचा उत्साह घेऊन हे महाकाव्य आले आहे' मूकमाटी बदद्ल रसाळ भाषेतील तत्त्वज्ञान असेही म्हटले आहे.लीलावती जैन यांनी मूकमाटीचे सुंदर विवेचन केले आहे.पुढे त्यांनी मूकमाटीचे अंतरंग ३ एप्रिल १९८९ च्या अंकात उलगडले आहे.

ब्र.कु.रेवती दोशी यांनी 'अजितमती साधना स्मृतीगंध' प्रकाशित होणाऱ्या पुस्तकातील काही अंश (१० मार्च १९९२)[१६] च्या अंकात सांगितला आहे. खूप सुंदर ...... हळूहळू भाषेतले

माताजींचे बोलणे...... माताजींचा दिनक्रम ...... त्यांना वाचून दाखवणे. हुबेहुब तंतोतंत वर्णन चित्रमयी भाषा असे रेवती दोशी यांच्या लेखन शैलीचे वैशिष्टय म्हणता येईल.

डॉ.सुभाषचंद्र अक्कोळे यांच्या 'समाज संवाद' या साक्षेपी अग्रलेखी संग्रह पुस्तकाचा प्रा.रोहिणी तुकदेव यांनी (५ नोव्हेंबर १९९९)[१७] च्या अंकात परिचय करून दिला आहे. अग्रलेखांचा समग्र आढावा घेऊन त्या म्हणतात, 'केवळ जैन समाजातील लोकांनीच नव्हे तर जैन धर्माबद्दल आणि जैन समाजाबद्दल उत्सुकता असलेल्या लोकांनीही अवश्य वाचावे' असे हे पुस्तक आहे.

डॉ.सौ. सुनिता लेंगडे यांनी (१० ऑगस्ट २००१)[१८] च्या अंकात 'विसाव्या शतकातील समाजसेविका' या प्रा.सौ.सुमन चौधरी संपादित पुस्तकाचा परिचय करून दिला आहे. सुनिता लेंगडे म्हणतात, 'हा ग्रंथ म्हणजे आपली जिद्द आणि श्रध्दा यांच्या बळावर जनहिताचे कार्य करणाऱ्या काही मातब्बर आणि आदरणीय अशा महिलांच्या कार्याची घेतलेली नोंद होय.' या परिचयामध्ये ब्रिटीश राजवटीविरुध्द आवाज उठवणाऱ्या वीरांगना राजमती बिरनाळे,, श्रीमती कळंत्रे आक्का,, सुलोचना भोकरे,, उषाताई मगदूम,, हौशाक्का चौगुले, , राजमती आक्का, , सुमतीबेन शहा,, सुरेखा शहा या स्त्रियांचा उल्लेख केला आहे.

सौ.शोभना भूमकर यांच्या 'नैवेद्यम' या ३५१ शाकाहारी निवडक व रुचकर पदार्थांचे विवरण करणाऱ्या पुस्तकाचा परिचय (८ मार्च २००१)[१९] च्या अंकात करून दिला आहे. पण परिचय देणाऱ्याचे नाव आढळले नाही. या पुस्तकासंबंधी 'शाकाहारी पदार्थांचा खजिना' असे विशेष वर्णन केलेले आहे.

नीलम माणगांवे यांनी 'जैन महाराष्ट्र लेखिका' या पुस्तकाचा क्रमशः आढावा (१२ एप्रिल २००२)[२०] , (३ मे २००२)[२१], (७ जून २००२)[२२] या तीनही अंकात घेतला आहे. पुस्तकांचा आढावा 'जैन महाराष्ट्र लेखिकांच्या पाऊलखुणा' या शीर्षकाखाली 'प्रगती' च्या वाचकांपर्यंत नेऊन पोहोचवला आहे. या पुस्तकासंदर्भात नीलम माणगावे म्हणतात, 'काळाच्या पुढे पाऊल टाकण्याची ताकद या लेखिकांच्या लेखणीमध्ये आढळते. पुस्तकाच्या संपादिका सौ.सुलोचनाबाई भोकरे

आपल्या मनोगतात म्हणतात, ' या लेखसंग्रहातील सर्वच काही सोने नाही. पण प्रत्येकाला यात सोन्याचे काही ना काही कण कोठे ना कोठे खासच सापडतील.'

लेखिका ह्या बऱ्याच मेट्रीक, बी.ए. व उच्चवर्गीय असल्यामुळे त्यांच्या लेखनात वैचारिक परिपक्वता आढळते. बऱ्याच लेखिकांनी कथा,, संवाद,, नाटय,, लेख,, ललित,, आत्मचरित्र वगैरे साहित्य प्रकारातील लेखनातून पुरुष प्रधान मानसिकता आणि प्रस्थापितांना विरोध केला आहे.

## ५.५ निष्कर्ष

१) जैन लेखिकांनी कथेचे लेखन केलेले आहे. पण या कथा पारंपारिक कथेचा बाज घेऊन आलेल्या आढळतात. या कथालेखनामागची प्रेरणा काही तरी बोध देणे, सांगणे, शिकवणे, तात्पर्य काढणे असे असल्याचे जाणवते.

२) बऱ्यापैकी कथा या संस्कार कथाच वाटतात. पण काही कथा स्त्री समस्या, पुनर्विवाह, साक्षरता यावरही लिहिल्या गेल्या आहेत.

३) जैन लेखिकांच्या कथालेखनाला मर्यादा आल्यासारखे वाटते. पण या कथा लेखिकांनी मराठी साहित्य कथा प्रवाहात स्वत:ला झोकून देऊन लेखन केले असते तर कदाचित आता आहेत त्यापेक्षा उच्च दर्जाच्या कथांची निर्मिती काही लेखिका या नक्कीच करू शकल्या असत्या. तेवढे सामर्थ्य त्यांच्या जवळ होते. पण आपले हे सामर्थ्य त्या एका परिघातच बंदिस्त करून ठेवल्या सारखे वाटते.

४) कथा लिहिताना कथा लेखिका खुलल्या नाहीत. पण कविता लिहिताना मात्र त्यांनी जास्त चांगल्यारीतीने काव्य शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रभावीपणे आपल्या भावना त्या कागदावर उतरवू शकलेल्या आहेत. निसर्गाचे नियम म्हणजे जन्म, मृत्यू, उत्पत्ती आणि विनाश हे आहेत. जैन कवयित्रींनी हाच मुख्यधागा पकडून आपले काव्य लेखन केलेले आहे. मोह, माया, संयम, क्षमा, अहिंसादी तत्त्वज्ञानाच्या कक्षेला स्पर्श करणाऱ्या या कविता भाव, भक्ती आणि विरक्तीच्या दर्शक आहेत, असे म्हणता येईल.

५) ग्रंथ परिचय आणि प्रवास वर्णन या प्रकारात स्त्रियांनी खूप कमी लेखन केलेले आहे. 'यात लिहिण्यासारखे काय आहे ?' असेही ही कदाचित वाटले असेल.

## ५.६ संदर्भ टीपा

### अ) कथाविषयक

१) श्रीमती सुधाताई, 'गरीब बहिणीची ओवाळणी', प्रगति आणि जिनविजय, ०३ नोव्हेंबर १९३३.

२) सौ. मिठारी सुशिला, 'उद्योगी तरूण', प्रगति आणि जिनविजय, १४ जुलै १९३३.

३) ब्र. शिलावतीबाई, 'ज्ञानाचे महत्त्व', प्रगति आणि जिनविजय, ०७ ऑगष्ट १९३४.

४) वाकेकर सुगंधाबाई, 'प्रेम संन्यास', प्रगति आणि जिनविजय, ०२ ऑक्टोबर १९३४.

५) सौ.भोकरे सुलोचना, 'यंदाची भाऊबीज', प्रगति आणि जिनविजय, २० नोव्हेंबर १९३४.

६) जुनुनकर लीलावती, 'स्नेहलची ओवाळणी', प्रगति आणि जिनविजय, ०८ जानेवारी १९३५

७) वाकेकार सुगंधाबाई, 'स्त्री ऱ्हदय', प्रगति आणि जिनविजय, ०१ जानेवारी १९३५.

८) सौ.भोकरे सुलोचना, 'माझे स्वप्न', प्रगति आणि जिनविजय, १२ फेबुवारी १९३५.

९) बोरीकर कृष्णाबाई, 'परीक्षा', प्रगति आणि जिनविजय, १९ फेबुवारी १९३५.

१०) सौ.इंगळे शालिनी, 'दुखावलेली कविता', प्रगति आणि जिनविजय, २५ जुन १९३५.

११) सौ.काळे सिंधुताई, 'दागिण्यांची हौस फिटली', प्रगति आणि जिनविजय, ०२ जुलै १९३५.

१२) कु.जुनुनकर लिलावती, 'लग्न की विघ्न?', प्रगति आणि जिनविजय, ०५ नोव्हेंबर १९३५.

१३) कु.रणदिवे शकुंतला, 'विमोह', प्रगति आणि जिनविजय, २६ नोव्हेंबर १९३५.

१४) सौ.काळे सिंधुताई, 'वनातील सौंदर्य', प्रगति आणि जिनविजय, २४ डिसेंबर १९३५.

१५) वाकेकर सुगंधाबाई, 'आत्मयज्ञ' , प्रगति आणि जिनविजय, २८जानेवारी १९३६.

१६) सौ.ओहाळे रतनबाई, 'समाजाचा दुबळेपणा', प्रगति आणि जिनविजय, १५ मे १९४०.

१७) सौ.भोकरे सुलोचना, 'साक्षरता प्रसार', प्रगति आणि जिनविजय, २९ जानेवारी १९४१.

१८) सौ.भोकरे सुलोचना, 'स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य', प्रगति आणि जिनविजय, १२ मार्च १९४१.

१९) सौ.भोकरे सुलोचना, 'देहार्पण', प्रगति आणि जिनविजय, २३ एप्रिल १९४१.

२०) सौ.शहा चंचलाबाई, 'विजयाच्या आघाडीवर', प्रगति आणि जिनविजय, ११ जून १९४१

२१) सौ.भोकरे सुलोचना, 'स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य', प्रगति आणि जिनविजय, १ मे १९४५

२२) सौ.पाटील चंद्राबाई, 'तक्रार', प्रगति आणि जिनविजय, २० ऑगष्ट १९५६

२३) कु.पाटील मालती, 'अमरसौभाग्य', प्रगति आणि जिनविजय, २७ नोव्हेंबर १९६२

२४) सकळे सुवर्णा, 'मोह', प्रगति आणि जिनविजय, ०२ जून १९८०.

२५) कु.पाटील राणी, 'मोह', प्रगति आणि जिनविजय, ०६ जून १९८३

२६) कु.चौधरी सुवर्णा, 'सत्याचा विजय', प्रगति आणि जिनविजय, ०६ जून १९८३

२७) कु.पाटील पुष्पा धनपाल, 'मौनत्व एक महान औषध', प्रगति आणि जिनविजय, ०५ मे १९८६

२८) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'आशा', प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑक्टोबर १९८६

२९) कोले सुनंदा, 'मातीची डाळ', प्रगति आणि जिनविजय, ०२ फेब्रुवारी १९८७

३०) सौ.रणदिवे सुचेता, 'नवी आई',प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑगष्ट १९८७

३१) पाटील मायादेवी, 'संस्कार', प्रगति आणि जिनविजय, ०६ ऑगष्ट १९८७.

३२) सौ.केळकर  उज्वला, 'धन्वंतरी', प्रगति आणि जिनविजय, ०५ ऑक्टोबर १९८७.

३३) सौ.गडकर जयश्री, 'का चिंता करीशी?', प्रगति आणि जिनविजय, २६ ऑक्टोबर १९८७.

३४) प्रा.सौ.दर्यापुरकर भुपाळी, 'खरी संपत्ती', प्रगति आणि जिनविजय, ०७ नोव्हेंबर १९८७.

३५) अनामिका, 'मावळीतीचे सांगाती' प्रगति आणि जिनविजय, ०७ डिसेंबर १९८७.

३६) सौ.आवटे सुनंदा, 'वास्तविक त्याग', प्रगति आणि जिनविजय, ११ जानेवारी १९८८.

३७) सौ.हावळे सुवर्णा, 'बोधकथा', प्रगति आणि जिनविजय, ०७ मार्च १९८८.

३८) सौ.हावळे सुवर्णा, 'बोधकथा', प्रगति आणि जिनविजय, ०४ एप्रिल १९८८.

३९) सौ.हावळे, सुवर्णा, 'खेळातील तत्वज्ञान', प्रगति आणि जिनविजय, ०१ ऑगष्ट १९८८.

४०) सौ.बर्वे सुचेता, 'श्रदधेचे साध्य', प्रगति आणि जिनविजय, ०५ डिसेंबर १९८८.

४१) ब्र.टोणे विलासमती , 'इर्षा' , प्रगति आणि जिनविजय, ०५ फेब्रुवारी १९९१.

४२) सौ.पाटील सुवर्णा, 'सद्‌भावना', प्रगति आणि जिनविजय, ११ जून १९९१.

## ब) काव्यविषयक

१) सौ.उपाध्ये सुलोचना, 'मृत्यू कुणाला चुकणार आहे?', प्रगति आणि जिनविजय, ०३ ऑगष्ट १९३२.

२) सौ.उपाध्ये सुलोचना, 'दागिण्यांची आवड', प्रगति आणि जिनविजय, १७ ऑगष्ट १९३२.

३) सौ.उपाध्ये सुलोचना, 'स्तवनिधी क्षेत्रास पाहून', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९३२.

४) सौ.उपाध्ये सुलोचना, 'दागिण्यांची आवड' प्रगति आणि जिनविजय, २९ मे १९३४.

५) सौ.उपाध्ये सुलोचना, 'माहेरची ओढ',प्रगति आणि जिनविजय, १४ ऑगष्ट १९३४.

६) सौ.उपाध्ये सुलोचना, 'चुकलं गं ताई' , प्रगति आणि जिनविजय, २६ मार्च १९३५.

७) काळे निर्मलाबाई, 'माझा बाळ', प्रगति आणि जिनविजय, ३० एप्रिल १९३५.

८) काळे निर्मलाबाई, 'दुःखी विधवा', प्रगति आणि जिनविजय, १० डिसेंबर १९३५.

९) कांचन, 'प्रेम हे असे आहे', प्रगति आणि जिनविजय, ३१ डिसेंबर १९३५.

१०) कांचन, 'जैन हिंदू नाहीत', प्रगति आणि जिनविजय, १४ जानेवारी १९३६.

११) कु.पाटील इंदूमती, 'श्री वीरध्वजवंदना', प्रगति आणि जिनविजय, ०५ नोव्हेंबर १९४१.

१२) सौ.भोकरे सुलोचना, 'तिची सबब', प्रगति आणि जिनविजय, ११ फेब्रुवारी १९४२.

१३) सौ. चंचलाबाई पाटील, 'अंगाई गीत', प्रगति आणि जिनविजय, ०१ मे १९४८.

१४) सौ उषा काक्रंबे, 'तू कोण?', प्रगति आणि जिनविजय, २३ एप्रिल १९४९.

१५) सौ.भोकरे सुलोचना, 'यंदाची भाऊबीज', प्रगति आणि जिनविजय, १७ डिसेंबर १९४९.

१६) सौ चंपाबाई पाटील, 'सूनबाई' ,प्रगति आणि जिनविजय, १४ डिसेंबर १९५३.

१७) गरगट्टे श्रीमतीबाई, 'श्री गरूव्रतोपदेशस्तवन', प्रगति आणि जिनविजय, १९ ऑक्टोबर १९५३.

१८) वणकुद्रे रत्नाबाई, 'जीवनसागर', प्रगति आणि जिनविजय, १५ जून १९५३.

१९) गरगट्टे श्रीमतीबाई, 'महावीर जयंती जन्मोत्सव गीत', प्रगति आणि जिनविजय, २६ एप्रिल १९५४.

२०) गरगट्टे श्रीमतीबाई, 'आचार्य शांतिसागर निर्वाणानंतरचे गीत', प्रगति आणि जिनविजय, ७ ऑक्टोबर १९५५.

२१) गरगट्टे श्रीमतीबाई, 'शांतिसागर मुनीपदी', प्रगति आणि जिनविजय, ७ नोव्हेंबर १९५५.

२२) गरगट्टे श्रीमतीबाई, 'पू. शातिसागर', प्रगति आणि जिनविजय, २१ नोव्हेंबर १९५५.

२३) कु. नर्मदा आवटी, 'विनवणी', प्रगति आणि जिनविजय, ९ जानेवारी १९५६.

२४) गरगट्टे श्रीमतीबाई, 'आचार्य शांतिसागरपदी माझे भाव', प्रगति आणि जिनविजय, ५ मार्च १९५६.

२५) सौ.पाटील विजयमाला, ‘समतेने नांदू भारती’, प्रगति आणि जिनविजय, १० डिसेंबर १९५६.

२६) सौ.खाडीलकर सुनंदा, ‘देवाघरच्या कन्येस’, प्रगति आणि जिनविजय, १० सप्टेंबर १९५६.

२७) सौ.पाटील विजया, ‘घेऊनी माहेरला आले’, प्रगति आणि जिनविजय, २९ सप्टेंबर १९५६.

२८) गरगट्टे श्रीमतीबाई, ‘श्रीगुरूस्तवन’, प्रगति आणि जिनविजय, १६ डिसेंबर १९५७.

२९) गरगट्टे श्रीमतीबाई, ‘महावीर जन्मोत्सव’, प्रगति आणि जिनविजय, १२ मे १९५८.

३०) गरगट्टे श्रीमतीबाई, ‘माझे मनोद्वार’, प्रगति आणि जिनविजय, १७ नेव्हेंबर १९५८.

३१) कु.गांधी सुंदर, ‘रे जीवा सम्यकत्त्व ग्रहण कर’, प्रगति आणि जिनविजय, २३ नोव्हेंबर १९५९.

३२) कु.गांधी सुंदर, ‘मनुजा सोड’, प्रगति आणि जिनविजय, ३० नोव्हेंबर १९५९.

३३) अनामिक, ‘स्त्रीविषयक गीत’, प्रगति आणि जिनविजय, १४ डिसेंबर १९५९.

३४) सौ.टिळक इंदुमती, ‘मानाचा मुजरा’,प्रगति आणि जिनविजय, ३१ ऑक्टोबर १९६०.

३५) गरगट्टे श्रीमतीबाई, ‘श्री गुरूचरणी’, प्रार्थना प्रगति आणि जिनविजय, ७ नोव्हेंबर १९६०.

३६) सौ.शहा नवलाबाई, ‘निर्वाण’, प्रगति आणि जिनविजय, ६ जुलै १९६४.

३७) सौ.शहा नवलाबाई, ‘सारे जग’, प्रगति आणि जिनविजय, ९ नोव्हेंबर १९६४.

३८) कु.कासर पुष्पलता , ‘नमाली शुक्राची चांदणी’, प्रगति आणि जिनविजय, ८ फेब्रुवारी १९६५.

३९) सौ.शहा नवलाबाई, ‘सत्वरक्षक’, प्रगति आणि जिनविजय, १५ फेब्रुवारी १९६५.

४०) सौ.वणकुद्रे सरोजनी, ‘कोडे’, प्रगति आणि जिनविजय, ३ मे १९६५.

४१) कासार पुष्पलता, ‘भगवान महावीर अवाहन’, प्रगति आणि जिनविजय, ३ मे १९६५.

४२) वणकुद्रे सरोजनी, 'मनाची व्यथा', प्रगति आणि जिनविजय, ११ ऑक्टोबर १९६५ .

४३) सौ . वणकुंद्रे रत्नाबाई, 'तिळगूळ गीत', प्रगति आणि जिनविजय, २० फेब्रुवारी १९६७

४४) सौ . शहा नवलबाई, 'पाळणा', प्रगति आणि जिनविजय, १७ एप्रिल १९६७ .

४५) सौ . रणदिवे सुचेता, 'अमरवाणी', प्रगति आणि जिनविजय, ३० ऑक्टोबर १९६७ .

४६) सौ . चौगुले सरोज, 'आस' , प्रगति आणि जिनविजय, २२ एप्रिल १९६८ .

४७) सौ . वणकुंद्रे रत्नाबाई, 'शांत करा हो या भूदेवीला', प्रगति आणि जिनविजय, २८ एप्रिल १९६८ .

४८) कु . रोकडे कुमुदिनी, 'प्रभो घ्या आज नवा अवतार', प्रगति आणि जिनविजय, ०३ जून १९६८ .

४९) सौ . बुरसे लीला, 'हे जनतेच्या कर्मवीरा', प्रगति आणि जिनविजय, २३ सप्टेंबर १९६८ .

५०) कासार पुष्पलता, 'प्रभावना मानीते मी तिथे', प्रगति आणि जिनविजय, ०४ नोव्हेंबर १९६८ .

५१) डॉ . सौ . पांगळ विजयालक्ष्मी, 'दयाला दर्शन दे मजला', प्रगति आणि जिनविजय, ३० डिसेंबर १९६८ .

५२) सौ . वंजाळे लीलावती, 'पार्श्वनाथ वंदना', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९६९

५३) सौ . पुरवत इंदूमती, 'आला पर्यूषण पर्व', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९६९

५४) सौ . चौगुले सरोज, 'पालखी', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९६९

५५) सौ . शहा नवलबाई, 'साजरी करुया महावीर जयंती', प्रगति आणि जिनविजय, २७ मार्च १९७२

५६) सौ . शहा सुजाता, 'आता सावध हो जीवनात', प्रगति आणि जिनविजय, १० एप्रिल १९७३

५७) सौ.पुरवंत इंदूमती, ‘आज महावीर जन्माला आला’, प्रगति आणि जिनविजय, ०८ एप्रिल १९७४

५८) सौ.शहा नवलबाई, ‘महावीर ज्ञान भंडार’, प्रगति आणि जिनविजय, ०८ एप्रिल १९७४

५९) सौ.पुरवंत इंदूमती, ‘वीर प्रभूंची मूर्ती’, प्रगति आणि जिनविजय, ३१ मार्च १९७५

६०) सौ.गुंडाळे कुसुम, ‘पार्श्वनाथ स्तवन’, प्रगति आणि जिनविजय, २३ जून १९७५.

६१) सौ.शहा सुजाता, ‘शांतिसागर स्मरण’, गीत प्रगति आणि जिनविजय, २२ सप्टेंबर १९७५.

६२) सौ.शहा सुजाता, ‘भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ’, प्रगति आणि जिनविजय, ०३ फेब्रुवारी १९७६.

६३) सौ.शहा सुजाता, ‘देवास मागणी’, प्रगति आणि जिनविजय, ०३ फेब्रुवारी १९७६

६४) सौ.नांद्रे सरोजनी, ‘श्री १०८ मुनीपद’, प्रगति आणि जिनविजय, २६ डिसेंबर १९७७.

६५) कमते चंपाबाई, ‘प्रभू दर्शन लाभ’, प्रगति आणि जिनविजय, १० मार्च १९७८

६६) चौधरी बहिणाबाई, ‘अरे संसार संसार’, प्रगति आणि जिनविजय, २९ मे १९७८.

६७) चौधरी बहिणाबाई, ‘कशाला काय म्हणू नये’, प्रगति आणि जिनविजय, २९ मे १९७८.

६८) कु.गुंडे शुभदा, ‘हरपला धरतीचा तारा’, प्रगति आणि जिनविजय, २६ जानेवारी १९८१.

६९) सौ.फुरसुले पुष्पलता, ‘बाहुबली भगवान’, प्रगति आणि जिनविजय, १६ मार्च १९८१.

७०) कु.परमाज सुरेखा, ‘महावीरांचा पाळणा’, प्रगति आणि जिनविजय, २२ जून १९८१.

७१) सौ.रोकडे उज्वला, ‘उचलते म्हणून बेल भंडार’, प्रगति आणि जिनविजय, ०६ जुलै १९८१.

७२) सौ.पटवर्धन विद्या, ‘महावीर जन्मोत्सव’, प्रगति आणि जिनविजय, १५ मार्च १९८२.

७३) सौ.जोशी प्रिया, ‘माझी आजी’, प्रगति आणि जिनविजय, २९ नोव्हेंबर १९८२.

७४) सौ.कोठारी शुभदा, ‘त्रिवार वंदन तुला’, प्रगति आणि जिनविजय, ०३ ऑक्टोबर १९८३.

७५)कमते चंपावती, 'प. पू. विद्यानंद मुनी महाराज वंदन', प्रगति आणि जिनविजय, २७ फेब्रुवारी १९८४.

७६) सौ.जोशी प्रिया, 'पाऊस', प्रगति आणि जिनविजय, ०२ जुलै १९८४.

७७) सौ.काक्रंबे विमल, 'वंदन', प्रगति आणि जिनविजय, २७ ऑगस्ट १९८४.

७८) सौ.शहा लीला, 'आचार्य शांतिसागर स्तवन', प्रगति आणि जिनविजय, २७ ऑगस्ट १९८४.

७९) कु.उपाध्ये प्रमिला, 'वीर ध्वज गीत', प्रगति आणि जिनविजय, २२ ऑक्टोबर १९८४.

८०) कु.गुंडे शुभदा, 'मिटले एक जीवनपुष्प', प्रगति आणि जिनविजय, ०५ नोव्हेंबर १९८४.

८१) सौ.सांगरोळे निर्मला, 'जाग मानवा जाग', प्रगति आणि जिनविजय, ०३ डिसेंबर १९८४.

८२) सौ.शहा नवलबाई, 'मला काही सांगायचे आहे', प्रगति आणि जिनविजय, २८ जानेवारी १९८५.

८३) सौ.शहा नवलबाई, 'स्वामींचा पाळणा', प्रगति आणि जिनविजय, २१ जून १९८६.

८४) सौ.पाटील शांता, 'जीवनज्योत', प्रगति आणि जिनविजय, ०१ सप्टेंबर १९८६.

८५) कु.वांजुळे इतिश्री, 'आले हे केशवनंदी मुनी', प्रगति आणि जिनविजय, ०८ फेब्रुवारी १९८८.

८६) सौ.पाटील शहाणी, 'खरं गणित', प्रगति आणि जिनविजय, ०४ जुलै १९८८.

८७) कु.वरखेडकर प्रतिभा, 'प्रणाम गीत', प्रगति आणि जिनविजय, १८ एप्रिल १९८९.

८८) कु.गाजी छाया,'प्रणाम तुजला माझा', प्रगति आणि जिनविजय, २४ सप्टेंबर १९९१.

८९) डॉ.सौ.कोठाडिया सरिता, 'नव्या जगात जायचे आहे', प्रगति आणि जिनविजय, ०१ डिसेंबर १९९२.

९०) सौ.पाटील शुभदा, 'महाश्वेता', प्रगति आणि जिनविजय, ०४ जानेवारी १९९६.

९१) कु.गांधी पार्शिया, 'झिम्मा गीत', प्रगति आणि जिनविजय, ०९ जानेवारी १९९७.

९२) सौ.वणकुंद्रे कांचन, 'भारुड (सूनबाईचे)' , प्रगति आणि जिनविजय, १७ डिसेंबर १९९९.

९३) शहा वासंती, 'अरिहंत स्तुती', प्रगति आणि जिनविजय, १४ एप्रिल २०००.

९४)शहा सुरेखा, 'हे स्त्री तुझ्या शक्तीमधून', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर २००१.

९५) सौ.शहा सुरेखा, 'संयम', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर २००१.

९६) सौ.शहा रजनी, 'आज दिवाळी मोक्षाची', प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर २००१.

९७) सौ.पाटील रुपाली, 'माणगावचा राम', प्रगति आणि जिनविजय, ११ ऑक्टोंबर २००२.

## प्रवास वर्णन

०१) कु.उपाध्ये सुलोचना, 'माझा कर्नाटकचा प्रवास', प्रगति आणि जिनविजय, १५ जानेवारी १९३०.

०२) कु. उपाध्ये सुलोचना , 'माझा कर्नाटकचा प्रवास', प्रगति आणि जिनविजय, ३१ जानेवारी १९३०.

०३) सुधाताई, 'वऱ्हाडचा प्रवास', प्रगति आणि जिनविजय, २७ जुलै १९३३.

०४) सौ.पाटील सुमन, 'मनिपूर स्टेट आणि लोक', प्रगति आणि जिनविजय, १८ जुलै १९५५.

०५) सौ.कापसे कांचन, 'पॅराशूट जम्पिंग एक थरारक अनुभव', प्रगति आणि जिनविजय, १४ फेब्रुवारी १९८५.

०६) श्री.मिरजी रत्नाबाई, 'इंग्लड भेटीबददल', प्रगति आणि जिनविजय ०६ एप्रिल १९८५.

०७) श्री.आरवाडे गंगूबाई, 'उगवत्या सूर्याच्या देशात', प्रगति आणि जिनविजय, १९ जानेवारी १९८७.

०८) श्री.आरवाडे गंगूबाई, 'उगवत्या सूर्याच्या देशात', प्रगति आणि जिनविजय, ०२ मार्च १९८७.

०९) श्री.आरवाडे गंगूबाई, ‘उगवत्या सूर्याच्या देशात’, प्रगति आणि जिनविजय, ०६ एप्रिल १९८७.

## ग्रंथ परिचयात्मक

०१) सौ.भोकरे सुलोचना, ‘अर्धांगीनीनं काय काय दाखवलं?’, प्रगति आणि जिनविजय, ७ ऑगस्ट १९४०.

०२) सौ.भोकरे सुलोचना, ‘जैन महाराष्ट्र लेखिका’, प्रगति आणि जिनविजय, ११ सप्टेंबर १९४०.

०३) सौ.भोकरे सुलोचना, ‘जैन आणि हिंदू’, प्रगति आणि जिनविजय, ११ जुलै १९४६.

०४) सौ.भोकरे सुलोचना, ‘दिगंबरत्व’, प्रगति आणि जिनविजय, १७ सप्टेंबर १९५६.

०५) सौ.भोकरे सुलोचना, ‘जैनेंद्रव्रत’, प्रगति आणि जिनविजय, ८ ऑक्टोबर १९५६.

०६) सौ.हुक्केरी प्रेमलता, ‘रात्री भोजन त्याग’, प्रगति आणि जिनविजय, ९ फेब्रुवारी १९५९.

०७) सौ.भोकरे सुलोचना, ‘भावपल्लवी’, प्रगति आणि जिनविजय, ६ जुलै १९५९.

०८) शहा हीरा, ‘शिबिराची समीक्षा’, प्रगति आणि जिनविजय, ८ जानेवारी १९७९.

०९) सौ.कुंडलपूरकर त्रिशला, ‘मला आवडलेले पुस्तकः आनंदी गोपाळ’, प्रगति आणि जिनविजय, ७ फेब्रुवारी १९८३.

१०) सौ.कुंडलपूरकर त्रिशला, ‘आनंदी गोपाळची दुसरी बाजू’, प्रगति आणि जिनविजय, ४ एप्रिल १९८३.

११) सौ.देशमाने विद्युलता, ‘शील विजय’, प्रगति आणि जिनविजय, १४ फेब्रुवारी १९८५.

१२) डॉ.भवाळकर तारा, ‘एक गोष्ट अर्धीच’, प्रगति आणि जिनविजय, १५ जुलै १९८५.

१३) सौ.गुंडे प्रेमलता, ‘बालविकास भाग १ ते ४’, प्रगति आणि जिनविजय, २८ ऑक्टोंबर १९८५.

१४) सौ.गुंडे प्रेमलता, 'मोहेनजोंदडो जैन परंपरा आणि प्रमाण', प्रगति आणि जिनविजय, २ नोव्हेंबर १९८७.

१५) प्रा. सौ.जैन लीलावती, 'मुकमाटी', प्रगति आणि जिनविजय, १४ मार्च १९८९.

१६) कु.दोशी रेवती, 'अजितमती साधना स्मृतिगंध', प्रगति आणि जिनविजय, १० मार्च १९९२.

१७) प्रा.तुकदेव रोहिणी, 'समाजसंवाद', प्रगति आणि जिनविजय, ५ नोव्हेंबर १९९९.

१८) डॉ. सौ.लेंगडे सुनिता, 'विसाव्या शतकातील जैन समाजसेविका', प्रगति आणि जिनविजय, १० ऑगस्ट २००१.

१९) सौ.भूमकर शोभना, 'नैवेद्यम', प्रगति आणि जिनविजय, ८ मार्च २००१.

२०) सौ.माणगावे नीलम, 'जैन महाराष्ट्र लेखिका', प्रगति आणि जिनविजय, १२ मार्च २००१.

२१) सौ.माणगावे नीलम, 'जैन महाराष्ट्र लेखिका', प्रगति आणि जिनविजय, ३ मे २००२.

२२) सौ.माणगावे नीलम, 'जैन महाराष्ट्र लेखिका', प्रगति आणि जिनविजय, ७ जून २००२.

**प्रकरण ६**

# जैन स्त्रियांच्या लेखनातून प्रकट झालेली भाषाशैली


६.१ प्रस्तावना

६.२ भावनांचे प्रकटीकरण

६.३ ताजेपणा

६.४ चित्रमयता

६.५ परिणामकारकता

६.६ लयबद्धता

६.७ भावमय भक्तीरस

६.८ कन्नड भाषेचा प्रभाव

६.९ निष्कर्ष

६.१० संदर्भ टीपा

# प्रकरण सहावे

# जैन स्त्रियांच्या लेखनातून प्रकट झालेली भाषाशैली

## ६.१ प्रस्तावना

भाषा ही मूलतः एक सामाजिक प्रक्रिया आहे. त्यामुळे समाजमनाचे अनेक कंगोरे भाषेत उमटताना आपल्याला दिसतात. साहित्यातून बोलणारी भाषा ही आपल्या शैलीसह प्रकट होताना दिसते. म्हणजेच भाषा व साहित्यातील शैली त्या साहित्यकृतीतील प्रामाणिकता स्पष्ट करते. लिहिलेले लेखन उठावदार व वाचनीय बनविण्यात भाषा व शैलीचा फार मोठा वाटा असतो. भाषा शैलीसंबंधी रा. ग. जाधव लिहितात, "शैलीचा विचार हा लेखक-कवीच्या दृष्टीकोनाच्या संदर्भात जसा करता येतो तसाच तो साहित्य कृतीमधील शब्दकलेच्या आधारेही करता येतो".[१] म्हणजेच भाषा व शैलीच्या संदर्भात लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याची शैली यांचा अतूट संबध आहे. कारण मनातील विचार लेखक त्याने ठरवून घेतलेल्या दृष्टीकोनातून व्यक्त करीत असतो आणि त्याच्या मांडणीतील शैलीच्या आधारे त्याच्या अनुभवाचे वेगळेपण सिध्द होते. म्हणजेच लेखकाने निवडलेल्या शैलीत त्याच्या कलाकृतीतील आशय व अभिव्यक्ती या दोहोंचाही अंतर्भाव असतो. लेखकाचे व्यक्तीमत्त्व शैलीला जन्म देते. वाङःमयांतर्गत विविध घटकांना आकार देण्यात शैली महत्वाची भूमिका बजावते. शब्दातील तरलता व अलंकारिता शैलीच्या संदर्भात अत्यावश्यक बाबी ठरतात. हे मान्य करुनही लेखकाच्या जीवनानुभवातील तीव्रताच त्याच्या शैलीला घडवित असते. म्हणून शैलीचा विचार दोन अंगानी करता येतो. एक म्हणजे एखादी साहित्यकृती कलाकृती म्हणून समजून घेण्याच्या दृष्टीने आणि दुसरे म्हणजे भाषाशास्त्रीय पध्दतीने कोणतीही साहित्यकृती भाषेशिवाय समजू शकत नाही. शिवाय लेखकाचे व्यक्तिमत्त्व, भाषा व साहित्यकृतीतील घटनांच्या रचनाकौशल्यांचा परस्पर संबंध असल्यामुळे साहित्य शैली व भाषाशैली याच अंगानी अभ्यासकांनी विचार मांडलेला आहे. यामुळे भाषाशैली हा शब्दप्रयोग मराठी साहित्याच्या संदर्भात आपल्याकडे सरलपणे वापरला जातो. साहित्य शैलीचा साहित्यातील अभिव्यक्तीच्यासंदर्भात संबध असल्यामुळे आशय व रचनातंत्र यांचा परस्पर संबध येतो यामुळे साहित्य प्रकारानुरूप शैली प्रकटते.

'प्रगति आणि जिनविजय' मध्ये लिहिणाऱ्या जैन लेखिकांच्या साहित्याच्या संदर्भात विचार करता बरेचसे लेखन हे पारंपारिकतेचा बाज घेऊन आलेले आहे. काही तरी बोध देणे, सांगणे,

शिकवणे, तात्पर्य काढणे ही या लेखनामागची प्रेरणा असल्याचे जाणवते. कोल्हापूर, सांगली भागातील जास्तीत जास्त स्त्रियांच्या लेखनाचा सहभाग यात आपल्याला आढळतो. ग्रामिण भाग आणि धार्मिक संस्कार हे यात प्रामुख्याने आपल्याला पहायला मिळते. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेला आणि जैन समाजाचा जास्तीत जास्त वावर असणारा असा हा परिसर आहे आणि त्याचमुळे बऱ्यापैकी जैन कुटुंबामध्ये कन्नड बोलण्याची परंपरा आहे. या सगळयाचा परिणाम लेखिकेंच्या साहित्यावर झालेला आहे. ग्रामिण भागातून आणि धार्मिक कुटुंबातून या लेखिका आल्यामुळे तेथील जीवनानुभव त्यांच्या साहित्यातून आलेले आहे. 'ग्रामीण साहित्य-स्वरूप आणि शोध' या पुस्तकात डॉ. नागनाथ कोत्तपल्ले म्हणतात, 'ग्रामीण समाजाची एक वेगळी जीवन पध्दती बोलीभाषा येथे आढळते. या समाजातील पिढी जशी शिक्षित होत जाईल तसतशी या जीवनाची चित्रणे जीवन पार्श्व भूमीसह साहित्यात येणारच'.[२] डॉ. कोत्तापल्ले यांचे हे विधान जैन साहित्यातील भाषाशैलीला पूर्ण तः लागू पडणारे आहे. कारण जैन साहित्याची नाळ लेखक ज्या परिसरामध्ये राहतो-वावरतो त्या मातीशी जोडलेली असल्यामुळे त्या प्रदेशाच्या बोलीतूनच त्यांचे साहित्य साकार झाले आहे.

भाषेचा धागा व्यक्तीच्या समाज जीवनातील व्यवहाराशी समाजाच्या आचारविचारांशी, नीतिनियमांशी निगडीत असल्याकारणाने एखादया समाजाचा त्याच्या जातीजमातीअंतर्गत असलेल्या संस्कृतीचा, त्याच्या जीवनपध्दतीचा परिचय हा भाषेमुळेच होत असतो. म्हणून नुकत्याच शिकलेल्या जैन लेखिकांना स्वतःसह आपल्या समाजाला विचार देण्यासाठी, अभिव्यक्त करण्यासाठी भाषा हे प्रभावी माध्यम वाटलेले आहे. यामुळे जैन लेखिकांनी अविष्कारासाठी स्वसमाजाच्या बोली भाषेचा वापर जाणीवपूर्वक केला आहे. कारण समाज आणि भाषा यांचा अतूट संबंध आहे. ग्रामिण भागाचा विचार करता अनेक जातीजमातींची माणसे एकत्र राहूनही व्यक्तिगत पातळीवर त्यांचे आपापसांतील जीवनव्यवहार हे त्यांच्या बोलीतून चालवतात. त्यामुळे त्या त्या समाजाच्या बोलीचा घाट, दैनंदिनीतील शब्द, शब्द उच्चारणातील धाटणी व लय, वाक्यप्रचार, म्हणी प्रतिमासृष्टी इत्यांदींचा विचार त्या समाजाची बोली समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरतो. अनेकदा व्यक्तींचा व्यवसाय अथवा निर्माण झालेली विशिष्ट परिस्थितीही एखाद्या बोलीची घडण बदलू शकते. परंतु हा बदल त्या बोलीने स्वीकारलेले नवे शब्द हे मूळ बोलीची अथवा भाषेची समृदधी वाढविण्यासाठी फलदायी ठरतात. कारण ज्या भाषेतील शब्दसंचय अधिक ती भाषा अधिक सर्व समावेशक व समृदध असते.

जैन समाजातील भाषा समृदध असली तरी लेखिकेंच्या शब्दसामर्थ्याला मर्यादा असल्यासारखे वाटते. नुकत्याच शिकलेल्या व नुकत्याच लिहिणाऱ्या स्त्रियांचा भरणा 'प्रगती जिनविजय' मध्ये अधिक असल्याचे जाणवते. साहित्य शारदेला प्रसन्न करण्यासाठी असावी लागणारी समर्पित भावनेची उणीव इथे नक्कीच भरून राहते. पूजेसाठी फुले आणली, आरती झाली पण भावनेच्या भक्तीचा गंध दरवळलाच नाही. कदाचित परिमल पसरला असता तर मराठी साहित्याच्या प्रवाहामध्ये 'प्रगति जिनविजयच्या' लेखिकांनी मोलाची भर घातली असती. एका परिघात आपले सामर्थ्य बंदिस्थ केल्यामुळे भाषाशैलीच्या जेवढया खुणा लांबून का होईना खुणावल्यासारख्या वाटल्या त्याचा उहापोह करीत आहे.

## ६.२ भावनांचे प्रकटीकरण

नुकत्याच लिहायला आणि वाचायला शिकलेल्या लेखिकांच्या मनातील भावनांची कल्लोळे या 'प्रगति आणि जिनविजय' या नियतकालिकातून पाहायला मिळते. समाजात जे चाललेले आहे ते चांगले की वाईट याची नजर लेखिकांना आलेली दिसते. आणि आपल्या या भावना त्या मांडताना दिसतात.

वासंती शहा (२८ मे, १९८४)[३] 'अधिवेशनाच्या व्यासपीठावर काही सामाजिक प्रश्नांची चर्चा व्हावी.' या लेखामध्ये त्या म्हणतात, 'धर्म टिकवायचा असेल तर आधी समाज टिकवायला हवा. कित्येक ठिकाणी मंदिरे आहेत पण जैनांची घरे नाहीत असे का?'

बऱ्याच लेखनातून मनात उमटणारी भावना सहजपणे लेखनीमध्ये उतरलेली दिसते. 'क्षमावली' या लेखामध्ये (१५ सप्टेंबर, १९८६)[४] प. पू. आर्यिका १०५ भरतमती माताजी यांनी 'क्षमा मुखाने म्हणतो पण भाव गळयाखाली उतरत नाहीत. ह्दयात क्लेश, कपट ठेवून क्षमा मागून काय उपयोग?' असा सवाल केला आहे. बोलणे आणि वागणे यात अंतर असणाऱ्या लोकांबद्दलही चपराक काही लेखिकांनी दिलेली आहे. तीन दिवसांच्या लग्नाच्या गोंधळापेक्षा एका दिवसात लग्न करणे चांगले असे मत कु,. शकुंतला बोबडे यांनी 'एका दिवसात लग्न' (१६ जुलै, १९३५)[५] या लेखात मांडलेले आहे. लग्नातल्या मानपानावरही त्यांनी टिका केली आहे.

'एक्का म्हणजे एक बिंदु... आपला आत्मा, तो स्वतंत्र आहे. एकटाच आहे. कर्मही एकटाच करतो. त्याचे फलही एकटाच भोगतो. इस्पिक, किलवर, बदाम, चौकट म्हणजे संसार

भ्रमणातील चार भव वैगेरे' हा लेख सौ. सुवर्णा धनपाल हावळे यांनी 'पत्त्याच्या पानात अध्यात्मज्ञान' (७ जुलै १९९२)[६] मध्ये लिहिलेला आहे. अफलातून अध्यात्माचे ज्ञान त्यांनी मांडले आहे. 'दुधात जसे दही तसे प्रत्येक शरीरात ज्ञानी आत्मा असतो.' हा विचार पुढच्या लेखामध्ये त्यांनी मांडलेला आहे.

'खानदेशातील चांदबिबी' म्हटल्याचा आपला राग व्यक्त केलेल्या सरस्वतीबाईंना (६ ऑगष्ट, १९३३)[७] सुधाताई म्हणतात, 'चांदबिबीचा मुलूख' वाचून विंचवाने नांगी मारल्यासाखं झालय, पण सरस्वतीबाई पुरुषी वळणावर गेलात अगदी, समाजसेवेत एकमेकांना काय शिव्या द्यायच्या असतात?'

'बाई रडता रडता निजली |
साखर तुपात भिजली ||
बाळ खेळता खेळता गेले दूर |
हाती खारीक खोबऱ्याचे झाले चूर ||

या जात्यावरच्या गाण्याच्या ओळी 'मातेचे संस्कार' या लेखात सुभद्राबाई अमरावती यांनी मांडल्या आहेत. रजोदर्शन हा स्त्रीचा स्वाभाविक शरीरधर्म त्यासाठी तिला चार चौघात कशासाठी मिरवायचे? असा प्रश्न गोंदूबाई उपाध्ये यांनी 'हे बंद व्हायला पाहिजे' (२५ डिसेंबर, १९३४)[८] या लेखात सांगितले आहे. स्त्रीच्या वस्तूरूपावर भाष्य करताना 'आजचे स्त्री जीवन' (२९ जानेवारी, १९४१)[९] हा लेख चंचलाबाईंनी लिहिला आहे.

स्त्री आणि तिचे चारित्र्य हे समाजासाठी खूप महत्त्वाचे असते. यावर वासंती शहा, पुणे यांनी ' जैन धर्म संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान' (५ सप्टेंबर, १९८३)[१०] या लेखात ते लिहितात, 'भारतीय स्त्री, शील, विनय, लज्जा इ. गुणांचे प्रतिक बनून राहिली आहे.' हे सांगताना जैन धर्माची भूमिका बदलते. युग मनुस्मृतीचा प्रभाव जैनांचे रामायण अशा मुद्यांना घेऊन त्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

## ६.३ ताजेपणा

ताजेपणा हा जगण्यातला जिवंतपणा दाखवतो. भाषेमध्ये सुध्दा जिवंतपणा टिकवायचा असेल तर त्यात ताजेपणा असावा लागतो. देवळातल्या पुजेसाठी ताजी फुले लागतात. जेवणाच्या चवीसाठी ताजा स्वयंपाक लागतो. सृष्टीतील चैतन्य जाणवण्यासाठी ताजेपणाचा टवटवीत फुलोरा निसर्गात भरून आणि भारून राहिलेला असतो. भाषेमध्ये सुध्दा पावित्र्य जपण्यासाठी, खमंग चवीसाठी आणि टवटवीतपणा बहरण्यासाठी ताजेपणाची नितांत गरज असते. कमी फरकानी का असेना काही लेखिकांनी हा ताजेपणा टिकवण्याचा प्रयत्न जरूर केलेला आहे.

धर्माचा पगडा जैन स्त्रियांच्यावर जास्त होता. तरीही सामाजिक चळवळीचा परिणाम काही विचारवंतांवर झालेला दिसून येतो. यात लक्ष्मीबाई पाटील यांचे नाव घ्यावे लागेल. स्वतःच्या अनुभवावर आधारित 'सोने' (६नोव्हेंबर, १९३४)[११] हा लेख त्यांनी लिहिला आहे. दसऱ्याच्या दिवशी पाच सहा मुले येऊन जरा लांबच राहून 'सोनं घ्याजी' म्हणाली. आप्पा म्हणाले, 'सोने पुढे येऊन द्या' आप्पांच्या गांधीभक्त मित्राला ते आवडले नाही. त्याची कानउघाडणी करताना आप्पांनी 'गांधीभक्त म्हणविणाऱ्यांनी तरी असे उद्‌गार काढू नयेत,' हे सांगितले.

'एका दिवसात लग्न' या लेखात (१६ जुलै १९३५)[१२] कु. शकुंतला बोवडे यांनी लग्न या संस्थेवर ताषेरे ओढले आहेत. त्या काळामध्ये पाच दिवस लग्न चालायचे. वेळ, पैसा, मनुष्य बळाचा अपव्यय या गोष्टींवरील भाष्य अतिशय वेधकपणे मांडलेले आहे.

पंचकल्याणिक पूजा आणि त्यामधील ५६ राजे हा नेहमीच चर्चिला जाणारा विषय. या विषयावर अतिशय पोटतिडकीने नीलम माणगावे (१६ नोव्हेंबर, २००१)[१३] यांनी आपले विचार मांडले आहेत. जैन समाजामध्ये पंचकल्याणिक पूजा मोठया धामधूमित होतात. तिर्थंकरांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंतच्या घटना या पूजेत मोठया धामधूमित मांडल्या जातात. त्यातीलच एक प्रसंग राज्याभिषेकाचा असतो. या राज्याभिषेकाच्या वेळी ५६ देशांचे राजे (पुरुष) असतात. पण एका पूजेमध्ये सम्राट राजांना नजराणा देण्यासाठी एक मुलगी उठते. तेंव्हा सूत्रधार निवेदनामध्ये म्हणतात, 'अमूक देशाचे राजे परगावी गेले आहेत म्हणून त्यांनी आपल्या राजकन्येला महावीरांच्या दरबारात पाठविले आहे.' या वक्तव्याबद्दल लेखिका नाराजी व्यक्त करते. ही नाराजी इतकी जिवंत आहे की त्यावर बऱ्याच महिलांनी प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत.

सौ. चंचलाबाई रावसाहेब शहा यांनी 'क्षमा, दया व शांती' नावाचा लेख २६ ऑक्टोबर, १९५९ च्या अंकात लिहिलेला आहे. पर्युषण पर्वाची सुरुवात झालेली आहे. क्षमा, दया व शांती या तिघींनी भारतात दौरा काढला आहे. ही कल्पना योजून लेख लिहिलेला आहे. दिल्लीला गेल्यानंतर क्षमा भाषण करते... त्या भाषणातून क्षमा, दया शांतिचे महत्व सांगितले आहे. लिखाणातील कल्पकता नाविण्यपूर्ण आहे.

(२१ मे १९६२)[१४] च्या अंकामध्ये, 'ॐ परमात्मने' या लेखात श्रीमतीबाई गरगट्टे यांनी आपले विचार काव्यमय भाषेत मांडले आहेत. हे आत्मन् परमात्म्याच्या सान्निध्यात सदैव असूनही त्याचे तुला दर्शनही होत नाही ही खेदाची गोष्ट आहे. आपली विकारमय दृष्टी बदलून अंतर्मुख होऊन मंगल परमानंद परंज्योत परमात्त्म्याकडे परम शुध्द सुबध्द अखंड दृष्टी लाव आणि परम शाश्वत सुखी हो|' भाषाशैली, मांडणी इतकी सुंदर आहे की, कर्नाटकातील लेखिका छान मराठी लिहू शकतात याचे आश्चर्य वाटते.

संवादातून कथानक मांडण्याचा प्रयत्न बऱ्याच लेखिकांनी केलेला आहे. साधी सोपी सुटसुटीत अशी भाषाशैली 'प्रेमसन्यास' (२० ऑक्टोबर, १९३४)[१५] या कथेची आहे. सुगंधाबाई वाकिकार जैन यांची ही कथा आहे.

ललित अंगांनी लिहिलेली 'माझे स्वप्न' हे कथानक भाषेतील टवटवीतपणा टिकवून ठेवणारे आहे. (१२ फेब्रुवारी, १९३५)[१६] सौ. सुलोचना भोकरे यांनी ही कथा लिहिलेली आहे. निवेदिका रामटेकच्या यात्रेस निघालेली आहे. तिला वनदेवी भेटते. ती वनदेवीला म्हणते, 'बाई तुमच्या राज्यातील आनंदलाभास मी फार उत्सुक आहे. मला आत घ्याल काय?' वनदेवी म्हणते, 'का नाही?' वनदेवी तिला आत घेते. पुष्पलता, फलवृक्ष, वने, उपवने वैगेरे दाखवते शेवटी पाण्यात डुंबणार एवढयात जाग येते. पायावर काहीतरी ओझे जाणवते. स्वप्न आणि वास्तव यांचा सुरेख मेळ घातलेला आहे.

'तक्रार' नावाचे रुपक सौ. चंद्राबाई क. पाटील (२० ऑगष्ट, १९५६)[१७] यांनी खूप सुंदर रितीने लिहिलेले आहे. उद्योग आणि आळस यांच्यामधले हे रुपक आहे. उद्योग तक्रार करतो की, 'सूर्य आळशी आहे. तो लवकर उठत नाही त्यामुळे मला कामाला जाण्यासाठी त्याची वाट पहावी

लागते.' आळसही तक्रार करतो की, 'सूर्य फार गडबडी आहे. मी उठायच्या आधीच तो आपले दार उघडतो.'

म्हणजे सूर्य आहे तसाच असतो. उद्योग आणि आळस त्यांच्या त्यांच्या प्रवृत्तीप्रमाणे सूर्याला पाहतात. भाषेतील ताजेपणा जाणवत राहतो.

## ६.४ चित्रमयता

भाषेचा संबंध समाजजीवनाशी असल्यामुळे एखाद्या समाजाचे जीवनव्यवहार, जीवनपध्दती, आचार-विचार, संस्कृती, विविध संकेताची उकल भाषा करीत असते. 'प्रगती आणि जिनविजय' यातील लेखिकांची भाषा ही स्वतःची अशी साधी साजशृंगार लेऊन आलेली भाषा आहे. जितके जमेल तितके चांगले लिहिण्याचा त्यांचा प्रयत्न खूपच कौतुकास्पद स्वरुपाचा आहे. वाचत असताना भाषेचा चित्रपट डोळयासमोर तरळत ठेवण्याचे कौशल्य काही लेखिकेंनी अल्पप्रमाणात का होईना साध्य केलेले आहे. परंपरागत पिढीत पिचलेली स्त्री स्वतःचे आत्मभान ठेवू पाहत आहे हेच 'प्रगति आणि जिनविजय' या पत्रिकेचे यश आहे.

'देहार्पण' ही कथा स्त्रियांची समर्पणाची प्रवृत्ती दाखवणारी आहे. सौ सुलोचना भोकरे यांनी (२३ एप्रिल, १९४१)[१८] च्या अंकामध्ये ही कथा लिहिलेली आहे. कुंदा या समर्पित स्त्रीची मैत्रिण इथे निवेदिका आहे. कुंदा बाळंतपणात आजारी पडते. तिच्यावर प्रेम करणारा तिचा नवरा तिची खूप सेवा करतो. ती संकोचते. डॉक्टरांनी लगेच मूल नको, थोडे दिवस माहेरी जा असे सांगितलेले असते. पतीने एवढी सेवा केली आपण त्याला काय दिले असा विचार ती करते. तिला वाईट वाटते व शेवटी पती नको म्हणत असताना स्वतःला समर्पित करते. पुन्हा दिवस जातात. त्यात ती मरते. हे सर्व निवेदीकेला कुंदाने पाठविलेल्या पत्राने समजते आपल्या वागण्याचे समर्थन तिने केलेले आहे. पती उदार वृत्तीने वागेल तर त्याच्या दुप्पट मोबदला पत्नी निस्वार्थपणे देऊ शकते, हे जगाला कळू दे' कुठल्याही परिस्थितीत पतिला शरीरसुख देणं हे आपले कर्तव्य आहे स्त्रियांची ही मानसिकता या कथेतून स्पष्ट झाल्याचे जाणवते.

स्वातंत्र्याच्यापूर्वी अशी अभावाने आढळणारी चित्रमय भाषा स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र बहरलेली दिसते.

मोहाचा त्याग करण्याचा संदेश देणारी 'मोह' ही कथा सुवर्णा सकळे, अंकलखोप (२जून, १९८०)[१९] यांची आहे. घराघरामध्ये घडणारी ही कथा आहे. सासूचे सुनेबरोबर कधीच पटत नाही. सासू मुलाला रागाने म्हणते, 'मला पेटवून टाक' खरोखर तो तिला नदीवर नेतो सरणावर ठेवतो आणि विसरलेली काडीपेटी आणायला घरी जातो. चलाखीने सरणावरून सासू उठते. त्या सरणामध्ये भोपळा ठेवते. सरण पेटवल्यावर भोपळा फुटतो. मुलाला वाटते आई मरते. नंतरचे कथानक पूर्ण वाचल्याशिवाय रहावत नाही. सासूला नशिबाची साथ मिळते. सून मोहात अडकते. आणि सरते शेवटी मरते. चित्रमय भाषा असणारी 'त्याग' नावाची सौ. सुनंदा आवटे यांची कथा (११ जानेवारी, १९८८)[२०] खूप सुंदर आहे.

'सद्भावना' ही सुवर्णा पाटील यांची कथा (११ जून, १९९१)[२१] मानवी जीवनावर भाष्य करणारी आहे. तीन दिवसांनी आहार करणाऱ्या व तीनच प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या साधूकडे लग्न न जमणाऱ्या तरुणाला (निर्मलकुमार) त्याची आई पाठवते. जंगलातून जाताना तो रात्री एका म्हातारीकडे राहतो. सकाळी जाताना म्हातारी म्हणते, ' माझी मुलगी मुकी आहे. तिचे लग्न जमेना, तेही साधूंना विचारून ये' वाटेत माळी आणि एक ऋषी भेटतो. तेही आपले काम त्याला सांगतात. एकूण कामे झाली चार आणि साधू तीनच प्रश्नाची उत्तरे देणार. तो विचारात पडतो. स्वतःचा प्रश्न बाजूला ठेवतो...म्हातारी, माळी, ऋषी यांच्या प्रश्नांची उत्तरे साधू सांगतात. माळी आणि ऋषी त्याला धन दिले. मुक्या मुलीबरोबर लग्न होते. ती बोलू लागते. कथाच इतकी बोलकी आहे की सगळे कथानक समोर घडल्यासारखे वाटते.

राजाराम कॉलेजमध्ये प्रोफेसर असलेल्या सौ. कांचन कापसे हया एन.सी.सी. च्या पॅराशूट जंपींग कोर्ससाठी दिल्लीला गेल्या होत्या.त्याच्यावर आधारित 'पॅराशूट जंपिंग एक थरारक अनुभव' हा त्यांचा लेख (१४ फेब्रुवारी, १९८५)[२२] च्या अंकात प्रसिदध झाला. ४००० फुटावरून खालचं दिसणारं दृष्य... विमानातून खाली उडी मारल्याचा तो क्षण .... पॅराशूट उघडेपर्यंतची प्राणांतिक धडधड... वाऱ्याचा तडाखा... बधिरलेला मेंदू... पोटातील भीती... वगैरेचा थरार जसाच्या तसा त्यांनी शब्दातून मांडलेला आहे. वाचकांनाही तो थरार अनुभवता यावा एवढे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे.

नेमचंद शहा (दादा) यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रदर्शी वर्णन विद्युलता शहा यांनी (०८ फेबुवारी, १९६०)[२३] च्या अंकात केले आहे. दादांना वाचकांसमोर उभं करण्याचं सामर्थ्य त्यांच्या शब्दात आहे. चॉकलेटी लांब गुडघ्यापर्यंत कोट, रेघाळ शर्ट, मळकट धोतर, डोक्याला पिवळा फेटा, बगलेत जाडजुड पुस्तक घेतलेली प्रशस्त पण कणखर शरीर प्रकृतीची... आपल्या तंद्रित विचारमग्न असलेली मंदिरातून तुरू तुरू धावणारी गौर काया व्यक्ती कोण? तर दादा!' संपूर्ण दादा उभे करण्याची ताकद शहा यांच्या लेखनित दिसून येते.

## ६.५ परिणामकारकता

माणूस वाचतो आणि मग विचार करतो. भाषेची ही ताकद परिणामकारकता म्हणून आपल्यासमोर येते. भाषेचा परिणाम हा व्यक्तीच्या विचारावर जसा होतो तसा वागण्या बोलण्यावरही होतो. 'प्रगति आणि जिनविजय' मधील भाषा जैन समाजावर परिणाम करणारी ठरलेली आहे.

जन्माला येणारा प्रत्येक माणूस जगत असतो. मरेपर्यंत जगणे... मरण येत नाही म्हणून जगणे आणि जीवनाचा आस्वाद घेत जगणे यात फरक आहे. हा जीवनाचा आस्वाद कसा घ्यायचा हे सौ. प्रेमलता गुंडे यांनी 'जीवन जगण्याची कला' (२ डिसेंबर, १९८५)[२४] या लेखामध्ये सांगितली आहे.

स्पष्ट, परखड विचार मांडणाऱ्या, भीडभाड न ठेवता आपल्या योग्य मुद्यांशी ठाम राहणाऱ्या, अन्यायाविरूद्ध झगडणाऱ्या आणि विशेषतः मुनीच्या शिथिलाचारासंबंधी स्पष्टपणे मते मांडणाऱ्या धाडसी लेखिका म्हणून प्रा. सौ. लीलावती जैन यांचे नाव घ्यावे लागेल. 'समाज प्रबोधनाची दिशा' या सदरामध्ये त्यांनी आता सुवुध्द, सुजाण, श्रावकाचाराची गरज आहे. असा लेख लिहिलेल्या (१३ ऑगष्ट, १९८४)[२५] लेखात उच्च कोटीतले आचार्य, विचारी मुनी, शिथिलाचरी मुनी आणि अविचारी मुनी असे मुनींचे चार प्रकारात विवेचन करून समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न केले आहेत. अतिशय परिणामकारक असा लेख आहे.

शिक्षणाने माणूस शिक्षित होतो. साक्षर होतो. पण तो सुशिक्षित होतोच असे नाही. सुशिक्षित स्त्री कोणाला म्हणायचे यावर भाष्य सौ. अनुराधा गडेण्णावर (४ एप्रिल,

१९८८)[२६] यांनी केले आहे. 'खरी सुशिक्षित स्त्री कोण?' हा त्यांचा विचार करायला लावणारा लेख आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दहा पंधरा वर्ष अगोदर स्त्रियांना नवे भान आल्याचे जाणवते. स्त्रीजीवनावर सतत विचार मंथन होत असल्यामुळे त्यांच्या एकूणच जीवनात आणि व्यक्तीमत्त्वात बदल होऊ लागल्याचे लक्षात येते. नातेसंबधांकडे नव्याने बघण्याची दृष्टिही आल्याचे जाणवते. त्यामुळे प्रभावी भाषाशैलीचा परिणामकारक वापर... काही लेखिकांनी 'प्रगति आणि जिनविजय' मध्ये केलेला आहे. सहसंपादिका निलम माणगावे सौ सुनेत्रा नकाते, डॉ तारा भवाळकर, सुमन चौधरी इ. चा उल्लेख करावा लागेल.

## ६.६ लयबद्धता

स्त्रियांनी स्त्रीविषयक केलले हे लेखन मनाच्या आंतरिक तळमळीतून आलेले आहे. हे आवर्जून नमूद करावेसे वाटले. स्त्री समस्या उलगडून दाखविताना, स्त्री प्रश्नांना थेट भिडून त्यांनी हे लेखन प्रामाणिकपणे केलेले आहे. लेखनाची गुणवत्ता, भाषिक समृद्धी, उच्च अभिव्यक्तीचे निकष इथे लावताच येणार नाहीत. पण तरीसुद्धा भाषाशैली अभ्यासताना काही लेखिकांनी कमी प्रमाणात का असेना लयबद्ध लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'मातेचे संस्कार' (३ ऑक्टोबर, १९३३)[२७] हा सुभद्राबाई अमरावती यांचा लेख... याच लेखामध्ये 'बाई रडता रडता निजली | साखर तुपात भिजली || बाळ खेळता खेळता गेले दूर ||हाती खारीक खोबऱ्याचे झाले चूर || या जात्यावरच्या ओळी सांगताना वीरत्वाचे संस्कार केले आहेत.

'ॐ परमात्मने' (२१ मे, १९६२)[२८] च्या लेखात श्रीमतीबाई गरगट्टे यांनी आध्यात्मिक भाषेला लयबद्ध केले आहे. आत्म्याला उद्देशून ते म्हणतात, 'हे आत्मन्, परमात्म्याच्या सान्निध्यात सदैव असूनही त्याचे तुला दर्शन नाही ही खेदाची गोष्ट आहे. आपली विकारमय दृष्टी बदलून, अंतर्मुख होऊन मंगल परमानंद परंज्योत परमात्म्याकडे परम शुध्द सुबुद्ध अखंड दृष्टी लावं आणि परम शाश्वत सुखी हो | त्यांची भाषा ठेक्याचा लय पकडून ठेवते. त्यांच्यासारखीच भाषा ही सौ. सरस्वतीबाई बाबूराव देसूरकर वडगाव (बेळगाव) यांची आहे. 'अहिंसा हा परमेश्वरी संकेत' (३ सप्टेंबर, १९६२)[२९] या लेखामध्ये सुबक मुद्देसूद मांडणी करून जगा व जगू द्या चे विश्लेषण खूप सुंदर रीतीने केले आहे.

कु. विद्युलता शहा यांनी 'जैन धर्माचा एकात्मता संदेश' वर मौलीक विचार मांडले आहेत. (२० मार्च १९९०)[३०] एकात्म संदेश म्हणजे आपल्या दैनंदिन मनाच्या चिंतनाची सरलता|, वचनाच्या उच्चारातली एकता|, आणि शरीराच्या क्रियेमध्ये सहजता ठेवणे होय. धर्माचे ज्ञान पण भाषेमध्ये सहजता, सजगता आणते.

जैन स्त्रियांनी वेगवेगळया विषयात लेखन केले. पण स्त्री-पुरूष समानता हा विचार सामाजिक जीवनात, प्रत्यक्ष जगण्यात उतरले नसल्याने या विषयावर स्त्रियांनी पुन्हा पुन्हा लेखन केले.

(२१ मे, १९६२)[३१] कु. सुनंदा मालगावे यांनी 'आई आई आई' या लेखात आईवर भाष्य केले आहे. आईची थोरवी गाईली आहे.

'स्त्री ची महान योग्यता' (१४ जुलै, १९६९)[३२] सांगताना डॉ. सौ. विजयालक्ष्मी पांगळ म्हणतात, 'स्त्री ही परमेश्वराची मूर्ती असून विश्वातले प्रेम, मांगल्य, कोमलता, सौदर्य, पावित्र्य तिच्याजवळ आहे.'

साधी, सोपी, सुटसुटीत भाषाशैली म्हणून 'प्रेमसंन्यास' कथेकडे पाहता येईल (२ ऑक्टोबर, १९३४) सुलोचना भोकरे यांचे 'माझे स्वप्न' (१२ फेब्रुवारी, १९३५)[३३] नावाची कथा ललित अंगानी लिहिल्यामुळे वाचनीय झाले आहे. नदीच्या प्रवाहाची खळखळणारी भाषा या लिखाणात दिसून येते.

**६.७ भावमय भक्तिरस**

जैन स्त्रियांनी पारंपारिकतेचा बाज घेऊन कथा लिहिल्या. पण कविता मात्र मोकळेपणानी आणि प्रभावीपणे मांडल्या धार्मिकतेचे वर्तुळ सोडून या कविता बाहेर पडू शकत नाहीत. याचे कारण समाजावर धर्माचा पगडा प्रचंड आहे. जी स्त्री, जे कुटुंब धार्मिक क्रियाकांड करते ती चांगली असा समाजात एक भ्रम आहे. त्याचाच हा परिणाम असावा.

क्षणभंगुर जीवनाचा अमूर्त संदेश 'करूण दृश्य' (३ ऑगष्ट, १९३२)[३४] या कवितेत कु. सुलोचना उपाध्ये यांनी मांडला आहे. अंथरूणावर असणारा मुलगा त्याच्या वेदनेनी विव्हळणारी आई , शेवटपर्यंत आधार देणारा मुलगा... करूणरसात ओथंबलेली आणि ताल, लय, सूर लेवून आलेली ही कविता मनाला भावते.

भावपूर्ण ओळींनी मनाच्या हृदयाचा तळ भगवंताना समर्पित करणाऱ्या शब्दरचना अधिक प्रमाणात जैन कवयत्रिंच्या कवितेत सापडते. स्त्रियांची घुसमट पूर्वीच्या काळी लोकगीतातून बाहेर पडली. जे कुठं बोलता येत नाही. कुणाला सांगता येत नाही ते त्या स्त्रिया उखळाला, मुसळाला, जात्याला, रहाटाला सांगायच्या. दूध उतू जाते तसे मन मोकळे करायच्या. जैन स्त्रियांनी आपले मन 'प्रगतिच्या' अंकातून मोकळे केलेले दिसते.

'व्यर्थ किती पैसा जातो, पूजेचा अविनय होतो'. असे सांगत कु. सुलोचना उपाध्ये (१५ सप्टेंबर, १९३२)[३५] यांनी 'स्तवनिधी क्षेत्रास पाहून ही कविता लिहिली. क्षेत्र महात्म्य मोठं आणि ते राखायला हवं हे सांगणाऱ्या सुलोचनाबाई 'कोणा थोराला फुल देऊ?' (०१ ऑक्टोबर, १९३२)[३६] असे कवितेतून विचारतात. पुढच्या अंकामध्ये 'कवि देवेंद्रतनम' यांनी याला उत्तर दिले आहे.

'ऐसा काय विचार घोर पडला पुष्पास अर्पावया
नाही काय सुयोग्य थोर दिसला सप्रेम ते घ्यावया

जीवन क्षणभंगुर आहे. कधीही काहीही होऊ शकते... कुणी कुणाचे नाहीत ही सांगणारी 'जीवनसार' कविता सौ. रत्नाबाई गुणधरराव वणकुद्रे (१५ जुन १९५३)[३७] यांनी लिहिली. शब्दांचे सामर्थ्य रत्नाबाईंच्या लेखणीतून दिसून येते. श्रीमतीबाई गरगट्टे यांनी शांतीसागर निर्वाणानंतर 'शांतिसागर मुनिवदी' म्हणून कविता लिहिली. शांतीसागर महाराजांच्यावरती असीम श्रदधा, भक्ती त्यांच्या कवितेत दिसते.

बहिणीला भाऊ एक तरी असावा
पावलीचा खण एक रात्रीचा विसावा
भाऊ ग म्हणती आल्या नणंदा लुटाया
आई बापाच्या राज्यात खाल्या दुधावरच्या सायी
भावजयाच्या राज्यात ताक घेण्याची सत्ता नाही

'स्त्री विषयक गीत' (१४ डिसेंबर, १९५९)[३९] एक अर्थपूर्ण गीत म्हणून याकडे बघता येई ल. कविता आहे पण कविता लिहिणाऱ्याचे नाव नाही. शब्दांचा ठसठशीतपणा अर्थाच्या सामर्थ्या सह इथे प्रकट होताना दिसते. नात्यांचा पोकळपणा ... मुलीला माहेर कस परकं होतं याच वास्तव दर्शन या कवितेतून दिसते.

'मिटले एक जीवनपुष्प' ही कविता कु. शुभदा गुंडे, सांगली यांनी इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर लिहिली. मनाला भिडणारी ही कविता आहे.

"वाऱ्याचा मुक्तपणा आज दबकून चालला होता

नभातील मेघांचा वेग, स्तब्ध झाला होता"

शेवटी त्या म्हणतात,

"उमललेले एक जीवनपुष्प अमरतेच्या बागेमध्ये

मिटले एक जीवनपुष्प दुर्बल वेडाच्या नशेमध्ये"

श्री नवलबाई दामोदर शहा यांची 'मला काही सांगायचे आहे' ही कविता स्वतःची जाणीव निर्माण करणारी आहे. (२८ जानेवारी, १९८५)[४०] समाजाला तिने सवाल केलेला आहे 'तुमच्याच भावनांना जिंदगीसारखं जपून किती दिवस ठेवायच?' तिच्या आतल्या वेदना यातना दिसतात. मनातला भाव कागदावर मनाची शक्ती घेऊन उतरताना दिसतो. हे सगळं बदलाव अशी तिची इच्छा आहे. म्हणूनच ती म्हणते, 'मरगळलेलं शरीर, मरगळलेलं मन झटकून टाकायच आहे, मला काही सांगायचं आहे'.

मानवी मन भावना जिवंत करणारी, जगण्यावर भक्ती करणारी ही कविता आहे. 'जोहड' च्या लेखिका सुरेखा शहा (१९ नोव्हेंबर, २००१)[४१] यांनी, 'स्त्री तुझ्या शक्तीमधून' ही कविता लिहिली आहे. आशावादी दृष्टिकोन या कवितेत असून स्त्री शक्तीला आव्हान देणारी ही कविता आहे.

सगळयाच कविता भावमय आहेत. कधी भगवंताच्या भक्तीत तर कधी आपल्या आजूबाजूच्या व्यक्तीत, कधी कर्तृत्वाच्या शक्तीत तर कधी वास्तवाच्या जगण्यात हा भक्तीरस ओथंबून वाहिला आहे. मनाला हूरहूर लावणारी अस्वस्थ करणारी कौटुंबिक जिव्हाळयाची उत्कट कविता श्रद्धांजली रुपात सौ. रुपाली पाटील (११ ऑक्टोबर, २००२)[४२] यांनी लिहिलेली आहे. अपघाती मृत्यूनंतर आपल्याच माणसांना बसलेला जबरदस्त मानसिक धक्का यातल्या शब्दाशब्दांतून अश्रू ओघळवतो.

'वाट पहात बसल्या होत्या काकू सांजसमयी उंबरठयावर

पण अचानक न सांगता गाडी का थांबली दूरवर?'

## ६.८ कन्नड भाषेचा प्रभाव

जैन समाज हा मुळातच संख्येने अल्प असल्यामुळे त्याला अल्पसंख्यांचा दर्जा दिलेला आहे. हा समाज संपूर्ण भारतभर विखुरलेला आहे. त्यामुळे त्या त्या भागाचा, परिसराचा परिणाम जैन बोली भाषेवर झालेला आहे. 'प्रगति आणि जिनविजय' हा अंक सांगली, कोल्हापूर भागातल्या परिसरातला आहे. इथला बराचसा जैन समाज हा पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक भागात पसरलेला आहे. विविध भागात राहून सुद्धा या समाजात धार्मिक रुढी-परंपरा, रीतिरिवाज हे एकाच पध्दतीने केले जातात. लेखन वाचन शिक्षण हे महाराष्ट्रात रहात असल्यामुळे मराठी भाषेतच केले जातात. पण या परिसरात बऱ्यापैकी जैन कुटुंबात बोली भाषा म्हणून कन्नड भाषेचाच वापर केला जातो. बोलताना कानडी आणि लिहिताना मराठी याचा परिणाम जैन मराठी भाषेवर निश्चितच झालेला आहे. त्यामुळे या मराठी भाषेला 'बेळगावी मराठी' किंवा 'जैनांची मराठी' असेही म्हणतात.

कितीतरी कन्नड शब्द हे जैन मराठी भाषेमध्ये विराजमान झालेले आहेत. 'नवदा भाक्तिने आहार कुडतु' हे सहजपणे महाराजांच्या (जैनमुनी) चौका (आहार) वेळी म्हटले जाते. कुडतु हा कन्नड शब्द आहे. कुडतो म्हणजे देतो होय. असे बरेचसे कन्नड शब्द ओघाने आलेले आहेत. धर्माशी संबंधीत बरेच लेखन असल्यामुळे महाराजजी, गंधोदक, बस्ती, पडघावणे, चरणोदक, पळी, चौका, मुनिवदी, इ. असे शब्द सहजपणे आलेले आहेत. श्रीमतीबाई गरगट्टे यांच्या कवितेचे शीर्ष कच 'शांतीसागर मुनिवदी' असे आहे. मुनिवदी म्हणजे 'मुनीवर' असा मराठी अर्थ होतो. कन्नड भाषेचा प्रभाव असल्यामुळे स्त्रिलिंगी लिहीण्याऐवजी 'लिहितो.. खातो.. पितो... जातो असे सहजपणे लिहिले गेले आहे.

इथे आपल्याला लक्षात येते कानडी भाषेशी मराठीचा संपर्क आल्याने त्या भाषेतील काही शब्द उच्चारात बदल होऊन मराठीत रूढ झाले आहेत. उदा. बेलगाम. हे गाव पण आपण मराठीत सहजपणे बेळगाव म्हणतो. खड्डा, अप्पा, आड, अण्णा, अडकिता, इ. अनेक कन्नड शब्द उच्चारातील भेदासहीत मराठीत स्थिरावले आहेत.

लिखाणातील भाषेत जसा कन्नडचा प्रभाव जाणवतो. त्यापेक्षा अधिक कानडी प्रभाव हा जैन लोकांच्या बोलण्यात जाणवतो. 'न' चा उच्चार 'ण' असा सर्रास केला जातो.

## ६.९ निष्कर्ष

१) सन १९२२ ते २००२ एवढया प्रदीर्घ वर्षाच्या काळातील स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्यविषयक लेखनाचा अभ्यास करताना जाणवले कि यातल्या लेखिकांना स्वत्त्वाची जाणीव होऊ लागली आहे. चांगले वाईट पारखण्याची नजर आलेली आहे. मला जे काही थोड फार समजलेले आहे ते मी दुसऱ्यांना पटवून देवू शकते हा आत्मविश्वास येऊ लागलेला आहे. यातून त्यांनी जो लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे तो चांगलाच आहे, स्तुत्य आहे.

२) बरेचसे लिखाण हे पारंपारिकतेचा बाज घेऊनच आलेले आहे. काही तरी बोध देणे, सांगणे, शिकवणे, तात्पर्य काढणे, ही या लेखन प्रकियेची प्रेरणा असल्याचे जाणवते.

३) साहित्य वाचल्यावर लेखिकांच्या शब्दसामर्थ्याला गगन भरारी मारण्यासाठीच्या मर्यादा पावलोपावली जाणवतात. नुकत्याच लिहिणाऱ्या, वाचणाऱ्या लेखिकांचा भरणा अधिक आहे. भावनांचे प्रकटीकरण करण्यासाठी जैन लेखिकांना 'प्रगति आणि जिनविजय' हे व्यासपीठ मिळाले. साधी, सोपी, सुटसुटीत अशी भाषाशैली यातील लेखिकांची आहे.

४) संवादातून कथानक मांडण्याचा प्रयत्न बऱ्याच लेखिकांनी केलेला आहे. परंपरागत पिढीत पिचून, दडपून गेलेली ही स्त्री स्वतःच आत्मभान ठेवून, घराचा उंबरठा ओलांडून जितके जमेल तितके चांगले लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्त्रियांचे चौफेर वाचन कमी पडते. त्यांचे विचार हे समाजापर्यंत पोहचले हेच त्यांच्या लिखाणाचे मोठे यश आहे.

५) विसाव्या शतकाच्या शेवटच्या दहा पंधरा वर्ष अगोदर स्त्रियांना नव्या जाणीवा, नवे भान आल्याचे लक्षात येते. स्त्री जीवनावर सतत विचार मंथन होत असल्यामुळे त्यांच्या एकूणच जीवनात आणि व्यक्तिमत्त्वात बदल होऊ लागल्याचे लक्षात येते. बदलणारा समाज, बदलणारी पिढी आणि त्यामुळे बदलत जाणारे नातेसंबंध याकडे प्रगल्भ होऊन बघण्याची नजर त्यांना आलेली आहे. त्यामुळे काही लेखिकांनी प्रभावीपणे, परिणामकारकपणे, लेखनातील आपली दमदार पाऊले 'प्रगति आणि जिनविजय' मध्ये उमटवलेली आहेत. सहसंपादिका निलम माणगावे, तारा भवाळकर, सौ सुनेत्रा नकाते, सुमन चौधरी इ. नावे अभिमानाने घ्यावी लागतील.

स्त्रियांनी केलेले हे लेखन आंतरिक उर्मीतून आलेले आहे. स्त्री विषयक, शिक्षणविषयक, आरोग्य, गृहिणी, संगोपन, समाज यावर चौफेर लेखन झालेले आहे. लेखनाची गुणवत्ता, भाषिक

समृद्धी, उच्च अभिव्यक्ती हे निकष इथे लावताच येणार नाहीत. पण कौतुकास्पद जाणीवा, कौतुकास्पद लेखन असे मी नक्की म्हणेन.

## ६.१० संदर्भ टीपा


१) प्रा. रा.ग. जाधव पुणे, 'वाङ्मयीन निबंधलेखन', १९७७, पृ.९४

२) डॉ.कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५, पृ.५९

३) सौ.शहा वासंती, 'अधिवेशनाच्या व्यासपीठावर काही सामाजिक प्रश्नांची चर्चा व्हावी', प्रगति आणि जिनविजय, २८ मे १९८४.

४) प. पू. आर्यिका भरतमती माताजी, 'क्षमावली',प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९८६.

५) कु.बोवडे शकुंतला, 'एका दिवसात लग्न', प्रगति आणि जिनविजय, १६ जुलै १९३५.

६) सौ.हावळे सुवर्णा धनपाल, 'पत्त्याच्या पानात आत्मज्ञान', प्रगति आणि जिनविजय, ७ जुलै १९९२.

७) सुधाताई, 'पत्रलेखन', प्रगति आणि जिनविजय, ६ ऑगस्ट १९३३.

८) उपाध्ये गोंदूबाई, 'हे बंद व्हायला पाहिजे', प्रगति आणि जिनविजय, २५ डिसेंबर १९३४.

९) सौ. चंचलाबाई, 'आजचे स्त्री जीवन', प्रगति आणि जिनविजय, २९ जानेवारी १९४१.

१०) सौ.शहा वासंती, 'जैन धर्म संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान', प्रगति आणि जिनविजय, ५ सप्टेंबर १९८३.

११) सौ.पाटील लक्ष्मीबाई, 'सोने', प्रगति आणि जिनविजय, ६ नोव्हेंबर १९३४.

१२) कु.बोवडे शकुंतला, 'एका दिवसात लग्न', प्रगति आणि जिनविजय, १६ जुलै १९३५.

१३) सौ.माणगावे नीलम, 'पंचकल्याणिक पूजा आणि त्यामधील ५६ राजे', प्रगति आणि जिनविजय, १६ नोव्हेंबर २००१.

१४) सौ.गरगट्टे श्रीमतीबाई, 'ओम परमात्मने', प्रगति आणि जिनविजय, २१ मे १९६२.

१५) वाकेकर सुगंधाबाई, 'प्रेमसंन्यास', प्रगति आणि जिनविजय, २० ऑक्टोबर १९३४.

१६) सौ.भोकरे सुलोचना, 'माझे स्वप्न', प्रगति आणि जिनविजय, १२ फेब्रुवारी १९३५.

१७) सौ.पाटील चंद्राबाई, 'तक्रार', प्रगति आणि जिनविजय, २० ऑगस्ट १९५६.

१८) सौ.भोकरे सुलोचना, 'देहार्पण', प्रगति आणि जिनविजय, २३ एप्रिल १९४१.

१९) सौ. सकळे सुवर्णा, 'मोह', प्रगति आणि जिनविजय, २ जून १९८०.

२०) सौ.आवटे सुनंदा, 'वास्तविक त्याग', प्रगति आणि जिनविजय, ११ जानेवारी १९८८.

२१) सौ.पाटील सुवर्णा, 'सद्भावना', प्रगति आणि जिनविजय, ११ जून १९९१.

२२) सौ.कापसे कांचन, 'पॅराशूट जंपिंग एक थरारक अनुभव', प्रगति आणि जिनविजय, १४ फेब्रुवारी १९८५.

२३) सौ.शहा विद्युलता, 'दादा', प्रगति आणि जिनविजय, ८ फेब्रुवारी १९६०.

२४) सौ.गुंडे प्रेमलता, 'जीवन जगण्याची कला', प्रगति आणि जिनविजय, २ डिसेंबर १९८५.

२५) प्रा. सौ.जैन लीलावती, 'समाज प्रबोधनाची दिशा', प्रगति आणि जिनविजय, १३ ऑगष्ट, १९८४.

२६) सौ.गड्डेण्णावर अनुराधा, 'खरी सुशिक्षित स्त्री कोण?', प्रगति आणि जिनविजय, ४ एप्रिल १९८८.

२७) सुभद्राबाई, अमरावती, 'मातेचे संस्कार', प्रगति आणि जिनविजय, ३ नोव्हेंबर १९३३.

२८) श्रीमतीबाई गरगट्टे , 'ओम परमात्मने', प्रगति आणि जिनविजय, २१ मे १९६२.

२९) देसूरकर सरस्वती बाबूराव, वडगाव (बेळगाव), 'अहिंसा हा परमेश्वरी संकेत', प्रगति आणि जिनविजय, ३ सप्टेंबर १९६२.

३०) कु.शहा विद्युलता, 'जैन धर्माचा एकात्मता संदेश', प्रगति आणि जिनविजय, २० मार्च १९९०.

३१) कु. मालगावे सुनंदा, 'आई आई आई', प्रगति आणि जिनविजय, २१ मे १९६२ .

३२) डॉ. सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'स्त्रीची महान योग्यता', प्रगति आणि जिनविजय, १४ जुलै १९६९.

३३) सौ.भोकरे सुलोचना, 'माझे स्वप्न', प्रगति आणि जिनविजय, १२ फेब्रुवारी १९३५.

३४) सौ.उपाध्ये सुलोचना, 'करुण दृश्य', प्रगति आणि जिनविजय, ३ ऑगष्ट १९३२.

३५) सौ.उपाध्ये सुलोचना, 'पूजेचा अविनय होतो', प्रगति आणि जिनविजय, १५ सप्टेंबर १९३२.

३६) सौ.उपाध्ये सुलोचना, 'कोणा थोराला फूल देऊ ?', प्रगति आणि जिनविजय, १ ऑक्टोबर १९३२.

३७) सौ.वणकुद्रे रत्नाबाई गुणधरराव , 'जीवनसार', प्रगति आणि जिनविजय, १५ जून १९५३.

३८) गरगट्टे श्रीमतीबाई, 'शांतिसागर मुनिवादी', प्रगति आणि जिनविजय, ७ ऑक्टोबर १९५५.

३९) अनामिक, ‘स्त्री विषयक गीत’, प्रगति आणि जिनविजय, १४ डिसेंबर १९५९ .

४०) श्रीमती शहा नवलाबाई दामोदर, ‘मला काही सांगायचे आहे’, प्रगति आणि जिनविजय, २८ जानेवारी १९८५ .

४१) सौ . शहा सुरेखा , ‘स्त्री तुझ्या शक्तीमधून’, प्रगति आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर २००१ .

४२) सौ . पाटील रुपाली, ‘श्रद्धांजली’, प्रगति आणि जिनविजय, ११ ऑक्टोबर २००२ .

**प्रकरण ७**

# जैन स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचे मराठी साहित्याला योगदान

७.१ प्रस्तावना

७.२ प्रचलित रूढी, परंपरा आणि समजूती विरोधी बंडखोर लेखन

७.३  उदारमतवादी लेखन

७.४ पुरोगामी प्रबोधनपर लेखन

७.५ कर्मठपणाला विरोध करणारे लेखन

७.६ स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे लेखन

७.७ संस्कारमूल्य जपणारे लेखन

७.८ संशोधनपर लेखन

७.९ व्यक्तीपरिचयात्मक लेखन

७.१० भाषणातून उद्‌बोधन करण्याची शैली

७.११ निष्कर्ष

७.१२ संदर्भ टीपा

# प्रकरण सातवे

# जैन स्त्रियांच्या वैचारिक साहित्याचे मराठी साहित्याला योगदान

## ७.१ प्रस्तावना

अनादीकाळापासून चालत आलेल्या जैन धर्म, जैन संस्कृती, आचारविचार, समाजव्यवस्था, स्त्री-पुरुष हक्क यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर मनुनिर्मित समाज रचनेच्या अगदी उलट समाज व्यवस्था जैन धर्मने अंगिकरून तिचा प्रचार, प्रसार केल्याचे आढळून येते. सम्यकत्त्वाची हानी होत नसेल व व्रतांना दोष लागत नसेल तर आपल्या परिसरातील चांगल्या परंपरा व लौकिक रूढी यांना मुक्त हृदयाने स्विकारण्याचे जैन नर नारींना स्वातंत्र्य होते. म्हणून मनुस्मृती, मिताक्षरा, शरियत या सारखे धर्मशास्त्र लिहिण्याची जैनाचार्यांना गरज वाटली नाही. जैन आचार्यांनी जैन धर्म, जैन संस्कृतीची व्याख्या, समाजाचा लौकिक विकास या विषयावरती अत्यंत सूक्ष्म लेखन केले आहे. पण धर्मशास्त्र लेखनाची वेळ आल्यावर त्यांनी केवळ खालील श्लोक सांगितला आहे.

> "सर्व एव हि जैनानां प्रमाणं लौकिको विधि:
>
> यत्र सम्यकत्व-हानिर्-न-यत्र न व्रत -दूषणम् |"
>
> (उपासकाध्ययन, ३४, ४८०)

अनादी काळापासून जैनधर्मामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांनाही समाजाच्या जडणघडणीमध्ये बरोबरीचे स्थान बहाल केले गेले होते. प्रथम तीर्थकर भगवान आदिनाथांनी ब्राम्ही आणि सुंदरी या आपल्या दोन कन्यांना विद्या शिकवली. त्या विद्येच्या प्रसारार्थ त्यांनी विहार केला. हे जरी खरे असले तरी जैन समाज देशभर, विखुरलेल्या अवस्थेत असलेने त्या त्या भागातील इतर समाजाच्या चालीरीती, कुटुंब व्यवस्था पोषाख, बोलीभाषा याचा परिणाम व काही भागांचा विशिष्ट पगडा जैन धर्मियावरही पडला आहे. म्हणूनच महाराष्ट्र कर्नाटक मध्ये असलेला जैन समाज अंशत: हिंदु आणि शिव संस्कृती विचारसरणीचा झाला. जैन धर्मीयांच्या व इतर धर्मियांच्या चालीरिती यामध्ये समन्वयाची सांगड घालून जीवन जगणे अपरिहार्य समजून जैन समाजाने आपली वाटचाल चालू

ठेवली. म्हणूनच हिंदु धर्मियांचे स्त्रियांबद्दल असलेले आचार विचार व मिथ्यादृष्टी याची त्याने भय व लोभापोटी कास पकडली.

स्त्री उध्दारक पुण्यश्लोक सावित्रीबाई फुले व महात्मा जोतीराव फुले यांच्या क्रांतीकारी विचारसरणीचा पगडा तत्कालीन जैन समाजावरही पडला. महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई यांच्या कार्याचा वसा घेऊन, समाजातील अंधश्रध्दा शिक्षणाविषयी गैरसमजूती आणि खास करून स्त्रियांवरील अन्याय दूर करणेसाठी झटणारी दांपत्ये पुढे आली. विधवा विवाहासाठी प्रयत्न सुरू झाले. शिकलेल्या आणि विचार करू पाहणाऱ्या स्त्रियांनी हातात लेखनी घेतली. समाजामध्ये जे चुकीचे आहे त्यावर प्रहार सुरू झाला. 'प्रगती आणि जिनविजयने' याला हातभार लवला. जैन समाज हा असा मनुसंस्कृती पासून वेगळा पण नंतर प्रवाहात मिसळत गेलेला. अशा समाजाचे जीवन राहणीमान, विचार सरणी, रूढी, परंपरा, धार्मिक वैकल्ये, मुनीजीवन हे सगळेच वेगळे आहे. हा समाज आतापर्यंत साहित्यांमध्ये आपले स्वत:चे ठसठशीत रूप घेऊन दाखल झालेला नव्हता. पण 'प्रगती आणि जिन विजयाने' जैन साहित्याचा वेगळा प्रवाह निर्माण केला. प्रगतीने... लालित्यातील हृदयाची खळबळ कमी ऐकली पण विचारांचा नजराणा मराठी साहित्याला बहाल केला.

'प्रगती आणि जिनविजय' या मासिकाने जैन स्त्रियांसाठी वैचारिक व्यासपिठ निर्माण करून दिले. यातील लेखिकांना जे रूचेल , जे पटेल, जे वाटेल ते त्यांनी निर्भिडपणे लिहिले आहे. जैन संस्कृती, जैन जीवन, जैन रूढी, परंपरा, स्त्रियांची कुंचबना, चुकीच्या धर्माचे उदात्तीकरण समाजासमोरच आणण्याचे काम केले आहे. अनेक महिलांना लिहिते केले आहे. जैन साहित्याचा छोटासा का असेना पण हा प्रवाह मराठीत साहित्यात आणण्याचे महत्त्वाचे योगदान 'प्रगती जिनविजयला' जाते.

## ७.२ प्रचलित रूढी, परंपरा आणि समजूती विरोधी बंडखोर लेखन:

स्वातंत्र्यपूर्व काळात सुध्दा स्त्रिया काळाच्या पुढे जाऊन विचार करू शकत होत्या. लग्नावर होणारा अवाढव्य खर्च दारिद्रय आणण्यास कारणीभूत आहे हे सांगताना सौ.रत्नप्रभा महाजन यांनी ( १९ नोव्हेंबर १९३५ )[१] 'सुधारलेले लग्न' हा लेख लिहिला आहे. 'खोटी लाज सोडा, पोकळ चालीरिती तोडा-मोडा फेकून द्या. पण आपला पैसा सांभाळा. घराचे रक्षण करा' हे सांगताना एका

दिवसात लग्न करण्याची परंपरा समाजात सुरू झाली पाहिजे यासाठी जैन स्त्रियांनी पुढाकार घेतला पाहिजे हे आवर्जून सांगितले आहे.

जैन धर्म हा आपल्या धर्माला 'विश्वधर्म' समजतो. पण या धर्माचे पालन करताना समाज अनेक पोटजातीचा स्विकार करतो. कट्टरपणे त्याचे पालन करतो. या पोटजातीत उच्च-नीच हा भेदभाव केला जातो. यावर डॉ.विजयालक्ष्मी पांगळ (१० जाने १९६६)[२] यांनी "जैन समाजाची एकता" या लेखात हाच मुद्दा उचलून धरला आहे. "पंतभेद, जाती भेद, त्यात पुन्हा पोट जाती भेद यामुळे जैन समाज विस्कळीत झाला असून जैन समाजात एकता राहिली नाही".त्यासाठी रोटी बेटी व्यवहार सर्व जैन समाजात सुरू करायला पाहिजे. तसेच एक जैन समाज.. एक जैन धर्म यांची संघटना करून समाज जोडायला पाहिजे असे आपले विचार स्पष्ट करून त्या म्हणतात, 'असे झाले तरच आपण जैन अनुयायी आहोत'.

जैन साधूंचे आहाराबद्दलचे नियम अतिशय कडक आहेत. मुनि आहाराला बाहेर पडताना मनात एखादी गोष्ट ठरवून ठेवतात. उदा.कळस घेतलेली स्त्री किंवा मुलगी, ताटात लवंग, बदाम, खारीक इ. पदार्थ, सवाष्ण स्त्री, गाय-नारळ वगैरे वगैरे. जर ती गोष्ट समोर आली नाही तर ते आहार घेत नाहीत. जेवताना दार बंद झाले,,, लहान मूल रडू लागले, अन्नात चुकून केस, खडा आला तर तिथल्या तिथेच आहार बंद होतो यावर 'आत्मलक्ष्मी साधूची लक्षणे' या लेखात (९ मे १९८३)[३] सौ.वासंती शहा यांनी आहारासाठी श्रावकांना (काही कारणास्तव) नकार देणाऱ्या साधूसंबंधी माहिती देऊन प्रबोधनाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकले आहे.

प.पू.१०८ गणधराचार्य कुंथुसागर महाराज यांचा परिचय प्रगती आणि जिन विजयमध्ये मंत्र-तंत्र असणारे महाराज म्हणून केला गेला. ३.३.१९८६ च्या अंकात महाराजांनी एका व्यक्तीच्या डोक्यावर चरणोदक (गंधोधक) घातला आणि त्याला दिसू लागले असे छापले गेले. यावर प्रा.लीलावती जैन यांनी "ऐकावे ते नवलच- गंधोदक महात्म्य" या लेखात शंका उपस्थित करून जनजागरण केले आहे.

लग्न, डोहाळे जेवण, घर बांधणे, विहीर काढणे, कोणी वारले तर गारवा म्हणून ठोमरा भाकरी देण्याची पध्दत आज ही जैन समाजात आहे. लग्न मंडपात वराचे पाय धुणे हा तर

संस्कृतीचा भाग आहे. यावर प्रगती आणि जिन विजयमध्ये प्रतिक्रिया पाठवण्याचे आवाहन केले गेले. त्याला बराचसा प्रतिसाद मिळाला.

**७.३ उदारमतवादी लेखन :**

जैन समाजा मध्ये अनेक पोटजाती आहेत. विश्‍वधर्म समजल्या जाणाऱ्या जैन समाजामध्ये पोटजातीतील मिश्र विवाह आजही मोकळया स्वच्छ मनाने होत नाहीत. यावर (१७ डिसेंबर १९४१) 'आंतरजातीय विवाहार्थ तीन सूचना' या सभेत त्यांनी दक्षिण भारत जैन सभेलाच सवाल केलेला आहे, 'जैन जातीचे देव एक, त्यांच्या धार्मिक क्रिया एक, रोटी व्यवहार होतात पण बेटी व्यवहार होत नाहीत...' असे मत मांडून त्यांनी शेवटी मिश्र विवाह झालेल्या मुळगुंदच्या देशपांडे घराण्याचा उल्लेख केलेला आहे.

मिस्.एस्.एन.गांधी, पंढरपूर यांनी (३० आक्टो १९३४)[४] 'विधवा स्त्रिया संबंधी समाजाने पाळावयाची कर्तव्य' या लेखात समाजाला जाब विचारण्याचे धाडस केले आहे. नवरा वारल्यानंतर स्त्रियांनी कुंकू लावले पाहिजे. केशवपणामुळे विधवांच्या शीलाला धक्का पोहचत नाही. ही समजूत चुकीची आहे असे विचार सांगून 'पुनर्विवाहास मोकळीक मिळाली तर कमकुवत स्त्रीयांचा अनितीपासून बचाव होईल' हे सांगितले आहे.

प्रौढ स्त्रियांच्या विवाह समस्येवर "प्रौढ विवाह समस्या ( १३ जुलै १९५९)[५] या लेखात कु.वसुंधरा ढेरे यानी काही बाबतीत पुरुष प्रौढ काही बाबतीत स्त्री श्रेष्ठ असे असताना पुरूषांच्या श्रेष्ठतेवर स्त्री ने जर मात केली तर तिला स्वसुखाला अंतरावे लागते असे का? असा सवाल केला आहे. प्रौढ स्त्री व पुरुषांनी विवाहासंदर्भातील सौंदर्याची कल्पना बदलली पाहिजे हे ही त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे.

१९३४ साली स्तवनिधी येथे दक्षिण भारत जैन सभेचे अधिवेशन भरले होते. त्यामध्ये 'प्रगती अणि जिन विजय' च्या संपादक मंडळाची निवडणूक हा विषय आला. 'स्त्री लेखिकेला घ्यावे' अशी सूचनाही आली. ही जबाबदारी अवघड आहे? बायकांना हे जमणार नाही. शोभेसाठी नाव घालायचे काय ? हे सवाल एका सद्गृहस्थानी केले. पण श्री.बी.बी.पाटील व धावतें काका

यांनी स्त्रियांच्या कर्तृत्वाला संधी दिली पाहिजे असे म्हणत स्त्री विभागाच्या संपादिका म्हणून सौ.सुलोचनाबाई भोकरे यांचे नाव सुचविले. सुलोचनाबाई संपादिका झाल्या. आपण स्त्री असल्याचा सार्थ अभिमान खरा करून दाखविला. त्यांच्यांच बाबतची स्मृती नावाची घटना (५ ऑक्टों १९५९)[६] त्यांनी सांगितली आहे. घरात पुरुष माणूस नसताना एक भूमिगत स्वातंत्र्य सैनिक संपादिकेच्या घरी येतो आश्रय मागतो. स्वातंत्र्य पूर्व कालखंडात घडलेली ही घटना आहे. एक स्त्री म्हणून नव्हे तर एक माणूस आणि देशप्रेमी म्हणून त्याला आश्रय दिला पाहिजे असे सुलोचनाबाईंना वाटते. त्या आश्रय देतात.त्यांचे पती आल्यानंतर त्यांच्या उदारमतवादी धाडसी कामा बद्दल त्यांचे कौतुक करतात.

सौ.सुमन चौधरी यांनी सामाजिक कर्तव्यातला आपला महत्वपूर्ण संपादकीय वाटा उचलला आहे. सर्व धर्मिय स्त्रियांना पोटगीपात्र ठरवण्याचा महत्वपूर्ण व क्रांतीकारक निर्णय केरळ खंडपीठाने केला. न्यायमूर्ती ए.पी.सेन आणि न्यायमूर्ती एस.नटरवाजन यांनी यांचे काम पाहिले. सायराबानू उर्फ अब्दुलगफूर या मुसलमान स्त्रीला न्याय मिळाला. ‘क्रांतीकारक निकाल’ (१ जुन १९८७)[७] म्हणून संपादकीय सुमनताईनी लेख लिहिलेला आहे.

जैन कासारांनी धर्मांतर केले आणि ते ‘हिंदु कासार’ झाले. अर्थिक अडचण असेल, पोट भरण्याची भ्रांत असेल, नको तेवढे कर्मकांड असतील किंवा वैचारिक शिथिलता असेल अगतिकतेने ही मंडळी हिंदू कासार झाले. ‘कोकणातील कासारवाडी (रायगड) येथे कोकण कासार परिषदे’ च्या निमित्ताने सर्व जैन कासारांनी धर्मांतर केले’ ही खळबळजनक माहिती “जैन कासार समाज मृत्यूच्या छायेत” या लेखात (५ डिसेंबर १९९०)[८] सौ.शरयू शरद मोहिते, पुणे यांनी सांगितलेली आहे. जैन कासार समाजाला आर्थिक प्रगतीच्या योजना दिल्या पाहिजेत. सर्व गरीब कासारांनी एकत्र आले पाहिजे, हे ही अगदी तळमळीने नमूद केले आहे. कासार म्हणजे बांगडी घालणारा समाज होय. या कासाराबावत जैन समाज उदारमतवादी बनला पाहिजे ही आग्रहाची भूमिकाही त्यानी मांडली आहे.

धर्माचा उदय व्यक्तीच्या मनात असतो. सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान, सम्यक् चारित्र्य या आत्मिक गुणांचा विकास व्यक्तिगत तपश्चर्येने होतो. म्हणून धर्माचा केद्रबिंदू व्यक्ती आहे. सामाजिक जाणिवांच्या विस्तारासाठी परिग्रह प्रमाण व्रताची योजना आहे. सामाजिक हितासाठी

आपल्या प्राप्तीचा काही भाग राखून ठेवला पाहिजे तरच समाजाचे रक्षण होईल. जैन धर्म हा विश्व धर्म आहे अशी घोषणा करून चालणार नाही. त्यासाठी विश्वाचा विचार करावा लागेल. सौ.अनुराधा गडेण्णावर यांनी (१७ सप्टें १९९१)[९] "आमच्या सामाजिक जाणीवा विस्तारल्या पाहिजेत" यावर लेखन केले आहे.

### ७.४ पुरोगामी प्रबोधनपर लेखन :

संततीनियमन सारखा नाजूक विषयही स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिला गेला. कु.सुलोचना भोकरे (१२ जुन १९३४)[१०] 'संतती नियमन' या लेखात एक पती/एक पत्नी व्रताचे पालन करा.बाल,वृध्द व विजोड विवाहापासून संतती उत्पन्न करू नका. संतती उत्पन्न न करणे हेच खरे 'संतती नियमन' होय असे विचार मांडलेले आहेत.

पूर्वीच्या काळात बालविवाह होत असत.लग्नानंतर मुलीला ऋतुप्राप्ती होत असे. त्यावेळी नवऱ्यासह तिला मखरात बसवून ओटी भरुन वरात काढीत असत. रजोदर्शन हा स्त्रीचा स्वाभाविक शरीरधर्म-त्यासाठी तिला चारचौघात कशासाठी मिरवायचे ? असा प्रश्न सौ. सुलोचना भोकरे यांना पडला. 'न्हाणवली' या लेखात १८ व २५ डिसेंबर १९३४ च्या अंकात त्या म्हणतात "मुलीला न्हाणवली बसवून सासुरवाडी कडून भारी किंमतीचा आहेर व द्रव्य उखळण्यासाठीच नवऱ्याकडचे 'न्हाणवली' करतात" याला त्यांनी कडाडून विरोध केला आहे.

लोकमान्यांना भेटण्यासाठी काही विद्यार्थी सिंहगडावर गेले.लोकमान्यानां म्हणाले "तुमचा उपदेश ऐकायचा आहे?" लोकमान्यानीं मुलांना प्रबोधन पर उपदेश केला.अभ्यास करा असे सांगितले. अडीच तासाची ही र्चचा सूत्ररूपाने सौ.चंचलाबाई शहा (१७ सप्टेंबर १९६३)[११] यांनी लोकमांन्यांचे 'अमृततुल्य बोल' या लेखात सांगितले आहे.

चहुअंगानी विचार करून लिहिणाऱ्या लेखिका म्हणून सौ.वासंती शहा, पुणे या ओळखल्या जातात. "समाजधुरीण या विषयाकडे लक्ष पुरवतील काय"(२८ जानेवारी १९६३)[१२] या लेखात ठाम वैचारिक मांडणी आणि विचारातला समतोल पणा दिसून येतो" कर्म-सिध्दांत आणि पुनरजन्म ही तत्वे म्हणजे भारतीय संस्कृतिला जैन धर्माने दिलेली अनमोल देणगी आहे.भारतीय संस्कृतीच्या

घडणीमध्ये जैन धर्माचा फार महत्वाचा वाटा आहे.पण जैनेतर इतिहासकारांनी जैनांच्या या कतृत्वावर अनुलेखाने विस्मृतीचा गोळा फिरवला आहे.आणि जैन समाज एकीकडे अल्पसंख्यांक झाल्यामुळे इतिहासकारांना या कार्यात यशही आले.या करिता प्रथम एक अभ्यास मंडळ स्थापन करावे". त्यांच्या मते जैनांचा इतिहास यावरच्या पुस्तकांच्या माध्यमातून लिहिला जावा. जैन समाजाला हालविणारा लेख प्रवोधन करणारा म्हणून याकडे पाहिले पाहिजे,

"धर्मप्रभावनेच्या कल्पना जेव्हा मंदिर आणि मूर्ती भोवतीच घोटाळू लागतात तेव्हा सामाजिक दृष्टी हरवू लागते" असे सडेतोड विचार मांडणाऱ्या सौ.वासंती शहा यांनी " विचारवंत थोडे-क्रियाकांडवादीच जास्त !" नावाचा लेख लिहिला आहे. (१९ सप्टेंबर १९८१)[१२] धर्मप्रभावना ही सामाजिक विकासासाठी असली पाहिजे हे मत त्यांनी ठामपणे मांडले आहे.या विषयाचे मंथन त्यांनी समारंभात रमलेल्या आणि उत्सवात हरवलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी वेळोवेळी केले. त्यांच्या मते इकडून तिकडून चार लेख, कविता गोळा करून पत्रकारिता होत नसते. समाजाला दिशा देण्याचे काम पत्रकारितेतून झाले पाहिजे हे सडेतोड मत त्यांनी मांडले आहे. "मंदिर बांधणे किंवा मूर्ती मानंस्तंभ उभारणे हे महान पुण्याचे कार्य आहे.अशी समाजमनाची समजूत करून देण्यात आली आहे. त्यामुळे इहपर लोकी अमाप सुख मिळते...अर्थातच धर्म व्यक्तिगत पातळीवर राहिला आणि धर्म आणि समाजातही या वेगळया गोष्टी बनल्या" हे सगळे 'धार्मिक क्रिया समाजहिताची असावी" (१ मार्च १९८२)[१४] या लेखातून त्यांनी मांडले आहे.

आकाशवाणीच्या सौजन्यांने सुप्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या तारा अली बेग यांचा "सामजिक कलंक-हुंडा पध्दती !" हा सर्वसमावेशक अभ्यासू लेख (२० ऑगस्ट १९८२)[१५] ला प्रसिध्द करण्यात आले आहे. १९६१ मध्ये प्रथम हुंडाप्रतिबंधक कायदा करण्यात आला. पण हा कायदा समाजात शोभेचा वाहुलाच ठरला. स्त्रियांचा छळ आणि मानसिक खच्चीकरण यात तिची होणारी पिळवणूक जीवघेणी ठरते. राजस्थानमधील रूपकंवर या सती गेलेल्या स्त्रीच्या घटनेवर सौ.सुमन चौधरी यांनी संपादकीय लिहिले आहे. (५ ऑक्टों १९८७)[१६] या घटनेला 'अमानुष केवळ अमानुष' असे म्हटलेले आहे. सतीबंदी कायदयावर विवेचन केले आहे.

बिरदेव यात्रेत २२ फेब्रुवारीच्या दै.सकाळमध्ये ७००० बकऱ्यांचे बळी दिले ही बातमी वाचून सौ.प्रेमलता गुंडे यांनी 'केवढे हे क्रौर्य' (७ मार्च १९८८)[१७] हा लेख लिहिला. बिरदेव हा शाकाहारी देव पण त्याचे भक्तगण मंदिरा भोवती भुतावळ येऊ नये म्हणून हजारो बकऱ्यांची कत्तल करतात ही अंधश्रध्दा थांबवली पाहिजे.मन सुन्न करणारे लेखन आहे.

'मला न उमजलेले कोडे' (१४ फेब्रु १९८५)[१८] सौ.जयश्री सुरेंद्र सुर्यवंशी यांनी 'स्त्री आणि स्त्रीवरचा मनुवादी अन्याय' यावर लेख लिहिला आहे. पुरूष चांगला आणि स्त्री वाईट अशा कथा पुराणात का सांगितल्या जातात हा प्रश्न त्यांना पडला आहे.

जैन धर्मामध्ये नोपी आणि व्रत-उपवासाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. या निमित्ताने आपण फळे आणि महागडया वस्तू देवाला अर्पण करतो. भुकेलेल्या गरीबाकडे आपण पाहतही नाही .यावर सौ.सुमन चौधरी यांनी 'व्रतवैकल्यएक चिंतन' ( ५ मे १९८६)[१९] या नावाचा लेख लिहिला.

"मंत्र-तंत्राचा वापर करावा की करू नये" हा विषय देऊन 'प्रगती..' ने वाचकाकडून प्रतिक्रिया मागवल्या होत्या. उलट सुलट दोन्ही अंगानी लिहिले. पण मंत्र तंत्राचा वापर करू नये असे म्हणणारे लेख जास्त आलेले दिसतात.

**७.५कर्मठपणाला विरोध करणारे लेखन:**

जैन समाज धर्मावर विश्वास ठेवणारा आहे.जैन मुनिनी, विव्दानांनी याचाच बराचसा फायदा स्व:हितासाठी करून घेतलेला आहे. काही मुनी स्वत:चे हित न पाहता प्रामणिकपणे जैन संस्कृतीचे पालनही करतात. पण बरेचसे मुनी आपला संघ वाढवणे, आपली लोकप्रियता वाढवणे यासाठी प्रयत्नवादी असतात. त्यांच्या नजरेतून भेटणारा, वाटणारा समाज ते श्रावकां समोर ठेवतात.आणि चुकीचा समज लोकांपर्यंत पोहचवण्यात यशस्वी होतात.चुकीचा समज गैरसमज समाजात पसरवला जातो. श्रावकांचा अभ्यास कमी पडतो. धर्मावरचं अतिप्रेम विवेकीवृत्तीला फाटा देतो.आणि चुकीच्या कर्मठ पध्दती समाजात चालू होतात. यावर प्रहार करण्याचं काम अत्यंत निर्भिडपणे समाजाचा विरोध पत्करुन काही लेखिकेनी केलेला आहे.

बंधूभाव जोपासणे, धर्मजागृती करणे वगैरे प्रथा काळाची गरज म्हणून सद्हेतूने सुरू होतात. तो हेतू काही वर्षांनी विस्मृत होतो आणि ती प्रथा स्थूल रूपाने चालू राहते. भट्टारक संस्थेची तीच गत झालेली आहे. समाजाकडून भंडारपट्टी वसूल करणे, मंदिर बांधणे, प्रतिष्ठा करणे, प्रतिष्ठाचार्य म्हणून मिरविणे, भरपूर बिदागी मिळविणे एवढाच भट्टारकांचा समाजाशी संपर्क राहिलेला आहे. त्यांच्या अशा समाजहित धोरणावर सौ. वासंती शहा यांनी 'भट्टारक संस्थेचा मूळ उद्देश आणि आजचे भट्टारक" (२२ फेब्रु १९८२)[२०] हा लेख लिहून कडाडून टिका केली आहे.

त्यांनीच 'ही कोंडी आता फुटलीच पाहिजे"नावाचा लेख (२० जून१९८३)[२१] लिहिला.माडा गावात श्री विलास शहा यांच्यावर तेथील गुजर समाजाने बहिष्कार घातला. कारण एवढेच कि विलास शहा यांची ८० वर्षाची मावशी दलित बालवाडीमध्ये जाऊन तेथील १०० मुलांना रोज रुचकर खाऊ दयायची. मावशी दलित वस्तित जाते म्हणून गुजर समाजाने संपूर्ण कुंटूबावर मंदिरात यायची बंदी घातली. दोन तीन महिने त्रास सहन केल्यावर विलास शहा यांनी पत्रक काढून बहिष्काराला महाराष्ट्रभर प्रसिध्दी दिली. बहिष्कार संपेपर्यत मंदिरासमोर बसून उपवास (उपोषण) करण्याची घोषणा केली. संपूर्ण वर्षभर कर्मठ समाजाला सामोरे जाण्याचे अवघड काम विलास शहा यांनी केले.यावर खरमरीत लेख वासंती शहा यांनी लिहिलेला आहे.

मुनिच्या प्रभावाखाली असलेल्या धनिकांच्या या कृत्याला वाचा फोडलीच पाहिजे म्हणत त्यानी कळसा प्रकरण लिहिले आहे. "जिकडे धर्म तिकडे विजय" (१२ डिसें १९८३)[२२] लेख लिहून कळसा प्रकरणाबद्दल विरोध आणि मुनी मौनाबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

कर्नाटकामध्ये जैन वस्ती असलेले 'कळसा' हे गाव.कळसा गावातील जैन समाज हे दासीपुत्र आहेत असा लोकांचा समज आहे.(धर्मपत्नी सोडून ठेवलेल्या बाईपासून झालेली मुले) कदाचित पूर्वीच्या काळातील ती वस्तुस्थिती असू शकेल. विवाहबाह्य किंवा विधवेपासून (विधवा विवाहापासून) झालेली संतती असू शकेल. महामस्तकाभिषेकासाठी विमलसागर महाराजांचा संघ श्रवणबेळगोळला जाताना कळसा गावात गेला. कळसा गावातील लोकांनी आनंदाने त्यांचे स्वागत केले. महाराजांच्या आहाराची जय्यत तयारी केली.पण महाराजांनी आहार घेतला नाही. कळसा गावातील संतती ही अनौरस संतती असल्याचे सांगून या लोकांना मंदिरात येऊ द्यायचे नाही असा

आदेश विमलसागर महाराजांनी काढला. बाहिष्काराचे पत्रक काढले. या घटनेनंतर कळसा गावातील लोकांनी प्रा.,सौ.,लिलावती जैन व वासंती शहा यांना ही घटना पत्राने कळवली. 'बहिष्काराचे पत्रक केराच्या टोपलीत टाका' अशा सूचना दोघींनी केल्या.

न्याय मिळो किंवा न मिळो पण न्यायाच्या दिशेने एखादया गोष्टीचा व्रतस्थपणे पाठपुरावा करायचा याचे उत्तम उदा. प्रा, सौ लिलावती जैन व वासंती शहा यांचा आहेत. प्रत्येकवर्षी जैन समाजामध्ये किमान वीस,पंचवीस पंचकल्याणिके होत असतात. अमाप पैसा यावर खर्च केला जातो. यावर ते म्हणतात. "मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्याची कल्पना व तिच्या क्रियाविधी निरीश्वरवादी जैन धर्मामध्ये नाही. जैन धर्मशास्त्र हे सिद्धांतशास्त्र आहे."पुढे त्या मिस्कीलपणे आणि मार्मिकपणेही म्हणतात की, "जिथे माणसावर लवकर संस्कार होत नाहीत. तिथे जड मूर्तिवर सस्कांर कसे काय होणार?" धाडसीपणाने ते विधान करतात. "मूर्तिच्या अवलंबनातून खुद्द मुनीच मुक्त झाले नाहीत तर ते आपल्या अनुयायानां,आपले धर्मनेतृत्व मानणाऱ्या भाविकांना कोणता वेगळा उपदेश करणार" हे विवेचन करणारा "मूर्तीची प्राणप्रतिष्ठा ,मूर्तिवर संस्कार ही केवळ कवि कल्पना" हा लेख (२१ फेब्रु. १९८९)[२३] त्यानी लिहिला.

### ७.६ स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे लेखन :-

आत्मकल्याणाचा पाया असलेल्या जैनधर्मातल्या स्त्रिया बऱ्याच अंशी देवधर्मात आयुष्य व्यतित करताना दिसतात. पण 'प्रगति आणि जिनविजय ने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे लेख लिहिले आणि त्याचा निश्चितच फायदा समाजातल्या स्त्रियांना झाला.

प्रगति आणि जिनविजयच्या माध्यमातून लिहिण्यासाठी पहिल्यांदा लेखणी उचलणाऱ्या यात प्रथम लेखिकाच आहेत. श्रीमती भ्रतार चारुदत्त कळंत्रे,, सांगली . (२८ एप्रिल१९८२)[२४] 'स्त्री शिक्षण आणि त्याचे महत्त्व' असा पहिलाच लेख त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासबंधी लिहिला. उपलब्ध अंकामध्ये १९२२ ते १९३२ या दहा वर्षात एकूण अकराच लेख शिक्षणावर लिहिले आहेत. याचा अर्थ स्त्री शिक्षणासंबधीची आस स्त्रियांना होती हे नमूद करावेसे वाटते.

स्त्रियांनी रडत बसण्यापेक्षा कुठल्याही गोष्टीला धैर्याने तोंड दिले पाहिजे असे विचार 'चांदणीत तूप' या लेखात सौ सुलोचना भोकरे (३१ डिसें १९३५)[२५] यांनी मांडले आहेत.पती व्यसनी, अधर्मी असेल तर चेलना राणीसारखे वागा.तो देशद्रोही असेल तर राजपूत वीरांगणेचे चित्र समोर आणा असा सल्ला त्यांनी दिला आहे. 'सांगली असेंब्लीची निवडणूक व स्त्रियांना वयाची सवलत' या लेखात सौ सुलोचना भोकरे (१६ आक्टो १९४०) म्हणतात. 'निवडणूक लढविण्याची अट पुरुषांना व स्त्रियांना ३० वर्षाची आहे. पण स्त्रियांसाठी ही अट २५ वर्षाची असावी' याचे कारण देताना ते सांगतात 'खाणेसुमारीच्या आकडयानुसार स्त्रियांची आयुमर्यादा पुरुषांपेक्षा कमी असलेली दिसते म्हणून स्त्रियांना वयाची सवलत असावी.'

समाजाला खडबडून जागे करणारे ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक १८८२ मध्ये प्रसिध्द झाले.तसे स्वतंत्र लेखन जैन स्त्रियांमध्ये १९व्या शतकात निर्माण झाले नाही, पण स्त्री पुरुष समानतेचे भान मात्र निश्चित आल्याचे जाणवते.सौ चंचलाबाई शहा यांनी 'आजचे स्त्री जीवन' (२९ जाने १९४१)[२६] "वैवाहिक जीवन व वैवाहिक स्त्रियांचे समाज कार्य" (१ जून १९४६)[२७] या दोन्ही लेखात स्त्री स्वातंत्र्यावरचे आपले परखड मत मांडले आहे "एक सामाजिक कलंक हुंडापध्दती"हा सर्व समावेशक अभ्यासू लेख सुप्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या तारा अलिबेग यांनी लिहिला आहे.

३ फेब्रुवारी १९७५ ला सहसंपादिका उषाताई मगदूम यांनी 'स्त्रियांचे उध्दारक भ.महावीर' असा अग्रलेख लिहिला आहे.महावीरांनी स्त्रीला समतेचे स्थान दिले आहे.धर्मप्रभावनेत भाग घेण्यास जेव्हा स्त्रीला स्थान नव्हते तेव्हा आपल्या संघात त्यांनी स्त्रीला बरोबरीचे स्थान दिले आहे.सम्यक् ज्ञान, दर्शन व चारित्र्याच्या मार्गाने मोक्ष कोणत्याही प्राणी मात्राला मिळवता येतो. मग स्त्री त्याला अपवाद कशी ? असा चपराक ही त्यांनी समाजाला दिलेला आहे.

पुरुष प्रधान समाजव्यवस्थामध्ये स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम स्थानावर राहिले आहे. जैन संस्कृतीही त्याला अपवाद नाही. जैन समाजामध्येही स्त्री दुय्यम स्थानावरच आहे.पण धर्म संस्कृतीमध्ये तिचे स्थान कुठे आहे हे सांगण्याचा प्रयत्न सौ.वासंती शहा यांनी 'जैन संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान'( ५ सप्टें १९८३)[२८] या लेखात केला आहे. कृतीयुगापासून चालत आलेले तिचे

समान स्थान हळूहळू विसाव्या,बाविसाव्या तिर्थंकरानंतर महावीर काळातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेत घसरत गेले. मोठा प्रदीर्घ,ऐतिहासिक दाखले देऊन लिहिलेल्या लेखात त्या शेवटी म्हणतात "जैन धर्मामध्ये 'पतिव्रता'हा शब्द प्रयोग नाही.कारण या शब्दातून स्त्रीचे दास्यत्व ध्वनित होते.या शब्दा ऐवजी 'सहधर्मचारिणी असा शब्द प्रयोग आहे."

राजस्थानतील रूपकंवर या सती गेलेल्या स्त्रीच्या घटनेवर सौ.सुमन चौधरी यांनी संपादकीय लिहिले आहे. अमानुष केवळ अमानुष (५ आक्टों १९८७)[२९] असे म्हटले आहे. सौ.प्रेमलता गुंडे यांनी 'मुलगी झाली हो "( २ मार्च १९८७ )[३०] या शिर्षकाखाली स्त्री भ्रूणहत्येवर लेखन केले आहे.त्यांचा दुसरा लेख 'कुटूंब न्यायालये' (२ एप्रिल १९८८)[३१] मधून कुटूंब न्यायालयाची गरज आणि इतर स्त्री संदर्भातले विवेचन केले आहे. राजकारणतील स्त्रियांच्या राखीव जागेच्या प्रश्नावर सह.संपादिका सौ.प्रेमलता गुंडे यांनी "स्त्रियांची सामाजिक व राजकीय स्थिती" (६ मार्च १९९०)[३२] या विषयावर लेखन केले आहे .

८ मार्च २००२ च्या अंकात नीलम माणगावे आंतरराष्ट्रीय " महिला दिनाच्या निमित्ताने" लिहिलेल्या लेखात अन्यायाच्या विरोधात झगडतानासुध्दा मनाची शांती ढळू न देता आत्मविश्वासाने जगण्याचे सामर्थ्य मिळवणे म्हणजेच महिला सबलीकरण होय हे सांगितले आहे.

**७.७ संस्कार मूल्य जपणारे लेखक :**

घरासमोर रांगोळी काढणे ही भारतीय संस्कृती! विशेषता: दक्षिण भारतात रांगोळीची परंपरा खूप मोठी आहे.महाराष्ट्रात सोनार जातीच्या स्त्रिया आणि ब्राम्हण स्त्रिया दारात रांगोळी काढतातच. 'रांगोळी' या लेखात (२४ एप्रिल १९३४)[३३] जैन स्त्रियांनीही दारात रांगोळी काढावी असे मत सौ.सुलोचना भोकरे यांनी मांडले आहे . मुनीनां जैनांचे घर ओळखता यावे म्हणून जैनधर्म दर्शक चित्रांची रांगोळी काढावी अशा सूचनाही दिल्या आहेत

'अक्षय तृतीया' संबंधी सौ.वासंती शहा (७ मे १९८४)[३४] यांनी माहिती दिली आहे. आहार दान व आहार ग्रहण या संबंधातल्या वृषभदेवांच्या जीवनातल्या इतिहासपूर्व काळातील घटना सांगितली आहे.सौ.प्रेमलता गुंडे यांनी संपादकीय मध्ये 'आपले सण' ( ५ सप्टेंबर १९८८)[३५] या

लेखात प्रत्येक सणाचा आढावा घेतला आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे मूर्तिमंत प्रतिक म्हणून 'सक्रांत' चा उल्लेख केला आहे. 'अशी घ्या बाळाची काळजी' या लेखात गर्भधारणा, प्रसूति , मुलांचे आजार , पोषक आहार वगैरे सबंधी मार्गदर्शन डॉ सुमति चौगुले ( ३ मे १९८५ )[३६] यांनी केली आहे. यावर तीन लेख प्रसिध्द झाले आहेत.

डॉक्टर झालेल्या स्त्रियांनी स्त्रीजीवनाचा अभ्यास करून स्त्रियांच्या जगण्याचे , त्याच्या राहणीमानाचे , आरोग्याचे , आनंददायी दिवस घालवण्याचे काही निष्कर्ष काढले आहेत. स्त्री म्हणून स्त्रीजीवनाकडे त्यांनी अधिक जागृतपणे बघितल्याचे जाणवते. स्त्री जीवनाच्या घडामोडी विषयी डॉ.नलिनी नाडकर्णी यांनी लेखाचा विषयच निवडला आहे, " विशीत ज्या डोळस त्यांचा चाळीशीत कळस". ( ६ जुलै १९८७)[३७] चाळाशीत मनन आणि साठीत जतन केल्यास अजून यौवनात मी, अशी हमी देण्याची संधी नेहमी मिळेल असेही त्यांनी सांगितले आहे.

'बालकांचा मानसिक विकास' (२ नोव्हेंबर १९८७)[३८] हा प्रा.रेवती हातकणंगलेकर यांचा लेख आहे . २ ते ६ वयोगटातील मुलांच्या मानसिकतेसंबधी यात विश्लेषण केले आहे. डॉ रोहिणी केळकर यांनी 'दिल जलता है' (१९ आक्टों १९९९)[३९] या अंकात धुम्रपानाचे दुष्परिणाम सांगितले आहेत.

सौ. कांताबाई मसाळकर (४ जून १९३५)[४०] यांनी 'श्रुतपंचमी' बद्दल सांगितले आहे. श्रुतपंचमी दिवशी स्त्री-पुरूषानी एकत्र येऊन शास्त्र पूजा करावी हे त्या काळात सांगणे धाडसाचे आहे.

**७.८ संशोधनपर लेखन ः**

सौ.सुलोचनाबाई भोकरे यांनी 'परागमन' नावाचा कानडी लिपितला जुना ग्रंथ पाहिला. दोनशे वर्षापूर्वीची बरीचशी माहिती अंनतमती आर्जिका वगैरे त्यात वाचायला मिळाले. 'ही अंनतमती लेखिका कोण?' असा सवाल करुन त्याबद्दलची माहिती देणारा लेख (६ नोव्हे १९३४)[४१] सुलोचनाबाईनी लिहिला आहे. यात बरेचसे संशोधन व्हायला पाहिजे असे मतही व्यक्त केले आहे.

'अकबर आणि जैन धर्म' (३ फेब्रुवारी १९६४)[४२] हा डॉ.सौ विजयालक्ष्मी पांगळ यांचा लेखही दर्जेदार झालेला आहे. वरेचसे बारकावे आणि दाखले त्यांनी दिलेले आहेत. प्रसिध्द् इतिहास लेखक मि.विन्सेंट स्मिथ यांचाही उल्लेख लेखामध्ये आलेला आहे. सूक्ष्म अभ्यास दर्शविणारा हा लेख आहे. आर्यिका जिनदेवी माताजी यांनी 'समाधीमरण' वर अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन मांडले आहे. (१० ऑगस्ट १९८७)[४३] प्रा.डॉ.सौ अरूणा कौलगुड, ,मुंबई यांचा "महिला मनुष्यबळ विकासः आजची नितांत गरज" हा लेख (४ मे १९८७)[४४] अभ्यासपूर्ण आणि वस्तुनिष्ठ आहे. 'उपेक्षित जैन इतिहास' (७ फेब्रुवारी १९८९)[४५] यावर सौ प्रेमलता गुंडे यांनी सपांदकीयमध्ये जैन धर्माचा चुकीचा प्रसार होत आहे.त्यामुळे जैन इतिहासाचे भान, जैनधर्मियांनी, जैनविव्दानांनी समाजाला सांगितली पाहिजे हे सांगणारे अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. या धर्तीवर 'इतिहास शुध्दिकरण' सारखा लेख (२८ ऑगस्ट१९४०)[४६] मंदोदरीबाई चावरे यांनी लिहिला आहे. मराठी मधील हायस्कूलमधल्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकामधील जैनांना कमीपणा आणणाऱ्या चुकीच्या माहितीकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. ( 'हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास'-: लेखक-गणेश नारायण जोशी - पान.२८ मध्ये लिहिलेली चुकीची माहिती) संपूर्ण माहिती चुकीची आहे.समाजातील घडामोडीकडे आणि इतरही सर्व-व्यापी गोष्टीकडे जैन लेखिकांचे बारीक लक्ष्य होते हे कौतुकास्पद तर आहेच पण आश्चर्यकारकही आहे.

### ७.९ व्यक्तिपरिचयात्मक लेखन :-

जैन समाजाची सुधारणा व्हावी, इतर समाजाच्या तुलनेत तो कुठेही कमी पडू नये. व्यापार उद्योगात त्याची भरभराट व्हावी, शेतकऱ्याची अर्थिक परिस्थिती सुधारावी, राजकारण, समाजकारण सारख्या विविध क्षेत्रात त्यांना संधी मिळण्यासारखी वातावरण निर्मिती व्हावी, स्त्री शिक्षणाचा विकास घडवून आणावा. धर्म आचार, विचार, शिक्षण यामध्ये जैन समाज प्रगत व्हावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केलेल्या व्यक्तीचा परिचय समाजाला व्हावा , विषेशत: तरुण पिढीला व्हावा म्हणून लेखिकांनी हे लेखन केलेले आहे. विशेष म्हणजे स्त्री-पुरुष असा भेद न करता उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय आपलेपणाने करुन दिलेला आहे.त्यांचे कार्य मोकळया मनाने नव्हे तर अभिमामाने समाजापुढे आणले आहे.अद्दितीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा परिचय जसा दिलेला

आहे.तसे सर्वसामान्य व्यक्तीचा परिचयही करुन दिलेला आहे.लेखावर नाव नसल्यामुळे काही परिचयात्मक लेख कुणी लिहलेत समजत नाहीत.

२८ ऑगस्ट १९३४ च्या अंकात सौ. सुलोचना भोकरे यांनी धर्मचंद्रिका ब्रम्हचारिणी कंकुबाईचा परिचय करून दिलेला आहे.मुलींच्या शाळेत जाणारी गुजर मंडळीतील ती पहिली महिला होय.समाजातल्या अंधश्रध्देपोटी, चुकीच्या समजुतीसाठी त्यांना खूप त्रास सोसावा लागला.नाहक हेटाळणी झाली.तशात कमी वयात वैधव्यही आले.त्यानंतर त्यांनी शिक्षण घेतले.मराठी,, गुजराती,, हिंदी,, संस्कृत,, कानडी एवढया भाषा त्यांना येत होत्या.त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. २५ वर्ष नियतकालिकामधून लेखन केले. भाषण केले. त्यांचा जन्म १८३२ चा आहे. यावरून त्यांच्या कार्याची तपस्या लक्षात येते. कंकुबाईंना जैनातल्या 'रमाबाई रानडे' म्हटले जाते.आपली स्वत:ची संपूर्ण इस्टेट त्यांनी धर्मकार्यासाठी खर्च केले.शेवटी त्यांना 'धर्मचंद्रिका' या पदवीने सन्मानित केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या निधनानंतर डॉ.सरोजनी बाबर यांनी 'स्मृतीचिन्हे!' (१ जून १९५९)[४७] म्हणून कर्मवीरांच्या आठवणी सांगितल्या आहेत. कर्मवीर जैन आहेत पण बहुजन समाजासाठी,, त्यांच्या शिक्षणासाठी भरीव अशी कामगिरी त्यांनी केली आहे.एका लेखिकेच्या सिध्दहस्त लेखणीतून उतरलेल्या आठवणी म्हणजे कर्मवीर आण्णांचे साधे-सुधे-स्वच्छ-सरळ जीवनदर्शन म्हणावे लागेल.

पं.सुमतिबाई शहा यांचे वडील नेमिचंद शहा..म्हणजेच दादा होय. त्यांचे चित्रदर्शी व्यक्तिमत्त्व विद्युलता शहा यांनी (८ फेब्रुवारी १९६०)[४८] च्या अंकात लिहिले आहे.पहिली आर्कि टेक्ट जैन महिला म्हणून (२२ जून १९६४)[४९] च्या अंकात सौ.स्मितताई बक्षी यांचा परिचय बातमी या सदरात प्रसिध्द झालेला आहे. 'देशप्रेमी: धर्मप्रेमी: समाजप्रेमी- श्रीमती कळंत्रे आक्का' यांचा परिचय प्रसिध्द झालेला आहे पण लिहिणाऱ्याचे नाव नाही.अभिमानास्पद परिचय इथे करुन दिलेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे पहिले अर्थमंत्री, दिवाण बहाद्दूर बॅरिस्टर आण्णासाहेब लठ्ठे यांचा परिचय (८ डिसेंबर १९८५)[५०] सौ.प्रेमलता गुंडे यांनी करुन दिलेला आहे. एक थोर देशभक्त आणि श्रेष्ठ

दर्जाचे कार्यकर्ते , दक्षिण भारत जैन सभेचे संस्थापक,गाढे अभ्यासक , लेखक म्हणून त्याचा परिचय महत्त्वपूर्ण आहे. पहिल्या क्रांतिकारक जैन महिला म्हणून (६ जून १९८८)[५१] इंदूमती गोयनका यांचा परिचय प्रसिध्द झालेला आहे. पण लेखकाचे नाव नाही. सौ त्रिशला सुरेश होरे यांनी 'रयतमाऊली' सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (७ मे १९९१)[५२] यांच्या विषयी लिहिले आहे. डॉ. पद्मजा पाटील यांनी " श्रीमती राजमती पाटील स्वातंत्र्य लढयातील झुंजार क्रांतीकारक महिला" असा दीर्घ लेख लिहून त्यांच्या स्वातंत्र्य लढयाच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे.

**७.१० भाषणातून उद्बोधनपर लेखन.**

दक्षिण भारत जैन सभेची स्थापना १८९८ साली झाली. त्याच वर्षी स्तवनिधी येथे पहिले अधिवेधन भरले. त्यावेळेला एकमेव जैनसाक्षर स्त्री खानेसुमारीत नोंद झालेल्या गोंदूताई उपाध्ये या होत्या. 'स्त्री शिक्षण' या विषयावर त्यांनी छोटासा निबंध लिहून आणून या अधिवेशनात वाचला. पुढील अधिवेशनात गोंदूबाईच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाने स्वतंत्र जैन महिला परिषदेची स्थापना झाली आणि पुढे प्रत्येक वर्षी अध्यक्षपदावरून स्त्रिया भाषण करू लागल्या. यातील काही भाषणे 'प्रगती आणि जिनविजयाच्या' अंकातून प्रसिध्द केली गेली. आणि स्त्रीविकासाला, प्रगतीला मोठा हातभार लागला. दक्षिण भारत जैन महिला परिषद अधिवेशनाच्या वेळी मांडलेले विचार 'प्रगती..." ने समाजापर्यंत जाऊन पोहचवले. आणि त्यामुळेच स्त्रियांचे विचार पुरुषांपर्यंतही जाऊन पोहचले.

ज्या काळात स्त्री शिक्षणाचा प्रसार झालेला नव्हता. जैन स्त्रिया मांजघरातल्या कोषातच होत्या. अशा काळात स्त्रिया सभेला जाऊ लागल्या, सभेत बोलू लागल्या ही फार मोठी क्रांती होती. जैन समाजाच्या दृष्टीने हे पाऊल खूप मोलाचे आणि परिवर्तनाच्या वाटेवर महत्त्वाचे सुचिन्ह होते. सुरवातीच्या काळामध्ये सर्वच महिला अध्यक्षांनी भाषणामधून स्त्री शिक्षण, कन्याविक्रय, बालविवाह , वृध्दबालिका विवाह , हुंडा, विधवांच्या समस्या, परित्यक्त त्यांचे प्रश्न वगैरे गोष्टी भाषणातून समाजासमोर आणल्या. ७२ व्या अधिवेशनापर्यंत सातत्याने याच घटना घडल्या. पण बेल्लद बागेवाडी येथे ७२ वे अधिवेशन भरले. त्या अधिवेशनच्या अध्यक्षा श्रीमती रतनबाई पाटील म्हणाल्या "दक्षिण भारत जैन सभेला ९२ वर्षे झाली . पण अजूनही मुलीचा लग्न खर्च, तिचे संरक्षण, हुंडा, विधवा, विवाह समस्या , परित्यक्त त्यांचे प्रश्न संपले नाहीत. ३ मार्च १९९२ च्या

अंकात  हे छापले आहे. याचाच अर्थ अधिवेशन , भाषणे आणि समाज एकत्र आलेले नाहीत. भाषण भासणात गुंडाळली गेली. अधिवेशनाच्या ठिकाणी नुसती भाषणे राहिली आणि समाज घराच्या चार भिंतीत रिवाजात बसला.

सौ. चंचलाबाई रावसाहेब शहा (३० जुलै १९४१)[५३] यांचे भाषण विषयाची व्याप्ती वाढणारे वाटते. स्त्री शिक्षण, कन्याविक्रय, हुंडा वैगेरे प्रश्नांच्या पुढे जाऊन आपली मते मांडली आहेत. थोडे वैचारिक परिवर्तन झाल्यासारखे वाटते. स्त्रिया शिकायला लागल्या आहेत. पण शिक्षणाने खरचं त्या सुशिक्षित झाल्या आहेत का हा प्रश्न त्यांना पडला आहे. 'आत्मपरिक्षणाचा काळ आता आला आहे' असे सांगून मंदिराच्या चार भिंतित आता धर्म राहिला नसल्याचे आपले स्पष्ट मत त्यांनी बोलून दाखविले आहे.

१९४६ साल ही स्वातंत्र्याच्या पहाट. या स्वातंत्र्याच्या पहाटे पं.सुमितीबाई शहा यांनी तर महिलांना राजकीय क्षेत्रात उतरण्याचे आवाहन केले आहे.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर (१९५५) 'स्वातंत्र्य मिळाले पण आता राष्ट्राची उन्नती करायला हवी' हे सांगताना अनंतमती नागावकर यांनी बायकानां चकाटया पिटण्यापेक्षा काम करण्याचे आवाहन केले आहे.

काळाबरोबर नवी दृष्टी आल्याचे जाणवते.पण भाषण जसे जोशात हवे तसे ते नसल्याची हुरहुर मनाला लागते. स्त्रीविषयक, सामाजिक, वैचारिक लेखामध्ये जाणवणारा तोचतोपणा इथं परत परत आल्यासारखा वाटतो. हे वाटणे स्वाभाविक आहे.कारण दिवस, महिने, वर्ष पुढे सरकली तरी समाजजीवनातील स्त्रीसमस्या तशाच थंडीने कुडकुडत असल्यासारख्या आहेत. स्त्रियांचे रहाणीमान बदलले,, बाह्यरूप बदलले,, केशभूषा, वेषभूषा बदलली तरी स्त्रीजीवनाचा चेहरा,, त्यांचे स्थान, त्यांचे प्रश्न तेच राहिल्याने परिवर्तनाची ऊब जैन स्त्रियांना मिळालीच नाही.

बऱ्याच कतृत्ववान महिला अधिवेशनाच्या अध्यक्षा म्हणून निवडल्या गेल्या आहेत.त्यामुळे त्यांचे विचार रोखठोक आणि ठाम आहेत.पण काही वयाने अधिक असलेल्या अध्यक्षा ह्या प्रतिष्ठित, धनिक, समाजकार्य करणाऱ्या पुरुषांच्या पत्नी आहेत. धार्मिक गोष्टीभोवतीच, पाप, पुण्य, मंदिराभोवतीच त्यांचे भाषण फिरत राहिले आहे.

महिलांच्या उच्चशिक्षणाविषयी,, आरोग्याविषयी,, पुरूषप्रधानतेविषयी,, आर्थिक स्वावलंबनाविषयी,, व्यावसायिक शिक्षणाविषयी,, जाती,, धर्म,, स्पृश्य,, अस्पृश्य,, नातेसंबंध,, वाचन,, सौंदर्य,, आरोग्य इ. विषयी अध्यक्षा फारशा बोललेल्या आढळत नाहीत.

**७.११ निष्कर्ष :**

१) 'प्रगती आणि जिनविजय' या मासिकाने जैन स्त्रियांसाठी वैचारिक व्यासपिठ निर्माण करुन दिले. यातील लेखिकांना जे रूचेल , जे पटेल, जे वाटेल ते त्यांनी निर्भिडपणे लिहिले आहे.

२) अनेक महिलांना, नवशिक्षीतांना लिहिते करण्याचे काम 'प्रगती जिनविजयने केले आहे. जैन साहित्याचा छोटासा का असेना पण हा प्रवाह मराठी साहित्यात आणण्याचे महत्त्वाचे योगदान 'प्रगती जिनविजयला' जाते.

३) स्वातंत्र्यपूर्व काळात आणि त्यानंतर जैन लेखिकानी प्रचलित रूढी परंपरेविरोधात आपली लेखणी न कचरता चालवलेली आहे. वाचताना वाचकाला घायाळ केले आहे. विचारप्रवृत्त केलेले आहे.

४) प्रा. सौ. लीलावती जैन व वासंती शहा याचे सामजिक लेखन समाजाला दिशादर्शक आहे. कळसा प्रकरण , शिरपूर घटना यावरचे त्यांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी पोषक आहेत. समाजपरिवर्तनाची गरज त्यांनी तळमळीने मांडलेली आहे.

५) जैन धर्मातल्या चुकींच्या गोष्टीवर , घटनेवर भाष्य करताना सुधारणावादी विचारानां चालना देण्याचे , वैचारिक शिथिलता झटकण्याचे काम करताना "जैन धर्म हा विश्व धर्म आहे" हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६) संततीनियमन सारखा नाजूक विषय स्वातंत्र्यपूर्व काळात हाताळला गेला.

७) पुरुष प्रधान समाजव्यवस्थामध्ये स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम स्थानावर राहिले आहे. जैन संस्कृतीही त्याला अपवाद नाही. जैन समाजामध्येही स्त्री दुय्यम स्थानावरच आहे. धर्म संस्कृतीमध्ये तिचे स्थान पटवून देण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

८) संस्कारमूल्ये जोपासताना संशोधनाची कास धरणाऱ्या लेखिका समाजमनाचा तळ शोधून अभ्यासपूर्ण विवेचन करताना दिसतात.

९) स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मोठया मनाने व अभिमानाने समाजापुढे परिचय आणलेला आहे. यात अव्दितीय कार्य करणाऱ्या व्यक्तींबरोबर सामान्य व्यक्तींचा परिचयही करुन दिलेला आहे.

१०) धार्मिक गोष्टीभोवती फिरणाऱ्या भाषणांचा अभ्यास केल्यावर अधिवेशन भाषण आणि समाज एकत्र आलेले नाहीत हे लक्षात येते.

**७.१२ संदर्भ टीपा**


१), सौ.महाजन रत्नप्रभा, 'सुधारलेले लग्न', प्रगती आणि जिनविजय, १९ नोव्हेंबर १९३५.

२) डॉ.पांगळ विजयालक्ष्मी, 'जैन समाजाची एकता', प्रगती आणि जिनविजय, १० जाने १९६६.

३) सौ.शहा वासंती, 'आत्मलक्ष्मी साधूची लक्षणे', प्रगती आणि जिनविजय, ९ मे १९८३.

४) 'मिस्.गांधी एस्.एन.,पंढरपूर, 'विधवा स्त्रियासंबंधी समाजाने पाळावयाची कर्तव्ये', प्रगती आणि जिनविजय, ३० आक्टो १९३४.

५) कु.ढेरे वसुंधरा, 'प्रौढ विवाह समस्या', प्रगती आणि जिनविजय, १३ जुलै १९५९.

६) सौ.भोकरे सुलोचनाबाई, 'स्मृती', प्रगती आणि जिनविजय, ५ ऑक्टों १९५९.

७) सौ.चौधरी सुमन, 'क्रांतीकारक निकाल', प्रगती आणि जिनविजय, १ जून १९८७.

८) सौ.मोहिते शरयू शरद, पुणे, 'जैन कासार समाज मृत्यूच्या छायेत', प्रगती आणि जिनविजय, ५ डिसेंबर १९९०.

९) सौ.गडेण्णावर अनुराधा, 'आमच्या सामाजिक जाणीवा विस्तारल्या पाहिजेत', प्रगती आणि जिनविजय, १७ सप्टें १९९१.

१०) कु.भोकरे सुलोचना, 'संतती नियमन', प्रगती आणि जिनविजय, १२ जुन १९३४.

११) सौ.शहा चंचलाबाई, 'अमृततुल्य बोल', प्रगती आणि जिनविजय, १७ सप्टेंबर १९६३.

१२) सौ.शहा वासंती, पुणे, 'समाजधुरीण या विषयाकडे लक्ष पुरवतील काय', प्रगती आणि जिनविजय,२८ जानेवारी १९६३.

१३) सौ.शहा वासंती, 'विचारवंत थोडे-क्रियाकांडवादीच जास्त!', प्रगती आणि जिनविजय,१९ सप्टेंबर १९८१.

१४) सौ.शहा वासंती, पुणे, 'धार्मिक क्रिया समाजहिताची असावी', प्रगती आणि जिनविजय, १ मार्च १९८२.

१५) बेग तारा अली, 'सामाजिक कलंक-हुंडा पध्दती!', प्रगती आणि जिनविजय, २० ऑगष्ट १९८२.

१६) सौ.चौधरी सुमन, 'अमानुष केवळ अमानुष', प्रगती आणि जिनविजय, ५ ऑक्टोंबर १९८७.

१७) सौ.गुंडे प्रेमलता, 'केवढे हे कौर्य', प्रगती आणि जिनविजय, ७ मार्च १९८८.

१८) सौ.सुर्यवंशी जयश्री सुरेंद्र,'स्त्री आणि स्त्रीवरचा मनुवादी अन्याय', प्रगती आणि जिनविजय, १४ फेब्रुवारी १९८५.

१९) सौ.चौधरी सुमन, 'व्रतवैकल्य एक चिंतन', प्रगती आणि जिनविजय, ५ मे १९८६.

२०) सौ.शहा वासंती, 'भट्टारक संस्थेचा मूळ उद्देश आणि आजचे भट्टारक', प्रगती आणि जिनविजय, २२ फेब्रुवारी १९८२.

२१) सौ.शहा वासंती, 'ही कोंडी आता फुटलीच पाहिजे', प्रगती आणि जिनविजय, २० जून १९८३.

२२) सौ.शहा वासंती, 'जिकडे धर्म तिकडे विजय', प्रगती आणि जिनविजय, १२ डिसें १९८३.

२३) प्रा.जैन लीलावती,, 'मूर्तीवर संस्कार ही केवळ कवि कल्पना', प्रगती आणि जिनविजय, २१ फेबुवारी १९८९.

२४) श्रीमती कळंत्रे, भ्रतार चारुदत्त, सांगली, 'स्त्री शिक्षण आणि त्याचे महत्त्व', प्रगती आणि जिनविजय, २८ एप्रिल १९८२.

२५) सौ.भोकरे सुलोचना, 'चांदणीत तूप', प्रगती आणि जिनविजय, ३१ डिसेंबर १९३५.

२६) सौ शहा चंचलाबाई, 'आजचे स्त्री जीवन', प्रगती आणि जिनविजय, २९जानेवारी १९४१.

२७) सौ.शहा चंचलाबाई, 'वैवाहिक जीवन व वैवाहिक स्त्रियांचे समाज कार्य', प्रगती आणि जिनविजय, १ जून १९४६.

२८) सौ.शहा वासंती, 'जैन संस्कृतीमध्ये स्त्रीचेस्थान', प्रगती आणि जिनविजय, ५ सप्टेंबर १९८३.

२९) 'सौ.चौधरी सुमन', 'अमानुष केवळ अमानुष', प्रगती आणि जिनविजय, ५ आक्टोंबर १९८७.

३०) 'सौ.गुंडे प्रेमलता', 'मुलगी झाली हो', प्रगती आणि जिनविजय,२ मार्च १९८७.

३१) 'सौ.गुंडे प्रेमलता', 'कुटुंब न्यायालये', प्रगती आणि जिनविजय,२ एप्रिल १९८८.

३२) सौ.गुंडे प्रेमलता, 'स्त्रियांची सामाजिक व राजकीय स्थिती', प्रगती आणि जिनविजय, ६ मार्च १९९०.

३३) सौ. भोकरे सुलोचना, 'रांगोळी', प्रगती आणि जिनविजय, २४ एप्रिल १९३४.

३४) सौ.शहा वासंती, 'अक्षय तृतीया', प्रगती आणि जिनविजय, ७ मे १९८४.

३५)'सौ.गुंडे प्रेमलता', 'आपले सण', प्रगती आणि जिनविजय,५ सप्टेंबर १९८८.

३६) डॉ. चौगुले सुमति, 'अशी घ्या बाळाची काळजी', प्रगती आणि जिनविजय, ३ मे १९८५.

३७) डॉ.नाडकर्णी नलिनी, 'विशीत ज्या डोळस त्यांचा चाळीशीत कळस', प्रगती आणि जिनविजय,६ जुलै १९८७.

३८) प्रा.हातकणंगलेकर रेवती, 'बालकांचा मानसिक विकास', प्रगती आणि जिनविजय,२ नोव्हेंबर १९८७.

३९) डॉ. केळकर रोहिणी, 'दिल जलता है', प्रगती आणि जिनविजय, १९ आक्टोंबर १९९९.

४०) सौ.मसाळकर कांताबाई, 'श्रुतपंचमी', प्रगती आणि जिनविजय, ४ जून १९३५.

४१) सौ. भोकरे सुलोचना, अंनतमती लेखिका कोण?', प्रगती आणि जिनविजय, ६ नोव्हेंबर १९३४.

४२) डॉ.सौ.पांगळ विजयालक्ष्मी, 'अकबर आणि जैन धर्म', प्रगती आणि जिनविजय, ३ फेब्रुवारी १९६४.

४३) आर्यिका जिनदेवी माताजी, 'समाधीमरण', 'प्रगती आणि जिनविजय', १० ऑगष्ट १९८७.

४४) प्रा.डॉ.सौ कौलगुड अरूणा, ,मुबंई, 'महिला मनुष्यबळ विकास -आजची नितांत गरज', प्रगती आणि जिनविजय, ४ मे १९८७.

४५) सौ गुंडे प्रेमलता 'उपेक्षित जैन इतिहास', प्रगती आणि जिनविजय, ७ फेब्रुवारी १९८९.

४६) सौ.चावरे मंदोदरीबाई, 'इतिहास शुध्दिकरण', प्रगती आणि जिनविजय, २८ ऑगष्ट १९४०.

४७) डॉ.बाबर सरोजनी, 'स्मृतीचिन्हे!', प्रगती आणि जिनविजय,१ जून १९५९.

४८) सौ.शहा विद्युलता, 'नेमिचंद शहा', प्रगती आणि जिनविजय, ८ फेब्रुवारी १९६०.

४९) सौ.बक्षी स्मितताई, 'बातमी', प्रगती आणि जिनविजय,२२ जून १९६४.

५०) सौ.गुंडे प्रेमलता, 'बॅरिस्टर आण्णासाहेब लठ्ठे', प्रगती आणि जिनविजय, ८ डिसेंबर १९८५.

५१) अनामिक , 'इंदूमती गोयंका', प्रगती आणि जिनविजय, ६ जून १९८८.

५२) सौ. होरे त्रिशला सुरेश, 'रयतमाऊली', प्रगती आणि जिनविजय, ७ मे १९९१.

५३) सौ.शहा चंचलाबाई रावसाहेब, 'भाषण', प्रगती आणि जिनविजय,३० जुलै १९४१.

# उपसंहार

समाज काळानुसार बदलत जातो. त्याची वाटचाल प्रगतीतून उन्नतीकडे होत जाते. हा विचार २० व्या शतकातील दृष्टीकोनातून पाहिल्यास खूप महत्त्वाचा ठरतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने स्वतंत्रपणे विकासाचे ध्येय ठरवले. परिवर्तनाच्या टप्प्याने भारताचा चेहरा मोहरा बदलून टाकला. स्त्रियांच्या जडणघडणीत, विकासात हा टप्पा खूप महत्त्वाचा ठरला आहे. जैन समाज आणि जैन स्त्रिया यांच्या विकासाची वाटचाल प्रगतीतून उन्नतीकडे होत जाताना यशाचा आलेख चढता राहिला.

दक्षिण भारत जैन सभेची स्थापना झाली. या सभेच्या अनेक शाखा निघाल्या. यातून अधिवेशन होऊ लागली. महिला परिषदेचा सहभाग महत्त्वाचा ठरला. नवीन विचार, नवीन जागृती, नवीन जाणीवा यातून प्रगति आणि जिनविजयचा जन्म झाला. समाजाचा पारदर्शी आरसा बनून समाज जीवनाचे दिशादर्शक बनण्याचे काम 'प्रगति' ने केले. जैन स्त्रियांच्या विकासाचे अंतरा अंतराचे टप्पे यातून स्पष्टपणे दिसू लागले. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन उंचावत गेला. स्त्रियांना स्वत:चे आत्मभान आले. जगण्याची दिशा मूळ धरू लागली. यातूनच स्त्रिया बदलू लागल्या. सामर्थ्याचे भान, आत्मविश्वास, ध्येयनिश्चिती आणि त्यासाठीचे प्रयत्न म्हणजेच आज दिसणारे त्यांचे विविध क्षेत्रातील पदार्पण होय.

दक्षिणेकडील जैन समाज हा प्रामुख्याने शेतीप्रधान आहे. खेडयापाडात जास्त विखुरलेला आहे. इतर समाजातील सुधारक स्त्रियांप्रमाणेच जैन समाजातील स्त्रियांनीही समाजकारण, राजकारण, साहित्य, शिक्षण, कला, क्रिडा, खेळ, संगीत, नाटय, अभिनय, योग, ज्ञान, विज्ञान, धर्म, सेवा वगैरे क्षेत्रात आपले नाव कमावलेले आहे. संग्रामातही स्त्रिया कमी नाहीत.

एका मोठया कालखंडातल्या १०० वर्षातल्या जैन स्त्रियांच्या विकासाचा, वेदनांचा आढावा घेताना प्रगति आणि जिनविजय मधील बातम्या बोलक्या झालेल्या आहेत. स्त्रियांच्या संदर्भात जैन समाजामध्येही अनेक सामाजिक प्रश्न होते. (काही प्रमाणात ते आजही आहेतच). स्त्री शिक्षण, बाल विवाह, विधवा विवाह, स्त्री अपेक्षा, तिचा छळ, कोंडमारा, .... किती तरी प्रश्नांना स्त्रियांना तोंड द्यावे लागत होते. दिवाणबहाद्दूर बॅरिस्टर आण्णासाहेब लट्ठे, डॉ.आदिनाथ उपाध्ये, आदिराज उपाध्ये, बा.बु.पाटील, किर्तन सम्राट तात्यासाहेब चोपडे तसेच गोदूबाई उपाध्ये, ज्ञानमतीबाई लट्ठे, श्रीमती कळंत्रे आक्का, पद्मश्री सुमतीबाई शहा या सारख्या अनेक जैन

समाजसुधारक स्त्रीपुरुषांनी ही सामाजिक कोंडी फोडण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न केला. जैन स्त्रियांना शिक्षणाच्या वाटा मोकळया करून त्यांना आत्मनिर्भर केले आणि जैन स्त्रियांनीही त्यांच्या प्रयत्नाचे सोने केले.

'प्रगति आणि जिनविजय' मध्ये स्त्रियांविषयी, त्यांच्या प्रश्नांविषयी, समस्यांविषयी पुरुषांनीही विपूल लेखन केलेले आहे. संपादक बा.भु.पाटील, दि.ब.आण्णासाहेब लट्ठे, आ.बा.पाटील, जी.के पाटील, बी.बी.पाटील, वा.दु.दुधाळे, बी.बी. मालगावे, डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे अशा अनेक विचारवंतांनी स्त्रीप्रबोधन, मार्गदर्शनात्मक लेखन केलेले आहे. 'प्रगति आणि जिनविजय' चा विचार करता पुरुष लेखकांनी विविधांगी, भरपूर, सडेतोड, वास्तववादी, डोळयात अंजन घालणारे लेखन केले आहे. पण आपल्याला फक्त स्त्रियांनी लिहिलेल्या लेखनाचा इथे विचार करावयाचा आहे.

जैन स्त्रियांनी पुरुषांच्या तलनेत एकूण १०० वर्षांच्या कालखंडात 'प्रगति आणि जिनविजय' मध्ये खूप कमी म्हणजेच १६ ते १७ टक्के लेखन केलेले आहे. एकूण ७७५ लेख लिहिले आहेत. एकेक लेख किंवा एखादी दुसरी कथा, कविता लिहिणाऱ्या लेखिकांची संख्या भरपूर असून हीच संख्या अधिकतर आहे. सौ. प्रेमलता गुंडे (६६), सौ. सुलोचना भोकरे (५७), वासंती शहा (५२), सौ. सुमन चौधरी (२६), डॉ.विजयालक्ष्मी पांगळ (२३), शरयू दफ्तरी (१३) यांची नावे जास्तीत जास्त लेखन करणाऱ्या स्त्रियांमध्ये घ्यावी लागतील.

परत लेखांची वर्गवारी विभागानुसार करावयाची म्हटले तर वैचारिक आणि सामाजिक मध्ये वासंती शहा यांनी (३३, १४) एवढे जास्त लेख लिहिले आहेत. धार्मिक मध्ये डॉ. विजयालक्ष्मी पांगळ (७) यांचा अग्रक्रम लागतो. स्त्रीविषयक, गृहिणी संबंधी, व्यक्ति परिचय मध्ये सौ. प्रेमलता गुंडे यांनी सर्वात जास्त (१०, ६, १३) एवढे लेखन केले आहे. आरोग्य विभागात सौ. शरयू दफ्तरी यांनी (७) जास्त लेखन केलेले आहे. कथेमध्ये सुलोचना भोकरे (६), कवितेमध्ये श्रीमतीबाई गरगट्टे (१०), प्रवासवर्णन गंगूबाई आरवाडे (३), ग्रंथ परिक्षण सुलोचना भोकरे (६), भ. महावीरांवर उषाताई मगदूम (३) असे लेख लिहिले आहेत. तर....कुदंकुदांवर फक्त दोन (सुलोचना पाटील, नंदप्रभा पाटील), शांतिसागरांवरही दोन (सुरेखा हुक्केरी, प्रेमलता गुंडे), प्रज्ञावती वर प्रेमलता गुंडे यांनी फक्त एकच लेख लिहिला आहे. 'भाषण' विभागातील भाषण करणाऱ्या स्त्रिया अपवाद सोडता वेगवेगळया असून त्यामधील थोडया लेखिका आहेत.

१९७७ ते १९८७ हे दशक स्त्रियांनी केलेल्या लेखनाचा सुवर्णकाळ म्हणता येईल. सर्वात जास्त लेखन स्त्रियांनी या कालखंडात केलेले आहे. विविध प्रकारात एकूण २८५ लेख लिहून या दशकात उच्चांक गाठला आहे. १९८८ ते २००२ हा १४ वर्षांचा कालखंड दुसऱ्या क्रमांकावर येतो. या कालखंडात १८९ लेख लिहिले गेले आहेत. १९२० ते १९३२ या सुरुवातीच्या काळात सर्वात कमी लेख (११) आहेत. स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने मागासलेपण असल्यामुळे स्त्रियांनी लेखन कमी केलेले आहे. हे आपण समजावून घेऊ शकतो. १९३४ ते १९४४ या दशकात विपूल लेखन म्हणजे १२९ लेख अभ्यासाला मिळाले. पण त्याचा पुढचा कालखंड १९४५ ते १९५५ या दशकात फक्त १६ लेख अभ्यासता आले. स्वातंत्र्याच्या दशकात एवढी उदासिनता का ? हा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही. १९३५ ते १९३९ या पाच वर्षांच्या कालखंडात एकही अंक वाचण्याच्या सुस्थितीत नाही. १९४० ते १९४४ या पाच वर्षांच्या कालखंडाला (१२९ लेख) लेखनाचा सुवर्ण काळ म्हणता येईल.

१९४२ ते १९५२ हा कालखंड 'प्रगति आणि जिनविजय' च्या इतिहासातील महत्त्वाचा कालखंड होय. हा कालखंड स्वातंत्र्य संग्रामाचा, जाज्वल्य देशभक्तीचा कालखंड आहे. तर याच कालखंडात तडफदार, स्पष्ट, परखड, आक्रमक लिहिणारे संपादक म्हणून जी.के.पाटीलनी आपली कारकीर्द गाजवली आहे. 'प्रगति आणि जिनविजय' मधले लेख अक्षरश: जगणारे जी.के.पाटील हे या कालखंडात ७ वर्षे संपादक होते. या कालखंडात स्त्रियांनी १६ लेख लिहिले आहेत. स्त्रियांची लेखणी या कालखंडात बहरली नाही याचे आश्चर्य वाटते. या आधी स्त्रियांनी भरपूर लेखन केलेले आढळते.

एक महत्त्वाची गोष्ट सौ. सुलोचना भोकरे यांनी १७ ऑक्टोबर १९५७ च्या अंकात 'आठवण' म्हणून सांगितली आहे. 'प्रगति आणि जिनविजय' च्या 'संपादक मंडळाची नेमणूक' हा विषय १९३४ साली स्तवनिधी येथे द. भा. जैन सभेच्या अधिवेशनात आला. तेव्हा कळंत्रे आक्कांनी संपादक मंडळात 'स्त्री लेखिकेला घ्यावे' ही आदिनाथ उपाध्ये यांची इच्छा बोलून दाखवली. 'बायकांना असले अवघड काम जमणार कसे ?' असा सवाल एका सद्गृहस्थानी त्यावेळेला रागाने केला. कारण स्त्रियांनी फक्त चूल आणि मूल सांभाळण्याचा तो काळ होता. पण अशा काळात १९३७ साली कु. सुलोचना उपाध्ये (नंतरच्या भोकरे) या सहसंपादिका झाल्या. याच

दशकात स्त्रियांनी लिहिण्याचा उच्चांक गाठून एक प्रकारे 'आम्ही स्त्रियाही लिहू शकतो. विचार करु शकतो. आम्हालाही बुद्धी आहे. मांडणी कौशल्य आहे' हे दाखवून दिले.

ज्या काळात स्त्रियांची अक्कल गुडघ्याखाली असते असा समज होता. विचार आणि बुद्धीही स्त्रियांना नसतेच. असा समाजात विचार होता. याच काळात स्त्रियांनी 'प्रगति' मध्ये झपाटून लेखन केलेले आहे. पुरुषी दुराग्रहाला चक्क मोडीत काढलेले आहे. १०० वर्षांच्या कालखंडात स्त्रियांनी जास्तीत जास्त लेखन 'वैचारिक' मध्येच केलेले आहे. १७६ वैचारिक लेख लिहून त्यांनी आपली विचार प्रगल्भता सिद्ध केली आहे. १९७७ ते १९८७ च्या दशकात सर्वाधिक म्हणजे ८२ वैचारिक लेख लिहून उच्चांक गाठला आहे. स्त्री विषयक १९६ लेख, सामाजिक ५४ लेख लिहून समाज भान असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

प्रवास वर्णन खूप कमी फक्त ९ लेख लिहिले गेले. कविता या प्रकारात (९७ कविता) लिहिल्या गेल्या. १९८८ ते २००२ या चौदा वर्षांच्या काळात स्त्रियांची उन्नती झाली. स्त्रिया जास्त प्रमाणात शिकल्या. नोकरी करू लागल्या. अर्थोत्पादन करून स्वावलंबीही झाल्या. पण एकूण स्त्री विकासाच्या प्रगतीच्या मानाने या काळात लेखन कमी झालेले आहे. आज निरीक्षणाअंती खेदाने असे म्हणावेसे वाटते की, जैन समाजामधील स्त्रिया खूप थोडया प्रमाणात बदलल्या. त्यांच्यात परिवर्तन झाले. पण खेडयापाडयातील बहुसंख्य स्त्रिया या शिक्षित झाल्या पण परिवर्तन, प्रबोधनापेक्षा, विज्ञानवादापेक्षा कर्मकांडात जास्त आजही गुरफटल्या जात आहेत. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

'प्रगति आणि जिनविजय' मध्ये शहरी, ग्रामीण, शिक्षित, अल्प शिक्षित, पदवीधर, डॉक्टर, इंजिनिअर, वकील सर्व भागातून, सर्व स्तरातून, संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक आणि थोडया फार इतर राज्यातील स्त्रियांनीही आपले विचार मांडले. कोल्हापूर, सोलापूर, सातारा, पंढरपूर, पुणे, मुंबई, विदर्भ, मराठवाडा, निपाणी, बेळगांव, धारवाड वगैरे चोहो बाजूंच्या स्त्रियांनी आपले योगदान प्रगतिला दिले आहे. वेगवेगळया प्रांतातील लिहिणाऱ्या स्त्रियांची भाषा, मराठी असली तरी त्या त्या प्रांतानुसार वैशिष्ट्यपूर्ण असली पाहिजे. पण ती तशी फारशी दिसत नाही. संपादकीय संस्कारातून ती शुद्ध नागरी केली असावी असे वाटते.

'प्रगति आणि जिनविजय' मधले लेखन म्हणजे जैन समाजाचा आणि जैन स्त्रियांचाही इतिहास आहे. लिहिणाऱ्या काही स्त्रिया सुरवातीला कुमारिका होत्या. लिहिता लिहिता त्या

सौभाग्यवती झाल्या. पुढे श्रीमती झाल्या आणि शेवटी, काळाच्या पडद्याआड ही गेल्या. त्यांचाही हा इतिहास आहे. लिहिणाऱ्या स्त्रियांचे विचार वाचता वाचता अचानक त्यांच्या मृत्यूची बातमी आली की लेखणी निधनवार्तेन हळवी व्हायची. हिच लेखणी सुरवातीचे अंक पाहताना आश्चर्याने थक्क ही व्हायची. विविध प्रकारच्या जाहिराती या वार्तापत्राच्या आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी छापलेल्या असाव्यात. मूळव्याध, वज्रांग वैभव, वज्रांग सुंदर पाक, खात्रीशीर औषधे, संतती प्रतिबंधक तहकुबी गोळ्या, ॲन्सुरन्स कंपनी, मुंबई सारख्या जाहिराती बरोबरच महाताबीज, योगसामर्थ्य उर्फ भानामती (१८ सप्टेंबर १९३४), तपकीर मिडियम सिगारेट (१९ जून १९३४) सारख्या जाहिराती ही यायच्या. या जाहिराती वाचताना मिथ्यात्व, सप्तव्यसनं, सोडायला सांगणाऱ्या, वैज्ञानिकतेचे, धार्मिकतेचे अधिष्ठान असणाऱ्या जैन समाजाच्या मुखपत्राच्या अंकातून या जाहिराती कशा ? असा प्रश्न मनात निर्माण व्हायचा. बैलगाडांच्या शर्यतीची ही बातमी वाचल्यावर जैन श्रावकांना पाहून अहिंसावादी बनलेले मन खिन्न बनायचे.

'प्रगति आणि जिनविजय' ची सुरवात १९०२ साली झाली. पण १९२१ पर्यंतचे अंक अजिबात उपलब्ध झाले नाहित. १९२१ ते १९३२ या कालखंडातील अंक जीर्णावस्थेत मिळाले. जे वाचता येत नव्हते. १९३६ ते १९४२ या कालखंडातील अंक सुस्थितीत उपलब्ध झाले नाहीत. १९५० ते १९५१ या वर्षातील ही अंक खूपच थोडे होते. १९७५ ते १९७७ या कालखंडातील खूपच कमी अंक मिळाले. शिवाय अधले मधले एखादे दुसरे अंक ही उपलब्ध होऊ शकले नाहीत. तरी ही जे अंक मिळाले त्या मधून भरपूर माहिती गोळा करता आली. पण जे अंक उपलब्ध झाले नाहीत त्याची माहिती, त्याचा विचार करता आला नाही. याची खंत मनाला लागूल राहिली.

'प्रगति' मधील बातम्या पाहिल्या म्हणजे वस्तुस्थितीची जाणीव होते. थोडया खर्चात केलेली विवाह, गांधी पद्धतीने केलेली विवाह, तसेच पोट जातीतील विवाह, विधवा विवाह सारख्या पुरोगामी, परिवर्तनीय बातम्यांनी जैन समाजाची उन्नती, प्रगति लक्षात आणून दिली आहे. मात्र त्याच्या उलट स्त्री अन्यायाची, हुंडा बळीची बातमी अजिबातच नसल्याचे पाहून आश्चर्य वाटते. उत्तीर्ण झालेल्या, शिष्यवृत्ती घेतलेल्या, मेरीटमध्ये आलेल्या भरपूर बातम्या आहेत. पण नापासामुळे, अपयशामुळे, शोषणामुळे आत्महत्या केलेल्या बातम्या अपवादाने सुद्धा नाहीत.

जैन समाजामध्ये हळदीकुंकू समारंभाची पध्दत नसतानाही १९३४ साली पुण्याच्या सुगंधाबाई लोणकर यांनी पुण्यात सैतवाल स्त्रियांचा सामुदायिक हळदीकुंकू समारंभ घडवून आणला. एका दिक्षा

घेतलेल्या जर्मन विदुषीला कर्मठ जैन श्वेतांबर श्रावकांनी मंदिरात दर्शन घेण्याला विरोध केला म्हणून तिने ग्वाल्हेर राणीसाहेबांच्या पदरी शिक्षिकेची नोकरी धरली. ही घटना १९३४ मधील आहे. १९३५ मध्ये विधवांनी कुंकू लावावे म्हणून अकोल्याच्या स्त्रियांनी प्रयत्न केला. ब्राम्हण स्त्रियांसारखे खांद्यावर पदर घेतला म्हणून त्या स्त्रीवर बहिष्कार घालावा की काय ? असा प्रसंग १९३४ मध्ये घडला. या बातम्यांवरून २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील जैन समाज मनांची वस्तुस्थिती लक्षात येते. या पार्श्वभूमीवर आजचा समाज खूप बदललेला आहे.

'प्रगति आणि जिनविजय' ला अनेक लेखिकांनी योगदान दिलेले आहे. पण आघाडीच्या लेखिका म्हणून सुलोचना भोकरे, वासंती शहा, प्रेमलता गुंडे, डॉ. विजयालक्ष्मी पांगळ, शरयू दफ्तरी, लीलावती जैन, सुमन चौधरी, यांचा उल्लेख करावा लागेल. विविध विषयात, विविध प्रकारात या लेखिकांनी विपूल लेखन केलेले आहे. निर्भिड आणि परखड विचार मांडणाऱ्या वासंती शहा यांचे लेखन हे समाजातील अनिष्ट रूढी, परंपरेवर ताषेरे ओढणारे आहे. सामाजिक, वैचारिक, प्रकारातील त्यांचे लेखन स्पष्ट, विचारी, पारदर्शी, सडेतोड, भीड भाड न ठेवता परखड मोकळेपणाने आणि पोटतिडकीने लिहिलेले आहे.

धार्मिक अधिष्ठानातही परिवर्तनीय विचारांची बैठक असणाऱ्या बंडखोर विचार निर्भिडपणे मांडणाऱ्या, बोलणाऱ्या स्त्रियांमध्ये पुन्हा वासंती शहा यांचेच नाव घ्यावे लागेल. प्रा. सौ. लीलावती जैन यांनीही समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा व भ्रष्ट मुनींच्या अविचारी वागण्यासंबंधी आणि त्यांच्या शिथिलाचारासंबंधी समाजाचा रोष पत्करूनही आवाज उठवलेला आहे. मिस् गांधी, लीलावती जुनूनकर, कुमुदिनी रोकडे, वनमाला खेमलापुरे, इंदुमती लडगे, नीलम माणगावे सारख्या काही मोजक्या लेखिकांनी अनिष्ट रूढी, परंपरा, स्त्रीस्वातंत्र्य , स्त्रीपुरूष समानता संबधी लिहिण्याचे धाडस केले आहे. इंदूमती लडगे या मुलीने १९३४ साली महाराजांच्या समोरच्या मंदिरातील भाषणात 'मुनी जिथे जातात तिथे धर्माचाच उपदेश करतात. स्त्री शिक्षणासंबंधी ते काही सांगत नाहीत.' असे बोलून 'मुनींनी स्त्री शिक्षणाचा उपदेश करावा.' असे सांगण्याचे धाडस केले. त्यावेळच्या समाजाला हे रूचले नाही. तिला मुनींची क्षमा मागायला लावण्यात आले. १९३४ साली मिस् गांधी नावाची स्त्री 'कुंकू लावणे हा स्त्रियांचा जन्मसिध्द् हक्क आहे मग नवरा वारल्यावर हा हक्क बंद का व्हावा ?' असा वेधडक धाडसी प्रश्न विचारलेला आहे. १९८३ साली सौ. वनमाला खेमलापुरे यांनी मासिक धर्मासंबंधीचे नाजूक प्रश्न सडेतोडपणे विचारले आहेत. याचाच अर्थ 'प्रगति आणि

जिनविजयने' प्रबोधन, जनजागृती करण्याचे काम (कमी प्रमाणात का असेना) केलेले आहे एवढे निश्चित.

१९५० च्या दरम्यान सुलोचना भोकरे ह्या सहसंपादक पदावरून कमी झाल्यानंतर स्त्री लेखनाला मरगळ आलेली दिसते. पुढे ही मरगळ २०/२५ वर्षापर्यंत राहिलेली आहे. १९७०/७५ नंतर मात्र स्त्री लेखणीला नवी झळाळी आलेली आहे. एक निरीक्षण इथे धाडसाने नोंदवावे वाटते की, सभासमारंभाच्या अध्यक्षा काही सन्माननीय अपवाद सोडता सौभाग्यवती स्त्रियाच दिसलेल्या आहेत. तर देणगी देणाऱ्या देणगीदार स्त्रियांमध्ये विधवांची संख्या विपूल आढळली आहे. पतीपत्नी या दोघांच्या नावाने देणगीदार म्हणूनचे प्रमाण खूपच जास्तीचे आहे. सर्व राज्यातील पदार्थांची दखल घेत पाककला विभागही समृद्ध झालेला आहे.

जैन स्त्रियांच्या विचाराला, लेखनाला, त्यांच्या प्रतिभेला 'प्रगति आणि जिनविजय' ने पुरेपूर संधी दिली. सहसंपादिका म्हणूनही स्त्रियांना सन्मान दिला. या संधीचे सोने स्त्रियांनी केले. परंतू एक गोष्ट मात्र मनाला बोचत राहिली ती म्हणजे स्त्रियांची योग्यता असूनही त्यांना संपादकपद मात्र देण्यात आले नाही.

जैन समाज आणि जैन स्त्रियया यांच्या विकासाची वाटचाल प्रगतीतून उन्नतीकडे होतानाचा अभ्यास या प्रबंधातून करता आला. जैन समाज जो धार्मिकतेच्या बाबतीत अतिशय कट्टर आहे. हजारो वर्षापूर्वीच्या धार्मिक परंपरेचे पालन आजही तितक्याच तन्मयतेने करतो अशा अहिंसावादी समाजाच्या चालीरीती,, रूढी-परंपरेचा, समाजाबरोबर बदलणाऱ्या स्त्रिययांच्या मानसिकतेचा त्यांच्या वैचारिक परखड मतांचा अभ्यास करण्याची संधी नविन संशोधकांना मिळेल. 'प्रगती आणि जिनविजय' मधून जैन साहित्यालाही नविन अभ्यासदिशा मिळेल यात शंका नाही.

## संदर्भग्रंथ सूची

१) जोग रा. श्री., 'नियतकालिक वाङमय', मराठी वाङमयाचा इतिहास, खंड - ४ (१८०० ते १८७४), मराठी साहित्य परिषद पुणे प्रकाशन, सन १९९९, पृ. १०३.

२) (संपा.) कुलकर्णी व. दि., मराठी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास' खंड १, (सन १८३२ ते १८८२), मुंबई विद्यपीठ, मुंबई व श्रीविद्या प्रकाशन, पुणे, सन १९८७. पृ. ०२

३) तत्रैव, पृ. ०३.

४) कर्णिक प्रदिप , 'ग्रंथव्यवहारात नियतकालिकांचे स्थान', 'ललित', संपादक, मुद्रक, प्रकाशक : अशोक कोठावळे, ३१६, प्रसाद चेंबर्स, सरस्वती प्रिंटर्स, मुंबई, जून १९९९, अं. ६, पृ. ३५.

५) साठे शरद केशव , आणखी एक तरी सूची मंडळ हवे, महाराष्ट्र टाइम्स्,,, प्रदिप कर्णिक, तत्रैव, पृ. ०४२

६) (संपा.) कुलकर्णी व. दि., नियतकालिक आणि वाङमयेतिहास लेखन, 'मराठी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास' खंड १, (सन १८३२ ते १८८२)

७) परांजपे भा. श्री., 'अर्वाचीन मराठी वाङमयाचा इतिहास', - व्हिनस प्रकाशन, पुणे, सन १९९७, पृ. २७८ - ७९

८) (संपा.) कुलकर्णी व. दि., उनि ; पृ. ०५/०६

९) जोशी छाया व डॉ. जान्हवी, 'संतअर्वाचीन साहित्य समालोचन : नियतकालिक',

(१८०० ते १९५०), मोघे प्रकाशन, पृ. २९.

१०) जाधव रा. ग., 'वैचारिक मराठी नियतकालिके : काही विचार', वाङ्मयीन

परिप्रेक्ष्य, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृती, मार्च २००४, पृ. १३३.

११) (संपा.) खांडगे मंदा, ',स्त्री साहित्याचा मागोवा ः खंड १', साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, पृ.२२.

१२) डॉ.विलास संगवे, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, द.भा.जैन सभा,, कोल्हापूर, १९७६, पृ. २७.

१३) ढवळे वा. रा., 'साहित्य नियतकालिकेचे', साहित्य समालोचन, महाराष्ट्र

प्रकाशन संस्था, मुंबई, पृ. १३५.

१४) तर्खडकर दादोबा पांडुरंग : वैचारिक मराठी भाषेचे व्याकरण, मुंबई, तृतीयावृत्ती, १९५७, पृ. ९ व १०.

१५) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध : उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २२.

१६) तत्रैव : पृ. २७.

१७) देशमुख मा. म. : राष्ट्र निर्माते, शिवभारती प्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, १९९२, पृ. ३.

१८) चंदनशीव भास्करतत्रेव, पृ. ९८.

१९) तत्रैव : पृ. १२.

२०) फडके (डॉ.) य. दि. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ६७.

२१) तत्रैव, खंड ६, पृ. ४७१.

२२) तत्रैव : पृ. ४८२.

२३)आगरकर गोपाळ गणेश : आगरकर वाङ्मय खंड १, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९८४, पृ. ७.

२४) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती २००९, पृ. १९०.

२५) देशपांडे सुनंदा : गोपाळ गणेश आगरकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८३, पृ. ४०.

२६) तत्रैव : भाग ८, पृ. २५ व २६.

२७) खांडेकर वि. स. : प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण, १९९३, प. २७४.

२८) कोल्हटकर अ. ब. : अच्युतराव कोल्हटकर स्मारक, ग्रंथ भाग १, प्रकाशन : संपादक अनंत हरि गद्रे, मुंबई, प्रथमावृत्ती १९३३, पृ. २१६.

२९)तत्रेव : पृ. २१.

३०) फडके (डॉ.) य. दि. : केतकर लेखसंग्रह, डॉ. श्री. व्यं. केतकर, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, १९७७, प्रस्तावना, पृ. ११.

३१)अळतेकर (डॉ.) म. मा. : तत्रेव, पृ. २०७.

३२) डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २२५.

३३) ताटके अरविंद : सांोधक सप्तर्षि, इनामदार बंधू प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६२, पृ. ४२.

३४) तत्रैव : पृ. २.

३५) तत्रैव : पृ. १०५.

३६) कीर धनंजय : म. जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती, १९९६, पृ. २६२.

३७) तत्रैव : अंक १३ वा, १ एप्रिल १८९४, पृ. २.

३८)डॉ. मोरे गिरीश : मराठी निबंध : उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती, २००९, पृ. २६१.

३९) तत्रैव : पृ १७० (१४).

४०) तत्रैव : पृ. १२९ (३).

४१)डॉ.आंबेडकर बाबासाहेब : तत्रैव, पृ. २०७ (५).

४२) तत्रैव : पृ. २०८ (६).

४३) डॉ.मोरे गिरीश, 'मराठी निवंध उद्‌गम आणि विकास', प्रथमावृत्ती, २००९, पृ. २७५.

४४) प्रा.जाधव रा.ग, वाङ्मयीन निवंधलेखन, पुणे, १९७७, पृ.९४.

४५) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५, पृ.५९.

# साधनसूची

कालखंडानुसार सर्वसाधारण संख्यात्मक तक्ता.

| अ. नं. | विषय | १९२२ ते १९३२ | १९३३ ते १९४३ | १९४४ ते १९५४ | १९५५ ते १९६५ | १९६६ ते १९७६ | १९७७ ते १९८७ | १९८८ ते २००२ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैचारिक | | ९ | २ | २० | १४ | ८२ | ४९ | १७७ |
| २. | सामाजिक | | १६ | | | ३ | २१ | १४ | ५४ |
| ३. | शैक्षणिक | ३ | ७ | | | १ | ५ | ५ | २१ |
| ४. | धर्म धार्मिक | | २ | | ३ | ७ | २१ | १५ | ४८ |
| ५. | भ. महावीर | | १ | | २ | ४ | १० | १३ | ३० |
| ६. | आ. कुंदकुदाचार्य | | | | | | | २ | २ |
| ७. | आ. शांतिसागर | | | | | | १ | १ | २ |
| ८. | पद्मावती | | | | | | १ | | १ |
| ९. | स्त्री विषयक | | ३८ | २ | ३ | ३ | २७ | २३ | ९६ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० . | गृहिणी विषयक | | ४ | | १ | | २२ | ८ | ३४ |
| ११ . | आरोग्य | | १ | | १ | | २२ | ८ | ३२ |
| १२ . | कथा | | २० | १ | २ | | १० | ७ | ४० |
| १३ . | कविता | | १२ | ७ | २३ | २१ | २१ | १३ | ९७ |
| १४ . | प्रवास वर्णन | २ | १ | | १ | | ५ | | ९ |
| १५ . | ग्रंथ परिक्षण | | २ | १ | ४ | | ७ | ८ | २२ |
| १६ . | भाषणे | ६ | १० | ३ | १० | ३ | ७ | ५ | ४४ |
| १७ . | व्यक्ती परिचय | | ६ | | ६ | ३ | १३ | १८ | ४६ |
| | एकूण | ११ | १२९ | १६ | ७६ | ५९ | २७५ | १९० | |

## विवेचन

१ . शंभर वर्षात एकूण ७६८ लेख . २ . १९७७ ते १९८७ सर्वात जास्त लेखन (२८५) .
३ . १९२२ ते १९३२ सर्वात कमी लेखन (११) . ४ . १९४४ ते १९५४ स्वातंत्र्याच्या कालखंडातील अत्यल्प लेखन (फक्त १६) . ५ .१९३३ ते १९४३ या १० वर्षांमधील मार्च १९३३ ते १९४० या कालावधीमधील अंक वाचण्याएवढा सुस्थितीत नसताना देखील (म्हणजे राहिलेल्या केवळ पाच वर्षा ंत) १२९ लेख मिळाले . म्हणजे १९३३ ते १९४३ या दशकालाच (स्त्री शिक्षणाचा फारसा प्रचार झालेला नसतानाही) स्त्री लेखनाचा सुवर्णकाळ म्हणता येईल .